# लोकलेखा समिती

## (२०१०-२०११)

### (बारावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ च्या
नागरी अहवालामधील
शालेय शिक्षण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.१),
गृहनिर्माण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.२ व ४.२.३),
रोजगार व स्वयंरोजगार विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.३),
सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.४),
उच्च व तंत्र शिक्षण / शालेय शिक्षण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.५),
उच्च व तंत्र शिक्षण विभागशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.६),
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.७),
वित्त व गृह विभागाशी संबंधीत (परिच्छेद क्र. ४.१.१),
गृह विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.२.१),
जलसंपदा विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.२.६, ४.२.७ व ४.२.८),
सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.३.३),
आदिवासी विकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.३.५),
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय (पशुसंवर्धन)
विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.१) यावरील

# आठवा अहवाल

( हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास
दिनांक एप्रिल, २०१२ रोजी सादर करण्यात आला )

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
२०१२

# लोकलेखा समिती

# २०१०-२०११

## (बारावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ च्या
नागरी अहवालामधील
शालेय शिक्षण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.१),
गृहनिर्माण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.२ व ४.२.३),
रोजगार व स्वयंरोजगार विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.३),
सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.४),
उच्च व तंत्र शिक्षण / शालेय शिक्षण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.५),
उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.६),
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.७),
वित्त व गृह विभागाशी संबंधीत (परिच्छेद क्र. ४.१.१),
गृह विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.२.१),
जलसंपदा विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.२.६, ४.२.७ व ४.२.८),
सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.३.३),
आदिवासी विकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.३.५),
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय (पशुसंवर्धन)
विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.१) यावरील

# आठवा अहवाल

## लोकलेखा समिती
## २०१०-२०११

**समिती प्रमुख**

१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

**<u>सदस्य</u>**

२) श्री.कालिदास कोळंबकर - वि.स.स.
३) श्री.निलेश देशमुख-पारवेकर - वि.स.स.
४) डॉ.नामदेव उसेंडी - वि.स.स.
५) श्री.अमित देशमुख - वि.स.स.
६) श्री.रामप्रसाद कदम-बोर्डीकर - वि.स.स.
७) श्री. रवि राणा - वि.स.स.
८) श्रीमती मिनाक्षी पाटील - वि.स.स
९) श्री.ए.टी.पवार - वि.स.स.
१०) श्री.नवाब मलिक - वि.स.स.
११) श्री.विलास लांडे - वि.स.स.
१२) श्री.शिवेंद्रसिंह भोसले - वि.स.स.
१३) श्री.संजय सावकारे - वि.स.स.
* १४) श्री.सुधीर मुनगंटीवार - वि.स.स.,(दि.२० ऑक्टोबर, २०१० रोजी पर्यंत)
** १४ (अ) प्रा. राम शिंदे- वि.स.स. (दि.२० ऑक्टोबर,२०१० रोजीपासून) (दिनांक ३० मार्च, २०१२ पासून निलंबित)
१५) श्री.गिरीष महाजन - वि.स.स.
१६) श्री.नानाभाऊ पटोले - वि.स.स.
१७) श्री.सुर्यकांत दळवी - वि.स.स.
१८) श्री.आर.एम.वाणी - वि.स.स.
*** १९) श्री.एकनाथ शिंदे - वि.स.स. (दिनांक ३० मार्च, २०१२ पासून निलंबित)
२०) श्री.बाळा नांदगावकर - वि.स.स.
२१) श्री. सुरेशदादा देशमुख - वि.प.स.
२२) श्री.भाई जगताप - वि.प.स.
**** २३) श्री. राजेंद्र जैन - वि.प.स.
***** २४) श्री. विनोद तावडे - वि.प.स.(दिनांक २३ डिसेंबर, २०११ रोजीपासून विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र, विधानपरिषद पदी निवड)
२४ (अ) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. (दिनांक ६ फेब्रुवारी, २०१२ रोजीपासून)
२५) डॉ. दिपक सावंत - वि.प.स.

सदरहू समिती दिनांक २४/२/२०१० रोजी विधानसभा व दिनांक २/३/२०१० रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.
२) श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.
३) श्री. सु. सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार.
४) श्री. ॠतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
५) श्री. दिलीप येवला, अवर सचिव (समिती).
६) श्री. सोमनाथ न. सानप, कक्ष अधिकारी.

*** श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१० रोजी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर प्रा. राम शिंदे, वि.स.स. यांची मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१० रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

** प्रा.राम शिंदे, वि.स.स. यांना दिनांक ३० मार्च, २०१२ रोजी पासून सभागृहाने निलंबित केल्याने रिक्त.
*** श्री.एकनाथ शिंदे, वि.स.स. यांना दिनांक ३० मार्च, २०१२ रोजी पासून सभागृहाने निलंबित केल्याने रिक्त.

**** श्री.राजेंद्र जैन,वि.प.स.यांची दिनांक ५ डिसेंबर,२०१० रोजी विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे सदरची जागा रिक्त आहे.

***** श्री.विनोद तावडे, वि.प.स. यांची दिनांक २३ डिसेंबर, २०११ रोजी विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद पदी निवड झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांची मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक ६ फेब्रुवारी, २०१२ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

## प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ च्या नागरी अहवालामधील शालेय शिक्षण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.१ व ३.५), गृहनिर्माण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.२ व ४.२.३), रोजगार व स्वयंरोजगार विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.३), सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.४), उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.५ व ३.६), अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.७), वित्त व गृह विभागाशी संबंधीत (परिच्छेद क्र. ४.१.१), गृह विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.२.१), जलसंपदा विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.२.६, ४.२.७ व ४.२.८), सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.३.३), आदिवासी विकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.३.५), कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय (पशुसंवर्धन) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.१) यावरील यावर विचार करुन लोकलेखा समितीचा आठवा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक २९ जून, २०१०, दिनांक ५,६,१९,२० व २७ ऑक्टोबर, २०१०, दिनांक १९ जानेवारी, २०११, दिनांक १,२,८,९,१५,२१ व २२ फेब्रुवारी, २०११, दिनांक १ मार्च, २०११, दिनांक १३ जुलै, २०११, व दिनांक ४ ऑक्टोबर, २०११ रोजी अपर मुख्य सचिव, गृह विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण, गृहनिर्माण, गृह (विशेष), वित्त, नियोजन, ऊर्जा, आदिवासी विकास आणि सामान्य प्रशासन विभाग, सचिव, रोजगार व स्वयंरोजगार, उच्च व तंत्र शिक्षण, सामान्य प्रशासन, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, गृह (बंदरे), जलसंपदा व जलसंपदा (लाभक्षेत्र विकास) आणि कृषी व पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय (पशुसंवर्धन) विभाग यांची साक्ष विधान भवन, मुंबई येथे घेतली.

प्रधान महालेखाकार, महाराष्ट्र-१, मुंबई तसेच महालेखाकार, महाराष्ट्र-२, नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरुन बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांची देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट "ब" मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक १० एप्रिल, २०१२ रोजी झालेल्या बैठकीत हा अहवाल विचारात घेतला व त्यास काही फेरफारासंह मान्यता दिली.

**विधान भवन,**
**मुंबई.**
**दिनांक : १० एप्रिल, २०१२**

**गिरीश बापट,**
**समिती प्रमुख,**
**लोकलेखा समिती**

## (सहा)
# अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | विभाग व तपशील (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | **सन २००५-२००६ च्या नागरी अहवालामधील परिच्छेद** | |
| | **शालेय शिक्षण विभाग** | |
| **(१)** | शालेय शिक्षण अभियान (परिच्छेद क्र.३.१) | |
| | **गृहनिर्माण विभाग** | |
| **(२)** | (अ) वाल्मिकी आंबेडकर मलिन वस्ती आवास योजना (परिच्छेद क्र.३.२)<br>(ब) जमिनीच्या किंमती स्वेच्छेने (Arbitrary) ठरविल्यामुळे झालेले नुकसान (परिच्छेद क्र.४.२.३) | |
| | **रोजगार व स्वयंरोजगार विभाग** | |
| **(३)** | महाराष्ट्रातील सेवायोजन विनिमयाचे संगणकीकरण (परिच्छेद क्र. ३.३) | |
| | **सामान्य प्रशासन विभाग** | |
| **(४)** | सेतू केंद्राचा माहिती तंत्रज्ञान आढावा (एकात्मीकृत नागरिक सेवा केंद्रे) (परिच्छेद क्र.३.४) | |
| | **शालेय शिक्षण विभाग** | |
| **(५)** | शिक्षण संस्थांना दिलेल्या सहायक अनुदानाची लेखा परीक्षा (परिच्छेद क्र.३.५) | |
| | **उच्च व तंत्र शिक्षण विभाग** | |
| **(६)** | शिक्षण संस्थांना दिलेल्या सहायक अनुदानाची लेखा परीक्षा (परिच्छेद क्र.३.५) | |
| **(७)** | डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रविद्याविषयक विद्यापीठाची कार्ये (परिच्छेद क्र.३.६) | |
| | **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग** | |
| **(८)** | अन्न सुरक्षा, अनुदान व अन्नधान्याचे व्यवस्थापन (परिच्छेद क्र.३.७) | |


..२..

..२..

**वित्त व गृह विभाग**

**(९)** वाहतुक भत्याचे अतिरिक्त प्रदान
(परिच्छेद क्र.४.१.१)

**गृह विभाग**

**(१०)** परवानाधारकास दाखविलेली अवाजवी मेहरबानी
(परिच्छेद क्र.४.२.१)

**जलसंपदा विभाग**

**(११)** (अ) चलत अग्रीमाची अनधिकृत अदायगी
(परिच्छेद क्र.४.२.६)
(ब) कामाचे अनियमित वाटप
(परिच्छेद क्र. ४.२.७)
(क) कंत्राटदाराला अतिरिक्त प्रदान
(परिच्छेद क्र.४.२.८)

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**(१२)** पुलाचे बांधकामावर निष्फळ खर्च
(परिच्छेद क्र.४.३.३)

**आदिवासी विकास विभाग**

**(१३)** विजेच्या पंपावरील निष्फळ खर्च
(परिच्छेद क्र.४.३.५)

**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय (पशुसंवर्धन) विभाग**

**(१४)** पशुसंवर्धन विभागातील अंतर्गत नियंत्रण यंत्रणा
(परिच्छेद क्र.५.१)

## शालेय शिक्षण विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील **परिच्छेद क्रमांक ३.१ "सर्व शिक्षा अभियान"** या संदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिलेले आहेत.

**आर्थिक निधी आणि खर्च -**

**१.१** वार्षिक मंजूर निधी, केंद्र आणि राज्य शासनाने दिलेला निधी आणि केलेला खर्च यांचा वर्षनिहाय तपशील खालील तक्त्यात दर्शविलेला आहे आणि प्रत्येक घटकानुसार झालेला खर्च खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | प्रकल्प मान्यता मंडळाने मंजूर केलेल्या खर्चाचा आराखडा | | | महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेला मिळालेला निधी | | | उपलब्ध निधीतून केलेला खर्च (टक्के) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | GOI चा वाटा | राज्य सरकारचा वाटा | एकूण | GOI कडून | राज्य सरकार कडून | एकूण | |
| २००१-०२ | ८८.८२ | १५.६७ | १०४.४९ | ४८.१८ | ००.०० | ४८.१८ | Nil (०) |
| २००२-०३ | ३२३.४१ | १०७.८१ | ४३१.२२ | ११०.०० | १९.९० | १२९.९० | ९६.७१ (५४) |
| २००३-०४ | ५७३.५८ | १९१.१९ | ७६४.७७ | २०५.२७ | ८९.६३ | २९४.९० | ३३३.६४ (८९) |
| २००४-०५ | ६४१.५४ | २१३.८५ | ८५५.३९ | ३५४.९० | ८३.४९ | ४३८.३९ | ३८५.१६ (८०) |
| **एकूण** | **१६२७.३५** | **५२८.५२** | **२१५५.८७** | **७१८.३५** | **१९३.०२** | **९११.३७** | **८१५.५१ (८९)** |

SSA करिता २००१-०२ मध्ये खर्चाचा मंजूर आराखडा हा रु.८८.८२ कोटी होता, त्यानुसार भारत सरकारने रु.४८.१८ कोटीचा आपला वाटा (जुलै २००१-मार्च २००२) दिला. राज्य शासनाने ही योजना जानेवारी २००२ मध्ये सुरु केली आणि २००१-०२ च्या अर्थसंकल्पात SSA च्या कार्यान्वयाकरिता त्यांच्या वाट्याची (रु.१५.६७ कोटी) काहीही तरतूद केली नव्हती. परिणामी, २००१-०२ मध्ये भारत सरकारने आपला उर्वरित रु.४०.६४ कोटीचा वाटा दिला नाही आणि न वापरलेली रक्कम २००२-०३ मध्ये वापरण्याची राज्य शासनाला परवानगी (मे २००२) दिली. राज्य शिक्षण मंत्र्यांच्या ऑक्टोबर १९९८ मध्ये झालेल्या परिषदेमधील शिफारशींनुसार योजना निर्गमित केली गेली आणि त्यामुळे भारत सरकारने योजना चालू करावयाचे वेळी राज्य शासनाने कार्यक्रमाचे कार्यान्वयन करण्यासाठी तयारीत राहणे अपेक्षित होते. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने असे नमूद केले की, राज्य शासनाने SSA करिता २००१-०२ मध्ये योग्य अर्थसंकल्पीय तरतूद केली नाही.

२००१-२००५ करिता प्रकल्प मान्यता मंडळाने (PAB) रु.२१५५.८७ कोटी च्या खर्चाचा आराखडा मंजूर केला. तथापि, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेला केंद्र व राज्य शासनाकडून फक्त रु.९११.३७ कोटी (४२ टक्के) मिळाले. अशाप्रकारे, २००१-२००५ दरम्यान निधी प्राप्त मध्ये रु.१,२४४.५० कोटीची एकूण तूट होती. उपलब्ध असलेल्या निधीपैकी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदने रु.८१५.९१ कोटी (८९ टक्के) खर्च केले आणि उर्वरित रु.९५.८६ कोटी त्यांच्याकडे पडून होते.

योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे पहिल्या सहा महिन्यांचा खर्च भागविण्यासाठी भारत सरकारने १५ एप्रिल पर्यंत अनुदान द्यावयाचे होते. तथापि, असे दिसून आले की निधी देण्यात भारत सरकारकडून दोन ते पाच महिन्यांचा विलंब झाला. राज्य शासनाचा हिस्सा सुद्धा पाच महिने उशिराने देण्यात आला. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद साधनसंपत्ती सुसज्ज करण्यातच अपयशी ठरली नाही तर असलेल्या निधीचा वापर करण्यात सुद्धा अपयशी ठरली आणि त्यामुळे राज्यात SSA च्या कार्यान्वयाला अपेक्षित गति मिळाली नाही.

**ज्ञापन :**

**१.२** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

२००१-२००५ या वर्षात महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेला केंद्र आणि राज्य शासनाकडून रु.९११.३७ कोटी इतकी रक्कम मिळाली. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने रु.८१५.५७ कोटी इतकी रक्कम खर्च केली आणि खर्च न केलेली शिल्लक रक्कम रु.९५.८६ कोटी इतकी होती.

२००१-२००५ या कालावधीत शिक्षण प्रशिक्षण साहित्य उप कार्यक्रम, शिक्षण प्रशिक्षण, विकलांगांसाठी एकात्मिक शिक्षण नाविन्यपूर्ण कार्यक्रम शाळेतील मुलांऐवजी लोक प्रतिनिधींचे प्रशिक्षण, नागरी कामे आणि मुलींच्या शिक्षणासाठी प्राथमिक स्तरावरील राष्ट्रीय कार्यक्रम या बाबींवर कमी खर्च झाल्यामुळे महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडून रु.९५.८६ कोटी इतकी रक्कम न वापरता शिल्लक राहिली. प्रत्यक्ष लक्ष्य आणि आर्थिक कामगिरीबाबतचे विवरण यासोबत जोडले आहे. **(विवरण क्र.१)**

**विद्यमान केंद्रीय योजनांचा पूर्व प्राथमिक शिक्षणावरील अखर्चित निधी**

**१.३** भारत सरकारच्या सर्व विद्यमान पूर्व प्राथमिक शिक्षण योजना दहाव्या पंचवार्षिक योजनेपासून SSA शी केंद्राभिमुख होणार होत्या. असे आढळून आले की, नोव्हेंबर २००५ पर्यंत MPSP ने जून २००३ मध्ये बंद झालेल्या जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रमाचे रु.१.५२ कोटी SSA ला हस्तांतरीत केलेले नव्हते.

**ज्ञापन :**

**१.४** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

भारत सरकारला देय आहे अशी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडे असलेल्या जिल्हा प्राथमिक शिक्षण प्रकल्पाचे कार्यक्रम एक आणि दोन खालील खर्च न केलेली शिल्लक रक्कम आणि त्यावरील व्याज या कार्यालयाच्या खालील क्रमांकाच्या पत्रांनी परत करण्यात आली आहे.

१. म.प्रा.शि.प./उपसं/(एफॲन्डए)लेखा-३/परतावा/जि.प्रा.शि.प./
२००५-०६/२७९५/दि.१७/६/२००५

२. म.प्रा.शि.प./उपसं/(एफॲन्डए)लेखा-३/परतावा/जि.प्रा.शि.प./
२००८-०९/४९०४/दि.१२/९/२००८

३. म.प्रा.शि.प./उपसं/(एफॲन्डए)लेखा-३/परतावा/जि.प्रा.शि.प./
२००८-०९/६९३७/दि.२३/१२/२००८

या सोबत चलनांसह या पत्रांच्या प्रती जोडल्या आहेत. व्याजासह खर्च न केलेली शिल्लक रक्कम कार्यालयीन पत्र क्र.म.पा.शि.पकृउपसं (विवले) लेखा-३/अखर्चित/एकूण/जि.प्रा.शि.प./एक आणि दोन/२००८०९/४९९६ दि.१७/९/२००८ द्वारे परत केली आहे. चलनांसह पत्राची प्रत सोबत जोडली आहे. **(विवरण क्र.२)**

**निधी अडकवून ठेवणे -**

**१.५** SSA अंतर्गत जिल्हा पातळीवर प्रत्येक प्राधिकाऱ्याने कुठल्याही राष्ट्रीयकृत किंवा अनुसूचित बँकेमध्ये तर गट आणि ग्राम पातळीवर कुठल्याही राष्ट्रीयकृत किंवा अनुसूचित बँकेत किंवा डाक कार्यालयात बचत खाते उघडावयाचे होते. छाननीत (नोव्हेंबर २००५) असे उघडकीस आले की, २००२-२००४ मध्ये MPSP ने मुदत ठेवींमध्ये रु.१४८ कोटी गुंतवले आणि रु.७.२१ कोटीचे व्याज मिळविले. मुदत ठेवीमध्ये निधी ठेवणे हे नियमबाह्य होते. तथापि, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदने मुदत ठेवीमध्ये निधी ठेवणे सुरुच ठेवले आणि पुन्हा एप्रिल व नोव्हेंबर २००५ दरम्यान रु.३.२९ कोटी मुदत ठेवींमध्ये गुंतविले. मे २००१ मध्ये, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदने ZP ना जिल्हा केंद्रीय सहकारी (DCC) बँकेमध्ये बचत खाते उघडावयाचे अनुदेश दिले. हा आदेश SSA निधी जमा करण्यासाठी भारतीय स्टेट बँकेत बचत खाते उघडण्याच्या निदेशांसहित मागे घेण्यात आला. या निदेशाच्या विपरीत ZP, नांदेड अंतर्गत असलेल्या शाळांनी योजनेचा निधी हा नांदेड DCC बँकेत ठेवणे सुरुच ठेवले, असे दिसून आले की, सप्टेंबर २००४ पासून शाळा प्राधिकारी वर्ग DCC बँकेतून रु.१.४७ कोटीचा SSA निधी बँकेच्या

वाईट आर्थिक परिस्थितीमुळे वापरु शकले नाहीत. अशाप्रकारे, अनुदेशांचे पालन करण्यातील शाळांच्या अपयशामुळे SSA अंतर्गत विविध घटकांचे कार्यान्वयन बाधित झाले आणि निधी अखर्चित राहिला.

लेखापरीक्षेत असे निदर्शनास आले की, SSA चा घटक असलेल्या पूर्व प्राथमिक पातळीवर मुलींच्या शिक्षणाच्या राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत (२००४-२००५) मिळालेले रु.११.५० लाख ठेवण्यासाठी ऑक्टोबर २००५ पर्यंत बृहन्मुंबई महानगर पालिकेने (BMC) कुठल्याही राष्ट्रीयकृत बँकेत बचत खाते उघडले नव्हते.

तसेच, SSA अंतर्गत पिंपरी-चिंचवड व पुणे MC आणि ZP, अहमदनगर यांना नागरी कामांसाठी रु.३.२७[४] कोटी प्राप्त झाले. ही रक्कम MC निधी खाते, प्राथमिक शिक्षण खाते व ZP खात्यामध्ये वर्ग करण्यात आली.

**ज्ञापन :**

**१.६** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

भारत सरकार आणि राज्य शासन यांचे कडून मिळालेल्या निधीवर उपार्जित केलेल्या व्याजाच्या हिशेबांच्या संबंधातील मार्गदर्शक तत्त्वे राज्य अंमलबजावणी संस्थांना निर्गमित करण्यात आली. (पहा-भारत सरकारचे पत्र क्र.१५.५.२००३-सर्व शिक्षा अभियान (पीआर) दि.२८ एप्रिल, २००५) त्यानुसार मुदतबंद ठेवीवर आणि बचत खात्यावर उपार्जित झालेली व्याजाची रक्कम जमा करण्याची कार्यवाही राज्य स्तरावर हाती घेण्यात आली आहे आणि रु.३,४६,६३,९६४ इतकी रक्कम (व्याजासह मुदतबंद ठेवीची रक्कम) बचत बँक खात्यात जमा करण्यात आली. (पहा-पत्र क्र.म.प्रा.शि.प.उपसं/(विवले)लेखा/अल्प मुदत ठेव/०६/१९६४/दि. २७/४/२००६.) त्याचप्रमाणे, राज्य आणि जिल्हा स्तरावरील मुदतबंद ठेवीवर उपार्जित झालेल्या व्याजाची रु.१७,०६,१००/- इतकी रक्कम दि.२८ एप्रिल, २००६ रोजी बचत खात्यात जमा करण्यात आली. उपार्जित व्याजाच्या रकमांबाबत भारत सरकार आणि राज्य शासनाला कळविण्यात आले आहे आणि त्या रकमा संचयी वर्षामध्ये सहायक अनुदानाच्या लेख्यात समायोजित करण्यात आल्या. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडे उपलब्ध असलेल्या एकूण अखेरच्या शिल्लक रकमा वजा करुन सहायक अनुदान मंजूर करण्यात आले.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने सर्व शिक्षा अभियान आणि मुलींच्या शिक्षणासाठी प्राथमिक स्तरावरील राष्ट्रीय कार्यक्रम यासाठी भारतीय स्टेट बँकेत बचत खाते उघडले आहे.

प्रत्येक वित्तीय वर्षाच्या अखेरीस बचत खात्यावर उपर्जित झालेल्या व्याजाची रक्कम, राज्य स्तरावरील बचत खात्यात जमा करण्यात येते आणि संबंधित शासनांकडून योग्य त्या मान्यतेने नंतरच्या

वित्तीय वर्षाचा त्या-त्या शासनाचा हिस्सा म्हणून प्रमाणानुसार रकमा समजण्यात येतात. भारत सरकारच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडून मान्यता मिळाल्यानंतर केवळ पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने रु.१.५६ कोटी इतकी रक्कम महानगरपालिकेच्या नागरी कामे हाती घेण्याच्या निधीत हस्तांतरीत केली आहे. (पहा-पत्र क.एफ क्र.४-३ २००४/प्राशि-८ दिनांक २८ फेब्रुवारी, २००५ प्रत जोडली आहे.) **(विवरण क्र.३)**

याशिवाय, पुणे महानगरपालिकेने नागरी बांधकामे हाती घेण्याची रु.८७.१० लाख इतकी रक्कम महानगरपालिकेच्या निधीत हस्तांतरित केली. कारण त्या महानगरपालिकेने तिचा हिस्सा दिला होता आणि नागरी बांधकामे पूर्ण केलीत. तथापि, महानगरपालिकेकडे निधी हस्तांतरण करण्यास भारत सरकारने मान्यता दिल्यामुळे आता तीच रक्कम सर्व शिक्षा अभियानाच्या बचत खात्यात जमा करण्यात आली आहे. मानव संसाधन विकास विभाग प्राथमिक शिक्षण व साक्षरता पत्र क्र.एफक्र ४-५ ईई-८ दि.२७ फेब्रुवारी, २००६ याद्वारे निधीसंबंधात आणि नागरी कामे हाती घेण्याबाबत मंजुरी मिळाली आहे. (पत्राची प्रत सोबत जोडली आहे.) **(विवरण क्र.४)** सर्व शिक्षा अभियानांतर्गत कोणताही तांत्रिक कर्मचारी वर्ग नसल्यामुळे अहमदनगर जिल्हा परिषदेने, गट साधन केंद्राचे बांधकाम हाती घेण्यासंबंधातील रु.८४ लाख इतका निधी, सर्व शिक्षा अभियानाच्या बचत खात्यातून जिल्हा परिषद निधीच्या बचत खात्यात हस्तांतरीत केला. जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कक्षाने कामावर लावलेल्या कंत्राटदारांकडून १४ गट साधन केंद्रांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. त्यासाठी संपूर्ण रक्कम वापरण्यात आली.

शाळेच्या इमारतीचे बांधकाम करणे, शिक्षकांचे अनुदान, शाळा अनुदान आणि दुरुस्ती व देखभाल अनुदान या संबंधातील रु.९३.२३ लाख इतका निधी शाळा स्तरावरील ग्राम शिक्षण समितीला गट शिक्षण अधिकाऱ्यामार्फत वितरित करण्यात आला म्हणून ही बाब निधी वळविणे होत नाही.

**उपयोजन प्रमाणपत्र सादर करणे -**

**१.७** महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद ने आर्थिक वर्ष संपल्यापासून नऊ महिन्यांच्या आत केंद्र आणि राज्य शासनाला अनुदानाचे उपयोजन प्रमाणपत्र सादर करावयाचे होते. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद ने २००२-२००३ या वर्षाचे उपयोजन प्रमाणपत्र भारत सरकारला ऑक्टोबर २००४ मध्ये म्हणजेच १० महिन्यांच्या विलंबाने सादर केले. तथापि, २००१-२००२ मध्ये प्रकल्प पूर्व कामासाठी मिळालेल्या रु.४.२८ कोटी रकमेचे उपयोजन प्रमाणपत्र सादर केलेले नाही.

शालेय प्राधिकाऱ्यांनीही प्राप्त अनुदानाचे उपयोजन प्रमाणपत्र संबंधित प्राधिकाऱ्यांना आर्थिक वर्ष संपल्यानंतर एक महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक होते.

दोन नगरपरिषदा, सात गट तालुके आणि शाळा निरीक्षक, उत्तर परिमंडळ, मुंबई यांच्या अभिलेखांच्या तपासणीमध्ये असे उघडकीस आले की, २००२-२००५ या कालावधीत रु.३.६४ कोटी आणि रु.७७.४६ लाखाचे अनुदान अनुक्रमे ३६६२ शासकीय आणि १२६५ खाजगी शाळांना वितरित करण्यात आले.

२००२-२००५ या वर्षाकरिता १८३१ शासकीय शाळांकडून रु.१.६४ कोटी आणि २००३-२००४ या वर्षाकरिता ८६४ खाजगी शाळांकडून रु.४८.५४ लाख रक्कमेची उपयोजन प्रमाणपत्रे प्राप्त झाली नव्हती. यावरुन, योजनेच्या कार्यान्वयनाचे योग्य रीतीने संनियंत्रण केले गेले नाही हे निदर्शनास येते.

**ज्ञापन :**

**१.८** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

प्रकल्पपूर्व कार्यक्रमांसाठी मिळालेल्या रकमेचा वापर केल्यासंबंधीचे प्रमाणपत्रे, खालील पत्रांद्वारे भारत सरकारला सादर करण्यात आली आहेत. **(विवरण क्र.५)**

| | |
|---|---|
| १) २००२/०३-म.प्रा.शि.प./ उपसं/(एफॲन्डए)/वापर केल्यासंबंधीचे प्रमाणपत्र/ २००४/०५ ३२६२ दि.११.१०.०४. | २) २००३/०४- म.प्रा.शि.प.सशिअ लेखा४/२००५ ०६/१८२३ दि.१५.०४.०५. |
| ३) २००४/०५- म.प्रा.शि.प./ उपसं/(एफॲन्डए) लेखा ४/लेखापरीक्षा अहवाल- २००५०६/१७३ दि.१६.१.०६ | ४) २००५/०६- म.प्रा.शि.प.- उपसं(एफॲन्डए) लेखा-४/लेखा परीक्षा अहवाल/२००६ ०७/५९०० दि.२८.१२.०६ |

**शाळा प्रवेश व नाव नोंदणी यांची रुपरेखा**

**१.९** २००२-०३ पर्यंत राज्यात ७२०३३ वस्त्या होत्या. त्यापैकी, ३,२८१ वस्त्या शालेय शिक्षण सुविधेपासून वंचित होत्या. शासनाने २००३-०५ मध्ये नवीन प्राथमिक शाळा उघडल्या नाहीत. तथापि, बहुतेक गावांमध्ये वस्तीशाळा (पर्यायी शाळा) उघडल्या गेल्या. मार्च, २००५ पर्यंत ३७० वस्त्या (एकूण वस्त्यांच्या ०.५१ टक्के) शालेय शिक्षणापासून वंचित राहिल्या. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदने (नोव्हेंबर, २००५) नमूद केले की, २००५-०६ मध्ये या वस्त्या समाविष्ट केल्या जातील. SRI च्या

सर्वेक्षणानुसार, २.१ टक्के गावे व ३.८ टक्के नागरी गट शालेय शिक्षण सुविधेपासून वंचित राहिली आहेत.

नोव्हेंबर, २००५ पर्यंत मार्च, २००२ ला नोंदणी केलेल्या १५.७९ लाख बालकांपैकी १.०६ लाख बालके शालेय शिक्षणापासून वंचित राहिलीत.

राज्यातील सहा ते १४ वर्षे वयोगटातील १.७५ कोटी बालकांपैकी, फेब्रुवारी व मार्च २००१ मध्ये १५.७९ लाख बालके शालेय शिक्षणापासून वंचित होती. त्यापैकी नोव्हेंबर, २००४ पर्यंत १४.४३ लाख बालके समाविष्ट केली गेलीत. तथापि, डिसेंबर, २००४ मध्ये केलेल्या दुसऱ्या सर्वेक्षणात ४.२९ लाख बालके शालेय शिक्षणापासून वंचित राहिल्याचे निदर्शनास आले. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने नमूद केले (डिसेंबर,२००५) की, नोव्हेंबर २००५ ला आणखी ३.२३ लाख बालके नियमित आणि पर्यायी शाळांद्वारे समाविष्ट केली गेली आणि फक्त १.०६ लाख बालके शालेय शिक्षणापासून वंचित राहिली (नोव्हेंबर, २००५ ला असलेल्या १.६७ कोटी बालकांच्या ०.६३ टक्के). अशाप्रकारे २००३ पर्यंत सर्व बालके नोंदविण्याचे SSA चे उद्दिष्ट नोव्हेंबर, २००५ पर्यंत साध्य झाले नाही. SRI च्या सर्वेक्षणानुसार महाराष्ट्रात ६ ते १४ या वयोगटातील प्रती हजारी २८ बालके (२.८ टक्के) ही शालेय शिक्षणापासून वंचित राहिली आहेत. ग्रामीण भागामध्ये १००० बालकांपैकी ३६ व नागरी भागात १००० बालकांपैकी १९ बालके शालेय शिक्षणापासून वंचित राहिलीत.

चाचणी तपासणी केलेल्या १६२ शाळांमध्ये असे आढळून आले की, २००१-२००२ मध्ये राज्यात जेव्हा SSA चे कार्यान्वयन सुरु झाले नव्हते त्यावेळेस चार टक्के बालके शाळा सोडून जात होती. तथापि, २००२-०५ दरम्यान शाळा सोडून जाण्याचे प्रमाण सहा टक्के पर्यंत वाढले.

**ज्ञापन :**

**१.१०** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

नमुना गट तालुके, महानगरपालिका येथे महात्मा फुले शिक्षण हमी योजनेंतर्गत अशासकीय संस्थाकडून चालविण्यात येणाऱ्या शिक्षण हमी योजनेत नावनोंदणी झालेल्या मुलांपैकी ३२१ इतकी मुले अन्य तालुके किंवा वस्त्यांमध्ये स्थलातंरित झाली, ४५३ इतक्या मुलांनी जवळपासच्या शिक्षण हमी योजना केंद्रामध्ये (वस्तीशाळा) नावनोंदणी केली, १९३ इतक्या मुलांनी जुलै, ऑगस्ट, २००५ मध्ये नियमित शाळांमध्ये नावनोंदणी केली. संबंधित जिल्ह्यांनी दिलेल्या माहितीनुसार २००५-०६ या वर्षी चालविण्यात आलेल्या महात्मा फुले शिक्षण हमी योजनेअंतर्गत केंद्रात उरलेल्या मुलांची नावनोंदणी करण्यात आली.

**कामे पूर्ण होण्यातील विलंब -**

**१.११** SSA मध्ये नागरी कामांवर संपूर्ण प्रकल्प खर्चाच्या जास्तीत जास्त ३३ टक्के मर्यादेपर्यंत खर्च करण्याची मुभा आहे. नागरी कामे ही ग्राम शिक्षण समिती द्वारा निष्पादित करावयाची होती. ५४,६५८ नागरी कामांकरिता रु.६२३ कोटींची तरतूद (२००२-२००५) असतांना रु.३०९ कोटी खर्च करुन १९,९९९ नागरी कामे पूर्ण (२००३-२००५) केली गेली. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने (नोव्हेंबर २००५) विलंबाचा संबंध हा पुरेसा निधी उपलब्ध असतांनाही राज्य शासनाद्वारे नागरी कामे मंजूर करण्यातील विलंबाशी लावला. चाचणी तपासणीत (नोव्हेंबर २००५) असे निदर्शनास आले की, २००३-२००५ मध्ये सात जिल्ह्यांच्या ३१ गटांमध्ये रु.१०.४१ कोटी खर्च करुन सुद्धा ७०५ कामे ही पाण्याची टंचाई, VEC च्या स्थानिक समस्या व जमिनीच्या समस्येमुळे कामे पूर्ण करण्याच्या निर्धारित तारखेनंतर एक ते १५ महिने अपूर्ण राहिली.

त्याचप्रमाणे, सात गटांमध्ये ज्यावर रु.३९.८० लाख खर्च करावयाचा होता, अशी ४२ कामे एकतर चालूच झाली नाहीत किंवा मुख्यत: जमिनीच्या समस्येमुळे थांबविण्यात आली ज्याचा परिणाम पैसे अडकून राहण्यात आला.

**ज्ञापन :**

**१.१२** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत शाळा बांधण्याचा कार्यक्रम दिनांक २ ऑक्टोबर, २००३ रोजी सुरु करण्यात आला. २००३-०५ पर्यंत नागरी बांधकामांवर कमी खर्च झाल्याची कारणे खाली दिल्याप्रमाणे आहेत-

१. जिल्हा बांधकाम समितीकडून उशिरा मिळालेली प्रशासकीय मान्यता.

२. स्थानिक कारणांमुळे जमीन उपलब्ध न होणे.

३. अभियंत्यांच्या नेमणुकीस विलंब.

४. साहित्याच्या किंमतीत झालेली वाढ.

५. सामाजिक तसेच राजकीय समस्या.

६. नैसर्गिक समस्या.

७. ग्राम शिक्षण समितीच्या सदस्यांकडून पुढाकार व प्रेरणाचा अभाव.

८. पाणी टंचाई.

राज्य स्तरावरुन सततच्या पाठपुराव्यामुळे आणि मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी जिल्हा प्राधिकाऱ्यांना निर्गमित केलेल्या पत्रामुळे आणि विभागीय आयुक्तांनी सर्व प्राथम्यक्रमाने घेतलेल्या आढाव्यामुळे परिस्थितीत काहीशी सुधारणा झाली आणि फेब्रुवारी, २००९ त्या अखेरीस, ५४६५८ इतक्या एकूण नागरी बांधकामांपैकी ४५६०१ इतकी बांधकामे पूर्ण झाली आणि पुढच्या तीन महिन्यांमध्ये उरलेली बांधकामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे.

**शाळांमधील आवश्यक बाबी -**

**१.१३** SSA अंतर्गत शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय, मुले आणि मुली यांच्यासाठी प्रसाधनगृहे, भिंतीचे कुंपण, खेळाचे मैदान आणि फळा, इ.ची तरतूद करणे करारनिविष्ट केलेले आहे. तथापि, असे दिसून आले की, बऱ्याच शाळांमध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे मूलभूत सोयी उपलब्ध नव्हत्या.

त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे :-

| वर्ष | राज्यातील एकूण शाळांची संख्या | एकूण शाळा ज्यात सुविधा उपलब्ध नव्हत्या (कंसात टक्केवारी) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भिंतीचे कुंपण | खेळाचे मैदान | मुलींसाठी प्रसाधनगृह | सार्वजनिक प्रसाधनगृह | पिण्याचे पाणी | फळा |
| २००२-०३ | ७४५३४** | ३३९४६ (४५) | २५३९२ (३४) | ४६७५१ (६३) | ४१४६७ (५६) | १३९२४ (१९) | ४२५७ (६) |
| २००३-०४ | ७७४८७ | ३४०५६ (४४) | २६२१२ (३४) | ४६४०० (६०) | ४०४५३ (५२) | १४८०४ (१९) | ५८१ (१) |
| २००४-०५ | ७६४०७** | ३३६०२ (४४) | २४३३० (३२) | ४३१८७ (५७) | ३६०९२ (४७) | १४८३५ (१९) | ३६८० (५) |

आकडे मुंबई सोडून आहेत कारण विभाग या वर्षाकरिता आधारसामुग्री देऊ शकला नाही.

शाळांमधील निकृष्ट आवश्यक बाबींमुळे नाव नोंदणी, विद्यार्थ्यांना शाळेत टिकवून ठेवणे आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा दर्जा यावर प्रतिकूल परिणाम झाला.

SRI ने केलेल्या सर्वेक्षणात असे उघडकीस आले की, सुमारे ३.४ टक्के प्राथमिक शाळा, ३.५ टक्के उच्च प्राथमिक शाळा व ५.२ टक्के उच्च प्राथमिक विभाग असलेल्या माध्यमिक शाळा बांधकाम भक्कम नसलेल्या कच्च्या इमारतींमध्ये चालू होत्या आणि म्हणूनच शाळेसारखी संस्था चालविण्यास योग्य नव्हत्या. २५.३ टक्के प्राथमिक शाळा, १२.६ टक्के उच्च प्राथमिक शाळा व १२.५ टक्के उच्च प्राथमिक विभाग असलेल्या माध्यमिक शाळांचे बांधकाम अर्ध पक्के होते. ०.४ टक्के प्राथमिक शाळा व ०.९ टक्के उच्च प्राथमिक शाळा ह्या इमारतींशिवाय चालू होत्या.

**ज्ञापन :**

**१.१४** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

भारत सरकारने, सर्व मुलांना शाळेत प्रवेश घेता यावा या दृष्टीने, वर्गखोल्यांचे बांधकाम करण्यास अग्रक्रम दिलेला आहे. मुलींसाठी स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी यांसारख्या इतर मूलभूत सोयी जसे इतर मूलभूत सोयी संपूर्ण स्वच्छता मोहिमेअंतर्गत पुरवण्यात येत आहेत.

भारत सरकारने २००८-२००९ या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये कुंपण भिंतींना मंजुरी दिलेली आहे आणि प्रत्येक जिल्ह्यासाठीच्या मंजूर खर्चानुसार व आवश्यकतेनुसार त्यांचे बांधकाम करण्यात येईल. मुलांची शाळेतील पटसंख्या टिकून राहण्यासाठी शाळास्तरावर मूलभूत सोयी पुरवण्यासाठी इष्ट प्रयत्न करण्यात येत आहेत. मूलभूत सोयीची सद्यस्थिती पुढील तक्त्यात दर्शवण्यात आलेली आहे.

| वर्ष | राज्यातील एकूण शाळांची संख्या | मूलभूत सोयी नसलेल्या शाळांची संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | कुंपण भिंत | खेळाचे मैदान | मुलींसाठी स्वच्छतागृहे | सार्व. स्वच्छता गृहे | पिण्याचे पाणी |
| २००७-०८ | ८७२७२ | ३५२१०<br>(४०.३४) | २६६१०<br>(३०.४९) | ५१७८९<br>(५९.३४) | २२७४८<br>(२६.०६) | ११०४०<br>(१२.६५) |

**संशोधन व प्रशिक्षण -**

**शिक्षकांचे प्रशिक्षण :-**

**१.१५** सर्व शिक्षकांकरिता २० दिवसांचा आंतर-सेवा पाठ्यक्रम, अप्रशिक्षित शिक्षकांकरिता ६० दिवसांचा उजळणी पाठ्यक्रम आणि नवप्रविष्टांसाठी ३० दिवसांचे दिशानिर्देशन याद्वारे क्षमता निर्माण करण्याचे SSA मध्ये कराराविष्ट होते. जिल्हा पातळीवर या पाठ्यक्रमांचे संचालन जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था (DIET) करणार होती. तीन[१०] BEO, तीन[११] MCS, ZP, नागपूर आणि शिक्षण निरीक्षक, दक्षिण मुंबई यांच्या अभिलेखांच्या छाननीत असे उघडकीस आले की, २००२-०५ दरम्यान ७८,९२१ शिक्षक प्रशिक्षणाकरिता ठरविण्यात आले असताना फक्त ५१,०९७ शिक्षकांना (६५ टक्के) प्रशिक्षण देण्यात आले आणि २७,८२४ (८५ टक्के) शिक्षक प्रशिक्षणावाचून राहिले. आणखी असे आढळून आले की, चाचणी तपासणी केलेल्या तीन[१२] ZP मध्ये, मुख्य कार्यपालन अधिकाऱ्यांनी संबंधित DIET यांना शिक्षकांच्या प्रशिक्षणाकरीता दिलेल्या रु.५८.०९ लाखांपैकी, रु.२८.४५ लाख (४९ टक्के) वापरले गेले आणि बाकी रु.२९.६५ लाख DIET कडे विनावापर राहिले. अशाप्रकारे, निधीची उपलब्धता असतांनाही शिक्षकांच्या प्रशिक्षणाचे उद्दिष्ट साध्य झाले नाही.

**ज्ञापन :**

**१.१६** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

सन २००४-२००५ या वर्षात आयोजित केलेल्या प्रशिक्षणाचा तपशील पुढे नमूद केला आहे. महाराष्ट्राच्या संबंधात सेवांतर्गत प्रशिक्षण कालावधीतील मान्य उद्दिष्टे आणि साध्ये तपशील खाली दिल्याप्रमाणे आहे.

(रुपये लाखांत)

| २००४-०५ | | | |
|---|---|---|---|
| मान्य उद्दिष्ट | | साध्ये | |
| प्रत्यक्ष | आर्थिक | प्रत्यक्ष | आर्थिक |
| ४,७६,४८८ | ७२४६.४२ | ४३३७९४ (९१.०४%) | १९५७.४७ (२४.०१%) |

२००४-२००५ वर्षामध्ये प्रशिक्षण देण्यात आलेल्या एकूण प्रशिक्षणार्थीपैकी २० दिवसांचे, ३० दिवसांचे आणि ६० दिवसांचे याप्रमाणे प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थीची विभागणी पुढीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| २० दिवसाचे प्रशिक्षण | ४०५५४१ |
| ३० दिवसाचे प्रशिक्षण | १९६५९ |
| ६० दिवसाचे प्रशिक्षण | ८८५९४ |
| | --------- |
| एकूण | ४३३७९४ |
| | --------- |

वरील तक्त्यामध्ये दिसून आल्याप्रमाणे २००४-०५ या वर्षामध्ये प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट ठरविलेल्या शिक्षकांपैकी ९ टक्के इतक्या शिक्षकांना प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट गाठण्यात आले आहे.

| वर्ष २००७-०८ | | | |
|---|---|---|---|
| मान्य उद्दिष्ट | | साध्ये | |
| प्रत्यक्ष | आर्थिक | प्रत्यक्ष | आर्थिक |
| ४४६७४८ | ५७४४.५९ | ४३७१७५ (९७.८५ टक्के) | ४०५९.६४ (७०.६७ टक्के) |

शिक्षकांचे प्रशिक्षण हे उन्हाळी/दिवाळीच्या सुट्टीमध्येच आयोजित करण्यात येत आहे. याशिवाय शिक्षकांना शैक्षणिक वर्षामध्ये प्रशिक्षणासाठी पाठविण्यास/प्रतिनियुक्त करण्यास सांगण्यात येणार नाही याची खात्री करण्याच्या दृष्टीने अधिकाधिक प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्याकरिता महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या स्तरावर आवश्यक ते प्रयत्न केले जातात.

ही वास्तव परिस्थिती आहे. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या राज्य साधन गटाने अशी शिफारस केली आहे की, एका शैक्षणिक वर्षामध्ये केवळ ५० टक्के शिक्षकांनाच प्रशिक्षण देणे शक्य आहे.

नव्याने भरती झालेल्या शिक्षकांसाठी ३० दिवसांचे आणि अप्रशिक्षित शिक्षकांसाठी ६० दिवसांचे शिक्षकांसाठीचे प्रशिक्षण, असे सर्वसाधारण अनुमान आहे. हे प्रशिक्षण जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेकडून देण्यात येते. तथापि, नव्याने भरती झालेल्या आणि अप्रशिक्षित शिक्षकांची संख्या ही वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकामध्ये अदमासावर आधारित प्रस्तावित करण्यात आली असल्यामुळे, प्रत्यक्ष लक्ष्य आणि वित्तीय लक्ष्य हे समुचित आकड्यांवर आधारित आहेत.

**खरेदी**

**१.१७** SSA अंतर्गत शाळांसाठी लागणारे शैक्षणिक साहित्य, शिकविणे व शिकण्याकरिता साहित्य तयार करणे, EGS ना श्रेणीवाढ देऊन झालेल्या प्राथमिक शाळांसाठी साहित्य खरेदी करणे आणि विकलांग बालकांना एकात्मिकदृष्ट्या शिक्षणाच्या प्रवाहाशी जोडणे याकरीता निरनिराळ्या अनुदानाची तरतूद केली गेली आहे.

**संगणकांचा पुरवठा**

**१.१८** बालकांना सुलभ रितीने संगणकाचे शिक्षण देण्यासाठी निवडक उच्च प्राथमिक शाळांमध्ये पाच संगणक तसेच त्यासोबत वापरली जाणारी इतर सामग्री आणि शैक्षणिक software असलेली, संगणक प्रयोगशाळा प्रस्थापित करावयाची होती. सर्व जिल्ह्यांमध्ये ५४० प्रयोगशाळा प्रस्थापित करण्यासाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने मार्च, २००४ ते मार्च, २००५ मध्ये पुरवठादारांना रू. ९.०४ कोटी प्रदान केले. पुरवठादारांनी २८९ प्रयोगशाळांमध्ये १४४५ संगणक (सप्टेंबर, २००४) प्रतिष्ठापन केले आणि महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने एप्रिल, २००५ मध्ये शैक्षणिक software पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले. त्यापैकी ११९४ संगणकांमध्ये शैक्षणिक software चे प्रतिष्ठापन जुलै, २००५ मध्ये झाले आणि २५१ संगणक शैक्षणिक software शिवाय राहिले, आणखी २५१ प्रयोगशाळांकरिता software ची पुरवठा मागणी (जुलै, २००५ मध्ये प्रतिष्ठापन झालेले १२५५ संगणक) नोव्हेंबर, २००५ पर्यंत केली गेली नव्हती. याप्रमाणे शैक्षणिक software ची पुरवठा मागणी करण्यात झालेल्या विलंबामुळे प्रयोगशाळांचा उपयोग झाला नाही ज्यामुळे विद्यार्थी संगणक शिक्षणापासून वंचित राहिले. SRI ने केलेल्या सर्वेक्षणानुसार १०.४ टक्के प्राथमिक शाळा, ६.५ टक्के उच्च प्राथमिक आणि २.१ टक्के उच्च प्राथमिक विभाग असलेल्या माध्यमिक शाळा यांना शैक्षणिक साहित्य देण्यात आले नव्हते.

**ज्ञापन :**

**१.१९** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

फेब्रुवारी, २००६ या महिन्यात २५१ संगणक प्रयोगशाळांकरिता शैक्षणिक संगणक प्रणालीच्या सी.डी. बनविण्यासाठी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. ठरलेल्या दिनांकालाच निविदा उघडण्यात आल्या. परंतु, त्या कालावधीतील २००६-०७ या विद्यावर्षासाठी इयत्ता पाचवीचा अभ्यासक्रम बदलला आणि मार्च, २००६ मध्ये निविदेची प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्यानंतर ६०६ संगणक प्रयोगशाळांकरिता (२००४-०५ वर्षामध्ये स्थापन झालेल्या २५१ संगणक प्रयोगशाळा आणि २००५-०६ वर्षामध्ये स्थापन झालेल्या ३५५ संगणक प्रयोगशाळा) अशा एकूण ६०६ प्रयोगशाळा याबाबत एप्रिल, २००६ या महिन्यात निविदा काढण्यात आल्या. मिळालेल्या निविदा १६ मे, २००६ रोजी उघडण्यात आल्या. निविदा उघडताना निविदा उघडण्याच्या बैठकीला उपस्थित असलेल्या प्रतिनिधींनी दोन निविदांच्या वैधतेबाबत आक्षेप घेतले. त्यामुळे, विधी व न्याय विभागाकडून कायदेशीर सल्ला मागवण्यात आला. सदर सल्ला मिळण्यास अडीच महिन्यांचा कालावधी लागला. त्यानंतर व्ही.जे.आय.टी., आय.टी.आय, शासकीय तंत्रनिकेतन, बालचित्रवाणी यांचेकडे असलेल्या तज्ञांचा समावेश असणाऱ्या तंत्रविषयक समितीद्वारे तांत्रिक मूल्यमापनाच्या प्रक्रियेस सुरुवात झाली. तांत्रिक मूल्यमापन पूर्ण झाल्यानंतर विषय मूल्यमापन करण्यात आले. प्रतिवादी निविदाकारांची आर्थिक बोली उघडताना तांत्रिकदृष्ट्या पात्र नसलेल्या एका निविदाकाराने मुंबई उच्च न्यायालयात मार्च, २००७ मध्ये विनंती अर्ज दाखल केला. तो विनंती अर्ज एप्रिल, २००७ च्या अखेरीस मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळला. इयत्ता ६ वी व ७ वी च्या १८ विषयांपैकी सात विषयांच्या शैक्षणिक संगणक प्रणाली सी.डी. ची मागणी करण्यात आली होती आणि त्याचा पुरवठा करण्यात आला आहे. निविदाकारांच्या न्यायालयात जाण्यामुळे आणि कार्यकारी समितीने दि. २३.११.२००७ रोजी दिलेल्या मान्यतेने पहा : निर्णय क्रमांक ४८८ शैक्षणिक संगणक प्रणाली सी.डी. चा स्वीकार करण्याबाबात घ्यावयाच्या निर्णयामधील कार्यवाहीत्मक अडचणी आल्यामुळे, उर्वरित ११ विषयांसाठीची पुढील निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. त्यानंतर इयत्ता पाचवी, सहावी व सातवीच्या विषयांच्या सी.डी. चा पुरवठा करण्याबाबतचे आदेश देण्यात आले आहेत.

**पाठ्यपुस्तकांचा पुरवठा -**

**१.२०** शालेय सत्र सुरु होण्यापूर्वी इयत्ता पहिली ते आठवीच्या सर्व मुलींना आणि अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीच्या मुलांना विनामूल्य पाठ्यपुस्तके पुरविण्याची तरतूद करावयाची होती. १९ गट[१३], सहा MCs[१४] आणि शाळा निरीक्षक (दक्षिण आणि पश्चिम मुंबई) यांच्या अभिलेखांच्या छाननीत

असे उघडकीस आले की, २००४-०५ मध्ये ६.०२ लाख विद्यार्थ्यांना सत्र सुरु झाल्यानंतर तीन महिन्यांनी पाठ्यपुस्तकांचा अंशत: पुरवठा करण्यात आला आणि २.०४ लाख विद्यार्थ्यांना सत्र सुरु झाल्यानंतर तीन ते सहा महिन्यानंतर पुस्तके मिळाली. याप्रमाणे, पाठ्यपुस्तके पुरवठा करण्यातील विलंबाने बालकांच्या शिक्षणाची गुणवत्ता बाधित झाली.

SRI नी केलेल्या सर्वेक्षणानुसार ८४ टक्के प्राथमिक शाळा, ९१.३ टक्के उच्च प्राथमिक शाळा आणि ९१.७ टक्के उच्च प्राथमिक विभाग असलेल्या माध्यमिक शाळांमधील मुलींना मोफत पाठ्यपुस्तके देण्यात आली. जवळपास ८६.३ टक्के प्राथमिक शाळा, ९०.४ टक्के उच्च प्राथमिक शाळा व ९२.७ टक्के उच्च प्राथमिक विभाग असलेल्या माध्यमिक शाळांमधील अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके देण्यात आलेली होती.

**ज्ञापन :**

**१.२१** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

सन २००४-२००५ या वर्षामध्ये, न्यायालयीन प्रकरणामुळे छपाईची प्रक्रिया मागे पडली होती. प्रत्यक्षात छपाईची प्रकिया ४-५ महिने उशिराच सुरु झाली होती.

सर्व शिक्षा अभियान असूनसुद्धा उर्वरित सर्व विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनामार्फत पाठ्यपुस्तके मिळाली.

(रुपये लाखांत)

| | | |
|---|---|---|
| जून २००४ | ६७ टक्के | ३७०.४३ |
| जुलै २००४ | ८६ टक्के | १०३.४५ |
| ऑगस्ट २००४ | ९१ टक्के | ३२.८४ |
| सप्टेंबर २००४ | ९८ टक्के | ३७.१३ |
| ऑक्टोबर २००४ | ९९ टक्के | ४.५२ |
| नोव्हेंबर २००४ | १०० टक्के | ६.७८ |
| एकूण | | ५५५.१५ |

**साक्ष :**

१.२२ उपरोक्त लेखी माहितीच्या संदर्भात समितीने दिनांक २० ऑक्टोबर, २०१० व १ फेब्रुवारी, २०११ रोजी प्रधान सचिव, शालेय शिक्षण, विभाग यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सचिवानी समितीस अशी माहिती दिली की, सर्व शिक्षा अभियान ही योजना आपल्या देशात जानेवारी २००१ मध्ये सुरु झाली आहे. त्यापूर्वी सन १९९२ पासून डीपीईपी (जिल्हा प्रौढ शिक्षण कार्यक्रम) ही योजना सुरु होती. ही योजना सुरुवातीला राज्यातील पाच जिल्ह्यांमध्ये सुरु केली होती, नंतर चार जिल्ह्यांमध्ये सुरु

करण्यात आली. सन २००० पर्यंत या योजनेच्या माध्यमातून काही मुलांना शिक्षण मिळाले नाही असे आढळून आले म्हणून सर्वच मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे असे ठरविले त्यासाठी संपूर्ण देशभर हा कार्यक्रम राबवावा म्हणून सर्व शिक्षा अभियान योजनेला सुरुवात झाली. त्या अंतर्गत सन २००७ पर्यंत सर्व मुलांना पाचवीपर्यंत शिक्षण मिळाले पाहिजे आणि सन २०१० पर्यंत राज्यातील सर्वच मुलांनी इयत्ता आठवीपर्यंत शिकले पाहिजे असे लक्ष्य ठरवून देण्यात आले. त्यात विशेषकरुन अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती च्या मुलांना जी शाळेत स्वत: येऊ शकत नाहीत, त्यांना शाळेत आणण्यासाठी विशेष प्रयत्न करायचे आणि नियमितशाळेत येणे शक्य नसेल तर अशा मुलांना पर्याय/विकल्प शिक्षणाची प्रेरणा देण्याची योजना आहे. दर्जा सुधारण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण देणे, एक शिक्षकी शाळांचे द्विशिक्षकीमध्ये रुपांतर करणे, शिक्षकांना शिकविण्याव्यतिरिक्त इतर कोणतीही कामे न देणे अशी व्यवस्था करण्यात आली आहे. सन २००९ मध्ये भारत सरकारने मात्र शिक्षण हक्क कायदा लागू करण्यासंबंधीची अधिसूचना जारी केली आणि ९ एप्रिल, २०१० पासून तो कायदा लागू झाला ही त्यात आणखी चांगली गोष्ट आहे. पूर्वीच्या कार्यक्रमामध्ये शिक्षणासारख्या कार्यक्रमात बदल करण्याची गरज होती पण तो बदल केलेला नसल्याने काही उणीवा राहून गेल्या होत्या. त्यात लोकांचा सहभाग घेण्याची उणीव राहून गेली व ती म्हणजे प्रत्येक गावच्या ग्राम शिक्षण समितीच्या फक्त दोन सदस्यांना प्रशिक्षणाची तरतूद होती त्यात बदल करुन आता जास्त सदस्यांना तीन दिवसांचे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली. अशा प्रकारे तीन वर्षात सर्वच सदस्यांना प्रशिक्षणासाठी पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच समाज, शिक्षक आणि शाळा हे सर्व मिळून मुलांच्या सर्वांगीण विकासाचे काम करतील असे या कार्यक्रमात अपेक्षित आहे.

१.२३ सन २००१-०२ पासून सर्व शिक्षा अभियान राज्यात सुरु झाले आहे. सन २००१-०२ हे या कार्यक्रमाचे पहिलेच वर्ष होते. या पहिल्या वर्षात कार्यक्रमासाठी एकूण ३५० कोटी रुपये मंजूर झाले होते, त्यापैकी पहिल्या वर्षी ५० कोटी रुपये आले होते असे सांगण्यात आले त्यावर समितीने अशी विचारणा केली की, सदर रक्कम कोणत्याही हिशेबामध्ये दिसत नसली तरी त्याबाबतची वस्तुस्थिती काय आहे ? याबाबत विभागीय प्रतिनिधीनी खुलासा केला की, ही रक्कम पुढील वर्षीच्या लेख्यामध्ये परावर्तीत झाली आहे.

१.२४ पहिल्या वर्षात आलेली ५० कोटीची रक्कम एकत्रित निधीत गेली. ५० कोटीचा जो निधी मिळाला त्यानंतर सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाचे काम संपूर्ण देशाच्या काना-कोपऱ्यात सुरु झाले परंतु महाराष्ट्र राज्यात सुरु झाले नाही याचे कारण काय आहे ? असा प्रश्न स्थायी समितीमध्ये विचारण्यात

आला होता तेव्हा ती रक्कम एकत्रित निधीमध्ये गेल्यामुळे या योजनेचे काम सुरु झाले नाही असे उत्तर दिले आहे. तसेच सन २००१-०२ मध्ये १०४ कोटी एवढी रक्कम राज्याला मिळाली. वास्तविक पहाता देशाचा विचार केला तर शिक्षणाचा प्रसार महाराष्ट्र राज्यात झालेला आहे आणि त्याच राज्यात सर्व शिक्षा अभियानासारख्या योजनेला पूर्णता अपयश आले असेल तर ही बाब गंभीर आहे. देशात सर्वात मोठे राज्य असलेल्या महाराष्ट्रात भारत सरकारकडून पैसे येतात तरी देखील योजना सुरु होण्यास एक एक वर्ष उशिर होतो, ही गोष्ट बरोबर नाही. असे मत व्यक्त करून समितीने अशी विचारणा केली की, सन २००१-२००२ या वर्षात राज्य शासनाने सर्व शिक्षा अभियानाकरिता त्याच्या हिश्यासाठी १५.६७ कोटी एवढ्या रकमेबाबत कोणतीही तरतूद न करण्याची कारणे काय आहेत ? त्यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, सन २००१-२००२ हे सुरुवातीचे वर्ष होते. राज्य सरकारने असा निर्णय घेतला की, केंद्र सरकारकडून पैसे आल्यानंतर आपल्या हिश्याचे पैसे देऊ. परंतु त्यांच्याकडून जानेवारी महिन्यात पैसे आले होते. राज्य शासनाचे अनुरुप अनुदान नंतर मिळाले होते.

१.२५ राज्य सरकारने आपले अनुदान टाकले नाही. सर्व शिक्षा अभियान या योजनेसाठी केंद्र सरकारकडून ८५ टक्के निधी येतो आणि राज्य सरकारला १५ टक्के निधी द्यावयाचा असतो. अशा प्रकारे राज्याने १५ टक्के रक्कम राखून ठेवावयास पाहिजे होती परंतु ती ठेवली नाही. जर ती रक्कम राखून ठेवली असतील तर समिती समोर परिच्छेद आलाच नसता. असेही समितीने सचिवांच्या निदर्शनास आणून दिले.

१.२६ सन २००१ ते २००५ या कालावधीत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडून रुपये ९५.८६ कोटी एवढी रक्कम न वापरता शिल्लक राहिली आहे. याबाबतची कारणमिमांसा समितीने विचारली असता विभागीय प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, दरवर्षी काही पैसे शिल्लक राहतात. तीन टप्प्यात पैसे दिले जातात. तिसरा टप्प्यातील पैसे शेवटी येतात. कामाची सगळी कार्यपद्धती सुरु करुन ती पुर्ण करण्यास वेळ लागतो त्यामुळे काम सुरु करण्यास वेळ लागतो. पुढच्या वर्षी देण्यात येणाऱ्या पैशात हे पैसे समायोजित केले जातात. पुढच्या वर्षी आपला जो काही भाग असतो त्याची गणना करुन पैसे दिले जातात.

१.२७ त्यावर समितीने उदाहरणा दाखल राजस्थानमध्ये पंतप्रधान योजने अंतर्गत पंतप्रधान ग्राम सडक योजने उदाहरण देताना सचिवांच्या निदर्शनास आणून दिले की, राजस्थानमध्ये अगोदर पैशाची तरतूद केली जाते आणि केंद्र सरकाराकडून आलेले पैसे नंतर वाटले जातात आपल्या राज्यात तशी पद्धत सुरु केली जात नाही ही खेदाची बाब आहे. तसेच इतर राज्य सरकार केंद्र सरकारकडून येणाऱ्या

पैशाची वाट पाहत नाहीत. तीच पद्धत महाराष्ट्र राज्यात अवलंबिण्यात यावी. अशी समितीची सूचना आहे.

१.२८ The State Government introduced the scheme in the State in January, २००२, but did not make the provision for its share. What is the reason for not making the provision of State share in the budget for the year २००१-०२? महालेखाकार यांनी असे विचारले असता विभागाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, For the first year, due to some administrative problem budgetary provision could not have been available for the scheme. But, from last year and in this year we are not facing any problem in this respect. Now, the Government of India approved the project, as soon as the Government of India releases the fund we will immediately add State share into it.

१.२९ त्यावर महालेखाकारांनी पुन्हा असे विचारले की, The Department is also failed to utilise available funds in time so the Government of India did not released the balance amount? Why you have not spent the funds in time? याबाबत विभागीय प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, We are receiving the funds in three stages. When we received the funds for the first stage, after spending more than ५०% funds then only we have to request for the second installment of fund then we will receive the funds for the second stage. After spending ५०% of that fund we will receive the funds for the ३rd stage. The third installment was come late because of that only the last stage fund is not utilised.

१.३० प्राथमिक शिक्षणाच्या विद्यमान योजनांचा खर्च न केलेल्या निधीसंबंधी विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, केंद्र सरकारच्या प्राथमिक शिक्षणाच्या योजना दहाव्या पंचवार्षिक योजनेतील सर्व प्रौढ शिक्षण अभियान नावाच्या योजनेत समाविष्ट करण्यात आल्या होत्या. २००३ साली बंद करण्यात आलेल्या जिल्हा प्रौढ शिक्षण कार्यक्रम खालील खर्च न करण्यात आलेले १.५२ कोटी रुपये सर्व शिक्षा अभियान निधीकडे नोव्हेंबर २००५ पर्यत परत केली नाही. हा कार्यक्रम महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या सोसायटीमार्फत राबविण्यात येतो. त्यासाठी लागणारे पैसे केंद्र सरकाराकडून सोसायटीला दिले जातात त्याचबरोबर राज्य सरकारकडून जी काही अनुरुप अनुदान द्यावयाचे असते त्याकरता अर्थसंकल्पामध्ये तरतूद करुन हे अनुदान त्यांना दिले जाते.

१.३१ माहे जून २००३ मध्ये बंद झालेल्या प्राथमिक शिक्षण कार्यक्रमाखालील खर्च न केलेली रक्कम रुपये १.५२ कोटी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने सर्व शिक्षा अभियान निधीकडे हस्तांतरित करण्यासाठी जवळजवळ ५ वर्षाचा विलंब झाला असल्याचे विभागाने मान्य करून खर्च न केलेली रक्कम व्याजासह परत करण्यात आली असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले. हे जरी खरे असले

तरी विभागाने दिलेले कारण समितीस अमान्य असल्याने समितीने याबाबत असे नमूद केले की, विभागाला दिलेले पैसे खर्च न करता तसेच ठेवणे ही बाब अतिशय गंभीर आहे. ज्या कामासाठी पैसे दिलेले आहेत ते पैसे त्याच कामासाठी खर्च करावयास पाहिजे होते. त्याबाबत विभागीय प्रतिनिधींनी पुन्हा खुलासा केला की, १.५२ कोटी रुपये शिल्लक राहिले होते. सोसायटीच्या खात्यामध्ये हे पैसे जमा होते आणि ते पैसे समायोजित करण्याचा विभागाने प्रयत्न केला परंतु त्यांना ते शक्य झालेले नाही त्यामुळे राज्य सरकारला आणि केंद्र सरकारला त्यांचे पैसे परत करण्यात आले आहेत व यामध्ये विलंब झाल्याचे मान्य केले.

१.३२ समितीने पुढे अशी विचारणा केली की, उशीर लागण्याची कारणे काय आहेत ? ज्या कामासाठी पैसे आले होते ते पैसे त्याच कामासाठी खर्च करणे आवश्यक होते परंतु आपण ते पैसे खर्च केलेले नाहीत. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी जिल्हा प्रौढ शिक्षण कार्यक्रमाचे पैसे शिल्लक राहिले होते एवढाच खुलासा केला.

१.३३ महालेखाकारांकडून विभागाने परिच्छेद तपासून घेतलेला नाही. महालेखापाल कार्यालयातील अधिकाऱ्यांबरोबर बसून जर विभागाने या परिच्छेदासंदर्भात महालेखाकारानी उपस्थित केलेल्या मुद्दयाचे निराकरण केले असते तर हा परिच्छेद समितीसमोर आलाच नसता यावर विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, दिनांक १७.६.२००५ रोजी केंद्र सरकारकडे आणि १२.९.२००८ रोजी राज्य सरकारकडे पैसे भरलेले आहेत आणि या बाबतीत लेखी माहितीमध्ये देखील खुलासा करण्यात आला आहे.

१.३४ महालेखाकार कार्यालयाची यामध्ये चूक झालेली आहे असे विभागास म्हणावयाचे आहे काय ? असे समितीने विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, १.५२ कोटी रुपयांचा हिशोब करावयाचा राहिल्यामुळे परिच्छेद तसाच राहिला. सन २००३ साली ही योजना बंद झाली होती आणि आपण २००५ सालापर्यंत पैसे भरले नाहीत. या विलंबास जो अधिकारी जबाबदार असेल त्याच्याविरुद्ध कारवाई करावी लागेल. तसेच आता पर्यंत विलंबाबाबत कोणावरही कारवाई केली नसल्याचेही विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले. पैसे भरण्याबाबत विलंब झाला म्हणून महालेखाकार यांच्याकडून परिच्छेद आला आहे. यावरुन शासनातील वरिष्ठ अधिकारी महालेखाकारानी व्यक्त केलेल्या अभिप्रायासंदर्भात कोणतीही दखल घेत नसल्याचे मत समितीने व्यक्त केले.

१.३५ समितीसमोर साक्षीला येण्यापूर्वी विभागीय सचिवांनी सर्व तयारी करावयास पाहिजे होती. समिती समोर कोणते परिच्छेद आहेत आणि त्या अनुषंगाने कोणते प्रश्न विचारण्यात येणार आहेत हे

माहिती असल्यामुळे विभागीय सचिवांनी सर्व माहिती अगोदरच घ्यावयास पाहिजे होती. यावर विभागीय प्रतिनिधीनी नमूद केले की, संपूर्ण राज्यातील विविध जिल्ह्यामध्ये हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यातून १५ दिवसात माहिती घेऊन समितीला पाठविण्याचे विभागीय प्रतिनिधीनी समितीला आश्वासित केले. या योजनेची अंमलबजावणी यशस्वीपणे न होण्याची कारणमिमांसा समितीला कळविण्यात यावी कारण या योजनेची यशस्वीपणे अंमलबजावणी झालेली नाही ही बाब या लेखापरीक्षण परिच्छेदावरुन दिसून येते. तेव्हा वरील सर्व मुद्याची माहिती पंधरा दिवसानंतर जेव्हा समितीची पुढील बैठक घेण्यात येईल त्यावेळी समितीला देण्यात यावी असे निदेश समितीने सचिवाना दिले.

साक्षीचे वेळी सर्व शिक्षा अभियानासंबंधीच्या माहितीसाठी समितीला सादरीकरण (Presentation) करताना विभागीय सचिव व विभागीय प्रतिनिधी, यांनी समितीला पुढीलप्रमाणे माहिती दिली.

१.३६ राज्यात एकूण ३५ जिल्हे असून त्यात ३५१ गट साधन केंद्र, ५४ शहरी साधन केंद्र व ५७३८ समूह साधन केंद्रे आहेत. सर्व शिक्षा अभियानांतर्गत शिक्षकांना प्रशिक्षण देणे, तसेच त्यांची अध्यापन कला अधिक विकसित व्हावी यासाठी ब्लॉक रिसोर्स सेंटर, अर्बन रिसोर्स सेंटर तसेच क्लस्टर रिसोर्स सेंटर कार्यरत आहेत. राज्यात ७३,६५२ वस्त्या (हॅबीटेशन्स) असून ४२,१५५ खेडी आहेत. सन २००१ च्या जनगणनेनुसार ५,०४,००,५९६ पुरुष व ४,६८,७८,०७४ महिला अशी एकूण ९,६८,७८,६७० लोकसंख्या आहे.

१.३७ सन २००१ चे महाराष्ट्र स्त्री-पुरुष प्रमाण ९२२ व देशाचे स्त्री-पुरुष प्रमाण ९३३ इतके आहे. सन २००१ नुसार पुरुषांमधील साक्षरतेचे प्रमाण ८६.०० व महिलांमधील साक्षरतेचे प्रमाण ६७.०० इतका आहे. अशा प्रकारे सन २००१ नुसार एकूण साक्षरतेचे प्रमाण ७६.९० इतके आहे.

१.३८ सन २००१ नुसार राष्ट्रीय साक्षरता प्रमाण जनगणना (पुरुष) ७८.८५ व राष्ट्रीय साक्षरता प्रमाण जनगणना (महिला) ५४.१६ इतका आहे. अशा प्रकारे एकूण साक्षरता प्रमाण जनगणना ६५.३७ इतका आहे.

१.३९ राज्यात ८ शैक्षणिक विभाग आहेत. त्यात ४७,२३९ प्राथमिक शाळा, २७,११७ उच्च प्राथमिक शाळा, १९,९१८ माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा अशा एकूण ९४,२७४ शाळा आहेत. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या ४०,८७,००२ माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या ६२,६७,४११ व उच्च माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या ५५,७३,१७० इतकी आहे अशा प्रकारे

एकूण विद्यार्थ्यांची पटसंख्या १,५९,२७,५८३ इतकी आहे. तसेच राज्यातील पीटीआर २९.८४, एससीआर ३१.२३, जीईआर १००.९६ व एनईआर ९९.७७ इतका आहे.

१.४० सर्व शिक्षा अभियानांतर्गत भारतीय संविधानातील ८६ व्या घटना दुरुस्तीनुसार व शिक्षण हक्क अधिनियम २००९ नुसार ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात आलेले आहे. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्यासाठी केंद्र शासनाने सन २००१-०२ पासून देशभर सर्व शिक्षा अभियान हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम सुरु केला आहे. महाराष्ट्रात सर्व शिक्षा अभियान या कार्यक्रमाची २००२-०३ पासून अंमलबजावणी राज्यभर सुरु आहे. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण समाजाच्या सहभागाने होत आहे.

१.४१ सर्व शिक्षा अभियानाची मुख्य उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत. सन २००३ पर्यंत सर्व मुला-मुलींना शाळा, शिक्षण हमी केंद्र, पर्यायी शिक्षण केंद्र इत्यादीमध्ये दाखल करणे, सन २००७ पर्यंत सर्व मुला-मुलींचे पाच वर्षाचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करणे, सन २०१० पर्यंत सर्व मुला-मुलींचे आठ वर्षांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करणे, प्राथमिक शिक्षणाचा समाधानकारक दर्जा व जीवनपयोगी शिक्षणावर भर देणे, प्राथमिक स्तरावरील लिंगभेद व सामाजिक क्षेत्रातील फरक २००७ पर्यंत दूर करणे व उच्च प्राथमिक शिक्षणाबाबतचे उद्दिष्ट साध्य करणे, सन २००७ पर्यंत १०० टक्के उपस्थितीचे उद्दिष्ट साध्य करणे.

१.४२ सर्व शिक्षा अभियानातंर्गत नवीन शाळा, शिक्षण वेतन, गट साधन केंद्र, समूह साधन केंद्र, बांधकाम, मोठ्या प्रमाणावरील शाळा इमारत दुरुस्ती, शाळा बाह्य मुलांसाठी उपक्रम, मोफत पाठ्यपुस्तक, नवोपक्रम, तसेच अपंग मुलांचे समावेशित शिक्षण, देखभाल दुरुस्ती, व्यवस्थापन खर्च, संशोधन व मूल्यमापन, पर्यवेक्षण व संनियंत्रण, शाळा अनुदान, शिक्षक अनुदान, अध्ययन, अध्यापन साहित्य अनुदान, शिक्षक प्रशिक्षण, लोकप्रतिनिधींचे प्रशिक्षण, मुलींच्या प्राथमिक शिक्षणासाठी विशेष कार्यक्रम, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय इत्यादी उपक्रम राबविले जातात. तसेच राज्यात सन २०१० मध्ये शिक्षण हक्क कायदा सुरु झाला. त्यात ज्या मुलांना पालक नाही, ज्या मुलांना राहण्यासाठी घर नाही, अशा मुलांचा सर्व शिक्षा अभियानांतर्गत समावेश करण्यात आला आहे.

१.४३ या संदर्भात एका महिन्यापूर्वी योजना तयार करुन त्याला मान्यता दिली आहे. सन २०१०-११ ते २०१४-१५ पर्यंत सर्व शिक्षा अभियान सुरु राहणार आहे त्यात केंद्र शासनाचा ६५ टक्के व राज्य शासनाचा ३५ टक्के हिस्सा राहणार आहे. या संदर्भात गेल्या वर्षी १२५० कोटी रुपयांचे अधिक तरतूद होते. शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी सुरु झाल्यानंतर यावर्षी अर्थसंकल्पामध्ये १६५० कोटी

रुपयांची तरतूद करण्यात आली व उर्वरित २-३ महिन्यांसाठी पुरवणी मागण्याच्या माध्यमातून तरतूद करण्यात आली. पुढील वर्षासाठी साधारणपणे अर्थसंकल्पामध्ये २५०० कोटी रुपयांची तरतूद होण्याची शक्यता आहे.

१.४४ या संदर्भात ग्रामीण भागात मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी, गटशिक्षण अधिकारी, केंद्रप्रमुख, शाळा व्यवस्थापन समिती यांच्या अधिपत्याखाली आणि शहरी भागात महानगरपालिका आयुक्त, शिक्षणाधिकारी/प्रशासनाधिकारी, शहरी साधन केंद्र समन्वयक, केंद्र समन्वयक, शाळा व्यवस्थापन समिती यांच्या अधिपत्याखाली कार्यक्रमाची अंमलबजावणी केली जाते.

१.४५ राज्यस्तरीय व्यवस्थापन संरचनेमध्ये लोकप्रतिनिधींचा समावेश नाही. त्यात लोकप्रतिनिधींचा समावेश असणे अत्यावश्यक असल्याचे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय व्यवस्थापन संरचना तयार करण्यात आली आहे. आता पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली शाळा व्यवस्थापन समिती गठित करण्यात आली आहे. शिक्षण हक्क कायदा येण्यापूर्वी ग्राम शिक्षण समिती कार्यरत होती. त्या समितीचे अध्यक्ष सरपंच व सदस्य सचिव मुख्याध्यापक होते. आता त्या संरचनेमध्ये बदल झाला आहे. आता त्यामध्ये ७५ टक्के पालक व २५ टक्के इतरांचा समावेश केला आहे.

१.४६ सदर बाब ही राज्य पातळीवरील आहे. परंतु जिल्हा व तालुका पातळीवर या कार्यक्रमाची अंमलबजावणी करीत असताना समितीमध्ये लोकप्रतिनिधींचा समावेश असणे अत्यावश्यक आहे. ग्रामीण पातळीवर सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाची अंमलबजावणी करीत असताना शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी तसेच केंद्रप्रमुख इत्यादी यंत्रणा पुरेशी नाही. सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा पातळीवर पालकमंत्री शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष असतात. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यात बहुतांश समित्या असतात. त्यामुळे त्या समित्यांचे कामकाज एकाच दिवसात घेण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. परंतु तालुका पातळीवर या कार्यक्रमाची अंमलबजावणी व्यवस्थितपणे होत आहे किंवा नाही यासाठी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी सक्रिय राहून जास्तीत जास्त वेळ देऊ शकतो. यात लोकप्रतिनिधींना स्थान दिल्यास कार्यक्रम अंमलबजावणीच्या दृष्टीने शाळा व्यवस्थापन समितीला काही अडचणी असल्यास किंवा काही सुधारणा करायच्या असल्यास सरपंच किंवा मुख्याध्यापक यांच्यापेक्षा लोकप्रतिनिधी जास्त चांगल्याप्रकारे या बाबी शासनासमोर मांडू शकतात. सन २०१०-११ मध्ये शिक्षण हक्क कायदा नुसार पालक मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली शाळा व्यवस्थापन समिती कार्यान्वित करण्यात आली. त्यात शाळा व्यवस्थापन समितीमध्ये लोकप्रतिनिधींचा समावेश असणे गरजेचे

आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता सचिवांनी खुलासा केला की, राज्य स्तरीय व्यवस्थापन संरचनेमध्ये लोकप्रतिनिधींचा समावेश करण्यासाठी समितीला शासनाकडे शिफारस करावी लागेल.

१.४७ या कार्यक्रमांतंर्गातील ज्या शाळा व्यवस्थापन समितीबद्दल माहिती देण्यात येत आहे. त्यात आश्रमशाळांसंबंधी कोणताही उल्लेख नसल्याबाबत समितीने विचारले असता विभागीय सचिवानी खुलासा केला की, ही बाब समाजकल्याण विभागाशी संबंधित आहे. सर्व शिक्षा अभियानातंर्गत त्यांना अनुदान दिले जाते. सर्व शिक्षा अभियानामध्ये आश्रमशाळांचा समावेश होतो व त्यांना सर्व लाभ दिले जातात.

१.४८ आश्रमशाळांमधील शैक्षणिक दर्जा खालावला असल्याचे समितीने निदर्शनास आणले असता विभागीय सचिवांनी असे सांगितले की, नियंत्रण प्राधिकार समाजकल्याण विभाग आहे. योजनेचे संपूर्ण नियंत्रण शालेय शिक्षण विभागाकडून केले जाते. त्यावर समितीने असे नमूद केले की, आदिवासी विकास विभागाकडे शिक्षणासंबंधी स्वतंत्र यंत्रणा नाही. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, शैक्षणिक विभाग आदिवासी विकास विभागाने पाहू नये. शालेय शिक्षण विभागाने पाहणे आवश्यक आहे. आश्रमशाळांचे व्यवस्थापन आदिवासी विकास विभागाकडे आहे.

१.४९ यासंदर्भात समितीने असे सूचित केले की, आश्रमशाळांमधील शिक्षणाचा दर्जा उंचावला पाहिजे. तेथील शिक्षणाबाबत शालेय शिक्षण विभागाने नियंत्रण ठेवले पाहिजे. याबाबत समिती शासनास शिफारस करेल.

**प्रकल्प संमती मंडळ (PAB) बाबत विभागीय सचिवांनी समितीस पुढीलप्रमाणे खुलासा केला.**

१.५० गावाची योजना गावकऱ्याच्या समितीच्या बैठकीत होते आणि खर्च निश्चित केला जातो. त्यानुसार शाळा विकास आराखडा तयार होतो. नंतर तो भारत सरकारकडे पाठविला जातो. त्याचे मूल्यन केले जाते. सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखाली प्रकल्प मूल्यन मंडळाची बैठक होते.

१.५१ प्रकल्प मूल्यन मंडळामध्ये अनेक अशासकीय संघटना असतात. प्रकल्प मूल्यन होत असताना निकषाप्रमाणे प्रकल्प आहे की नाही ? मागील वर्षी प्रत्येक निकषाचे प्रमाण काय होते? त्यासंबंधी वेगवेगळे कार्यकारी गट आहेत, ते अभ्यास करतात. हा अभ्यास करुन प्रत्येक मुद्याबाबत चर्चा झाल्यानंतर ते प्रकल्प मान्य करतात. प्रकल्प मान्य केल्यानंतर त्यामध्ये बदल करण्याचा शासनाला अधिकार नाही. शाळा खोल्यांच्या बांधकामाबाबत मोठ्या प्रमाणात मागणी होते. परंतु एकूण प्रकल्प खर्चाच्या ३० टक्के खर्च त्यावर करता येतो. त्या मर्यादेपुढे खर्च करता येत नाही. गरज असताना आणि निधी उपलब्ध असताना सुद्धा आपल्याला त्या मर्यादेपर्यंतच खर्च करता येतो.

**Retention Rate (Primary) बाबत विभागीय सचिवांनी पुढीलप्रमाणे माहिती दिली.**

१.५२ रिटेंशन रेट बाबत माहिती देताना समितीला असे सांगण्यात आले की, रिटेंशन रेट हा शैक्षणिक दर्शक आहे. विद्यार्थी किती प्रमाणात टिकून राहतात याची टक्केवारी दिलेली आहे. पटसंख्या नोंदणी १०० टक्के होते. शेवटपर्यंत सर्व मुले टिकत नाहीत. श्री.माधव चव्हाण हे शिक्षणतज्ज्ञ आहेत. त्यांच्या असर संस्थेने संपूर्ण देशामध्ये महत्त्वाच्या दर्शकाबद्दल सर्वेक्षण केले. त्या सर्वेक्षणामध्ये देशाची आणि महाराष्ट्राची काय स्थिती आहे हे त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे. त्या सर्वेक्षणामध्ये असे दिसून आले की, पाचवीतील मुले दुसऱ्या इयत्तेतील पुस्तकाचे वाचन करु शकत नाहीत. आठवीतील मुले पाचवीच्या पुस्तकातील वाचन करु शकत नाहीत. याची टक्केवारी किती आहे तसेच गणित व व्यावसायिक गणिताबाबत त्यांनी मुल्यमापन केले आहे. या निकषाप्रमाणे आपल्या राज्याची स्थिती देशामध्ये चांगली असली तरी आपण खूप मागे आहोत. आता पाचवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना दुसरीतील गणित सोडविता येत नाही. गणितामध्ये महाराष्ट्र बिहारपेक्षा मागे आहे ही वस्तुस्थिती आहे. रिटेन्शन रेट सुरुवातीच्या काळात ९० ते १०० टक्के असतो. सुरुवातीची नोंदणी १०० टक्के आहे. परंतु रिटेन्शन नंतर कमी आहे. त्यांची आकडेवारी आणि आपली परिस्थिती जवळपास जुळत आहे. नोंदणी टिकवून ठेवण्यासाठी चर्चा करुन धोरण ठरविता येईल. आपले शिक्षक १२ वी उत्तीर्ण झालेले असतात. सर्व विषय शिकविणारे शिक्षक आहेत. गणित शिकविणारे शिक्षक अन्य विषय शिकवू शकत नाहीत. विषयनिहाय शिक्षक असतात. शिक्षण हक्क कायद्यामध्ये पाचवीनंतर त्यांनी विषयनिहाय शिक्षकाची तरतूद केली आहे. यापुढे विषयनिहाय पदवीधर डी.एड शिक्षक घ्यावे लागतील. The Procedure of recruitment and selection of teacher is not strict. आतापर्यंत शिक्षकांची निवड डी.एड परीक्षेमध्ये किती गुण मिळाले त्या आधारे होत होती. विषयाचे ज्ञान आहे की नाही हे पाहिले जात नव्हते. तीन वर्षापूर्वी सीईटी परीक्षेची व्यवस्था करण्यात आली. त्यामध्ये दोन निकष आहेत. एकूण विषय वाचता आले पाहिजेत. त्याशिवाय गणित आणि सायन्स ५० टक्के आले पाहिजे. पुन:स्थापनेला वेळ लागेल. दरवर्षी १५००० शिक्षक भरती केले जातात. त्यांचा प्रशिक्षण कार्यक्रम राबविला जातो. सध्या संस्था विषयक प्रशिक्षणाची व्यवस्था नाही. सुरुवातीला शिक्षण सेवकाचा कालावधी आहे त्या काळात संस्थाविषयक प्रशिक्षण दिले तर शक्य होईल.

प्रशिक्षित शिक्षक असतील तरच विद्यार्थी तयार होतील. शिक्षक अद्ययावत असावेत. यासाठी सेवा प्रवेशानंतर प्रशिक्षण सुरु आहे. त्याबाबत जे गांभीर्य असावयास पाहिजे ते आज नाही. ५० लोकांना

बोलावले तर ३० लोक येतात. त्यांच्याकडून अभिवेदन दिले जाते की, त्यांना वारंवार प्रशिक्षणासाठी बोलाविले जाते.

शिक्षक पदावर निवड झाल्यानंतर सक्तीचे प्रशिक्षण द्यावे. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, शिक्षणसेवक म्हणून तीन वर्षे सेवा करावी लागते. प्रत्येक वर्षाला दोन महिने सुट्टी असते. एक महिना संस्थे विषयक प्रशिक्षणाची अट घातली आणि संस्थे विषयक प्रशिक्षण पूर्णत: सफल केल्याशिवाय कायम होणार नाही असा धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे. याबाबत माननीय मंत्रीमहोदयांशी चर्चा केलेली आहे. आज संपूर्ण व्यवस्था विश्वासावर टिकून आहे. व्यवस्थेमध्ये सुधारणा केली नाही तर तो विभागाचा दोष राहील.

शिक्षण हक्क कायद्याच्या अंमलबजावणीसंदर्भात माहिती देताना सचिवानी असे सांगितले की, या कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये दोन-तीन मुख्य अडचणी आहेत. चौथीपर्यंतच्या शाळा आहेत. पाचवी ते सातवीसाठी दुसऱ्या शाळेत जावे लागते. राज्य शासनाची प्राथमिकची व्याख्या पहिली ते सातवी आहे. परंतु देशातील ६ ते १४ वयोगटातील मुलांना शिक्षण देण्यासाठी पहिली ते आठवीपर्यंत प्राथमिकचा भाग असतो. आपल्या राज्यात आठवी माध्यमिक विभागात आहे. माध्यमिकसाठी निकष वेगळे आहेत. माध्यमिकमध्ये ६९ टक्के विद्यार्थी प्रवेश घेतात. देशाच्या तुलनेत हे प्रमाण कमी आहे. राज्य शासनाने प्राथमिक शिक्षणाची व्याख्या बदलली पाहिजे. संपूर्ण देशात तामिळनाडू, महाराष्ट्र अशी दोन-तीन राज्ये वगळता सर्व राज्यांनी व्याख्या बदलली आहे. विभागाने मंत्रीमंडळापुढे प्रस्ताव सादर केला होता. मध्यंतरी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल झाली होती. उच्च न्यायालयाने निदेश दिले होते की, प्राथमिक शिक्षणाची व्याख्या निश्चित करावी. ही एक मुख्य अडचण आहे. आणखी एक अडचण म्हणजे मोठ्या प्रमाणात खाजगी माध्यमिक विना अनुदानित व अनुदानित शाळा आहेत. आठवीपर्यंतचे शिक्षण प्राथमिक विभागात आणले तर प्रशासकीय अडचण निर्माण होण्याची शक्यता आहे. परंतु यासंबंधी केव्हा ना केव्हा तरी निर्णय घ्यावाच लागेल. प्राथमिक विभाग ९० टक्के जिल्हा परिषदांकडे आहे. आठवीचा समावेश माध्यमिक विभागामध्ये आहे आणि ९० टक्के खाजगी क्षेत्र आहे. जिल्हा परिषदेकडे आठवीपर्यंतच्या शिक्षणाची जबाबदारी दिली तर तितके विद्यार्थी मिळणार नाहीत. माध्यमिक विभागाचे शिक्षक अतिरिक्त होतील. ही प्रशासकीय अडचण आहे. ती देखील सोडवावी लागणार आहे.

याबाबत विभागाचे असे मत आहे की, प्राथमिक शिक्षण आठवीपर्यंत केले पाहिजे. आठवी प्राथमिक विभागाशी जोडली गेली पाहिजे परंतु मंत्री मंडळाने विभागाची सूचना मान्य केली नाही.

विभागातर्फे पुन्हा एकदा प्रयत्न केला जाईल. परंतु, अद्याप प्रस्ताव मान्य झालेला नाही. असेही सचिवानी समितीला सांगितले.

**उपक्रमाबाबतची माहिती-**

१.५३ सन २०१०-११ पर्यंत ८३२२ नवीन प्राथमिक शाळा व ४८९ उच्च प्राथमिक शाळा मंजूर झाल्या आहेत. त्यासाठी बांधकाम, शिक्षकांचे वेतन याकरिता अनुदानाची आवश्यकता आहे. सर्व शिक्षा अभियानामध्ये १५३९५ शिक्षक मंजूर आहेत व वेतनासाठी अनुदान मंजूर केले आहे.

रेसिडेन्शियल ब्रिज कोर्स म्हणजे सेतू शाळा ही कल्पना अशी आहे की, सर्व शिक्षा अभियानामध्ये विशिष्ट वयाच्या मुलांना ठराविक वर्गामध्ये ठेवले पाहिजे. ११ वर्षे वयाचा असेल तर पाचवीमध्ये प्रवेश झाला पाहिजे. ११ वर्षे वय असल्यामुळे पहिलीच्या वर्गात प्रवेश द्यायचा नाही. आतापर्यंत तसे होत होते. त्यांची लहान मुलांबरोबर बसण्याची इच्छा नसायची. पोकळी आहे ती भरुन काढण्यासाठी हा प्रयत्न आहे. पाचवीमध्ये प्रवेश देऊन पहिली आणि तिसरीची पोकळी भरण्याचा हेतू आहे.

**गट साधन केंद्रबाबतची माहिती -**

१.५४ गाव पातळीवर गट साधन केंद्राची स्थापना केली आहे. याची यादी देता येईल. ग्रामीण भागात ३५१ गट साधन केंद्र असून शहरी भागात ५४ शहरी साधन केंद्र आहेत. गट शिक्षणाधिकारी याठिकाणी बसतात. त्यांना संगणक, फोन, इंटरनेट इ. सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. एक स्वतंत्र हॉल बांधून दिले आहे. वेगवेगळ्या विषयाचे २० विषय तज्ज्ञ असतात. ते शिक्षकांना मार्गदर्शन करण्यासाठी, अध्ययन व अध्यापन साहित्य तयार करण्यासाठी मदत करीत असतात.

**समूह साधन केंद्राची माहिती-**

४८६० ग्रामीण समूह साधन केंद्र आहेत. १० ते १५ शाळांसाठी हे समूह साधन केंद्र आहेत.

**शाळाबाह्य मुलांसाठी उपक्रमाची माहिती-**

१.५५ राज्यात जवळपास ८४ हजार मुले शाळाबाह्य असल्याचे आढळून आले आहे. त्यांच्या वयास अनुरुप समकक्ष वर्गामध्ये प्रवेश देऊन त्यांची अभ्यासातील प्रगती सर्वसामान्य मुलांच्या बरोबरीने साध्य करण्यासाठी निवासी व अनिवासी सेतू शाळेअंतर्गत विशेष शिक्षण देण्यात येत आहे. शासनाने हा एक चांगला निर्णय यावर्षी घेतला आहे. आता प्रत्येकाला युनिक आयडेंटिफिकेशन नंबर मिळणार असून त्याच्याशी जोडण्यात येणार आहे. त्यामुळे खरेपणा ओळखता येईल. विशेषत: त्यांची उपस्थिती, शैक्षणिक गुणवत्ता, आरोग्य याचे संनियंत्रण करता येईल. आज विद्यार्थ्यांचे प्रोफाईल ऑनलाईन शोधणे शक्य नाही. विभाग चाईल्ड ट्रॅकिंग सिस्टीम ऑनलाईन डेव्हलप करीत आहे. त्यामध्ये हे शक्य होईल.

ऊस तोडणी कामगारांची मुले स्थलांतरित होतात. त्यामुळे यामध्ये सुसूत्रता रहात नाही. त्यांच्या बाबतीत काय विचार केला आहे ? असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, यामध्ये सुसूत्रता रहात नाही. त्यांचे त्यांच्याबाबतीत ट्रॅकिंग करुन शैक्षणिक पातळी ठेवणे सुलभ होईल. तसेच स्थलांतरित मुलांसाठी सेतूशाळा केंद्रे उघडण्यात आलेली आहेत. ज्या ठिकाणी साखर कारखाने आहेत त्या ठिकाणी ५ महिन्यांसाठी अशी केंद्रे सुरु केली जातात. त्या ठिकाणी स्वयंसेवकाच्या माध्यमातून शिक्षणाची सोय केली जाते.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, साखर शाळांची संकल्पना आम्हाला माहीत आहे. परंतु ज्या ठिकाणी धरणाची कामे सुरु असतात तेथील कामगार देखील स्थलांतरित होऊन आलेले असतात. अशा कामगारांच्या मुलांसाठी सुद्धा शिक्षणाची व्यवस्था व्हायला पाहिजे. विदर्भामध्ये ही संकल्पना राबविली जात नाही. याबाबतीत शिक्षणाधिकाऱ्यांनी आम्हाला कोणतीही कल्पना दिलेली नाही.

याबाबत सचिवांनी सांगितले की, स्थलांतरित कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था व्हायला पाहिजे. अशी व्यवस्था करण्यासाठी योजनेमध्ये तरतूद करणे आवश्यक आहे. पुढील वर्षी अशी व्यवस्था करावयाची असेल तर त्यासाठी आधी योजनेमध्ये तरतूद करायला पाहिजे. विदर्भातील यवतमाळ जिल्हा व इतर संपूर्ण आदिवासी भाग आहे. त्या ठिकाणी अशी सोय होणे आवश्यक आहे.

**मोफत पाठ्यपुस्तके संबंधी माहिती-**

१.५६ शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व अनुदानित शाळांतील इयत्ता १ली ते ८वी मधील सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व स्वाध्याय पुस्तिकांचे वाटप शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस केले जाते. आतापर्यंत १ कोटी ३९ लाख मुलांना मोफत पाठ्यपुस्तके व स्वाध्याय पुस्तिकांचा लाभ दिलेला आहे.

**अपंग मुलांचे समावेशित शिक्षणाबाबत माहिती-**

१.५७ या योजनेंतर्गत ६ ते १८ वर्षे वयोगटातील विशेष गरजाधिष्ठित मुलांचा शोध घेणे, प्राथमिक तपासणी करणे, गरजेनुसार आवश्यक ती शस्त्रक्रिया करणे, आवश्यक अनुषंगिक साहित्य व साधने पुरविणे आणि इतर सर्वसामान्य मुलांच्या सोबतच त्या मुलांना शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देणे अशा प्रकारचा हा उपक्रम आहे. या उपक्रमांतर्गत काही मुलांना चष्मे उपलब्ध करुन दिलेले आहेत. काही मुलांवर शस्त्रक्रिया देखील करण्यात आलेली आहे. अशा मुलांना शाळेच्या मुख्य प्रवाहात दाखल केले जाते.

१.५८ ज्या मुलांमध्ये काही विशिष्ट शारीरिक बदल दिसून येतात त्यांच्यासाठी वेगळे वर्ग करता येत नाहीत. अशा मुलांवर उपचारात्मक शस्त्रक्रिया करुन त्यांना इतर मुलांसमवेत आणण्यासंबंधीची सर्व व्यवस्था केली जाते.

**बांधकामे अपूर्ण असण्याची तसेच सुरु न होण्याची कारणे या संबंधी माहिती-**

१.५९ सर्व शिक्षा अभियानांतर्गत ३३ टक्के निधी बांधकामासाठी व अन्य सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी वापरण्यात येतो. वर्गखोल्या, समूह साधन केंद्रे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, दुरुस्ती यावर खर्च करण्यात येतो.

काही ठिकाणची बांधकामे पूर्ण होऊ शकलेली नाहीत. ५४ हजार वर्गखोल्या मंजूर झालेल्या आहेत. जागेचा वाद, जागेचा अभाव, मतभेद, प्रशासकीय कारणे इत्यादी कारणामुळे कामे सुरु होऊ शकलेली नाहीत. ज्या ठिकाणी जागा उपलब्ध होत नव्हती अशा ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे स्थानिक लोकप्रतिनिधींचे सहकार्य घेऊन जागेचा प्रश्न सोडविलेला आहे.

**नवोप्रक्रमाबाबतची माहिती-**

१.६० अंगणवाडी/बालवाडी सक्षमीकरणासाठी आयसीडीएसच्या समन्वयाने कार्यक्रमाची अंमलबजावणी करायची आहे. सध्या आयसीडीएस हे सेग्रेटेड आहे. ३ ते ६ वयोगटातील मुले पूर्व प्राथमिक शाळेमध्ये येताना ती पूर्णपणे तयार असली पाहिजेत. म्हणून ही मुले देखील शिक्षणाचा भाग समजण्यात आली पाहिजेत, त्यांचा देखील शिक्षण हक्क कायद्यामध्ये समावेश करावा किंवा नाही याबाबत विचार सुरु आहे. या वयोगटातील मुलांचा सध्या तरी शिक्षण हक्क कायद्यामध्ये समावेश केलेला नसला तरी कायद्यामध्ये त्यांच्यासंबंधी थोडासा उल्लेख केलेला आहे. या ३ ते ६ वयोगटातील मुलांसाठी देखील काही करता येईल का यादृष्टीने विभागीय स्तरावर चर्चा सुरु आहे. सध्या पोषण आणि आरोग्य या दोन गोष्टींवरच भर देण्यात आलेला आहे. शिक्षणाचा भाग दुर्लक्षित आहे. ३ ते ६ वयोगटातील मुलांची जनगणना करणे आवश्यक आहे.

मुलींची पटनोंदणी वाढणे, गळतीचे प्रमाण कमी करणे, मुलींना शिक्षणाची गोडी लागण्याकरिता जीवनोपयोगी व्यवसाय शिक्षण देणे, व्यक्तिमत्व विकास करण्याकरिता विविध उपक्रम राबविणे यासाठी १५ लाख रु.चा निधी मंजूर झालेला आहे.

प्रत्येक जिल्ह्यातील उच्च प्राथमिक शाळा निवडून त्या शाळेत ५ संगणक, ५ यु.पी.एस १ प्रिंटर, स्पिकर्स इत्यादी साहित्य देण्यात येते. शाळेला संगणक पुरविण्याच्या बाबतीत काही प्रश्न निर्माण झाले आहेत. एक म्हणजे शाळेला संगणक पुरविले तर काही शाळांमध्ये ते प्रतिष्ठापन झालेले तर काही

शाळांमध्ये ते प्रतिष्ठापन केले जात नाहीत. प्रतिष्ठापन झाले तर त्यांचे देखभाल दुरुस्ती होत नाही. ते बंद पडून असतात. काही भागामध्ये भारनियमन असल्यामुळे त्यांचा वापर करता येत नाही. आता बूट मॉडेल केलेले आहे. त्यामध्ये संगणकाबरोबर संपूर्ण उपकरणे, शिक्षण साहित्य दिले जाते.

शाळांना दिलेल्या संगणकांची देखभाल दुरुस्ती व्हावी यासाठी तालुका किंवा जिल्हानिहाय एखाद्या तज्ज्ञ व्यक्तीची नेमणूक केली तर बरे होईल असे समितीने सुचविले असता विभागाकडे निधी मर्यादित असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले. बऱ्याच शाळांना लोकप्रतिनिधी यांच्या निधीतून संगणक दिलेले आहेत. सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून सर्वच शाळांना संगणक पुरविणे शक्य होत नाही. लोकप्रतिनिधींशी समन्वय साधून शाळांना संगणक पुरवावेत. परंतु संगणकाची देखभाल दुरुस्ती तालुका व जिल्हा स्तरावर तज्ज्ञ व्यक्तीची नेमणूक शालेय शिक्षण विभागाने करावी. असे मत समितीने व्यक्त केले.

**शिक्षक प्रशिक्षण -**

१.६१ नवनवीन शैक्षणिक पद्धती, साहित्य हाताळणे आणि आशय ज्ञान क्षमता वाढविण्यासाठी प्रत्येक शिक्षकास प्रत्येक वर्षी प्रशिक्षण दिले जाते. नियमित शिक्षकांना २० दिवसाचे, नव्याने दाखल झालेल्या शिक्षकांसाठी ३० दिवसाचे आणि अप्रशिक्षित शिक्षकांसाठी ६० दिवसाच्या प्रशिक्षणाची योजना आहे. हे प्रशिक्षण SCERT, DIET, BRC यांच्यामार्फत दिले जाते. तसेच नाविन्यपूर्ण प्रशिक्षणामध्ये CCE, ADEPTS, जीवन विद्या प्रेरणादायी शिबीर, Seven Habits व आदर्श शाळा याबाबत शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाते.

शिक्षण हक्क कायद्या मध्ये दोन गोष्टी आलेल्या आहेत. एक म्हणजे ८वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांची कोणत्याही प्रकारची परिक्षा घेता येणार नाही आणि त्यांना नापास करता येणार नाही. आता शिक्षण आणि अध्ययन कौशल्यावर भर दिलेला आहे. ज्या विद्यार्थ्यांमध्ये अध्ययन कौशल्य नसेल त्याच्यावर उपचारात्मक कारवाई करता येते. त्या विद्यार्थ्यांस नापास करता येत नाही. एखाद्या विद्यार्थ्यामध्ये अध्ययन कौशल्यतेचा अभाव आहे हे समजण्यासाठी विद्यार्थ्यांचे वर्षभर मूल्यमापन करुन त्याच्यामध्ये ज्या गोष्टीचा अभाव दिसून येईल त्यावर भर देण्यात येणार आहे.

आता १ली ते ८वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेणार नसल्यामुळे ९वी आणि १०वी मध्ये मात्र त्यांना परीक्षेला सामोरे जावे लागेल. परीक्षा देण्याची विद्यार्थ्यांना सवय नसल्यामुळे ते १०वीच्या परीक्षेमध्ये मेरीटमध्ये येऊ शकणार नाहीत. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन प्रक्रिया आतापासून सुरु झालेली आहे. आधीच्या

पद्धतीप्रमाणे आपण परीक्षा घेऊन मुलांना पास आणि नापास करीत होतो. तरी सुद्धा ५० टक्के मुले अशी आहेत की जी ८वीमध्ये असून देखील त्यांना २री आणि ३री मधील गणिते सोडविता येत नाहीत. या पद्धतीमध्ये सुधारणा करण्यासाठी ही पध्दती आणलेली आहे. त्यासाठी काही वेळ द्यायला पाहिजे.

या पद्धतीमध्ये आपण विद्यार्थ्यांना नापास करणार नाही. त्यांचे शैक्षणिक मूल्यमापन नियमितपणे होणार आहे. त्यासंबंधीचे निकष आपण निश्चित केलेले आहेत. विद्यार्थी हा सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनामध्ये आला पाहिजे. इयत्ता ६वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्याला "एक्स" आणि "वाय" गोष्टी येत असतील आणि "झेड" गोष्ट येत नसेल तर ती त्याला कशी शिकता येईल यावर भर देण्यात येणार आहे. प्रत्येक विद्यार्थ्याचे शैक्षणिक मूल्यांकन होणार आहे. हा शिक्षणक्रम ठरविताना सीबीएसई, आयसीएसई आणि आपले शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ या सर्वांचे मार्गदर्शन घेऊन सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन शिक्षक मार्गदर्शिका एक पुस्तक तयार करण्यात आलेले आहे. शेवटी ज्या शिक्षकांच्या माध्यमातून आपणास ही संकल्पना राबवावयाची आहे त्यांना इम्पॉवर करणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्याला भविष्यात आपली प्रगती साधता यावी, तो प्रगल्भ व्हावा, बुद्धिमान व्हावा अशा तऱ्हेचे शिक्षण त्याला मिळावयास हवे, असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, हा केंद्र शासनाचा उपक्रम आहे. त्यासाठी केंद्र शासनाने शिक्षण तसेच अन्य विविध क्षेत्रातील तज्ज्ञ लोकांची सल्लागार समिती नेमलेली आहे. शिक्षण हक्काच्या कायद्या बरोबरच प्रशिक्षण आणि कार्यान्वयन ह्या गोष्टी देखील विचारात घेतल्या पाहिजेत. आतापर्यंत आपण ब्रिटीशकालीन शिक्षण पद्धतीच अवलंबिलेली आहे. त्यामध्ये आपण बदल केला नाही. विद्यार्थ्याला पाढे तोंडपाठ येत असतील तर तो गणित दोन मिनिटामध्ये सोडवू शकेल. परंतु आताच्या पद्धतीमध्ये त्यास ४ मिनिटे लागू शकतील. तथापि, आता परीक्षा ही ३ तासाची असणार नाही. परिक्षेसाठी लागेल तेवढा वेळ दिला जाईल. विद्यार्थ्यांना पुस्तकेसुद्धा बघण्याची मुभा राहील. जर विद्यार्थ्याने नीट अभ्यास केला नसेल तर पुस्तक समोर ठेवून देखील त्याला प्रश्नाचे उत्तर लिहिता येणार नाही.

**लोकचेतना अभियानाची माहिती-**

१.६२ कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी लोकचेतना अभियानाच्या माध्यमातून स्थानिकांचा सहभाग मिळविण्यासाठी लोकप्रतिनिधींना ३ दिवसाचे निवासी व अनिवासी प्रशिक्षण देण्याचा उपक्रम आहे.

**अध्ययन अध्यापक साहित्य अनुदानाची माहिती-**

१.६३ नवीन प्राथमिक शाळेसाठी रु. २०,०००/- व नवीन उच्च प्राथमिक शाळेसाठी रु. ५०,०००/- अनावर्ती अनुदान प्रयोगशाळा, खेळाचे साहित्य, संगीत साहित्य, पुस्तके इत्यादीसाठी दिले जाते.

**मुलींच्या प्राथमिक शिक्षणासाठी विशेष कार्यक्रमाची माहिती-**

१.६४ ज्या ठिकाणी महिला साक्षरता आणि पुरुष साक्षरता यात २१.६९ टक्क्यांचा फरक आहे अशा १७ जिल्ह्यातील ५२३ आदर्श समूह साधन केंद्रात कार्यक्रम राबविला जात आहे. पूर्वी प्रती शिक्षणार्थी ३० रुपये दिले जात होते. आता प्रतिशिक्षणार्थी १०० रुपये दिले जातात.

या उपक्रमास कमी-जास्त प्रतिसाद मिळत आहे. ग्रामीण भागामध्ये लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण देणे ही सोपी गोष्ट नाही. जागतिक बँकेच्या तसेच दिल्लीच्या जनरल रिव्हू मिशनच्या लोकांनी भेट देऊन पाहणी केली. त्यांचा अहवाल सकारात्मक (पॉझिटिव्ह) आहे. त्यांच्या अहवालामध्ये विविध निकषावर (पॅरामिटर्स्वर) महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक आहे. महाराष्ट्राचा क्रमांक तिसरा असला तरी आपण खूप मागे आहोत.

**कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय (KGBV)**

१.६५ केंद्र शासनाने शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले तालुके निश्चित केलेले आहेत. ज्या तालुक्यातील मुलांचे शिक्षणाचे प्रमाण राष्ट्रीय प्रमाणापेक्षा कमी आहे असे ४३ तालुके शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले म्हणून निश्चित करण्यात आलेले आहेत. प्राथमिक शाळांमध्ये ग्रंथालय, वाचनालय, गणित किट, इंग्लिश भाषा किट, विज्ञान प्रयोगशाळा आदींची व्यवस्था करण्यात आलेली आहे. आमच्याकडे साधने कमी असल्यामुळे इयत्ता ५वी ते ७वीच्या विद्यार्थ्यांसाठी ह्या सोयी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. एनसीईआरटीकडून विज्ञानाची चांगली किटस् आलेली आहेत. सन २०१०-२०११ करिता एकूण १६८२१५.११४ लाख रु.ची आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे. RTE साठी वेगवेगळे पर्याय आहेत. शाळा इमारतीचे अधिकार मुख्याध्यापकांना दिलेले आहेत. त्यांना इमारतीसंबंधातील तांत्रिक ज्ञान नसल्यामुळे तांत्रिक मान्यता देण्यासाठी इंजिनिअर असतात.

१.६६ जिल्हानिहाय विचार केला तर रत्नागिरी जिल्ह्याने ६० टक्क्यांपेक्षा जास्त निधी खर्च केला आहे. लातूर जिल्ह्यांने सर्वात कमी निधी खर्च केला आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा सर्व शिक्षा अभियानामध्ये सहभाग नसेल तर त्याचा परिणाम होतो. त्यामुळे आम्ही सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची देखील बैठक घेतो. भिवंडी महानगरपालिकेने सर्व शिक्षा अभियानावर सर्वात जास्त म्हणजे ६७.०२ टक्के खर्च केला आहे, तर अकोला महानगरपालिकेने

९.७८ टक्के इतका खर्च केला आहे. पुणे महानगरपालिकेने ४१.०१ टक्के खर्च केला आहे. विभागाला मुंबई महानगरपालिकेला अनुदान देताना मात्र खूप अडचण येते. मुंबई महानगरपालिकेचा आवाका फार मोठा आहे. मुंबई महानगरपालिकेला सर्व शिक्षा अभियानातंर्गत वर्ग खोल्यांसाठी ३ लाख रूपये दिले तर त्याचा त्यांना काहीही उपयोग होत नाही. मुंबई महानगरपालिका दहा लाखाच्यावर निधी खर्च करते.

सर्व शिक्षा अभियानामध्ये पूर्वी संरक्षण भिंत घेण्यात येत नव्हती, असे समितीने सांगितले असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सर्व शिक्षा अभियानांतर्गत वर्ग खोल्या बांधणे, शौचालय बांधणे इत्यादी कामे हाती घेण्यात येतात.

सर्व शिक्षा अभियानांतर्गत संरक्षण भिंत घेतली पाहिजे. त्यास प्राधान्य दिले पाहिजे. शाळेतील मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो असे मत समितीने व्यक्त केले असता यासंबंधी समितीने शासनाला सूचना करावी असे विभागीय सचिवांनी सूचीत केले.

A.G.'s first question is about supply of computer system and software. The department had purchased २५० computer systems and necessary software. Whether that computer systems and software are installed? Departmental Secretary explained that all the computer systems and software are installed. Department Secretary for Education assured Committee for a detail list but still today not received.

A.G.'s second question is about supply of textbooks to the students. What is the reason behind the delay in supply of text books to the students? Departmental Secretary explained that the main reason behind the delay in supply of text books are Court matters and printing procedure. Now the problem is solved and from this year students will get textbooks on time. We have taken adequate care from this year and we will get १००% supply of text books upto June.

A.G.'s next question is about the civil works, infrastructure facilities, toilets and water facilities. Most of the schools do not have all these facilities. What action is taken by the department in this regard?

Departmental Secretary explained that for every year, we are having ३३% budget share for our department. We cannot cover all the schools in single year. At the same time, the schools located in villages are not having drinking water and sanitation facilities at all. We are trying to communicate with the Drinking water and Sanitation department of local government bodies to co-operate us in this regard.

I would like to tell you the latest figures about how many schools are not having all these basic facilities. There are separate toilet facilities for boys in ६१२५० schools but ३५७३ schools still are not having seperate toilet facilities for boys and girls. There are no seperate toilet facilities for

girls in १८४८६ schools. There are no drinking water facilities in ६२९७ schools. There are no wall boundaries in २९७९२ schools. We are trying our best to provide all these things in every school by taking help of local government bodies.

यात तफावत असण्याचे कारण असे आहे की, सुरूवातीला सामाईक प्रसाधनगृहे बांधली होती. त्यामुळे मुलींचा प्रश्न सुटत नव्हता. तद्‌नंतर विभागाने स्वतंत्र प्रसाधनगृहे बांधली आहेत.

A.G. next question is about parking of funds. The department had made fix deposit account of १.४२ crore in March, २००५. I would like to know that what is the procedure for parking of funds? Departmental Secretary explained that the department had already spent १.२६ crore out of १.४२ crore and the remaining funds will be spent by March this year.

जून २००३ मध्ये बंद झालेल्या जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रमाखालील खर्च न केलेली रक्कम रूपये १.५२ कोटी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने सर्व शिक्षा अभियान निधीकडे हस्तांतरित करण्यासाठी जवळ जवळ ५ वर्षाचा विलंब झाला. याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, संपूर्ण निधी ग्रामीण पातळीवरून गोळा करावयाचा असल्यामुळे यास विलंब झालेला आहे.

नांदेड जिल्हा परिषदेतंर्गत असणाऱ्या शाळांना स्टेट बँकेत बचत खाते उघडण्याचे निदेश असतानाही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत योजनेचा निधी ठेवणे सुरूच ठेवले याबाबत संबंधितांवर काय कारवाई करण्यात आली आहे ? अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी खुलासा केला की, संबंधितांवर कारवाई करण्याचा प्रस्ताव मागवून घेण्यात येईल. राष्ट्रीयकृत बँकेत किंवा स्टेट बँकेत बचत खाते उघडण्याचे निदेश असताना संबंधितांनी हेतुपुरस्सर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत खाते उघडले आहे आणि त्यांच्या विरुद्ध अजून कारवाई झालेली नाही हे योग्य नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता सचिवानी खुलासा केला की, राष्ट्रीयीकृत बँकेत किंवा स्टेट बँकेत बचत खाते उघडण्याबाबतचे निदेश प्राप्त होण्यापूर्वी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत खाते उघडण्यात आले होते. परंतु नंतर शासनाच्या निदेशाप्रमाणे त्या बँकेतील पैसे काढून राष्ट्रीयीकृत बँकेत भरले आहेत.

सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमासंदर्भात काही तक्रारी आल्या आहेत काय ? या कार्यक्रमांतर्गत राज्यातील किती जिल्ह्यांमध्ये अनियमिततेच्या, निधी योग्य प्रकारे खर्च न करण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, किती प्रकरणी विभागीय चौकशी सुरु आहे ? अशी किती प्रकरणे विभागाकडे प्रलंबित आहेत ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवानी खुलासा केला की, आता माझ्याकडे सर्व जिल्ह्यांची माहिती नाही. परंतु मालेगाव आणि भिवंडीमध्ये अशा प्रकारची जास्त प्रकरणे आहेत. तसेच अकोला जिल्ह्यामध्ये बांधकामाच्या निधीमध्ये अपहार झालेला आहे. त्या प्रकरणी संबंधितांना निलंबित केलेले आहे.

सर्व शिक्षा अभियानांतर्गत प्राप्त झालेल्या निधीमध्ये अफरातफर केल्याच्या वा गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी विभागाकडे आल्या आहेत काय ? असल्यास, समितीला त्याची माहिती द्यावी. असे समितीने निदेश देवूनही साक्षीचे वेळी तसेच त्यानंतर मागाहून देखील अद्यापपर्यंत माहिती प्राप्त होवू शकलेली नाही.

शाळा भाड्याच्या जागेत चालविली जात असेल तर सर्व शिक्षा अभियानातंर्गत जागेचे भाडे देण्याची तरतूद आहे काय ? याबाबत विभागीय सचिवानी खुलासा केला की, जागेचे भाडे देण्याची तरतूद नाही. शाळेस जागा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी राज्य शासनाची किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेची आहे.

सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाच्या माहिती पुस्तिकेबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, विभागाने माहिती पुस्तिका तयार केलेली आहे. ही पुस्तिका इंग्रजी भाषेत असून तिचे मराठीत भाषांतर करण्याचे काम सुरु आहे.

यावर समितीने विभागीय सचिवांना सूचित केले की, विभागाने ही माहिती लवकरात लवकर मराठीत भाषांतरीत करुन घ्यावी. कारण या योजनेंतर्गत केंद्र सरकारकडून मोठ्या प्रमाणावर निधी प्राप्त होतो. त्याबाबत स्थानिक पातळीवर माहिती नसेल तर त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी होऊ शकणार नाही. तथापि, समितीला अहवालाची मराठी प्रत अद्याप प्राप्त झालेली नाही.

१.६७ शिक्षण हक्क कायद्यानुसार ६ ते १४ वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण केलेले आहे असे असताना शाळांतून कमी उपस्थिती असते. ही उपस्थिती १०० टक्के होण्यासाठी काय उपाययोजना केली आहे ? असे समितीने विचारले असता विभागीय सचिवानी खुलासा केला की, गळती शून्य व्हावी हे सर्व शिक्षा अभियानाचे उद्दिष्ट आहे. परंतु ती शून्यावर येईल की नाही, हे माहीत नाही. आजही अशी परिस्थिती आहे की, आपण परीक्षेत नापास होऊ या भीतीपोटी मुलांची गळती होत असते. त्यासाठी आनंददायी शिक्षण, सर्वंकष सार्वत्रिक मूल्यांकन, एज ॲप्रोप्रिएट एज्युकेशन अशा विविध योजना विभागातर्फे राबविण्यात येत आहे असेही सचिवांनी समितीला सांगितले.

सर्व शिक्षा अभियान कार्यक्रम ग्रामीण भागात जिल्हा परिषदेमार्फत आणि शहरी भागात महानगरपालिकेमार्फत राबविला जातो. काही खाजगी अनुदानित शाळा आहेत तर काही खाजगी विनाअनुदानित शाळा आहेत. खाजगी विनाअनुदानित शाळांसाठी सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत निधी खर्च करता येतो काय अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवानी खुलासा केला

की, खाजगी विनाअनुदानित शाळांसाठी सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत निधी खर्च करता येत नाही. खाजगी अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके व गणवेष देण्यात येतो.

मान्यता प्राप्त अनुदानित आणि खाजगी अनुदानित शाळांसाठी सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत कोणकोणते उपक्रम राबविण्यात येतात याची माहिती देण्याचे विभागीय सचिवांनी आश्वासित करुनही समितीचा अहवाल तयार होईपर्यंत देखील त्याबाबतची माहिती समितीला अद्याप देण्यात आली नाही.

**अभिप्राय व शिफारशी :**

**१.६८** समितीसमोर आलेल्या उपरोक्त माहितीवरुन असे दिसून येते की, सन २००१-०२ पासून सर्व शिक्षा अभियान राज्यात सुरु झाले असून सन २००१-०२ हे या कार्यक्रमाचे पहिलेच वर्ष होते. या पहिल्या वर्षात कार्यक्रमासाठी एकूण ३५० कोटी रुपये मंजूर झाले होते, त्यापैकी पहिल्या वर्षी ५० कोटी रुपये आले होते. ती रक्कम कोणत्याही हिशेबामध्ये दिसत नसली तरी ही रक्कम पुढील वर्षीच्या लेख्यामध्ये परावर्तीत झाली आहे.

**१.६९** रूपये ५० कोटीचा जो निधी मिळाला त्यानंतर सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाचे काम संपूर्ण देशाच्या काना-कोपऱ्यात सुरु झाले परंतु महाराष्ट्र राज्यात सुरु झाले नाही.

**१.७०** सन २००१-०२ मध्ये १०४ कोटी एवढी रक्कम राज्याला मिळाली. वास्तविक देशाचा विचार केला तर शिक्षणाचा प्रसार महाराष्ट्र राज्यात झालेला आहे आणि त्याच राज्यात सर्व शिक्षा अभियानसारख्या योजनेला पूर्णत: अपयश आले असेल तर ही बाब गंभीर आहे.

**१.७१ देशात सर्वात मोठे राज्य असलेल्या महाराष्ट्राला उक्त योजनेच्या अंमलबजावणीसाठी भारत सरकारकडून अनुदान मिळाले तरी देखील योजना सुरु होण्यास एक वर्ष उशीर होतो, ही बाब बरोबर नाही. याप्रकरणी जे जबाबदार असतील त्यांची चौकशी करुन चौकशीत दोषी आढळून आलेल्यांवर योग्य तो कारवाई करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**१.७२** सन २००१ ते २००५ या कालावधीत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडून रुपये ९५.८६ कोटी एवढी रक्कम न वापरता शिल्लक राहिली आहे. दरवर्षी काही पैसे शिल्लक राहतात. आपल्याला तीन टप्प्यात पैसे येत असतात. तिसरा टप्प्यातील पैसे शेवटी येतात. त्यामुळे कामाची सगळी कार्यपद्धती सुरु करुन ती पुर्ण करण्यास विलंब लागतो त्यामुळे काम सुरु करण्यास वेळ लागतो. पुढच्या वर्षी देण्यात येणाऱ्या निधीत हे पैसे समायोजित केले जातात. पुढच्या वर्षी आपला जो काही भाग असतो त्याची गणना करुन निधी दिला जातो.

**१.७३ केंद्र शासनाकडून निधीची रक्कम आगाऊ स्वरुपात येत नाही त्यामुळे राज्य शासन आपल्या हिश्याची रक्कम देत नाही. इतर राज्यामध्ये मात्र त्या त्या राज्याची हिश्याची रक्कम अगोदरच दिली जाते आणि योजनांची कामे वेगाने सुरु कशी राहतील हे पाहिले जाते. सबब इतर राज्यांनी या योजनेच्या अंमलबजावणीसाठी जी कार्यपद्धती अवलंबिली आहे तशीच कार्यपद्धती आपल्या राज्यात सुरु केली जात नाही ही खेदाची बाब आहे. सबब, या योजनेच्या अंमलबजावणीसाठी इतर राज्यांनी जी कार्यपद्धती अवलंबिली आहे त्याबाबतची माहिती घेवून तिच कार्यपद्धती आपल्या राज्यात अवलंबविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**१.७४** जून २००३ मध्ये बंद झालेल्या प्राथमिक शिक्षण कार्यक्रमाखालील खर्च न केलेली रक्कम रुपये १.५२ कोटी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने सर्व शिक्षा अभियान निधीकडे हस्तांतरित करण्यासाठी जवळजवळ ५ वर्षाचा विलंब झाल्याचे विभागाने मान्य केले तसेच खर्च न केलेली रक्कम व्याजासह परत करण्यात आली आहे. हे विभागाने दिलेले कारण समितीस अमान्य असल्याने समितीने याबाबत असे नमूद केले की, विभागाला दिलेले पैसे खर्च न करता तसेच ठेवणे ही बाब अतिशय गंभीर आहे. ज्या कामासाठी पैसे दिलेले आहेत ते पैसे त्याच कामासाठी खर्च करावयास पाहिजे होते. तसे न करता १.५२ कोटी रुपये सोसायटीच्या खात्यामध्ये जमा होतात आणि ते पैसे समायोजित करण्याचा विभागाने प्रयत्न केला परंतु त्यांना ते शक्य झालेले नाही त्यामुळे राज्य सरकारला आणि केंद्र सरकारला त्यांचे पैसे परत करण्यात आले आहेत. यामध्ये विभागाने विलंब झाल्याचे मान्य केले.

**१.७५** १.५२ कोटी रुपयांचा हिशोब करावयाचा राहिल्यामुळे परिच्छेद तसाच राहिला. सन २००३ साली ही योजना बंद झाली होती आणि आपण २००५ सालापर्यंत पैसे भरले नाहीत. या विलंबास जो अधिकारी जबाबदार असेल त्याच्याविरुद्ध कारवाई करावी. अधिकाऱ्यांनी केलेल्या चुकांबाबत शासनातील वरिष्ठ अधिकारी त्यांच्यावर कारवाई करीत नाहीत ही गोष्ट योग्य नसल्याची खंत व्यक्त करुन याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली.

**१.७६** जे अधिकारी काम करीत नाहीत त्यांच्याविरुद्ध कार्यवाही केली जात नाही. शिक्षण हा विषय अत्यंत महत्त्वाचा असतांना **या विलंबास जे कोणी अधिकारी जबाबदार असतील त्यांच्याविरुद्ध कारवाई करुन त्यासंबंधीची माहिती समितीला देण्याचे विभागीय सचिवानी आश्वासित करुनही अद्यापपर्यंत समितीस माहिती प्राप्त झाली नाही. तरी यासंदर्भातील माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**१.७७ सन २००३ पर्यंत सर्व मुला-मुलींना शाळा, शिक्षण हमी केंद्र, पर्यायी शिक्षण केंद्र इत्यादीमध्ये दाखल करणे, सन २००७ पर्यंत सर्व मुला-मुलींचे पाच वर्षाचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करणे, सन २०१० पर्यंत सर्व मुला-मुलींचे आठ वर्षांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करणे, प्राथमिक शिक्षणाचा समाधानकारक दर्जा व जीवनोपयोगी शिक्षणावर भर देणे, प्राथमिक स्तरावरील लिंगभेद व सामाजिक क्षेत्रातील फरक दूर करणे, उच्च प्राथमिक शिक्षणाबाबतचे उद्दिष्ट साध्य करणे व सन २००७ पर्यंत १०० टक्के उपस्थितीचे उद्दिष्ट करणे इत्यादी उद्दिष्टे साध्य करावयाची होती. परंतु, सन २०११ पर्यंत सुद्धा सदर उद्दिष्टे साध्य झालेली नाहीत तरी याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**१.७८** सर्व शिक्षा अभियानातंर्गत नवीन शाळा, शिक्षण वेतन, गट साधन केंद्र, समूह साधन केंद्र, बांधकाम, मोठ्या प्रमाणावरील शाळा इमारत दुरुस्ती, शाळा बाह्य मुलांसाठी उपक्रम, मोफत पाठ्यपुस्तके, नवोपक्रम, तसेच अपंग मुलांचे समावेशित शिक्षण, देखभाल दुरुस्ती, व्यवस्थापन खर्च, संशोधन व मूल्यमापन, पर्यवेक्षण व संनियंत्रण, शाळा अनुदान, शिक्षक अनुदान, अध्ययन, अध्यापन साहित्य अनुदान, शिक्षक प्रशिक्षण, लोकप्रतिनिधींचे प्रशिक्षण, मुलींच्या प्राथमिक शिक्षणासाठी विशेष कार्यक्रम, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय इत्यादि उपक्रम राबविले जातात. तसेच राज्यात सन २०१० मध्ये शिक्षण हक्क कायदा सुरु झाला. त्यात ज्या मुलांना पालक नाही, ज्या मुलांना राहण्यासाठी घर नाही, अशा मुलांचा सर्व शिक्षा अभियानांतर्गत समावेश करण्यात आला आहे. **या उपक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी, याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**१.७९** ग्रामीण पातळीवर सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाची अंमलबजावणी करीत असताना शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी तसेच केंद्रप्रमुख इत्यादी यंत्रणा पुरेशी नसल्याने जिल्हा पातळीवर तसेच सन २०१०-११ मध्ये शिक्षण हक्क कायद्यानुसार पालक मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली शाळा व्यवस्थापन समिती कार्यान्वित करण्यात आली आहे. पालक मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यात बहुतांश समित्या असतात. त्यामुळे त्या समित्यांचे कामकाज एकाच दिवसात घेण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. परंतु तालुका पातळीवर या कार्यक्रमाची अंमलबजावणी व्यवस्थितपणे होत आहे किंवा नाही यासाठी तेथील स्थानिक लोकप्रतिनधी सक्रिय राहून जास्तीत जास्त वेळ देऊ शकतो. यात लोकप्रतिनिधींना स्थान दिल्यास कार्यक्रम अंमलबजावणीच्या दृष्टीने शाळा व्यवस्थापन समितीला काही अडचणी असल्यास किंवा काही सुधारणा करायच्या असल्यास सरपंच किंवा मुख्याध्यापक यांच्यापेक्षा लोकप्रतिनिधी जास्त चांगल्याप्रकारे

या बाबी शासनासमोर मांडू शकतात. त्यामुळे **राज्यस्तरीय शाळा व्यवस्थापन संरचनेमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींचा समावेश करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

**१.८०** आश्रमशाळांचा शैक्षणिक दर्जा निश्चित करण्यासाठी नियंत्रण प्राधिकारी समाजकल्याण विभाग आहे. योजनेचे संपूर्ण नियंत्रण शालेय शिक्षण विभागाकडून केले जाते. **आदिवासी विकास विभागाकडे शिक्षणासंबंधी स्वतंत्र यंत्रणा नाही. आदिवासी विकास विभागाकडे केवळ आश्रमशाळाचे व्यवस्थापन असले तरी आश्रमशाळांमधील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**१.८१** शिक्षण हक्क कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये दोन-तीन मुख्य अडचणी आहेत. चौथीपर्यंतच्या शाळा आहेत. पाचवी ते सातवीसाठी दुसऱ्या शाळेत जावे लागते. राज्य शासनाची प्राथमिक शाळेची व्याख्या पहिली ते सातवी आहे. परंतु देशातील ६ ते १४ वयोगटातील मुलांना शिक्षण देण्यासाठी पहिली ते आठवीपर्यंत प्राथमिकचा भाग असतो. आपल्या राज्यात "आठवी" माध्यमिक विभागात आहे. माध्यमिकसाठी निकष वेगळे आहेत. माध्यमिकमध्ये प्राथमिक विभागातील ग्रॉस इन्व्हॉल्वमेंट रिटेन्शन ६९ टक्के आहे. याचा अर्थ ६९ टक्के विद्यार्थी प्रवेश घेतात. देशाच्या तुलनेत हे प्रमाण कमी आहे. **तामिळनाडू, महाराष्ट्र अशी दोन-तीन राज्ये वगळता सर्व राज्यांनी प्राथमिक शिक्षणाची व्याख्या बदलली आहे. सबब, तामिळनाडू वगळता इतर राज्यांनी प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात जी व्याख्या केली आहे त्याबाबतची माहिती घेवून त्यानुसार या संदर्भात उच्च पातळीवर विचारविनिमय करुन आपल्या राज्याची देखील इतर राज्याप्रमाणे प्राथमिक शिक्षणाची व्याख्या बदलण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**१.८२** राज्यात प्रमाणात खाजगी माध्यमिक विनाअनुदानित व अनुदानित शाळा आहेत. आठवीपर्यंतचे शिक्षण प्राथमिक विभागात आणले तर प्रशासकीय अडचण निर्माण होण्याची शक्यता आहे. परंतु यापुढील काळात निर्णय घ्यावाच लागेल. प्राथमिक विभाग ९० टक्के जिल्हा परिषदांकडे आहे. **आठवीचा समावेश माध्यमिक विभागामध्ये आहे आणि ९० टक्के खाजगी क्षेत्र आहे. जिल्हा परिषदेकडे आठवीपर्यंतच्या शिक्षणाची जबाबदारी दिली तर तितके विद्यार्थी मिळणार नाहीत. माध्यमिक विभागाचे शिक्षक अतिरिक्त होतील ही प्रशासकीय अडचण आहे ही बाब विचारात घेता याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**१.८३** ऊस तोडणीच्या हंगामात ऊस तोडणी कामगारांची मुले स्थलांतरित होतात. या स्थलांतरित मुलांसाठी सेतूशाळा केंद्रे उघडण्यात आलेली आहेत. ज्या ठिकाणी साखर कारखाने आहेत

त्या ठिकाणी ५ महिन्यांसाठी अशी केंद्रे सुरु केली जातात. त्या ठिकाणी स्वयंसेवकाच्या माध्यमातून शिक्षणाची सोय केली जाते. **परंतु ज्या ठिकाणी धरणाची कामे सुरु असतात तेथील कामगार देखील स्थलांतरित होऊन आलेले असतात. अशा कामगारांच्या मुलांसाठी सुध्दा शिक्षणाची व्यवस्था झाली पाहिजे. विदर्भामध्ये ही संकल्पना राबविली जात नाही. उपरोक्त धर्तीवर ज्याठिकाणी धरणाची कामे सुरु असतात तेथे काम करणाऱ्या कामगाराच्या मुलांसाठी तसेच विदर्भामध्ये व इतर संपूर्ण आदिवासी भागामध्ये सुद्धा सेतू शाळा केंद्रे उघडण्यात यावीत, अशी समितीची शिफारस आहे.**

**१.८४** प्रत्येक जिल्ह्यातील उच्च प्राथमिक शाळा निवडून त्या शाळेत ५ संगणक, ५ यु.पी.एस १ प्रिंटर, स्पिकर्स इत्यादी साहित्य देण्यात येते. शाळेला संगणक पुरविण्याच्या बाबतीत काही प्रश्न निर्माण झाले आहेत. एक म्हणजे शाळेला संगणक पुरविले तर काही शाळांमध्ये ते बसविले जातात तर काही शाळांमध्ये ते बसविले जात नाहीत व बसविले असल्यास त्यांची देखभाल दुरुस्ती होत नाही. ते बंद पडून असतात. काही भागामध्ये भारनियमन असल्यामुळे त्यांचा वापर करता येत नाही.

**१.८५ सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून सर्वच शाळांना संगणक पुरविणे शक्य होत नाही. त्यामुळे याबाबत लोकप्रतिनिधींशी समन्वय साधून जास्तीत जास्त शाळांना अध्यापन साहित्यासह संगणक पुरविण्यात यावेत तसेच शाळांना दिलेल्या संगणकांची देखभाल दुरुस्ती व्हावी यासाठी तालुका किंवा जिल्हानिहाय एखाद्या तज्ज्ञ व्यक्तीची नेमणूक करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**१.८६** शिक्षण हक्क कायद्यामध्ये इयत्ता १ली ते ८वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांची कोणत्याही प्रकारची परीक्षा घेता येणार नाही आणि त्यांना नापास देखील करता येणार नाही. त्यामुळे शिक्षण आणि विद्वत्ता कौशल्यावर भर दिलेला आहे. ज्या विद्यार्थ्यांमध्ये विद्वत्ता कौशल्य नसेल त्याच्यावर उपचारात्मक कारवाई करता येते. त्या विद्यार्थ्यांस नापास करता येत नाही. एखाद्या विद्यार्थ्यामध्ये विद्वता कौशल्याचा अभाव आहे हे समजण्यासाठी विद्यार्थ्यांचे वर्षभर मूल्यमापन करुन त्याच्यामध्ये ज्या गोष्टीचा अभाव दिसून येईल त्यावर भर देण्यात येणार आहे. त्यासाठी **सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन प्रक्रिया आतापासून सुरु झालेली आहे. आधीच्या पद्धतीप्रमाणे आपण परीक्षा घेऊन मुलांना पास आणि नापास करीत होतो. तरीसुद्धा ५० टक्के मुले अशी आहेत की जी ८वी मध्ये असून देखील त्यांना २री आणि ३री मधील गणिते सोडविता येत नाहीत. या पद्धतीमध्ये सुधारणा करण्यासाठी नवीन शिक्षणपद्धती अंमलात आणलेली असली तरी याबाबत शिक्षकांना प्रशिक्षण देणे आवश्यक असून त्यासाठी आवश्यक ती उपाययोजना लवकरात लवकर करण्याची कार्यवाही करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**१.८७** केंद्र शासनाने शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले तालुके निश्चित केलेले आहेत. **ज्या तालुक्यातील मुलांचे शिक्षणाचे प्रमाण राष्ट्रीय प्रमाणापेक्षा कमी आहे असे ४३ तालुके शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले म्हणून निश्चित करण्यात आलेले आहेत. या तालुक्यांची सविस्तर माहिती समितीला देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**१.८८ प्राथमिक शाळांमध्ये ग्रंथालय, वाचनालय, गणित किट, इंग्लिश भाषा किट, विज्ञान प्रयोगशाळा आदींची व्यवस्था करण्यात आलेली आहे. विभागाकडे साधने कमी असल्यामुळे इयत्ता ५वी ते ७वीच्या विद्यार्थ्यांसाठी ह्या सोयी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या असल्या तरी सर्व शाळांना या सुविधा देण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे सर्व शाळांना या सुविधा देण्यात याव्यात, अशी समितीची शिफारस आहे.**

**१.८९** एनसीईआरटीकडून विज्ञानाची चांगली किटस् आलेली आहेत. सन २०१०-२०११ करिता एकूण १६८२१५.११४ लाख रु.ची आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे. RTE साठी वेगवेगळे ऑब्जेक्टीव्हज आहेत. शाळा इमारतीचे अधिकार मुख्याध्यापकांना दिलेले आहेत. त्यांना इमारतीसंबंधातील तांत्रिक ज्ञान काहीही नसते. त्यामुळे तांत्रिक मान्यता देण्यासाठी इंजिनिअर असतात. **सर्व शिक्षा अभियानातंर्गत होणाऱ्या शाळेच्या इमारत बांधकामामध्ये मुख्याध्यापकांचा सहभाग करू नये, अशी समितीची शिफारस आहे.**

**१.९०** सर्व शिक्षा अभियानातंर्गत वर्षनिहाय खर्च पाहिला तर ९८ टक्के लक्ष साध्य झाले आहे. जिल्हानिहाय विचार केला तर रत्नागिरी जिल्ह्याने ६० टक्क्यांपेक्षा जास्त निधी खर्च केला आहे. लातूर जिल्ह्यांने सर्वात कमी निधी खर्च केला आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा सर्व शिक्षा अभियानामध्ये सहभाग नसेल तर त्याचा विपरीत परिणाम होतो. सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची बैठक देखील घेतली जाते. भिवंडी महानगरपालिकेने सर्व शिक्षा अभियानावर सर्वात जास्त म्हणजे ६७.०२ टक्के खर्च केला आहे, तर अकोला महानगरपालिकेने ९.७८ टक्के इतका खर्च केला आहे. पुणे महानगरपालिकेने ४१.०१ टक्के खर्च केला आहे. **राज्यातील सर्व जिल्हापरिषदेच्या, नगरपालिकेच्या व महानगरपालिकेच्या शाळांच्या, खोल्यांच्या बांधकामाबाबत एकसुत्रीपणा आणण्यात यावा तसेच निधी खर्च करण्याबाबत योग्य मार्गदर्शक सूचना करण्यात याव्यात, अशी समितीची शिफारस आहे.**

**१.९१** सर्व शिक्षा अभियानातंर्गत शासनाने शाळेसाठी संरक्षक भिंतीचा देखील विचार केला पाहिजे. शाळा सुरू असताना त्यामध्ये जनावरे चरत असल्याचे दिसून येते. **सर्व शिक्षा अभियानामध्ये**

**संरक्षण भिंत घेण्यात येत नसून वर्ग खोल्या बांधणे, शौचालय बांधणे इत्यादी कामे हाती घेण्यात येतात. त्यामुळे सर्व शिक्षण अभियानांतर्गत शाळेसाठी संरक्षण भिंत बांधकामाचा समावेश करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे. तसेच या संदर्भात शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात द्यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**१.९२** विभागाने २५० संगणक पद्धती व आज्ञावली खरेदी केल्या असून त्यांचा वापर करण्यात आला नसल्याचे महालेखाकारांचे म्हणणे आहे. परंतु विभागीय सचिवांनी सर्व संगणक पद्धती व आज्ञावली वापरण्यात आल्याचे समितीला सांगण्यात आले तसेच त्याबाबतची सविस्तर यादी देण्याचे आश्वासित करुनही अद्याप समितीस माहिती प्राप्त झालेली नाही. तरी सदर माहिती समितीला तातडीने सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

**१.९३** जून २००३ मध्ये बंद झालेल्या जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रमाखालील खर्च न केलेली रक्कम रूपये १.५२ कोटी सर्व शिक्षा अभियान निधीकडे हस्तांतरित करण्यासाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेत जवळ जवळ ५ वर्षाचा विलंब झाला, संपूर्ण ग्रामीण पातळीवरून निधी गोळा करावयाचा होता. त्यामुळे यास विलंब झालेला आहे. पाच वर्षात कोणतीही कारवाई न करणे हे योग्य नाही असे समितीचे स्पष्ट मत असून त्याबद्दल समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

**१.९४** नांदेड जिल्हा परिषदेतंर्गत असणाऱ्या शाळांना स्टेट बँकेत बचत खाते उघडण्याचे निदेश असतानाही शाळांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत योजनेचा निधी ठेवणे सुरूच ठेवले तसेच एका ठराविक बँकेमध्ये पैसे ठेवण्यामध्ये काही जणांचे वैयक्तिक हितसंबंध गुंतलेले असतात ही बाब विचारात घेता राष्ट्रीयकृत बँका या विश्वासार्ह असल्यामुळे यात ठेवलेला निधी सुरक्षित असतो. **जिल्हा परिषदांनी राष्ट्रीयकृत बँकेत पैसे ठेवले किंवा कसे याबाबत विभागाने सर्वंकष आढावा घेवून समितीला माहिती देण्यात यावी. या संदर्भात संबंधितांवर कारवाई करण्याचे आश्वासित करुनही, अद्याप कारवाई केल्याबाबतची माहिती अद्याप समितीला प्राप्त झालेली नाही. तरी या प्रकरणी जबाबदारी निश्चित करुन त्यानुसार त्यांचेविरुद्ध कारवाई करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**१.९५** सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमासंदर्भात काही तक्रारी आल्या आहेत. पाच वर्षापूर्वी समितीने अमरावती येथे दौरा केला होता. त्याठिकाणी सर्व शिक्षा अभियान योजनेमध्ये काही जणांनी भ्रष्टाचार व गैरव्यवहार केल्याचे आढळून आल्यानंतर त्यांना निलंबित करण्यात आले होते. **सद्य:स्थितीत या कार्यक्रमांतर्गत राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये अनियमिततेच्या, निधीचा योग्य प्रकारे खर्च न करण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, काही अधिकारी/कर्मचारी यांची विभागीय चौकशी सुरु आहे. या संदर्भात विभागाकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांची व कार्यवाही केलेल्या प्रकरणांची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**१.९६ सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाची माहिती पुस्तिका विभागाने तयार केलेली आहे. ही पुस्तिका इंग्रजी भाषेत असून तिचे मराठीत भाषांतर करण्याचे काम सुरु आहे. विभागाने ही माहिती लवकरात लवकर मराठीत भाषांतरीत करुन घ्यावी. कारण या योजनेंतर्गत केंद्र सरकारकडून मोठ्या प्रमाणावर निधी प्राप्त होतो. त्याबाबत स्थानिक पातळीवर माहिती नसेल तर त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी होऊ शकणार नाही. त्यामुळे याबाबत तातडीने कार्यवाही करण्यात यावी, सर्व शिक्षा अभियानांतर्गत राज्य शासनाने केंद्र शासनाला पाठविण्याकरिता अहवाल तयार केलेला आहे. त्या अहवालाची एक मराठी प्रत समितीला देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**१.९७** खाजगी विनाअनुदानित शाळांसाठी सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत निधी खर्च करता येत नाही. खाजगी अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके व गणवेष देण्यात येतो. **मान्यता प्राप्त अनुदानित आणि खाजगी अनुदानित शाळांसाठी सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत कोणकोणते उपक्रम राबविण्यात येतात याची माहिती देण्यात यावी, अशीही समितीची शिफारस आहे.**

# गृहनिर्माण विभाग

**२.** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालामधील **परिच्छेद क्रमांक ३.२ "वाल्मिकी आंबेडकर मलिन वस्ती आवास योजना" व परिच्छेद क्रमांक ४.२.३ जमिनीच्या किंमती स्वेच्छेने (Arbitrary) ठरविल्यामुळे झालेले नुकसान"** या संदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

**(अ) प्रकल्प अंमलबजावणी -**

अपात्र लाभधारकांची निवड, निवासस्थानांमध्ये स्वच्छता गृहांची तरतूद न करणे आणि जमिनीचा हक्क लाभधारकांना बहाल न करणे इ. अनियमितता होत्या.

**लाभधारकांची निवड-**

**२.१** १ जानेवारी, १९९५ च्या मतदार यादीत गलीच्छ वस्ती निवासकाचे नाव असणे आणि गलीच्छ वस्तीत त्याचे रहाणे ही योजनेंतर्गत लाभधारकाच्या निवडीसाठी कराररनिविष्ट अभिलक्षणे होती. तसेच स्वर्ण जयंती शहरी रोजगार योजनेकरीता बनविलेल्या गरीबी रेषेखालील कुटुबांच्या यादीत सुद्धा त्यांचे नाव असणे आवश्यक होते. वरील अभिलक्षणांची पूर्तता करणाऱ्या पात्र गलीच्छ वस्ती निवासकांची यादी नागरी स्थानीय संस्थांकडून बनवावयाची होती व संमतीसाठी शासनाच्या राज्य स्तरीय समन्वयन समितीपुढे प्रादेशिक मंडळातर्फे सादर करावयाची होती. तथापि, म्हाडाकडे द्रारिद्र्य रेषेखालील कुटुंबांच्या व मतदारांच्या याद्या नागरी स्थानिय संस्थाकडून निवड झालेल्या लाभधारकांची पात्रता तपासण्यासाठी आवश्यक होत्या त्या नव्हत्या.

चाचणी परीक्षा केलेल्या नगरपालिका/महानगरपालिका मध्ये ३२५५८ लाभधारकांना निवास स्थाने पुरविण्यात आली होती. छाननीमध्ये लाभधारकांच्या निवडीमधील अनियमितता खालील प्रकरणांत आढळून आली.

मुंबई मध्ये १२९ गलिच्छ विभागातून ६४५५ कुटुंब प्रमुखांची निवड करण्यात आली आणि त्यांना एप्रिल २००३ आणि मार्च २००६ या दरम्यान गलिच्छ वस्ती रहिवाश्यांकडून उप जिल्हाधिकारी यांनी मिळविलेल्या तोंडी माहितीच्या आधारे द्रारिद्र्य रेषेखालील लोकांच्या यादीशी व मतदार यादीशी त्याची पडताळणी न करता घरांचे वाटप करण्यात आले. याप्रमाणे लाभधारकांवर त्यांच्याकडील गरीबी रेषेखालील असल्याचा आणि १ जानेवारी, १९९५ पूर्वीपासून गलीच्छ वस्तीमध्ये रहात असल्याचा कागदोपत्री पुरावा न घेता रु.३८.७३ कोटी खर्च केले.

लातुर नगरपालिकेमध्ये १ जानेवारी, १९९५ पुर्वीपासून शासकीय व खाजगी जमिनीवर असलेल्या गलीच्छ वस्तीमध्ये रहाणाऱ्या सदस्यांची संख्या अनुक्रमे १२६२ व ११६७ अशी होती. तथापि १४४३७ लाभधारक निवडले गेले होते म्हणजेच १२००८ जादा लाभधारकांना २००२-२००६ दरम्यान पात्रता अभिलक्षणांचे उल्लंघन करुन निवासस्थाने पुरविण्यात आली होती. याप्रमाणे रु.४८.०३ कोटी (१२००८ X ४००००) अपात्र लाभधारकांवर खर्च करण्यात आले.

**ज्ञापन :**

**२.२** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला.

खाजगी जमिनीवरील झोपडपट्टीखालील भूखंड हे त्या-त्या झोपड्याधारकांचे असून त्याची सिद्धता करणाऱ्या कागदपत्रांची जसे मिळकतपत्र/खरेदीखत (पियर कार्ड व सेलडीड) इत्यादीची नगर परिषदेमार्फत पडताळणी/तपासणी करण्यात आली आहे. वरील सर्व बाबी विचारात घेऊन झोपडपट्टयामधील लाभार्थीसाठी वॅम्बे योजनेंतर्गत घरकुले बांधणीसाठी प्रस्ताव तयार करुन जिल्हा गृहनिर्माण समितीमार्फत म्हाडाकडे पुर्णतः तपासणीसाठी व मंजूरीसाठी सादर केला होता. म्हाडाने सदर प्रस्तावाची तपासणी करुन शिफारशीसह प्रस्ताव भारत सरकारकडे मंजूरीसाठी सादरीकरणास्तव महाराष्ट्र शासनाकडे सादर केला होता. याचाच अर्थ प्रस्तावाची सर्व सक्षम स्तरावर तपासणी करण्यात येऊन व त्याबाबत योग्य ती शहानिशा खातरजमा करुनच सरकारने सदर प्रस्तावास मंजूरी दिली आहे. दिनांक ७/११/२००६ च्या महाराष्ट्र शासन निर्णयानुसार लाभार्थी ठरविण्यासाठीची १/०१/१९९५ हि मानीव तारीख खाजगी जमिनीवरील झोपडपट्टीधारकांसाठी विचारात घेण्याची आवश्यकता नाही, असे स्पष्ट केलेले आहे. सदर वॅम्बे योजनेअंतर्गत वरील प्रस्ताव तयार करताना शासन निर्णयातील लाभार्थी ठरविण्याबाबतचे उल्लंघन करुन लाभार्थी निश्चित केलेले नाहीत.

**२.३ अनुपालनावरील आक्षेप :**

१. दारिद्र्य रेषेखाली असलेल्या नावाची यादी उपलब्ध नसताना म्हाडाने लाभार्थी हे दारिद्र्य रेषेखालील आहेत याची खातरजमा कशी केली. लोकलेखा समितीस सादर करावयाच्या उत्तरामध्ये याचा खुलासा करावा.

२. उप जिल्हा अधिकारी यांनी झोपडपट्टी धारकांकडून प्राप्त झालेल्या तोंडी माहितीच्या आधारे लाभार्थी निवड कशी केली. याचा खुलासा लोकलेखा समितीस सादर करावयाच्या उत्तरामध्ये करावा.

३. उत्तर मुद्देसुद नाही. २४२९ पात्र लाभार्थ्यां ऐवजी १४४३७ लाभार्थी निवडले त्यामुळे १२००८ लाभार्थ्यांची निवड करण्याची कारणे व समर्थन लोकलेखा समितीस सादर करावयाच्या उत्तरामध्ये करावा.

४. लाभार्थ्यांची निवड शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसारच करावयाची होती. सदर बाब खाजगी जमिनीवरील झोपडपट्टीवासियांसाठी कशी लागू नव्हती. ही बाब लोकलेखा समितीस सादर करावयाच्या उत्तरात स्पष्ट करावी.

**२.४ अंतिम अनुपालन :**

१. मुंबई शहर आणि उपनगरे अंतर्गत लाभार्थी निश्चित करताना दि.१९.९.२००२ व दि.०७.११.२००६ वरच्या शासन निर्णयाचा आधार घेवुन खातरजमा केली.

२. गृहनिर्माण विभागाचे शासन निर्णय दिनांक १९.९.२००२ व दि.०७.११.२००६ चा आधार मानण्यात आला.

३. १.०१.१९९५ रोजीची लातूर शहरातील (रहिवाशी यांची) झोपडपट्टी मधील लोकसंख्या ९८,१४० इतकी होती. त्यापैकी झोपडपट्टीत राहणाऱ्या कुटुंबियांचा विचार करुन १७,४४७ इतक्या सदनीका अपेक्षित होत्या. प्राप्त परिस्थिती मध्ये लातूर नगरपरिषदेकडून १४,४३७ इतक्या सदनिका बांधण्याचा प्रस्ताव म्हाडाकडे आल्याने एवढ्या सदनीकांना मंजुरी दिली.

४. दिनांक १९.०९.२००२ व दि.०७.११.२००६ च्या शासन निर्णयाचा आधार घेवून लाभार्थ्यांची निवड शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसारच केलेली आहे.

**तपशीलवार प्रकल्प अहवाल तयार करणे-**

२.५ जिल्हा गृहनिर्माण समित्यांनी नगरपालिका/महानगरपालिकांच्या सल्ल्याने तपशीलवार प्रकल्प अहवाल व अंदाजपत्रके तयार करावयाची होती. जिल्हा गृहनिर्माण समित्यांनी सुद्धा तपशीलवार प्रकल्प अहवाल प्रादेशिक मंडळाकडे केंद्र शासनाच्या नगर विकास व गरीबी निर्मुलन (Urban Development and Poverty Alleviation) मंत्रालयाकडून मंजूरी मिळविण्यासाठी म्हाडातर्फे हुडकोकडे पुढील सादरीकरण करण्यासाठी सादर करावयाचे होते. परंतु असे लक्षात आले की, मुख्यत: जमिनीविषयक अडचणीमुळे मार्च २००६ पर्यंत ८० नगरपालिका/महानगरपालिकापैकी १२ च्या बाबत तपशीलवार प्रकल्प अहवाल बनविण्यात आले नव्हते. याबाबत शेवटच्या परिषदेमध्ये शासनाने असे म्हटले (सप्टेंबर २००६) की, ह्या १२ नगरपालिका/महानगरपालिकांचा केंद्र शासनाने डिसेंबर २००५ मध्ये प्रस्तुत केलेल्या एकात्मिक

गृहनिर्माण गलीच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रम या नव्या योजनेमध्ये समावेश करण्यासंबंधीची कारवाई करण्यात येत होती.

**ज्ञापन :**

**२.६** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला.

जे झोपडपट्टीधारक जानेवारी १९९५ पासून झोपडपट्टीमध्ये राहतात त्यांचाच समावेश नगरपालिका/महानगरपालिकेने प्रकल्प अहवाल केला आहे. अशा पद्धतीचे सर्वेक्षण नगरपालिका/महानगरपालिकेमार्फत केले जाते. त्यामुळे अशा झोपडपट्टीधारकांची यादी मंडळाकडे नसते.

२.७ परंतु ज्या झोपडपट्टी धारकांचा समावेश वॅम्बे योजनेत केला आहे त्याची यादी मंडळाकडे उपलब्ध आहे. नगरपालिका/महानगरपालिकेने केलेल्या सर्वेक्षणाच्या आधारे तयार केलेल्या प्रकल्पाला जिल्हा गृहनिर्माण समितीची मंजूरी मिळवून प्रकल्प मंजूरीकरीता शासनास म्हाडातर्फे पाठविण्यात आले व राज्य शासन व केंद्र शासनाची मंजूरी घेतल्यानंतरच वॅम्बेची कामे करण्यात आली.

**अनुपालनावरील आक्षेप :**

१२ नगरपालिका/महानगरपालिका यांनी तपशिलवार प्रकल्प अहवाल बनविला नसल्याची कारणे व त्यावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल लोकलेखा समितीस सादर करावा.

**अंतिम अनुपालन :**

**२.८** जानेवारी १९९५ पासून नगरपालिका क्षेत्रामध्ये राहणाऱ्या झोपडपट्टी वासियांना घरकूल उपलब्ध करुन देणेबाबत प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम नगरपालिकेतर्फे करण्यात आले. सदर काम त्यांच्या स्तरावरुन करण्यामागे त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती ही आहे. प्रकल्प अहवाल मंडळाकडून करण्यामध्ये लाभार्थ्यांच्या माहितीअभावी दिरंगाई झाली असती त्यामुळे प्रकल्प अहवालाचे काम नगरपालिकेकडूनच करण्यात आले. नगरपालिकेकडून निश्चित लाभार्थींची व प्रकल्प अहवालाची विभागीय मंडळाकडून पडताळणी करुन त्यानंतर जिल्हा गृह समितीची प्रकल्पाला मान्यता घेण्यात आली व म्हाडाच्या/प्राधिकरण्याच्या माध्यमातून राज्यशासनास मंजुरीसाठी देण्यात आली.

**कामाचे कार्यान्वयन -**

**२.९** नगरपालिका/महानगरपालिका क्षेत्रांतील निवासस्थानांचे बांधकाम प्रादेशिक मंडळांकडून किंवा स्वत: लाभधारकांकडून आणि स्वच्छता गृहांतील कुंड्यांचे (seats) बांधकाम नगरपालिका/ महानगरपालिकांकडून करण्यात आले होते. ७८ पूर्व-अर्हताकारी व अशासकीय संस्थांना वॅम्बे योजनेच्या

कामाच्या कार्यान्वयनासाठी निविदा मागवून शासनाच्या गृह-निर्माण विभागाने मान्यता दिली (जून २००३) आणि मंजूर प्रकल्पाच्या कार्यान्वयनासाठी जिल्हा गृहनिर्माण समित्यांनी त्यांचेकरीता कामाचे आदेश काढले. निवासस्थानांच्या बांधकामावर प्रादेशिक मंडळाच्या कार्यकारी अभियंत्याकडून देखरेख ठेवली जात होती आणि म्हाडाच्या मुख्य अभियंत्याकडून नियंत्रण, स्वच्छता गृहाच्या कुंड्यांचे बांधकाम ज्यांचे कार्यान्वयन नागरी स्थानिक संस्थांकडून झाले आहे त्यावरसुद्धा नगरपालिका/महानगरपालिकांच्या मुख्य अधिकारी/आयुक्तांकडून देखरेख ठेवली जात होती. मान्य अशा अशासकीय संस्थांकडून सल्ला घेऊन लाभधारकांनी त्यांच्या घराचे बांधकाम करावयाचे होते. स्वतः बांधावयाच्या घराचा नकाशा लाभधारकांनी स्वतःच ठरवावयाचा होता. पूर्व अर्हताकारी व अशासकीय संस्थानी बांधलेल्या निवास स्थानांच्या प्रकरणी घरांचे परीक्षेत्र २२५ चौ.फू.होते आणि त्यांचे नकाशे तांत्रिकदृष्ट्या प्रादेशिक मंडळाने संमत केलेले होते. योजनेच्या कार्यान्वयनामध्ये खाली नमूद केलेल्या अनियमितता आढळल्या.

तीन प्रादेशिक मंडळांतर्गत येणाऱ्या पांच नगरपालिका/महानगरपालिकांमधील मंजूर झालेली २९६० पैकी १०८० निवासस्थाने (२००३-२००५) राज्यस्तरीय समन्वयन समितीकडून इतर नगरपालिका महानगरपालिकेकडे स्थानांतरीत करण्यात आली ज्याची कारणे दप्तरी दाखल झालेली दिसून येत नव्हती. यातून नगरपालिका/महानगरपालिकांकडून तयार केले गेलेले निकृष्ट नियोजन व अवास्तव तपशीलवार प्रकल्प अहवाल याचे दर्शन होते.

यापुढे, परळी-वैजनाथ येथील नगरपालिकेत २००४-२००५ मध्ये ५१० स्वच्छतागृहाच्या कुंड्या बांधण्यासाठी परवानगी देण्यात आली होती. जुलै २००५ मध्ये राज्यस्तरीय समन्वयन समितीने ४७० स्वच्छता गृह कुंड्या जमिनीची उपलब्धता होत नसल्यामुळे इतर नगरपालिका/महानगरपालिकाकडे हस्तांतरीत करण्याचे ठरविले. कार्यान्वयन संस्थांना ४७० स्वच्छतागृह कुंड्यांचे काम सहा महिन्यात पूर्ण करण्याचे आदेश दिले गेले (ऑक्टोबर ०५). ३१ मार्च, २००६ पर्यंत काम सुरु झाले नव्हते. मे २००६ मध्ये याबाबतची कारणे मागविली होती ती ऑगस्ट २००६ पर्यंत आली नव्हती. त्याचप्रमाणे ठाणे महापालिकेत मान्य झालेल्या १२४० निवासस्थाने १३८ स्वच्छता गृह कुंड्यांपैकी (जून २००३) असे लक्षात आले की, (मे २००६) ८१० निवासस्थाने आणि १२८ स्वच्छतागृह कुंड्याचे काम जमिनी अभावी हाती घेण्यात आले नव्हते. ही कामे दुसऱ्या नगरपालिकांकडे हस्तांतरीत करण्यात आली. या बाबी तपशीलवार प्रकल्प अहवाल तयार करताना योग्य त्या नियोजनाचा अभाव दर्शवितात.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार, गलीच्छ वस्ती पुनर्वसन प्रकरणी, गलीच्छ वस्तीमध्ये राहाणाऱ्यांच्या सोयींना परमोच्च महत्त्व देणे आणि त्याची त्याबाबत मान्यता घेणे आवश्यक असते. तथापि

असे दिसून आले (जून २००६) की, गलीच्छ वस्ती पुनर्वसनाचे काम धुळे महानगरपालिकेकडून वॅम्बे योजनेंतर्गत निवासस्थाने बांधून हाती घेण्यात आले (२००३). गलीच्छ वस्ती निवासकांची सोय लक्षांत न घेता हे काम पूर्ण करण्यात आले. जरी ह्या निवासस्थानांचे काम मार्च २००३ आणि मार्च २००४ या दरम्यान पूर्ण करण्यात आले होते तरी कांही गलीच्छ वस्ती धारकांनी ह्या निवासस्थानांचा ताबा घेतला नव्हता. परिणामी १०५४ पैकी ५१० निवास स्थाने रिकामी पडून होती (जून २००६). याप्रमाणे या निवासस्थानांमध्ये गुंतवलेले रु.२.०४ कोटी निरर्थक ठरले.

**ज्ञापन :**

**२.१०** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाचे पुढीलप्रमाणे खुलासा केला.

परळी वैजनाथ शहरासाठी मंजूर ५१० शौचालयांपैकी ४७० शौचालये इतर शहरासाठी वळती करण्यात आली असून, त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. बीड-६०, अंबाजोगाई-८०, नांदेड-५०, परभणी-५०, हिंगोली-१८०, बसमत-५०

वरील सर्व शौचालये बांधणेसाठी संबंधीत महानगरपालिकांनी/नगरपरिषदांनी जमिनीचे स्थळ निश्चित करुन दिले नसल्याने मार्च २००६ पर्यंत शौचालयाचे बांधकाम सुरु करण्यात आलेले नव्हते. जेव्हा महानगरपालिकांनी/नगरपरिषदांनी शौचालये बांधण्यासाठीच्या जागा निश्चित करुन दिल्या, तेव्हा लगेचच शौचालयाचे बांधकाम हाती घेण्यात येऊन डिसेंबर २००७ अखेरपर्यंत एकूण ४३० शौचालयाचे बांधकाम पूर्ण केलेले असून, संबंधीत महानगरपालिका/नगरपरिषदांकडे हस्तांतरीत केलेले आहेत. जमीन/जागा उपलब्धते अभावी परभणी येथील ५०, बीड, परळी व बसमत येथील प्रत्येकी १० असे एकूण ८० शौचालयाचे बांधकाम सुरु करता येऊ शकले नाही. त्यामुळे सदरची ८० शौचालये बांधण्यात येणार नाहीत.

शासन व धुळे महानगरपालिका यांचेशी सतत पाठपुरावा केल्यानंतर उर्वरीत ५१० घरांचा ताबा संबंधित लाभार्थ्यांना महानगरपालिका, धुळे यांचेतर्फे देण्यात आलेला आहे. या वसाहतीत मुलभूत सुविधा जसे रस्ते, पाणीपुरवठा, विद्युत पुरवठा महानगरपालिका, धुळे यांनी स्थानिक संस्था म्हणून पुरविल्या आहेत. त्यामुळे सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.

**२.११ अनुपालनावरील आक्षेप :**

१०८० निवासस्थाने राज्यस्तरीय समन्वय समितीकडून इतर महानगरपालिका/नगरपालिका यांचेकडे स्थानांतरीत करण्यात आल्याची कारण लोकलेखा समितीस सादर करावी.

**अंतिम अनुपालन :**

**२.१२** योजनेचा स्थानिक प्रकल्प अहवाल संबंधीत महानगरपालिकेकडून बनविण्यात आला. परंतु पालिकेकडून १०८० निवासस्थानांना जागा उपलब्ध न झाल्याने सदर घरकूले भिवंडी कल्याण व डोंबिवली महानगरपालिकांना नामांतरीत करण्यात आले.

**जमिनीचा हक्क -**

**२.१३** वॅम्बे योजनेंतर्गत लाभधारकांना जमिनीचा हक्क/अधिकार प्रदान करणे ही केंद्र शासनाचे अनुदान मिळविण्याकरीता पूर्व अट होती. तथापि प्रकल्पाकरीता असलेली मूळ जागा नियमित करुन किंवा नवीन जागा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी शासन, म्हाडा, नगरपालिका आणि महानगपालिका यांचेवर होती. नगरपालिका/महानगरपालिकांकडून म्हाडातर्फे हुडकोस सादर केलेल्या तपशीलवार प्रकल्प अहवालामध्ये प्रस्तावित निवास स्थानाकरीता असलेल्या जमिनीची यद्यस्थिती/मालकी हक्क शासन/ म्हाडा/ नगरपालिका/ महानगरपालिका यांचेकडे असल्याचे दाखविले होते. नगरपालिका/महानगरपालिका यांनी त्यांचे तपशीलवार प्रकल्प अहवालामध्ये असे सुद्धा नमूद केले होते कि लाभधारकांना निवासस्थानांचा ताबा देतांना जमिनीचाही हक्क/अधिकार बहाल करण्यात येईल.

ऑक्टोबर २००२ आणि मार्च २००६ दरम्यान वॅम्बे योजनेअंतर्गत बांधल्या गेलेल्या निवासस्थानांप्रकरणी जमिनीचा हक्क/अधिकार दोन[२७] प्रादेशिक मंडळाकडून २३०४७ लाभधारकांना जून २००६ पर्यंत देण्यात आला नव्हता.

ठाणे महानगरपालिकेने वॅम्बे योजनेअंतर्गत रु.१६ लाख खर्च करुन निवासस्थानांचे बांधकाम (ऑगस्ट २००४) मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या जमिनीवर त्यांची पूर्वपरवानगी न घेता केले होते. म्हणून बृहन्मुंबई नगरपालिकेने ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास नकार दिला होता (नोव्हेंबर २००४). त्यामुळे ठाणे महानगरपालिका लाभधारकांना वास्तव्य प्रमाणपत्र देऊ शकले नव्हते. तथापि लाभधारकांनी निवासस्थानांचा ताबा घेतला होता. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय निवासस्थानांचे बांधकाम झाल्यामुळे लाभधारक जमिनीचा हक्क मिळण्यापासून वंचित राहिले होते. शिवाय भविष्यात केव्हाही अनधिकृत बांधकाम म्हणून ही निवासस्थाने पाडून टाकली जाण्याची शक्यता होती.

**ज्ञापन :**

**२.१४** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

योजनेची अंमलबजावणी राज्य शासनाच्या १९ सप्टेंबर, २००२ च्या शासन निर्णयानुसार करण्यात येते. वॅम्बेचे अनुदान उपलब्ध करु न देण्यासाठी जमिनीचा भाडेपट्टा लाभार्थ्यांना देणे ही पूर्व अट या

शासन निर्णयामध्ये नाही. संबंधित जिल्हाधिकारी/आयुक्त महानगरपालिका यांनी जमिनीचा भाडेपट्टा लाभार्थ्यांना द्यावयाचा असतो. याबाबत कार्यवाही करणेबाबत जिल्हाधिकारी/आयुक्त महानगरपालिका यांना विनंती करण्यात आली आहे. सद्यस्थितीमध्ये अद्याप कोणत्याही लाभार्थ्याला जमिनीचा भाडेपट्टा देण्यात आला नाही.

साईनाथनगर झोपडपट्टी मुंबई मनपाच्या जमिनीवर पाईप लाईनलगत वसलेली आहे. ह्या जमिनीवर वॅम्बे योजना हाती घेण्यापूर्वी गृहनिर्माण समितीच्या दि.११/६/२००३ च्या बैठकीमध्ये वस्तुस्थितीची चर्चा झाली. ही झोपडपट्टी १९९५ पुर्वीची आहे. त्यामुळे त्यांना पर्यायी जागा दिल्याशिवाय स्थलांतरीत करणे शक्य नव्हते. याबाबत ठाणे मनपा, एनजीओ व मुंबई मनपाचे अधिकाऱ्यांशी चर्चा होऊन गृहनिर्माण समितीच्या बैठकीमध्ये ह्याच जमिनीवर वॅम्बे योजना राबविण्याचे ठरले. त्याचबरोबर झोपडपट्टीधारकांना जमिनीचा हक्क देण्याकरिता मुंबई मनपाशी पाठपुरावा करण्याचे ठरले. ह्या पार्श्वभूमीवर गृहनिर्माण समितीने ह्या योजनेला प्रशासकिय मान्यता दिली. ठाणे मनपाने सदरहू योजनेचा भूअभिन्यास व घरकुलाचा नकाशा दि.३.३.०४ रोजी मंजूर केला व त्यानुसार काम सुरु करण्यात आले. काम सुरु असताना मुंबई मनपाने कधीही आक्षेप घेतला नाही परंतु दि.४.११.२००४ च्या पत्रान्वये मुंबई मनपाने परवानगी नाकारली.

तत्कालीन का.अ.-१/को.मं. मधील सदस्य सचिव ठाणे मनपा गृहनिर्माण समिती ह्यांनी दि.२६.३.२००४ च्या कार्यालयीन टिप्पणीन्वये आयुक्त, ठाणे महानगरपालिका ह्यांना सादर केली होती. या टिप्पणीद्वारे मुंबई मनपाकडून जमिन हस्तांतरणाची परवानगी मिळाल्याखेरीज अनुदान अदा करणे शक्य नसल्याचे निदर्शनास आणले होते. या टिप्पणीवर "अट शिथिल करावयाची कार्यवाही सुरु आहे. दरम्यानच्या काळात पेमेंट रिलीज करण्यास हरकत नाही" असे आदेश आयुक्त, ठाणे मनपा यांनी दिले. त्यानुसार अनुदान अदा करण्यात आले.

याबाबत आयुक्त, ठाणे मनपा ह्यांचे स्तरावर पाठपुरावा सुरु आहे. ह्याबाबत ठाणे मनपा गृहनिर्माण समितीच्या दि. २१.१.२००८ च्या बैठकीत पुन्हा चर्चा झाली व आयुक्त ह्यांनी मुंबई मनपा आयुक्त व गृहनिर्माण सचिव, मंत्रालय ह्यांचे स्तरावर पाठपुरावा करुन ना-हरकत प्रमाणपत्र मिळविण्याकरिता प्रयत्न केले जातील असे सांगितले.

मुंबई मनपाच्या दि.१४.६.२००६ च्या पत्रान्वये जलवाहीन्यांच्या जमिनीवरील झोपडपट्टी काढून त्यांची सुरक्षित जागी पुनर्वसन करण्याची विनंती केली आहे. ४० झोपडपट्टीवासियांचे सुरक्षित जागी पुनर्वसन करुन जुन्या झालेल्या जलवाहिन्या फुटण्याची शक्यता अभिप्रेत धरुन मोठ्या प्रमाणात होणारी

जिवीत व वित्त हानी टाळली गेली आहे त्यामुळे गृहनिर्माण समितीने अध्यक्ष, गृहनिर्माण समिती ह्यांच्या परवानगीने घेतलेला निर्णय व ४० झोपड्यांच्या पुनर्वसनाकरिता झालेला खर्च रु.१६ लाख वायफळ झालेला नाही. जमिनीचा हक्क झोपडीधारकांना देण्याची संपुर्ण जबाबदारी ही ठाणे मनपावर आहे.

अमरावती मंडळामध्ये वॅम्बेअंतर्गत बांधण्यात आलेल्या घरासाठी जमिनीच्या हक्क/भाडेपट्टा बहाल करायची जबाबदारी व नगरपालिका क्षेत्रामध्ये संबंधीत जिल्हाधिकारी यांनी करावयाची होती. याबाबत संबंधीत आयुक्तांना विनंती करण्यात आली आहे. जमिनीचा हक्क/भाडेपट्टा बहाल करणे ही बाब अमरावती मंडळाच्या अधिकार क्षेत्रात येत नाही. वॅम्बे अंतर्गत बांधण्यात आलेली घरे ही लाभार्थी जेथे राहतो त्याच ठिकाणी बांधण्यात आली असून बांधकाम पूर्ण केल्यावर घराचा ताबा संबंधित लाभार्थ्यांनी घेतला असून सदर घरामध्ये जे वास्तव्य करीत आहेत.

**२.१५ अनुपालनावरील आक्षेप :**

१. लेखापरिक्षण भूईभाडे आकारणीविषयी नाही. लाभधारकांना जमिनीचा हक्क/अधिकार भाडे पट्टा करुन देणेविषयी आहे. राज्यामध्ये योजनेअंतर्गत बांधण्यात आलेली एकूण निवासस्थाने/लाभधारकांना देण्यात आलेल्या जमिनीचा हक्क/अधिकार, संख्या व लाभधारकांना अद्याप न देण्यात आलेल्या जमिनीचा हक्क/अधिकार, संख्या व कारणे लोकलेखा समितीस सादर करावीत.

**अंतिम अनुपालन :**

**२.१६** जागेची मालकी महानगरपालिकेची असल्याने लाभार्थ्यांना बरोबर दिर्घ करार/नावावर करता येत नाही. तथापि सदर घरकुलांचा वापर योजनेच्या निकषानुसार चालू आहे.

**आर्थिक संपादणूक**

**निधी आकृतिबंध-**

**२.१७** केंद्र शासनाकडून ५० टक्के सहाय्यक अनुदान आणि गृहनिर्माण आणि नागरी विकास महामंडळ (हुडको) किंवा राज्याच्या स्वतःच्या स्त्रोतातून ५० टक्के कर्ज याप्रमाणे योजनेस निधी पुरवठा व्हावयाचा होता. राज्य शासनाने सदर योजना हुडकोकडून कर्ज न घेता स्वतःच्या स्त्रोतातून कार्यान्वयीत करण्याचा निर्णय घेतला. राज्य शासनाचा हिस्सा म्हणून योजनेच्या मुख्य संस्थेकडून म्हणजे म्हाडाकडून ५० टक्के निधी ठेव म्हणून मिळाल्याचे निश्चित झाल्यावर केंद्र शासनाने त्यांच्या हिश्श्याचे सहाय्य दिले. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये स्वतंत्र लेखे ठेवण्याविषयीची अट समाविष्ट केली होती असे लक्षात आले होते की, या योजनेकरीता म्हाडाने स्वतंत्र बँक खाते उघडले होते परंतु स्वतंत्र रोकड वही (Cash book) ठेवली नव्हती. वॅम्बे योजनेतंर्गत होणाऱ्या व्यवहारांची नोंद सर्वसाधारण

रोकड वही (General Cash Book) जी त्यांच्या सर्व योजनांसाठी होती त्यामध्ये घेतली जात होती. अंतिमत: वॅम्बे योजनेअंतर्गत खर्च न झालेल्या शिल्लक रकमांची अचूकता लेखापरीक्षणांत वेळोवेळी तपासणे शक्य होत नव्हते.

वॅम्बे योजनेसाठी उघडलेल्या खात्यामध्ये म्हाडाकडून जमा झालेल्या निधीची तसेच केंद्राचा हिस्सा म्हणून मिळालेल्या सहायता निधीची वर्षवार वर्गवारी आणि २००१-२००६ मध्ये त्याचे मु.ग.व.सु. मंडळासह प्रादेशिक मंडळामध्ये झालेले वाटप व खर्च पुढे दर्शविल्याप्रमाणे होता.

(रुपये कोटीमध्ये)

| **वर्ष** | **कडून निधी मुक्तता** | | **एकूण निधी उपलब्धता** | **वर्षवार वाटप प्रादेशिक मंडळात (मुं ग व सु मं यासह)** | **वर्षाचे शेवटी म्हाडाकडे असलेली शिल्लक** | **प्रादेशिक मंडळाकडून झालेला वर्षवार खर्च (मु ग व सु मं सह) ३१-०३-०६ पर्यंत** |
|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्र शासन | शासनातर्फे म्हाडा | | | | |
| २००१-०२ | --- | १२.६४ | १२.६४ | निरंक | १२.६४ | निरंक |
| २००२-०३ | १२.६४ | ४९.६५ | ७४.९३ | १.८८ | ७३.०५ | १.८८ |
| २००३-०४ | ४९.६६ | २५.०१ | १४७.७२ | ७७.२८ | ७०.४४ | ६७.६५ |
| २००४-०५ | १२१.९२ | १६४.९८ | ३५७.३४ | ११५.८५ | २४१.४९ | १२१.०७ |
| २००५-०६ | ३७.७७ | ३४.३१ | ३१३.५७ | १०४.३० | २०९.२७ | १०७.०५* |
| | **२२१.९९** | **२८६.५९** | | **२९९.३१** | | **२९७.६५** |

* आकड्यांचा ताळमेळ करावयाचा आहे.

वरील तक्त्यावरुन असे दिसून येईल की, मार्च २००६ पर्यंत रु.२०९.२७ कोटी आणि रु.१.६६ कोटी शिल्लक रक्कमा अनुक्रमे म्हाडा आणि प्रादेशिक मंडळांकडे निवास स्थाने व सार्वजनिक स्वच्छता गृहांचे काम सुरु न होणे/पूर्ण न होणे यामुळे विनावापर पडून होत्या. एकूण उपलब्ध करुन दिलेल्या निधीमध्ये आणि एकूण झालेल्या खर्चामध्ये (केंद्र शासन व राज्य शासनाकडून) सार्वजनिक स्वच्छता गृहासाठी उपलब्ध झालेल्या व खर्च झालेल्या अनुक्रमे १२०.७० कोटी व ७०.८८ कोटी या रकमांचा समावेश होता.

**ज्ञापन :**

**२.१७** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

वाल्मिकी आंबेडकर आवास योजना एप्रिल २००३ पासून पुणे मंडळात सुरु झाली. सदर योजनेसाठी म्हाडाकडून प्राप्त झालेला निधी व एकूण खर्च ३०.४.०३ ते ३१.३.०६ पर्यंतचा खालीलप्रमाणे आहे.-

| अ.क्र. | वर्ष | म्हाडाकडून प्राप्त झालेल निधी | निव्वळ खर्च (अभिकरण आकार सोडून) |
|---|---|---|---|
| १ | २००३-२००४ | ३२३१०९४३३ | ३२२३५८९२० |
| २ | २००४-२००५ | २३३४६९९८३ | २३२८२३०१९ |
| ३ | २००५-२००६ | ९५५६७१६८ | ९६९६४६४५ |
| ४ | एकूण | ६५२१४६५८४ | ६५२१४६५८४ |

दिनांक ३१/०३/२००६ अखेर शिल्लक काहीही नाही.

**२.१९ अनुपालन आक्षेप :-**

१. म्हाडाकडे पडून असलेल्या रकमेचा उत्तरात उल्लेख नाही. याचा लोकलेखा समितीस खुलासा द्यावा.

२. वॅम्बेच्या निधीवरील मिळालेले व्याज योजनेच्या बँक खात्यामध्ये योजनेचा स्त्रोत म्हणून जमा केले नाही. याची कारणे लोकलेखा समितीस सादर करावी.

**२.२० अंतिम अनुपालन :-**

१. शिल्लक राहिलेली रक्कम रु.६.८७ कोटी आहे.

२. व्याजाची रक्कम रु.१०८.११ कोटी याच योजनेच्या खात्यात जमा करण्यात आलेली आहे.

**मिळालेल्या व्याजाची रक्कम योजनेच्या खाती जमा करण्यात आली नाही -**

**२.२१** केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार वा वॅम्बे योजनेतील निधीवर मिळालेल्या व्याजाचा विनियोग त्या योजनेवर करावयाचा होता. वॅम्बे योजनेतील रु.२०५ कोटी इतका निधी कमी मुदतीच्या ठेवीमध्ये मार्च २००२ आणि डिसेंबर २००५ या कालावधीत गुंतविला होता व त्यावर ८.५० कोटीचे व्याज मिळविले होते. तथापि मिळालेले व्याज योजनेच्या बँक खात्यामध्ये वॅम्बे योजनेचा स्त्रोत म्हणून जमाही केले नाही किंवा ही वस्तुस्थिती केंद्रशासनास कळविलीही नाही.

**ज्ञापन :**

**२.२२** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह विभागाने खालीलप्रमाणे अभिप्राय दिले.

वॅम्बे निधी संदर्भातील गुंतवणुक म्हाडाच्या स्तरावर केली जाते.

वाल्मिकी आंबेडकर आवास योजना एप्रिल २००३ पासून नागपूर मंडळात सुरु झाली. सदर योजनेसाठी म्हाडाकडून प्राप्त झालेला निधी व एकूण खर्च ३०/४/२००३ ते ३१/०३/२००७ पर्यंतचा खालीलप्रमाणे आहे. प्राधिकरणाचे निर्देशानुसार वेगळा वॅम्बेचे लेखाशिर्ष ठेवण्यात आले आहे.

| अ.क्र. | वर्ष | | |
|---|---|---|---|
| १ | २००३-२००४ | ३३१५००० | ३३१५००० |
| २ | २००४-२००५ | ८३२४८९०० | ८३२४८९०० |
| ३ | २००५-२००६ | १४०९३३६९८९ | १४०९३३६९८९ |
| ४ | २००६-२००७ | १२२७७६०२२ | १२२७७६०२२ |

अनुपालनावरील आक्षेप व अंतिम अनुपालन परिच्छेद ३.२.७ प्रमाणे

**वॅम्बे योजनेच्या खात्यामध्ये लोक आवास योजनेतील शिल्लक रकमेचे हस्तांतर नाही-**

**२.२३** जानेवारी २००४ मध्ये बंद झालेल्या लोक आवास योजनेतील[२८] वापर न झालेला निधी स्वतंत्र बँक खात्यामध्ये जमा करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला (जानेवारी २००४). ह्या रकमेचा विनियोग वॅम्बे योजनेतील निवासस्थाने बांधण्यासाठी करावयाचा होता. तथापि असे आढळले की, मार्च २००५ ला लोक आवास योजनेतील वापर न झालेला शिल्लक निधी रु.१.६३ कोटी म्हाडाकडून त्यांचेकडे ठेवला होता आणि ऑगस्ट २००६ पर्यंत वॅम्बे योजनेच्या खाती जमा करण्यात आला नव्हता.

**ज्ञापन :**

**२.२४** "मार्च २००७ अखेर शिल्लक काहीही नाही." असा खुलासा विभागाने उक्त अभिप्रायासंदर्भात केला.

**अनुपालनावरील आक्षेप :-**

मुद्देसुद स्पष्टीकरण लोकलेखा समितीस सादर करावयाच्या उत्तरात स्पष्ट करावे.

**अंतिम अनुपालन :-**

सद्य:स्थितीत लोक आवास योजनेचा निधी चलनाद्वारे RBI येथे भरणा करण्यात आला आहे.

**दलालीची वसुली -**

**२.२५** जरी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार दलाली शुल्क आकारावयाचे नव्हते, तरी राज्य शासनाने वॅम्बे योजनेच्या कामावर झालेल्या खर्चाच्या ५ टक्के दलाली शुल्क आकारावयास परवानगी दिली. (सप्टेंबर २००२) तथापि ही वसुली राज्य शासनाने ऑक्टोबर २००३ मध्ये थांबविली. छाननीमध्ये असे दिसून आले की, मुंबई गलिच्छ वस्ती सुधारणा मंडळ व पुणे आणि नाशिक येथील प्रादेशिक मंडळे यांनी डिसेंबर २००४ पर्यंत रु.३.०४ कोटी इतके दलाली शुल्क वसूल केले होते. याचा परिणाम म्हणजे त्या मर्यादेपर्यंत योजनेचा निधी कमी झाला होता. उरलेल्या चार प्रादेशिक मंडळाकडून अशीच मागविण्यात आलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नव्हती. (ऑगस्ट २००६).

**ज्ञापन :**

**२.२६** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार ५% अभिकरण शुल्क रक्कम वसुल करुन, ती माहे डिसेंबर २००४ पर्यंत लेख्यात समाविष्ट केली. तथापि याबाबत सुधारीत मार्गदर्शनानुसार अभिकरण शुल्क आकारणीबाबतची कार्यवाही दिनांक १/१/२००५ पासून थांबविली आहे. वरील सुचना येण्यापूर्वी अभिकरण शुल्काची आकारणी खालीलप्रमाणे करुन ती लेख्यात दर्शविली.

१. २००३-२००४ (३०/४/२००३ पासून) रु.१६१२७८०२

२. २००४-२००५ (३१/१२/२००४ पर्यंत) रु.७७९६८३८

एकूण रु.२३९२४६४०

अभिकरण शुल्क आकारणी बाबतची शक्यता नसल्याने, मंडळाचे अधिक्य काल्पनिक वाढीमुळे जास्त येते. ती काल्पनिक वाढ टाळण्यासाठी मा.वित्त नियंत्रक/प्राधिकरण यांना कळविण्यात आले. त्याप्रमाणे त्यांचे आदेशानुसार पत्र क्र.३.१२/१४६४ दिनांक १७/०८/०४ व पत्र व्र.३.१२/१९५६ दिनांक ०३/०९/०५ अन्वये अभिकरण शुल्क आकार वार्षिक लेखा सन २००३-२००४ व २००४-२००५ मध्ये कमी केला. वस्तुत: अभिकरण शुल्कापोटी जमा झालेली रक्कम त्या मर्यादेपर्यंत कमी झाली. अशाप्रकारे पुणे मंडळाने अभिकरण शुल्क वसुल केलेले नाही.

**अनुपालनावरील आक्षेप :**

सादर केलेल्या माहितीनुसार मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ नाशिक व पुणे मंडळ यांनी ३.४ कोटी इतकी दलाली शुल्क वसूल केले होते यामधील तफावत पडताळून पाहुन नेमकी माहिती लोकलेखा समितीस उपलब्ध करुन द्यावी.

**अंतिम अनुपालन :**

दलालीची वसूलीची रक्कम

१) पुणे मंडळ रु.२.३९ कोटी  २) नाशिक मंडळ - निरंक

३) मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ रु.- ०.५५ कोटी या प्रमाणे वसूली करण्यात आली आहे.

**उपयोगिता प्रमाणपत्राचे सादरीकरण नाही -**

**२.२७** वॅम्बे योजनेंतर्गत असलेला निधी उपलब्ध झालेल्या दिनांकापासून १२ महिन्याचे आंत म्हाडाने त्याचे विनियोगाबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास सादर करावयाचे होते. तरीसुद्धा केंद्र शासनाने २००४-२००५ या कालावधीत उपलब्ध करुन दिलेल्या रु.१८४.२१ कोटी निधीसाठी रु.१२६.४५ कोटी इतक्या रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात आले. उरलेल्या रु.५७.३६ कोटी रकमेकरीता प्रमाणपत्र सादर करण्यात आले नाही (ऑगस्ट २००६). परिणामत: केंद्र शासनाने २००५-२००६ या कालावधीत योजनेसाठी मंजूर झालेल्या सहायक अनुदानापैकी शिल्लक राहिलेले रु.६५.२६ कोटीचे अनुदान मुक्त केले नाही.

**ज्ञापन :**

**२.२८** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खुलासा केला की, वॅम्बे निधी संदर्भातील गुंतवणूक म्हाडाच्या स्तरावर केली जाते.

**अनुपालनावरील आक्षेप :-**

संबंधीत मुद्याचे स्पष्टीकरण लोकलेखा समितीस सादर करावे.

**अंतिम अनुपालन :**

उपयोगिता प्रमाणपत्र यापुर्वीच सादर केले आहे.

**खोट्या उपयोगिता प्रमाणपत्राचे सादरीकरण -**

**२.२९** मुख्य अधिकारी, नाशिक मंडळाने वॅम्बे योजनेअंतर्गत २००१-२००२ मध्ये उपलब्ध करुन दिलेल्या रु.११.२४ कोटी इतक्या निधीकरीता उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले. तथापि असे लक्षांत आले कि ३१ डिसेंबर, २००३ पर्यंत फक्त रु.६.३८ कोटी इतकेच खर्च करण्यात आले होते आणि रु.४.८६ कोटी शिल्लक निधी ठेव खात्यामध्ये ठेवण्यात आला होता. परिणामतः म्हाडाने केंद्र शासनास पाठविलेले प्रमाणपत्र त्या मर्यादेत वाढीव ठरले.

**ज्ञापन :**

**२.३०** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेअंतर्गत कामासाठी अनामत पोटी ठेवण्यात आलेली रक्कम रुपये ४.८६ कोटी रक्कमेपैकी ४.७२ कोटी रुपये संबंधित कामांसाठी उपयोगात आणण्यात आलेली आहे. त्यामुळे उपयोगिता प्रमाणपत्राबाबतचा सदर मुद्दा निकालात काढण्याची विनंती आहे.

**अनुपालनावरील आक्षेप :-**

उपरोल्लेखित मुद्दांवर नेमके उत्तर लोकलेखा समितीस सादर करावे.

**अंतिम अनुपालन :**

उपयोगिता प्रमाणपत्रामध्ये खर्च दाखविलेली रक्कम रु.४.८६ कोटी ठेव खात्यात ठेवण्यात आली होती. तथापि सदर रक्कमेपैकी रु.४.७२ कोटी रक्कम तद्‌नंतर योजनेच्या कामी खर्च करण्यात आली.

**भौतिक प्रगती -**

**२.३१** केंद्र शासनाने मान्य केलेल्या आणि २००२-२००६ या कालावधीत बांधलेल्या निवासस्थाने/सार्वजनिक स्वच्छतागृहे यांची वर्षवार वर्गवारी खालीलप्रमाणे.

| वर्ष | वसति स्थाने | | | | सार्वजनिक स्वच्छता गृहे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | वर्षामध्ये संमत झालेली | | वर्षभरात बांधलेली | कमी (टक्के) | वर्षभरात संमत झालेली | वर्षभरात बांधलेली | कमी (टक्के) |
| | व.स्था. | श्रेणीवाढ | | | | | |
| २००२-२००३ | ४९८९ | ० | ४९८९ | १०३४ (६) | ५९७ | ५९७ | -- |
| २००३-२००४ | १७१७१ | १४१ | १६१३७* | २०३२३ (४३) | ३९०० | ३९०० | -- |
| २००४-२००५ | ४६३५३ | ५०१ | २६०३०* | ३०६२४ (९२) | २१३८० | १४८१३ | ६५६७ (३१) |
| २००५-२००६ | ३३३५७ | ० | २७३३ | --- | ४३१४ | -- | ४३१४ (१००) |
| **एकूण** | **१०१८७०** | **६४२** | **४९८८९** | **५१९८१ (५१)** | **३०१९१** | **१९३१०** | **१०८८१ (३६)** |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येईल कि १,०१,८७० आणि श्रेणी वाढ झालेल्या ६४२ निवास स्थानांपैकी फक्त ४९,८८९ निवास स्थाने (६४२ श्रेणीवाढ झालेल्या निवासस्थानांसह) आणि १९,१३० सार्वजनिक स्वच्छता गृहांचे बांधकाम पूर्ण झाले होते. ८,१०८ वसतिस्थाने आणि ३,२६८ सार्वजनिक स्वच्छता गृहे यांचे काम प्रगतीपथावर होते.

**अनुपालनावरील आक्षेप :**

अद्यावत भौतिक प्रगती अहवाल लोकलेखा समितीस सादर करावा.

**अंतिम अनुपालन :**

भौतिक प्रगती अहवाल सादर केलेला आहे.

१. औरंगाबाद मंडळ व नागपूर मंडळ

२. औरंगाबाद मंडळ मंडळ एकूण १७९४९/-सदनिका पुर्ण, नागपूर मंडळ १५८२/-सदनिका पुर्ण

**संनियंत्रण -**

**२.३२** अगोदर म्हटल्याप्रमाणे वॅम्बे योजनेच्या योग्य त्या अंमलबजावणीवर तसेच बांधकामाच्या गुणात्मकतेवर लक्ष ठेवण्यासाठी आणि योजनेच्या कार्यक्षम अंमलबजावणीकरीता एक राज्यस्तरीय समन्वयन समितीचे गठण केले होते. राज्य स्तरीय समन्वयन समितीने वारंवार भेटावे असे जरी होते तरी समिती फक्त दोनदा (जून २००४ आणि जुलै २००५) वॅम्बे योजनेच्या अंमलबजावणीतील अडचणींबाबत चर्चा करण्यासाठी एकत्र आली होती.

निवासस्थानांचे बांधकामावर प्रादेशिक मंडळाच्या कार्यकारी अभियंत्याने देखरेख ठेवावयाची होती. कामाच्या प्रगतीचा आणि निधीच्या उपयोगितेचा लेखा आणि अहवाल प्रादेशिक मंडळाने म्हाडास

सादर करावयाचा होता जो पुढे त्यांनी केंद्र शासनास सादर करावयाचा होता. परंतु असे लक्षात आले की, याबाबत पुरेशी पावले उचलण्यात आली नव्हती. कारण ३१ मार्च, २००६ पर्यंत संमत झालेल्या निवासस्थानांच्या फक्त ४९ टक्के निवासस्थाने आणि संमत झालेल्या सार्वजनिक स्वच्छतागृहांच्या फक्त ६४ टक्के स्वच्छतागृहे बांधून पूर्ण करण्यात आली होती.

**अनुपालनावरील आक्षेप :**

सद्य:स्थितीचा अहवाल लोकलेखा समितीस सादर करावा.

**अंतिम अनुपालन :**

घरकुलांची कामे लाभार्थ्यांमार्फत करावयाची असल्याने योजना राबविताना आवश्यक वेगाने कामाचा उरक झाला नाही.

तसेच योजना कालावधीमध्ये बांधकाम साहित्याचा दर वाढून त्याचा कामाच्या वेगावर परिणाम झाला.

उपलब्ध निधीप्रमाणे सर्व स्वच्छतागृहे बांधण्यात आली त्याची उपयोगिता प्रमाणपत्रे भारत सरकार यांना सादर झालेली आहेत.

**मूल्यमापन -**

**२.३३** राज्य शासनाकडून यशवंतराव चव्हाण ॲकडेमी ऑफ डेव्हलपमेंट ॲडमिनिस्ट्रेशन (यशदा) या स्वायत्त संस्थेची, वॅम्बे या योजनेची योग्य अंमलबजावणी, गलिच्छ वस्ती निवासकांच्या रहाणीमानाच्या दर्जातील सुधारणा, वातावरण विकास, निधीचा योग्य विनियोग आणि बांधकामाची गुणात्मकता इत्यादी बाबींचे मुल्यमापन करण्यासाठी नेमणूक करण्यात आली. सदर योजना अंमलात येण्यापूर्वी गलिच्छ वस्ती निवासकांच्या रहाणीमानातील दर्जाच्या संदर्भात योजना पूर्ण झाल्यावर संदर्भित योजनेचा त्यांच्या रहाणीमानावर उमटलेला ठसा याबाबतची तुलना करणे हा सुद्धा मुल्यमापनाचा हेतू होता. हा मुल्यमापन अहवाल जो ३० दिवसात पूर्ण करावयाचा होता तो ऑगस्ट २००६ पर्यंत सादर झालेला नव्हता.

**अंतिम अनुपालन :**

**मुल्यमापन :**

अहवाल दि.१५.३.२००७ रोजी सादर करण्यात आला आहे.

**(ब) जमिनीच्या किंमती स्वेच्छेने (Arbitrary) ठरविल्यामुळे झालेले नुकसान-**

**२.३४** विलेपार्ले येथील व्यापारी भूखंडावरील अतिक्रमण नियमित करताना जमिनीची किंमत स्वेच्छेने ठरविल्यामुळे झालेले रु.९२.७८ लाखाचे नुकसान.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या किंमत ठरविण्याच्या धोरणानुसार त्यांच्या मालकीच्या व व्यापारी हेतुसाठी राखीव ठेवलेल्या भुखंडावरील भाडेपट्टयाचा हप्ता, चालू बाजारभावाप्रमाणे किंवा निवासी दराच्या दुप्पट यामध्ये जो दर जादा असेल त्या दरानुसार आकारावयाचा होता.

म्हाडाचा एक भाग, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ यांचे सह-मुख्य अधिकारी भूमी व प्रशासन यांचे अभिलेखे तपासले असता असे दिसून आले की, गृहनिर्माण या विषयासंबंधातील कॅबिनेट उप समितीने खाजगी कंपनीच्या नावे असलेली विलेपार्ले, मुंबई येथील ९७८ चौ.मी. जमीन, की ज्यावर कंपनीने अतिक्रमण केले होते, नियमित करण्याच्या प्रस्तावावर विचार केला होता (डिसेंबर १९९७) ह्या उप-समितीने शासनास सदर जमीन म्हाडाच्या नियमानुसार नियमित करण्याविषयी आदेश काढण्यासाठी निर्देशित केले (जानेवारी १९९८) मंडळाच्या मुख्य अधिकाऱ्याने शासनास अशी माहिती दिली की, (जानेवारी १९९८) जमिनीची किंमत रु.३३,८९७ प्र.चौ.मी. अशी असून म्हाडाच्या प्रचलित नियमानुसार अतिक्रमण नियमित करण्याकरीता जमिनीच्या किंमतीच्या ५० टक्के दंडात्मक शुल्क आकारण्या योग्य आहे.

जमिनीची किंमत कमी करण्यासंबंधात कंपनीकडून निवेदन आल्यानंतर (फेब्रुवारी १९९८) शासनाने उप संचालक, नगररचना मुंबई यांना त्या भागातील जमिनीचे प्रचलित दर कळविण्यासंबंधात निर्देशित केले (फेब्रुवारी १९९८) उप-संचालक यांनी फेब्रुवारी १९९८ अखेर बाजारातील दराचे रु.४०,०००/- प्र.चौ.मी. असे मूल्यमापन करुन तो दर जून १९९८ मध्ये शासनास कळविला. जरी गृहनिर्माण विभागाने तो दर आकारण्याविषयी प्रस्ताव सादर केला होता तरी गृहनिर्माण मंत्र्यांनी तो दर अतिक्रमण हे संरक्षित झाले आहे या कारणावरुन नाकारला (जुलै १९९८). आपल्या निर्णयापुष्ठ्यर्थ त्यांनी असे म्हटले की, मुंबईतील स्थावर मालमत्तेच्या दरात नगर-रचना प्राधिकरण आणि मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांनी कळविलेले दर अवास्तव व असंयुक्तिक होते. त्यांनी यामुळे या व्यवहारासाठी रु.२०,०००/-प्र.चौ.मी. असा दर आकारण्याचे तसेच बाजार भावाच्या ५० टक्के इतका दंडात्मक आकार न आकारण्याचा निर्णय घेतला (जुलै १९९८)

शासनाने सदर निर्णय मंडळास कळविला (नोव्हेंबर १९९८) की ज्याद्वारे कंपनीस ९७८ चौ.मी. इतक्या भूखंडाचे वाटप झाले (जुलै १९९९) आणि त्यांना रु.२.२० कोटी इतकी रक्कम भाडेपट्टा हप्ता म्हणून ४५ दिवसांच्या आत भरण्यास सांगितले. भूधारकाने सदर रकमेचा भरणा ठरवून दिलेल्या वेळेत

केला नाही आणि फक्त रु.१० लाख सप्टेंबर २००० मध्ये अदा केले. सातत्याने मागणी करुन सुद्धा भाडेपट्टा हप्त्याची अदायगी न केल्यामुळे मंडळाने नोव्हेंबर २००३ मध्ये सदर जागेस सील ठोकले.

भूधारकाने उच्च न्यायालयात खटला दाखल केला की, ज्यांनी त्यांच्या १२ नोव्हेंबर २००३ च्या अंतरीम आदेशाने रु.६० लाख त्वरीत भरण्याविषयी भूधारकांस निर्देशित केले. ऑक्टोबर २००४ मध्ये भूधारक व मंडळाचे अधिकारी यांचेमध्ये झालेल्या संयुक्त बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार विकसन योग्य ४६३.९० चौ.मी. इतके बिल्ट अप क्षेत्र रु.२०,०००/प्र.चौ.मी. या दराने कंपनीस देण्याविषयीचा सुधारीत आदेश मंडळाकडून निर्गमित करण्यात आला (मार्च २००६).

सुधारीत आदेशानुसार कंपनीकडून देय असलेली एकूण रक्कम रु.१.०४ कोटी इतकी होती. सप्टेंबर २००० मध्ये भरणा केलेले रु.१० लाख आणि नोव्हेंबर २००३ मध्ये भरणा केलेले रु.६० लाख यांचा विचार करता बाकी रक्कम रु.३४ लाख कंपनीकडून अदा करावयाचे होते. तथापि ही रक्कम मार्च २००६ पर्यंत अदा केली नव्हती.

कंपनीने केलेले निवेदन याशिवाय जमिनीची किंमत रु.४०,०००/- प्र.चौ.मी. वरुन रु.२०,००० प्र.चौ.मी. इतका कमी करण्यास दुसरा कोणताही आधार नव्हता. जमिनीच्या किंमतीमध्ये अशा तऱ्हेने स्वच्छंदपणे केलेल्या कपातीमुळे मंडळास रु.९२,७८ लाख इतके नुकसान झाले. शिवाय कंपनीकडून देय असलेली रु.३४ लाख ही रक्कम मार्च २००६ पर्यंत वसूल केलेली नव्हती.

ही बाब शासनाचे प्रधान सचिव यांचे निदर्शनास जून २००६ मध्ये आणली. उत्तर अद्याप प्रलंबित आहे (ऑक्टोबर २००६).

**ज्ञापन :**

**२.३५** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला. सदरील जागा ही मे.भास्कर ऑटो गॅरेज यांनी अतिक्रमीत केलेली असल्याने त्यांना शासनाने म्हाडा अधिनियम १९७६ खालील (जमीन वितरण) नियम, १९८२ चे विनियम, १६ नुसार वितरित केलेला आहे. कमी केलेल्या दराविषयी (म्हणजे दंडनीय रक्कम वगळून निश्चित केलेल्या रु.२०,०००/- प्रति. चौ.मी.) नमूद करण्यात येते की, शासनाने एकूण ९७८.०० चौ.मी. साठी दर निश्चित केलेला आहे. अर्जदारांच्या ताब्यात असलेल्या ९७८ क्षेत्रापैकी २०० चौ.मी. क्षेत्रावर बांधकाम असून ते संरक्षण पात्र आहे व अर्जदाराकडून ५० टक्के पेनल्टी न घेता सरसकट (नेट) रु.२०,०००/- प्रती चौ.मी.दर एकूण ९७८ चौ.मी.क्षेत्रासाठी आकारण्यात आलेला आहे.

(अ) म्हाडाचे सन १९९२ मध्ये विनियम १६ अंतर्गत रहिवाशी भूखंडाच्या वितरणासाठीची दरसूची म्हाडा प्राधिकरणाच्या ठराव क्र.३०९४ दिनांक १६/११/९२ अन्वये ठरवून दिलेली आहे. तसेच सुधारीत दरसूची ठराव क्र.४०९४ अन्वये ठरविण्यात आली परंतु त्यामध्ये रहिवासी भूखंडाव्यतिरिक्त अन्य भूखंडासाठी तरतुद केलेली नसल्याने सदर बाबतीत ठराव क्र.३०९४ चा संदर्भ भूखंडाच्या लिज भाडे/हप्ता (lease premium) घेण्यात आलेला आहे. तो खालीलप्रमाणे आहे. (१) वितरणापर्यंतच्या दिनांकापर्यंत जमीन व त्यावरील खर्चीत विकास रकमेवर १२.५०% प्रति वर्ष व्याजदर आकारण्यात आला आहे. (२) अविकसित जमिनीची किंमत त्या वेळच्या (वितरणाच्या वेळी) रेडी रेकनरप्रमाणे घेण्यात आलेली आहे. (३) प्राधिकरणाचा ठराव क्र.३०९४ प्रमाणे तळमजला + २ साठीच्या असलेल्या रहिवासी वापराच्या तरतुदी प्रमाणे वितरण समाविष्ट आहे. (४) शासनाने विशेषाधिकाराचा वापर करुन मे.भास्कर ऑटो गॅरेजचे अतिक्रमणाचा दर रु.२०,०००/- प्रति चौ.मी. निश्चित केला व त्याप्रमाणे रु.२०,०००/- प्रति चौ.मी. (९७८ चौ.मी.) भूखंडासाठी दर आकारुन अतिक्रमीत भूखंड नियमित करण्याचे आदेश दिले. (ब) डी.पी.प्लान सन १९९१-९२ प्रमाणे जरी भूखंड रस्त्यांमुळे बाधीत होत असला तरी त्याचे क्षेत्रासहीत सुमारे ४६३.९० चौ.मी. क्षेत्र असलेल्या भूखंडाचे ऑफर लेटर दिनांक १/३/२००५ रोजी मे.भास्कर ऑटो गॅरेज यांना देण्यात आले. त्यात त्यांनी स्वत: रस्त्याचे डी.पी.रिझर्व्हेशन उठविण्याबाबतचा पाठपुरावा महानगरपालिकेकडे करावा अशी अट देखील घालण्यात आली आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे मे.भास्कर ऑटो गॅरेजच्या मालकाने एकूण रु.७०,००,०००/- (रु.७०.०० लक्ष) भूखंडाच्या प्रिमीयमपोटी भरणा केलेली आहे. तसेच सदर भूखंड हा खाडी (नाला) लगत आहे व त्याने खाडीच्या काही भागात भरणी केलेली आहे.

उपलब्ध असलेल्या नोंदी प्रमाणे (रेकॉर्ड) अद्यापी भूखंडावरील रस्त्याचे डी.पी. रिझर्वेशन उठविण्यात आलेले दिसत नाही. तसेच सी.आर.झेडच्या नियमाप्रमाणे महानगरपालिकेने नाल्याजवळील भूखंडावरील बांधकामाबाबत परवानगी द्यावयाची आहे. मे.भास्कर ऑटो गॅरेज यांनी भूखंडाच्या देय असलेल्या किंमतीपोटी पार्ट पेमेंट केलेले दिसते. उर्वरित शिल्लक रकमेबाबत (अंदाजे ३४.०० लक्ष) सादर करण्यात येते की, उल्लेख केल्याप्रमाणे भूखंडावरील डी.पी. रिझर्वेशनप्रमाणे असलेल्या रस्त्याबाबत तसेच नाल्याच्या हद्दीबाबत महानगरपालिकेने कार्यवाही करावयाची आहे व सुधारीत आदेश अद्याप अप्राप्त असल्याने तसेच म्हाडा देखील नियमानुसार वरील भागात बांधकामास परवानगी देता येणे शक्य नाही. अशा परिस्थितीत मे.भास्कर ऑटो गॅरेज मालकांकडून शिल्लक रक्कमेची मागणी महानगरपालिकेकडून वरीलप्रमाणे मंजुरी मिळाल्यानंतर करण्यात येईल. वरील

अहवालात नमूद केलेली वस्तुस्थिती पाहता शिल्लक असलेल्या रक्कमेमुळे म्हाडाचे नुकसान झाले असे मानता येणार नाही. कारण म्हाडा ज्या जागेवर बांधकाम करण्यास परवानगी देऊ शकत नसेल तर त्या जागेची किंमत निर्णयापूर्वी घेणे उचित होणार नाही तसेच उपरोक्त भूखंडाचा ताबा देखील अद्यापी लाभधारकास देण्यात आलेला नाही.

**२.३६ अनुपालनावरील आक्षेप :**

(१) भूखंडाचे वितरण हे प्रचलित वितरण पद्धतीनुसार नसल्याने किंवा अतिक्रमणाच्या नियमितीकरणाबाबत असल्याने गृहनिर्माण विभागाने प्रस्तावित केलेल्या त्या वेळच्या प्रचलित धोरणानुसार व त्यावेळचा बाजार भाव आणि ५० टक्के दंड आकारुन रक्कम वसूल करावयास हवी होती. परंतु तसे झाले नाही. याबाबतीत संबंधित विभागाने दिलेली कारणमिमांसा पुरेशी नाही. म्हणून सदर बाबतीत नागरी लेखा समिती समोर सादर करण्यात येणाऱ्या अहवालात सविस्तर समर्थनाचा समावेश करावा. सदर प्रकरणी सादर केलेल्या उत्तरात मुंबई महानगरपालिकेकडून रस्त्याचे बांधकाम न झाल्याने तसेच सर्व्हे विभागाकडून प्रलंबित असलेल्या प्रकरणांवर निर्णय झालेला नसल्याने वसुल न करण्यात आलेल्या रकमेबाबत म्हाडाचे नुकसान झाले आहे, असे म्हणणे समर्थनीय वाटत नाही. जर नियमितीकरण झाले होते, तर सदर बाबतीत कळविण्यात आलेल्या रकमेचा भरणा करणे हे लाभधारकावर बंधनकारक होते. तसेच, सदर रक्कम वसूल करणे मंडळावरही बंधनकारक होते. इतक्या मोठ्या कालावधीनंतरही भाडेपट्टा करारनामा करण्यात आलेला नाही, ही बाब देखिल नियमबाह्य आहे. लोकलेखा समितीस सादर करण्यात येणाऱ्या अहवालात शासनाचे विशेष बाबींवर ठळक मतप्रदर्शन समाविष्ट करणे आवश्यक आहे.

**२.३७ पूर्तता अहवाल :**

(१) विषयांकित जमीन सन १९४७ मध्ये संपादित केलेली असली तरी जमीन दलदलीची व बाजूस नाला असल्यामुळे मंडळ विकसित करु शकले नाही. तसेच, अर्जदाराने सदर जमिनीवर केलेले अतिक्रमण संरक्षणपात्र असल्यामुळे मुंबई मंडळ सदर अतिक्रमण काढू शकले नाही. जमिनीचा विकास करु शकले नाही. शिवाय सदर प्रकरण न्यायालयीन होते व त्यावर स्थगिती देण्यात आली होती. त्यावेळी मुंबईतील जागेच्या किंमती बऱ्याच प्रमाणात खाली घसरल्या होत्या व त्यात घसरण सुरुच होती. अशा परिस्थितीत अतिक्रमणदारास सदर जागा वितरीत केल्यास मंडळाचा आर्थिक फायदाच होणार होता. वरील परिस्थिती पाहता संचालक, नगररचना कार्यालयाने कळविलेला रु.४०,०००/- प्रति चौ.मी. व मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांनी कळविलेला रु.३३,८९४/- प्रति.चौ.मी. हे दर अवाजवी व अवास्तव

वाटत असल्यामुळे तसेच, अर्जदार संरक्षण पात्र अतिक्रमणांसह जागा विकत घेण्यास तयार होता व जागा वितरीत न केल्यास मोकळ्या जागेवरही अतिक्रमणे होऊन कालांतराने सदर जागेची कोणतीही किंमत मिळाली नसती व मंडळाचे नुकसान झाले असते. ही बाब विचारात घेऊन अर्जदाराकडून ५० टक्के पेनल्टी न घेता नेट रु.२०,०००/- प्रति चौ.मी. दर लावण्याचा निर्णय शासनाने तत्कालीन परिस्थितीमध्ये घेतला होता. भूखंडाचा काही भाग हा जवळील नाल्यामुळे तसेच, रस्त्याबाबत निर्णय न झाल्याने बाधीत होत होता. त्यामुळे भूखंडाबाबत लाभधारकाला कळविलेल्या रकमेपैकी काही रकमेचा भरणा करण्यात आला आहे. पूर्ण रकमेऐवजी काही रकमेचा भरणा केलेला असल्यामुळे भाडेपट्टा करारनामा करण्यात आलेला नाही. परंतु, मुंबई महानगरपालिका तसेच, सर्व्हे विभागाकडून काही बाबतीत निर्णय येणे अपेक्षित असल्याने व नंतर लाभधारकास सदर बाबतीत संपूर्ण भूखंडाचा लाभ हा अधिकृत परवानगी मिळाल्यानंतरच मिळणार आहे.

**साक्ष :**

**२.३८** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.३.२ संदर्भात समितीने गृहनिर्माण विभागाने प्रधान सचिव व इतर विभागीय प्रतिनिधींची दिनांक १ मार्च, २०११ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, वाल्मिकी आंबेडकर मलिन वस्ती आवास योजनेचे निकष काय आहेत, या योजनेखाली आतापर्यंत किती लाभार्थ्यांची निवड करण्यात आली व किती लाभार्थ्यांना घरकुले देण्यात आली ? त्यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, वाल्मिकी आंबेडकर आवास योजना ही केंद्र शासन पुरस्कृत योजना आहे. दिनांक १९ सप्टेंबर, २००२ रोजीच्या शासन निर्णयामध्ये या योजनेचे संपूर्ण निकष, लाभार्थ्यांची पात्रता कशी ठरवावयाची, घरांचे क्षेत्र किती असावे, घराचे बांधकाम कसे असावे, पात्रतेसाठी शहरनिहाय समिती असावी यासंदर्भात माहिती दिलेली आहे. म्हाडाला नोडल एजन्सी म्हणून नामनिर्देशित करण्यात आले होते. सन २००२ ते २००६ या कालावधीमध्ये ही योजना राबविण्यात आली होती आणि त्यावेळी ७७,३८७ घरकुले आणि २६,३४८ शौचालये बांधण्यात आली होती. या योजनेमध्ये केंद्र शासनाने व राज्य शासनाने ४७७.१० कोटी रुपये खर्च झालेले आहेत. यामध्ये २२१ कोटी रुपये केंद्र शासनाचे आणि २६२ कोटी रुपये राज्य शासनाचे आहेत.

२.३९ दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांची यादी उपलब्ध नसताना लाभार्थी दारिद्र्य रेषेखालील आहे याची खातरजमा कशी करण्यात आली ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, ज्या झोपडपट्टीवासियांची नावे सन १९९५ च्या यादीमध्ये आहेत आणि ते झोपडीमध्ये

वास्तव्य करीत आहेत अशा दुर्बल झोपडपट्टीवासियांना योजनेचा लाभ द्यावयाचा आहे. ज्या शहरांमध्ये ही योजना राबवावयाची होती तेथे पात्रतेचे निकष ठरविण्यासाठी समिती नियुक्त करण्यात आली होती. त्या समितीमध्ये जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त इत्यादींचा समावेश आहे. त्या समितीने लाभार्थ्यांची नावे ठरवून दिलेली आहेत. म्हाडाने अंमलबजावणी संस्था (Implementation Egency) म्हणून घरे बांधलेली आहेत.

झोपडपट्टीतील लोकांना लाभ मिळावा यासाठी ही योजना राबविण्यात आली होती. मुंबईतील दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांची (बीपीएलची) यादी जाहीर झालेली नाही. तर मग लाभार्थ्यांची निवड कशी करण्यात आली ? याबाबत समितीने माहिती विचारली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, दिनांक १.१.१९९५ च्या यादीप्रमाणे जे पात्र लाभार्थी होते त्यांना या योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.

२.४० मुंबईतील पोलीसांना किंवा कंपनीतील कामगारांना राहण्यासाठी घरे नाहीत म्हणून ते झोपडपट्टीमध्ये राहतात. परंतु ते दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांमध्ये (बीपीएलमध्ये) बसत नाहीत. सन १९९५ चा बेस धरावा असे राज्य शासनाने सांगितले होते. दारिद्र्य रेषेखालील (बीपीएलची) यादी अंतिम (फायनल) झालेली नसल्यामुळे कोणता निकष लावावा यासंदर्भात विभागाने शासनाकडे विचारणा केली होती काय ? अशी समितीने विचारणा केली असता, योजनेची अंमलबजावणी करतांना तो दारिद्र्य रेषेखालील (बीपीएल) आहे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहे हे शासनाच्या आदेशाप्रमाणे बघण्यात आलेले नाही हे बरोबर आहे. पण विभागाला ही योजना राबवावयाची होती अशी विभागीय सचिवांनी माहिती दिली.

२.४१ ही योजना राबविल्यामुळे गरिबांना घरे मिळाली. परंतु यामध्ये तांत्रिक अडचण आहे. दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांची (बीपीएलची) यादी अंतिम झालेली नसल्यामुळे कोणता निकष लावावयाचा हे विभागाने शासनाकडून स्पष्ट करुन घेतले नाही, तसेच किती दारिद्र्य रेषेखालील (बीपीएल) धारक आहेत व किती अल्प उत्पन्न गटातील आहेत याचा आढावा घेण्यात आला होता काय ? केवळ तो झोपडपट्टीमध्ये राहतो म्हणून लाभ दिलेला आहे असे झालेले आहे काय ? यावर विभागीय सचिवांनी दारिद्र्य रेषेखालील (बी.पी.एल) धारक आहे किंवा नाही हे बघण्यात आलेले नाही, असा खुलासा केला.

२.४२ अल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता, ही योजना राबवावयाची होती व सर्व समावेशक समिती नियुक्त करण्यात आली

होती. त्या समितीने जी यादी अंतिम केली होती त्या यादीप्रमाणे लाभार्थ्यांना लाभ देऊन ही योजना राबविण्यात आलेली आहे जी समिती नियुक्त करण्यात आली होती ती सर्व समावेशक समिती होती आणि त्या समितीने यादी अंतिम केलेली आहे, असेही समितीस विभागास प्रतिनिधींनी सांगितले.

२.४३ लातूर येथे २,४२९ पात्र लाभार्थ्यांऐवजी १४,४३७ लाभार्थी निवडले गेले म्हणजे १२,००८ जादा लाभार्थ्यांना सन २००२ ते २००६ दरम्यान पात्रता नसताना घरकुले देण्यात आली. त्यामुळे अपात्र लाभधारकांवर रुपये ४८.०३ कोटी खर्च करण्यात आले. यासंदर्भात समितीने माहिती विचारली असता विभागीय सचिवांनी लातूर नगरपालिकेची १९९५ ची मतदार यादी आणि सन १९९१ च्या जनगणनेनुसार झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या रहिवाशांची संख्या ८७ हजार आहे अशी माहिती दिली. समितीने ही योजना झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या लोकांसाठी होती का आर्थिक दुर्बल घटकांसाठी होती ? अशी विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी दोन्ही निकषाचे अनुकरण करावयाचे होते असा खुलासा केला. ज्यांना लाभ देण्यात आलेला आहे ते आर्थिक दुर्बल घटकातील आहेत किंवा नाही हे कोठेही नमूद करण्यात आलेले नाही. मतदार यादी आहे, पाहणी झालेली (सर्व्हे) आहे. १९९५ पूर्वी झोपडपट्टीमध्ये राहत असल्याचा पुरावा आहे परंतु दारिद्र्य रेषेखाली (बीपीएल) आहे किंवा नाही हे कळत नाही. म्हाडा ही अंमलबजावणी करणारी यंत्रणा होती. म्हाडाने अंमलबजावणी करताना केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयास हवी होती. असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, शहर झोपडपट्टी मुक्त करण्यासाठी केंद्र शासनाची राजीव गांधी आवास योजना आहे. म्हाडाने नवीन जागेवर घरे बांधून दिलेली नाहीत. म्हाडाने आहे त्याच ठिकाणी घरे बांधलेली आहेत. त्यावर समितीने विचारणा केली की, घराचा ताबा देतांना जो करारनामा करण्यात आला त्यामध्ये अमुक इतकी वर्षे घर विकता येणार नाही अशी अट होती काय ? १० वर्षे घर विकता येणार नाही अशी झोपडपट्टी पुनर्विकास योजनेमध्ये (एसआरएमध्ये) अट आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. त्यावर समितीने विचारणा केली की, ज्यावेळी झोपडपट्टीची पाहणी (सर्व्हे) केली जाते त्यावेळी कळते की, अमुक ठिकाणी आर्थिक दुर्बल घटकातील लोक राहतात आणि त्याप्रमाणे त्यांचा योजनेमध्ये समावेश करण्यात येतो व १२,००८ घरे पूर्वी तेथे होती का आणि असतील तर ती आधीच्या पाहणीमध्ये का आली नाहीत ? लातूर येथे २,४२९ पात्र लाभार्थ्यांऐवजी १४,४३७ लाभार्थी निवडले गेले म्हणजे १२,००८ लाभार्थ्यांचा फरक आहे. यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, सन २००६ मध्ये लातूर नगरपालिकेने पत्र दिलेले आहे की, दिनांक ०१.०१.१९९१ च्या जनगणनेनुसार झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या रहिवाशांची संख्या ८७ हजार आहे. दिनांक ०१.०१.१९९५ रोजीची लातूर शहरातील झोपडपट्टीत राहणाऱ्या कुटुंबियांचा

विचार करता १७,४४७ इतक्या सदनिका अपेक्षित होत्या. प्राप्त परिस्थितीमध्ये लातूर नगरपरिषदेकडून १४,४३७ सदनिका बांधण्याचा प्रस्ताव म्हाडाकडे आल्याने १४,४३७ सदनिकांना मंजुरी देण्यात आली.

२.४४ समितीने विचारणा केली की, लातूरमध्ये योजना राबविण्यात आल्यामुळे म्हाडा समाधानी आहे काय आणि खरोखर गरीब लोकांना घरे मिळालेली आहेत काय ? यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, जे लोक झोपडपट्टीमध्ये राहत होते त्यांच्या झोपडीचे म्हाडाने फोटो काढलेले आहेत. यावर समितीने अशी विचारणा केली की, प्राप्त परिस्थितीमध्ये लातूर नगरपरिषदेकडून १४,४३७ इतक्या सदनिका बांधण्याचा प्रस्ताव म्हाडाकडे आल्याने एवढ्या सदनिकांना मंजुरी दिली आधीच्या पाहणीमध्ये या झोपड्यांचा उल्लेख असावयास पाहिजे होता. त्यामुळे जी पाहणी झालेली आहे ती चुकीची झालेली आहे काय ? त्यावर विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, पहिल्या टप्प्यामध्ये १२५ घरे, दुसऱ्या टप्प्यामध्ये २८७ घरे आणि तिसऱ्या टप्प्यामध्ये १२ हजार घरे अशा तीन टप्प्यात ही योजना पाहणी करुन राबविण्यात आलेली आहे.

२.४५ केंद्र शासनाचे निकष का बदलण्यात आले नाहीत व त्यासाठी शासनाने परवानगी का दिली नाही. यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, केंद्र शासनाच्या नगर विकास विभागाने मूळ मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. आपण शासन निर्णय काढताना त्यातील तरतूदी कडक केलेल्या आहेत. In the guidelines, the persons belonging to BPL category, including the members of the weaker sections were to be beneficiaries. Preference was to be given to the BPL. दारिद्र्य रेषेच्या खालील लोकांना घरे उपलब्ध करुन देण्यात यावेत, असे केंद्र शासनाचे धोरण नव्हते. या योजनेची अंमलबजावणी करताना समितीने सुचविले होते की, झोपडपट्टीत जे लोक राहतात, जे लोक गरीब आहेत, ज्यांना घरे नाहीत त्यांना घरे उपलब्ध करुन देण्यात यावीत, असे सुचवल्याप्रमाणे त्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

२.४६ लाभधारकांना जमिनीचा भाडेपट्टा करुन देण्याविषयी व जागेची मालकी लाभार्थ्यांच्या नावावर करुन देण्यासंदर्भात खुलासा करण्याविषयी समितीने सांगितले असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, हे पट्टे ३० वर्षाचे होते. झोपडपट्टीच्या जागेवरच ही घरे बांधण्यात आलेली आहेत. शासकीय किंवा निमशासकीय जमीन असेल तरच आपण भाडेपट्टयाने जमीन देऊ शकतो. सदर पट्टे सहकारी सोसायटीलाच देऊ शकतो. घरकुले बांधून झाल्यानंतर लाभधारकांना वाटप, संमती पत्र देऊन त्यांना हक्काची घरे देण्यात आलेली आहेत.

२.४७ लाभार्थ्यांच्या नावाने भाडेपट्टा यापूर्वीच व्हावयास पाहिजे होता. मालकी झाल्यानंतरच चेअरमन निवडला जात असतो व त्यानंतरच खरेदी विक्रीचे व्यवहार होत असतात. तसेच सोसायटीच स्थापन झाली नसेल तर अनेक प्रश्न निर्माण होत असतात. ज्या लाभार्थ्यांला सदनिका मिळालेली आहे व ती सदनिका त्याने विकावयाची ठरवली, स्टँप पेपर तयार केला तरी विक्रीच्या संदर्भात विभागाची त्या सदनिका धारकाला परवानगी घ्यावीच लागत असते. यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, लाभार्थ्यांला १० वर्षे तरी सदनिका विकता येणार नाही अशी अट होती. मुखत्यारनामे (Power of attorney) घरे विकली जातात ही बाब वेगळी आहे. परंतु महत्वाची समस्या ही भाडेपट्ट्याची आहे. ज्या जमिनीवर झोपडपट्टी आहे अशा जमिनी ३० वर्षाच्या भाडेपट्ट्याने देता आली नसती. त्यामुळे अशा प्रकारच्या योजनाद्वारे त्यांना याचा लाभ देण्यात आला आहे.

२.४८ म्हाडा केवळ घरे बांधण्याचे काम करते परंतु सोसायटी बनवून देण्याचे काम करीत नाही. म्हाडाने सोसायटी बनवून ती लाभार्थ्यांच्या ताब्यात दिली पाहिजे. म्हाडा केवळ बांधकाम करते परंतु पुढची कोणतीही जबाबदारी स्वीकारीत नाही. यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, लाभार्थ्यांला घराचा ताबा मिळाल्यानंतर ते घर त्याला १० वर्षे तरी विकता येणार नाही यासंदर्भात अट घालून दिलेली आहे. लाभार्थ्यांना वैयक्तिक वाटप पत्र (ॲलॉटमेंट लेटर) दिलेली आहेत. सदर सदनिका लाभार्थ्याला सदनिका विकता येणार नाही, हस्तांतरीत करता येणार नाही किंवा भाड्याने देता येणार नाही अशा अटी घालून दिलेल्या आहेत, परंतु यासंदर्भातील कालावधी घालून देण्यात आलेला नाही.

या ठिकाणच्या सदनिका किती लाभार्थ्यांनी विकल्या होत्या याची माहिती म्हाडाकडे आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली की, या योजनेमध्ये काही लोक अनौपचारिकरित्या वास्तव्य करीत असल्याचे आढळून आले होते.

२.४९ याच अनुषंगाने समितीने विचारणा केली की, या योजनेसाठी मिळालेल्या निधीपैकी म्हाडाकडे किती रक्कम शिल्लक आहे असे समितीने विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, म्हाडाकडे ६.८७ कोटी रक्कम शिल्लक आहे तसेच १०८ कोटी रुपये निधी लेख्यामध्ये आहे. यावर विभागीय सचिवांनी म्हाडाने हे पैसे शासनास परत करावयास पाहिजेत असे सांगितले. यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी समितीला विदित केले की, म्हाडाला शासनाकडून ३०० कोटी रुपये येणे असून त्यापैकी आतापर्यंत शासनाकडून २१५ कोटी रुपये मिळालेले आहेत. उर्वरित रक्कमेचे व्याज धरुन शासनाकडून म्हाडाला अद्यापही ४७० कोटी रुपये येणे बाकी आहे असेही सचिवांनी समितीला सांगितले.

२.५० समितीने विचारणा केली की, बऱ्याच ठिकाणी महानगरपालिकेचे, नगरपालिकेचे शासनास पैसे येणे बाकी असतात तसेच शासनाचे सुद्धा महानगरपालिकेस, नगरपालिकेस पैसे देणे बाकी असतात. परस्पर निर्णय घेऊन अशा प्रकारे काम केले जाते. त्यामुळे कोणी कोणाला किती रक्कम द्यावयाची आहे किंवा घ्यावयाची आहे याची माहिती मिळणे आवश्यक आहे. यावर विभागीय सचिवांनी म्हाडाने ६.८७ कोटी रुपये शासनास परत देण्याबाबत म्हाडाला पत्र देण्यात येईल असे सांगितले.

२.५१ मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, नाशिक व पुणे मंडळ यांनी वसूल केलेल्या दलाली शुल्काच्या रु ३.०४ कोटी रक्कमेबाबत समितीने खुलासा करण्यास सांगितले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, शासन निर्णय २ सप्टेंबर, २००२ पासून ब्लॉक १४ म्हाडाने नोडल एजन्सी म्हणून काम केलेले आहे. या योजनेमध्ये केंद्र शासनाचा निधी २२१ कोटी असून राज्य शासनाचा निधी २६२ कोटी रुपये आहे. राज्य शासनाच्या स्तरावर म्हाडाला हे काम देण्यात आले होते. सदर काम हे नागरी स्थानिक संस्था मार्फत केले जाते. म्हाडाने देखरेख, तांत्रिक सल्ला इ. बाबत महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार ५ टक्के अभिकरण शुल्क रक्कम वसूल करुन ती माहे डिसेंबर, २००४ पर्यंत लेख्यात समाविष्ट केली आहे. तथापि याबाबत सुधारित मार्गदर्शनानुसार अभिकरण शुल्क आकरणी रद्द करण्यात आली आहे. या ठिकाणी दलाली हा जो शब्द वापरलेला आहे तो चुकीने वापरला गेला आहे.

३.४ कोटी रुपये रक्कम म्हाडाला मिळाली आहे काय ? असे समितीने विचारले असता, विभागीय प्रतिनिधींनी ही रक्कम म्हाडाला मिळालेली नाही, असा खुलासा केला. त्यावर म्हाडाने आपला हिस्सा काढून घ्यावयास पाहिजे होता, असे समितीने मत व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी म्हाडानेच शासनास १०८ कोटी परत केले पाहिजे, असे प्रतिपादन केले यावर विभागीय प्रतिनिधीनी खुलासा केला की, इतर योजना बंद झाल्यानंतर उर्वरित रक्कमा शासनाला परत केल्या जातात. त्यामुळे ही रक्कम सुध्दा शासनास परत केली जाईल.

२.५२ समितीने विभागास उपयोगिता प्रमाणपत्राच्या संदर्भात माहिती देण्याबाबत सांगितले असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, उपयोगिता प्रमाणपत्रामध्ये खर्च दाखवलेली रक्कम रुपये ४.८६ कोटी ठेव ठेवण्यात आली होती. परंतु सदर रक्कमेपैकी रु.४.७२ कोटी रक्कम तद्नंतर योजनेच्या कामी खर्च करण्यात आली आहे. महालेखापालाच्या म्हणण्यानुसार हे पैसे त्याचा उपयोग करुन प्रमाणपत्र द्यावयास पाहिजे होते परंतु आता हे पैसे खर्च करण्यात आलेले आहेत.

त्यावर महालेखाकारांनी पैसे खर्च करण्याअगोदर उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्याचा आक्षेप असल्याचे समितीस सांगितले असता विभागीय सचिवांनी असे प्रकार न घडण्याबाबत काळजी घेतली जाईल, असे समितीस सांगितले.

२.५३ यशदाने आपल्या अहवालात काय म्हटले आहे ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधीनी २५ मुद्यांच्या बाबतीत माहिती देण्यात आलेली आहे, अशी माहिती दिली. यावर यशदाचा अहवाल आला आहे काय ? यशदाचा अहवाल समितीला तसेच महालेखापालांना सुद्धा सादर झालेला नाही. त्यामुळे यशदाचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा, असे समितीने सांगितले असता यशदाचा अहवाल समितीला तसेच महालेखापालांना सुद्धा उपलब्ध करुन देण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले. त्यावर यशदाचा अहवाल म्हाडाकडे केव्हा आला होता ? अशी समितीने विचारणा केली असता म्हाडाचे वित्त नियंत्रक यांनी यशदाचा अहवाल मुख्य अभियंत्यांकडे मार्च २००७ मध्ये आला होता असा खुलासा केला. त्यावर उप मुख्यकार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी माझ्याकडे मुख्य अभियंत्यांचा कार्यभार असून हा अहवाल माझ्या पूर्वीच दिलेला दिसतो. यावर विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, यशदाचा अहवाल शासनाकडे, समितीकडे तसेच महालेखापालांकडे पाठविला गेला नाही असे दिसते. त्यावर यशदाचा अहवाल समितीला देण्यात यावा आणि यशदाचा अहवाल समिती समोर असता तर त्यातील शिफारशींवर बरीच चर्चा आजच्या बैठकीत करता आली असती. यशदाचा अहवाल म्हाडाकडून महालेखाकार आणि लोकलेखा समितीकडे न पाठविण्याची कारणे काय आहेत ? व याप्रकरणी कोणते अधिकारी जबाबदार आहेत ? ज्या अधिकाऱ्यांनी सदर अहवाल समितीला आणि महालेखाकार यांच्याकडे पाठविला नाही, त्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली गेली पाहिजे. यशदाने अहवाल म्हाडाला सादर केला आणि तो अहवाल म्हाडातील अधिकाऱ्यांनी वाचला असेल. त्या अहवालात कडक शब्दात लिहिले असेल म्हणून तो अहवाल म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी तसाच दाबून ठेवला असावा, असे समितीचे स्पष्ट मत झालेले आहे. त्यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, याबाबत वस्तुस्थिती पडताळून पाहिली जाईल असे विभागीय सचिवांनी समितीला आश्वासन दिले.

२.५४ यशदाने आपल्या अहवालात जवळपास २५ शिफारशी केलेल्या आहेत. यशदाचा अहवाल म्हाडाकडे प्राप्त झाला. त्यानंतर तो अहवाल महालेखाकार आणि लोकलेखा समितीकडे यावयास पाहिजे होता. म्हाडाच्या कामाचे मुल्यमापन करुन काय करावयास पाहिजे होते आणि काय केले पाहिजे यासंबंधी पूर्ण अभ्यास करुन सदरचा अहवाल यशदाने सादर केलेला आहे. समितीला अहवाल सादर न करण्याची संबंधित अधिकाऱ्यांची प्रवृत्ती बरोबर नाही. जाणीवपूर्वक सदरचा अहवाल महालेखाकार आणि

समितीला सादर करण्यास टाळाटाळ केलेली दिसते. याबाबतीत संबंधितांविरुद्ध काय कार्यवाही केली जाईल ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधीनी तसे घडले असेल तर संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध निश्चितपणे कारवाई करु, असे आश्वासन दिले. त्यावर लोकलेखा समितीला जाणीवपूर्वक अहवाल सादर केला गेला नाही. म्हणून संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित झाली पाहिजे अशी समितीची मागणी आहे. त्यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, शासनाने यशदाची नियुक्ती केली आहे. यशदाने आपला अहवाल परस्पर म्हाडाला पाठविला. शासनाकडे देखील तो अहवाल पाठविलेला दिसत नाही. म्हाडाला यशदाचा अहवाल प्राप्त झाला. सदरचा अहवाल महालेखाकार तसेच लोकलेखा समितीकडे का पाठविला नाही याबाबतची माहिती जाणून घेऊन ज्यांनी अहवाल पाठविला नसेल त्यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल. परंतु अजूनही सदरची माहिती समितीला म्हाडाकडून प्राप्त झालेली नाही.

२.५५ यशदाने आपला अहवाल इंग्रजी भाषेत सादर केलेला आहे. राज्य शासनाचा दैनंदिन कारभार हा मराठीत चालतो आहे याची सर्वांना माहिती असून देखील सदरचा अहवाल इंग्रजीत तयार केला आहे. सदरच्या अहवालाची प्रत कोणी वाचू नये म्हणून हा अहवाल इंग्रजी भाषेत केला असावा असा समितीचा समज झाला आहे. यशदाच्या अहवालाच्या मराठी प्रती समितीच्या सर्व सदस्यांना उपलब्ध करुन द्याव्यात असे ही समितीने सांगितले. त्यावर विभागीय प्रतिनिधीनी या अहवालाची एक प्रत केंद्र शासनाकडे पाठवावयाची असेल म्हणून तो अहवाल इंग्रजी भाषेत केला असावा, असा खुलासा केला.

२.५६ यशदाने आपल्या अहवालात २५ शिफारशी केल्या आहेत. त्यापैकी किती शिफारशींची आतापर्यंत अंमलबजावणी करण्यात आली आहे ? अशी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधीनी पती-पत्नी यांच्या नावे संयुक्तपणे सदनिका असावी अशी अहवालात शिफारस केली आहे, ती शिफारस अंमलात आणली आहे. शासनाने अंमलबजावणी केलेल्या शिफारशींची माहिती समितीस मागावून पाठविली आहे. **(विवरण क्र.६)**

२.५७ यशदाच्या अहवालाच्या मराठी प्रती समितीच्या सर्व सदस्यांना उपलब्ध करुन द्याव्यात असे सांगितले असता विभागीय प्रतिनिधींनी होकारात्मक उत्तर दिले यशदा अहवालाच्या मराठी प्रती समितीस नंतर सादर करण्यात आल्या आहेत. त्या अहवालामधील यशदाने केलेल्या २५ शिफारशींची माहिती आहे. **(विवरण क्र.७)**

अहवालातील पहिलीच शिफारस आरक्षण धोरणा संदर्भातील आहे. त्याबाबतीत काय केले आहे ? अशी समितीने विचारणा केला असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, लाभार्थ्यांची निवड करताना योग्य लाभार्थ्यांची निवड केली आहे किंवा नाही ही बाब कटाक्षाने तपासून घेतली पाहिजे अशा स्वरुपाची शिफारस आहे.

२.५८ या अहवालातील २५ व्या शिफारशींमध्ये दोन इमारतींमध्ये अंतर किती असावे, सदनिका धारकांना राहण्यासाठी सोयी सवलती कोणकोणत्या द्याव्यात. अग्निशमन वाहन जाईल अशी व्यवस्था इमारती बांधताना केली पाहिजे, तसेच उच्च वीज प्रवाहापासून सदर इमारतीचे अंतर किती असावे इत्यादी बाबींचा अहवालात उल्लेख केला गेला आहे. या शिफारशीमधील नमूद केलेल्या गोष्टींचे पालन म्हाडाकडून केले जात आहे काय ? अशी समितीने विचारणा केला असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, जे झोपडीधारक आहेत, त्यांनी त्यांच्या जागेवर बांधकाम केलेले आहे. त्या जागेवर म्हाडाने बांधकाम केलेले नाही. ज्या ठिकाणी झोपड्या होत्या, त्या झोपडीधारकांनी आपापल्या जागेवर इमारती बांधलेल्या आहेत. त्यास म्हाडाने मान्यता दिलेली आहे. झोपडीधारकांनी जस-जसे बांधकाम केले आहे तस-तसे त्यांना बांधकामासाठी लागणाऱ्या रकमेचे हप्ते देण्यात आले आहेत. सदरहू बांधकामे तांत्रिकदृष्ट्या बरोबर आहेत काय एवढीच बाब म्हाडाने तपासावयाची आहे.

२.५९ सदर बांधकाम करताना कोण कोणत्या तांत्रिक बाबी तपासल्या गेल्या? अशी समितीने विचारणा केले असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, पूर्वी जेवढ्या जागेवर झोपडीधारकाची झोपडी होती, तेवढ्याच जागेवर झोपडीधारकाने बांधकाम केलेले आहे. यासंदर्भात समिती नियुक्त केली होती आणि त्या समितीला पूर्णपणे अधिकार दिले होते. काही ठिकाणी पूर्वी शौचालयाची योजना राबविली असेल, त्या ठिकाणी दुसऱ्यांदा शौचालयाची योजना राबबिली जावू नये, झोपडीधारकाची जेवढी जागा होती, तेवढ्याच जागेवर झोपडीधारकाने बांधकाम केले आहे किंवा नाही इत्यादी गोष्टी पाहण्याची जबाबदारी समितीकडे सोपविली होती.

२.६० यशदाच्या अहवालातील एका शिफारशीप्रमाणे ७० युनिटस्‌चा नमुना प्रकल्प हुडकोने चिखली, नागपूर येथे केला आहे. वॅम्बेने तो मागील वर्षी पूर्ण केलेला आहे. परंतु महाराष्ट्रातील इतर प्रकल्पासाठी तो नमुना प्रकल्प आहे. शहरांमध्ये वेगवेगळ्या वस्त्या आहेत. अशा वस्त्यांचा विकास व्हावा म्हणून एका ठिकाणी पायलट प्रोजेक्ट तयार करावा असे सांगितले होते. एखादी चांगली योजना असेल तर ती चांगल्या पद्धतीने राबविण्याचे ठरविले जाते. परंतु काही अधिकारी अशा चांगल्या योजनांच्या अंमलबजावणीकडे लक्ष देत नाही, त्यामुळे चांगल्या योजनेचा बोजबारा उडतो. सन २००२ मध्ये बऱ्याच

वस्त्यांमध्ये अशा पद्धतीच्या योजना राबविल्या गेल्या असतील, त्या ठिकाणच्या वस्त्या झोपडपट्टी पुनर्विकास योजने मध्ये (एस.आर.ए.) रुपांतरीत झाल्या असतील. या अहवालात बऱ्याच शिफारशी करण्यात आलेल्या आहेत, त्या शिफारशींचा अभ्यास करण्यासाठी समितीच्या सर्व सदस्यांना मराठी अहवालाच्या प्रती उपलब्ध करुन द्याव्यात. समिती सदस्यांनी तो अहवाल वाचल्यानंतर जर काही अतिरिक्त मुद्दे आढळून आले तर त्यासंदर्भात आपल्याला सदर मुद्यांचा खुलासा करण्यासाठी पुन्हा बोलाविले जाईल. यशदाच्या अहवालाच्या प्रती महालेखाकार आणि लोकलेखा समितीकडे पाठविल्या नाहीत ? ज्या अधिकाऱ्यांनी सदर अहवाल महालेखाकार आणि समितीकडे पाठविला नाही त्या संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचे विरुद्ध कारवाई करण्यात यावी व त्याबाबतची अभिप्रायासह माहिती समितीला सादर करण्यात यावी, असे निदेश समितीने दिले. यासंदर्भात विभागीय प्रतिनिधीनी समितीला आश्वासित करुनही विभागाकडून माहिती प्राप्त झालेली नाही.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ४.२.३ संदर्भात प्रधान सचिव, गृहनिर्माण व इतर विभागीय प्रतिनिधींची दिनांक १ मार्च, २०११ रोजी साक्ष घेतली.

२.६१ विलेपार्ले येथील व्यापारी भूखंडावरील अतिक्रमण नियमित करताना जमिनीची किंमत स्वेच्छेने ठरविल्यामुळे शासनाचे रुपये ९२.७८ लाखाचे नुकसान झाले. मे. भास्कर ऑटो गॅरेज या कंपनीचे मालक कोण आहेत, तसेच या जमिनीवरील अतिक्रमण केव्हा पासूनचे आहे ? सदर भूखंडावरील डी.पी.रिझर्वेशन उठविणेच्या दृष्टीने काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ? मे.भास्कर ऑटो गॅरेज यांनी भूखंडाच्या देय असलेल्या किंमतीपोटी आतापर्यंत किती रक्कम अदा केली आहे ?

२.६२ म्हाडाची योजना राज्यात सर्वत्र कार्यान्वित झालेली आहे. राज्यात म्हाडाच्या जागेवर लोकांनी अतिक्रमण केलेले आहे, त्यांना वारंवार नोटीसा देणे, त्यानंतर पुढील कार्यवाही करणे यासंबंधी म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी लक्ष ठेवावयास पाहिजे. ज्या ठिकाणी म्हाडाच्या जागा आहेत, तेथे मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले आहे, त्या जागा खाली करुन घेण्यासंदर्भात म्हाडाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष जागांना भेटी दिल्या पाहिजेत. या ठिकाणी म्हाडाचे खुले भूखंड असतील तेथे कुंपणे घातली पाहिजेत. तशा प्रकाराची कार्यवाही कोठेही केलेली दिसून येत नाही. म्हाडाचेच अधिकारी सांगतात, हा भूखंड म्हाडाचा आहे, या भूखंडावर अतिक्रमण करुन तेथे गॅरेज टाका अथवा अन्यत्र बांधकाम करा. त्या भूखंडावर अतिक्रमण झाल्यानंतर अतिक्रमण करणाऱ्या व्यक्ती वीज जोडणी उपलब्ध करुन घेतात.

दुकानाचा परवाना त्या भूखंडावर मिळवून घेतात व तद्नंतर म्हाडाची कार्यवाही सुरु होते. त्यानंतर त्या व्यक्ती न्यायालयात जातात. तशी प्रकरणे न्यायालयात गेल्यानंतर म्हाडाला अतिक्रमणे हटविता येत नाहीत. म्हाडाने आपले भूखंड जपून ठेवावयास पाहिजे, त्यावर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण होणार नाही, यासाठी दक्षता घेतली पाहिजे.

२.६३ बहुतांशी भूखंड कमाल जमीन धारणा मधून म्हाडाला मिळालेले आहेत. सदरचे भूखंड एका धनदांडग्यांच्या ताब्यातून घेऊन दुसऱ्या धनदांडग्याच्या घशात घालण्याचे प्रकार म्हाडाच्या अधिकाऱ्यांकडून होत आहेत. या भूखंडाची देखरेख करण्यासाठी, तसेच त्यावर अतिक्रमणे होऊ नयेत यासाठी म्हाडाकडे काही यंत्रणा आहे काय ? म्हाडाकडे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध आहे, सुरक्षा व्यवस्था नेमण्याची निविदा म्हाडा काढू शकते तसेच म्हाडाचे भूखंड अतिक्रमीत होऊ नये म्हणून स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात येईल काय ? विलेपार्ले येथील म्हाडाच्या भूखंडावरील अतिक्रमण धारकांचे नाव काय आहे ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, म्हाडाच्या भूखंडावर अतिक्रमण होऊ नये यासाठी निश्चितपणे काळजी घेण्यात येईल. तसेच विलेपार्ले येथील म्हाडाच्या भूखंडावर ज्या व्यक्तीने अतिक्रमण केले आहे त्याचे नाव श्री. भास्कर बोधा सनील असे आहे. त्याने विलेपार्ले येथील म्हाडाच्या ९७८ चौरस मीटर जागेवर अतिक्रमण केलेले आहे. सदर अतिक्रमण संरक्षणपात्र असल्यामुळे मुंबई मंडळ सदर अतिक्रमण काढू शकले नाही. सदर जागा अतिक्रमित केलेली असल्याने शासनाने म्हाडा अधिनियम १९७६ खालील नियम १९८२ चे विनियम १६ नुसार वितरित करण्याचे आदेश दिले. प्राधिकरणाच्या धोरणाप्रमाणे सदरहू जागेची किंमत ३३ हजार ८९७ रुपये चौरस मीटर अशी वर्कआऊट केली होती. शासनाने आदेश दिल्याप्रमाणे जागेची किंमत काय असावी अशी माहिती घेतली. नगर रचना विभागाने प्रति चौरस मीटर ४० हजार रुपये असा दर काढून दिला.

२.६४ सदर जागेसंदर्भात ५० टक्के दंडनीय शुल्क न आकारता सरसकट २० हजार रुपये चौरस या दराने सदरची जागा अतिक्रमण धारकास देण्यासंबंधी म्हाडास शासनाकडून आदेशित केले गेले. त्यानंतर म्हाडाने ९७८ चौरस मीटरचे २ कोटी २० लाख ५८० रुपये एवढी आकारणी केली व सदरहू रक्कमेचा भरणा करावा असे मे.भास्कर ऑटो गॅरेजच्या मालकास १९९९ मध्ये कळविण्यात आले. त्यानंतर भास्कर ऑटो गॅरेजच्या मालकाने १० लाख रुपये भरले. उर्वरित रक्कम अजून त्यांनी भरलेली नाही. त्यानंतर म्हाडाने जप्तीच्या कार्यवाहीस सुरुवात केल्यानंतर सदरहू गॅरेजचा मालक उच्च न्यायालयात गेला आहे.

२.६५ जप्तीची कार्यवाही म्हाडाकडून वेळेवर का झाली नाही ? जप्तीची कार्यवाही वेळीच झाली असती तर प्रकरण न्यायालयात जाण्याचा प्रश्नच आला नसता. जप्तीच्या कार्यवाहीस विलंब का लागला ? असे समितीने विचारले असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, सन २००३ मध्ये जप्तीची कार्यवाही सुरु केली. त्यानंतर सदर प्रकरण उच्च न्यायालयात दाखल केले गेले. या जागेत काही नाल्याचा भाग आहे व डी.पी.प्लॅन प्रमाणे काही जागा रस्त्यामुळे बाधीत होत होती. डी.पी.प्लॅन प्रमाणे या जागेवरील काही भाग बाधीत होत असला तरी त्याचे क्षेत्रासहित सुमारे ४६३.९० चौरस मीटर जागेचे ऑफर लेटर अतिक्रमणधारकास देण्यात आले. ४६३.९० चौरस मीटर जागा २० हजार रुपये प्रति चौरस मीटर या दराने साधारणतः १ कोटी ४ लाख रुपये भरण्याबाबत अतिक्रमणधारकास कळविण्यात आले. या अतिक्रमणधारकाकडून एकूण ३४ लाख रुपयांचे येणे होते, त्यातील रु.२७ लाख त्यांनी भरली आहे. आता त्या ठिकाणी काय आहे ? असे समितीने विचारले असता, विभागीय प्रतिनिधींनी त्या जागेवर गॅरेज आहे. तसेच या अतिक्रमणासंदर्भात काढून आणलेले फोटो समितीला दाखविण्यात आले.

२.६६ मुंबईमध्ये म्हाडाच्या किती भूखंडावर अतिक्रमण झालेले आहे ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी साधारणतः ५५ भूखंडावर अतिक्रमण झालेले आहे. यासंबंधीचे माहिती डाटा तयार केलेली आहे. सदरहू माहिती विभागाकडून प्राप्त झालेली आहे. ती अहवालाच्या शेवटी (**विवरणपत्र क्र.८)** जोडली आहे.

२.६७ सदरहू अतिक्रमण धारकाकडून किती रक्कम येणे बाकी आहे ? अशी समितीने विचारणा केली असता, त्यांच्याकडून १ कोटी ०४ लाख ३९ हजार ७८० रुपये येणे आहे व सदरहू रक्कम तात्काळ भरावी म्हणून म्हाडाने त्यांना नोटीस दिलेली आहे, असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

सदरचे अतिक्रमण केव्हापासूनचे आहे ? अशी समितीने विचारणा केली असता, सदर अतिक्रमण १९९५ पूर्वीचे आहे. मूळ भूखंड १९६४ मधील आहे. त्यावेळी पुष्कळ भूखंड म्हाडाकडे आले. त्यातील हा एक भूखंड आहे. म्हाडाच्या भूखंडाचे संरक्षण व्हावे म्हणून एजन्सी नेमली आहे. त्याचप्रमाणे अतिक्रमण हटविण्यासाठी एक पथक देखील तयार केलेले आहे, अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

२.६८ एका श्रीमंतांकडील भूखंड दुसऱ्या श्रीमंत व्यक्तीला द्यावयाचा असा हा प्रकार म्हाडाच्या भूखंडाच्या बाबतीत चाललेला आहे. हा भयानक असा प्रकार आहे. या बाबतीत कुठे तरी पायबंद घातला गेला पाहिजे असे समितीचे स्पष्ट मत आहे. यासंदर्भातील समितीचे मत शंभर टक्के मान्य आहे. म्हाडाच्या मौल्यवान जमिनीवर अशा प्रकारचे अतिक्रमण होऊ लागले तर ती बाब अतिशय गंभीर आहे, असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

२.६९ म्हाडाचे अधिकारी सरकारच्या आशिर्वादाने म्हाडाचे भूखंड अशा पध्दतीने श्रीमंत माणसांच्या घशात घालत आहेत. हा प्रकार थांबला पाहिजे. सदरहू क्षेत्रासाठी संचालक, नगररचना यांनी ४०,०००/- रुपये प्रति चौ.मी. असे मुल्यमापन करुन दर कळविण्यात आला होता. परंतु प्रत्यक्षात २०,०००/- प्रति चौ.मी. दर आकारण्यात आलेला आहे. याबाबत समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, याबाबतीत शासन स्तरावर म्हणजे माननीय गृहनिर्माण मंत्री महोदयांनी निर्णय घेतला होता. त्याची टिप्पणी आहे. नगररचना विभागाच्या नियमाप्रमाणे जेव्हा जमीन देण्याचा निर्णय घेतला जातो, त्यावेळी ते म्हाडाच्या नियमाप्रमाणे व्हावयास पाहिजे. त्यावेळेस माननीय मंत्री महोदयांनी निर्णय दिला आहे ती अतिक्रमित जागा आहे. अर्जदाराच्या ताब्यात असलेल्या ९७८ चौ.मी. क्षेत्रापैकी ३०० चौ.मी. क्षेत्रावर बांधकाम असून ते संरक्षण पात्र आहे व अर्जदारांकडून ५० टक्के दंड न घेता सरसकट रु. २०,००० प्रति चौ.मी. क्षेत्रासाठी दर आकारण्यात आलेला आहे.

२.७० त्यावर समितीने विचारणा केली की, ज्यावेळी अशा प्रकारचा निर्णय घेतला जातो. तेव्हा तो न्यायालयात एक पुरावा (Evidence) होत नाही काय ? तसेच संबंधितांकडून ५० टक्के दंड न आकारण्याचा निर्णय घेण्यात आला, त्याला कोणता आधार आहे ? यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, याबाबत कारणे दिलेली आहेत. माननीय गृहनिर्माण मंत्री महोदयांनी दिलेल्या निर्णयामध्ये म्हटलेले आहे की, "विभागाची टिप्पणी पाहता जरी विषयांकित जमीन १९४७ मध्ये संपादित केलेली असली तरी जमीन दलदलीची व बाजूस नाला असल्यामुळे मंडळ विकसित करु शकले नाही. तसेच अर्जदाराने सदर जमिनीवर केलेले अतिक्रमण संरक्षणपात्र आहे त्यामुळे आजही मुंबई मंडळ सदर अतिक्रमण काढू शकत नाही. जमिनीचा विकास करु शकत नाही. शिवाय सदर प्रकरण न्यायालयीन असून त्यावर स्थगिती आहे. सध्या मुंबईतील जागेच्या किंमती बऱ्याच प्रमाणात खाली घसरल्या असून, अजूनही त्यात घसरण होत आहे. अशा परिस्थितीत अतिक्रमित अर्जदाराला सदर जागा वितरीत केल्यास मंडळाचा आर्थिक फायदाच होणार आहे. वरील परिस्थिती पाहता संचालक, नगररचना कार्यालयाने कळविलेला ४० हजार रुपये प्रति चौ.मी. व मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांनी कळविलेला ३३,८९४.०० रु. प्रति चौ.मी. हे दर अवाजवी व अवास्तव वाटतात. अर्जदार संरक्षणप्राप्त अतिक्रमणासह जागा विकत घेण्यास तयार आहे. जागा वितरीत न केल्यास मोकळ्या जागेवरही अतिक्रमणे होऊन कालांतराने सदर जागेस काहीही किंमत मिळणार नाही. त्यात मंडळाचे नुकसान होणार आहे. म्हणून अर्जदाराकडून शासनाने ५०% दंड न घेता सरसकट २० हजार रुपये प्रति. चौ.मी. दर लावण्याचा

निर्णय घेतला आहे. त्याप्रमाणे म्हाडा मुंबई मंडळास कळविण्यात यावे. सर्व जमीन गमविण्यापेक्षा हा उचित निर्णय समाजहिताचा व सरकारच्या हिताचा म्हणून घेतला आहे.

२.७१ सदरहू जमीन म्हाडा विकसित करु शकत नाही असे जे सांगितलेले आहे, ते मान्य आहे काय ? असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी शासनाने म्हाडाला आदेश दिले आहेत. सदरहू जमीन अतिक्रमित केलेली असल्यामुळे आणि त्यांच्याकडे जमिनीचा ताबा असल्यामुळे म्हाडा ती जमीन विकसित करु शकत नाही. परंतु एकूण क्षेत्र ९७८ चौ.मी. असून म्हाडाच्या स्तरावर असा निर्णय घेतला की, ४०,०००/- प्रती चौ.मी. इतका दर आकारण्यात यावा आणि बाकी डी.पी.रोड व इतर जी जागा आहे त्यासाठी आकारावयाचे नाही. परंतु याबाबत विचार करावा लागेल. ही बाब म्हाडाने तपासावयास पाहिजे. त्यावर समितीने विभागीय सचिवांना तशा प्रकारचे संबंधितांना आदेश द्यावेत, असे निदेश दिले.

२.७२ संबंधितांना जी रक्कम भरण्याबाबत सांगण्यात आले होते. त्यासाठी काही कालावधी देण्यात आला होता काय ?  यासाठी वेळेचे बंधन असले पाहिजे व सदरहू रक्कम आजही भरलेली नाही. तसे असेल तर त्या रक्कमेवर व्याज लावले पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, जप्तीची नोटीस लावली होती, पण त्याची म्हाडाकडून पाहणी (सर्व्हे) झालेली नाही. याबाबतीत विभागामध्ये झालेल्या चर्चेमध्ये असे दिसून आले की, याठिकाणी संबंधितांना गरजेपेक्षा जास्त कालावधी देण्यात आलेला आहे. या अगोदर प्रधान सचिव महोदयांनी सांगितल्याप्रमाणे सदरहू जमीन १९४७ मध्ये संपादित केलेली असली तरी ती दलदलीची आहे. परंतु तरी देखील त्याला एफ.एस.आय. वापरता येतो. तसेच तेथील काही जागा डी.पी.रोडमध्ये आणि नाल्यामध्ये गेलेली आहे असे न्यायालयात विधान करण्यात आले होते. त्याकडे लक्ष न देता संपूर्ण जमिनीवर पैसे आकारण्यात येतील. आतापर्यंत पैसे देण्यात आलेले नाहीत, कळविलेल्या रकमेवर व्याज लावून ते वसूल करण्यात येईल आणि रस्त्यावरील क्षेत्राची न कळविलेली निव्वळ रक्कम कळवून वसूल करण्यात येईल.

२.७३ यासाठी बँक दराप्रमाणे व्याज आकारणी करावयास पाहिजे. यासाठी निश्चित कालावधी ठरविला आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधीनी याबाबत न्यायालयाची स्थगिती आहे असे विधान करण्यात आले होते. पण आमच्या अभिलेख्यांमध्ये तसे काही दिसत नाही, असा खुलासा केला.

२.७४ समितीला या विषयाच्या अनुषंगाने माहिती देण्यात यावी जेणेकरुन त्याचा समितीच्या अहवालामध्ये उल्लेख करता येईल. संबंधितांना ज्या कारणासाठी जमीन देण्यात आलेली आहे. ती त्यासाठी वापरली जात नाही. तसेच म्हाडाच्या ५५ मालमत्तेबाबत सांगितले, पण त्यापैकी २५-३० मालमत्तेवर मुंबई, नागपूर, ठाणे इ.ठिकाणी अतिक्रमण करण्यात आलेले आहे. तसेच म्हाडाच्या ताब्यातील जमिनी संरक्षित करण्यासाठी कोणता विचार करण्यात आला आहे ? त्या ठिकाणी संरक्षक कुंपण घालण्यात येणार आहे काय ? पोलीस चौक्या बसविण्यात येणार आहेत काय ? या दृष्टीकोनातून म्हाडाने काही विचार केला आहे काय ? म्हाडा ही स्वायत्त संस्था आहे. त्यांच्याकडे निधी उपलब्ध आहे. त्यामुळे त्यांनी त्यांच्या मालमत्ता सांभाळल्या पाहिजेत आणि त्यासाठी कोणती यंत्रणा आखण्यात येणार आहे ? तसेच पुणे येथे २.५ एफ.एस.आय. देत नाही ? याबाबत समितीने विचारणा केली असता, आता सदरहू बाब शेवटच्या टप्प्यापर्यंत आलेली आहे. म्हणजे आता केवळ सही व्हावयाची आहे, असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

२.७५ मुंबई आणि पुणे येथे म्हाडाच्या एकंदर जमिनी किती आहेत ? त्यापैकी अतिक्रमित जमिनी किती आहेत ? तसेच तेथील जमिनींच्या संरक्षणासाठी कोणती उपाययोजना करण्यात आलेली आहे ? याबाबत म्हाडाने काही धोरण ठरविलेले आहे काय या बाबतची माहिती म्हाडाकडून प्राप्त झालेली माहिती अहवालाच्या शेवटी (**विवरणपत्र क्र.९)** जोडली आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

२.७६ वाल्मिकी आंबेडकर आवास योजना ही केंद्र शासन पुरस्कृत योजना आहे. राज्य शासनाने दिनांक १९ सप्टेंबर, २००२ रोजी शासन निर्णय काढलेला आहे. त्या शासन निर्णयामध्ये या योजनेचे संपूर्ण निकष, लाभार्थ्यांची पात्रता कशी ठरवावयाची, घरांचे क्षेत्र किती असावे, घराचे बांधकाम कसे असावे, पात्रतेसाठी शहरनिहाय समिती असावी यासंदर्भात माहिती दिलेली आहे. म्हाडाला अंमलबजावणी करणारी यंत्रणा (नोडल एजन्सी) म्हणून नामनिर्देशित करण्यात आले होते. सन २००२ ते २००६ या कालावधीमध्ये ही योजना राबविण्यात आली होती आणि दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांची यादी उपलब्ध नसताना लाभार्थी दारिद्र्य रेषेखालील आहे याची खातरजमा न करता ज्या झोपडपट्टीवासियांची नावे सन १९९५ च्या यादीमध्ये आहेत आणि ते झोपडीमध्ये वास्तव्य करीत आहेत अशा दुर्बल झोपडपट्टीवासियांना योजनेचा लाभ द्यावयाचा होता. ज्या शहरांमध्ये ही योजना राबवावयाची होती तेथे पात्रतेचे निकष ठरविण्यासाठी समिती नियुक्त करण्यात आली होती. त्या समितीमध्ये जिल्हाधिकारी,

महानगरपालिका आयुक्त इत्यादींचा समावेश आहे. त्या समितीने लाभार्थ्यांची नावे ठरवून दिलेली आहेत. म्हाडाने अंमलबजावणी संस्था म्हणून घरे बांधलेली आहेत.

२.७७ मुंबई मध्येही दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांची यादी जाहीर झालेली नसताना लाभार्थ्यांची निवड करण्यात आली असून झोपडपट्टीतील लोकांना या योजनेचा लाभ देण्यात आला आहे. दिनांक १.१.१९९५ च्या यादीप्रमाणे जे पात्र लाभार्थी होते त्यांना योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.

२.७८ मुंबईतील पोलीसांना किंवा कंपनीतील कामगारांना राहण्यासाठी घरे नाहीत म्हणून ते झोपडपट्टीमध्ये राहत असले तरी ते दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांमध्ये बसत नाहीत. सन १९९५ चा बेस धरावा असे राज्य शासनाने सांगितले होते. दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांची यादी अंतिम झालेली नसल्यामुळे कोणता निकष लावावा यासंदर्भात विभागाने शासनाकडे विचारणा केली नव्हती. तसेच योजनेची अंमलबजावणी करताना तो दारिद्र्य रेषेखालील आहे किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहे हे शासनाच्या आदेशाप्रमाणे तपासण्यात आलेले नाही.

२.७९ ही योजना राबविल्यामुळे गरिबांना घरे मिळाली. परंतु दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांची यादी अंतिम झालेली नसल्यामुळे कोणता निकष लावावयाचा हे विभागाने शासनाकडून स्पष्ट करुन घेतले नाही, तसेच किती व्यक्ती दारिद्र्य रेषेखालील आहेत व किती अल्प उत्पन्न गटातील आहेत याचा आढावा घेण्यात आला नव्हता केवळ तो झोपडपट्टीमध्ये राहतो म्हणून लाभ दिलेला आहे. लाभार्थी दारिद्र्य रेषेखालील झोपडपट्टी धारक आहे किंवा नाही हे तपासण्यात आलेले नसल्यामुळे कोणत्याही निकषाची पूर्तता न करता योजनेची अंमलबजावणी केलेली असल्याचे विभागीय सचिवांनी मान्य केले असून त्यामध्ये अनियमितता व गैरव्यवहार झाल्याचे नाकारता येणार नाही. **त्यामुळे या संपूर्ण योजनेची चौकशी करुन त्यामध्ये दोषी आढळून आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

२.८० लातूर येथे २,४२९ पात्र लाभार्थ्यांऐवजी १४,४३७ लाभार्थी निवडले गेले एकूण १२,००८ जादा लाभार्थ्यांना सन २००२ ते २००६ दरम्यान पात्रता नसताना घरकुले देण्यात आली. त्यामुळे अपात्र लाभधारकांवर रुपये ४८.०३ कोटी खर्च करण्यात आले. लातूर नगरपालिकेची १९९५ ची मतदार यादी आणि सन १९९१ च्या जनगणनेनुसार झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या रहिवाशांची संख्या ८७ हजार आहे व ही योजना झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या लोकांसाठी व आर्थिक दुर्बल घटकांसाठी होती ? या दोन्ही निकषाचे अनुकरण करावयाचे होते परंतु ज्यांना लाभ देण्यात आलेला आहे ते आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील आहेत किंवा नाही हे कोठेही नमूद करण्यात आलेले नाही. म्हाडा ही अंमलबजावणी करणारी यंत्रणा असली तरी म्हाडाने अंमलबजावणी करताना ही बाब केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या

निदर्शनास आणून द्यावयास पाहिजे होती की, मतदार यादी आहे, पाहणी झालेली आहे, १९९५ पूर्वी झोपडपट्टीमध्ये राहत असल्याचा पुरावा आहे. परंतु, दारिद्रय रेषेखालील आहे किंवा नाही हे कळत नसल्यामुळे म्हाडाने शासनाचे अभिप्राय घेणे आवश्यक आहे. म्हाडाने नवीन जागेवर घरे बांधून दिलेली नाहीत तर म्हाडाने आहे त्याच ठिकाणी घरे बांधलेली आहेत. घराचा ताबा देताना जो करारनामा करण्यात आला त्यामध्ये १० वर्षापर्यंत घर विकता येणार नाही अशी अट आहे.

२.८१ ज्यावेळी झोपडपट्टीची पाहणी केली. त्यावेळी १२,००८ घरे पूर्वी तेथे नव्हती. लातूर येथे २,४२९ पात्र लाभार्थ्यांऐवजी १४,४३७ लाभार्थी निवडले गेले म्हणजे १२,००८ लाभार्थ्यांचा फरक आहे. सन २००६ मध्ये लातूर नगरपालिकेने पत्र दिले की, दिनांक ०१.०१.१९९१ च्या जनगणनेनुसार झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या रहिवाशांची संख्या ८७ हजार आहे. दिनांक ०१.०१.१९९५ रोजीची लातूर शहरातील झोपडपट्टीत राहणाऱ्या कुटुंबियांचा विचार करता १७,४४७ इतक्या सदनिका अपेक्षित होत्या. प्राप्त परिस्थितीमध्ये लातूर नगरपरिषदेकडून १४,४३७ सदनिका बांधण्याचा प्रस्ताव म्हाडाकडे आल्याने १४,४३७ सदनिकांना मंजुरी देण्यात आली. या योजनेतून खरोखर गरीब लोकांना घरे मिळालेली आहेत त्यांच्या झोपडीचे म्हाडाने फोटो काढलेले आहेत. लातूर नगरपरिषदेकडून १४,४३७ इतक्या सदनिका बांधण्याचा प्रस्ताव म्हाडाकडे आल्याने एवढ्या सदनिकांना मंजुरी दिली. ती चुकीची झालेली आहे. पहिल्या टप्प्यामध्ये १२५ घरे, दुसऱ्या टप्प्यामध्ये २८७ घरे आणि तिसऱ्या टप्प्यामध्ये १२ हजार घरे अशा तीन टप्प्यात ही योजना राबविण्यात आलेली आहे. ही योजना पाहणी करुन राबविण्यात आलेली आहे.

२.८२ केंद्र शासनाचे निकष का बदलण्यात आले नाहीत व त्यासाठी शासनाने परवानगी का दिली नाही. केंद्र शासनाच्या नगर विकास विभागाने मूळ मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. शासन निर्णय काढतांना त्यातील तरतूदी कडक केलेल्या आहेत. In the guidelines, the persons belonging to BPL category, including the members of the weaker sections were to be beneficiaries. Preference was to be given to the BPL. दारिद्र्य रेषेच्या खालील लोकांना घरे उपलब्ध करुन देण्यात यावी असे केंद्र शासनाचे धोरण नव्हते. या योजनेची अंमलबजावणी करतांना समितीने सुचविले होते की, झोपडपट्टीत जे लोक राहतात, जे लोक गरीब आहेत, ज्यांना घरे नाहीत त्यांना घरे उपलब्ध करुन देण्यात यावीत असे सुचविल्याप्रमाणे त्यास मान्यता देण्यात आलेली आहे. लातूर नगरपरिषदेकडून १४४३७ सदनिका बांधण्याच्या प्राप्त झालेल्या प्रस्तावाची कोणतीही सखोल तपासणी न करता सरसकट सर्वांना घरकुल योजनेचा लाभ देण्यात आला. **लातूर येथे म्हाडाने राबविलेली घरकुल योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे राबविण्यात आली नसून योजनेचे निकष सोयीनुसार बदलण्यात आले. याबाबत योग्य ती चौकशी करुन कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

२.८३ लाभधारकांना जमिनीचा भाडेपट्टा करुन दिल्याशिवाय जागेची मालकी लाभार्थ्यांच्या नावावर करता येत नाही, तसेच घरे लाभार्थ्यांच्या नावावर करुन देण्याच्या संदर्भात केंद्र शासनाच्या अटींचे उल्लंघन झाले आहे. हे पट्टे ३० वर्षाचे होते. झोपडपट्टीच्या जागेवरच ही घरे बांधण्यात आलेली आहेत. शासकीय किंवा निमशासकीय जमीन असेल तरच शासन भाडेपट्टयाने जमीन देऊ शकतो. सदर पट्टे सहकारी सोसायटीलाच देऊ शकतो. घरकुले बांधून झाल्यानंतर लाभधारकांना वाटप, संमती पत्र देऊन त्यांना हक्काची घरे देण्यात आलेली आहेत.

२.८४ लाभार्थ्यांच्या नावाने भाडेपट्टा यापूर्वीच व्हावयास पाहिजे होता. मालकी झाल्यानंतरच अध्यक्ष निवडला जात असतो व त्यानंतरच खरेदी विक्रीचे व्यवहार होत असतात. यामध्ये सोसायटीच स्थापन झाली नसेल तर अनेक प्रश्न निर्माण होत असतात. ज्या लाभार्थ्याला सदनिका मिळालेली आहे व ती सदनिका त्याने विकावयाची ठरवली, तर विक्रीच्या संदर्भात विभागाची त्या सदनिका धारकाला परवानगी घ्यावीच लागत असते. (Power of attorney) लाभार्थ्यांला १० वर्षे तरी सदनिका विकता येणार नाही अशी अट होती. तरीसुद्धा मुखत्यारनामाने घरे विकली गेली. परंतु महत्वाची समस्या ही भाडेपट्टयाची आहे. ज्या जमिनीवर झोपडपट्टी आहे अशा जमिनी ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने देता आली नसती. त्यामुळे वाल्मिकी आंबेडकर आवास या योजनेद्वारे त्यांना लाभ देण्यात आला आहे.

२.८५ म्हाडा केवळ घरे बांधण्याचे काम करते परंतु सोसायटी बनवून देण्याचे काम करीत नाही. म्हाडाने सोसायटी बनवून ती लाभार्थ्यांच्या ताब्यात दिली पाहिजे. म्हाडा केवळ बांधकाम करते परंतु पुढची कोणतीही जबाबदारी स्विकारीत नाही. लाभार्थ्यांना घराचा ताबा मिळाल्यानंतर ते घर त्याला १० वर्षे तरी विकता येणार नाही अशी अट घालून दिलेली आहे. लाभार्थ्यांना वैयक्तिक वाटप पत्र दिलेली आहेत असे असले तरी सदर सदनिका लाभार्थ्याला सदनिका विकता येणार नाही, हस्तांतरीत करता येणार नाही किंवा भाड्याने देता येणार नाही अशा अटी घालून दिलेल्या आहेत परंतु यासंदर्भातील कालावधी घालून देण्यात आलेला नाही. त्यामुळे या योजनेचा गरजूना खरोखरच फायदा झाला आहे काय याबाबत समितीस शंका वाटते. तसेच ज्या अटी घालण्यात येतात त्या स्वयंस्पष्ट असाव्यात त्यामध्ये कोणतीही त्रुटी वा पळवाटा असू नयेत असे समितीचे स्पष्ट मत आहे सबब, **किती लाभार्थ्यांनी वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेंतर्गत सदनिका विकल्या आहेत व या योजनेमध्ये किती लोक अनौपचारिकरित्या वास्तव्य करीत असल्याचे आढळून आले आहे व अशा लोकांवर म्हाडाने कोणती कारवाई केली याची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी, अशी शिफारस समिती करीत आहे.**

२.८६ वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेअंतर्गत केंद्र व राज्य सरकारकडून प्राप्त झालेल्या अनुदानापैकी म्हाडाकडे ६.८७ कोटी इतकी रक्कम शिल्लक आहे, तसेच १०८ कोटी रुपये निधी लेख्यामध्ये आहेत. म्हाडाने हे पैसे शासनास परत करावयास पाहिजेत. परंतु, म्हाडाला शासनाकडून

३०० कोटी रुपये येणे असून त्यापैकी आतापर्यंत शासनाकडून २१५ कोटी रुपये मिळालेले आहेत. उर्वरित रक्कमेचे व्याज धरुन शासनाकडून म्हाडाला अद्यापही ४७० कोटी रुपये येणे बाकी आहे. **बऱ्याच ठिकाणी महानगरपालिकेचे, नगरपालिकेचे शासनास पैसे येणे बाकी असतात तसेच शासनाचे सुद्धा महानगरपालिकेस, नगरपालिकेस पैसे देणे बाकी असतात. परस्पर निर्णय घेऊन अशा प्रकारे काम केले जाते. त्यामुळे राज्यातील महानगरपालिका/नगरपालिकांनी शासनास व शासनाने या संस्थांना किती रक्कम समायोजित करावयाची व याबाबत काय कार्यवाही करण्यात येते याची सविस्तर माहिती समितीला देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

२.८७ उपयोगिता प्रमाणपत्रामध्ये खर्च दाखविलेली रक्कम रुपये ४.८६ कोटी ठेव ठेवण्यात आली होती. परंतु सदर रक्कमेपैकी रु.४.७२ कोटी रक्कम तद्‌नंतर योजनेच्या कामी खर्च करण्यात आली आहे. महालेखापालाच्या म्हणण्यानुसार या रकमेचा उपयोग करुन त्यानुसार प्रमाणपत्र द्यावयास पाहिजे होते. परंतु, तसे करण्यात आलेले नाही. त्यामुळे महालेखाकारांनी पैसे खर्च करण्याअगोदर उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्याचा आक्षेप घेतला आहे. **निधी खर्च करण्यापूर्वी उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे हे नियमबाह्य असून यापुढील काळात अशा नियमबाह्य गोष्टी घडणार नाहीत याची दक्षता घ्यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

२.८८ यशदाच्या अहवालात २५ मुद्यांच्या बाबतीत माहिती देण्यात आलेली आहे. यशदाचा अहवाल म्हाडाच्या मुख्य अभियंत्याकडे मार्च २००७ मध्ये आला होता. हा अहवाल शासनाकडे, लोकलेखा समितीकडे तसेच महालेखापालांकडे पाठविला गेला नाही. सदर अहवाल म्हाडाला सादर झाला आहे, असे असता ही सदर अहवाल महालेखाकार व लोकलेखा समितीकडे का पाठविला नाही. यशदाचा अहवाल समितीसमोर असता तर त्यातील शिफारशींवर बरीच चर्चा करता आली असती. सदरचा अहवाल म्हाडाकडून महालेखाकार आणि लोकलेखा समितीकडे न पाठविणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून योग्य ती कारवाई केली गेली पाहिजे अशी समितीचे स्पष्ट मत आहे कारण, **यशदाने म्हाडाला सादर केलेला अहवाल वस्तुस्थितीवर आधारीत असल्याने सदर अहवाल म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी तसाच दाबून ठेवला अशी शंका घेण्यास वाव असल्याचे समितीचे स्पष्ट मत झाले आहे. म्हाडाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी केलेल्या या कृतीबद्दल समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. सबब, सदर अहवालाबाबतची वस्तुस्थिती काय आहे ती पडताळून पाहण्याचे समितीस आश्वासित करुनही विभागाने अद्याप कार्यवाही केल्याचे तसेच जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांच्याविरुद्ध कारवाई केल्याचे समितीस कळविण्यात आलेले नाही. त्यामुळे समितीस आश्वासित केलेली माहिती तात्काळ देण्यात यावी व याप्रकरणी जे अधिकारी दोषी आहेत त्यांची चौकशी करुन चौकशीत दोषी आढळून आलेल्या अधिकाऱ्याविरुद्ध योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

२.८९ विलेपार्ले येथील म्हाडाच्या भूखंडावर ज्या व्यक्तीने अतिक्रमण केले आहे त्याचे नाव श्री. भास्कर बोधा सनील असे आहे. त्याने विलेपार्ले येथील म्हाडाच्या ९७८ चौरस मीटर जागेवर अतिक्रमण केलेले आहे. सदर अतिक्रमण संरक्षणपात्र असल्यामुळे मुंबई मंडळ सदर अतिक्रमण काढू शकले नाही. सदर जागा अतिक्रमित केलेली असल्याने शासनाने म्हाडा अधिनियम १९७६ खालील नियम १९८२ चे विनियम १६ नुसार वितरित करण्याचे आदेश दिले. प्राधिकरणाच्या धोरणाप्रमाणे सदरहू जागेची किंमत ३३ हजार ८९७ रुपये चौरस मीटर अशी दर्शविण्यात आली होती. शासनाने आदेश दिल्याप्रमाणे जागेची किंमत काय असावी अशी माहिती घेतली असता नगररचना कार्यालयाने (टाऊन प्लॅनिंगने) प्रति चौरस फूट ४० हजार रुपये असा दर निश्चित केला आहे. सदर अतिक्रमण १९९५ पूर्वीचे आहे. मूळ भूखंड १९६४ मधील आहे. त्यावेळी पुष्कळ भूखंड म्हाडाकडे आले. त्यातील हा एक भूखंड आहे. म्हाडाच्या भूखंडाचे संरक्षण व्हावे म्हणून एजन्सी नेमली आहे. त्याचप्रमाणे अतिक्रमण हटविण्यासाठी एक पथक देखील तयार केलेले आहे. परंतु त्यांच्याकडून कोणतीही कारवाई केली जात नाही.

२.९० सदर जागेसंदर्भात ५० टक्के दंडनीय शुल्क न आकारता सरसकट २० हजार रुपये चौरस फुट या दराने सदरची जागा अतिक्रमणधारकास देण्यासंबंधी म्हाडास शासनाकडून आदेशित केले गेले. त्यानंतर म्हाडाने ९७८ चौरस मीटरच्या भूखंडाची २ कोटी २० लाख ५८० रुपये एवढी आकारणी केली व सदरहू रक्कमेचा भरणा करावा असे मे.भास्कर ऑटो गॅरेजच्या मालकास १९९९ मध्ये कळविण्यात आले. त्यानंतर भास्कर ऑटो गॅरेजच्या मालकाने १० लाख रुपये भरले. उर्वरित रक्कम अजून त्यांनी भरलेली नाही. त्यानंतर म्हाडाने जप्तीच्या कार्यवाहीस सुरुवात केल्यानंतर सदरहू गॅरेजचा मालक उच्च न्यायालयात गेला आहे.

२.९१ म्हाडाचे अधिकारी, अशा पध्दतीने आपल्या मालकीचे असलेले म्हाडाचे भूखंड श्रीमंत माणसांच्या घशात घालत आहेत. असे प्रकार थांबले पाहिजेत. असे समितीला वाटते. तसेच सदरहू क्षेत्रासाठी संचालक, नगररचना यांनी ४०,०००/- रुपये प्रति चौ.मी. असे मुल्यमापन करुन दर कळविला होता. परंतु प्रत्यक्षात २०,०००/- प्रति चौ.मी. दर आकारण्यात आलेला आहे. याबाबतीत शासन स्तरावर म्हणजे मा.गृहनिर्माण मंत्री महोदयांनी निर्णय दिला आहे. नगररचना विभागाच्या (टाऊन प्लॅनिंगच्या) नियमाप्रमाणे जेव्हा जमीन देण्याचा निर्णय घेतला जातो, त्यावेळी ते म्हाडाच्या नियमाप्रमाणे व्हावयास पाहिजे परंतु तसे झालेले नाही. अर्जदाराच्या ताब्यात असलेल्या ९७८ चौ.मी. क्षेत्रापैकी ३०० चौ.मी. क्षेत्रावर बांधकाम असून ते संरक्षण पात्र आहे व अर्जदारांकडून ५० टक्के दंड न घेता सरसकट (नेट) रु. २०,००० प्रति चौ.मी. क्षेत्रासाठी दर आकारण्यात आलेला असून तो योग्य नसल्याचे समितीचे मत आहे.

२.९२ उक्त प्रकरणी जप्तीची कार्यवाही म्हाडाकडून वेळेवर झाली नाही. जप्तीची कार्यवाही वेळीच झाली असती तर प्रकरण न्यायालयात जाण्याचा प्रश्नच आला नसता. सन २००३ मध्ये जप्तीची कार्यवाही सुरु केली. त्यानंतर सदर प्रकरण उच्च न्यायालयात दाखल केले गेले. सदर जागेत काही नाल्याचा भाग आहे व डी.पी.प्लॅन प्रमाणे काही जागा रस्त्यामुळे बाधीत होत होती. डी.पी.प्लॅन प्रमाणे या जागेवरील काही भाग बाधीत होत असला तरी त्याचे क्षेत्रासहित सुमारे ४६३.९० चौरस मीटर जागेचे ऑफर लेटर अतिक्रमणधारकास देण्यात आले. ४६३.९० चौरस मीटर जागा २० हजार रुपये प्रति चौरस फुट या दराने साधारणत: १ कोटी ४ लाख रुपये भरण्याबाबत अतिक्रमणधारकास कळविण्यात आले. अतिक्रमणधारकाकडून एकूण ३४ लाख रुपयांचे येणे होते, त्यातील रु.२७ लाख त्यांनी भरली आहे. आता त्या ठिकाणी गॅरेज आहे. सदर भूखंडावरील अतिक्रमण हे सन १९९५ पूर्वीचे असून ९७८ चौ.मी. म्हणजे अंदाजे १०,५०० चौ.फुट असलेला हा भूखंड निश्चितच लहान नाही. म्हाडाने त्यांच्या भूखंडाचे संरक्षण करण्याकरिता एजन्सी नेमली. तसेच या कामाकरिता त्यांचे मिळकत व्यवस्थापन कार्यरत होते. या अतिक्रमण होते संशयास वाव राहतो. अतिक्रमण झालेले आहे हे कळल्यावर देखिल ५-५ वर्ष जप्तीची कार्यवाही करण्यात येत नाही. यावरुन म्हाडाच्या कारभाराविषयी शंकाच उद्‌भवते. **विलेपार्ले येथिल म्हाडाच्या जागेबाबत कोणता निर्णय घेतला आहे व त्याची सद्य:स्थिती समितीला कळविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे. तसेच म्हाडाचे मुंबई शहर व उपनगरात कोणकोणत्या ठिकाणी किती भूखंड मोकळे आहेत व ते भूखंड अद्याप कोणत्या कारणाकरिता वितरीत झालेले नाहीत किंवा मोकळे राहिलेले आहेत. तसेच या मोकळ्या भूखंडावर अतिक्रमण होणार नाही किंवा या मोकळ्या भूखंडाचा गैरवापर होत नाही. या दृष्टीने म्हाडाने कोणत्या उपाययोजना केलेल्या आहेत. याची भूखंडनिहाय तपशिलवार माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

२.९३ अतिक्रमित जमीन दलदलीची व बाजूस नाला असल्यामुळे म्हाडा विकसित करु शकले नाही असा मा.मंत्री महोदयांचा निर्णय असेल तर अतिक्रमित जमीन संरक्षणपात्र कशी होवू शकते. शिवाय सदर निर्णयामुळे आजही मुंबई मंडळ सदर अतिक्रमण काढू शकत नाही वा जमिनीचा विकास करु शकत नाही. तसेच सदर प्रकरण न्यायालयीन असल्याने त्यावर स्थगिती आहे. संचालक, नगररचना कार्यालयाने कळविलेला ४० हजार रुपये प्रति चौ.मी. व मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांनी कळविलेला ३३,८९४.०० रु.प्रति चौ.मी. हे दर वाजवी आहेत. जागा वितरीत न करता न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी व मोकळ्या जागेचे संरक्षण म्हाडाने करावे तसेच या प्रकरणी शासनाने म्हाडाला आदेश दिले आहेत की, सदरहू जमीन अतिक्रमित केलेली असल्यामुळे आणि त्यांच्याकडे जमिनीचा ताबा असल्यामुळे म्हाडा ती जमीन विकसित करु शकत नाही. परंतु एकूण क्षेत्र ९७८ चौ.मी. असून म्हाडाच्या स्तरावर असा निर्णय घेतला की, ४०,०००/- प्रती चौ.मी. इतका दर आकारण्यात यावा

आणि बाकी डी.पी.रोड व इतर जी जागा आहे त्यासाठी हा दर आकारावयाचा नाही. परंतु याबाबत म्हाडाने विचार करावा. विभागीय सचिवांनी तशा प्रकारचे संबंधितांना आदेश द्यावेत, कारण यामध्ये मंडळाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे ते टाळण्यासाठी मंडळाने आवश्यक ती कार्यवाही करावी, तसेच यासाठी वेळेचे बंधन असले पाहिजे व सदरहू रक्कम आजही भरलेली नाही. त्यावर व्याज लावले पाहिजे. जप्तीची नोटीस लावली होती, पण त्याची म्हाडाकडून पाहणीझालेली नाही. संबंधितांना गरजेपेक्षा जास्त कालावधी देण्यात आलेला आहे. **याबाबत न्यायालयाची स्थगिती आहे असे विधान करण्यात आले होते. परंतु शासनाच्या अभिलेख्यात तसे काही नाही, त्यामुळे समितीला या विषयाच्या अनुषंगाने माहिती देण्याचे आश्वासित करुनही समितीस अद्याप माहिती प्राप्त झालेली नाही. या प्रकरणी शासनाने तातडीने कार्यवाही करुन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी व या प्रकरणाची संपूर्ण माहिती व सद्य:स्थिती समितीला देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

२.९४ राज्यात म्हाडाच्या जागेवर लोकांनी अतिक्रमण केलेले आहे, त्यांना वारंवार नोटीसा देणे, त्यानंतर पुढील कार्यवाही करणे यासंबंधी म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी लक्ष ठेवावयास पाहिजे. ज्या ठिकाणी म्हाडाच्या जागा आहेत, तेथे मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले आहे, त्या जागा खाली करुन घेण्यासंदर्भात म्हाडाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष जागांना भेटी दिल्या पाहिजेत. या ठिकाणी म्हाडाचे खुले भूखंड असतील तेथे कुंपणे घातली पाहिजेत. तशा प्रकारची कार्यवाही कोठेही केलेली दिसून येत नाही. म्हाडाचेच अधिकारी हा भूखंड म्हाडाचा आहे. या भूखंडावर अतिक्रमण करुन तेथे गॅरेज टाका अथवा अन्यत्र बांधकाम करा असे सांगतात. त्या भुखंडावर अतिक्रमण झाल्यानंतर अतिक्रमण करणाऱ्या व्यक्ती वीज जोडणी उपलब्ध करुन घेतात. दुकानाचा परवाना त्या भूखंडावर मिळवून घेतात व तद्‌नंतर म्हाडाची कार्यवाही सुरु होते. त्यानंतर त्या व्यक्ती न्यायालयात जातात. तशी प्रकरणे न्यायालयात गेल्यानंतर म्हाडाला अतिक्रमणे हटविता येत नाहीत. म्हाडाने आपले भूखंड जपून ठेवावयास पाहिजेत, कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण होणार नाही, यासाठी दक्षता घेतली पाहिजे. बहुतांशी भूखंड कमाल जमीन धारणा मधून म्हाडाला मिळालेले आहेत. सदरचे भूखंड एका धनदांडग्यांच्या नावे घेऊन दुसऱ्या धनदांडग्यास देण्याचे प्रकार म्हाडाच्या अधिकाऱ्यांकडून होत आहेत ही अतिशय गंभीर बाब आहे. मुंबईमध्ये म्हाडाच्या साधारणत: ५५ भूखंडावर अतिक्रमण झालेले आहे. यासंबंधीची माहिती तयार केलेली आहे. सदरहू माहिती समितीला नंतर सादर करण्याचे आश्वासित केल्यानुसार माहिती प्राप्त झाली असली तरी सदर माहिती परिपूर्ण नाही. अतिक्रमित व्यक्तीवर केलेली कारवाई जुनी असून म्हाडा प्रशासनाने पाठपुरावा केलेला नाही. त्यामूळे **सदरहू अतिक्रमणास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व या अतिक्रमित भूखंडाच्या सद्य:स्थितीसह सविस्तर माहिती तातडीने समितीला पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

२.९५ संबंधितांना ज्या कारणासाठी जमीन देण्यात आलेली आहे. ती त्यासाठी वापरली जात नाही. तसेच म्हाडाच्या ५५ मालमत्तांपैकी २५-३० मालमत्तेवर मुंबई, नागपूर, ठाणे इ. ठिकाणी अतिक्रमण

करण्यात आलेले आहे. तसेच **म्हाडाच्या ताब्यातील जमिनी संरक्षित करण्यासाठी कोणता विचार करण्यात आला आहे. त्या ठिकाणी संरक्षक कुंपण घालून त्याठिकाणी पोलीस चौक्या बसविण्याच्या दृष्टीकोनातून म्हाडाने अद्यापपर्यंत काही विचार केलेला नाही. वास्तविक पहाता म्हाडा ही स्वायत्त संस्था आहे. त्यांच्याकडे निधी उपलब्ध असतो त्यामुळे त्यांनी त्यांच्या मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी कोणती यंत्रणा आखण्यात येणार आहे, याची माहिती समितीस तातडीने देण्यात यावी तसेच मुंबई, नागपूर, ठाणे व पुणे येथे जमिनीच्या वाढणाऱ्या किंमती लक्षात घेता म्हाडाच्या भूखंडावर म्हाडाचे अधिकारी अतिक्रमण करण्यास प्रोत्साहन देतात त्यामुळे म्हाडाच्या अतिक्रमित जमिनींच्या संरक्षणासाठी धोरण ठरवून त्याची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

# रोजगार व स्वयंरोजगार विभाग

## ३. महाराष्ट्रातील सेवायोजन विनिमयाचे संगणकीकरण-

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालामधील परिच्छेद क्र.३.३ "महाराष्ट्रातील सेवायोजन विनिमयाचे संगणकीकरण" या संदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

**परिच्छेद क्र.३.३.६ प्रकल्पाचे नियोजन आणि अंमलबजावणी**

**ओरॅकल आणि डी बी २ अंतर्गत आधार सामुग्री समूह वापराचा अपूर्ण विकास**

**३.१** सन १९९७-९८ आणि सन १९९८-९९ मध्ये ३६ युनिट्समध्ये अंमलात आणलेला (खर्च रु.२.०६ कोटी) ओरॅकल आधारीत वापर आधार सामुग्री समूह अंमलात आणून अर्धवट सोडून देण्यात आला. कारण आकडेवारी व्यवस्था व सादरीकरण व्यवस्था विकसित करण्यात आल्या नव्हत्या. नवीन डीबी २ आधारीत रोजगार मित्र वापर आधार सामुग्री समूहाकडे जाताना आकडेवारी अहवाल निर्माण न करण्याच्या जुन्या वापर आधार सामुग्री समुहाच्या कमतरता नवीन समूहामध्ये तशाच चालू राहिल्या. हा वापर आधार सामुग्री समूह ऑक्टोबर २००३ ते जुलै २००५ दरम्यान सर्व ४५ युनीट्स मध्ये अंमलात आणला (खर्च-संगणक सामुग्रीसाठी रु.२.७६ कोटी). जरी ""रोजगार मित्र" ही व्यवस्था डिसेंबर २००४ पर्यंत पूर्ण व्हावयाची होती तरी रोजगार वाहिनी व्यवस्था-वेब साईट, रोजगार मित्र-स्वयं रोजगार व्यवस्था, रोजगार मित्र-वेब व्हर्जन व्यवस्था, नोकरीविषयक आकडेवारी आणि बाजारांतील मालकांची माहिती व्यवस्था मे २००६ पर्यंत अद्याप विकसित होत होत्या, असे लक्षात आले की, सामंजस्य करारामध्ये (MOU)[33] ह्या बाबी पूर्ण होण्यास विलंब लागल्यास नुकसान भरपाई मागण्याचे कलम नव्हते.

याप्रमाणे ही सेवायोजन विनिमये हाती केलेल्या संकलनावर अवलंबून राहिल्याने संगणकीकरणाचे उद्दिष्ट साध्य झाले नाही. याबाबतीत आयुक्तांनी असे म्हटले की, (जून २००६) आराखड्यानुसार रोजगार वाहिनी वेबसाईटचे काम प्राधान्याने हाती घेतल्यामुळे नोंदणी व सादरीकरण या व्यवस्थेच्या विकासाला विलंब झाला आणि नोकरीविषयक आकडेवारी आणि बाजारातील मालकांची माहिती व्यवस्था पूर्ण होऊ शकल्या नाहीत. ह्या वापर साधन सामुग्री समुहाच्या विकासास लागलेला विलंब आणि सामंजस्य करारामध्ये दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे न गेल्यामुळे ह्या व्यवस्थेसाठी खरेदी केलेल्या संगणक सामुग्रीचा पूर्णपणे वापर होऊ शकला नाही.

**३.२ ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे. ओरॅकलमधील इइसी सॉफ्टवेअरसाठी फक्त सांख्यिकी व पाठवणीचे भाग विकसित करण्यात आले नव्हते हे खरे आहे. एन आय सी पुणे हे दोन्ही भाग विकसित करीत होते, परंतु दरम्यानच्या काळात माहिती तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी ओरॅकलमधून डीबी२ आरडीबीएमएस मध्ये जाण्याचा निर्णय घेतला. म्हणून ओरॅकल आधारभूत आज्ञावल्यांच्या विकसनाचे काम थांबविले. हा बदलाचा निर्णय माहिती तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या स्तरावर घेवून त्याचे विभागाने पालन केले आहे.

असे असले, तरीही नोंदणी, अपडेशन, नुतनीकरण व व्यपगत हे भाग ओरॅकलमध्ये विकसित केले होते आणि या भागाद्वारे दैनंदिन कामकाज करण्यात येत होते.

सन १९९७-९८ व १९९८-९९ या आर्थिक वर्षात ओरॅकल आधारीत ईईसी आज्ञावल्यांच्या अंमलबजावणीसाठी खरेदी करण्यात आलेल्या रुपये २.०६ कोटी रकमेच्या साधनसामुग्रीचा दैनंदिन कामकाजासाठी, बॅकलॉग डाटा एन्ट्रीसाठी आणि ओरॅकलमधील डाटाचे डीबी२ मध्ये रुपांतरण करण्यासाठी जून, २००६ पर्यंत पूर्णपणे उपयोग करण्यात आलेला आहे. ओरॅकलमधील ईईसी आज्ञावल्यांमुळे ३६ कार्यालयांतील महत्त्वाच्या आणि मोठ्या नोंदणीपटाचा संगणकीकृत डाटाबेस तयार करणे शक्य झालेले आहे. येथे प्रकर्षाने लक्षात घ्यावयाची बाब अशी की, ओरॅकल आधारभूत ईईसी सॉफ्टवेअरच्या विकसनासाठी खर्च झालेला नाही.

सन १९९७-९८ व १९९८-९९ मध्ये खरेदी करण्यात आलेले सर्व्हर्स अद्यापही वापरात असून सुस्थितीत ठेवण्यात आलेले आहेत. प्रिंटर्स, डेस्कटॉप पीसीजदेखील अद्याप वापरात आहेत.

महाराष्ट्र शासनास, डम्ब टर्मिनल प्रकारच्या होस्ट सेंट्रीक ॲप्लिकेशन एन्व्हॉर्यमेंट मधून नवीन क्लाएंट सर्व्हर/वेब टेक्नॉलॉजी प्रकारच्या ग्रफिकल युजर्स एन्टरफेससह असणाऱ्या एन्व्हॉयरमेटमध्ये स्थलांतरीत व्हावयाचे असल्याने, सचिव, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र शासन यांनी महाराष्ट्र शासनाचे सर्व आज्ञावल्या विकसन हे क्लायंट-सर्व्हर किंवा वेब बेस्ड प्रकारचे करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. सचिव, माहिती तंत्रज्ञान यांनी महाराष्ट्र शासनाच्या सर्व विभागांनी संगणक विकसनासाठी डीबी२ डाटाबेसच उपयोगात आणण्यासाठीची शिफारस केली जेणेकरुन सर्व विभागांच्या डाटाची खात्यांतर्गत ॲप्लिकेशनमध्ये देवाणघेवाण करणे शक्य होईल. माहिती तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी डीबी२ ची लायसन्सेस सर्व विभागांना उपलब्ध करुन दिली.

रोजगार व स्वयंरोजगार विभाग, महाराष्ट्र शासन लोकांकरिता वेब बेस्ड पोर्टल ॲप्लिकेशन विकसित करु इच्छित होता. सर्व कार्यालयांतील नोंदणीपट, वेब पोर्टलवर उपलब्ध करुन देणे असे नियोजन होते. तथापि, ओरॅकलमधील ॲप्लिकेशनची रचना फॉर्म्समध्ये नसल्याने सर्व कार्यालयातील डाटा एका सर्व्हरवर संकलित करण्यासारखा नव्हता. ओरॅकलमधील ॲप्लिकेशनचे विकसन करतेवेळी या बाबीचा विचार केलेला नव्हता.

जुन्या सॉफ्टवेअरमधील त्रुटी नवीन डीबी२ आधारभूत सॉफ्टवेअरमध्ये कायम आहेत हे खरे नाही. एनआयसी पुणे यांनी रोजगार मित्र सॉफ्टवेअर विकसित करताना जवळपास सर्व त्रुटींचे निराकरण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. माहिती तंत्रज्ञान लेखा परिक्षण पथकास सापडलेल्या अतार्किक व असंबंधित त्रुटी या ओरॅकलमधील डाटाबेसशी संबंधित आहेत, जो ओरॅकलमधून डीबी२ मध्ये रुपांतरीत केलेला आहे. ओरॅकलमधील ईईसी सॉफ्टवेअरमध्ये अनुसमर्थन तपासणी व नियंत्रण (व्हॅलिडीटी चेक्स व कन्ट्रोल्स) दिलेले नव्हते. तार्किक त्रुटी व अनुसमर्थन तपासणी (व्हॅलिडिटी चेक्स) जे ओरॅकल आधारीत आज्ञावल्यांत नव्हते, ते डीबी२ आधारीत आज्ञावल्यात मोठ्या प्रमाणात दुरुस्त केले गेले आहेत.

**<u>पद्धती विकासावरील दस्तऐवजाचा अभाव</u>**

३.३ असे लक्षांत आले की, वापर साधन सामुग्री समुहाचा विकास वाढवणे/भर घालणे या तत्त्वावर करण्यात आला आणि पद्धतीस आवश्यक असलेल्या बाबीचा तपशीलवार आराखडा बनविण्यात आला नव्हता. वापरकर्त्याच्या गरजांप्रमाणे आवश्यक असलेल्या बाबीचा मसूदा तयार करण्यात आला नव्हता. शिवाय संचालनालयाकडे प्रक्रिया प्रवाहाबाबतीत तांत्रिक दस्तऐवज, माहिती प्रवाह, माहिती शब्दकोश, एकत्रित माहिती रुपरेषा आणि संकेत करार उपलब्ध नव्हते. पुरेशा दस्तऐवजाच्या अभावामुळे प्रक्रिया विकसनावर योग्य त्या नियंत्रणाचा अभाव होता आणि गैरवाजवी विलंब होत होता.

**<u>ज्ञापन :</u>**

**३.४** महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे. विभागाने एनआयसी, पुणे यांच्याशी एमओए स्वाक्षरित केला होता, ज्यामध्ये सॉफ्टवेअरच्या विकसनाचे योग्य नियोजन केले गेले आहे, त्यामुळे पुरेशा दस्तऐवजाच्या अभावामुळे विकसन कार्यपद्धतीवर योग्य त्या नियंत्रणाचा अभाव व गैरवाजवी विलंब या गोष्टी उद्‌भवल्याचे खरे नाही. एनआयसी, पुणे यांना सॉफ्टवेअर विकसन व अंमलबजावणीत मदत करण्यासाठी पूर्वीच्या सॉफ्टवेअरच ज्ञान असलेल्या सदस्यांचा गाभा गट तयार करण्यात आला होता. या

सॉफ्टवेअरच्या विकसन आणि अंमलबजावणी करिता प्रधान सचिव व आयुक्त यांनी अनेक वेळा चर्चा केलेली होती.

सेवायोजन विनिमय केंद्रांचे संगणकीकरण ओरॅकल आधारित इइसी सॉफ्टवेअरद्वारे अगोदरच सुरु झाले होते, त्यामुळे विभागाने युआरएस तयार करण्याबाबत एनआयसी, पुणे यांच्यावर अधिक दबाव आणला नाही. तथापि, एनआयसीने एसआरएस तयार केला होता, परंतु विभागाने सॉफ्टवेअरमध्ये अनेकवेळा दुरुस्त्या सुचविल्याने आणि एनआयसीकडे असलेल्या मनुष्यबळ कमतरतेमुळे एसआरएस अद्यावत करावयाचा राहिला.

विकसनानंतर एनआयसीने पुढील कागदपत्रे संचालनालयास दिलेली आहेत.

१ वापरकर्त्यांचे पुस्तक (User Manual) (व्यवस्थापक २.०, मुख्य २.०, सेवायोजन बाजार माहिती २.०).

२ सेवायोजन विनिमय केंद्राचे संगणकीकरण मागणी विश्लेषण (Requirement Analysis for Employment Exchange Computerization).

३ रोजगार मित्र/रोजगार वाहिनीसाठी डाटाबेस रुपरेषा (Data base scheme for Rojgar Mitra/Rojgar Wahini).

४ मुख्य आणि विनियम फाईल्ससाठी टेबल रचना.

५ विकसित केलेल्या अहवालांची यादी.

डाटा प्रवाह आकृत्यांची (Data flow diagram) तातडीची गरज नाही. एनआयसी, पुणे यांनी त्या पुरविलेल्या नाहीत. परंतु ही कागदपत्रे आम्ही प्राप्त करुन घेवू.

**निविष्ट नियंत्रणे**

३.५ उमेदवारांच्या नोंदणीच्या आधार माहितीचे विश्लेषण केले असता असे आढळले की, निविष्ट नियंत्रणे पुरविण्यात आली नव्हती आणि वापर आधार सामुग्री समुहात अचूकता तपासणी यंत्रणेचीसुद्धा अंतर्गत बांधणी करण्यात आली नव्हती. सेवायोजन विनिमयांच्या चाचणी तपासणीत ११.२७ लाख केलेल्या नोंदीमधील उणिवा व विसंगती खाली दर्शविलेल्या निविष्ट नियंत्रणातील आणि अचूकता तपासणीतील कमतरता दिसून येतात.

**अनेक नोंदणी क्रमांक देणे**

७१२९ प्रकरणांमध्ये ३५२७ उमेदवारांना दोनदा/अनेकदा चुकीचे नोंदणी क्रमांक देण्यात आले. परिणामतः नोंदणी केलेली सदस्य संख्या फुगीर ठरली. ह्याचा परिणाम दोनदा नोंदणी क्रमांक

मिळालेल्या उमेदवारांना नियोक्त्यांकडे त्यांची नावे पाठविताना गैरवाजवी फायदा मिळण्याची शक्यता होती.

ही वस्तुस्थिती संचालनालयाने शेवटच्या परिषदेत स्विकारली (जून २००६) आणि NIC ची मदत घेऊन पद्धतीमध्ये अचूकता आणण्याचे आश्वासन दिले.

**<u>नोंदणी आणि अर्हता यांच्या तारखांतील तफावत</u>**

- १३०५४ प्रकरणी नोंद केलेल्या अर्हतेच्या तारखा ह्या उमेदवारांनी त्या संबंधित दिलेल्या परीक्षा उत्तीर्ण झालेल्या तारखाच्या पुर्वीच्या होत्या.
- ८०८३ प्रकरणी अतिरिक्त अर्हतेच्या नोंद केलेल्या तारखा सुरुवातीच्या नोंदणी केल्या तारखेच्याही पुर्वीच्या होत्या.
- ११२८ प्रकरणी उत्तीर्ण झालेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेच्या तारखा ह्या त्यांनी उत्तीर्ण केलेल्या माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षेच्या पुर्वीच्या दिसून आल्या.

वरील अनियमितता आणि उणिवांमुळे संबंधित उमेदवारांना गैरवाजवी वरिष्ठता फायदे मिळण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. डिसेंबर २००५ महिन्यांतील सादरीकरणाच्या तपशीलाची पडताळणी करता असे लक्षात आले की, नियोक्त्याला केलेल्या १० सादरीकरणात ५१ उमेदवारांना गैरवाजवी फायदा देण्यात आला होता.

**<u>आधार माहितीमध्ये असंयुक्तिक माहिती</u>**

- जन्म दिनांक म्हणून अभिलिखित केलेल्या भविष्यातील वर्ष २००६ नंतरच्या तारखा ६२ प्रकरणी दिसून आल्या.
- ४५६ प्रकरणांत अभिलिखित केलेल्या जन्मतारखा दर्शवित होत्या की, त्यांची वयाची १४ वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच उमेदवारांची नावे नोंदविण्यात आली होती.
- १,२,९,१९००,१९०८,२२०० आणि २९९५ अशी असंबद्ध परीक्षा पास झाल्याची वर्षे ४६७५ प्रकरणी अभिलिखित करण्यात आली होती.
- १४९ प्रकरणी उमेदवारांच्या उंची २७० से.मी.पेक्षा जास्त अभिलिखित झाल्या होत्या.

**<u>चुकीचे अनुसमर्थन नियंत्रण (validation control)</u>**

शारिरीक दुर्बलता असलेल्या उमेदवारांची फक्त काळजी घेणाऱ्या विशेष सेवायोजन विनियमामध्ये असे लक्षांत आले की, ६० उमेदवार संबंधित अभिलेख्यामध्ये शारिरीक दुर्बलता गटाच्या विरोधात एन पताका दाखविल्यामुळे शारिरीक दुर्बलता नसलेले म्हणून समजण्यात आले. या प्रमाणे हे ६० उमेदवार समर्थ नियोक्त्याकडे पाठविले गेल्यास चांगल्या संधीपासून दुरावण्याची शक्यता होती.

यावर विशेष सेवायोजन विनिमय (शा.दु) यांनी असे उत्तर दिले की, (एप्रिल २००६) माहितीमध्ये दुरुस्ती करण्यात येईल आणि NIC ने अनुसमर्थन तपासण्या देण्याचे मान्य केले आहे की, ज्यामुळे या युनीटमध्ये नोंद झालेल्या सर्व उमेदवारांची शारिरीक दुर्बल म्हणूनच आपोआप नोंद होईल. तथापि दुरुस्तीची कारवाई करण्यात आली नव्हती (ऑगस्ट २००६).

**ज्ञापन :**

**३.६** महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

होय, डिबी२ डाटाबेसमध्ये सापडलेल्या काही दुय्यम/दुबार नांव नोंदण्या ह्या मुळच्या जुन्या ओरॅकल डाटाबेसमध्ये केलेल्या होत्या. अशा नोंदण्या उमेदवार जेव्हा इतर मदतीसाठी कार्यालयात येतात किंवा त्यांना कार्यालयात बोलावून एनआयसी, पुणे यांनी विकसित करुन दिलेल्या सुविधेच्या (Utility) आधारे दुरुस्त करण्यात येत आहेत. या अनियमितता सर्व कार्यालयातून डिबी२ आज्ञावल्या स्थिरावताना सुरुवातीस नोंदल्या गेलेल्या समस्यांमुळे (Hiccups) निर्माण झालेल्या आहेत.

जरी डिबी२ आज्ञावल्यामध्ये अनुसमर्थन चाचणी (Validity Checks) ठेवण्यात आली असली तरी, दुय्यम नाव नोंदणी होण्याची शक्यता आहे.

कारणे -

१) उमेदवार त्याची पूर्वीच नोंदणी हेतुतः दाखवित नसल्याने.

२) विद्युत पुरवठा खंडित झाल्याचे कारणाने डाटा एंट्री ऑपरेटरला दोनदा नोंदणी करावी लागल्याने,

म्हणून दुय्यम नाव नोंदणी टाळण्यासाठी नवीन सॉफ्टवेअरमध्ये एनआयसी, पुणे यांनी दुय्यम नाव नोंदणीचा शोध घेण्यासाठी एक सुविधा विकसित केली आहे. ही सुविधा जन्मतारीख व नाव यांच्या आधारे पुनरावृत्ती तपासते. डाटाबेसमधून दुबार नाव नोंदणी शोधून ती रद्द करण्यासाठी सर्व कार्यालयांना सविस्तर सूचना देण्यात येत आहेत.

सन २०००-०१ मध्ये एक मोठ्या मोहिमेचा भाग म्हणून जवळपास ४० लाख उमेदवारांचा नोंदणीपट ओरॅकल डाटाबेसमध्ये संगणकीकृत करण्यात आला. हे काम कमी वेळेत व दबावाखाली केले गेले. या मोठ्या कामकाजामुळे काही चुका झाल्या असण्याची शक्यता आहे. तसेच, समाजकल्याण खात्याने त्यांचे रोजगार विषयक काम बंद केले आणि त्यांचा हस्तांतरीत करण्यात आलेला नोंदणीपट कोणत्याही तपासणीशिवाय जशाचा तसा संगणकात भरण्यात आला. मुद्दा असा की, डिबी२ आधारित आज्ञावल्याच्या वापरानंतर नोंद घेण्याइतपत त्रुटी आढळून आलेल्या नाहीत. म्हणून, सापडलेल्या त्रुटी ओरॅकल डाटाशी निगडीत असाव्यात, जो डिबी२ मध्ये पोर्ट केलेला आहे. यापैकी पुष्कळसा डाटा शोधून दुरुस्त करण्यात येत आहे असे असले, तरी ज्या उमेदवारांच्या नोंदी प्रमाणपत्रे तपासण्याअभावी अद्ययावत करता येऊ शकलेल्या नाहीत, त्या नोंदी उमेदवारांना कार्यालयात बोलावून ३१ डिसेंबर, २००७ पर्यंत दुरुस्त करण्यात येतील.

**<u>अपूर्ण माहिती आधार</u>**

**<u>स्थित उमेदवारांची माहिती न भरणे</u>**

३.७ मालकांकडे नियुक्त झालेल्या उमेदवारांचा तपशील या व्यवस्थेमध्ये प्रवेशित करणे आवश्यक असते आणि त्यांची नावे जीवंत नोंदवहीतून मृत नोंदवहीत स्थलांतरीत करावयाची असतात. छाननीमध्ये असे लक्षांत आले की, नियुक्त झालेल्या उमेवारांची माहिती संगणकीय व्यवस्थेमध्ये भरण्यात आली नव्हती. याप्रमाणे, जीवन नोंदवहीतील उमेदवारांची असलेली आकडेवारी फुगीरच नव्हती तर अगोदरच नियुक्त झालेल्या उमेदवारांना पुन: सादर केले जाण्याची भीती होती ज्यामुळे इतर उमेदवारांची संधी जाणार होती.

उत्तरादाखल सेवायोजन विनिमयाने असे म्हटले की, (मार्च-एप्रिल २००६) नियुक्त झालेल्या उमेदवारांची नोंद घेण्याची सुविधा अद्याप अंमलात आणण्यात आली नव्हती.

**<u>नियोक्त्यांचा अनुल्लेखित समावेश</u>**

जिल्हा सेवायोजन विनिमयांना त्यांच्या परिक्षेत्रातील सर्व नियोक्तांचा समावेश असलेली आधार माहिती ठेवणे आवश्यक असते. राज्य विमा कामगार मंडळ आणि संचालनालय रोजगार आणि स्वयंरोजगार यांच्याकडून अनेक मालकांविषयी मिळालेली माहितीचा तपशील खालीलप्रमाणे होता.

| राज्य विमा कामगार मंडळाचे क्षेत्र/उप प्रदेश | मालकांची संख्या | | | |
|---|---|---|---|---|
| | रा.वि.का.मं. यांचेकडून मिळालेली माहिती | सि.से व स्व.रो. यांचेकडून मिळालेली माहिती | फरक (२-३) | समाविष्टतेची टक्केवारी (३/२ x१००) |
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| मुंबई | ३९५५२ | ३३१४ | ३६२३८ | ८.३८ |
| ठाणे | ११३१६ | १३६९ | ९९४७ | १२.१० |
| पुणे (धुळे, जळगांव, कोल्हापूर पुणे, नाशिक, सांगली, सातारा व सोलापूर) | १०९६५ | ९०१२ | १९५३ | ८२.१९ |
| नागपूर (अकोला, अमरावती, भंडारा, चंद्रपूर गोंदिया, नागपूर, वर्धा व यवतमाळ) | ४३०६ | ५०६८ | -७६२ | ११७.७० |
| औरंगाबाद (औरंगाबाद, नांदेड) | १८९६ | १६०२ | २९४ | ८४.४९ |

असे पाहण्यात आले की, गेल्या पाच वर्षात मुंबई युनीटकडून मालकांच्या सहभागाकरीता स्ट्रीट सर्वेक्षण सुद्धा करण्यात आली नव्हती. मालकांचा कमी समावेश असे दर्शविते की, सेवायोजन विनिमय यांनी मालकांविषयीची माहिती गोळा करण्यासाठी पुरेसे प्रयत्न केलेले नव्हते.

उत्तरादाखल सहा.संचालक मुंबई आणि ठाणे सेवायोजन विनिमय यांनी लेखापरीक्षण निरीक्षणे स्विकारली आणि म्हटले (एप्रिल व मे २००६) मालकांची आधार माहिती वाढविण्यासाठी आवश्यक ती पावले उचलण्यात येत आहेत.

**ज्ञापन :**

**३.८** महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालील प्रमाणे नमूद केले आहे. जुलै, २००७ मध्ये मुक्त केलेल्या रोजगार मित्र व्हर्जन ३.०० मध्ये पाठवणीच्या नोंदी घेण्याबाबतच्या सुविधेची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे.

पर्यवेक्षीय संवर्गातील प्रशिक्षित मनुष्यबळ स्त्रोताच्या कमतरतेमुळे वारंवार पट सर्वेक्षण शक्य नाही. परंतु वैयक्तिक भेटी, वेबसाईट यासारख्या दुय्यम स्त्रोताच्या सहाय्याने उद्योजकांच्या नोंदणीपटाची व्यापकता वाढविली जाईल.

**लेखापरीक्षणाचा मागोवा (Audit trail)**

३.९ वेगवेगळ्या अनधिकृत सुधारणा अभिलिखित केल्या जात नव्हत्या जरी व्यवस्थेमध्ये त्याकरीता अंतर्गत यंत्रणा होती.

संचालनालयाने असे कबूल केले (जून २००६) की, NIC च्या मदतीने दुरुस्ती कारवाई करण्यात येईल.

मुंबई उपनगर आणि ठाणे सेवायोजन विनिमयांच्या २००५-०६ च्या माहितीची छाननी केली असता असे लक्षांत आले की, मुंबई सेवायोजन विनिमयाच्या संबंधित ११७ प्रकरणी आणि ठाण्याच्या बाबतीत ३१० प्रकरणी अर्हता नोंदणीच्या तारखेत बदल केला होता यापैकी ठाणे सेवायोजन विनिमयांत अगोदर परिच्छेद ३.३.७ मध्ये नमूद केलेली अर्हतेच्या चुकीच्या तारखा नमूद केलेली चार प्रकरणे होती. ज्या अधिकाऱ्यांनी हे बदल केले त्यांची नावे आणि तसेच बदल करण्याची कारणेही व्यवस्थेमध्ये अवगत करता येत नव्हती याप्रमाणे आधार माहितीमध्ये केलेल्या बदलांबाबतचा सच्चेपणा आणि अधिकार याबाबतची खात्री करुन घेणे शक्य झाले नव्हते.

ही वस्तुस्थिती मुंबई व ठाणे सेवायोजन विनिमयांनी मान्य केली.

अशा तऱ्हेने सुरक्षितता नियंत्रणांच्या अभावामुळे व्यवस्था त्यांतील माहितीमध्ये अनधिकृत बदल होण्यास बळी पडत होती.

**ज्ञापन :**

**३.१०** महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे की, डीबी २ सॉफ्टवेअरमध्ये अंतर्भूत असलेल्या सुविधा (inbuilt utility) अनधिकृत बदल (असल्यास) शोधण्यासाठी वापरल्या जात आहेत. संबंधित कार्यालयात या अनियमिततेची चौकशी करण्यात आली आहे. ही अनियमितता पुढील कार्यपद्धतीच्या कारणामुळे अथवा अपवादात्मक परिस्थितीमुळे उद्‌भवली असल्याचे दिसून आले.

१. स्थलांतरीत प्रकरणी, उमेदवारांना मूळ नोंदणीच्या ज्येष्ठतेबरोबर पुर्ननोंदणीचा दिनांक ज्या कार्यालयांत नोंदणी स्थलांतर झालेली आहे त्या कार्यालयात मिळते.
२. विशेष नुतनीकरण प्रकरणी देखील उमेदवारांना नोंदणीच्या मूळ ज्येष्ठतेबरोबर पुर्ननोंदीचा दिनांक मिळतो.
३. नवीन नाव नोंदणीच्या वेळी ओरॅकलमधील नोंदींच्या आधारे अथवा उमेदवाराने प्रस्तुत केलेल्या क्ष-१० च्या आधारे ज्या शैक्षणिक पात्रतेच्या नोंदी ओरॅकलमधून डिबी२ मध्ये सॉफ्टवेअरने रुपांतरीत केलेल्या नाहीत, त्या मॅन्यूएली संगणकात भरल्या जातात. अशा प्रकरणी नोंदणी ज्येष्ठता दिनांक हा नोंदणी/अद्ययावतीकरण दिनांकापेक्षा वेगळा असतो. (नोंदणी दिनांक > ज्येष्ठता दिनांक).

अशी प्रकरणे जुन्या ओरॅकल डाटामध्ये दुरुस्त्या केल्या संदर्भातील आहेत. संबंधित कार्यालयातून नाव नोंदणी केलेल्या ४ लाख नोंदणी पैकी अनुक्रमे ११७ व ३१० इतक्या नोंदी आहेत.

तथापि, या प्रकरणी निदर्शनास आणण्यात येते की, नोंदणी दिनांक हा उमेदवारांना रोजगारांच्या संधीकरिता पाठवणी करताना केवळ महत्त्वाचा नाही. उद्योजकांना पाठविण्यात येणाऱ्या यादीमध्ये नावाचा समावेश होण्यासाठी उमेदवारांकडून इतर आवश्यक कसोट्यांची पूर्तता व्हावी लागते. जसे जात, अनुभव, शैक्षणिक पात्रता इत्यादी.

**विषाणू विरोधांचे अद्ययावतीकरण नव्हते.**

**३.११** याबाबतीत असे लक्षात आले की, चाचणी परीक्षा केलेल्या सर्व युनीटमधील संगणकांमध्ये स्थापीत केलेल्या विषाणूविरोधी व्हर्जन २००४ चे अद्ययावतीकरण करण्यात आलेले नव्हते.

संचालनालयाने कबूल केले की, (जून २००६) एन आय सी च्या मदतीने दुरुस्ती कारवाई करण्यात येईल.

**ज्ञापन :**

**३.१२** महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंबंधी विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केले आहे की, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी सन २००६-२००७ साठी केलेल्या दर करारावरील मे.जैनाम टेक्नॉलॉजिस, मुंबई या कंपनीकडून सिमेंटिक अँटी व्हायरस सॉफ्टवेअरची ५६३ लायसेन्सेस खरेदी करण्यात आलेली आहेत. यासाठी सन २००१ ते २००७ पर्यंत खरेदी करण्यात आलेल्या संगणकांची संख्या विचारात घेण्यात आलेली आहे. सदरच्या खरेदी करण्यात आलेल्या लायसेन्सेस पैकी आजपावेतो ४५५ लायसेन्सेस संचालनालयासह रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रातील डेस्कटॉप पीसीज्वर स्थापित करण्यात आलेली असून उर्वरित संगणक नादुरुस्त, क्षमता कमी, लॅन मध्ये नसणे इ. कारणांनी स्थापित करता न आलेली लायसेन्सेस लवकरच स्थापित करुन घेण्यात येत आहेत. या लायसेन्सेसची मुदत दर करारातील अटी व शर्थीप्रमाणे ३ वर्षाची आहे.

**साक्ष :**

**३.१३** समितीने दिनांक ६ ऑक्टोबर, २०१० व ९ फेब्रुवारी, २०११ रोजी वरील परिच्छेदासंदर्भात रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली. त्यावेळी सचिवांनी परिच्छेदांच्या अनुषंगाने खुलासा करावा असे समितीने सांगितले असता, त्यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सेवायोजन विनिमय केंद्राच्या संगणकीकरणाबाबत हा परिच्छेद आहे. ईईसीची आज्ञावली विकसित

करण्याचे काम एनआयसी, पुणे यांच्याकडून करुन घेण्यात आले आहे. याबाबत लेखापरीक्षणाचा प्रमुख मुद्दा असा होता की, यामध्ये नियोजन व नियंत्रणाचा अभाव असल्यामुळे आज्ञावली विकसित करण्यास खूप वेळ लागला. दुसरे असे की, ओरॅकलमध्ये ईईसी सॉफ्टवेअरमध्ये अनुसमर्थन तपासणी व नियंत्रण दिलेले नव्हते असा मुद्दा आहे. त्या संदर्भात संपूर्ण माहिती उत्तरामध्ये देण्यात आली आहे. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे ही सर्व प्रणाली शासकीय यंत्रणेने एनआयसी, पुणे यांचेमार्फत विकसित केली आहे. यामध्ये खाजगी यंत्रणेचा समावेश नाही. याकरिता हार्डवेअरसाठी २ कोटी रुपये खर्च झाला. विभागाने या प्रणालीचा पूर्णपणे उपयोग केला आहे व हे हार्डवेअर आपण मेंटेन करुन त्याचा उपयोग करीत आहोत. दुसरी गोष्ट अशी की, यामध्ये समन्वय व नियंत्रणाचा अभाव दिसतो. म्हणून त्या संदर्भात ही आज्ञावली विकसित कशी करता येईल याबाबत कार्यवाही करण्यासाठी एनआयसीचे अधिकारी, रोजगार व स्वयंरोजगार विभागातील अधिकाऱ्यांचा समावेश करुन एक कोअर ग्रुप स्थापन केला आहे आणि त्याद्वारे ही पद्धती अधिक चांगली करण्यासाठी विभागाचा प्रयत्न आहे. सुरुवातीला ओरॅकल पद्धतीमध्ये काम करीत होतो. त्यानंतर ओरॅकलचे अपग्रेडेशन न करता डीबी२ ही आज्ञावली स्वीकारण्यात आली. त्यावेळी महाराष्ट्र शासनास, डम्ब टर्मिनल प्रकारच्या होस्ट सेंट्रीक ॲप्लिकेशन एन्हव्हायरमेंटमधून नवीन क्लाएंट सर्व्हर/वेब टेक्नॉलॉजी प्रकारच्या ग्राफिकल युजर्स एन्टरफेससह असणाऱ्या एन्व्हॉयरमेंट स्थलांतरीत व्हावयाचे असल्याने, सचिव, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र शासन यांनी महाराष्ट्र शासनाच्या सर्व आज्ञावल्या विकसन हे क्लायंट सर्व्हर किंवा वेब बेस्ड प्रकारचे करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. सचिव, माहिती तंत्रज्ञान यांनी महाराष्ट्र शासनाच्या सर्व विभागांनी संगणक विकसनासाठी डीबी२ डाटाबेसच उपयोगात आणण्यासाठी शिफारस केली. जेणेकरुन सर्व विभागांच्या डाटाची खात्यांतर्गत ॲप्लिकेशनमध्ये देवाणघेवाण करणे शक्य होऊ शकते.

३.१४ समितीने अशी विचारणा केली की, आपण ओरॅकल आधारीत साधन सामुग्री समूह उपयोगात आणण्याचा कार्यक्रम ३६ युनिटमध्ये अंमलात आणून अर्धवट सोडून देण्यात आला. परंतु हे करीत असतांना जुन्या ओरॅकल आधारीत समूहामध्ये असलेल्या कमतरता नवीन समूहामध्ये चालू राहिल्या हे विभागाने अपेक्षित केले नव्हते काय? त्यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, सुरुवात आपण ओरॅकलमध्ये केली होती. परंतु त्यामधून माहिती नीट दिसत नव्हती. म्हणून विभागाने त्याचे श्रेणीवाढ करण्याचा विचार केला. आपण ओरॅकलमध्ये रुपांतरीत करावयास गेलो असतो आणि ओरॅकलचा वापर करावयास सुरुवात केली असती तर ओरॅकलची किंमत जास्त असल्यामुळे आपला खर्च जास्त झाला असता आणि म्हणून ओरॅकलच्या ५ परवान्यासाठी ८० लाख रुपये आपल्याला मोजावे

लागले असते. दरम्यानच्या काळात शासनाने डीबी२ विकत घेतल्यामुळे आपण ओरॅकलमधून डीबी २ मध्ये शिफ्ट झालो आणि म्हणून आम्ही डीबी२ मध्ये ॲप्लिकेशन्स डेव्हलप केले व आपण अगोदर वापरीत असलेल्या हार्डवेअरचा वापर केला. आपल्या राज्यासाठी भूषणावह बाब अशी की, गुजरात राज्याप्रमाणे आपल्या राज्यामध्ये सेवा योजन कार्यालयाचे संगणकीकरण झाले आहे व ही पद्धती केंद्र सरकारने नमुना म्हणून स्वीकारली आहे. केंद्र शासनाचा मिशनमोड प्रोजेक्ट येत आहे. आपल्या आज्ञावलीचा अभ्यास केल्यानंतर या आज्ञावलीचा वापर संपूर्ण देशभरातील सेवा योजन कार्यालयामध्ये करण्याचा निर्णय घेण्यापर्यंत केंद्र शासन पोहोचले आहे. आपल्याला कॉम्प्युटर सोसायटी ऑफ इंडिया यांचा सन २००७-०८ या वर्षीचा निहिलेंट ॲवॉर्ड नोव्हेंबर २००८ मध्ये देण्यात आलेला आहे. तो ॲवॉर्ड आपल्याला बेस्ट ई-गव्हर्नंस प्रोजेक्टसाठी देण्यात आला आहे. तसेच, केंद्र सरकारने दस्तऐवज करण्यासाठी आपल्याला २ लाख ३५ हजार रुपये मंजूर केले आहेत. संपूर्ण राज्यभर ४५ सेवायाजन कार्यालये ती संगणाद्वारे "रोजगार मित्र" या आज्ञावलीद्वारे जोडण्यात आली आहेत.

३.१५ त्यावर समितीने अशी विचारणा केली की, सर्व आकडेवारी पाहिल्यानंतर उपलब्ध असलेली पदे आणि सेवायोजन कार्यालयाकडे उमेदवारांची झालेली नोंदणी याचे प्रमाण व्यस्त दिसते. एकूण ९ लाख बेरोजगारांची नोंदणी असून ४० ते ४५ हजार जागा उपलब्ध आहेत. तरीसुद्धा गेल्या वर्षभरामध्ये आपण सात हजार लोकांना नोकऱ्या दिल्या आहेत. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, रिक्त पदांची सक्तीने अधिसूचना देणे कायद्याने बंधनकारक आहे. रिक्त पदे भरण्यासाठी त्याची अधिसूचना सेवा योजन कार्यालयाला दिली पाहिजे. त्या अनुषंगाने मागील वर्षी १ लाख ४ हजार रिक्त पदे अधिसूचित झाली. त्यानुसार ८ लाख १६ हजार उमेदवारांची नावे उद्योजकांकडे पाठविण्यात आली होती. उद्योजकांकडून ४४ हजार रिक्त पदे भरल्याचे उत्तर प्राप्त झाले. परंतु एकदा पद भरल्यानंतर त्यांनी सेवायोजन कार्यालयाला कळविणे बंधनकारक नाही. याबाबतचा कायदा केंद्र शासनाचा असून त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

३.१६ खाजगी यंत्रणेमार्फत रोजगार उपलब्ध होण्यासाठी वेबसाईट तयार करण्यात आली असून त्यामध्ये फीड बॅक सिस्टीम आहे, ती पद्धती आपल्याकडे नाही. त्या यंत्रणेकडे वेबसाईटवर अर्ज केल्यानंतर संगणक प्रणालीमुळे तात्काळ माहिती मिळू शकते. तशाप्रकारे फीडबॅक आपल्याकडे तात्काळ मिळू शकेल काय? अशी विचारणा समितीने केली असता याबाबत विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, सेवा योजन कार्यालयामार्फत उमेदवारांना आणि उद्योजकांना मोफत सेवा दिली जाते. खाजगी यंत्रणेमार्फत नोंदणी केली तर त्यांच्याकडे पैसे भरावे लागतात. नोकरी मिळाल्यानंतर पगाराच्या ८.३३

टक्के पैसे त्यांना द्यावे लागतात. ऑनलाईनद्वारे, एसएमएसद्वारे उमेदवारांच्या नावाची नोंदणी कशी करता येईल आणि त्यांना माहिती कशी देता येईल याबाबत आपण विचार करीत आहोत.

३.१७ समितीने अशी विचारणा केली की, महाराष्ट्रामधील विद्यापीठामधून अनेक विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेऊन बाहेर पडतात. आज राज्यामध्ये बेरोजगारांची संख्या खूप आहे, परंतु त्याचा निश्चित आकडा आपल्याजवळ नाही. या संदर्भात विधानपरिषदेमध्ये तारांकित प्रश्नाच्या चर्चेच्यावेळी मंत्रिमहोदयांनी खूप मोठी संख्या सांगितली होती. सुशिक्षित बेरोजगार पदवीधारक आणि १२ वी नंतर पदविका (डिप्लोमा) केलेल्या बेरोजगारांसाठी रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत विभागाकडून कोणते प्रयत्न करण्यात येत आहेत ? तसेच राज्यामध्ये पदवीधर आणि पदव्युत्तर झालेल्या उमेदवारांची संख्या किती आहे. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, सेवायोजन कार्यालयामध्ये बेरोजगार उमेदवार नोंदणी करण्यासाठी येतात त्यांना नोकरीची गरज आहे अशातला भाग नाही. परंतु ते आपल्या नावाची नोंदणी करुन ठेवतात. त्यामुळे बेरोजगार किती आहेत हा खरा आकडा सिस्टीममध्ये मिळणे अवघड आहे. राज्यामध्ये पदवीधारक आणि पदव्युत्तर व टेक्निकल क्वॉलिफाईड झालेले उमेदवार इनटेक कॅपॅसिटीच्या १० ते १५ टक्के पर्यंत नोंदणी करुन घेतात. त्याचप्रमाणे टेक्निकल क्वॉलिफिकेशन असलेली मुले आणि सायन्स, कॉमर्स पदवीधारक मुलांना लवकर नोकऱ्या मिळतात. खाजगी क्षेत्रामध्ये त्यांना या नोकऱ्या मिळत असल्यामुळे ते सेवा योजन कार्यालयाकडे नोंदणी करण्यासाठी येत नाहीत. सेवा योजन कार्यालयाकडे बी.ए. झालेली मुले मोठ्या संख्येने येतात. शासनाचा असा निर्णय झाला आहे की, सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग हेच रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे काम पहातील. हा निर्णय घेण्यामागील भूमिका अशी आहे की, उच्च व तंत्र शिक्षण विभागामध्ये तांत्रिक शिक्षण घेतलेल्या मुलांना नोकऱ्यांची गरज आहे त्यांना सेवायोजन कार्यालयाकडे पाठविणे ही सर्व कामे एकत्रितरित्या करता येतील. आपल्या डेटाबेसमध्ये जास्त संख्येने मुले आली तर चांगल्या उद्योजकांकडे त्यांना पाठविता येतील. त्यामुळे उमेदवारांच्या आत्मविश्वासात वाढ (कॉन्फिडन्स बिल्ड) होईल आणि त्यासाठी जास्त संख्येने रोजगार उपलब्ध करुन देण्याचा आपल्या विभागाकडून प्रयत्न केला जाईल.

३.१८ राज्य शासनाने उमेदवारांच्या कौशल्य विकासासाठी (स्किल डेव्हलपमेंटसाठी) पुढाकार घेतला आहे. त्याचप्रमाणे शासनाने युनिव्हर्सिटी एज्युकेशन सिस्टीममध्ये औद्योगिक शिक्षण, आयटीआय, व्यवसाय प्रशिक्षण, डिप्लोमा, डिग्रीबरोबर इंजिनिअरींग कॉलेज, एमबीए या विभागापर्यंत संबंध वाढविला पाहिजे. युनिव्हर्सिटीबरोबर समन्वय साधून आपले पोर्टल चांगल्याप्रकारे कसे वापरता येईल आणि छोटे व मध्यम उद्योजकांसाठी एक नवीन पोर्टल डेव्हलप करण्याच्या स्टेजपर्यन्त विभाग आलेला आहे.

कौशल्य विकासासाठी (स्किल डेव्हल्पमेंटसाठी) केंद्र सरकारने आराखडा तयार केला असून त्यामध्ये या विभागाला समाविष्ट करुन घेणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने विभाग पुढील कारवाई करणार आहे. याबाबत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती असून तिच्या विभागीय स्तरावर, जिल्हा स्तरावर गरज पडल्यास तालुका स्तरावरही बैठका घ्याव्या लागतील.

३.१९ निविष्ट नियंत्रण आणि अचुकता तपासणीमध्ये लागू करण्यात आलेल्या साधन सामुग्री समूहास एकदा किंवा अनेक वेळा नोंद झालेल्या बाबींची अधिकृतता तपासण्याच्या अभावामुळे ७१२९ प्रकरणी उमेदवारांना चुकीचे क्रमांक देण्यात आले. याबाबत समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, सुरुवातीला ओरॅकलमध्ये डाटा एंट्री करण्यात आली होती. डीबी२ डाटाबेसमध्ये सापडलेल्या काही दुबार नाव नोंदण्या मूळच्या जुन्या ओरॅकल डाटाबेसमध्ये केल्या होत्या. त्यावेळी समाजकल्याण विभागाकडे भरपूर डाटा होता. त्यांनी त्यांचे रोजगार विषयक काम बंद केले आणि त्यांचा हस्तांतरित करण्यात आलेला नोंदणीपट कोणत्याही तपासणीशिवाय जशाच्या तसा संगणकामध्ये भरण्यात आला. हे काम त्यांनी कमी वेळेमध्ये केल्यामुळे त्यामध्ये मोठ्या प्रमाणात चुका झाल्या असण्याची शक्यता आहे. याबाबत हा मुद्दा लेखापरीक्षणामध्ये ऑडिटमध्ये मांडल्यानंतर नवीन उपयोगिता (युटिलिटी) बनविण्यात आली व त्यामुळे बऱ्यापैकी अभिलेख (रेकॉर्ड) दुरुस्त करण्यात आले. काही उमेदवार पहिल्यांदा आपल्या नावाची नोंदणी करतात, परंतु दोन वर्षानंतर पुन्हा आपला फॉर्म हरविला असून तो सापडत नाहीत असे सांगतात. आपली पूर्वी नोंदणी (रजिस्ट्रेशन) झाली आहे परंतु नंबर लक्षात नाही असे सांगतात. अशा उमेदवारांची पुन्हा नोंदणी केली जाते. अशा उमेदवारांची उपयोगिता बनवून ज्या उमेदवारांची पूर्वी नोंदणी झाली असेल तर त्यामध्ये अतिरिक्त माहिती टाकून नवीन नोंदणी रद्द केली जाते. एनआयसी, पुणे यांनी दुय्यम नाव नोंदणी टाळण्यासाठी नवीन आज्ञावलीमध्ये एक सुविधा विकसित केली आहे. ही सुविधा जन्मतारीख व नाव यांच्या आधारे दुबार नाव नोंदणी शोधून ती रद्द करण्यात येते.

३.२० काही उमेदवार मुंबईच्या सेवा योजन कार्यालयात नोंदणी करतात त्याप्रमाणे ठाण्याच्या सेवायोजन कार्यालयामध्ये जाऊन देखील नोंदणी करतात. त्यामुळे आपण उपयोगिता तपासून ती दुरुस्त करतो. २००६ मध्ये लेखापरीक्षण झाल्यानंतर आम्ही २००७ पर्यंत डाटा दुरुस्त करण्याचे ठरविले. त्यासाठी विभागाने एक नवीन प्रोग्रॅम डेव्हलप करुन तो रन केला. त्यानुसार दररोज संध्याकाळी हा प्रोग्रॅम रन करण्याचे आदेश विभागाने संबंधितांना दिले. त्यामुळे जे काही दुबार काम झाले आहे ते काढून टाकल्यानंतर उमेदवारांची ज्येष्ठता कायम रहाते. एमकेसीएल हे आमच्या

विभागाच्या अंतर्गत असून माननीय उच्च व तंत्र शिक्षणमंत्री हे अध्यक्ष आहेत तर माननीय राज्यमंत्री हे उपाध्यक्ष आहेत व सचिव, रोजगार व स्वयंरोजगार हे संचालक मंडळावर आहे.

३.२१ सन १९९७ ते १९९९ मध्ये ओरॅकल आधारित कार्यक्रम ३६ युनिटमध्ये २.०६ कोटी खर्च करुन अंमलात आणून अर्धवट सोडला व सन २००१-२००२ मध्ये "रोजगार मित्र" या नावाचा नवीन डीबी२ साधन सामुग्री समूह विकसित करण्यावर लक्ष केंद्रित केले परंतु जुन्या ओरॅकलमधील कमतरता नवीन समूहात चालूच राहिल्या या महालेखापालांच्या आक्षेपाबाबत आपल्याला काय सांगावयाचे आहे? समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, सन १९९७-९८ मध्ये ओरॅकल आधारित इइसी आज्ञावल्यांच्या अंमलबजावणीसाठी २ कोटी रुपयांची जी साधनसामुग्री खरेदी करण्यात आली होती त्याच साधनसामुग्रीचा वापर ओरॅकल डेटाबेसमधून डीबी२ मध्ये रुपांतर झाल्यानंतर केला जात आहे. त्याचबरोबर हे काम शासकीय यंत्रणेला दिले होते. त्यामुळे हा खर्च वाया जाण्याचा प्रश्न येत नाही. २००६ मध्ये ज्या उपयोगिता विकसित करण्यात आल्या होत्या त्यामध्ये सगळे दोष दूर करण्याचा प्रयत्न केला असून त्यातील बरेचसे दोष दूर करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये बरेच संरोध लावण्यात आले आहेत. जसे काही उमेदवारांचे वय कमी नोंदविण्यात येत असेल तर वय आणि शिक्षण हे जुळले पाहिजे. याप्रकारचे विविध संरोध आहेत. ७ हजार १२९ प्रकरणात उमेदवारांना चुकीचे क्रमांक देण्यात आले होते तसेच १३ हजार ०५४ प्रकरणी उमेदवारांच्या गुणात्मकतेच्या तारखा त्याने उत्तीर्ण केलेल्या परीक्षेच्या पूर्वीच्या दाखविण्यात आल्या होत्या. सन २००७ मध्ये विभागाला या कामाबद्दल अवॉर्ड मिळाला आहे.

३.२२ मुंबई आणि ठाणे जिल्हा सेवायोजन विनिमय केद्रांकडून मालकाशी संपर्क साधण्याचे प्रमाण अनुक्रमे ८.३८ आणि १२.१० इतके कमी आहे महालेखापरिक्षकांच्या आक्षेपाबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, आपल्याकडे नोंदविण्यात आलेली माहिती आणि इ.एस.आय.सी.मध्ये नोंदविण्यात आलेली माहिती यामध्ये तफावत दिसून येते. त्यांच्याकडे जी माहिती नोंदविण्यात आली होती त्यानुसार हा आकडा ३३ हजार असून आपल्याकडे नोंदविण्यात आलेला आकडा ३,५०० आहे. या संदर्भात आपल्या कायद्यात असे म्हटलेले आहे की, २५ पेक्षा जास्त कामगार ज्या ठिकाणी काम करतात त्या कारखान्याची नोंदणी कायद्याप्रमाणे बंधनकारक आहे. यासाठी गेल्या दीड वर्षात मोहिम घेण्यात आली होती. त्याचबरोबर रोजगार मेळावे देखील आयोजित करण्यात आले होते आणि जास्तीत जास्त नोकऱ्या मिळविण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संस्था तसेच राज्य कामगार विमा (इ.एस.आय.एस.) यांच्याकडून याद्या मागविण्यात आल्या

होत्या. गेल्या दीड वर्षात १३ हजार ९४४ नवीन मालक राज्यात नोंदविण्यात आले त्यामुळे जास्तीत जास्त रिक्त जागा मिळवल्या गेल्या. हे काम फार मोठ्या स्वरुपाचे आहे प्रत्येक ठिकाणी जाऊन काम करणे अवघड आहे. त्यामुळे वेब साईटवर मालक स्वतः नोंदणी करतील, रिटर्न स्वतः भरतील अशा प्रकारची ऑन लाईन व्यवस्था केल्यास ते काम करणे सोपे होईल. आता या ऑनलाईन नोंदणी यंत्रणेचे सुरक्षा लेखापरीक्षण पूर्ण झालेले आहे. त्यामुळे यासबंधी आता लवकरच जाहिरात देण्यात येणार असून जास्तीत जास्त मालकांपर्यन्त पोहचणार आहोत. त्यामुळे संबंधित मालकाला/नियोक्त्यांना कार्यालयात जाण्याची गरज राहणार नाही ऑन लाईन त्यांना नोंदणी करता येईल.

३.२३ विभागाने मोहिम घेतली होती परंतु त्याला लोकांकडून फारसा प्रतिसाद मिळाला नाही हे खरे आहे काय? अशी समितीने विचारणा केली असता, ज्यांच्या पर्यंत आपण पोहोचलो होतो त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला असल्याची माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

अनेक कार्यालयात पदे रिक्त आहेत व किती तारखेपर्यंत ही पदे भरण्यात येणार आहेत ? याबाबतची माहिती समितीने विचारली असता ९४५ पैकी २२० पदे रिक्त आहेत. बरीच पदे रिक्त असल्यामुळे माणसे कमी पडतात. ही सर्व कामे करणे वास्तविक अशक्य आहे. वर्ग एक आणि दोन आणि तीनच्या सर्व पदांची बिंदू नामावली मंजूर करुन घेण्यात आली आहे. त्याचबरोबर वर्ग एक आणि वर्ग दोनची पदे भरण्याच्या संदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला कळविण्यात आले असून वर्ग तीन आणि वर्ग चार मधील जी पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत त्यासंबंधीची प्रक्रिया चालू आहे. तसेच वर्ग तीन आणिं वर्ग चारची पदे जी सरळसेवेने भरती करावयाची आहेत त्या भरतीवर बंदी असल्यामुळे ती पदे भरता येणार नाहीत. जी पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत ती पदे तीन-चार महिन्यात भरण्यात येतील परंतु लोकसेवा आयोगामार्फत जी पदे भरावयाची आहेत त्यासाठी एक वर्षाचा कालावधी लागेल, अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

३.२४ समितीने विचारणा केली की, अकुशल, अशिक्षित, शिक्षित उमेदवारांना नोकऱ्या उपलब्ध व्हाव्यात या दृष्टीने काय प्रयत्न करण्यात येतात? त्यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, ज्या व्यक्तीचे वय १४ वर्षा पेक्षा जास्त आहे आणि ज्याला नोकरीची गरज आहे अशी कोणतीही व्यक्ती सेवा योजन कार्यालयात नाव नोंदवू शकते. समितीने याबाबत पुढे अशीही विचारणा केली की, काही ठिकाणी मजूर मिळत नाही तर काही ठिकाणी मजूर काम शोधत असतात अशा प्रकारचा विरोधाभास दिसून येतो त्याचबरोबर कोणत्या ठिकाणी काम मिळू शकेल हे मजूरांना माहीत नाही तेव्हा या लोकांना काम मिळेल या दृष्टीने कोणते नियोजन करण्यात आलेले आहे ? त्यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की,

सेवायोजन कार्यालयामार्फत नाव नोंदविण्याचे काम केले जाते तसेच संपूर्ण राज्यात साडेबारा हजार कॉमन सर्व्हिस सेंटर्स सुरु करण्यात येणार असून त्यापैकी तीन हजार कॉमन सर्व्हिस सेंटर्स सुरु करण्यात आली आहेत. त्या ठिकाणी नाव नोंदणी करता येईल. आता या बाबतीत मंत्री मंडळासमोर प्रस्ताव आणण्यात येणार आहे. या सुविधेमुळे संबंधित व्यक्तीला गावाजवळ आपले नाव नोंदविता येईल व त्यायोगे ग्रामीण भागातील उमेदवारांना नोकऱ्या मिळू शकतील.

३.२५ ग्रामीण भागातील जास्तीत जास्त उमेदवारांना त्वरीत नोकऱ्या उपलब्ध कशा होतील या दृष्टीने काय नियोजन आहे याबाबत समितीने विचारले असता, त्यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, पूर्वी रोजगार व स्वयंरोजगार आणि उच्च व तंत्रशिक्षण असे दोन विभाग होते त्या ऐवजी आता रोजगार व स्वयंरोजगार आणि उच्च व तंत्रशिक्षण असा एकच विभाग करण्यात आला असल्यामुळे त्याचा परिणाम निश्चितपणे दिसून येईल. तसेच रिक्त पदांची माहिती उमेदवारांना ऑन लाईनवर कशी उपलब्ध करुन देता येईल यासंदर्भात उच्चाधिकार समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे राज्यातील विद्यार्थ्याचे शाळा सोडण्याचे प्रमाण विचारात घेऊन अशा विद्यार्थ्यांना कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत काही प्रशिक्षण देऊन रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत प्रयत्न करण्यात येणार आहेत. या संदर्भात विभाग स्तरावर तसेच जिल्हा स्तरावर संरचना तयार करावे लागेल त्याचप्रमाणे शैक्षणिक संस्था, उद्योग, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, अशासकीय संस्था, सेल्फ हेल्प ग्रुप इत्यादींचा समावेश करुन याबाबतीत काय करता येईल याचा आराखडा तयार करावा लागेल.

३.२६ समितीने विचारणा केली की, अनेक ठिकाणी विविध कोर्सेस केलेले उमेदवार असतात परंतु कोणत्या ठिकाणी कोणते पद रिक्त आहे याची त्यांना माहिती नसते. ग्रामीण भागातील उमेदवारांना ही अडचण मोठ्या प्रमाणावर जाणवते त्या तुलनेने शहरी भागातील उमेदवारांना ही अडचण कमी प्रमाणात जाणवते तेव्हा तलाठी कार्यालयात आणि तहसीलदार कार्यालयात जर या संबंधीची माहिती उपलब्ध करुन दिले तर अधिक बरे होईल. त्यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, नोकरी करणारा आणि नियोक्ता या दोघांनी समोरासमोर येणे आवश्यक आहे. त्यासाठी मेळावे आयोजित करावे लागतील तसेच नियोक्ता आकर्षित कसे होतील या बाबतीत विचार करावा लागेल. राज्यातील सर्व सेवायोजन कार्यालय एकमेकांशी जोडण्यात आलेली आहेत.

३.२७ मुलांना जास्तीत जास्त रोजगार कसा मिळेल या दृष्टीने अनेक प्रयत्न करण्यात येत असले तरी ग्रामीण भागातील मुलांना नोकऱ्या मिळत नाहीत. शेती व्यवसायाशी संबंधित दुग्ध व्यवसाय वा इतर व्यवसाय आहेत त्यासाठी मजूर लागतात परंतु ते सुद्धा मिळत नाहीत रोजगार कसा निर्माण

करावयाचा याबाबतीत आपण चर्चा करीत असतो. परंतु अनेक ठिकाणी मुलांना रोजगार मिळत नाही. ग्रामीण भागातील काही मजूर दोन-तीन दिवस काम करतात आणि दोन-तीन दिवस काम करीत नाहीत याची नोंद माननीय मंत्री, विभागाचे सचिव आणि इतर सबंधितांनी घेतली पाहिजे. जुनीच पद्धत चालू न ठेवता नवीन पद्धत सुरु करण्यात आली पाहिजे. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, आज आपल्याकडे रिक्त पदे जास्त आहेत परंतु योग्य शिक्षण घेतलेले मुले मिळत नाहीत. २००९ साली १३८ मेळावे आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये ३८ हजार रिक्त पदासाठी ५८ हजार मुले हजर झाली होती. परंतु फक्त ८ हजार २०० उमेदवारांना नोकऱ्या मिळाल्या होत्या. तसेच जुलै २०१० पर्यंत ५५ मेळावे आयोजित करण्यात आले होते त्यामध्ये १९ हजार रिक्त पदे होती आणि २१ हजार २०० मुले हजर होती त्यापैकी ४ हजार २०० उमेदवारांना नोकऱ्या मिळाल्या आहेत. उमेदवाराच्या संदर्भात स्पीच डेव्हलपमेंट करणे आवश्यक आहे. ताज हॉटेलमध्ये काही पदे भरावयाची होती परंतु तेथे योग्य उमेदवार मिळाले नाहीत.

३.२८ समितीने विचारणा केली की, सिलीकॉन व्हॅलीमध्ये ६० टक्के लोक भारतीय आहेत. अमेरिका सारखा देश असे म्हणतो की, भारतामध्ये इंग्रजी बोलणाऱ्यांची संख्या जास्त आहे परंतु काही जणांना चांगले इंग्रजी बोलता येत नाही. त्यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, समितीचे मत बरोबर आहे. काही ठिकाणी इंग्रजी बोलणाऱ्यांची संख्या जरी जास्त असली तरी काही ठिकाणी इंग्रजीतून बोलावयाचे म्हटले की, उमेदवार घाबरतात त्यांच्यासाठी सेमी स्कील्ड कोर्सेस आहेत. चीनमध्ये अशा प्रकारचे एकूण ४० हजार कोर्सेस आहेत. उदाहरणार्थ इंग्लीश स्पीकींग, सॉफ्ट स्कील्स्, पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट, नर्सिंग, हेल्थ केअर, बार्बर, स्पा, ब्युटी पार्लर इत्यादी तीन ते सहा महिन्याचे कोर्सेस आहेत.

३.२९ समितीने विचारणा केली की, कमवा आणि शिका अशी आपली एक योजना आहे. त्यातून कोणत्या पदावर नेमणूक केली जाते ? या योजनेमध्ये पहिल्या वर्षी ५ हजार रुपये दुसऱ्या वर्षी ५ हजार ५०० रूपये आणि तिसऱ्या वर्षी ६ हजार रुपये देण्यात येतात. त्यानंतर या व्यक्तीला कायम स्वरूपी नोकरी देण्यात येते. त्यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, वेल्डर, फिटर सारख्या पदावर नेमणूक होत असते. तसेच विभागामार्फत यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या माध्यमातून आणि गव्हर्नमेंट पॉलिटेक्नीक डिस्टन्स लर्निंग प्रोग्राम (जीपीडीएल) अंतर्गत विविध व्होकेशनल कोर्सेसचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. पायलट योजनेमध्ये जीपीडीएल आहे. कंपनी मुलांना पगार देते. तसेच त्यांचे कंपनीमार्फत रोज तीन तास पार्ट टाईम प्रशिक्षण होत असते त्यानंतर त्या व्यक्तीला यशवंतराव

चव्हाण मुक्त विद्यापीठामार्फत तसेच जीपीडीएल कडून सर्टिफिकेट दिले जाते या दोन्ही योजना आपल्याला मोठ्या प्रमाणावर राबवावयाच्या आहेत. आपल्याकडे सेवायोजन आहे कारण एम्प्लाईबिलीटी नाही. दोन संस्थामार्फत हा प्रकल्प पायलट बेसिसवर सुरु आहे. त्यातील एका संस्थेचे नाव यशस्वीनी आहे.

३.३० औद्योगिक प्रशिक्षण (औ.प्र.) संस्थेतील प्रशिक्षण हे ७० टक्के प्रात्यक्षिक व ३० टक्के सैध्दांतिक असे प्रात्यक्षिकाभिमुख असून राज्यात ४१६ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण (औ.प्र.) संस्थांतून प्रतिवर्षी १.६० लाख प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेत आहेत. प्रशिक्षण काळात केवळ प्रात्यक्षिके पूर्ण केली आणि उत्तीर्णतेचे प्रमाणपत्र मिळविले म्हणजे प्रशिक्षणार्थी पूर्ण कुशल झाले असे म्हणता येणार नाही. म्हणून त्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव देणे (On Job Training) आणि विविध कौशल्यांचा सराव करुन घेणे व त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आवश्यकता असते. त्याआधारे ते रोजगार/स्वयंरोजगार करण्याठी सक्षम होतात.

उपरोक्त हेतू साध्य करण्यासाठी सर्व औद्योगिक प्रशिक्षण (औ.प्र.) संस्थांमधून उत्पादनाभिमुख प्रशिक्षण योजना २००२ पासून सुरु करण्यात आली आहे. त्याद्वारे विविध संस्था, कार्यालये, कारखाने यांचेकडून जॉब ऑर्डर्स/सर्व्हिस ऑर्डर्स घेण्यात येवून प्रात्यक्षिक कौशल्यांचा वापर करुन कार्यवाही करण्यात येते व त्यासाठी मोबदला घेण्यात येतो. त्यातून प्रशिक्षणार्थ्यांना काही प्रमाणात उत्पन्न मिळते. सदर योजनेद्वारे शिका व कमवा हा उद्देश देखील साध्य होतो. सदर मोबदल्यातील काही भाग संस्था विकासासाठी वापरण्यात येतो.

३.३१ औद्योगिक प्रशिक्षण (औ.प्र.) संस्थातून पारंपारिक व्यवसाय अभ्यासक्रमांसोबतच आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असे एकूण ११६ व्यवसाय अभ्यासक्रम शिकविण्यात येतात. सर्वसामान्यपणे खालील प्रकारची कामे सदर योजनेतून पूर्ण करुन देण्यात येतात.

१ डीटीपी ची कामे, डेटा बेसची कामे,

२ विद्युत वायरिंग, मोटर रिवाईडिंग इ.

३ टि.व्ही.संगणक, इ.दुरुस्ती.

४ वाहन दुरुस्ती व सर्व्हिसिंग

५ यंत्रसामुग्रीचे सुटे भाग बनविणे/दुरुस्त करणे.

६ फॅब्रिकेशन, कपाटे, दरवाजे, खिडक्या, कॅबिन्स, इ.कामे.

७ फर्निचर बनविणे आणि दुरुस्ती,

८ छोटी बांधकामे, प्लबिंग, पेंटिंग इ.

९ विविध प्रकारचे कपडे शिवणे,

१० ब्युटीपार्लरची कामे,

११ बेकरीची उत्पादने व विविध सॉस / जॅम जेली बनविणे

१२ अन्य सेवाविषयक कामे.

३.३२ मुंबई सेवा योजन विनिमय केद्रांत ११७ प्रकरणी आणि ठाणे सेवा योजन विनिमय केंद्रात ३१० प्रकरणी गुणात्मकतेच्या नोंदवलेल्या तारखा कोणत्याही अधिकृततेशिवाय बदलण्यात आल्या या आक्षेपाबाबत विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, उमेदवारांची नोंदणीची तारीख एक असून जेष्ठतेची तारीख पूर्वीची आहे. या बाबतीत तपासणी केल्यानंतर असे दिसून आले की, काही उमेदवार एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात स्थलांतरीत होत असतात त्यावेळी नवीन जिल्ह्यात ज्या वेळी ते नाव नोंदवतात तेव्हा त्यांना त्या दिवसाची नोंदणीची तारीख दिली जाते परंतु त्यांची ज्येष्ठता ही पूर्वीची असते. एखाद्या उमेदवाराने नाव नोंदविल्यानंतर तीन वर्षापर्यंत त्याची नोंदणी वैध असते. तीन वर्षे संपण्यापूर्वी आणि त्यानंतर संबंधित व्यक्तीला आपल्या नाव नोंदणीचे नुतनीकरण करता येते. जेणेकरुन त्याला पूर्वीची ज्येष्ठता मिळू शकेल. पण काही प्रकरणामध्ये सदरहू नोंदणीचे नुतनीकरण होत नाही. मग तसे झाले तर संबंधितांच्या नाव नोंदणीची तारीख एक असते आणि ज्येष्ठतेची तारीख वेगळी असते. याबाबतीत काही अनियमितता झाली आहे काय ? त्याबाबत चौकशी केली आहे काय ? अशी विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी अनियमितता झाले असल्याचे सांगितले व त्याअनुषंगाने सर्वांना उत्तरे पाठविली आहेत. तसेच संबंधित कार्यालयातून नाव नोंदणी केलेल्या ४ लाख नोंदणीपैकी अनुक्रमे ११७ व ३१० इतक्या नोंदी आहेत.

३.३३ "सेवायोजन विनिमय केंद्राची कार्यक्षमता वाढविणे" याबाबत विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी अगोदर ओरॅकल ही आज्ञावली होती. तेव्हा ओरॅकलमध्ये फक्त मुलांची नोंदणी करण्यात येत होती. पण आता नवीन सॉफ्टवेअर घेतलेले असून त्यात जी रिक्त पदे येतात, ती सुद्धा दिसून येतात आणि त्या नंतर नियोक्त्यांकडे मुलांची नावे पाठविली जातात, लेखी स्वरुपामध्ये पाठवित नाही. आपले रिटर्न्स् सॉफ्टवेअर मार्फत केंद्र शासनाकडे पाठविले जातात. तसेच जी एम्प्लॉयमेंट मार्केट इन्फरमेशन सिस्टीम आहे, ती सॉफ्टवेअर मार्फत जाहीर होते असे समितीस सांगितले.

३.३४ संचालनालयाच्या अधिपत्याखाली एकूण ४५ सेवायोजन विनिमय केंद्रे होती आणि २००६ मध्ये साधारणपणे ३९.३६ लाख नोकऱ्या शोधणाऱ्यांची नोंद करण्यात आली होती. यासंदर्भात आजच्या

स्थितीबाबत समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, उमेदवारांच्या बाबतीत नोंदवही असते. ज्या उमेदवारांना नाव नोंदवून तीन वर्षांचा कालावधी झालेला नाही किंवा ज्यांनी ते नुतनीकरण केलेले आहे अशा उमेदवारांची नावे या नोंदवहीमध्ये असतात. आजच्या परिस्थितीत ३० लाख ५३ हजार संख्या असून, मागील २-३ वर्षाच्या आकडेवारी नुसार जवळजवळ सात ते साडेसात लाख नवीन उमेदवारांच्या नावाची नोंदणी केली जाते आणि ६ ते ९ लाखाच्या दरम्यान उमेदवारांची नावे उद्योजकांकडे पाठविली जातात.

३.३५ समितीने विचारणा केली की, या ९ लाख उमेदवारांच्या बाबतीत काय झाले ? या उमेदवारांना दुसरीकडे नोकरी मिळाली आहे काय किंवा त्यांनी नोकरी सोडून दिली आहे काय ? यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, दरवर्षी ७ लाख उमेदवारांची नावे व्यपगत होतात. उमेदवारांची नावे व्यपगत होण्याचे कारण असे आहे की, एकतर ते ३ वर्षाचा कालावधी झाल्यानंतर नुतनीकरण करीत नाहीत किंवा त्यांना नोकरी मिळालेली असते किंवा पुढील शिक्षण घ्यावयाचे असते अशा काही कारणामुळे नावे कमी होतात. परंतु १९९७-९८ पर्यंत नाव नोंदविण्याचे प्रमाण जास्त होते. आता बऱ्याच ठिकाणी भरती जाहिरातीद्वारे केली जाते, त्यामुळे नोंदणीचे प्रमाण कमी झाले आहे.

३.३६ यासंबंधात कायदे तयार करण्यात आले आहेत काय ? अशी विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, याबाबत केंद्र शासनाचा सी.एन.व्ही.ॲक्ट आहे. केंद्र शासनाने एक कमिटी नेमली होती. त्यानुसार १०-१५ कर्मचाऱ्यांपेक्षा जास्त कर्मचारी असतील तर त्यांना हा कायदा सक्तीचा करावा लागेल. या विषयाच्या अनुषंगाने एक प्रोग्रॅम बनविला होता आणि तो माननीय राज्यमंत्री यांना दाखविला होता. सदरहू प्रोग्रॅम समितीच्या सन्माननीय सदस्यांना पहावयास मिळाला तर सर्वांना त्याची माहिती समजू शकेल, असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, तो डीपीआर हाय पॉवर कमिटीसमोर आहे व अजून या प्रोग्रॅमला शासनाची मंजूरी मिळावयाची असल्याने, बाहेर दाखविण्यात आलेला नाही. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, जर प्रोग्रॅम समितीच्या सन्माननीय सदस्यांना दाखविला तर आम्हाला माहिती मिळू शकेल आणि त्याबाबत आणखी काय करता येईल यादृष्टीने समितीला काही शिफारस सुचविता येईल. तेव्हा या प्रोग्रॅम संबंधात तुमच्याकडे हार्ड कॉपी असेल तर ती देण्यात यावी. विभागीय प्रतिनिधींनी त्यावर खुलासा केला की, यासंबंधातील प्रेझेंन्टेशन दाखवू शकतो जेणेकरुन समितीच्या सन्माननीय सदस्यांना याची माहिती मिळू शकेल. त्यावर समितने असे मत व्यक्त केले की, असे झाले तर सर्व सन्माननीय सदस्यांना माहिती मिळेल आणि काही सूचना करावयाच्या असतील तर त्या करता येतील.

३.३७ विभागीय प्रतिनिधींनी समितीस आश्वासित केल्याप्रमाणे दिनांक ९ नोव्हेंबर,२०११ रोजी रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या ई-प्रशासन प्रणाली प्रकल्पाचे सादरीकरण (Presentation) केले व त्याची माहिती समितीला सादर केली.

**प्रस्तावित बदलाची गरज :**

सध्याच्या प्रणालीत खालीलप्रमाणे उणिवा जाणवतात

- ❖ रोजगार मित्र क्लायंट-सर्व्हर संरचनात्मक प्रणाली.
- ❖ सर्च इंजिन व स्वयंचलित जॉब मॅचिंग
- ❖ रोजगार मित्र व रोजगार वाहिनी दरम्यान डाटाची मॅन्युअल देवाण-घेवाण.
- ❖ ईटरॲक्टीव्ह पब्लिक इंटरफेस
- ❖ राज्यस्तरीय केंद्रिभूत अहवाल व डॅशबोर्ड
- ❖ नोकरी इच्छूक उमेदवारांची व नियोक्त्यांची सरळ नोंदणी
- ❖ शासनाच्या इतर विभागांसोबत इंटरलिंकींग
- ❖ विकेंद्रिभूत पद्धतीने डाटा साठवणूक
- ❖ एसएमएस व ई-मेल अलर्ट.

**प्रस्तावित उपाय : सर्वकष ई-प्रशासन प्रणाली**

१. केंद्रिभूत संकेतस्थळ- द्विभाषिक सपोर्ट सह

- ➢ रोजगार कार्यालये, महा ई-सेवा केंद्रे, तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, हॅन्डहेल्ड व कि-ऑस्क इ. माध्यमातून रोजगार विषयक सेवांचे कामकाज
- ➢ नोकरी इच्छूक उमेदवार नोंदणी, नुतनीकरण व पात्रता वाढ आणि नियोक्ते नोंदणी माहिती अद्ययावत करण्याची ऑनलाईन सुविधा.
- ➢ पात्रतेप्रमाणे उमेदवारीची पाठवणी/रिक्त पदांचा शोध, स्वयंचलित जॉब मॅचिंग सुविधा
- ➢ एसएमएस व ई-मेल द्वारे अलर्ट.
- ➢ सर्व लाभार्थी घटकांसाठी सामायिक प्लॅटफॉर्म.
- ➢ नियोक्त्यांना मनुष्यबळ विवरणपत्रे भरण्याची सुविधा.
- ➢ रिक्त पदे व्यवस्थापन प्रणाली.
- ➢ विविध संकीर्ण माहिती अहवाल प्रणाली.
- ➢ स्वयंरोजगार योजना व प्रशिक्षण योजनांची माहिती व व्यवस्थापन प्रणाली.

- व्यवसाय मार्गदर्शन सुविधा.
- रोजगार स्वयंरोजगार विभागाच्या योजनांचे स्वयंचलित व्यवस्थापन. (रोजगार मेळावा, ईपीपी, सेवा सहकारी संस्था, ग्रंथालय, अधिकारी/कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण इ.)

**विभागाचे इंट्रोनेट माध्यमातून स्वयंचलित कामकाज :**

- ✓ पत्रव्यवहार, पंजिका व्यवस्थापन प्रणाली.
- ✓ वेब बेस्ड बायोमॅट्रिक उपस्थिती प्रणाली.
- ✓ सामग्री व्यवस्थापन प्रणाली.
- ✓ ई-मेल व एसएमएस सुविधा.
- ✓ कामगार बाजार माहिती व्यवस्थापन प्रणाली.

**प्रस्तावित प्रणालीचे फायदे :**

अ.नोकरी इच्छूक उमेदवार -

- सरळ वेब साईटद्वारे, हॅन्डहेल्ड व हेल्पलाईनद्वारे दुरस्थ व दुर्गम ठिकाणावरुनही नाव नोंदणी, नुतनीकरण व पात्रता वाढ सहज करणे शक्य.
- रोजगार विषयक माहितीची वेबसाईटद्वारे उपलब्धता.
- ॲटोमॅटेड जॉब मॅचिंग व अलर्टमुळे सुयोग्य रोजगार मिळणे सुकर.
- सध्याच्या उमेदवार डाटामध्ये गुणात्मक दर्जा वाढीमुळे नोकरी संधीत वाढ.
- उमेदवारांपर्यंत थेट सेवा उपलब्धतेमुळे संघटीत व असंघटीत क्षेत्रातील गरजेचे ज्ञान.
- हेल्पलाईनद्वारे ऑन कॉल रोजगार सेवा उपलब्धता.
- सर्व लाभार्थी घटकांना लॉग-ईन सुविधा.

**ब.नियोक्ते -**

- सरळ वेब साईटद्वारे, हॅन्डहेल्ड व हेल्पलाईनद्वारे दुरस्थ व दुर्गम ठिकाणावरुनही नोंदणी व माहितीत सहज बदल करणे शक्य.
- संवैधानिक विवरणपत्रे भरणे व रिक्त पदे अधिसुचित सहज करता येणे शक्य.
- कसुरदार नियोक्त्यांना सहजपणे शोधून स्वंयचलित सुचना देणे शक्य.
- सुयोग्य उमेदवारांचा गरजेप्रमाणे शोध घेणे सहज शक्य.
- सध्याच्या नियोक्ते डाटामध्ये गुणात्मक दर्जा वाढ.
- रोजगार मेळावे, विवरणपत्रे, विविध योजना विषयक माहितीची सुचना.
- गरजेप्रमाणे स्वयंचलित नोकरी इच्छूक उमेदवार प्रोफाईल मॅचिंग सुविधा.

- व्यक्तिगत व अद्यावत लॉग-ईन सुविधा.

**क प्रशासकीय :**

- केंद्रिभूत डाटाबेस उपलब्धता.
- कमीत कमी मानवीय हस्तक्षेप.
- मानवीय श्रमात बचत.
- पारदर्शकेत वाढ.
- केंद्रिभूत डाटा विश्लेषण व अहवाल व्यवस्थापन प्रणाली.
- अधिक परिणामकारक, प्रतिसादात्मक व वेळीच सेवांची उपलब्धता.
- सेवाकार्य खर्चात बचत.
- विविध शासकीय विभागाच्या माहितीची सहज देवाण-घेवाण.

"अपूर्ण माहिती आधार" याबाबत महालेखाकार यांनी समितीच्या असे निदर्शनास आणून दिले की, There is a difference in the number of employers covered by ESIC and DESE. The coverage of employers by the Directorate of Employment and Self Employment in Mumbai and Thane region was very low. It was noticed that the Mumbai Unit for better coverage of the employers had not conducted Street Surveys. The low coverage of employers indicates that the Employment Exchanges had not made adequate efforts to collect information about the employers. What is the latest figure of number of employers for Mumbai and Thane?

त्यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, to maintain the database of employers, we have to do physical verification of their muster rolls. To do physical verification we need work force. Because of lack of trained work force, periodical Street Surveys are not feasible. The latest figure of number of employers for Mumbai and Thane region is 4000 and 1778 respectively. विभागाने ही मोहीम राबविली. पण मुंबई, पुणे येथे माणसांची कमतरता असल्यामुळे ते करता आले नाही. मात्र संपूर्ण राज्यामध्ये १२ हजार नवीन नावे नोंद नोंदविण्यात आली आहेत.

समितीने पुढे विभागाच्या असे निदर्शनास आणून दिले की, जर प्रत्यक्षात जाऊन नोंद करण्यात आली तर स्थानिक लोकांना देखील चांगल्या प्रकारे रोजगार मिळू शकतो. परंतु विभागाकडे कर्मचारी नसल्यामुळे बेरोजगारांवर अन्याय होत आहे. याबाबतीत काहीतरी प्रयत्न केले पाहिजेत. पदोन्नतीच्या धोरणामुळे देखील इतरांना नोकरीची संधी मिळू शकते. तसे प्रयत्न करावेत. सध्या नोकरीचा प्रश्न महत्वाचा आहे आणि नोकरी मिळाली नाही म्हणून तरुण आत्महत्या करीत आहेत अशी स्थिती आहे.

यावर विभागीय खुलासा केला की, महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) मध्ये यादृष्टीने संगणकीकरण आणि बळकटीकरण करण्याचे काम सुरु झालेले आहे.

३.३८ चाचणी परिक्षा केलेल्या सर्व युनीटमधील संगणकामध्ये स्थापीत केलेल्या विषाणू विरोधी व्हर्जन २००४ चे अद्यावतीकरण झाले नव्हते यासंदर्भात विभागाने खुलासा केला की, ॲन्टी व्हायरसचे अद्ययावत सॉफ्टवेअर घेतलेले आहे आणि आता प्रत्येक कार्यालयामध्ये याबाबत संबंधितांना अधिकार दिलेले आहेत आणि त्यांनी दरवर्षी सदरहू सॉफ्टवेअर अद्ययावत करावयास पाहिजे. तथापि, सन २००७ पर्यंत हे सॉफ्टवेअर घेण्यात आले नव्हते असे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, सिमेंटींक ॲंटी व्हायरस सॉफ्टवेअरची ५६३ परवाने खरेदी करण्यात आलेली आहेत आणि ते सर्व साईटवर लोड केलेले आहे. तसेच याची वैधता तीन वर्षाची आहे. एकंदर ४५ केंद्रामध्ये संपूर्ण संगणकीकरण झालेले आहे. पण सध्या तरुणांना व्हॅल्यु ॲडेड सर्व्हीसची अपेक्षा आहे आणि त्यादृष्टीने सुधारणा करावयाची आहे. डीपीआर दाखविलेला आहे आणि आय.एल.ॲण्ड एफ.एस. या कंपनीला कन्सलटन्ट म्हणून नेमलेले आहे. राज्याच्या आय.टी.विभागाच्या अंतर्गत याला मान्यता मिळाल्यानंतर एका वर्षामध्ये बहुतांशी सॉफ्टवेअर नव्याने तयार करता येतील. यामुळे डी.बी.-२ श्रेणीवाढ (अपग्रेड) होण्यासारखे आहे. १७ कार्यालयांचा प्रश्न सुटणार आहे. यामध्ये गोंदिया आणि गडचिरोली हे विभाग याला जोडलेले आहेत काय ? समितीने अशी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, गडचिरोली, गोंदिया येथे १५ दिवसामध्ये स्वॉनची (SWAN) प्रक्रिया पूर्ण होणार आहे. एकंदर ६१ कार्यालयांपैकी १९ कार्यालये भाडयाच्या इमारतीमध्ये कार्यरत आहेत. या कार्यालयांना जागा मिळण्यासाठी प्रयत्न केला आहे काय ? अशी समितीने विचारले असता त्यावर विभागीय प्रतिनिधींना गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया या तीन ठिकाणी जागेचा प्रश्न सुटलेला आहे असे समितीस सांगितले.

३.३९ मुंबई येथील कार्यालयाच्या अपग्रेडेशन बाबत समितीने विचारणा केली असता, विभागाने खुलासा केला की, सेवायोजन कार्यालयाची तीन-चार कार्यालये नमुना म्हणून करण्याचा विचार असून, त्यासाठी काही नुतनीकरणाचे आणि दुरुस्तीचे काम करावे लागणार आहे. सध्या सहा कार्यालयाची कामे हाती घेत आहोत आणि तीन कार्यालयांच्या बाबतीत अंदाजपत्रक तयार करुन ते शासनाकडे सादर केलेले आहे. याबाबत समितीने असे मत व्यक्त केले की, सदरहू कार्यालये अशी असावयास पाहिजेत की जेणेकरुन तेथे आल्यानंतर लोकांचा आत्मविश्वास वाढला पाहिजे. मात्र यापूर्वी सदनामध्ये या विषयाच्या प्रश्नाच्या संबंधात माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते की, आम्ही मुंबई येथील

सेवायोजन कार्यालय बंद करण्याच्या मनस्थितीमध्ये आहोत आणि "We are not the service providers. We are only the mediators." आणि ही माहिती वर्तमानपत्रामध्ये देखील छापून आली होती. आम्ही सगळ्यांना नोकरी देण्याचे काम सार्वजनिक खाजगी भागीदारी मधून करणार आहोत. याबाबत आज नेमकी काय परिस्थिती आहे ? त्यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केली की, केंद्र शासनाने मिशन मोड प्रोजेक्टमध्ये देशातील सर्व सेवायोजन कार्यालये अद्ययावत करणे आणि त्याचे करिअर गायडन्स् ॲण्ड कौन्सिलिंग सेंटरमध्ये रुपांतरीत करण्याचा निर्णय घेतलेला आहे. असे झाले तरी सेवायोजन कार्यालय सुरु राहील आणि ते बंद होणार नाही. कौन्सिलिंग करावयाचे असेल तर उमेदवारांची ॲप्टीट्युड टेस्ट घ्यावी लागेल. त्या टेस्टमुळे ही बाब लक्षात येईल की, ते कोणत्या नोकऱ्या करण्यासाठी तयार आहेत आणि त्यानुसार त्यांना कामाच्या संबंधातील प्रशिक्षण देणे, नेमणूक करणे सोपे होते. मात्र यासाठी शासकीय यंत्रणा पूर्णपणे सक्षम नाही. त्यामुळे आपल्याला हे काम सार्वजनिक खाजगी भागीदारीमध्ये करावे लागणार आहे. अशा प्रकारे यामध्ये सांगड घालावी लागेल आणि मग नवीन सेवायोजन कार्यालय समोर येणार आहे.

ही बाब महत्वाची असून तोच याचा मूळ उद्देश आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सेवायोजन कार्यालय बंद होणार नाहीत असे समितीस सांगितले.

३.४० सेवायोजन कार्यालयाचा जो मुख्य गाभा आहे, तो बंद होता कामा नये. कारण समाजाला त्याची गरज आहे. आजही ग्रामीण भागातील माणसाने सेवायोजन कार्यालयामध्ये जावून नाव नोंदविले आणि त्याला कार्ड मिळाले की, त्याला दहा वर्षांनी तरी नोकरी मिळेल अशी खात्री वाटते. सेवायोजन कार्यालयामध्ये नाव नोंदविण्यासाठी गेल्यानंतर कोणती व्यक्ती कोणत्या भागातील आहे ? तसेच स्थानिक लोक किती आहेत ? हे समजले पाहिजे. याविषयी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी समितीला विहित केले की, विभाग सदरहू विषय पहात नाही, कारण हा विषय विभागाच्या अखत्यारीतील नसल्यामुळे त्याबाबत तपासणी करीत नाही.

३.४१ समितीने विचारणा केली की, कंपनीच्या वेतन पटावर ठेकेदार ठेवलेले असतात आणि तेच कर्मचारी नेमतात. ही बाब विभागाच्या डायरेक्ट किंवा इन-डायरेक्ट कक्षेतील नसेल, पण तुमच्या धोरणावर याचा परिणाम होत नाही काय ? त्यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, आता केंद्र शासनाने आणि उच्च व तंत्रशिक्षण विभागाने विचार केला आहे की, तरुणांमध्ये कौशल्य निर्माण केले, ते विकसित केले तर आपोआप नोकरी मिळणार आहे. तसेच मुलांनी व्यक्तिमत्व चांगले ठेवणे आवश्यक आहे.

३.४२ यावर समितीने असे मत व्यक्त केले की, प्रसार माध्यमातून याचा प्रचार आणि प्रसार व्हावयास पाहिजे. पूर्वी दूरदर्शन वरील बातमी पत्रामध्ये रोजगाराच्या उपलब्धतेबाबत माहिती देण्यात येत असे. जेणेकरुन महाराष्ट्रामध्ये कुठे आणि कोणत्या नोकऱ्या उपलब्ध आहेत ते उमेदवारांना समजत असे. परंतु आता तशा प्रकारची माहिती देणे बंद करण्यात आले आहे. त्यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, डेटा बेसमध्ये ३० लाख उमेदवारांची नावे आहेत. यातील ५ लाख उमेदवारांकडे भ्रमणध्वनी नंबर आहेत, पण ते अद्ययावत नाहीत. सदरहू नंबर अद्ययावत करण्याबाबत त्यांना सांगण्यात येते जेणेकरुन संबंधितांना संदेश पाठविता येतील. स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे झाल्यानंतरही आज उमेदवारांना त्यांच्या मनाप्रमाणे फारशी सेवा देता येत नसल्यामुळे त्यांच्यामध्ये उदासिनता आहे. मात्र त्यांना चांगल्या प्रकारे माहिती मिळाली तर ते जास्त काम करु शकतील. आता सुरक्षा लेखापरीक्षण संपलेले असल्याने, विभाग त्यांना चांगल्या प्रकारे माहिती देऊ शकतो.

३.४३ रोजगार व स्वयंरोजगार विभागाने तयार केलेल्या ई-गव्हर्नन्सच्या प्रकल्पाबाबत विभागीय प्रतिनिधींनी समितीला माहिती देतांना सांगितले की, संपूर्ण राज्यामध्ये सेवायोजन कार्यालयांची संख्या ६१ असून त्यापैकी ४५ रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामधून रोजगार मित्र प्रणालीद्वारे दैनंदिन कामकाज पाहिले जाते. ३२ कार्यालये जिल्ह्यामध्ये आहेत. ६ युनीव्हर्सिटी आहेत. सेवा योजन कार्यालयाचे मुख्य काम उमेदवारांकडून नावे नोंदविणे हे आहे. संपूर्ण राज्यात ४१ हजार नियोक्ते आहेत. रिक्त जागांची संख्या व उमेदवारांची संख्या लक्षात घेऊन पाठवणी केली जाते व उमेदवारांना त्यांच्याकडे पाठविले जाते. केंद्र शासनाच्या कायद्यानुसार एका खाजगी संस्थेत २५ पेक्षा जास्त कर्मचारी असतील तर त्या संदर्भातील माहिती गोळा करुन केंद्र शासनाकडे जाते. तसेच शासकीय संस्थांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची माहिती देखील गोळा केली जाते. सध्या अस्तित्वात असलेले रोजगार मित्र नावाचे सॉफ्टवेअर आता बरेच जुने झाले आहे. आता जे सॉफ्टवेअर प्रस्तावित आहे ते वेबसाईट बेस्ड आहे. यामध्ये ऑनलाईनची सुविधा दिलेली आहे. रोजगार वाहिनी या भागाचे एकत्रीकरण करुन एक सर्वसमावेशक असा ई-गव्हर्नन्स प्रकल्प प्रस्तावित केलेला आहे. त्याकरिता एक उच्चाधिकार समिती गठीत केलेली असून या प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर तो विकसनाची सुरुवात केली जाईल.

३.४४ नवीन प्रस्ताव आणण्याचे कारण असे आहे की, रोजगार मित्र नावाचे सॉफ्टवेअर बरेच जुने झाले होते. यामध्ये एकूण ४५ ठिकाणी उमेदवारांच्या नावांची नोंदणी केली जाते. संपूर्ण डेटा एका केंद्रावर ठेवला जातो. काही बदल करावयाचा असल्यास तो हाताने करावा लागतो. या आज्ञावलीमध्ये हा बदल आपोआप होत नाही. तसेच एका ठिकाणी केलेला बदल पुन्हा सर्वत्र करावा लागतो. लातूर

जिल्ह्यामध्ये जागा रिक्त असेल व बीड जिल्ह्यामध्ये उमेदवार असल्यामुळे तेथे कळवायचे असेल तर या आज्ञावलीमध्ये अपडेट करता येत नाही. तसेच एका ठिकाणी काही बदल केला तर त्या संबंधी इतर केंद्रातील ४५ लोकांना बोलावून प्रशिक्षण द्यावे लागते व प्रत्येक ठिकाणी दुरुस्ती करावी लागते. या आज्ञावलीचा विकास टप्प्याटप्प्याने केलेला आहे. तांत्रिकदृष्ट्या आज्ञावलीमध्ये कोणताही दोष नाही. मात्र काम करताना संगणकीकरणाच्या संदर्भात ज्या प्रमाणे आवश्यकता भासेल त्या प्रमाणे पूरक आज्ञावली तयार केली गेली. त्यामुळे ही संपूर्ण पद्धत विकेंद्रित झाली. आता ही आज्ञावली ओरॅकल वरून डीबीटू केली आहे. या सर्व बाबींचा विचार ही नवीन आज्ञावली तयार करताना केला गेला आहे. तसेच शेवटच्या थरापर्यंत पोहचण्याच्या दृष्टीकोनातून राज्यामध्ये एकूण ११५०० महा-ई-सेवा केंद्रे तयार केली जाणार आहेत. त्या संदर्भात प्रस्ताव सादर केलेला आहे. लोकांना किरकोळ गोष्टींसाठी गावातून किंवा तालुक्याहून जिल्हा पातळीवर येण्याची गरज भासणार नाही. आज आपल्याला माहीतच असेल की, इंटरनेटपेक्षा मोबाईल फोनची संख्या अधिक प्रमाणात वाढली आहे. म्हणून आम्ही मोबाईल फोन वरुन एसएमएस किंवा ॲलर्ट देण्याची योजना राबविणार आहोत. या करिता मुंबई, पुणे येथे १ जानेवारी, २०११ पासून एक पायलट प्रोजेक्ट सुरु करण्यात आला आहे. आता पर्यंत साधारणपणे ११ हजार एसएमएस व ॲलर्टस या योजनेच्या माध्यमातून पाठविण्यात आले आहेत. एखाद्या उमेदवाराचे नाव सेवायोजन कार्यालयामध्ये नोंदविले असल्यास त्याबाबत खाजगी कंपनीला माहिती दिली जाते. मात्र उमेदवार व सदरहू कंपनी यांच्यामध्ये सुसंवाद साधता येत नव्हता. यामुळे उमेदवारांना आपले नाव कोणत्या कंपनीतील रिक्त जागेकरिता पाठविले आहे, याची माहितीच नसायची. आता जो पायलट प्रोजेक्ट सुरु केलेला आहे, त्यामध्ये उमेदवारांनी दिलेल्या मोबाईल क्रमांकावर त्यांचे नाव कोणत्या कंपनीतील कोणत्या पदाकरिता सुचविण्यात आले आहे, या बाबत एसएमएस पाठविला जाणार आहे. यामुळे उमेदवारांना कंपनीशी थेट संपर्क साधता येणार आहे. अशा प्रकारे आपली पोहोच वाढविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. अशा प्रकारच्या निरनिराळ्या योजनांमुळे उमेदवारांना स्थानिक पातळीवरुन जिल्हा पातळीवर येण्याची गरज राहणार नाही.

३.४५ गाव पातळीवर या योजनेचे स्वरुप काय राहणार आहे ? असे समितीने विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, आता जी नवीन प्रणाली सुरु केली जाणार आहे, ती वेब बेस्ड आहे. सध्या आपल्याकडे जो केंद्रीभूत डेटा आहे, त्या माध्यमातून आपल्याला संपर्क साधता येणार आहे. या नवीन प्रणालीमुळे सध्या जी माहिती आपल्याला उपलब्ध आहे, ती माहिती सर्व जिल्ह्यांमधील कार्यालयांशी शेअर करता येईल. संपूर्ण राज्यामध्ये किती लिपिक व टंकलेखकांची पदे रिक्त आहेत, ही

माहिती काढावयाची असेल तर जुन्या पद्धतीप्रमाणे सर्व ४५ ठिकाणाहून माहिती मागवावी लागेल. मात्र नवीन पद्धतीनुसार, ही सर्व माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होऊ शकेल. ही कार्यप्रणाली सुरु करण्यास साधारपणे २ ते ३ महिन्यांचा कालावधी लागेल. एखाद्या जिल्ह्यामध्ये जागा रिक्त असतील व दुसऱ्या जिल्ह्यामध्ये उमेदवार उपलब्ध असतील तर त्या बाबत उमेदवारांना कळविता येईल. जास्तीत जास्त लोकांचे स्थलांतर थांबावे हा देखील यामागचा एक प्रमुख उद्देश आहे. सध्या खेडे गावातून माणसांचा लोंढा शहरी भागामध्ये रोजगार मिळविण्यासाठी येत आहे. त्यांना तेथेच काम मिळण्यास या योजनेमुळे मदत होणार आहे.

३.४६ लहान गावांमध्ये देखील ही योजना राबवली जाणार आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, सध्या ११५०० कॉमन सर्व्हीस सेंटर्स आहेत. या केंद्रांमधून दिल्या जाणाऱ्या सेवांकरिता किती दर आकारले जावेत या संदर्भातील प्रस्ताव मंजुरीकरिता मंत्रीमंडळासमोर ठेवला जाणार आहे. तालुका पातळीवरील तंत्र शाळा व अभियांत्रिकी महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व किऑस्क इ. माध्यमातून रोजगारविषयक सेवांचे कामकाज करणे प्रमाणित आहे.

३.४७ समितीने विचारणा केली की, आतापर्यंत जी पद्धत वापरात होती ती आता कालबाह्य झालेली आहे. म्हणून सध्या नवीन कार्यप्रणाली अंमलात आणली जाणार आहे. तंत्रज्ञानामध्ये सतत बदल होत असतो. आता आपण नवीन कार्यप्रणाली तंत्रज्ञानावर आधारित करीत आहोत. समितीची अशी सूचना आहे की, भविष्यामध्ये तंत्रज्ञानामध्ये कोणते बदल होणार आहेत, या अनुषंगाने पद्धती तयार केली गेली पाहिजे. अन्यथा ही पध्दती वापरात येईपर्यंत ती कालबाह्य होऊन जाईल. सेवायोजन कार्यालयाद्वारे हजारो लोकांना रोजगार उपलब्ध करुन दिला जातो. हा प्रश्न सर्वसामान्यांशी निगडीत आहे. तसेच रोजगारासाठी खेड्यामधून शहरी भागांमध्ये होणाऱ्या स्थलांतराचा प्रश्न देखील महत्वाचा आहे. गावातील माणसाला तेथेच कामधंदा मिळाला पाहिजे. त्यांना तेथेच रोजगार मिळाला तर त्यांचे शहरी भागामध्ये होणारे स्थलांतर कमी होईल. कोणतीही योजना कितीही चांगली असली तरी देखील त्या योजनेची अंमलबजावणी कशी केली जाते, हा देखील एक महत्वाचा प्रश्न आहे. एखाद्या उमेदवाराने एखाद्या कंपनीमध्ये सेवायोजन कार्यालयामार्फत अर्ज केल्यास आपल्याला त्या बाबतीतील अभिलेख देखील ठेवावा लागेल. संबंधित उमेदवाराला नोकरी मिळाली की नाही, तसेच किती पदे रिक्त आहेत या दोन्ही गोष्टींचा आपल्याला समन्वय ठेवावा लागेल. आपल्याकडे केवळ बेरोजगारांची आकडेवारी उपलब्ध असते. मात्र किती लोकांना रोजगार मिळाला व किती जणांना रोजगार अद्याप मिळालेला नाही,

त्यांची सविस्तर आकडेवारी अंतर्भूत करणे आवश्यक आहे. त्यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, तंत्रज्ञान सतत बदलत असते. आज्ञावली तयार करुन तिची अंमलबजावणी करीपर्यंत नवीन तंत्रज्ञान आलेले असते. आता हा प्रकल्प तयार करताना ही काळजी घेण्यात आलेली आहे. पूर्वी मॅन्युअली गव्हर्नन्सचे काम होत होते. या नंतर ई-गव्हर्नन्स आले. आता एम-गव्हर्नन्स म्हणजेच मोबाईल टेक्नोलॉजीचा वापर वाढत आहे. समितीने या ठिकाणी केलेल्या ज्या सूचना आहेत त्या फार महत्वाच्या असून त्या तज्ज्ञांकडे पाठविण्यात येतील.

३.४८ नवीन टेक्नॉलॉजीमुळे आपल्या जबाबदाऱ्या वाढणार आहेत. आपली जबाबदारी केवळ हे सादरीकरण करून संपत नाही तर पुढच्या काळात तंत्रज्ञानामध्ये जे बदल होणार आहेत ते आपल्याला अंतर्भूत करावे लागणार आहेत. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, नवीन तंत्रज्ञानामुळे आपल्याला कामाची गती आणि कामात अचूकता मिळणार आहे. नवीन तंत्रज्ञानामुळे १० तासाचे काम दोन तासात पूर्ण होणार असून यामध्ये चुका अजिबात होणार नाहीत. परंतु निर्णय घेण्याची क्षमता आणि विश्लेषण करण्याचे काम माणसाकडून होणार आहे. ज्या ठिकाणी रोजगाराची संधी उपलब्ध आहे अशा ठिकाणी नावे पाठविणे व त्याचा पाठपुरावा करणे महत्वाचे आहे. उमेदवारांना नोकरी लागली. परंतु, दोन-तीन वर्षानंतर त्या उमेदवाराला कामावरुन काढून टाकले तर अशा उमेदवारांचे पुन्हा प्रश्न निर्माण होतील. त्यासाठी आपल्याला काही तरी तरतूद करावी लागणार आहे. या प्रस्तावात अंतर्गत पत्रव्यवहार, पत्ते अशी सर्व माहिती ठेवली नाही तर आपण या कामाला पूर्ण न्याय देऊ शकणार नाही. सर्व माहिती अद्ययावत ठेवली तरच उमेदवारांना न्याय देता येऊ शकेल.

३.४९ या प्रणालीचे फायदे पुढील प्रमाणे आहे. सरळ वेब साईटद्वारे व हेल्पलाईनद्वारे दुरस्थ व दुर्गम ठिकाणावरुनही नाव नोंदणी, नुतनीकरण व पात्रता वाढ सहज करणे शक्य आहे. रोजगार विषयक माहितीची वेबसाईट उपलब्धता, ॲटोमॅटेड जॉब मॅचिंग व अलर्टमुळे सुयोग्य रोजगार मिळणे सुकर होईल. सध्याच्या उमेदवाराच्या डेटामध्ये गुणात्मक दर्जा वाढीमुळे नोकरी मिळण्याच्या संधीत वाढ होईल. उमेदवारापर्यंत थेट सेवा उपलब्धतेमुळे संघटीत व असंघटीत क्षेत्रातील गरजूंना त्याचा फायदा होईल. हेल्पलाईनद्वारे ऑन कॉल रोजगार सेवा उपलब्ध होईल. सर्व लाभार्थी घटकांना लॉग-ईनची सुविधा प्राप्त होईल. उमेदवाराला नोकरी मिळाल्यानंतर त्याचा आढावा घेतला जातो. पूर्वी नोंदणी मॅन्युअल पद्धतीने केली जात असल्यामुळे उमेदवारांना फार भटकावे लागत होते. परंतु आता उमेदवारांना रजिस्टर्ड लॉग-ईन देण्यात येणार आहे. रजिस्टर्ड लॉग-ईनमुळे उमेदवारांचे वर्गीकरण करुन नावे संबंधितांकडे पाठविता येतील. ज्या ठिकाणी नोकरीची संधी उपलब्ध आहे अशा ठिकाणी

योग्य व अर्हताप्राप्त उमेदवार पाठविता येतील. आता नोकरी डॉट कॉम आणि इतर खाजगी कंपन्यांकडून अशा प्रकारची कामे केली जात आहेत. या कंपन्या उमेदवारांकडून मोठ्या प्रमाणात पैसे उकळत आहेत. खरे म्हणजे एक महिन्याचा पगारच या कंपन्या घेत आहेत. परंतु खाजगी कंपन्याच्या तुलनेत आपण उमेदवारांकडून फार कमी शुल्क घेत असतो. आपली सिस्टीम योग्य पद्धतीने अद्ययावत झाल्यानंतर जास्त उमेदवार आपल्याकडे आकर्षित होतील व त्यातून आपल्याला चांगला महसूल सुद्धा मिळू शकेल. यासंदर्भात समितीने असे मत व्यक्त केले की, खाजगी कंपन्या उमेदवारांची ज्या पद्धतीने लूट करीत आहेत त्यासाठी कडक कायदा करण्याची गरज आहे. नोकऱ्या मिळवून देण्यासाठी बोर्ड लावून धंदा सुरु केला जातो. या सर्व प्रकाराला आळा घालण्यासाठी केंद्र शासनाने कायदा करण्याची आवश्यकता आहे. केंद्र शासनाने कायदा केल्यामुळे तो कायदा सर्व राज्यांना लागू राहील. ज्या कंपन्या उमेदवाराना नोकऱ्या उपलब्ध करुन देतात त्यांच्यावर कडक बंधने घालण्याची आवश्यकता आहे. त्यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, खरे म्हणजे खाजगी कंपन्याचे रॅकेटच आहे. उमेदवारांची मोठ्या प्रमाणात फसवणूक केली जात आहे. अमेरिकेमध्ये एक बोगस युनिर्व्हसीटी उघडलेली आहे त्याची माहिती टीव्हीवरुन सुद्धा देण्यात आलेली आहे. त्यामुळे या पद्धतीला आळा घालण्यासाठी एक-दोन महिन्यात कायदा केला जाणार आहे. ज्या कंपन्या उमेदवारांना नोकऱ्या उपलब्ध करुन देतात त्या कंपन्या खरे म्हणजे नोंदणीकृत असल्या पाहिजेत. यासंदर्भात कायदा करण्याचे काम सुरु असून या कायद्याच्या संदर्भात लोकांच्या सूचना सुद्धा मागविल्या जाणार आहेत.

३.५० काही कंपन्या आपल्या येथील उमेदवारांना परदेशात नोकरीसाठी पाठवितात परंतु तेथे गेल्यानंतर त्या उमेदवारांची ज्या रोजगारासाठी नियुक्ती झाली होती तो रोजगार न देता इतर काम दिली जातात. या उमेदवारांना परत भारतात येण्यासाठी सुद्धा मोठ्या प्रमाणात अडचणींना तोंड द्यावे लागते. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, यासाठीच कायदा करण्यात येणार असून उमेदवारांना नोकरी देणाऱ्या कंपन्यांना सक्तीची नोंदणी राहणार आहे. यासंदर्भात विभागाची कार्यवाही सुरु असून उमेदवारांची फसवणूक होणार नाही यासाठी कडक कायदा केला जाणार आहे.

३.५१ यासंदर्भात समितीने मत व्यक्त केले की, आपल्याला केंद्र शासनाशी संलग्न कायदा करावा लागणार आहे. असे जर झाले तर संपूर्ण राज्यांना याचा फायदा होऊ शकेल. कोणत्याही राज्यातील कंपनी असली तरी त्या कंपनीला हा कायदा लागू होईल. त्यामुळे हा कायदा केंद्र शासनाशी

निगडीत असला पाहिजे. त्यावर केंद्र शासनाने असा कायदा केलेला नाही, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

३.५२ केंद्र शासनाने या संदर्भात कायदा केलेला नसल्यामुळे या कंपन्याना रान मोकळे झालेले आहे. आपण जो कायदा करणार आहोत त्याचा फायदा इतर राज्यांनी घेतला तरी सुद्धा चांगले होईल. खरे म्हणजे आपल्या राज्याने जे कायदे केलेले आहेत ते कायदे इतर राज्यांनी सुद्धा केलेले आहेत इतकेच नव्हे तर आपली रोजगार हमी योजना सुद्धा केंद्र शासनाने सुरु केलेली आहे. आपल्या राज्यात हा कायदा पहिल्यांदा सक्तीचा करण्याची गरज आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, आता जी पद्धती अवलंबविण्यात येणार आहे. त्याचा फार चांगला उपयोग होणार आहे. सरळ वेब साईटद्वारे, हॉन्डेल्ड व हेल्पलाईनद्वारे दुरस्थ व दुर्गम ठिकाणावरुनही नोंदणी व माहितीत सहज बदल करणे शक्य होणार आहे. संवैधानिक विवरणपत्रे भरणे व रिक्त पदे अधिसुचित करणे सहज शक्य होईल. कसुरदार नियोक्त्यांना सहजपणे शोधून स्वयंचित सूचना देणे शक्य होणार आहे. सुयोग्य उमेदवारांचा गरजेप्रमाणे शोध घेता येईल. सध्याच्या नियोक्ते डाटामुळे गुणात्मक दर्जात वाढ होईल. रोजगार मेळावे, विवरणपत्रे, विविध योजना विषयक माहितीच्या सूचना मिळू शकतील. गरजेप्रमाणे स्वयंचलित नोकरी इच्छूक उमेदवारांना प्रोफाईल मॅचिंग सुविधा उपलब्ध होणार आहे. व्यक्तिगत व अद्ययावत लॉग-ईन सुविधा मिळू शकेल. केंद्रिभूत डाटाबेस उपलब्ध होणार आहे. या प्रणालीमध्ये कमीत कमी मानवी हस्तक्षेप राहणार आहे. या प्रणालीमुळे मानवीय श्रमाची बचत होणार आहे. पारदर्शकतेत वाढ होणार आहे. केंद्रिभूत डाटा-विश्लेषण व अहवाल व्यवस्थापन प्रणाली राहणार आहे. अधिक परिणामकारक, प्रतिसादात्मक व वेळीच सेवा उपलब्ध होणे शक्य होणार आहे. या प्रणालीमुळे सेवाकार्य खर्चात बचत होणार आहे. विविध शासकीय विभागाच्या माहितीची सहज देवाण-घेवाण शक्य होणार आहे. कोणत्या क्षेत्रात किती जागा रिक्त आहेत याची माहिती या प्रणालीमुळे मिळणार आहे. ज्या ठिकाणी ज्या उमेदवारांची आवश्यकता आहे असेच उमेदवार संबंधितांना उपलब्ध करुन दिले जाणार आहेत. केवळ शहरीच नाही तर ग्रामीण भागातील उमेदवारांना या प्रणालीचा लाभ मिळणार आहे.

३.५३ कामगार विभागाकडे या संदर्भात एक समिती आहे. त्यामुळे या समितीशी समन्वय असण्याची आवश्यकता आहे. आता कारखाने बंद पडत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात लोकांना नोकरीची गरज आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, राज्याच्या मुख्य सचिवांच्या स्तरावर यासंदर्भात रोजगार व स्वयंरोजगार विभाग, तंत्रशिक्षण विभाग आणि

कामगार विभागांच्या सचिवांची एक समिती आहे. या विभागाचा एकमेकांशी अधिक समन्वय असण्याची आवश्यकता आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली अपेक्स समिती आहे. यावर समितीने पुढे असे निदर्शनास आणून दिले की, माननीय मुख्यमंत्र्यांकडे बऱ्याच समित्या असल्यामुळे या समितीची बैठक २-२ वर्षे होत नाही. प्रत्येक बैठकीसाठी माननीय मुख्यमंत्री महोदयांना उपस्थित राहणे शक्य होत नाही. आतापर्यंत जेवढ्या समित्या स्थापन झाल्या आहेत त्याचा आपल्याला अनुभव आहे. नुसत्या समित्या स्थापन करुन काहीही होत नाही. आपण आपल्या अनुभवातून शिकावयास पाहिजे. तसेच या संदर्भात समितीची सूचना आहे की, तीनही विभागाच्या संबंधित सचिवांनी समन्वय साधून काम केले पाहिजे. या बैठकीचा आढावा तीन महिन्यात उपलब्ध झाला तर चांगले होईल. त्यावर विभागीय प्रतिनिधींनी समितीच्या सूचनांची नोंद घेण्यात आली असल्याचे असे समितीस सांगितले.

३.५४ विभाग जी सेवा पुरविणार आहे. त्यासाठी काही शुल्क घेतले जाणार आहेत काय ? टेक्नॉलॉजी चालविण्यासाठी विभागास पैशांची गरज पडणार आहे काय ? असे समितीने विचारले असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, डी सेट्रलाईजचा प्रस्ताव देण्यात आलेला आहे. कॉमन सर्व्हीस सेंटर काढण्यात येणार असून त्यासाठी शुल्क आकारणे प्रस्तावित आहे. त्यावर समितीने विचारणा केली की, नवीन तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त फायदा कसा घेता येईल हे पाहिले पाहिजे. एका उमेदवाराकडून किती पैसे आकारले जाणार आहेत व या व्यवहाराची निविदा काढण्यात आलेली आहे काय, तसेच यामधून शासनाला किती टक्के महसूल मिळणार आहे ? याबाबत विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, जे उमेदवार आपलया प्रणालीचा फायदा करून घेतील अशा उमेदवारांकडून प्रत्येकी २०/- रू शुल्क व नुतनीकरणासाठी १५/- रुपये शुल्क आकारले जाईल. जे उद्योजक आपल्याकडून सेवा मागतात त्यांच्याकडून १०० रु. घेतले जातात. या कामासाठी एचपीसीची मान्यता मिळाल्यानंतर निविदा काढण्यात येणार आहे. यामधून शासनाला २० टक्के निधी मिळणार आहे. गावपातळीवर स्पॅन्को, सी.एन.एस. व रिलायन्स या कंपन्या सेवा केंद्रे उघडणार आहेत. गावपातळीवरील एजन्सीला ८० टक्के निधी देण्यात येणार आहे.

३.५५ गाव पातळीवर तीन एजन्सी आहेत. त्या सेवा केंद्रे काढणार आहेत त्यांनी तीन कोटी उमेदवारांची नोंदणी केली तर त्यांना ६० कोटी रुपये मिळतील अशी तरतूद यामध्ये आहे. शासनाचा महसूल कसा वाढेल याचा विचार होण्याची आवश्यकता आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता

विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, यासंदर्भातील प्रस्ताव राज्य शासनामार्फत तयार केला जाणार असून तो प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात येणार आहे.

३.५६ नाव नोंदणीमधून किती उत्पन्न मिळणार याचा अंदाज विभागाने घेतला असेल. निविदा काढण्या अगोदर याबाबत निश्चिती होणे आवश्यक आहे. नोंदणीची प्रक्रिया प्रतिदिन चालू राहणार आहे. हा पसारा दिवसेंदिवस वाढत जाणार असून १०० ते २०० कोटी रुपयांपर्यंत हा व्यवहार जाईल. त्यामुळे आता जी सेवा केंद्रे सुरु करण्यात येणार आहेत ती कोण चालविणार आहेत. अशी विचारणा समितीने केली असता या संदर्भातील सविस्तर कार्यवाही येत्या तीन महिन्यात माहिती तंत्रज्ञान विभागातर्फे करण्यात येणार आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

३.५७ रोजगार व स्वयंरोजगार यामध्ये दिवसेंदिवस वाढ होणार आहे त्यामुळे उत्पन्न वाढतच राहणार आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, यामध्ये ८० टक्के रक्कम संबंधितांना व २० टक्के रक्कम शासनाला मिळणार आहे. संबंधित विभागाला त्यातील दहा टक्के रक्कम मिळणार आहे. आता तरी ही मर्यादा ८० टक्के ठरविण्यात आलेली आहे. पुढे यामध्ये बदल करता येऊ शकेल.

३.५८ शासनाला २० टक्के रक्कम मिळणार आहे त्यामध्ये वाढ व्हावी या दृष्टीकोनातून प्रस्ताव तयार करावयास पाहिजे ही सर्व प्रक्रिया करीत असताना यातून रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात असा मुख्य हेतू आहे. एखाद्या आस्थापनेकडे एजन्सीनी चार माणसे पाठविली. त्यांनी ती ठेऊनच घेतली पाहिजे असे त्यांच्यावर बंधन नाही. अशा प्रकारे दोन किंवा तीन वेळा त्यांनी अशी माणसे परत पाठवून दुसरीच माणसे कामावर ठेवली तर त्याला आळा घालण्यासाठी काय उपाययोजना करण्यात येणार आहे. असे प्रकार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासंदर्भातील नियोजन कसे करण्यात येणार आहे. याबाबतची माहिती देण्याची आवश्यकता असल्याचे समितीने सूचित केले असता विभागीय प्रतिनिधींनी समितीला असा खुलासा केला की, तालुका किंवा सर्कल पातळीवरुन ही कार्यवाही करावयाची आहे. याबाबत कर्नाटक राज्याकडून माहिती मागविण्यात येत आहे. उद्योजक तेथे येऊन पी.पी.पी.च्या माध्यमातून अगोदर छाननी करतात तशी पध्दत त्यांनी सुरु केली आहे. यासंदर्भात अगोदर शॉर्ट लिस्ट तयार करण्यात येते.

३.५९ सर्वेक्षण करुन सेवा केंद्रांना परवानगी दिल्यानंतर त्यांनी अशा प्रकारची दुकाने उघडू नयेत. याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. कारण या व्यवसायाची उलाढाल दिवसेंदिवस वाढत

जाणार आहे. यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, राज्य स्तरावरुन ही सेवा केंद्रे आय.टी.विभागामार्फत वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

३.६० राज्यामध्ये सेवा केंद्र सुरु करण्यासाठी ज्या संस्थांना मंजुरी दिली आहे. त्यांची निवड कोणत्या निकषावर करण्यात आली. निवडीसाठी कोणत्या अटी व शर्ती विहित केल्या आहेत. तसेच त्या संस्थांवर राज्य शासनाने नियंत्रण कशा प्रकारे असणार आहे व किती सेवा केंद्रे दिली जाणार आहेत, त्यांच्याकडून किती पैसा मिळणार आहे अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, दरवर्षी सात ते साडे सात लाख नोंदणी होणार आहेत. यामध्ये दरवर्षी दहा ते पंधरा टक्के वाढ होणे अपेक्षित आहे. त्यामुळे दरवर्षी एक ते दीड लाख उमेदवार नोंदणी करतील ही सायकल दरवर्षी चालू राहणार आहे. यासाठी एक वेबसाईट तयार करण्यात येणार आहे.

३.६१ किती सेवा केंद्र उभारण्याचा निर्णय माहिती व तंत्रज्ञान विभागाने घेतला आहे, निविदा काढण्यात आली आहे काय ? यासंदर्भातील सविस्तर निर्णयाची एक लेखी प्रत समितीला सादर करण्यात यावी असे समितीने सूचित केले. समितीच्या सूचनेनुसार याबाबतची माहिती संदर्भात विभागाने माहिती व तंत्रज्ञान विभागाचा दिनांक ३ डिसेंबर, २००८ रोजीचा शासन निर्णय समितीस सादर केला. **(विवरण पत्र क्र.१०)**

३.६२ सरकारचा महसूल किती वाढणार आहे याची पाहणी करण्याचे काम लोकलेखा समितीचे आहे. या सेवा केंद्राची पुढे दुकाने होऊ नयेत, असे समितीला वाटते. कोणत्याही चर्चेतून आऊटपूट निघाला पाहिजे त्या दृष्टीकोनातून ही प्रक्रिया पारदर्शक होणे आवश्यक आहे. या समितीचे महत्व आपणा सर्वांना माहिती आहे. या सेवा केंद्रामुळे उद्योजक यांचा फायदा व्हावा असा दृष्टीकोन यामध्ये असता कामा नये. रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे उद्दिष्ट स्पष्ट आहे की, बेरोजगारांना रोजगार मिळाला पाहिजे. यामध्ये कोणतीही दुकानदारी होऊ नये अशी अपेक्षा आहे. माहिती व तंत्रज्ञान विभागाने आता २०० कोटी रुपयांचे उत्पन्न असतांना २० टक्के वाटा शासनाला मिळेल असे निश्चित केले आहे. भविष्यात हा व्यवसाय २००० कोटी रुपयांवर गेला तर २० टक्क्यांचे प्रमाण वाढविले पाहिजे, असे समितीला वाटते. ग्रामीण भागात इंटरनेट सुविधा नाहीत. त्यामुळे प्रत्येक ग्रामपंचायतीला इंटरनेट कनेक्टिव्हिटी मिळणार नाही. त्यासाठी एखादे डाटा फिडर सेंटर तालुक्याच्या किंवा सर्कलच्या ठिकाणी करण्यात येणार आहे काय ? How are you going to link up village population or people with this system? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, समितीने केलेली सूचना महत्त्वाची आहे. सेवा केंद्र सुरु करताना सर्व गोष्टींचा विचार करावा लागणार आहे. ही

प्रक्रिया अधिक लोकाभिमुख करण्यात येणार आहे. जी सेवा केंद्रे प्रस्तावित केली आहेत. त्यानुसार कामे करावी लागणार आहेत. रोजगार व स्वयंरोजगार सेवा केंद्रात नावे नोंदविण्यासाठी जास्तीत जास्त प्रचार व प्रसार करण्यात येणार आहे.

३.६३ बेरोजगार भत्ता या योजनेशी संलग्न केला आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, बेरोजगार भत्ता देणे बंद केलेला आहे. सेवा केंद्राकडून नोंदणी केल्याचा फायदा होणार आहे. जेव्हा केव्हा बेरोजगार भत्ता देण्याचा प्रश्न निर्माण होईल तेव्हा सर्व माहिती शासनाकडे अपडेट असेल. त्यामध्ये अचानक अशी कोणतीही वाढ होऊ शकणार नाही. यावर समितीने विचारणा केली की, ही सर्व चर्चा येथे करीत असताना असंघटित क्षेत्रात जे कामगार आहेत त्यांना सक्षम करण्याबाबत येथे काहीच दिसून येत नाही. या असंघटित क्षेत्रातील कामगारांना नियमित करण्याबाबत काय करण्यात येणार आहे. याबाबत शासनाचे नेमके धोरण काय आहे हे यातून स्पष्ट होत नाही. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, अशा असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी १२५ योजना कार्यरत आहेत. यासंदर्भातील सर्व माहिती वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. यामध्ये उणिवा आहेत. या योजनांचा शासन निर्णय काढण्यात आलेला आहे. त्यासंदर्भातील वेबसाईट अद्ययावत करण्यात येत आहे.

३.६४ स्वयंरोजगारासाठी महामंडळे आहेत. त्यांना त्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करुन दिला पाहिजे. रोजगार व स्वयंरोजगार विभागाकडून नोकऱ्या उपलब्ध करुन दिल्या जातात याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. कारण सात टक्के यातून रोजगार उपलब्ध होतो. परंतु ९३ टक्के जे असंघटित क्षेत्रातील कामगार आहेत त्यांना काहीच संरक्षण मिळत नाही. त्यांच्यासाठी कोणताही कायदा नव्हता. आता मागील काळात पाठ पुरावा करुन यासंदर्भातील कायदा संमत करुन घेतला आहे. जे असंघटित क्षेत्रातील कामगार आहेत त्यांना नियमित कसे करता येईल याचा विचार होण्याची आवश्यकता आहे. What exactly the term "win-win" mean? असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, यासंदर्भातील एक प्रस्ताव तयार करण्यात आलेला असून तो मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात येणार आहे. रोजगाराची नोंद जिल्हा उद्योग केंद्रात जिल्ह्याची ठिकाणी करण्यात येत आहे. मुंबई व पुणे अशा शहरी भागात प्रश्न निर्माण होत नाहीत. परंतु ग्रामीण भागात रोजगार देण्यासाठी प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. या सेवा केंद्राच्या माध्यमातून प्रत्येक गावातून रोजगाराची नोंद करण्यात येणार आहे. यासंदर्भातील सविस्तर प्रस्ताव तयार करण्यात

आला असून तो मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात येणार असून सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात त्यास मंजूरी मिळाली तर १ एप्रिल, २०११ पासून त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

३.६५ राज्य शासनाच्या महामंडळाकडून बेरोजगारांना रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या योजनांच्या माध्यमातून स्वयंरोजगार करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. त्याच लोकांनी रोजगार विभागातून नोकऱ्यांचा फायदा घेतला किंवा कसे याची माहिती अद्ययावत होणे आवश्यक आहे. ही सर्व प्रक्रिया शासनाकडून राबविण्यात येते. यामध्ये डुप्लीकेशन होऊ नये एवढाच उद्देश आहे. आता या विभागासाठी तीन कोटी रुपयांची तरतूद आहे. बेरोजगारांना नोकऱ्या उपलब्ध करुन देण्यासाठी त्याचा वापर झाला पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, शासनाच्या वेगवेंगळया महामंडळाकडून कोणाला कोणत्या योजनेतून लाभ मिळाला याची माहिती अद्ययावत असावयास पाहिजे आणि या सर्व बाबींची नोंद होण्याची व्यवस्था झाली पाहिजे त्या दृष्टीकोनातून विभागाकडून प्रयत्न करण्यात येत आहेत.

३.६६ आतापर्यंतचा अनुभव पाहता एका बाजूला अशाप्रकारे कार्यवाही करीत असताना व संबंधितांची उलाढाल वाढत असताना, दुसऱ्या बाजूला त्यासंदर्भातील काहीच नोंदी ठेवल्या नाही तर ते योग्य होणार नाही. हे सर्व इंटरलींक इंडिकेट झाले पाहिजे. चाकण एम.आ.डी.सी. परिसरात कायमस्वरुपी कामगार जवळजवळ १ लाख आहेत. तसेच कंत्राटी पद्धतीवर काम करणारे ६० ते ७० लाख कामगार आहेत. यासंदर्भातील नवीन धोरण ठरवित असताना या सर्व गोष्टींचा विचार करावयास पाहिजे असे समितीचे मत आहे. नाव नोंदणी हा धंदा झाला तर आपण नवीन पॅरासाईटस् तयार करीत आहोत असे म्हणावे लागेल. हे सर्व काम रोजगार व स्वयंरोजगार विभागाने नव्हे तर कामगार विभागाने करावयास पाहिजे. यातून आपण एकप्रकारे डिव्हाईस निर्माण करीत आहोत. आता कामगार विभागाचे संगणकीकरण झाले आहे. त्या दृष्टिकोनातून रोजगार व स्वयंरोजगार आणि कामगार विभागाची बैठक व्हावयास पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, विभागाच्या माध्यमातून कौशल्य विकास कार्यक्रम राबविला जातो. सर्व ठिकाणी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती असून मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती कार्यरत आहे. या समितीच्या माध्यमातून समन्वय साधला जातो. याशिवाय सचिवांच्या स्तरावर सुद्धा बैठका होतात.

३.६७ सध्या कायमस्वरुपी कामगारांचा डाटाबेस जमा करीत आहोत. आपण कायमस्वरुपी कामगारांबरोबरच कंत्राटी कामगारांचा सुध्दा डाटाबेस जमा करावा अशी समितीने सूचित केले असता

असे समितीने सुचित केले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, त्या अनुषंगाने कायद्यात बदल प्रस्तावित आहे. गेल्या वर्षी नोंदणी आणि नोकरी लावण्याचे प्रमाण १.५ टक्के होते. ते आता १२ टक्के केले आहे.

३.६८ विभागाकडे बेरोजगारांना नोकरी लागल्याची जशी माहिती असते तशीच नोकरी सोडल्याबाबतची सुद्धा माहिती असावयास पाहिजे. या समितीच्या मताबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, कायद्याने डाटा देणे बंधनकारक नाही. सी.एन.व्ही. हा १९५६ चा कायदा आहे. त्यामध्ये नोटीफिकेशन ऑफ व्हॅकेन्सीजबाबतचा उल्लेख आहे. According to the Compulsory Notification of Vacancies Act, 1956, it is not compulsory to notify as to what vacancies have been filled up. We will move an amendment to the Act. We will include in it "Contractual, as well as, regular appointments".

३.६९ विभागाने कायमस्वरुपी कामगारांबरोबरच कंत्राटी कामगारांची माहिती जमा केली तर १२ टक्के असणारे प्रमाण ३० टक्क्यांवर जाईल. वास्तविक पाहता बेरोजगार युवक शासकीय नोकरी मिळावी म्हणून रोजगार केंद्रात नावे नोंदवित असतात. प्रत्यक्षात ती मंडळी खाजगी क्षेत्रात सुद्धा नोकरीवर असते. उदा.एल अँड टी कंपनी १९७०-७५ च्या दरम्यान सुरु झाली. त्यावेळी त्या ठिकाणी किती कामगार होते हे आपल्याला पहावे लागणार आहे. शिवाय आज त्या कंपनीचे किती युनिट वाढले आणि त्या मानाने त्या कंपनीमध्ये किती कामगारांची भरती करण्यात आली ही माहिती आपल्याला त्या कंपनीकडून डाटा मागितल्यानंतर कळेल. कंपनीचे काम ज्या प्रमाणात वाढले त्या प्रमाणात त्यांनी कामगारांची भरती केली नसेल तर, कंपनी वाढीव काम कोणाच्या माध्यमातून करीत आहे, ठेकेदार कोण आहे इ. सर्व माहिती जमा केली तर, सर्व कंपन्यांची माहिती आपल्याला उपलब्ध होऊन, सर्व कंपन्यांचे ॲनेलिसीस उपलब्ध होईल. समितीच्या या वक्तव्यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, विभागाकडून प्रशिक्षण दिले जात नसले तरी कोणी कोणते प्रशिक्षण घेतले याबाबतची नोंद असावयास हवी. कारण एखाद्या ठिकाणी ५ हजार वेल्डर्सची आवश्यकता असेल तर विभागाकडे असलेल्या डाटावरुन संबंधितांना कामगार उपलब्ध करुन देता येतील. शिवाय एकदा प्रशिक्षण दिल्यानंतर वारंवार प्रशिक्षण घेऊ नये याबाबत सुद्धा काळजी घेणे आवश्यक आहे.

३.७० समितीने असे मत व्यक्त केले की, ग्राम किंवा जिल्हा स्तरावर नाव नोंदणीचे काम करण्यात येणार आहे. परंतु जे कामगार रोजंदारीवर काम करतात ते कामाच्या दिवशी तालुका किंवा जिल्हा स्तरावर आपली मजुरी बुडवून नोंदणीसाठी जाणार नाहीत. त्यामुळे रविवारी जर सेवा केंद्रे सुरु ठेवलीत तर काम करणाऱ्या मजुरांना आपापले नाव नोंदविता येईल. त्यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, आपण सेवा केंद्र मर्यादित ठिकाणी नव्हे तर जवळजवळ १२ हजार ठिकाणी करणार आहोत.

जवळपासच्या ठिकाणी सेवा केंद्र राहणार असल्यामुळे लोकांना आपले नाव नोंदविणे शक्य होईल. शिवाय हे काम आऊट-सोर्सिंग स्वरुपाचे असल्यामुळे सायबर कॅफेच्या माध्यमातून सुद्धा नोंदणी करणे शक्य होईल.

**अभिप्राय व शिफारशी :**

**३.७१** सेवायोजन कार्यालयाकडे एकूण ९ लाख बेरोजगारांची नोंदणी झाली असून राज्यात ४० ते ४५ हजार जागा उपलब्ध आहेत. तरी सुद्धा गेल्या वर्षभरामध्ये केवळ सात हजार लोकांना नोकऱ्या दिल्या आहेत. वरील आकडेवारीवरुन असे दिसून येते की, नोंदणीचे प्रमाण व उपलब्ध जागांचे प्रमाण व्यस्त आहे. रिक्त पदांची अधिसूचना काढणे कायद्याने बंधनकारक असतानाही ह्याची अंमलबजावणी होत नाही. पदे भरण्याची अधिसूचना सेवायोजन कार्यालयास देण्याची सक्ती असतानाही केवळ १ लाख ४ हजार रिक्त पदांसाठी अधिसूचना देण्यात आल्या व त्यानुसार ८ लाख १६ हजार उमेदवारांची नावे उद्योजकांकडे पाठविण्यात आली होती. उद्योजकांकडून ४४ हजार रिक्त पदे भरल्याचे उत्तर प्राप्त झाले आहे. एकदा पद भरल्यानंतर त्यांनी सेवायोजन कार्यालयाला कळविणे बंधनकारक नाही. **सेवा योजन कार्यालयामार्फत रिक्त पदे भरण्यासंदर्भातील कायदा केंद्र सरकारचा असला तरी सेवायोजन कार्यालयाला रिक्त पदासंदर्भातील अधिसूचना कळविणे सक्तीचे आहे. त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत तसेच त्यानुसार नियुक्त्या करण्याचे राज्य शासनास, केंद्र शासनास, राज्यातील व केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील उद्योजकास, उपक्रमास, प्राधिकरणास इत्यादी सर्व प्रकारच्या आस्थापनांना बंधनकारक करण्यात यावे व अशा प्रकारे पदे न भरल्यास दंडाची किंवा शिक्षेची कायद्यात तरतूद करण्यात यावी. उपरोक्त सर्व बाबींबाबत केंद्र शासनाच्या कायद्यात बदल करण्याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

३.७२ उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे सचिव हेच रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे सचिव म्हणून काम पहातील हा निर्णय घेण्यामागील शासनाची भूमिका अशी आहे की, तांत्रिक शिक्षण घेतलेल्या मुलांना नोकऱ्या मिळवून देण्यासाठी सेवायोजन कार्यालयाकडे पाठविणे, त्यासाठी डेटाबेसमध्ये जास्त संख्येने मुलांची नोंद करणे, त्यांना चांगल्या उद्योजकाकडे पाठविणे, त्यांचा आत्मविश्वास वाढवून जास्त संख्येने रोजगार उपलब्ध करुन देणे इत्यादी सर्व बाबी एकत्रितरित्या करता याव्यात. ही शासनाने घेतलेली भूमिका योग्य आहे.

३.७३ राज्य शासनाने उमेदवारांचे कौशल्य विकसित करावे त्याचप्रमाणे शासनाने विद्यापीठ शिक्षण पद्धतीमध्ये औद्योगिक शिक्षण, आय.टी.आय., व्यवसाय प्रशिक्षण, डिप्लोमा डिग्रीचे इजिनिअरिंग कॉलेज, एम.बी.ए. या विद्यार्थ्यांचा रोजगार व स्वयंरोजगार मध्ये सहभाग वाढविणे आवश्यक आहे. विद्यापिठाबरोबर समन्वय साधुन आपले पोर्टल चांगल्याप्रकारे वापरण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात

यावी. **लघु छोट्या व मध्यम उद्योगासाठी एक नविन पोर्टल विकसित करण्यात यावे स्किल डेव्हल्पमेंटसाठी केंद्र सरकारने तयार केलेल्या आराखड्यामध्ये रोजगार व स्वयंरोजगार या विभागासाठी समावेश करण्यात यावा. तसेच याबाबत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीच्या विभागीय स्तरावर, जिल्हा स्तरावर, तालुका स्तरावर नियमित बैठका घेण्यात याव्यात. याबाबत करण्यात आलेल्या व यापुढे करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची माहिती समितीला देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

३.७४ ज्या व्यक्तीचे वय १४ वर्षापेक्षा जास्त आहे आणि ज्याला नोकरीची गरज आहे अशा कोणत्याही व्यक्तींचे सेवायोजन कार्यालयामार्फत नाव नोंदविण्याचे काम केले जाते. संपुर्ण राज्यात साडेबारा हजार कॉमन सर्व्हिस सेंटर्स सुरु करण्यात येणार असून त्यापैकी केवळ तीन हजार कॉमन सर्व्हिस सेंटर्स सुरु करण्यात आली आहेत. त्यामुळे राज्यात अजूनही काही ठिकाणी मजूर मिळत नाही तर काही ठिकाणी मजूर काम शोधत असतात. **अशा प्रकारचा विरोधाभास आहे. कोणत्या ठिकाणी काम मिळू शकते. हे मजूरांना माहीत नाही. त्यामुळे लोकांना काम मिळेल या दृष्टीने योग्य ते नियोजन करण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.**

३.७५ रिक्त पदाची माहिती उमेदवारांना ऑन-लाईनवर तसेच प्रसार माध्यमातून याचा प्रचार आणि प्रसार व्हावयास पाहिजे. पूर्वी टी.व्ही.वरील बातमीपत्रामध्ये रोजगाराच्या उपलब्धतेबाबत माहिती देण्यात येत असे. ज्याला नोकरीची आवश्यकता आहे. ज्याला काम करण्यासाठी उमेदवारांची आवश्यकता आहे अशा व्यक्ती समोरासमोर याव्यात. यासाठी मेळावे आयोजित करण्यात यावेत. **रिक्त पदासाठी उमेदवार मागविण्याची सुरु असलेली जुनी पद्धत बंद करुन योग्य ठिकाणी योग्य उमेदवार कसा पाठविता येईल याबाबत नवीन पद्धत सुरु करावी. जेणेकरुन महाराष्ट्रामध्ये कुठे आणि कोणत्या नोकऱ्या उपलब्ध आहेत ते उमेदवारांना समजेल या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

३.७६ शासनाकडे जे सॉफ्टवेअर प्रस्तावित आहे ते वेबसाईट बेस्ड आहे. यामध्ये ऑनलाईनची सुविधा दिलेली आहे. **रोजगार वाहिनी या भागाचे एकत्रीकरण करुन एक सर्वसमावेशक असा ई-गव्हर्नन्स प्रोजेक्ट प्रस्तावित केलेला आहे. त्याकरिता नेमण्यात आलेल्या उच्चाधिकार समितीने या प्रस्तावास लवकरात लवकर मान्यता देवून विकसनाची सुरुवात करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

३.७७ रोजगार व स्वयंरोजगार विभागाने संगणकीकरणावर नाव नोंदणीची मोहीम राबविली असून माणसाची कमतरता असल्यामुळे संपुर्ण राज्यामध्ये बारा हजार नवीन नावे नोंदविण्यात आली आहेत. **अपुऱ्या कर्मचाऱ्यांच्या अभावी मोठ्या प्रमाणात उमेदवारांच्या नाव नोंदणीचा अनुशेष बाकी आहे. परिणामी बेरोजगारांवर अन्याय होत आहे. याकरीता तालुका स्तरावर जावून प्रत्यक्ष नोंदणी केल्यास तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे संगणकीकरण आणि बळकटीकरण करण्याचे काम केल्यास स्थानिक**

**लोकांबरोबर अन्य लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध होईल याबाबत योग्य ती कार्यवाही करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

३.७८ सेवायोजन कार्यालयाची तीन-चार कार्यालये नमुना म्हणून करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन असून, त्यासाठी काही इंटिरिअरचे आणि दुरुस्तीचे कामे सुरु आहे. सध्या सहा कार्यालयाची कामे हाती घेण्यात येत असून तीन कार्यालयांच्या बाबतीत अंदाजपत्रक तयार केलेले आहे. सदरहू कार्यालये लोकांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी सुरु करण्यात यावी. **केंद्र शासनाने मिशन मोड प्रोजेक्टमध्ये देशातील सर्व सेवायोजन कार्यालये अद्ययावत करण्याचा आणि त्याचे करिअर गायडन्स् ॲण्ड कौन्सिलिंग सेंटरमध्ये रुपांतरीत करण्याचा निर्णय घेतलेला असला तरी सेवायोजन कार्यालय सुरु राहील आणि ते बंद होणार नाही, या दृष्टीने कार्यवाही करावी. कौन्सिलिंग करावयाचे असेल तर उमेदवारांची ॲप्टीट्युड टेस्ट घ्यावी लागेल. त्या टेस्टमुळे असे लक्षात येईल की, ते कोणत्या नोकऱ्या करण्यासाठी तयार आहेत आणि त्यानुसार त्यांना कामाच्या संबंधातील प्रशिक्षण देणे व नेमणूक करणे सोपे होते. मात्र यासाठी शासकीय यंत्रणा पूर्णपणे सक्षम नसल्यामुळे हे काम सार्वजनिक खाजगी भागीदारीमध्ये करण्यात यावे. अशा स्वरुपाचे नवीन सेवायोजन कार्यालय तयार करण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.**

३.७९ रोजगार मित्र नावाचे सॉफ्टवेअर बरेच जुने झाले होते. यामध्ये एकूण ४५ ठिकाणी उमेदवारांच्या नावांची नोंदणी केली जाते. संपूर्ण डेटा एका केंद्रावर ठेवला जातो. काही बदल करावयाचा असल्यास तो मॅन्युअली करावा लागतो. या आज्ञावलीमध्ये हा बदल आपोआप होत नाही. तसेच एका ठिकाणी केलेला बदल पुन्हा सर्वत्र करावा लागतो. लातूर जिल्ह्यामध्ये जागा रिक्त असेल व बीड जिल्ह्यामध्ये उमेदवार असल्यामुळे तेथे कळवायचे असेल तर या आज्ञावलीमध्ये अपडेट करता येत नाही. तसेच एका ठिकाणी काही बदल केला तर त्यासंबंधी इतर केंद्रातील ४५ लोकांना बोलावून प्रशिक्षण द्यावे लागते व प्रत्येक ठिकाणी दुरुस्ती करावी लागते. या आज्ञावलीचा विकास टप्प्याटप्प्याने केलेला आहे. तांत्रिक दृष्ट्या आज्ञावलीमध्ये कोणताही दोष नाही. मात्र काम करताना संगणकीकरणाच्यासंदर्भात ज्याप्रमाणे आवश्यकता भासेल त्याप्रमाणे पूरक आज्ञावली तयार केली गेली. त्यामुळे ह्या संपूर्ण पद्धतीचे विकेंद्रीकरण झाले आहे. आता ही आज्ञावली ओरॅकल वरून डीबी २ केली आहे. या सर्व बाबींचा विचार ही नवीन आज्ञावली तयार करताना केला गेला आहे. राज्यामध्ये एकूण ११५०० महा-ई-सेवा केंद्रे तयार केली जाणार आहेत. लोकांना किरकोळ गोष्टींसाठी गावातून किंवा तालुक्याहून जिल्हा पातळीवर येण्याची गरज भासणार नाही. इंटरनेटपेक्षा मोबाईल फोनची संख्या अधिक प्रमाणात वाढली आहे. म्हणून **मोबाईल फोनवरुन एसएमएस देण्याची योजना राबविण्यात यावी. याकरिता एखाद्या उमेदवाराचे नाव सेवायोजन कार्यालयामध्ये नोंदविले असल्यास त्याबाबत खाजगी**

**कंपनीला माहिती दिली जाते. मात्र उमेदवार व सदरहू कंपनी यांच्यामध्ये सुसंवाद साधता येत नव्हता. यामुळे उमेदवारांना आपले नाव कोणत्या कंपनीतील रिक्त जागेकरिता पाठविले आहे, याची माहितीच नसायची. आता मुंबई व पुणे येथे जो पायलट प्रोजेक्ट सुरु केलेला आहे, त्यामध्ये उमेदवारांनी दिलेल्या मोबाईल क्रमांकावर त्यांचे नाव कोणत्या कंपनीतील कोणत्या पदाकरिता सुचविण्यात आले आहे, याबाबत एसएमएस पाठविला जातो. यामुळे उमेदवारांना कंपनीशी थेट संपर्क साधता येत आहे. अशाप्रकारे रोजगारासंबंधी पोहोच वाढविण्याचा सुरु असलेला प्रयत्न व अशा प्रकारच्या अन्य योजना संपूर्ण राज्यात सुरु करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**३.८०** गावातील माणसाला तेथेच कामधंदा मिळाला पाहिजे. त्यांना तेथेच रोजगार मिळाला तर त्यांचे शहरी भागामध्ये होणारे स्थलांतर कमी होईल. कोणतीही योजना कितीही चांगली असली तरी देखील त्या योजनेची अंमलबजावणी कशी केली जाते, हा देखील एक महत्वाचा प्रश्न आहे. एखाद्या उमेदवाराने एखाद्या कंपनीमध्ये सेवायोजन कार्यालयामार्फत अर्ज केल्यास आपल्याला त्या बाबतीतील अभिलेख देखील ठेवावा लागेल. संबंधित उमेदवाराला नोकरी मिळाली की नाही, तसेच किती पदे रिक्त आहेत या दोन्ही गोष्टींचा आपल्याला समन्वय ठेवावा लागेल. आपल्याकडे केवळ बेरोजगारांची आकडेवारी उपलब्ध असते. मात्र किती लोकांना रोजगार मिळाला व किती जणांना रोजगार अद्याप मिळालेला नाही, त्यांची सविस्तर आकडेवारी अंतर्भूत करणे आवश्यक असते. सध्या आपल्याकडे जो केंद्रीभूत डेटा आहे, त्या माध्यमातून आपल्याला संपर्क साधता येणार आहे. या नवीन प्रणालीमुळे सध्या जी माहिती आपल्याला उपलब्ध आहे, ती माहिती सर्व जिल्ह्यांमधील कार्यालयांशी शेअर करता येईल. **संपूर्ण राज्यामध्ये किती लिपिक व टंकलेखकांची पदे रिक्त आहेत, ही माहिती काढावयाची असेल तर जुन्या पद्धतीप्रमाणे सर्व ४५ ठिकाणाहून माहिती मागवावी लागेल. मात्र नवीन पद्धतीनुसार, ही सर्व माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होऊ शकेल. एखाद्या जिल्ह्यामध्ये जागा रिक्त असतील व दुसऱ्या जिल्ह्यामध्ये उमेदवार उपलब्ध असतील तर त्याबाबत उमेदवारांना कळविता येईल. जास्तीत जास्त लोकांच्या स्थलांतराला आळा बसावा याकरिता योजना लवकरात लवकर सुरु करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

३.८१ नोकऱ्या मिळून देण्यासाठी बोर्ड लावून धंदा सुरु केला जातो. यामध्ये अनेक तरुणांची फसवणूक होते. या सर्व प्रकाराला आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने कायदा करण्याची आवश्यकता आहे. केंद्र सरकारने कायदा केल्यामुळे तो कायदा सर्व राज्यांना लागू राहील. तसेच इतर राज्यातील कंपन्यांकडून उमेदवारांची फसवणूक होणार नाही. **ज्या कंपन्या उमेदवारांना नोकऱ्या उपलब्ध करुन देतात त्यांच्यावर कायद्याने बंधन नसल्यामुळे उमेदवारावर अन्याय करण्याची शक्यता नाकारता येणार**

**नाही. त्यामुळे कंपन्यांवर कडक बंधने घालण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात कायदा करण्याचे सुरु असलेले काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.**

३.८२ काही कंपन्या आपल्या येथील उमेदवारांना परदेशात नोकरीसाठी पाठवितात परंतु तेथे गेल्यानंतर त्या उमेदवारांची ज्या रोजगारासाठी नियुक्ती झाली होती तो रोजगार न देता इतर कामे दिली जातात. या उमेदवारांना परत भारतात येण्यासाठी सुद्धा मोठ्या प्रमाणात अडचणींना तोंड द्यावे लागते. **त्यामुळे उमेदवारांना परदेशात नोकरी देणाऱ्या ज्या कंपन्या आहेत त्यांची सक्तीने नोंदणी करणारा केंद्र शासनाशी संलग्न कायदा करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

३.८३ उमेदवारांना नोकऱ्या देणाऱ्या कंपन्यांनी नोंदणी करणे बंधनकारक असून हा कायदा महाराष्ट्र राज्यात पहिल्यांदा करणे गरजेचे आहे. जी सिस्टिम अवलंबणार आहोत त्याचा फार चांगला उपयोग होणार आहे. सरळ वेब साईटद्वारे, हँन्हेल्ड व हेल्पलाईनद्वारे दुरस्थ व दुर्गम ठिकाणावरुनही नोंदणी व माहितीत सहज बदल करणे शक्य होणार आहे. संवैधानिक विवरणपत्रे भरणे व रिक्त पदे अधिसुचित करणे सहज शक्य होईल. कसुरदार नियोक्त्यांना सहजपणे शोधून स्वयंचित सुचना देणे शक्य होणार आहे. सुयोग्य उमेदवारांचा गरजेप्रमाणे शोध घेता येईल. सध्याच्या नियुक्ती डाटामुळे गुणात्मक दर्जात वाढ होईल. रोजगार मेळावे, विवरणपत्रे, विविध योजनाविषयक माहितीच्या सूचना मिळू शकतील. गरजेप्रमाणे स्वयंचित नोकरी इच्छूक उमेदवारांना प्रोफाईल मॅचिंग सुविधा उपलब्ध होणार आहे. व्यक्तिगत व अद्ययावत लॉग-ईन सुविधा मिळू शकेल.

३.८४ केंद्रिभूत डाटाबेस उपलब्ध होणार आहे. या प्रणालीमध्ये कमीत-कमी मानवी हस्तक्षेप राहणार आहे. या प्रणालीमुळे मानवीय श्रमाची बचत होणार आहे. पारदर्शकतेत वाढ होणार आहे. केंद्रिभूत डाटा-विश्लेषण व अहवाल व्यवस्थापन प्रणाली राहणार आहे. अधिक परिणामकारक, प्रतिसादात्मक व वेळीच सेवा उपलब्ध होणे शक्य होणार आहे. या प्रणालीमुळे सेवाकार्य खर्चात बचत होणार आहे. विविध शासकीय विभागाच्या माहितीची सहज देवाण-घेवाण शक्य होणार आहे. कोणत्या क्षेत्रात किती जागा रिक्त आहेत याची माहिती या प्रणालीमुळे मिळणार आहे. ज्या ठिकाणी ज्या उमेदवारांची आवश्यकता आहे असेच उमेदवार संबंधितांना उपलब्ध करुन दिले जाणार आहेत. केवळ शहरीच नाही तर ग्रामीण भागातील उमेदवारांना या प्रणालीचा लाभ मिळणार आहे.

३.८५ कामगार विभागाकडे यासंदर्भात एक समिती आहे. त्यामुळे या समितीसमवेत समन्वय असण्याची आवश्यकता आहे. आता कारखाने बंद पडत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात लोकांना नोकरीची गरज आहे. राज्याच्या मुख्य सचिवांच्या स्तरावर यासंदर्भात रोजगार व स्वयंरोजगार विभाग, तंत्रशिक्षण विभाग आणि कामगार विभागांच्या सचिवांची एक समिती आहे. तसेच माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली अपेक्स कमिटी आहे. प्रत्येक बैठकीसाठी माननीय मुख्यमंत्री महोदयांना उपस्थित राहणे

शक्य होत नाही. आतापर्यंत जेवढ्या समित्या स्थापन झाल्या आहेत त्यातून ठोस निर्णय घेण्यात आला नाही त्यामुळे नुसत्या समित्या स्थापन करुन काहीही होत नाही. त्यांच्या वेळोवेळी बैठका घेणे आवश्यक आहे. **तीनही विभागाच्या संबंधित सचिवांनी समन्वय साधून केलेल्या कामाचा आढावा घेवून त्याबाबतची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

३.८६ एखाद्या आस्थापनेकडे एजन्सीने चार माणसे पाठविली असता त्यांनी ती ठेऊनच घेतली पाहिजे असे त्यांच्यावर बंधन नसल्याने एजन्सीच्या कामात सातत्य राहत नाही. अशा प्रकारे **दोन किंवा तीन वेळा त्यांनी अशी माणसे परत पाठवून दुसरीच माणसे कामावर ठेवली तर त्याला आळा घालण्यासाठी ठोस उपाययोजना तालुका किंवा सर्कल पातळीवरुन करण्यात यावी. तसेच ग्रामीण भागात इंटरनेट सुविधा नाहीत. प्रत्येक ग्रामपंचायतीला इंटरनेट कनेक्टिव्हिटी मिळणार नाही. त्यासाठी एखादे डाटा फिडर सेंटर तालुक्याच्या किंवा सर्कलच्या ठिकाणी देण्यात यावे, याप्रकरणी कर्नाटक राज्याने कोणती कार्यपद्धती अवलंबविली आहे. याची माहिती मागविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

३.८७ शासनाचा महसूल कसा वाढणार आहे याची पाहणी करण्याचे काम लोकलेखा समितीचे आहे. भविष्यात सेवा केंद्राची पुढे दुकाने होऊ नयेत असे समितीने मत व्यक्त केले. व त्या दृष्टीकोनातून ही प्रक्रिया पारदर्शक होणे आवश्यक आहे. **बेरोजगारांना रोजगार मिळाला पाहिजे. यामध्ये कोणतीही दुकानदारी होऊ नये अशी समितीची अपेक्षा आहे. माहिती व तंत्रज्ञान विभागाने आता २०० कोटी रुपयांचे उत्पन्न असताना २० टक्के वाटा शासनाला मिळेल असे निश्चित केले आहे. भविष्यात हा व्यवसाय २००० कोटी रुपयांवर गेला तर २० टक्क्यांचे प्रमाण वाढविण्याची तरतूद ठेवण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

३.८८ ग्रामीण किंवा जिल्हा स्तरावर नाव नोंदणीचे काम करण्यात येणार आहे. परंतु जे कामगार रोजंदारीवर काम करतात ते कामाच्या दिवशी तालुका किंवा जिल्हा स्तरावर आपली मजुरी बुडवून नोंदणीसाठी जाणार नाहीत. त्यामुळे रविवारी जर सेवा केंद्रे सुरु ठेवलीत तर काम करणाऱ्या मजुरांना आपापले नाव नोंदविता येईल. **सेवा केंद्रे १२ हजार ठिकाणी होणार असली तरी मजूरांसाठी वेळेला फार महत्त्व असते खाजगी नोकरीतून वेळ मिळणे शक्य होत नाही त्यामुळे रविवारी सेवा केंद्रे सुरु ठेवण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

## सामान्य प्रशासन विभाग

### ४. सेतू केंद्राचा माहिती तंत्रज्ञान आढावा (एकात्मीकृत नागरिक सेवा केंद्रे)-

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील सामान्य प्रशासन विभागाचा परिच्छेद क्रं.३.४ "सेतू केंद्राचा माहिती तंत्रज्ञान आढावा (एकात्मीकृत नागरिक सेवा केंद्रे)" यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

**सेतूच्या सर्व टप्प्यांचे कार्यान्वयन न करणे :**

**४.१** शासनाने सेतू प्रकल्पाचे चार टप्प्यात कार्यान्वयन करण्याचा संकल्प केला होता (ऑगस्ट २००२). तथापि, प्रकल्पाच्या टप्पेनिहाय कार्यान्वयनाकरीता स्थिरचिन्हे, कालमर्यादा निश्चित केल्या नाहीत. जून, २००६ पर्यंत, सेतू केंद्र फक्त पहिल्या टप्प्यात निश्चित केलेल्या सेवा देत होती.

DIT यांनी नमूद केले (मे २००६) की सेतू केद्रांमधील विभिन्न विभागांच्या सेवांचे एकात्मीकरण ही त्या-त्या विभागाच्या धोरणाची बाब आहे. हे उत्तर सेतू केंद्र उभारण्याच्या उद्दिष्ट्यांशी अनुरुप नव्हते.

**ज्ञापन :-**

**४.२** सेतू सुविधा केंद्रामार्फत पहिल्या टप्प्यातील सेवा देण्यात येत असून पुढील टप्प्यातील सेवा विविध विभागांच्या धोरणाची बाब आहे. तथापि, विभागवार सेतू सुविधा स्थापनेबाबत **(विवरणपत्र क्र.११)** माहिती दिली आहे.

**Software च्या एकरुपतेचा अभाव :**

**४.३** SLSS, तालुका व जिल्हा पातळीवर उपलब्ध असलेल्या आधारसामग्रीचे एकत्रीकरण करुन शासनाच्या अधिकृत web-site ला प्रेषित करणे सुकर होण्यासाठी एक सामाईक software विकसित करणार होते. तथापि, असे दिसून आले की विभिन्न सेतू केंद्रांमध्ये, आधारसामग्रीकरिता भिन्न back end software वापरात होते.

| सेतू केंद्र | Front end | Back end आधारसामग्री व BOT यंत्रणेची संख्या |
|---|---|---|
| जिल्हाधिकारी, चंद्रपूर | Access, Visual Basic | Access : २ |
| जिल्हाधिकारी, जळगांव | Access, Visual Basic | Access : १४, SQL : २ |
| जिल्हाधिकारी, कोल्हापूर | Access, Visual Basic | SQL : १, Assess : १ |
| जिल्हाधिकारी, नागपूर | Access, Visual Basic | Access : १, SQL : १ |

| | | |
|---|---|---|
| जिल्हाधिकारी, नांदेड | Access, Visual Basic | SQL : १, Access : १०, DB-२ :१ |
| जिल्हाधिकारी, ठाणे | Access, Visual Basic | SQL : २, Assess : १ |
| जिल्हाधिकारी, यवतमाळ | Access | Access : २०००:२ |

DIT यांनी नमूद केले (मे २००६) की सामाईक software चा विकास सक्रिय विचाराधीन आहे.

**ज्ञापन :-**

**४.४** केंद्र शासनाच्या निर्देशानुसार महा ई-सेवा केंद्र (CSC) राज्यात स्थापन करण्यात आली आहेत. या केंद्रांमार्फत पुरविल्या जाणाऱ्या सर्व सोई/सुविधा या सेतू केंद्रामार्फत पुरविल्या जाणाऱ्या सोई/सुविधांप्रमाणेच आहेत. सेतू केंद्रांचे काम हे नजिकच्या काळात महा ई-सेवा केंद्रांकडे सोपविण्यात येईल. सामाईक आज्ञावलीबाबतच्या सूचनाची नोंद घेण्यात आली आहे. सामाईक आज्ञावली सर्व महा ई-सेवा केंद्रांनी वापरणे आवश्यक आहे आणि याची अंमलबजावणी ई डिस्ट्रीक्ट प्रकल्पाकडून केली जात आहे.

**अपूर्ण टोकन निर्मिती :**

**४.५** कोल्हापूर येथील सेतू केंद्रात फेब्रुवारी २००३ ते मे २००६ या कालावधीत, प्रमाणपत्रे निर्गमित करण्याकरिता ६५,९६९ टोकन तयार केल्याचे आकडेवारीने दर्शविले. रोकडवही प्रमाणे मात्र निर्गमित झालेल्या प्रमाणपत्रांची प्रत्यक्ष संख्या ५७,११९ होती. याप्रमाणे फी पोटी आलेली रु. ०.८९ लाखची जमा एकतर खाती लिहीली गेली नाही किंवा ती वसूल केली गेली नाही.

सेतू केंद्र कोल्हापूर येथे आकडेवारी प्रमाणे ८१,४४५ शपथपत्रे निष्पादन केली होती रोकडवहीत मात्र निर्गमित केलेल्या शपथपत्रांची संख्या ७७,०४५ दाखविली होती, ज्यामुळे सेतू प्रभाराची रु. ०.४४ लाख वसुली कमी झाली.

याप्रमाणे पर्याप्त निविष्ट नियंत्रणांच्या अभावाच्या परिणामी रु. १.३३ लाखाची, फी ची कमी वसुली, लेखापरीक्षेत नजरेत आणून देईपर्यंत बिना दखल राहिली.

**ज्ञापन :-**

**४.६** अहवालात दर्शविलेली संख्या निर्गमित करण्याकरीता दिल्या जाणाऱ्या टोकनची संख्या ही मुलतः आवेदन स्विकारतेवेळी दिल्या जाणाऱ्या टोकनची संख्या आहे. टोकन देण्याची प्रक्रीया आवेदन

स्विकारतेवेळची आहे. टोकन संख्या व निर्गमित उताऱ्याची संख्या यांच्यातील फरक खालील बाबी मुळे पडला आहे.

नाव, पत्ता, जात वगैरे मजकूरात चूक झाल्याचे दिसून आल्यास नविन टोकनची निर्मिती केली जाते. काही प्रकरणांमध्ये अर्ज दाखल करण्याच्या पश्चात दाखले देण्यात येत नाही तसेच त्रुटी काढून प्रकरण अर्जदारास परत केल्यास अर्जदार त्रुटीसह पुन्हा प्रकरण सादर करीत नाही. असे जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी कळविले असून टोकन नोंदीची पुर्नरावृत्ती होणार नाही याबाबत आज्ञावलीमध्ये योग्य त्या सुधारणा करण्यात येत असल्याचे त्यांनी कळविले आहे.

**संस्करण नियंत्रणे :**

**४.७** अपर्याप्त संस्करण नियंत्रणांच्या काही प्रकरणांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

- सॉफ्टवेअरमध्ये शपथपत्रे निष्पादन करण्याकरिता टोकन क्रमांक करण्याची कांही तरतूद नव्हती (नांदेड, कोल्हापूर).
- सदतीस हजार दोनशे बेचाळीस प्रकरणांपैकी २१,६९६ प्रकरणांमध्ये अर्जदाराच्या छायाचित्रांशिवाय software ने शपथपत्रे तयार केली (जळगांव).
- Auto-generated fields मध्ये अनुक्रमे टोकन आणि प्रमाणपत्रे यांत १८३ व ३२९ रिकाम्या जागा निदर्शनास आल्या (जळगांव, नांदेड).
- Audit trail सुद्धा उपलब्ध नव्हती. याप्रमाणे, शपथपत्रांचे निर्गमन आणि वसूल केलेल्या फी च्या अचुकपणाची निश्चिती करता आली नाही.

**ज्ञापन :-**

**४.८** जिल्हाधिकारी, जळगाव यांनी तहसिलदार व सेतू केंद्र चालकांना अर्जदाराच्या छायाचित्राशिवाय शपथपत्र तयार केले जाणार नाही याबाबत दक्षता घेण्याच्या सक्त सूचना दिल्या आहेत.

डेटा बेसची सुरक्षा CSC, MS-WAN, SSDG व SDC या प्रकल्पांकडून एकत्रितपणे करण्यात येईल.

**फीची जादा वसुली :**

**४.९** शासनाने विहित केले होते (सप्टेंबर २००२) की जातीचे प्रमाणपत्र, प्राप्ती प्रमाणपत्र, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र, इ. निर्गमित करण्यासाठी BOT यंत्रणांनी रु. १० फी वसूल करावी. त्याचप्रमाणे,

ऑगस्ट २००४ पासून प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरिता केलेल्या प्रत्यक्ष खर्चाच्या अधीन राहून, ७/१२ प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरिता वसूल करावयाची जास्तीत जास्त फी रु. १५ होती.

तथापि, असे दिसून आले की विभिन्न प्रमाणपत्रे निर्गमित करण्यासाठी आकारलेल्या फी मध्ये जिल्ह्या-जिल्ह्यात खालील तपशीलाप्रमाणे फरक होता.

| **जिल्हा** | **दर प्रति प्रमाणपत्र (रुपये)** | **७/१२ प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरिता दर (रुपये)** |
|---|---|---|
| चंद्रपूर | १५ | १५ |
| जळगांव | २० | १० |
| ठाणे | २३ ते २९ | १७ |
| यवतमाळ | १९ | १५ |

याचा परिणाम ठाणे जिल्ह्यातील प्रत्येक अर्जदाराला प्रति प्रमाणपत्रे रु. १३ ते रु. १९ जादा बोजा झाला आणि परिणामत: ऑक्टोबर, २००४ ते फेब्रुवारी, २००६ पर्यंत त्यांचेकडून रु. २२.०९ लाखाची अनधिकृत वसुली झाली.

जिल्हाधिकारी, ठाणे यांनी नमूद केले (जुलै २००६) की ११ सप्टेंबर, २००३ ला झालेल्या (जिल्हा पातळीवरील संस्थेच्या) बैठकीतील निर्णयाप्रमाणे दर प्रति प्रमाणपत्र रु. २५ इतके वाढविले गेले. तथापि, हे उत्तर मान्य करण्यासारखे नव्हते कारण शासनाचे सेतू केंद्राकडून द्यावयाच्या सेवेकरीता, नागरिकांची देय फी वाढविण्याचे कोणतेही आदेश नव्हते.

**ज्ञापन :-**

**४.१०** जिल्हाधिकारी, ठाणे यांनी केलेल्या खुलाश्याप्रमाणे महसूल व वन विभाग यांच्या पत्रक क्रमांक सीसीओ/प्रक्र.२९/ल-१/सेल दि. ३०/९/०२ अन्वये प्रमाणपत्रांची फी रु.१०/- मात्र प्रस्तावित करण्यात आली आहे. सदर प्रमाणपत्रे सेतू केंद्रामार्फत वितरित करावयाची असल्याने, शासकीय दराव्यतिरिक्त सेतू सोसायटीस देय असणारा सुविधा आकार निश्चित करण्यासाठी समिती नेमण्यात आली. तद्नंतर महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्रमांक १००२/प्र.क्र. २९/ल-१/सेल दिनांक ३०/९/२००३ अन्वये रु. २५/- मात्र सुविधा आकार निश्चित करण्यात आला. सदर सुविधा आकार हा शासनाने विहीत केलेल्या परवाना फी/दाखला फी व्यतिरिक्त आकारण्यात यावा, असे स्पष्टपणे नमूद केले आहे. तसेच सदर पत्रातील मुद्दा क्रमांक ६ मध्ये पुढील प्रमाणे खुलासा करण्यात आला आहे. शासनाने अंतीम ठरविलेला कालावधी व सुविधा आकार हे शासनाने जाहीर केलेल्या तारखेपासून लागू

करण्यात यावेत. मात्र यापूर्वी ज्या ठिकाणी निविदा पद्धतीचा अवलंब करुन याबाबत कार्यवाही झाली असेल तर ते रद्द करण्यात येवू नयेत. ठेकेदार संस्थेशी करण्यात आलेल्या कराराची मुदत संपल्यानंतर शासनाने ठरविण्यात आलेला कालावधी व सुविधा आकार लागू करण्यात यावेत.

ठाणे जिल्ह्यातील सेतू केंद्रासाठी दि. १० मार्च, २००३, ६ मे, २००३ व ३ जून, २००३ अन्वये निविदा काढून सर्वात कमी असलेल्या दर आकारणीच्या निविदा मंजूर करण्यात आल्या आहेत. माहिती तंत्रज्ञान संचालनालयाकडील पत्र क्रमांक डीआयटी /फाईल ०४/०६/३९ दि. ४/३/२००४ अन्वये सर्वसामान्य प्रमाणपत्रासाठी जास्तीत जास्त रु. २०/- इतका सुविधा आकार लावण्यात यावा असे कळविण्यात आले होते मात्र निविदा पूर्वीच मंजूर झाल्या असल्याने रु.२३/- ते २९/- अशी दर आकारणी करण्यात आली आहे. माहिती तंत्रज्ञान संचालनालयाकडील पत्र क्र. डीआयटी/फाईल ०४/०६/३९ दि.४/३/२००४, ३/१२/०५, १/४/०६, ११/१०/०६ व ५/२/०७ अन्वये अशासकिय संस्थेशी चर्चा करुन दिनांक १/०६/०७ पासून कार्यान्वित असलेल्या सर्व सेतू सुविधा केंद्रातील सर्व सामान्य प्रमाणपत्राची आकारणी रु. २०/- मात्र व ७/१२ उताऱ्याची दर आकारणी रु. १५/- मात्र याप्रमाणे करण्यात येत आहे. मात्र दर मान्य नसल्याने सदर निर्णयाविरुद्ध सेतू केंद्रचालक मे. अभिषेक एन्टरप्राइजेस यांनी न्यायालयात दाद मागितली आहे. सद्य:स्थितीत सर्व साधारण प्रमाणपत्राची दर आकारणी रु. २०/- व ७/१२ च्या उताऱ्याची दर आकारणी रु. १५/- प्रमाणे सुरु आहे.

ठाणे येथील करार हा शासनाने दर निश्चितीबाबत निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांपूर्वी झालेला आहे.

**SLSS जवळ खर्च न केलेल्या फी ची शिल्लक -**

**४.११** शासनाने, SLSS आणि DLSS यांची निर्मिती शासन स्वत:च्या कर्मचाऱ्यांद्वारा ज्या सेवा प्रदान करीत होते, त्या सेवा देण्याकरीता केली (ऑगस्ट २००२). सेतू संस्थानी, नागरिकांना, सेतू केंद्रे चालविणाऱ्या BOT यंत्रणेमार्फत, निर्गमित करावयाच्या प्रमाणपत्राकरिता रु.१० प्रति प्रमाणपत्र वसूल करावयाचे होते. BOT यंत्रणांनी शासनाची इमारत, साधनसामग्री व शासनाच्या कर्मचारीवर्गाच्या सेवांचा वापर back end चे काम आणि संनियंत्रणासाठी वापरला. याप्रमाणे सेतू पद्धती चालविण्यात DLSS ची भूमिका नागरिकांकडून निव्वळ सेवा शुल्काची वसुली करणे इतकीच होती. शासनाने असेही निर्देश दिले होते (ऑगस्ट, २००२) की DLSS ने केलेल्या वसुलीचा १० टक्के भाग SLSS कडे पाठवावा. या बाबतीत असे निदर्शनास आले की, मे २००६ पर्यंत सहा जिल्हाधिकाऱ्यांनी DIT द्वारे पाठविलेल्या सेवा शुल्काचा भाग रु. १२.९६ लाख SLSS कडे जमा होता. सेतू पद्धती BOT तत्त्वावर खाजगी

संस्थाकडून चालविली जात असल्यामुळे, शासनाने निम्न सेवा दराचा लाभ नागरीकांना द्यायला हवा होता. असे न केल्याने अल्प दरात नागरिकांना सेवा देण्याची निश्चिती करण्यात शासन अपयशी ठरले.

**ज्ञापन :-**

**४.१२** सेतू केंद्रांचे काम हे नजीकच्या काळात महा ई-सेवा केंद्रांकडे सोपविण्यात येईल. SLSS जवळ खर्च न केलेल्या फीच्या रक्कमेचा वापर त्यावेळी केला जाईल.

**उपसंहार -**

**४.१३** जरी सेतू प्रकल्प २००२ मध्ये प्रारंभ केला तरी शासनाला सेतू प्रकल्पाच्या सर्व टप्प्यांचे कार्यान्वयन करण्यात अपयश आले. समाईक Software च्या अभावी सेतू केंद्रामधून शासनाला आकडेवारीचे एकत्रीकरण व प्रेषण शक्य नव्हते. अपूर्ण modules आणि संबंधित सर्व आकडेवारीची निविष्टि करण्यातील अपयशाचा परिणाम अपूर्ण आकडेवारीत झाला. माहिती तंत्रज्ञान सुरक्षितता सदोष होती ज्यामुळे पद्धतीला अनधिकृत प्रवेश व बदलांचा संभाव्य धोका होता. निविदेच्या तरतुदीचे पालन न केल्याने व्यवसाय सातत्याची निश्चिती करता आली नाही. शासनाने मंजूर केलेले दर लावण्यातील अपयशाचा परिणाम नागरिकांना प्रमाणपत्र व सात-बारा प्रमाणपत्र फी च्या जादा आकारणीच्या रुपात झाला.

**ज्ञापन :**

**४.१४** सेतू केंद्रांचे काम हे नजीकच्या काळात महा ई-सेवा केंद्रांकडे (CSC) सोपविण्यात येईल. त्यामुळे प्रकल्पातील सर्व त्रुटी/कमतरता दूर होतील.

**साक्ष :**

**४.१५** उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक २७ ऑक्टोबर, २०१० रोजी सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग यांची साक्ष घेतली. त्यावेळी सेतू प्रकल्पाबाबत अधिक माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, महाराष्ट्र शासनाने साधारणपणे सन २००१-०२ मध्ये सेतू प्रकल्पाच्या संदर्भात निर्णय घेतला होता. शासन स्तरावरून नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवा सुविधा उदा. परवाने (Lincence & Permit) एकाच ठिकाणी मिळाले पाहिजेत. याकरिता वेगवेगळ्या कार्यालयात लोकांना जावे लागू नये तसेच शासनाने ठरवून दिलेल्या कालमर्यादेमध्ये ही सर्व कागदपत्रे मिळाली पाहिजेत. पूर्वी राज्यामध्ये एक खिडकी योजना राबविण्यात आली होती. त्याच योजनेला संगणकीकरणाची जोड देऊन ठाणे जिल्ह्यामध्ये प्रमुख ठिकाणी हा सेतू प्रकल्प राबविण्यात आला होता. या प्रकल्पाचे यश पाहून महाराष्ट्रामधील सर्व तालुक्यांमध्ये हा कार्यक्रम राबविण्याच्या संदर्भात सूचना

सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. त्याकरिता राज्य स्तरावर जिल्हा स्तरीय सेतू समिती स्थापन करण्यात आली होती. या सर्व समित्या स्थापन करताना त्यांची कार्यकक्षा व रुपरेषा सन २००२ च्या शासन निर्णयानुसार कळविण्यात आलेली आहे. हा शासन निर्णय काढण्यापूर्वी मंत्रीमंडळाची मान्यता घेण्यात आली होती. त्यावेळी शासनाचा जो विचार होता, त्या दृष्टीने फ्रंट एन्ड कम्प्युटरायजेशन केले गेले. सेतू फ्रंट एन्ड कम्प्युटरायजेशन आधुनिक असावे व त्या ठिकाणी शासकीय कर्मचारी न ठेवता त्यांना जी यंत्रणा जिल्हा स्तरावरील सेतू समिती नेमून देईल तेथील नागरिकांच्या समाधानाशी त्यांचा पगार जोडला जाणार आहे. शासनाच्या संपूर्ण यंत्रणेचे संगणकीकरण टप्प्याटप्प्याने करण्याच्या दृष्टीकोनातून सर्व ठिकाणी सेतू केंद्र निर्माण करण्यात आलेले आहेत. आज जवळ जवळ सर्व जिल्ह्यामध्ये व सर्व तालुक्यांमध्ये तसेच महानगरपालिकेच्या कार्यालयामध्ये ही यंत्रणा कार्यरत आहे.

सन २००२ मध्ये शासनाने केलेला विचार व आज माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये झालेला बदल यामध्ये बराच फरक आहे. माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये रोज नवनवीन बदल होत असतात. रोज नवे तंत्रज्ञान तयार होत असताना ही सर्व सेतू केंद्रे एकाच ठिकाणी एकाच पोर्टलवर यंत्रणेच्या माध्यमातून जोडली गेली आहेत. एका आज्ञावलीच्या माध्यमातून काम करणारी ही केंद्रे तालुक्यातच नव्हे तर ४ गावे मिळून एक अशा प्रकारे गाव स्तरावर देखील सुरु केली जाणार आहेत.

माहिती व तंत्रज्ञान विभागाने जो प्रमुख आक्षेप नोंदविला आहे, त्या संदर्भात विभागीय सचिवांनी त्या वेळी शासनाचा जो विचार होता, त्या दृष्टीने काम केले गेले आहे. प्रत्येक जिल्ह्याने वेगवेगळ्या निविदा काढल्या, त्यामुळे प्रत्येक ठिकाणचा दर वेगवेगळा होता. एकाच जिल्ह्यामध्ये वेगवेगळ्या एजन्सी कार्यरत होत्या. जास्तीत जास्त २० रुपये दर लावावा, असे शासनाने ठरविले होते. मात्र वेगवेगळ्या निविदाचे दरही वेगवेगळे होते. शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वी, ठाणे जिल्ह्यामध्ये एका संस्थेशी करार करण्यात आला होता. त्यामुळे काही ठिकाणी दर २३ किंवा २७ रुपये होता. म्हणजेच शासनाने ठरवून दिलेल्या दरापेक्षा हा दर अधिक होता. मात्र ही वस्तुस्थिती आहे. या सर्व यंत्रणेमध्ये सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. सर्व ठिकाणी समान दर असावेत या दृष्टीने प्रयत्न केला जाणार आहे. खाजगी यंत्रणेकडून किती काम होईल, याच्या आधारे काम ठरवून प्रत्येक व्यवहाराप्रमाणे पैसे दिले जाणार आहेत. त्यामुळे एखाद्या ठिकाणी १०० दाखले दिले असतील व दुसऱ्या ठिकाणी ५० दाखले दिले गेले असतील. तर ज्या ठिकाणी १०० दाखले दिले असतील तेथील उत्पन्न जास्त असल्यामुळे, दर कमी येईल. अशा प्रकारे शासन स्तरावर एक कमाल मर्यादा निश्चित केली जाणार आहे.

काही सेतू केंद्रामध्ये नागरिकांना योग्य प्रकारे सुविधा पुरविल्या जात नाहीत. यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, सेतू प्रकल्प तयार करण्याचे काम महसूल विभागाचे होते. पहिल्या टप्प्यामध्ये काम करुन दुसऱ्या टप्प्यामध्ये रक्कम प्रदान करण्याची सुविधा करण्यात आली. तिसऱ्या टप्प्यामध्ये विभागामार्फत काम केले जाणार असून चौथ्या टप्प्यात जिल्हापरिषदांनी स्वतंत्र सेतू केंद्र स्थापन केले तसेच काही महानगरपालिकांनी देखील स्वतंत्र सेतू केंद्र स्थापन केले. त्यामुळे जिल्हापरिषदेच्या संदर्भात एखादे काम असल्यास त्या ठिकाणी नागरिकांचे काम केले जाईल. त्यामुळे एखाद्या सेतू केंद्रामध्ये सुविधा न मिळाल्यास दुसऱ्या सेतू केंद्रामध्ये सुविधा मिळणार आहे अशी पद्धती आजही वापरात आहे.

सन २००१-२००२ मध्ये शासनाने सेतू प्रकल्प निर्माण केला होता. सन २००६ मध्ये ठाणे जिल्ह्यामधील यंत्रणेमध्ये शासनाने पुन्हा बदल केला आहे. भविष्याची गरज ओळखून सुरुवातीलाच तशा प्रकारचे काम करणे शक्य होत नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, खरे तर असे करता येत नाही. कारण तसे करणे व्यवहारिकदृष्ट्या शक्य होत नाही. सर्व गोष्टींचा विचार करुन या सर्व सुविधा नागरिकांना देऊ याची वाट पाहत बसणे योग्य होणार नाही. तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये रोज बदल होत असतात. पूर्वी सॉफ्टवेअर, हार्डवेअर, ब्रॉडबँड परवडत नव्हते. आता ते सहज उपलब्ध आहे. आणखी २ वर्षानंतर तंत्रज्ञानामध्ये बदल झालेला असेल. म्हणूनच सुरुवातीला फ्रंट एन्ड सिस्टीम वापरात होती. त्या नंतर बॅक एन्ड सॉफ्टवेअर वापरण्याचा निर्णय घेण्यात आला.

कागदविरहीत मंत्रालय असे स्वरुप अजूनही आपल्याला शक्य झालेले नाही. बॅक एन्ड सॉफ्टवेअर वापरताना ही संकल्पना अभिप्रेत होती काय ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, महाराष्ट्र शासनाने टीसीएस या कंपनीशी जॉईंट व्हेंचर केलेले आहे. इलेक्ट्रॉनिक फाईल तयार करण्याची यंत्रणा सुरु करण्याकरिता सॉफ्टवेअर तयार केले आहे. प्राथमिक तत्त्वावर हे सॉफ्टवेअर तंत्रज्ञान विभागामध्ये व माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या कार्यालयामध्ये नोव्हेंबर पासून वापरले जाणार आहे. शासनाच्या सर्व कामकाजाचे संगणकीकरण झालेले नव्हते त्या वेळी फ्रंट एन्ड कम्प्युटरायझेशन केले होते. अर्ज स्वीकारुन टोकन देण्याचे काम झाल्यानंतर यंत्रणेच्या माध्यमातून पैसे स्वीकारल्याची पावती देणे व त्यानंतर प्रकरण बंद करणे अशा प्रकारे बेसीक दर्जाचे हे सॉफ्टवेअर तयार करण्यासाठी शासनाने पैसे घालविण्याची गरज नव्हती. केवळ गाव पातळीवर सेतू केंद्र सुरु झाले आहेत.

सर्व जिल्ह्यांमध्ये सेतू केंद्रामधून ७/१२ चा उतारा दिला जातो काय ? राज्यामध्ये सेतू केंद्र सुरु झालेले आहेत, त्या संदर्भात लोकांमध्ये पुरेशा प्रमाणात जागृती झालेली आहे काय ? असे समितीने विचारले त्यावर राज्यामध्ये सेतू केंद्र तालुका स्तरावर सुरु करण्यात आलेले आहे. या प्रकल्पामुळे चांगला परिणाम होत आहे. मात्र याचे निकाल खूप चांगले आहेत, असे आम्ही म्हणणार नाही. यामध्ये आपण आता बदल करणार आहोत. राज्यातील ३५ जिल्हे व ३२० तालुके या प्रकल्पानुसार जोडले जाणार आहेत. सुरुवातीला वर्षभरामध्ये साधारणपणे २० तालुके जोडले जाणार आहेत त्या नंतर राज्यातील सर्व तालुके जोडले जातील. याकरिता आपल्याला एक सॉफ्टवेअर तयार करावयाचे आहे. ई-जिल्हा प्रकल्प पुढील महिन्यात सादर केले जाणार आहे. या सॉफ्टवेअरमुळे ऑनलाईन अर्ज केल्यास सेतू केंद्रामधून प्रमाणपत्र मिळू शकेल. तसेच सेतू केंद्रामधून ७/१२ चा उतारा दिला जातो.

लोकांना शासकीय कार्यालयातून कागदपत्रे मिळण्याकरिता बराच वेळ लागतो. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, अभिलेख अद्यावत करण्यामध्ये वेळ लागण्याची शक्यता आहे. गाव पातळीवरील अभिलेखे, ७/१२ चे उतारे, ६ ड चा अर्ज वेगळ्या यंत्रणेच्या माध्यमातून ठेवला जातो. नोंदणीची व ७/१२ च्या अभिलेख्यांची यंत्रणा वेगळी आहे. या दोन्ही वेगवेगळ्या यंत्रणा एकत्र केल्या जाणार आहेत. मुद्रांक खात्यामध्ये संगणकीकरणाचे काम सुरु होणार आहे. या अभिलेख्यांचा ताळमेळ घालण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. खरे तर नोंदणी झाल्यानंतर लगेच बदल केला गेला पाहिजे. सर्वांना नोटीसेस दिल्यानंतर प्रमाणपत्र दिले गेले पाहिजे. पुणे जिल्ह्यामध्ये प्राथमिक तत्त्वावर ३० तालुक्यांमध्ये हा प्रयोग राबविला आहे. या प्रयोगास चांगले यश मिळाले आहे. मुळशी तालुक्यामध्ये देखील २ महिने महत्त्वाचा प्रकल्प सुरु केला आहे. हा प्रकल्प यशस्वी झाला तर कागदपत्रासंदर्भातील बरेच प्रश्न सुटू शकतील.

डेटा एन्ट्री करताना काही वेळा चुका होतात, तसेच ७/१२ वरील उताऱ्यावरील नावावर बदल करण्याच्या संदर्भात आपल्याकडे कोणती यंत्रणा आहे ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, ७/१२ च्या उताऱ्याचे संगणकीकरण झालेले आहे. परंतु, डेटा बेस संबंधी माहिती व ७/१२ संदर्भातील माहिती महसूल विभागाशी संबंधित आहे. त्यामुळे त्यासंदर्भातील माहिती महसूल विभाग देऊ शकेल. परंतु डेटामध्ये संदर्भात जर चुका झाल्या तर त्यात बदल करण्याची सोय आज्ञावलीत आहे.

महालेखाकारांनी यासंदर्भात असे नमूद केले की, The Office of the Accountant General has received a reply from the Department (in May २००६) that benefits of ७/१२ certificates, domicile certificates and other things and works will be streamed line. ७/१२ Certificates, Property Cards will be issued immediately, as soon as, the person approaches to the

concerned authorities. The Department should not take much time in giving all these certificates. What is the position now?

Now, a question has been pointed out about updating of the ७/१२ Certificates. ७/१२ extract can be changed only after the mutation certificate is issued. Issuance of the mutation certificate itself is a long process. If there is no complaint, it may take years to issue it. The one of the objectives of computerization of the department is that there should be co-ordination in all the branches of the department. What is the position?

त्यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, just now, I mentioned about it to the Committee. The Revenue Department and the Registration Department is taking lot of care to do this job. We are trying to launch mutation entry and then only the ७/१२ certificate number has to be computerized. That number will be a mutated number and it will not be a certificate. Therefore, the Department is sorting out this issue.

पुढे महालेखाकारांनी असेही नमूद केले की, This work is carried out by the T.C.S. Can they properly take care of all these things? Is there proper co-ordination between the T.C.S and your various departments? त्यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, T.C.S. is handling certain part of work only. Maha-e Project is providing all these facilities i.e., issuing of certificates, licenses and permits. As far as the question of co-ordination between the Registration Department, Revenue Department and the Survey Department is concerned, it is handled by the Department of National Land Records. Modernization works is handled by the State Officers. Our one Pilot Project is successfully running in Mulshi Taluka. We are waiting for the formal launching of the project and whatever the programmes and facilities will be developed by them will be available on a portal. The updated ७/१२ certificate will also be made available on the portal and anybody can down load it. Sir, I would assure the Committee that everything is being taken care of.

खरेदी झाल्यानंतर ७/१२ च्या उताऱ्यावर नाव लावण्याकरिता १५ दिवस लागतात. रजिस्ट्रेशन झाल्यानंतर ७/१२ चा उतारा लवकरात लवकर मिळाला पाहिजे. अशी सूचना समितीने विभागास केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, समितीने केलेल्या सूचनेप्रमाणे बदल होणे आवश्यक आहे, असे विभागासही वाटते. परंतु, ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीत आहे. ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट मध्ये राज्य शासन बदल करु शकत नाही. इंग्रजांनी भारतामध्ये हा कायदा सन १८६० मध्ये केला होता. मात्र त्यांनी इंग्लंडमध्ये सन १९६५ मध्ये नवीन कायदा तयार केला. आपल्याकडे मात्र अजूनही हाच

कायदा अस्तित्वात आहे. सध्या कोर्टामध्ये सुरु असलेल्या ७० टक्के दाव्यांचे मूळ हे या कायद्यातील त्रुटी हे आहे. त्यामुळे हा कायदा बदलला गेला पाहिजे.

या संबंधीचा कायदा बदलणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे राज्य शासनाने यासंबंधात केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा, असे निदेश समितीने विभागास दिले.

महालेखाकारांनी पुढे अशीही विचारणा केली की, The General Administration Department has submitted a reply to our Office that, the Department will provide all the facilities and services to the people. These facilities are : Caste Certificate, Birth Certificates, ७/१२ Certificate etc. How much time the department will take to provide these facilities to the people of Maharashtra? Whether these facilities are being provided to the people of Maharashtra? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, We are launching these services in five Districts of the State and they will be available to the people from the next month. I would like to submit that looking at the successes and feed back of the scheme, we would also like to role out these services in other Districts also. The discussion is also going on with the Government of India about funding of this project. **At present, out of five Districts, the Government of India funds three Districts.** The Govt. of Maharashtra through Setu Society funds two Districts. We will role out this scheme in other Districts also if our experience and things go well. It is well and good if the Central Government will fund some of these projects, if not, the State Government will fund these projects.

यावर महालेखाकारांनी विचारणा केली की, Is it true that the I.T. Companies are providing all the staff and the G.A.D. is giving them support only? त्यावर विभागीय सचिवांनी माहिती दिली की, They are implementing the projects and maintenance of the projects has to be done by the Department. i.e. I.G. Registration.

समितीने विचारणा केली की, ते कोणते पाच जिल्हे आहेत? व त्यावर लातूर, नागपूर, नांदेड, सिंधुदुर्ग आणि पुणे हे पाच जिल्हे आहेत. त्याच्यामध्ये आणखी काही वाढ करता येईल काय या दृष्टीने आम्ही प्रयत्न करु, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्यावर केंद्र सरकारने निधी दिला नाही तर काय करणार? व यासाठी आपल्याकडे पुरेसा कर्मचारी वर्ग आहे काय? केंद्र सरकारने निधी दिला नाही तर राज्य सरकार करणार. प्रत्येक विभागाला यासंबंधीचा आढावा घ्यावयाचा होता. पात्रता माहिती व तंत्रज्ञान विभागाने आपला आढावा घेतला आहे. त्यामध्ये कर्मचारी वर्गाची माहिती नमूद केली आहे. प्रत्येक विभागाने त्यांच्यातील काही पदे काढून त्या

पदांच्या जागी माहिती तंत्रज्ञानाची पदे निर्माण करावीत. या पदांसाठी वेगळ्या प्रकारची पात्रता आणि वेगळी वेतन श्रेणी असेल या पदांचा आढावा घेतल्यानंतर ती मंत्रीमंडळासमोर येतील. त्याला मंत्रिमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर त्याची कार्यवाही होईल. माहिती तंत्रज्ञान हे वेगळे संवर्ग असले तरी त्या संवर्गाचे लोक असतात. कन्सल्टंट, प्रोजेक्ट मॅनेजमेंट देखील आय.टी. कंपन्यांच्या माध्यमातून काम करीत आहेत. योजना कार्यान्वित करताना आय.टी. कंपन्या कर्मचारी वर्ग देतात. प्रत्यक्ष काम खाजगी यंत्रणेमार्फत राबविले. सॉफ्टवेअर ज्या कंपनीने केले त्याला त्यांचा सपोर्ट मिळाला. प्रत्यक्ष क्षेत्रामध्ये काम करीत होते ते देखील वेगळ्या यंत्रणेचे लोक होते त्यांना यांचा सपोर्ट मिळाला. डी.आय.जी. कॉम्प्युटर असे वेगळे पद निर्माण केले आणि ज्या व्यक्तीला संगणकाचे ज्ञान आहे त्यांना त्या पदावर घेतले आणि त्याच्या माध्यमातून राबविले असे प्रत्येक विभागात करणे आवश्यक आहे.

स्पष्टीकरणात जिल्हाधिकारी, जळगाव यांनी तहसिलदार व सेतू केंद्र चालकांना अर्जदाराच्या छायाचित्राशिवाय शपथपत्र तयार केले जाणार नाही अशा सक्त सूचना दिल्या आहेत असे म्हटले आहे. याबाबत खुलासा करण्यास सांगितले असता जळगाव जिल्ह्यामध्ये हे झालेले आहे. जळगावच्या जिल्हाधिकाऱ्यांनी याबद्दलच्या सूचना देखील लोकांना दिलेल्या आहेत. यापुढे अशा पद्धतीने होऊ नये या दृष्टिकोनातून इतर जिल्हाधिकाऱ्यांना देखील याबाबतच्या सूचना देण्यात येत आहेत. मी याठिकाणी सन्माननीय समितीच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, ज्या कालावधीबद्दल आपण बोलत आहोत त्या कालावधीमध्ये प्रतिज्ञापत्रावर छायाचित्र असावे असा नियम नव्हता, अशी विभागीय सचिवांनी माहिती दिली.

जातीचे प्रमाणपत्र देताना जर प्रतिज्ञापत्रामध्ये काही बाबी राहिल्या तर तो मनुष्य त्या त्रुटी पूर्ण करीत नाही व त्यामुळे ते प्रकरण तसेच प्रलंबित राहते याबाबत काही उपाययोजना करणार आहात काय? अशी समितीने विचारणा केली असता, त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, ही बाब बरोबर असून त्या ठिकाणी वेब कॅमेरा लावतो. आता थोडेसे पुढे जाऊन प्रतिज्ञापत्राची पद्धत काढून साधा अर्ज करावयाचा असतो त्याला प्रतिज्ञापत्राचा दर्जा देता येईल काय याचा विचार करु.

जादा वसुलीच्या संदर्भात खुलासा करण्यास सांगितले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, शासनाने कमाल मर्यादा करार केला होता आणि शासनाने कमाल मर्यादा ठरविली होती. प्रत्येक जिल्ह्याने त्यांच्या स्तरावर निविदा काढल्या आणि त्या-त्या जिल्ह्यात १५ रुपये, १७ रुपये असे जे दर आले त्याप्रमाणे त्यांनी दर लावले. ठाणे जिल्ह्यातील दर २० रुपयापेक्षा जास्त होते. कारण ते शासनाच्या शासन निर्णय च्या आधीचे होते. त्यानंतर त्यांच्याबरोबर वाटाघाटी करण्यात आल्या. यानंतर

देखील दर जास्त होते त्यामुळे ते न्यायालयात गेले. आता त्यांच्याकडून ते पैसे वसूल करण्यात आले. त्यांचा पूर्वीचा करार संपत आला आहे. त्यामुळे आता नवीन पद्धतीप्रमाणे दर लावले जातील.

दराच्या बाबतीत समानता आहे काय? अशी समितीने विचारणा केली असता दराच्याबाबतची समानता असू शकत नाही. पुणे जिल्ह्यात हवेली तालुक्यात दिल्या जाणाऱ्या दाखल्यांच्या संख्येत आणि सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यात दिल्या जाणाऱ्या दाखल्यांच्या संख्येत खूप फरक आहे. खाजगी यंत्रणेचा खर्च आणि त्यांच्या नफ्याची मर्यादा पाहिली तर हवेली तालुक्यात १२ रुपये दर येईल आणि जत तालुक्यात तोच दर १७ रुपये येऊ शकतो. कमाल मर्यादेपेक्षा जास्त दर नागरिकांकडून घेण्यात येऊ नयेत असे बंधन घालण्यात येते. त्यावर कमाल मर्यादा किती आहे? असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी कमाल मर्यादा दर आता २० रुपये आहे. गाव स्तरावर सेतू केंद्रामार्फत ह्या सुविधा देऊ तेथे महाराष्ट्रात सगळीकडे हे दर समान असतील, असे सांगितले.

महालेखाकारांनी विचारणा केली की, In this matter, our point is that the Government has not issued any Government Resolution. There was no Government Resolution (G.R.) issued for increasing a fee of Rs.२५/-. त्यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, Department will have to check up this point. In departments opinion, any District cannot start the process of recovery unless and until there are orders of the Government. No District can start the recovery unless the orders of the Government are there. यावर महालेखाकारांनी विचारणा केली की, As per A.G.'s record, these orders were issued, just based on a discussion between the Deputy Secretary of Department and the Local Authority. How can it be?

त्यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, No District can start the recovery unless and until there is an order of the Government. When a Deputy Secretary is absolutely signing on any paper it is presumed that he does it with the approval of the Department. However, It should have to find it out the fact in this case. Department had already mentioned that Thane District case was a separate one. In this case, what happened is that, an agreement was made before the Government finalized the rates. However, as per orders, we have negotiated about the rates with the Party but it went into the Court. Now, that question has been settled.

समितीने "सदर प्रमाणपत्रे सेतू केंद्रामार्फत वितरित करावयाची असल्याने, शासकीय दरा व्यतिरिक्त सेतू सोसायटीस देय असणारा सुविधा आकार निश्चित करण्यासाठी समिती नेमण्यात आली. तद्‌नंतर महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्रमांक १००२/प्र.क्र.२९/ल-१/सेल दिनांक ३०/९/२००३

अन्वये रु. २५/- मात्र सुविधा आकार निश्चित करण्यात आला." याचे काय झाले? अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी असे नमूद केले की, सन २००३ मध्ये सुविधा आकार २५ रुपये निश्चित करण्यात आला व त्याप्रमाणे त्यांना कळविण्यात आले. त्यानंतर शासनाने दिनांक ४ मार्च, २००४ ला या संबंधीचे परिपत्रक काढले आणि सर्वसामान्य प्रमाणपत्रासाठी जास्तीत जास्त रु.२० इतका सुविधा आकार लावण्यात यावा असे कळविण्यात आले. सन २००३ मध्ये ठाणे जिल्ह्याकरीता सुविधा आकार २५ रुपये कळविण्यात आला होता त्याप्रमाणे ते वसूल करीत होते. असा खुलासा केला त्यावर यासंदर्भात समिती नेमण्याचे प्रयोजन काय? यासंदर्भात विभागीय सचिवांनी त्यावेळी नेमके काय घडले हे आता सांगणे कठीण आहे, असे समाधानकारक उत्तर दिले.

महालेखाकारांनी There is a requirement of the Government Resolution at that time, no Government Resolution was issued? There was just a discussion and no Government Resolution was issued. Why ? अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी "I have a letter here. It is issued on ३०th Sepember, २००३ by the Government of Maharashtra. Now, my submission before this august Committee is that this issue should be treated as settled," असा खुलासा केला.

यावर हे दर फक्त ठाण्यासाठी नवीन करार होण्याच्या आधी होते काय? अशी समितीने विचारणा केली असता सन २००४ मध्ये शासन निर्णय काढून २० रुपये कमाल मर्यादा ठरविण्यात आला, असा खुलासा सचिवांनी केला.

समितीने पुढे SLSS च्या संदर्भात खुलासा करण्यात सांगितले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सेतू केंद्रामध्ये जेवढे पैसे जमा होतील त्यातील १० टक्के रक्कम राज्य स्तरीय सेतू समितीकडे यावेत आणि राज्य स्तरीय सेतू समितीने हे पैसे इतर विभागाच्या किंवा कुठल्याही विभागाच्या संगणकीकरणासाठी वापरावयाचे होते. सेतू केंद्राकडून दोन कोटी आणि काही लाख रुपये आजमितीस सेतू समितीकडे प्राप्त झाले आणि ते वेगवेगळ्या गोष्टीसाठी खर्च करण्यात येत आहेत. काही पैसे प्रशिक्षणावर खर्च करीत आहोत. केंद्र सरकार तीन जिल्ह्यांसाठी पैसे देते. दोन जिल्ह्यामध्ये राज्य शासनामार्फत संगणकीकरण करण्यात येत आहे. राज्य शासनाकडून जे पेसे खर्च करण्यात येतात ते सेतू समितीच्या माध्यमातून देण्यात येतात. इतर तीन जिल्ह्यात केंद्र सरकारमार्फत खर्च करण्यात येत आहे. त्यासाठी केंद्र सरकारने पैसे दिले नाही तर संगणक विकत घेणे, एजन्सी नेमणे हा खर्च ताबडतोब भागविला जावा या उद्देशाने हा निर्णय घेतलेला आहे.

समितीपुढे जातीचे प्रमाणपत्र, प्राप्ती प्रमाणपत्र, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र इ. निर्गमित करण्याचे काम BOT तत्त्वावर देण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांना जो खरा लाभ मिळणे आवश्यक आहे तो मिळेल काय? अशी विचारणा विभागास केली असता, विभागीय सचिवांनी नागरिकांना याचा लाभ मिळेल. यासंदर्भात त्यांनी नोंदणी विभागाचे उदाहरण दिले. नोंदणी विभागात संगणकीकरण चालू असतानाच असा प्रयोग केला की, कोणीही येऊन कागदपत्रे द्यावीत आणि नोंदणी करावी. त्याप्रमाणे लोकांनी कागदपत्रे दिल्यानंतर अर्ध्या-तासाच्या आत नोंदणी करुन ते बाहेर पडले. परंतु यांचे दर काय आहेत व काम वाढल्यानंतर हे दर आपोआप कमी होतील काय? अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सध्या दर २० रुपये आहे. गाव स्तरावरील सेतू केंद्राच्या मार्फत १ लाखाचे व्यवहार होतात. एक लाख लोक येतात आणि त्यांचे काम करुन जातात. ही संख्या ५० लाखा पर्यंत जाईल तेव्हा हे दर कमी होतील. एक लाख ही संख्या कमी आहे. शासनाला जवळ जवळ ११,००० केंद्र सुरु करावयाचे आहेत. आता फक्त ६५०० केंद्र सुरु आहेत. ६५०० केंद्रामध्ये फक्त एक लाख व्यवहार होतात. प्रत्येक सेतू केंद्रात फक्त १० ते १५ व्यवहार होतात. याचा अर्थ एका केंद्रात १० ते १५ लोक जातात आणि त्यांचे दाखले घेतात. ही संख्या ५० लाखापर्यंत जाऊ शकेल याची आम्हाला खात्री आहे अशी माहिती दिली.

सेतू केंद्रातूनच दाखले घेतले पाहिजेत असे सक्तीचे आहे काय? यावर सक्तीचे नाही पण लोक सेतू केंद्रातून दाखले घेणे पसंत करतील. कारण दुसऱ्या कुठल्याही मार्गापेक्षा हा मार्ग सुकर आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

समितीने विचारणा केली की, या सेतू केंद्रातून अशा प्रकारचे दाखले मिळतील परंतु अशा प्रकारे पैसे देऊन शिधावाटप पत्रिका तसेच दाखले मिळण्याची पर्यायी व्यवस्था निर्माण झाली तर या सेतू केंद्राचा उद्देश सफल होणार नाही. यावर यासंदर्भात आता लगेच सांगता येणार नाही. ज्या सुविधा गाव पातळीवरील सेतू केंद्रामार्फत उपलब्ध होतील त्या इतर माध्यमातून उपलब्ध होणार नाहीत यासाठी जे सक्तीचे करावे लागेल ते करण्याचा प्रयत्न करु परंतु यासंदर्भात आता भाष्य करणे कठीण आहे. पण विभाग नक्की ते करण्याचा प्रयत्न करेल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

समितीने यासाठी गाव स्तरावरील सेतू केंद्रातील विभागाचा कर्मचारीवर्ग प्रशिक्षित असण्याची गरज आहे, असे मत व्यक्त केले असता कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले त्यावर कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाचा खर्च कोण करणार? असे समितीने विचारले असता जी

कंपनी नेमण्यात येईल त्या कंपनीच्या माध्यमातून हे प्रशिक्षण देण्यात येईल, अशीही माहिती विभागीय सचिवांनी दिली.

प्रशिक्षणावर लागणारा खर्च सेतू केंद्रामार्फत करण्यात येणार आहे. तेव्हा ही सेवा सेतू अस्तित्वात आल्यानंतर यातील दोष दूर होतील काय? असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यातील दोष बऱ्याचअंशी दूर होतील. आजही काही चुका होत असतील तर त्या पुढच्या टप्प्यात दुरुस्त कराव्या लागतील. सुरुवातीलाच सांगितल्याप्रमाणे ही एक अति उत्कृष्ट सेवा निर्माण करावी लागणार आहे. कारण आपण उत्कृष्ट करत नाही आणि काहीच करीत नाही. आपण चांगल्या स्तरावर आहोत. चांगल्या वरुन उत्कृष्टपर्यंत जाऊ. त्यानंतर अतिउत्कृष्ट पर्यंत जाण्याचा प्रयत्न करु.

समितीने पुढे अशीही विचारणा केली की, महा ई-सेवा सध्या पाच जिल्ह्यात सुरु करण्यात येत आहे. संपूर्ण महाराष्ट्रात ही सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी किती वेळ लागेल? ही सेवा गडचिरोलीपर्यंत पोहचली पाहिजे.

आजही गडचिरोली जिल्ह्यात सेतू केंद्र सुरु केलेले आहे. सेतू केंद्र सर्व जिल्ह्यांमध्ये सुरु केलेले आहेत. नागपूर आणि अमरावती विभागात हे काम अधिक चांगले झालेले आहे. परंतु नाशिक मध्ये काहीच काम झालेले नाही. तेथील यंत्रणा बंद करण्यात आली आहे. नागपूर आणि मराठवाड्यात एजन्सीने काम बऱ्यापैकी केलेले आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यामध्ये गाव स्तरावर जवळ जवळ १२,००० ठिकाणी सेतू केंद्र सुरु करण्यात येत आहेत. ही सर्व केंद्र या वर्षाखेरपर्यंत सुरु होण्याची शक्यता आहे. फक्त नाशिक विभागात थोडासा उशीर होण्याची संभावना आहे, अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

समितीने महाराष्ट्रात भारनियमन असते त्यावेळी विभाग काय करणार ? अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, भारनियमनाच्या अनुषंगाने आपण प्रत्येक ठिकाणी पॉवर बॅकअपची व्यवस्था केलेली आहे. आम्ही ८ तासांच्या बॅकअपची व्यवस्था केली होती. पण ८ तासाचे बॅकअप झाल्यानंतर बॅटरी डिस्चार्ज होते आणि त्यानंतर ती परत चार्ज करावी लागते. तेव्हा परिस्थिती फार खराब होती आता परिस्थिती सुधारलेली आहे. काही ठिकाणी जनरेटर तसेच काही ठिकाणी सोलर बॅकअप ची व्यवस्था आहे. सोलर बॅकअप सक्तीचे करण्याबाबत केंद्र सरकारला लिहिले आहे. महाराष्ट्रातील केंद्राला सोलर बॅक-अप आहे.

महालेखाकारांनी समितीच्या असे निदर्शनास आणून दिले की, Our experience is somewhat different. The Departmental Representative just now explained that the Department is implementing some projects on the pilot basis. In my opinion, the Department should expedite these projects within six months and then we will send our audit staff/team to review it. They will take a survey of services provided by these projects and the co-ordination among the various agencies and departments of the Government. त्यावर विभागीय सचिवांनी absolutely, there is no problem. I agree with you. I will prepare a note and send it to your Office and then after six months your department can check it up. We are ready and willing to give you all kind of cooperation in this matter. असे प्रतिपादन केले. त्यावर महालेखाकारांनी विचारणा केली. The revenue is collected by the DLSS. I would like to know that, on what basis, it is distributed? What is the percentage of revenue? त्यावर विभागीय सचिवांनी the percentage is १० + १० + ८० अशी माहिती समितीस दिली.

समितीने केंद्रांची संख्या वाढविण्याची आवश्यकता आहे, असे मत व्यक्त केले असता जिल्हाधिकाऱ्यांच्या अखत्यारित केंद्रे वाढवू शकतात त्या ठिकाणी बसणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या सुद्धा वाढू शकते. कदाचित सह्या करणाऱ्या अधिकाऱ्यांची कमतरता असेल अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

समितीने सेतू केंद्रामध्ये प्रतिज्ञापत्रांसाठी सुद्धा बराच वेळ लागतो, अशी माहिती दिली असता सही करण्यासाठी तहसीलदार लागतात तसेच त्या ठिकाणी बसणारे कर्मचारी लागतात. १ संगणक वाढविला तरी व्यवस्था होऊ शकते. आम्ही तसे कळवू, अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

हे काम बीओटी तत्त्वावर दिलेले आहे. त्याबाबत अटी व शर्थी काय आहेत? अशी समितीने विचारणा केली असता जे काम आहे त्यासाठी कालमर्यादा दिलेली आहे. त्यांच्यावर ती बंधनकारक आहे. अर्ज स्वीकारणे, टोकन देणे, अर्जाची पूर्तता करुन बॅक एंडला जो शासकीय कर्मचारी आहे त्यांच्यापर्यंत पोहोचविणे तसेच त्यांच्याकडून आल्यानंतर परत त्या काऊंटरला संबंधित व्यक्तीकडे देणे, टोकन परत घेणे, पैसे घेणे असे काम आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

याकामी किती ठिकाणी एजन्सी नेमलेल्या आहेत ? असे समितीने विचारले असता सर्व तालुक्यांमध्ये, महापालिकांमध्ये तसेच बऱ्याचशा जिल्हापरिषदांमध्ये एजन्सी नेमलेल्या आहेत, अशी माहिती समितीस दिली त्यावर नवी मुंबई येथील एक एजन्सी पुण्यामध्ये काम करते. त्यांच्याकडून लोकांना पाहिजे तशी सेवा मिळत नाही. याबाबतीत काही केले आहे काय ? अशी माहिती समितीने

विचारली असता विभागीय सचिवांनी पुणे जिल्ह्याच्या बाबतीत असे काही प्रश्न असतील तर त्याची चौकशी करु. तसेच पुणे जिल्ह्याच्या बाबतीत नाही पण एक सर्वसाधारण तक्रार नुकतीच पंधरा-वीस दिवसांपूर्वी प्राप्त झाली होती. काही जिल्ह्यांमध्ये भरारी पथक करावे असे विभागाने ठरविले होते. पुणे जिल्ह्याच्या बाबतीत जी तक्रार आहे त्याबाबत विभाग खात्री करुन घेईल अशी माहिती दिली. यावर समितीने सर्व जिल्ह्यांमध्ये भरारी पथक असले पाहिजे. असे मत व्यक्त केले असता याबाबत ते जिल्हाधिकाऱ्यांच्या अखत्यारित असणे अपेक्षित आहे व त्या ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांचे नियंत्रण आहे, अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

जिल्ह्याच्या ठिकाणी फार अडचणी येतात, असे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, आता तालुक्याच्या ठिकाणी ते केंद्रित झालेले आहे त्यामुळे सगळ्यांना त्याच ठिकाणी यावे लागते. लोकांना दुसरा मार्ग नाही. यामध्ये स्पर्धा नसेल तर ज्यांच्याकडे मक्तेदारी असते ते गैरवापर करु शकतात. आता आपण गावस्तरापर्यंत ही सुविधा देणार आहेत. या सेवा आता तालुका, जिल्हा आणि गावस्तरावर देणार आहोत. त्यामुळे मक्तेदारी बंद होण्यास मदत होईल.

जे सुशिक्षित बेरोजगार आहेत त्यांना त्या ठिकाणी काम देता येणार नाही काय ? असे समितीने मत व्यक्त केले असता एका जिल्ह्यातील माणसे दुसऱ्या जिल्ह्यात पाठविली तर त्यांना जाण्या-येण्याचा खर्च परवडणार नाही. विभागाचा अनुभव असा आहे की, अनेक ठिकाणी स्थानिक लोकांना घेतलेले आहे.

त्यावर स्थानिक लोकांना प्राधान्य द्यावे, अशी सूचना समितीने विभागास केली असता विभागीय सचिवांनी त्यास सकारात्मक आश्वासन दिले. सुविधा केंद्रामध्ये जे दाखले बनविले जातात ते सहीसाठी अधिकाऱ्यांकडे गेल्यानंतर अधिकारी त्यांची नोंद न घेता बाजूला ठेवतात. त्यांच्यावर दोष येऊ नये म्हणून ते नोंद करीत नाहीत. ठराविक दिवसात दाखला देणे सक्तीचे असेल तर त्यांच्याकडे दाखला आलाच नाही हे सिद्ध करण्यासाठी असे करतात अशी माहिती समितीने दिली असता, विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, जेव्हा आपण इलेक्ट्रॉनिकली पाठवू तेव्हा ते तपासू शकतो. सेतू केंद्रामध्ये अर्ज स्वीकृत करुन तो स्कॅन करुन फोल्डर संबंधित तहसीलदाराकडे किंवा उप जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविले तर आपण चेक तपासू शकतो. अन्यथा ते दबावतंत्र वापरु शकतात आणि ऑपरेटरवर दोष येऊ शकतो. हे आपण दुसऱ्या टप्प्यामध्ये करणार आहोत.

नाशिकमध्ये इतर विभागाच्या मानाने कमी काम आहे. त्या ठिकाणी ते वाढविण्यासाठी काही उपाययोजना केली आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी आपल्याला

गावस्तरावर सेतू केंद्रे सुरु करावयाची होती. महाराष्ट्रामध्ये ४४ हजार गावे आहेत. आपण १२ हजार सेतू केंद्रे गावस्तरावर पहिल्या टप्प्यामध्ये सुरु करीत आहोत. वेगवेगळ्या विभागात वेगवेगळी एजंसी आहे. नाशिक विभागामध्ये जी एजंसी होती त्यांनी ते काम केले नाही म्हणून त्यांची एजंसी बंद केली. आता नवीन निविदा काढून नवीन एजंसी नियुक्त करीत आहोत. ती बाब अंतिम टप्प्यामध्ये आहे. त्यांनी व्हायबिलिटी गॅप मागितलेली आहे. १ हजार रुपये महिन्याला दर मागितलेला आहेत. दर कमी करण्याच्या बाबतीत त्यांच्याशी वाटाघाटी करीत आहोत. ज्या महिन्यात त्यांना कार्यादेश देऊ तेथून पुढे ते काम करतील. आपण विभागवार पाहिले तर पुणे विभागात २५ टक्के कोकण विभागामध्ये २६ टक्के, विदर्भामध्ये ७० टक्के केंद्रे उघडलेली आहेत तर नाशिक विभागामध्ये शून्य टक्के आहे. हा जो फरक आहे तो आम्ही कमी करणार आहोत. आता जी एजंसी आलेली आहे ती चांगली आहे. परवाच त्यांच्या बरोबर बैठक झाली. त्यांची विचारसरणी आणि कामकाज बरे वाटले. त्यांच्या बाबतीत आपण विचार करीत आहोत.

महालेखाकारांनी असा मुद्दा उपस्थित केला की, Our Office has noticed that in seven cases, applicants below १८ years of age had executed affidavits. In some cases, same I.D. was provided. How are you going to control over it? Who is doing this job? Is it done by DIT? यावर विभागीय सचिवांनी माहिती दिली की, This is not the job of DIT. This is the job of the person who is issuing the certificate. Tahsildar and Deputy Collector, who is signing the Certificate has to clearly mention the caste in the document. त्यावर महालेखाकारांनी पुढे असाही मुद्दा उपस्थित केला की, Now, the caste certificates are issued to different castes. The Department must provide separate I.D. for separate castes. All the castes should not have the same I.D. If I put an entry of a particular caste then it should accept that caste only and it will not accept the entry of other caste. यावर विभागीय सचिवांनी सांगितले we will take care of it. This is our job and we will certainly improve the system.

समितीने त्याबाबतीत काय सुधारणा केलेली आहे? अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी नवीन आज्ञावलीमध्ये सुधारणा केलेली आहे आणि करीत आहोत अशी माहिती दिली. यावर विभागाने काय काय सुधारणा केली याची माहिती तसेच नाशिकच्या संदर्भात समितीला माहिती द्यावी असे विभागास सांगितले असता विभागाकडून सदर आश्वासित माहिती प्राप्त झाली असून

नवीन आज्ञावलीमध्ये काय काय सुधारणा केली आहे याची माहिती :-

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार सेवांचे ई इनॅबलमेंट करुन देण्यासाठी ई डिस्ट्रीक्ट प्रकल्प सुरु केला आहे. या प्रकल्पा अंतर्गत शासन ते नागरीक या सेवा महा ई-सेवा केंद्राच्या माध्यमातून सुरु होणार आहे. सद्या ई डिस्ट्रीक्ट हा प्रकल्प पाच जिल्हास्तरावर राबविण्याचे निश्चित झाले असून या अंतर्गत १० सेवा नागरीकांसाठी उपलब्ध करुन दिल्या जाणार आहेत. ह्या सेवा नजिकच्या महा ई-सेवा केंद्रातून नागरीकांना दिल्या जाणार आहेत. या प्रक्रियेमुळे खालीलप्रमाणे सुधारणा होण्याचे अपेक्षित आहे.

अ. इलेक्ट्रॉनिक वर्क फ्लो/डॉक्युमेंट मॅनेजमेंट सिस्टीम उपलब्ध होणार असून अर्जाचा वर्क फ्लो इलेक्ट्रॉनिक पद्धतीने ठेवला जाणार आहे. अर्जाची स्थिती इलेक्ट्रॉनिक पद्धतीने अद्ययावत ठेवली जाणार आहे.

ब. एक समान व प्रमाणित आज्ञावली महाराष्ट्रभर राबविली जाणार आहे.

क. प्रत्येक अर्जाला एक विशिष्ट ओळख क्रमांक देण्यात येईल याद्वारे अर्जांची स्थिती कुठल्याही महा ई-सेवा केंद्रामधून बघावयास मिळेल.

ड. दाखले डिजीटल स्वाक्षरीद्वारे निर्गमित केले जाणार आहेत.

इ. केंद्रीभूत माहितीकोष (Database) असलेले वेब आधारीत वेब व एप्लीकेशन सर्वर....

ई. ऑनलाईन पद्धतीने अर्जांची स्थिती बघावयाची सुविधा तसेच एमआयएस व अहवालाची निर्मिती... अशी सुधारणा केलेली आहे तसेच

नाशिक विभागाकरीता एजन्सीची नियुक्ती करण्यात आली आहे. LOI (Letter of Intent) या एजन्सीला देण्यात आला असून करार स्वाक्षरीची प्रक्रिया सुरु आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

**४.१६** राज्यामध्ये एक खिडकी योजना राबविण्यात आली होती. त्याच योजनेला संगणकीकरणाची जोड देऊन ठाणे जिल्ह्यामध्ये प्रमुख ठिकाणी सेतू प्रकल्प राबविण्यात आला होता. या प्रकल्पाचे यश पाहून महाराष्ट्रामधील सर्व तालुक्यांमध्ये हा कार्यक्रम राबविण्याच्या संदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे.

**४.१७** प्रत्येक जिल्ह्याने वेगवेगळ्या निविदा काढल्या, त्यामुळे प्रत्येक ठिकाणचा दर वेगवेगळा होता. एकाच जिल्ह्यामध्ये वेगवेगळ्या एजन्सी कार्यरत होत्या. जास्तीत जास्त २० रुपये दर लावावा असे शासनाने ठरविले होते. मात्र वेगवेगळ्या निविदाचे दरही वेगवेगळे होते. शासन निर्णय निर्गमित

होण्यापूर्वी, ठाणे जिल्ह्यामध्ये एका एजन्सीशी करार करण्यात आला होता. त्यामुळे काही ठिकाणी दर २३ किंवा २७ रुपये होता. म्हणजेच शासनाने ठरवून दिलेल्या दरापेक्षा हा दर अधिक होता. ही वस्तुस्थिती असली तरी या सर्व यंत्रणेमध्ये सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. सर्व ठिकाणी समान दर असावेत या दृष्टीने प्रयत्न केला जाणार आहे. खाजगी यंत्रणेकडून किती काम होईल, याच्या आधारे काम ठरवून प्रत्येक व्यवहाराप्रमाणे पैसे दिले जाणार आहेत. त्यामुळे एखाद्या ठिकाणी १०० दाखले दिले असतील व दुसऱ्या ठिकाणी ५० दाखले दिले गेले असतील. तर ज्या ठिकाणी १०० दाखले दिले असतील तेथील उत्पन्न जास्त असल्यामुळे, दर कमी येईल. अशा प्रकारे शासन स्तरावर एक कमाल मर्यादा निश्चित केली जाणार आहे.

**४.१८** सेतू प्रकल्प तयार करण्याचे काम महसूल विभागाचे असून पहिल्या टप्प्यामध्ये काम करुन दुसऱ्या टप्प्यामध्ये रक्कम प्रदान करण्याची सुविधा करण्यात आली. तिसऱ्या टप्प्यामध्ये विभागामार्फत काम केले जाणार असून चौथ्या टप्प्यात जिल्हापरिषदांनी स्वतंत्र सेतू केंद्र स्थापन केले तसेच काही महानगरपालिकांनी देखील स्वतंत्र सेतू केंद्र स्थापन केले असून जिल्हापरिषदेच्या संदर्भात एखादे काम त्यांच्याकडे असल्यास त्या ठिकाणी ते केले जाईल**. अशी पद्धती वापरात असली तरी सदर पद्धतीची अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे एखाद्या सेतू केंद्रामध्ये सुविधा न मिळाल्यास दुसऱ्या सेतू केंद्रामध्ये सुविधा मिळणाच्या पद्धतीची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

४.१९ राज्यातील ३५ जिल्हे व ३२० तालुके सेतू प्रकल्पानुसार जोडले जाणार आहेत. सुरुवातीला वर्षभरामध्ये साधारणपणे २० तालुके जोडले जाणार असून त्यानंतर राज्यातील सर्व तालुके जोडले जातील. तसेच गाव सेतू केंद्र सुरु करावयाची असून महाराष्ट्रात ४४ हजार गावे आहेत ही सर्व गावे जोडण्यात येणार आहेत. याकरिता एक सॉफ्टवेअर तयार करावयाचे आहे. ई-जिल्हा प्रकल्प सुरु केला जाणार आहे. सेतू केंद्रात शासनाने वापरलेल्या सॉफ्टवेअरमुळे ऑनलाईन अर्ज केल्यास सेतू केंद्रामधून सर्टीफिकेट मिळू शकेल. तसेच सेतू केंद्रामधून ७/१२ चा उतारा दिला जातो.

**४.२० गाव पातळीवरील अभिलेखे, ७/१२ चे उतारे, ६ ड चा अर्ज वेगळ्या यंत्रणेच्या माध्यमातून ठेवला जातो. नोंदणीची व ७/१२ च्या अभिलेख्यांची यंत्रणा वेगळी आहे. या दोन्ही वेगवेगळ्या यंत्रणा एकत्र करुन मुद्रांक खात्यामध्ये संगणकीकरणाचे काम सुरु करताना या अभिलेख्यांचा ताळमेळ घालण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. खरे तर नोंदणी झाल्यानंतर लगेच अभिलेख्यामध्ये बदल केला गेला पाहिजे. सर्वांना नोटीसेस दिल्यानंतर प्रमाणपत्र दिले गेले पाहिजे. उपरोक्त दोन्ही यंत्रणेचे महत्त्व व सामान्य**

**जनतेची गरज लक्षात घेता शहर, जिल्हा, तालुका व गाव पातळीवरील सर्व ग्रामपंचायतीमध्ये ह्या यंत्रणा राबविण्यात याव्यात, अशी समितीची शिफारस आहे.**

४.२१ सेतू केंद्राचे काम हे संबंधित विभागाने करावयाचे आहे. याकरिता या विभागांनी त्यांच्याकडील उपलब्ध पदांचा आढावा घ्यावयाचा आहे. माहिती व तंत्रज्ञान विभागाने आढावा घेतला आहे. त्यामध्ये कर्मचाऱ्यांची माहिती नमूद केली आहे. प्रत्येक विभागाने त्यांच्यातील काही पदे काढून त्या पदांच्या जागी माहिती व तंत्रज्ञानाची पदे निर्माण करावयाची आहेत. या पदांसाठी वेगळ्या प्रकारची पात्रता आणि वेगळी वेतन श्रेणी असेल. या पदांचा आढावा घेतल्यानंतर ती मंत्रीमंडळासमोर येतील. त्याला मंत्रिमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर त्याची कार्यवाही होईल. माहिती तंत्रज्ञान हे वेगळे संवर्ग असले तरी त्याचे लोक असतात. कन्सल्टंट, प्रोजेक्ट मॅनेजमेंट देखील आय.टी. कंपन्यांच्या माध्यमातून काम करीत आहेत. योजना कार्यान्वित करताना आय.टी. कंपन्या कर्मचारी वर्ग देतात. प्रत्यक्ष काम खाजगी यंत्रणेमार्फत राबविले. सॉफ्टवेअर ज्या कंपनीने केले त्याला त्यांचा सपोर्ट मिळाला. प्रत्यक्ष क्षेत्रामध्ये काम करीत होते ते देखील वेगळ्या यंत्रणेचे लोक होते त्यांना यांचा सपोर्ट मिळाला. डी.आय.जी. कॉम्प्युटर असे वेगळे पदे निर्माण केली आणि ज्या व्यक्तीला संगणकाचे ज्ञान आहे त्यांना त्या पदावर घेतले आणि त्याच्या माध्यमातून प्रकल्प राबविले. **माहिती व तंत्रज्ञान विभागाने अवलंबिलेल्या कार्यपद्धतीचा शासनाच्या सर्व विभागानी अवलंब करुन याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**४.२२ जातीचे प्रमाणपत्र देताना जर प्रतिज्ञापत्रामध्ये काही त्रुटी राहिल्यास त्या पूर्ण करण्यात येत नाही व त्यामुळे ते प्रकरण तसेच प्रलंबित राहते याबाबत प्रतिज्ञापत्राची पद्धत काढून छायांकित लावलेल्या साध्या अर्जास प्रतिज्ञापत्राचा दर्जा देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

४.२३ सेतू केंद्रामार्फत वितरित करावयाची प्रमाणपत्रे शासकीय दरा व्यतिरिक्त सेतू सोसायटीस देय असणारा सुविधा आकार निश्चित करण्यासाठी समिती नेमण्यात आली. तदनंतर महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्रमांक १००२/प्र.क्र.२९/ल-१/सेल दिनांक ३०/९/२००३ अन्वये रु. २५/- मात्र सुविधा आकार निश्चित करण्यात आला. सन २००३ मध्ये सुविधा आकार २५ रुपये निश्चित करण्यात आला व त्याप्रमाणे त्यांना कळविण्यात आले. त्यानंतर शासनाने दिनांक ४ मार्च, २००४ ला या संबंधीचे परिपत्रक काढले आणि सर्वसामान्य प्रमाणपत्रासाठी जास्तीत जास्त रु.२० इतका सुविधा आकार लावण्यात यावा असे कळविण्यात आले. सन २००३ मध्ये ठाणे जिल्ह्याकरीता सुविधा आकार २५ रुपये कळविण्यात आला होता त्याप्रमाणे ते वसूल करीत होते. **सेतू केंद्राने प्रमाणपत्र व इतर दस्तऐवज**

**देण्यासाठी शासन निर्णयानुसार दर निश्चित केले असतानाही शासनाने समिती नियुक्त करण्याची कारणे काय होती याबाबत समितीला माहिती देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

४.२४ सेतू केंद्रामध्ये जेवढे पैसे जमा होतील त्यातील १० टक्के रक्कम राज्य स्तरीय सेतू समितीकडे द्यावेत आणि राज्य स्तरीय सेतू समितीने हे पैसे इतर विभागाच्या किंवा कुठल्याही विभागाच्या संगणकीकरणासाठी वापरावयाचे होते. सेतू केंद्राकडून दोन कोटी आणि काही लाख रुपये सेतू समितीकडे प्राप्त झाले आणि ते वेगवेगळया गोष्टीसाठी खर्च करण्यात येत आहेत. काही पैसे प्रशिक्षणावर खर्च केले आहेत. केंद्र सरकार तीन जिल्ह्यांसाठी पैसे देते. दोन जिल्ह्यामध्ये राज्य शासनामार्फत संगणकीकरण करण्यात येत आहे. राज्य शासनाकडून जे पेसे खर्च करण्यात येतात ते सेतू समितीच्या माध्यमातून देण्यात येतात. इतर तीन जिल्ह्यात केंद्र सरकारमार्फत खर्च करण्यात येत आहे. त्यासाठी केंद्र सरकारने पैसे दिले नाही तर संगणक विकत घेणे, एजन्सी नेमणे हा खर्च ताबडतोब भागविला जावा या उद्देशाने हा निर्णय घेतलेला आहे. तथापि, ताबडतोब भागविलेल्या खर्चाची रक्कम पुन्हा राज्य स्तरीय सेतू समितीकडे जमा होणे गरजेचे आहे कारण सेतू समितीकडे ज्या हेतूसाठी पैसा जमा करण्यात आला होता तो त्याच हेतूसाठी खर्च होईल परंतू तसे झालेले दिसत नाही. त्यामुळे **राज्यस्तरीय सेतू समितीकडे जमा होणारी रक्कम ही नियमानुसार व शासकीय निकषानुसार खर्च करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

४.२५ ज्या सुविधा गाव पातळीवरील सेतू केंद्रामार्फत उपलब्ध होतील त्या इतर माध्यमातून उपलब्ध होणार नाहीत त्यामुळे सेतू केंद्रातून माहिती घेण्याचे सक्तीचे करण्यात यावे. त्यासाठी गाव स्तरावरील सेतू केंद्रातील विभागाचा कर्मचारीवर्ग प्रशिक्षित असण्याची गरज आहे. कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात यावे. प्रशिक्षणावर लागणारा खर्च सेतू केंद्रामार्फत करण्यात यावा. तेव्हा ही जी सेवा सेतू केंद्रामध्ये अस्तित्वात आहे त्यातील दोष दूर करण्यात यावे व एक अति उत्कृष्ट सेवा निर्माण करावी. **महा ई-सेवा सध्या पाच जिल्ह्यात सुरु करण्यात येत असून ही सेवा संपूर्ण महाराष्ट्रात लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

४.२६ महाराष्ट्रात भारनियमन असते. त्याकरिता प्रत्येक ठिकाणी पॉवर बॅकअपची व्यवस्था केलेली आहे. सध्या ८ तासांच्या बॅकअपची व्यवस्था केली होती. काही ठिकाणी जनरेटर तसेच काही ठिकाणी सोलर बॅकअपची व्यवस्था आहे. **संगणकासाठी ८ तासांच्या पॉवर बॅकअपची व्यवस्था पुरेशी नसून जनरेटर हे खर्चिक आहे. त्यामुळे सोलर बॅकअप सक्तीचे करण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.**

४.२७ जिल्हाधिकाऱ्यांच्या अखत्यारित सेतू केंद्रे वाढवू शकतात त्या ठिकाणी बसणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या सुद्धा वाढू शकते. बऱ्याच ठिकाणी सह्या करणाऱ्या अधिकाऱ्यांची कमतरता असल्याने प्रतिज्ञापत्रांसाठी बराच वेळ लागतो, असेही निदर्शनास आले आहे की, त्या ठिकाणी बसणारे कर्मचारी जागेवर नसतात. तसेच तहसिलदार उपलब्ध नसतात. शासनाने कामाची कालमर्यादा दिलेली असून तेथील कर्मचाऱ्यांवर ती बंधनकारक आहे. अर्ज स्वीकारणे, टोकन देणे, अर्जाची पूर्तता करुन बॅक एंडला जो शासकीय कर्मचारी आहे त्यांच्यापर्यंत पोहोचविणे तसेच त्यांच्याकडून आल्यानंतर परत त्या काऊंटरला संबंधित व्यक्तीकडे देणे, टोकन परत घेणे, पैसे घेणे अशी कामे तातडीने करणे आवश्यक असतानाही तसे करण्यात येत नाही. **त्यामुळे ही सर्व कार्यपद्धती तातडीने करण्याची कार्यवाही करण्याबाबत आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

४.२८ तालुक्यांमध्ये, महापालिकांमध्ये तसेच बऱ्याचशा जिल्हापरिषदांमध्ये एजन्सी नेमलेल्या आहेत, परंतु त्यांचे काम समाधानकारक नाही. तसेच नवी मुंबई येथील एक एजन्सी पुण्यामध्ये काम करते. त्यांच्याकडून लोकांना पाहिजे तशी सेवा मिळत नाही. याबाबतीत काही प्रश्न असतील तर त्याची चौकशी करण्याचे विभागीय सचिवानी आश्वासित करुनही अद्याप केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस प्राप्त झाली नाही. याबाबत असे सूचीत करण्यात येते की, **तालुका, जिल्हापरिषदा व महानगरपालिकामध्ये केलेल्या व सुरु असलेल्या कामाचा आढावा घेण्यासाठी व कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये भरारी पथक नियुक्त करावे, अशी समितीची शिफारस आहे.**

**४.२९ सेतू केंद्रामध्ये करण्यात येणारी कामे व त्यासाठी आवश्यक असणारी कर्मचाऱ्यांची संख्या विचारात घेता जे सुशिक्षित बेरोजगार आहेत त्यांना सेतू केंद्रामध्ये काम देण्यात यावे. काम देताना स्थानिक सुशिक्षित बेरोजगारांचा प्राधान्याने विचार करण्यात यावा, अशीही समितीची शिफारस आहे.**

# शालेय शिक्षण विभाग

## ५. शिक्षण संस्थांना दिलेल्या सहायक अनुदानाची लेखा परीक्षा-

५.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील शालेय शिक्षण विभागाच्या **परिच्छेद क्र.३.५ "शिक्षण संस्थांना दिलेल्या सहायक अनुदानाची लेखा परीक्षा"** या संदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले.

**शालेय शिक्षण विभाग :**

**आर्थिक व्यवस्थापन :-**

५.२ संचालक, प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण हे जिल्हा परिषदांच्या शिक्षण अधिकाऱ्यांमार्फत तदर्थ अनुदाने शाळांना प्रदान करतात. संचालक, उच्च शिक्षण हे सहसंचालकांमार्फत महाविद्यालयांना अनुदाने प्रदान करतात. लेखापरीक्षेच्या कालावधीमध्ये सहायक अनुदानावरील खर्च खालील प्रमाणे होता.

(रुपये कोटीमध्ये)

| वर्ष | प्राथमिक शिक्षण | माध्यमिक शिक्षण | उच्च शिक्षण | एकूण | शिक्षणावरील राज्याचा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| २००१-०२ | ३१०.७२ | २४८३.१२ | ६८१.३९ | ३४७५.२३ | ८२८५.८१ |
| २००२-०३ | ३४५.५३ | २७८३.२० | ६९२.९१ | ३८२१.६४ | ७६६९.३५ |
| २००३-०४ | ३७८.७९ | २९८०.३८ | ७१४.५९ | ४०७३.७६ | ८२४८.२५ |
| २००४-०५ | ४२०.३० | ३२७९.५१ | ७७३.७६ | ४४७३.५७ | ८७९७.२४ |
| **एकूण** | **१४५५.३४** | **११५२६.२१** | **२८६२.६५** | **१५८४४.२०** | **३३०००.६५** |

राज्याच्या शिक्षणावरील खर्चाच्या तुलनेत एकूण सहायक अनुदानाची टक्केवारी ही ४८ टक्के होती. यावरुन असे दिसून येते की, सहायक अनुदानावरील खर्चात नियमितपणे प्रत्येक वर्षात वाढ होती.

**५.३ ज्ञापन :**

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

खाजगी अनुदानीत शाळा, प्राथमिक व माध्यमिक शाळा यांना शिक्षणाधिकारी यांचेमार्फत दिले जाणारे अनुदान हे कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी व वेतनेतर बाबीसाठी दिले जाते. सहायक अनुदान हे प्रामुख्याने वेतनासाठी दिले जाते. शाळांच्या संख्येत वाढ तसेच कर्मचाऱ्यांच्या वेतन व इतर भत्त्यामध्ये वाढ होत असल्याने सहायक अनुदानावरील खर्चात वाढ होणे स्वाभाविक आहे.

परिच्छेदामध्ये सहायक अनुदानाचा खर्च हा एकूण शिक्षणावरील खर्चाच्या सरासरी ४८ टक्के असून त्यामध्ये वाढ होत असल्याचे नमूद आहे. वेतनात वाढ ही प्रामुख्याने कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीमुळे, महागाई भत्त्यात वाढ इ. कारणामुळे होते. सन २००१-२००२ पासूनच्या वेतन व वेतनेतर खर्चात झालेली वाढ दर्शविणारा तक्ता सोबत जोडला आहे. परिच्छेदातील आक्षेपांशी संबंधित शाळांची यादी, अतिरिक्त शिक्षकांबाबत जिल्हास्तरावर यादी उपलब्ध करुन घेणे तसेच पुरेसे कर्मचारी नसणे इ.कारणांमुळे विलंब झाला तो कृपया क्षमापित करण्यात यावा.

**सन २००१-०२ ते २००४-०५ मध्ये सहायक अनुदानाच्या खर्चात झालेली वाढ**

**रुपये कोटीत**

| वर्ष | २००१-०२ | | | २००२-०३ | | | २००३-०४ | | | २००४-०५ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्राथ | माध्य. | एकूण | प्राथ | माध्य. | एकूण | प्राथ | माध्य. | एकूण | प्राथ | माध्य. | एकूण | एकूण |
| वेतन अनुदान खर्च | २९२.५० | २४५७.७६ | २७५०.२६ | ३२८.२८ | २७५५.१६ | ३०८३.४४ | ३६१.१४ | २९२७.२३ | ३२८९.१७ | ४१९.९२ | ३०३६.९४ | ३४५६.८६ | ३४५६.८६ |
| वेतनेत्तर अनुदान खर्च | १८.२२ | २५.३६ | ४३.५८ | १७.२५ | २८.०४ | ४५.२९ | १६.८५ | ५३.१५ | ७०.०० | ०.३८ | २४२.५७ | २४२.९५ | २४२.९५ |
| एकूण | ३१०.७२ | २४८३.१२ | २७९३.८४ | ३४५.५३ | २७८३.२० | ३१२८.७३ | ३७८.७९ | २९८०.३८ | ३३५९.१७ | ४२०.३० | ३२७९.५१ | ३६९९.८१ | ३६९९.८१ |
| शिक्षणावरील एकूण खर्च | | | ८२८५.८१ | | | ७६६९.३५ | | | ८२४८.२५ | | | ८७९७.२४ | ८७९७.२४ |
| अनुदानाच्या खर्चाची टक्केवारी (शालेय शिक्षण) | | | ३३.७२ | | | ४०.८० | | | ४०.७३ | | | ४२.०६ | ४२.०६ |

## अखर्चित निधी जिल्हा परिषदांकडे पडून राहणे-

५.४ शासनाच्या ग्रामविकास विभागाने अधिसूचित केले (१९९१) की, जिल्हा परिषदांकडे अखर्चित राहिलेली अनुदाने ही निर्धारण पूर्ण होण्याची वाट न पहाता दरवर्षी ऑगस्ट अखेरपर्यंत शासनाच्या खात्यात जमा केली पाहिजेत असे दिसून आले की, १९९९-२००० पर्यंत ३१ जिल्हापरिषदांकडे प्राथमिक शाळांना दिलेल्या पण खर्च न केलेल्या सहाय्यित अनुदानाचे रु.७.०६ कोटी पडून होते. तथापि, संचालक, प्राथमिक शिक्षण यांनी जिल्हापरिषदांकडे पडून राहिलेली रक्कम समायोजित न करता नंतरच्या वर्षात अनुदानांचे प्रदान करणे सुरु ठेवले.

शासनाने वस्तुस्थितीची निश्चिती करुन परिस्थिती कळविण्याचे मान्य केले (ऑगस्ट २००६).

**ज्ञापन :**

**५.५** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

प्राथमिक शिक्षण संचालनालयामार्फत जिल्हा परिषदांच्या शिक्षण विभागाकडून मागणी केलेल्या तरतूदीचा विचार करुन तसेच मागील वर्षात केलेला प्रत्यक्ष खर्च आणि कार्यरत पदे विचारात घेऊन तरतूदी वितरीत करण्यात येतात. शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित व्हावे, त्यांच्यामध्ये असंतोष निर्माण होऊ नयेत म्हणून आवश्यक त्या प्रमाणात शिक्षणाधिकारी यांचे मागणी प्रमाणे तरतूदीचे वितरण करण्यात आले.

जिल्हा परिषदांकडील अखर्चित रकमा जिल्हा परिषदांनी सोबत जोडलेल्या विवरणपत्रात दर्शविलेल्या कालावधी पर्यंत शासनाकडे चलनाने जमा केलेल्या आहेत. असे जिल्हा परिषदांकडून प्राप्त माहितीनुसार नमूद करण्यात येते. सन १९९९-२००० पर्यंत ३१ जिल्हा परिषदांकडे प्राथमिक शाळांना दिलेल्या परंतु खर्च न केलेल्या सहायक अनुदानाची रक्कम रु.७.०६ कोटी वसूलपात्र होती.

संचालनालयाच्या स्तरावरुन अनुदान निर्धारण पथकाने संकलित केलेल्या माहितीनुसार शासनाकडे १९९९-२००० या वर्षापासून वर्ष २००९-१० पर्यंत शासनाकडे भरलेल्या अखर्चित रक्कमेचा तपशील सोबतच्या विवरणपत्रात दर्शविण्यात आला आहे. त्यानुसार रु.४३५,७६,१६,०९८ अखर्चित रक्कम म्हणून शासनाकडे जमा करण्यात आल्याचे निदर्शनास येते. तपशिलवार पूरक टिप्पणी सोबत सादर केली आहे. **(विवरणपत्र क्र.१२)**

**माध्यमिक शाळांना बिगर वेतन अनुदानाचे प्रदान -**

५.६ माध्यमिक शिक्षण विभागाच्या निर्णयानुसार (नोव्हेंबर १९९९), माध्यमिक शाळांना अनुज्ञेय असलेल्या एकूण बिगर वेतन अनुदानापैकी, शिक्षण संस्थानी ७० टक्के शैक्षणिक हेतूकरिता आणि उर्वरित (३० टक्के) प्रशासकीय हेतूकरिता खर्च केला पाहिजे. तीन जिल्ह्यात असे दिसून आले की, शिक्षण संस्थांनी शैक्षणिक हेतूकरिता केलेला खर्च फक्त २० टक्के होता तर अनुदानांच्या ८० टक्के खर्च प्रशासकीय हेतू करिता केला. परिणामी, शैक्षणिक हेतूकरिता असलेले रु.११.३४ लाखाचे अनुदान प्रशासकीय हेतूकरिता परावर्तित केले गेले.

उत्तरामध्ये शासनाने वस्तुस्थितीची निश्चिती करुन परिस्थिती कळविण्याचे मान्य केले (ऑगस्ट २००६).

**ज्ञापन :**

**५.७** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

सदर परिच्छेदाबाबत सादर करण्यात येते की, कोल्हापूर व जळगांव जिल्ह्यातील ज्या माध्यमिक शाळांची नावे महालेखापाल, नागपूर यांचेकडून प्राप्त झाली आहेत. सदर शाळांची शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, कोल्हापूर व जळगांव यांचे स्तरावरुन करण्यात आलेल्या लेखा परिक्षण तक्ते पहाता, सदर शाळांना सन १९९८ च्या वेतनावर देय ठरणारे वेतनेतर अनुदान अनुक्रमे ६ टक्के, ९ टक्के व १२ टक्के मंजूर करण्यात आलेले आहे. सदर शाळांना मान्य व देय होणारे वेतनेतर अनुदान मंजूर करण्यात आले आहे. सन २००३-२००४ च्या खर्चावर अनुदान निर्धारण सन २००४-२००५ मध्ये वेतनेतर अनुदान देण्यात येते. कोल्हापूर/जळगांव जिल्ह्यातील खालील शाळांना वर्षनिहाय वेतनेतर अनुदानाचे त्याच्या अनुक्रमे पुढील वर्षी अनुदान निर्धारण केलेल्या शाळांची माहिती सोबत सादर करण्यात येत आहे. संबंधीत शाळांनी शासन निर्णय दि.३०.११.१९९९ नुसार शैक्षणिक हेतूकरीता ७० टक्के खर्च केला असून प्रशासकीय बाबीवर ३० टक्के खर्च केला आहे असे शिक्षणाधिकाऱ्यांना संबंधित शाळांच्या अनुदान निर्धारण तक्त्यावरुन तपासणीअंती दिसून आले आहे. सबब, संबंधित परिच्छेद वगळण्याबाबत विनंती करण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.रायगड यांनी प्रयत्न करुनही महालेखापाल, नागपूर यांचे कार्यालयाकडून शाळांची यादी प्राप्त न झाल्याने तपासणी करता आली नव्हती. आता महालेखाकार यांनी दिलेल्या पत्रानुसार (२४-५-११) २५ शाळांचे वेतनेतर अनुदानाची पुन्हा तपासणी केली असता अनुज्ञेय वेतनेतर अनुदानापेक्षा जास्तीचे वेतनेतर अनुदान दिलेले नाही असे शिक्षणाधिकारी (माध्य.) रायगड यांनी कळविले आहे. सोबत यादी जोडली आहे. **(विवरणपत्र क्र.१३)**

सद्यःस्थितीत शासनाने अनुदानित शाळांना सन २००३-२००४ नंतर वेतनेतर अनुदान देणे थांबविले आहे. वेतनेतर अनुदानाबाबतचे सुधारीत निकष शासनाकडून कळविण्यात आलेले नाहीत. वेतनेतर अनुदान देण्याबाबत निर्णय झाल्यास उपरोक्त निकर्ष किंवा शासनाकडून निश्चित केले जातील अशा निकषांनुसार वेतनेतर अनुदान देताना कार्यवाही करण्यात येईल.

**अतिरिक्त शिक्षकांवरील अनुत्पादक खर्च-**

५.८ शासनाने, शासन अनुदानित प्राथमिक आणि माध्यमिक शाळांच्या अतिरिक्त शिक्षकांना इतर शाळांमधील विद्यमान रिक्त पदांवर नियुक्त करण्याचे आदेश दिले (ऑगस्ट २००४). जर अनुदानित शाळांमध्ये पुरेशी पदे रिक्त नसतील तर जिल्हा परिषद किंवा नगर परिषद शाळांमधील रिक्त पदांवर

अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करावयास पाहिजे होते. पुढे, असेही आदेश दिले गेले (ऑक्टोबर २००४) की, जर स्थानिक संस्थांनी अतिरिक्त शिक्षकांची रिक्त पदांवर नियुक्ती करण्याचे नाकारले तर त्या स्थानिक संस्थांतर्गत असलेल्या शाळा अनुदानास पात्र राहणार नाहीत.

संचालक, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, पुणे यांच्या अभिलेखांच्या छाननीत असे उघडकीस आले की, विभागाने २००४-२००५ मध्ये ७१६ शिक्षकांना (११० प्राथमिक व ६०६ माध्यमिक शाळांचे शिक्षक) अतिरिक्त घोषित केले आणि रिक्त पदांच्या अभावामुळे त्याची कुठेही सोय होऊ शकली नाही आणि त्यांची नोकरी चालू राहिली. याप्रमाणे २००४-२००५ मध्ये त्यांच्या वेतन व भत्त्याकरिता प्रदान केलेले रु.७.४५ कोटी अनुत्पादक ठरले.

पुढे असेही निदर्शनात आले की, शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांनी २००४-२००५ मध्ये अतिरिक्त ठरविलेल्या ११ शिक्षकांची सोय केल्याशिवाय २००४-२००५ मध्ये १२६ नवीन शिक्षकांची नियुक्त केली. परिणामी वेतन प्रदानावर दरवर्षी रु.११.४५ लाखाचा निष्फळ खर्च झाला.

उत्तरामध्ये शासनाने, वस्तुस्थितीची निश्चिती करुन परिस्थिती कळविण्याचे मान्य (ऑगस्ट २००६) केले.

**ज्ञापन :**

**५.९** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

परिच्छेदातील निरिक्षणाच्या अनुषंगाने अभिलेख्यांची छाननी करण्यात आली व सर्व अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियम, १९८१ मधील तरतुदींच्या अनुषंगाने करण्यात आले आहे.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, जळगाव कार्यक्षेत्रातील खाजगी माध्यमिक शाळेत सन २००४-२००५ ला एकूण ११ माध्यमिक शाळांत विद्यार्थी संख्या निकषाअभावी तुकड्या कमी झाल्यामुळे शिक्षक अतिरिक्त झाले. सदरहू अतिरिक्त शिक्षक हे महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियम, १९८१ मधील नियम क्र.२६ च्या अधीन राहून अतिरिक्त घोषित केले आहे. सदर नियमाच्या अनुषंगाने त्यांना इतर माध्यमिक शाळेत रिक्त पदावर समावेशनाचे आदेश निर्गमित झाल्यापासून त्यांचे समावेशन होईपर्यंत त्यांचे वेतन त्याच शाळेत नियमावलीतील तरतूदीनुसार देय ठरते. समावेशित आदेश दिलेल्या शाळांवर सदर कार्यकाळात रिक्त कर्मचाऱ्याचे वेतन देय झालेले नाही. सर्व अतिरिक्त शिक्षक कर्मचाऱ्यांचे दिनांक २.११.०४ ते ८.८.२००६ पर्यंत समावेशन करण्यात आलेले आहे. (यादी सोबत जोडली आहे.) **(विवरणपत्र क्र.१४)**

शाळांतून रिक्त पदे उपलब्ध होतील त्यानुसार शिक्षणाधिकारी, जळगाव यांनी अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन जिल्ह्यांतर्गत केले आहे. यासाठी दिनांक २.११.२००४ ते ८.८.२००६ एवढा कालावधी लागला. हे समायोजन रिक्त जागेवरच करता येत असल्याने व रिक्त पदे उपलब्ध होतील त्यानुसार समायोजन केले त्यामुळे अधिक वेळ लागला. समायोजनाबाबत शिक्षणाधिकारी यांचेकडून संचालनालयाचे पत्र क्र.अमाशा/२०११-१२/निअप ३.५/१५४ दि.३०.७.२०११ अन्वये खुलासा मागविण्यात आला आहे.

शासन निर्णय क्र.एसएस१००३/(७०७/०३) प्राशि३ दि.१३.८.२००४ अन्वये खाजगी प्राथमिक शाळातील अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे जिप/नप च्या शाळांतून समायोजन करण्याबाबत निर्देश होते. खाजगी माध्यमिक शाळांबाबत असे निर्देश नाहीत.

**अनुदानीत शाळांचे निकृष्ट निकाल :-**

५.१० माध्यमिक शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी, अकार्यक्षम शिक्षकांचे विरुद्ध कारवाई करणे, शाळांची मान्यता काढून घेणे आणि ज्या सहाय्यित शाळांमध्ये माध्यमिक शालेय प्रमाणपत्र (SSC) परीक्षांचे निकाल लागोपाठच्या तीन वर्षात ३० टक्क्याहून कमी होते, अशा शाळाचे बिगर वेतन अनुदान कमी करण्याबाबतचे आदेश शासनाने निर्गमित केले (नोव्हेंबर २००३)

असे दिसून आले की, राज्यातील १३,४५१ माध्यमिक शाळापैकी १७८ शाळांमध्ये लागोपाठच्या तीन विद्यावर्षामध्ये (२००३, २००४ व २००५) परीक्षांचे निकाल शून्य ते ३० टक्क्याच्या दरम्यान होते. तथापि, संचालक, माध्यमिक शिक्षण यांनी आदेशात दर्शविल्याप्रमाणे त्या शाळांविरुद्ध कार्यवाही सुरु केली नव्हती. शासनाने वस्तुस्थितीची निश्चिती करुन प्रस्तावित कारवाई करण्याचे मान्य केले (ऑगस्ट २००६)

**ज्ञापन :**

**५.११** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

या संदर्भातील शासन निर्णय क्र.नमाशा १००१/(३०३/२००१)/माशि-१, दिनांक २५ मे, २००१ अन्वये शालांत प्रमाणपत्र परिक्षांचा निकाल कमी लागणाऱ्या शाळांविरुद्ध कारवाई करण्याचे निदेश दिलेले आहेत. परंतु शासन निर्णय क्र.नमाशा १००१/(३०३/२००१) माशि-१ दि.२६.२.२००२ अन्वये वरील शासन निर्णयास स्थगिती देण्यात आलेली आहे. त्यामुळे वेतन अनुदान कमी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. ही वस्तुस्थिती आहे.

सन २००३, २००४, २००५ मधील शालांत परिक्षा निकालाबाबत असून कमी निकाल असलेल्या शाळाविरुद्ध कार्यवाही अपेक्षित होती असे परिच्छेदावरुन दिसते. परंतु शासन निर्णय दि.२५.५.२००१ अंमलात होता व तो २६.२.२००२ च्या आदेशाने स्थगित करण्यात आला.

सन २००३-२००४ नंतर खाजगी माध्यमिक शाळांना वेतनेत्तर अनुदान देणे शासनाने बंद केले आहे. त्यामुळे अशा शाळाविरुद्ध कार्यवाही करणे शक्य झाले नाही. ही स्थिती कृपया मान्य करण्यात यावी.

**कसूर असतानाही शाळांची मान्यता चालू ठेवणे -**

**५.१२** माध्यमिक शाळा संहितेतील तरतुदीनुसार संचालक मंडळाने शाळांच्या मूलभूत आवश्यकता पूर्ण केल्या नाहीत तर त्या शाळांची मान्यता रद्द केली जाईल. शिक्षण उपसंचालक, नागपूर यांनी संचालक, माध्यमिक शिक्षण, पुणे यांना देवडिया उच्च माध्यमिक शाळा, नागपूर ची मान्यता काढून घेण्याची शिफारस केली (एप्रिल २००३, मार्च २००४, मे २००६) कारण त्या शाळेत शिक्षकांच्या नेमणूका नियमानुसार केल्या नाहीत आणि गेल्या चार वर्षामध्ये SSC परीक्षांचा निकाल २० टक्क्यांपेक्षा कमी होता. तसेच, शाळा अनधिकृतरित्या बांधलेल्या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर चालविली जात होती. १९९८ पासून रोकड वही योग्य रीतीने ठेवली गेली नव्हती. १९८७-१९८८ पासून लेख्यांची लेखापरीक्षा झाली नव्हती आणि कल्लनमियाँ उच्च माध्यमिक शाळा, कामठी या शाळेने मंजूर शिक्षकांच्या पदांपेक्षा जास्त पदांकरिता वेतन अनुदानाची मागणी केली आणि विद्यार्थ्यासाठी पर्याप्त जागा नव्हती. तथापि, संचालक, माध्यमिक शिक्षण, पुणे यांनी या शाळांची मान्यता चालूच ठेवली. सन २००२-२००३ ते २००४-२००५ या कालावधीत संचालकांनी या शाळांना अनुक्रमे रु.६६.२७ लाख आणि रु.८८.८९ लाखाचे अनुदानही प्रदान केले.

शासनाने वस्तुस्थितीची निश्चिती करण्याचे आणि प्रस्तावित कारवाई कळविण्याचे मान्य केले (ऑगस्ट २००६).

**ज्ञापन :**

**५.१३** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

शासन निर्णय क्र.नमाशा १००१/(३०३/२००१)/माशि-१, दिनांक २५ मे, २००१ अन्वये शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल सलग ३ वर्षे कमी लागल्याने संबंधित शाळेचे वेतन अनुदान कपातीचे व मान्यता काढण्याचे निर्देश दिलेले आहेत. परंतु या शासन निर्णयास शासन निर्णय दिनांक २६ फेब्रुवारी, २००२ अन्वये स्थगिती दिल्याने अशी कारवाई करणे प्रचलित नियमाच्या विरुद्ध असल्याने कारवाई

करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. माध्यमिक शाळा संहितेतील तरतुदीनुसार संचालक मंडळाने शाळांच्या मूलभूत आवश्यकता पूर्ण केल्या नाहीत तर त्या शाळांची मान्यता रद्द केली जाईल, अशी तरतूद आहे. त्यानुसार विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर यांनी त्यांचे दिनांक ३० जून, २००५ च्या पत्रान्वये शाळेची मान्यता काढण्याची नोटीस संबंधित संस्थेला देण्यात आली होती. यावर संस्थेने संचालकांकडे त्यांची बाजू मांडण्यासाठी दिनांक ११.७.२००५ च्या पत्रान्वये विनंती केली होती. त्यानुसार संचालनालय स्तरावर संबंधित शाळेची सुनावणी घेऊन त्रुटी पूर्ततेच्या अटीवर पुढील वर्षासाठी (२००५-२००६) मान्यता प्रदान केली. मार्च २००६ मध्ये त्रुटींची पूर्तता न केल्याने २००५-२००६ अखेरपर्यंत मान्यता काढण्यात आली. या आदेशाविरोधात पुन्हा संस्थेने मा.उच्च न्यायालय, नागपूर येथे दाखल केलेल्या अपीलावर न्यायालयाने संस्थेस संबंधित विभागाकडे प्रथम अपील करण्याचे निर्देश दिलेले होते. संस्थेकडून अपील प्राप्त झाल्यानंतर यानुसार यासंदर्भात दिनांक १६.१०.२००६ रोजी १२.३० वाजता संचालनालयामध्ये सुनावणी घेण्यात येऊन दिनांक ३०.४.२००७ पर्यंत शाळेची मान्यता सुरु ठेवण्याबाबत सशर्त अंतरिम निर्णय घेण्यात आला. यावरुन सदर शाळेला त्रुटी पूर्ततेसाठी दरवर्षी १/१ वर्षासाठी मान्यता प्रदान केल्यामुळे संबंधित शाळेला अनुदान देणे क्रमप्राप्त होते, त्यामुळे अनुदान देणे क्रमप्राप्त झाले.

कल्लनमिया उच्च माध्यमिक शाळा, कामठी, जिल्हा नागपूर या शाळेच्या व्यवस्थापनाविरुद्ध पोलिस स्टेशन कामठी येथे तक्रार नोंदविली आहे. तसेच उच्च न्यायालय, नागपूर येथे रिट याचिका क्रमांक ३६०३/२००७ व ३०/११/२००८ अन्वये प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. याच अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

नागपूर शहरातील विद्यावती देवडीया हायस्कूल, गांधीबाग, नागपूर ही शाळा शालांत परीक्षेचा निकृष्ट दर्जाचा निकाल, संस्थेअंतर्गत वाद, कर्मचाऱ्यांची नियुक्ती नियमानुसार नसणे, शाळा समितीचे गठन न करणे, शाळेला स्वत:ची इमारत नसणे, शाळेला ग्रंथालय व स्वतंत्र प्रयोगशाळा नसणे, रोकडवही व इतर अभिलेख अद्ययावत/उपलब्ध करुन न देणे या कारणांकरीता २००५-२००६ च्या सुरुवातीपासून शाळेची मान्यता शिक्षण उपसंचालक, नागपूर यांनी काढून घेतली.

संस्थेने या विरुद्ध शिक्षण संचालक, पुणे यांचेकडे अपिल केले. माध्यमिक शाळा संहितामधील तरतुदीनुसार कळविलेले दोष काढून टाकण्यास व्यवस्थापन तयार असल्यास असे दोष दूर करण्यासाठी संधी देण्याच्या दृष्टीने संस्थेने केलेल्या अपिलावर शिक्षण संचालक, पुणे यांनी उपरोक्त शाळेस त्रुटींची पूर्तता करण्याच्या अटीवर सन २००५-२००६ या वर्षापासून शाळेची मान्यता १-१ वर्षासाठी सुरु ठेवण्यास परवानगी दिली. सध्या शाळेमध्ये शाळा समिती गठीत करण्यात आली आहे, तपासणी अभिलेखे उपलब्ध

करुन देण्यात आले, कर्मचारी नेमणुका केलेल्या आहेत, ग्रंथालय व प्रयोगशाळा स्वतंत्र खोलीमध्ये आहे, रोकडवहीतील नोंदी पूर्ण करणे, शाळेचे लेखापरीक्षण पूर्ण करणे, संस्था विश्वस्तांच्या नावातील बदल अर्जास धर्मादाय आयुक्तांनी दिनांक ७/२/२००९ ला मान्यता दिलेली आहे. शाळेचा सन २००७-२००८ चा शालांत परीक्षेचा निकाल ३३.३३ टक्के, सन २००८-२००९ चा २८.९४ टक्के, सन २००९-२०१० चा ५८.८२ टक्के व सन २०१०-२०११ चा निकाल ४१ टक्के आहे. सध्या शाळेला स्वत:ची इमारत नाही, शाळा महानगरपालिकेच्या इमारतीत भाडेतत्त्वावर सुरु आहे त्यामुळे शिक्षण संचालकांनी सन २०११-२०१२ या शैक्षणिक सत्राअखेरपर्यंत शाळेची मान्यता सुरु ठेवण्यास परवानगी देण्यात आली.

कल्लनमिया उच्च माध्यमिक शाळा, कामठी, जि.नागपूर या माध्यमिक शाळेने विनाअनुदानित तुकड्यावरील ३ शिक्षकांचे वेतन मंजूर करुन घेतल्याचे दिसून येते. सदर बाब शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी दिनांक २०/६/२००६ अन्वये पोलीस निरीक्षक कामठी, जि.नागपूर येथे तक्रार नोंदविली. सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका क्र.३६०३/२००७ व ३०११/२००८ अन्वये प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

मा.उच्च न्यायालय, नागपूर येथील रिट पिटीशन क्र.३६५१/२०१०, म.रा.शिक्षक परिषद व इतर विरुद्ध मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मा.सचिव शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे, शिक्षण संचालक (प्राथमिक) म.रा.पुणे व इतर या याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे दिनांक २३/३/२०११ रोजी निर्णय देऊन याचिका खारीज केली आहे.

……..Considering the statements made in para. (4) of the affidevit dated 24/2/11 filed by the Deputy Director of Education and in view of the facts placed before this court by the learned government pleader, it appears that congnizance of the complaint of the petitioners has already been taken by the State Government, preliminary enquiry was also conducted by Director of Education and decision on the basis thereof to proceed departmently against Respondant No.7 has already been taken by the State Government.....

या याचिकेमध्ये Respondant No.7 हे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.नागपूर हे आहेत.

**गुणवत्ता शिष्यवृत्तीपासून विद्यार्थी वंचित राहिले -**

**५.१४** शासनाद्वारे माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळेच्या गुणवान विद्यार्थ्यांकरिता खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना चालविली जाते. ही शिष्यवृत्ती, महाराष्ट्र राज्य परीक्षा विभाग, पुणे यांचे द्वारे दर वर्षी घेतल्या जाणाऱ्या स्पर्धात्मक परीक्षेच्या निकालावर आधारित असून तीन वर्षांसाठी दिली जाते.

ही शिष्यवृत्ती माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांकरिता रु.२५ आणि उच्च माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांकरिता रु.४० प्रतिमाह या दराने प्रत्येक वर्षाच्या १० महिन्यांसाठी प्रदान केली जाते. जळगांव जिल्ह्यात २१५ माध्यमिक आणि ४८२ उच्च माध्यमिक शाळेचे विद्यार्थी निधी उपलब्ध असतानांही रु.२.३९ लाख रकमेच्या शिष्यवृत्तापासून वंचित राहिले.

शासनाने परिस्थितीची निश्चिती करण्याचे आणि प्रस्तावित कारवाई कळविण्याचे मान्य केले (ऑगस्ट २००६).

**ज्ञापन :**

**५.१५** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक यांनी दिलेला रुपये २,८२,६००/- व रुपये ३७,५०० चा धनादेश शिक्षणाधिकारी, माध्यमिक, जि.प.जळगाव यांना दिनांक २१/७/२००६ रोजी प्राप्त झाला. त्यावेळी संबंधित काम करणारे श्री.अनिल बिऱ्हाडे, कनिष्ठ लिपिक हे दिनांक ३१/७/२००६ रोजी स्वेच्छानिवृत्ती घेऊन सेवानिवृत्त झाले. त्यांच्या पदाचा कार्यभार श्री.डी.ओ.सोनावणे यांनी दिनांक १/८/२००६ रोजी स्वीकारला. प्राप्त झालेला धनादेश संबंधित शाळांना वितरण करण्यासाठी मागणीपत्र तयार करताना सदर याद्यांचे अवलोकन केले असता, सदर याद्या सदोष असल्याचे दिसून आले. संबंधित सेवानिवृत्त लिपिक, श्री.बिऱ्हाडे यांना उपस्थित राहण्याबाबत व याद्या तपासणीबाबत कळवूनही त्यांनी सहकार्य न केल्याने कालापव्यय होऊन धनादेश कालबाह्य झाला. यासंदर्भात शिक्षणाधिकारी, जळगाव यांनी विभागीय शिक्षण उपसंचालकांकडून पुनःश्च धनादेश नुतनीकरण करुन दिनांक २८/६/२००७ रोजी प्राप्त करुन घेतला.

झालेल्या दिरंगाईबाबत श्री.बिऱ्हाडे व श्री.सोनावणे यांची विभागीय चौकशी सुरु करण्याचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.जळगाव यांना दिनांक १५/७/२००८ अन्वये सादर करण्यात आला. तसेच दिनांक ८/९/२००८ अन्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

सन २००५-२००६ या आर्थिक वर्षाच्या जळगाव जिल्ह्यातील पूर्व माध्यमिक/माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या रकमा जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील गट शिक्षणाधिकारी यांना दिनांक १७/३/२००८ च्या सहविचार सभेमध्ये आवश्यक सूचना देऊन संबंधित पात्र विद्यार्थ्यांना देण्याकरीता संबंधित शाळा प्रमुखांना डीमांड ड्राफ्टने वितरीत करण्यात आलेल्या आहेत.

विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहीले नाहीत. विद्यार्थ्यांना विलंबाने शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात आला. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.जळगाव यांनी त्यांचे आदेश क्र.शिक्षण/आस्था-

२/आरआर/७९५/११ दिनांक २०/६/२०११ अन्वये संबंधित लिपिक श्री.देविदास ओंकार सोनावणे यांना याबाबत कसूरदार ठरवून महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील नियम ४ (दोन) नुसार त्यांची पुढील दोन वेतनवाढ भावी काळातील वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होणार नाही अशा रितीने दोन वर्षासाठी बंद करण्यात येत असल्याची शिक्षा दिली आहे.

**संनियंत्रण व मूल्यमापन -**

**५.१६** शासनाने मासिक खर्च विवरणपत्राव्यतिरिक्त अन्य विवरण वा व्यवस्थापन माहिती पद्धती (MIS) विहित केलेले नाही. तथापि, विभाग, प्रत्येक वर्षी संपादणूकीच्या महत्त्वाच्या दर्शकावरील शाळा सोडून जाण्याचे प्रमाण, शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर, शाळा-विद्यार्थी गुणोत्तर, अतिरीक्त कर्मचारी वर्गाचा तपशील इ.माहिती प्रकाशित करीत होता. कर्मचारी वर्गाला आणि वर्गांना मान्यता/मंजुरी यांचे संनियंत्रण प्रत्येक वर्षी शाळांची आणि विद्यार्थ्यांच्या संख्येची एक ऑगस्टला तपासणी करुन केले जाते. महाविद्यालयांना तदर्थ अनुदानाचे प्रदान, जास्त लेखापरीक्षीत विवरणपत्रे नसतांना अनुदानाचे प्रदान आणि तदर्थ अनुदानाच्या निर्धारणाचे थकित काम यावरुन निकृष्ट आर्थिक संनियंत्रण निदर्शनास येते. आणखी, लेखापरीक्षा कालावधीत विभागाने शाळा आणि महाविद्यालये यांच्या संपादणुकीचे काही मूल्यमापन केले नव्हते.

शासनाने मान्य केले (ऑगस्ट २००६) की, कुठलीही संनियंत्रण पद्धती अस्तित्वात नव्हती. तथापि, नमूद केले की On Line संनियंत्रण पद्धती विकसित केली जाईल.

**ज्ञापन :**

**५.१७** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांच्या संनियंत्रण व मूल्यमापनासाठी ऑनलाईन संनियंत्रण पद्धती विकसित केल्या जात आहे. त्यापैकी वेतन अनुदानाचे वितरण व संनियंत्रणासाठी ऑनलाईन कामकाजाबाबत शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१०/(१२६५/१०)/माशि-१, दिनांक १७/२/२०११ अन्वये आदेशीत केले आहे.

१ ऑगस्टच्या विद्यार्थी संख्येची तपासणी केल्यानंतर सेवक संच निश्चिती ऑनलाईन करण्याबाबत शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१०/(१२६५/१०)/माशि-१, दिनांक १७/२/२०११ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

**साक्ष :**

५.१८ उपरोक्त परिच्छेदांच्या संदर्भात दिनांक ४ ऑक्टोबर, २०११ रोजी प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांची साक्ष घेण्यात आली. शाळावरील सहायक अनुदान खर्च या आक्षेपाशी परिच्छेदातील संबंधित माहिती देण्यास ५ वर्षाचा विलंब झाला आहे व विलंबनाची दिलेली कारणे

संयुक्तिक नाहीत. समितीच्या कामकाजाच्या संदर्भात विभाग गांभिर्याने लक्ष देत नाही. ५ वर्षाचा विलंब करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर विभागाने कोणती कारवाई केलेली आहे ? फक्त कारणे दाखवा नोटीस देऊन काही उपयोग होणार नाही अशी नाराजी समितीने व्यक्त केली असता कारवाई करण्यास विलंब झाला ही वस्तुस्थिती मान्य करुन संबंधितावर कारवाई करण्यासाठी समितीने १५ दिवसाचा कालावधी दिला तर संबंधितावर १५ दिवसात चार्जशिट (दोषारोपपत्र) दाखल करण्यात येईल. असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले. त्यानुषंगाने शिक्षण संचालकांनी त्यांचे अधिनस्त संबंधित अधिकाऱ्यांकडून खुलासे मागविले असून खुलासे प्राप्त झाल्यावर संचालनालयाकडून पुढील आवश्यक कारवाई करण्यात येईल असे आश्वासन समितीन सचिवांना दिले.

योजनांतर्गत योजनांना शासनाकडून प्रशासकीय मंजुरी कालमर्यादेत न मिळण्यामागची कारणे काय आहेत ? ३१ जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांना दिलेल्या सहाय्यित अनुदानापैकी रु.७.०६ कोटीची शिल्लक रक्कम त्यांनी वेळीच समायोजित का केली नाहीत याबाबत समितीने अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, निधी अखर्चित राहिला तर तो शासनास परत केला पाहिजे. निर्धारण झाल्यानंतर पैसे वितरीत केले पाहिजेत. जिल्हा परिषदेच्या निर्धारणाचे काम वेळेवर झालेले नाही. हा निधी दुसरीकडे खर्च केला गेला नाही. असे समितीला सांगण्यात आले त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, शिक्षणासारखा महत्त्वाचा विषय असतांना सुद्धा निधी खर्च झालेला नाही. तरीसुद्धा विभागाने संबंधितांवर कोणतीही कारवाई केली नाही. हा निधी दुसऱ्या कामासाठी वापरला गेला असता तर अधिक चांगले झाले असते. अनुदान निर्धारणासंदर्भात सर्व विभागीय शिक्षण उपसंचालकांना अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले असून अहवाल प्राप्त करण्यासाठी संचालनालयातील १ अधिक्षक व वरिष्ठ लिपिक यांचा विभागीय स्तरावर दौरा निश्चित करुन अनुदान निर्धारणाचे काम पूर्ण करण्यात येत असल्याचे शिक्षण संचालनालयाकडून कळविण्यात आले आहे. अहवाल प्राप्त होताच समितीस सादर करण्यात येईल, असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले.

जळगाव व कोल्हापूर या दोन जिल्ह्यातील शिक्षणाधिकाऱ्यांकडे संबंधित शाळांचा अनुदान निर्धारण तक्ता व महालेखाकार यांच्याकडे असलेल्या अनुदान निर्धारण शाळांचा तक्ता यामध्ये तफावत असल्याचे समितीला दिसून आल्यामुळे विभागाला खुलासा करण्याबाबत सांगितले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, संबंधित शाळांनी शासन निर्णय दिनांक ३०.११.१९९९ नुसार शैक्षणिक हेतूकरिता ७० टक्के खर्च केला असून प्रशासकीय बाबीवर ३० टक्के खर्च केला आहे. परंतु १२ वर्षापासून शासनाने अनुदान देणे बंद केले आहे. यावर समितीने "अनुदान सुरु करण्याच्या संदर्भात शासन विचार करीत आहे काय ?" अशी विचारणा केली असता अनुदान सुरु करण्याचा शासनाचा तूर्त

विचार नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले. राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांची अवस्था फार खराब आहे. शाळेत स्वच्छतागृहाची अवस्था भयानक असल्यामुळे मुले त्या शौचालयाचा उपयोग करु शकत नाहीत. शैक्षणिक अनुदान बंद झाल्यामुळे चांगली शाळा कशी चालवावयाची हा प्रश्न देखील पडलेला आहे, असे समितीने मत व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी माहिती दिली की, दोन वर्षापूर्वी यासंदर्भात मंत्रीमंडळाची एक उपसमिती तयार करण्यात आली होती. या उपसमितीमध्ये मा.वित्त मंत्री व मा.नियोजन मंत्री, मा.शिक्षण मंत्री तसेच मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री सदस्य होते. त्यांनी मंत्रीमंडळापुढे ५ टक्के अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव ठेवला होता. त्यामध्ये ३ टक्के रक्कम ही सर्वसाधारण खर्चासाठी आणि २ टक्के रक्कम इमारतीच्या दुरुस्तीसाठी देण्यात यावी असा प्रस्ताव दिला होता. परंतु मंत्रीमंडळापुढे विषय मांडताना च्कायम विनाअनुदानित मधील शब्द काढण्याचा प्रस्ताव आणि हा प्रस्ताव एकत्रित ठेवला गेल्याने सदरहू ५ टक्के अनुदान देण्याचा प्रस्ताव मागे राहिला.

विभागामार्फत आरटीई अंतर्गत खाजगी विनाअनुदानित शाळांना २५ टक्के अनुदान दिले जाते याबाबत समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी माहिती दिली की, या शाळांना सदरहू रक्कमेची प्रतिपूर्ती केली जाते. या विषयाच्या बाबतीत केंद्र शासनाने नियम अधिसूचित केलेले आहेत. परंतु सदरहू नियमांच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयात आक्षेप घेण्यात आलेला आहे. आरटीई बाबतीतील नियम तयार केलेले आहेत. परंतु केंद्र शासनाच्या नमुना मार्गदर्शक सुचना नुसार (Model guidelines opervation) याबाबतीत पुढील कार्यवाही करणे आवश्यक असल्यामुळे जोपर्यंत केंद्रशासनाकडून मार्गदर्शन केले जात नाही तोपर्यंत त्याला वेळ लागण्याची शक्यता आहे. तसेच वेतनोत्तर अनुदान संदर्भात २३००० कोटी खर्च करणे आवश्यक आहे. विभागामार्फत दरवर्षी दरडोई योजना आणि योजनेत्तर मधून १० ते १२ हजार रुपये खर्च केले जातात.

खाजगी शाळेत एखाद्या गरीब विद्यार्थ्याला प्रवेश घ्यावयाचा असेल तर त्याच्या पालकांना प्रथम शुल्क भरण्यास सांगितले जाते. वास्तविक त्या विद्यार्थ्यांला त्या संस्थेने प्रथम प्रवेश दिला पाहिजे. उलट त्या पालकांना असे सांगितले जाते की, शाळा शासनाकडे मागणी (Claim) दाखल करील. परंतु, त्या विद्यार्थ्याने प्रवेशासाठी भरलेले शुल्क त्याला परत मिळत नाही. त्याला मिळालेले शुल्क केवळ कागदोपत्री राहते. अनेक विद्यार्थ्यांचे पालक भरलेले शुल्क परत मिळण्यासाठी शाळेमध्ये अनेकदा चकरा मारतात. परंतु त्यांच्या हातामध्ये भरलेले शुल्क पडत नाही. याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, ही अडचण विभागाला दिसून आली आहे. त्या विद्यार्थ्यांना संबंधित संस्थेने प्रवेश दिला पाहिजे. त्यानंतर त्या संस्थेला फी ची प्रतिपूर्ती (Reimburse) करुन मिळू

शकले. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, जळगांव यांच्या कार्यक्षेत्रातील खाजगी माध्यमिक शाळांमधील सन २००४-२००५ मध्ये अतिरिक्त ठरविलेल्या ११ शिक्षकांची सोय केल्याशिवाय १२६ नवीन शिक्षकांची नियुक्ती करण्याची कारणे काय आहेत ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, दरवर्षी संच मान्यतेनुसार शिक्षकांची संख्या निश्चित केली जाते. काही ठिकाणी अतिरिक्त शिक्षक ठरले तर त्यांना त्याच जिल्ह्यात समायोजित केले जाते. त्या वर्षी समायोजन करण्याच्या प्रक्रियेला उशीर झाला होता. ज्यांनी उशीर केला त्यांच्याविरुद्ध विभागाने कारवाई करावी. ११ शिक्षकांची सोय होण्यापूर्वीच १२६ नवीन शिक्षकांची भरती करण्यात आली. परंतु त्या ११ शिक्षकांचा पगार चालूच राहिला. त्यामुळे ११ लाख रुपयांचा अतिरिक्त खर्च झाला आहे. ज्यांनी ही चूक केली आहे त्यांच्या विरुद्ध कारवाई का करण्यात आली नाही. हा मुद्दा समितीसमोर आल्यानंतर त्याची चर्चा बैठकीत होईपर्यंत विभागाने स्वत:हून कारवाई करणे आवश्यक होते. असे मत व्यक्त करुन समितीने नाराजी व्यक्त केली असता या मुद्याबाबत संबंधिताविरुद्ध जबाबदारी निश्चित करण्याचे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले. तसेच या शिक्षकांचे जिल्ह्याबाहेर समायोजन केले तरी अडचणी निर्माण होतात. त्यामुळे अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे त्याच जिल्ह्यात समायोजन करावे लागते. परंतु त्या जिल्ह्यात समायोजन होत नसेल तर शाळा बंद करण्यासारखी कार्यवाही करावी लागते. यासंदर्भात समितीने विचारणा केली की, ११ शिक्षकांना समायोजित करण्यापूर्वीच १२६ शिक्षकांच्या नियुक्ता करण्यात आल्यामुळे वेतन प्रदानावर दरवर्षी ११.४५ लाख रुपयांचा खर्च वाया गेला आहे. याबाबत संबंधित संस्थाविरुद्ध कोणती कार्यवाही विभागाने केली आहे. यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, याप्रकरणी एक म्हणजे विभागीय कारवाई केली पाहिजे. अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांमुळे जादा पेमेंट झाले आहे त्याची संस्थेकडून वसुली केली पाहिजे. विभागाने अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई न केल्यामुळे खालच्या स्तरावर विभागाबाबत चांगला संदेश जात नाही. त्यामुळे विभागप्रमुख म्हणून आपण दक्ष राहिले पाहिजे अशी नाराजी व्यक्त करुन समितीने अशी विचारणा केली की, आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत शासनाने काही निर्णय घेतलेला आहे काय ? त्यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, कोणाला आर्थिकदृष्ट्या मागासलेले म्हणावयाचे ते शासनाला जाहीर (Notify) करावे लागेल आणि ते ठरविण्याचा शासनाला अधिकार आहे. पण आर्थिकदृष्ट्या मागास या प्रवर्गामध्ये अल्पसंख्याकांना समाविष्ट करण्याबाबतची चर्चा सुरु आहे.

सदर मुद्दयाबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन तातडीने कारवाई करण्याबाबत सचिवांनी आश्वासित करुनही केलेल्या कारवाईबाबतची माहिती समितीस प्राप्त झाली नाही.

अनुदानित शाळांचे ० ते ३० टक्के निकाल लागलेले आहेत. या संदर्भात शासनाने २००१ मध्ये शासन निर्णय निर्गमित केला होता. त्याची अंमलबजावणी झाली आहे काय किंवा त्यानंतर केव्हा अंमलबजावणी झाली आहे ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, ज्या शाळांचा निकाल कमी लागला आहे अशा शाळांविरुद्ध कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले होते. परंतु या निर्णयाला वेगवेगळे अपील करण्यात आले. त्यामुळे या शाळांना सुधारणा करण्याची संधी देण्यात आलेली आहे. आता त्या शाळांच्या निकालामध्ये सुधारणा झालेली आहे. शाळेत विद्यार्थी शिकत असताना शाळा बंद करण्यासारखी कारवाई करता येत नाही. ज्या शाळांचे निकाल चांगले लागत नाहीत त्या शाळेतील संबंधित शिक्षकांची वेतनवाढ रोखण्याची कारवाई करण्यात यावी, अशी सूचना समितीने केली असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, शासनाने वेतनेतर अनुदान बंद करण्याचा निर्णय घेतला असून त्याप्रमाणे शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. परंतु तरीही निकालात सुधारणा होत नसेल तर शाळेची मान्यता रद्द करण्यासारखी कारवाई करावी लागेल. शिक्षक डी.एड. व बी.एड. उत्तीर्ण झालेले असतात. त्यामुळे शाळांमध्ये शैक्षणिक प्रगती दिसून आली पाहिजे शासनाने शिक्षकांची गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाने शिक्षकांना प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात सुरु केलेला असून यशदामध्ये मागील एक वर्षापासून शिक्षकांना प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येत आहे. तसेच ज्या शाळांचा ३ वर्षामध्ये ० ते ३० टक्के निकाल लागलेला आहे अशा राज्यात एकूण १७८ शाळा आहेत. यावर समितीने या १७८ शाळांची माहिती एनडीटीव्ही सारख्या चॅनेलकडे दिली पाहिजे. या १७८ शाळांमधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून शासन ह्या शाळा बंद करीत नाही. पण या शाळांचे निकाल चांगले लागले नाही तर त्यांची मान्यता रद्द करण्याची किंवा शिक्षकांची वेतनवाढ रोखण्याची भूमिका शासनाने घेतली तर हा प्रश्न सुटेल अन्यथा कधीच सुटणार नाही. दुसरे कारण असे की, काही ठिकाणी अनधिकृतपणे शाळा चालतात. त्या शाळांमधील मुलांना अधिकृत असलेल्या शाळेत परीक्षेसाठी बसविले जाते. त्यामुळे शाळेच्या निकालावर परिणाम होतो असे मत व्यक्त करुन राज्यात किती अनधिकृत शाळा आहेत ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी माहिती दिली की, अनधिकृत

शाळांची संख्या आता उपलब्ध नाही. परंतु सध्या राज्यात पटसंख्या व प्रत्यक्षात असलेल्या विद्यार्थ्यांच्या तपासणीची मोहिम सुरु आहे. त्यामुळे अनधिकृत शाळांची संख्या समोर येणार आहे.

शाळांचा निकाल कमी लागण्याला अनधिकृत शाळा सुद्धा जबाबदार आहेत. या १७८ शाळांमध्ये नगर जिल्ह्यातील किती शाळा आहेत ? असे समितीने विचारले असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, नगर जिल्ह्यातील ७ शाळा आहेत. ज्या शाळांचा निकाल कमी लागतो त्या शाळांचे वेतनेतर अनुदान बंद करावे किंवा मान्यता काढण्याची कारवाई करावी लागेल. मान्यता काढून घेतली तर अडचण होते आणि वेतनेतर अनुदान देण्याचे शासनाने यापूर्वीच बंद केलेले आहे. पण निकाल कमी लागणाऱ्या शाळांमधील शिक्षकांवर कारवाई करण्याबाबतचा शासन निर्णय शासनाला निर्गमित करता येईल.

शाळांमधील मुले उत्तीर्ण वा अनुत्तीर्ण होवोत, शिक्षकांचा पगार चालू असतो. जोपर्यंत त्यांना आर्थिक झळ बसणार नाही तोपर्यंत यामध्ये काही सुधारणा होणार नाही. शिक्षकांवर कारवाई करीत असताना सुद्धा सकारात्मक दृष्टीकोनातूनच ती झाली पाहिजे, असे मत समितीने व्यक्त केले.

देवाडीया उच्च माध्यमिक शाळा, नागपूर या शाळेच्या संदर्भातील माहिती देण्याबाबत समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी माहिती दिली की, ज्यावेळी शासनाकडून शाळेला मान्यता दिली जाते त्यावेळी त्यांनी शाळेत मूलभूत सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत असे अपेक्षित असते. त्यांनी त्या सुविधा पुरविल्या नाही तर त्यांची मान्यता काढण्याची कारवाई करावी लागते. देवाडीया उच्च माध्यमिक शाळेत शिक्षकांच्या वेतनासाठी मंजूर असलेल्या अनुदानापेक्षा जास्त अनुदान दिले गेले होते. त्यामुळे संबंधित उप संचालकांविरुद्ध् कारवाई करण्याचे प्रस्तावित केले आहे. त्यांच्यावर दोषारोपपत्र दाखल करण्याचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवावयाचा आहे.

उपसंचालक सेवानिवृत्त होण्यापूर्वी त्यांच्याविरुद्ध कारवाई करावी. तसेच राज्यात बोगस विद्यार्थ्यांच्या पटसंख्येचा विषय सुरु आहे. शिक्षण विभागाने वेतनाचे अनुदान मंजूर केल्यावर शिक्षकांचे वेतन थेट त्यांच्या खात्यात जमा झाले पाहिजे असे समितीने सूचित केले. असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, शासनाकडून अनेक शाळांना अनुदान दिले जाते. या अनुदानित शाळांमधील शिक्षकांच्या नेमणुकासंबंधी शासनाकडे तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. म्हणून या शाळांमध्ये शिक्षकांची भरती करीत असताना ती सीईटीच्या माध्यमातून करावी अशी एक चर्चा सुरु आहे. सध्या वेतनाचे देयक मुख्याध्यापकांच्या नावे सादर केले जाते. त्यामुळे ती रक्कम संस्थेच्या नावे जमा होते. बँकेच्या

माध्यमातून थेट शिक्षकांच्या खात्यामध्ये वेतन जमा करण्याची सुरुवात मुंबईतील शाळांमध्ये सुरु करीत आहोत.

जळगाव जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात झालेल्या दिरंगाईबाबत श्री.अनिल बिऱ्हाडे व श्री.डी.ओ.सोनावणे, कनिष्ठ लिपिक यांची विभागीय चौकशी सुरु करण्याचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.जळगाव यांना दिनांक १५/७/२००८ च्या पत्रान्वये सादर करण्यात आला, तसेच दिनांक ८/९/२००८ अन्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आली याप्रकरणी ३ वर्षाचा कालावधी होवूनही अद्याप संबंधितांविरुद्ध कोणतीही कारवाई न करण्याची कारणे काय आहेत ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, श्री.सोनावणे यांच्याविरुद्ध विभागाने कारवाई केली असून त्यांच्या कायम स्वरुपी दोन वेतनवाढी रोखण्यात आल्या आहेत. गुणवत्ता शिष्यवृत्तीपासून विद्यार्थी वंचित राहिल्याप्रकरणी श्री.बिऱ्हाडे, कनिष्ठ लिपिक यांचे विरुद्ध शिस्तभंग विषयक कारवाई करुन अहवाल सादर करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांना माध्यमिक शिक्षण संचालनालयाने कळविले आहे.

सध्या राज्यात बनावट पटसंख्येचा विषय सुरु आहे. अनेक शाळांमध्ये मजुरांना, मुक्या बहिऱ्या मुलांना आणून बसविण्याचे प्रकार विविध वाहिन्यांवर पाहिले आहेत. या मोहिमेची बाबतची माहिती समितीने विचारली असता विभागीय सचिवांनी माहिती दिली की, नांदेड जिल्ह्यातील जिल्हाधिकारी डॉ.श्रीकर परदेशी यांनी हा प्रकार उघडकीस आणला आहे. त्यामुळे बनावट विद्यार्थ्यांची तपासणी करण्याच्या मोहिमेला शिक्षण खात्याने मान्यता दिली होती. त्यांच्या मदतीला महसूल विभागातील कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. शासनाकडून प्रत्येक अनुदानित शाळेला अनुदान दिले जाते. त्यामध्ये जिल्हा परिषदांच्या शाळा आहेत. नांदेडचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर राज्यातील विद्यार्थ्यांची नोंदणी झालेली पटसंख्या व प्रत्यक्षात असलेल्या विद्यार्थ्यांची तपासणी केली असता साधारणपणे २० टक्के तफावत असल्याचे आढळून आले. खाजगी शाळांमध्ये २५ टक्के तफावत दिसून आली आहे. या तपासणीमध्ये आजुबाजूच्या शाळेतील मुलांना वर्गात बसविणे, बाहेरच्या राज्यातील विद्यार्थ्यांना वर्गात बसविणे असे प्रकार निदर्शनास आले आहेत. यावरुन प्रत्येक शाळेमध्ये काही ना काही बोगस विद्यार्थी बसविण्याचा प्रयत्न झालेला आहे.

नांदेड येथील एका शाळेत बनावट पटसंख्या आढळून आली आणि त्या शाळेच्या बाबतीत मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा झाली. बनावट पटसंख्येमुळे साधारणतः चार गोष्टीवर परिणाम होतो. संच मान्यतेप्रमाणे विद्यार्थी आणि शिक्षकांची संख्या निर्धारित केली जाते. परंतु अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांची

व शिक्षकांची संख्या मोठ्या प्रमाणात दाखविण्यात येते. पर्यायाने शासनाकडून मोठ्या प्रमाणात अनुदान त्या संस्था प्राप्त करुन घेतात. बनावट पटसंख्येमुळे शासनाच्या मिड-डे मिल योजनेमध्ये पुरविण्यात येणाऱ्या सामानाची संख्या वाढते. विद्यार्थ्यांच्या बनावट पटसंख्येमुळे गणवेशाचे वाटप मोठ्या प्रमाणात करावे लागते. विद्यार्थ्यांसाठी मोफत पाटी-पुस्तक योजना आहे. तसेच शिष्यवृत्ती आहे या चारही गोष्टीत मोठ्या प्रमाणात अपेक्षित वित्तीय भार अंदाजित (Financial implecation extra polate) करण्यात आला आहे.

नांदेड येथील शाळेत पटसंख्येच्या बाबतीत जो प्रकार आढळून आला, असाच प्रकार जर संपूर्ण राज्यात सुरु असेल तर त्यातून सुमारे अडीच ते तीन हजार कोटी रुपये विद्यार्थ्यांच्या पटसंख्येवर खर्च होत असावा असा आमचा अंदाज आहे. नांदेड येथे असा प्रकार आढळून आल्यामुळे महसूल विभागाच्या माध्यमातून संपूर्ण राज्यात तीन दिवस विद्यार्थ्यांची उपस्थितीची पडताळणी मोहिम सुरु झालेली आहे. राज्यात वेगवेगळी पथके तयार करुन शाळांची तपासणी करण्यात येत असून विद्यार्थी पट संख्येच्या बाबतीतील अहवाल रोज शासनास सादर होत असतो. याबाबतीतील अहवालाची माहिती प्राप्त झाल्यानंतर डाटा फिडींग करण्याच्या सूचना देखील दिलेल्या आहेत.

या संदर्भात समितीने अशी माहिती दिली की, शिक्षण खात्यामध्ये अनपेक्षित भेटीची पद्धत नाही काय ? "सकाळ" या वृत्तपत्रात विद्यार्थ्यांना ट्रकमध्ये, टेम्पोमध्ये बसविलेले आहे अशा प्रकारचा फोटो छापून आलेला आहे. एका शाळेत उपस्थिती दाखविल्यानंतर त्याच विद्यार्थ्यांना या वाहनांमधून दुसऱ्या शाळेत घेऊन जातात. एका शाळेत व्ही.डी.ओ.शुटींग झाली की त्या विद्यार्थ्यांना दुसऱ्या शाळेत नेवून बसवितात. हा प्रकार सर्रास या राज्यात सुरु आहे.

यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, विद्यार्थी एका शाळेतून दुसरीकडे जाऊ नये, तसेच विद्यार्थी ओळखले जावेत म्हणून त्यांच्या हाताच्या बोटाला शाई लावली जाते. ती शाई तीन दिवसापेक्षा जास्त दिवस पुसली जाणार नाही अशी ती शाई आहे. निवडणुका होताना मतदारांच्या बोटाला शाई लावली जाते, ती पद्धत विद्यार्थी मोजणीसाठी अंमलात आणली आहे. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांची मोजणी झाली, त्या विद्यार्थ्याला दुसऱ्या शाळेत दाखविता येणार नाही. नांदेड येथील शाळेत विद्यार्थी पटसंख्येचा जो प्रकार झाला. तो राज्यात इतरत्र संस्थेच्या शाळांमध्ये देखील असा प्रकार सुरु असल्याचे तपासणीअंती आढळून आलेले आहे. त्या संस्थांनी विद्यार्थ्यांच्या पटसंख्येच्या नोंदवहीमध्ये बदल करण्यास सुरुवात केली आहे. म्हणून उप संचालकांकडून १ ऑगस्ट प्रमाणे संच मान्यतेचा जो विद्यार्थी संख्येचा आकडा मंजूर करुन घेतला आहे. तो आकडा आपल्या पटपडताळणी मध्ये आधार म्हणून धरला जाणार आहे. अनेक शाळांमध्ये बनावट पटसंख्या दाखविली जात आहे. त्यासाठी शाळा तपासणीचे काम हाती

घेतले आहे. याबाबतीत आता विभागीय कार्यालयामध्ये विविध अनुभव यावयास लागले आहेत. अमरावती विभागीय आयुक्तांनी माहिती देताना सांगितले की, तपासणी चालू असताना विद्यार्थ्यांना शाळेत पाठविण्यासाठी पालकांनी भाव ठरविले आहेत. त्या विद्यार्थ्यांचे पालक म्हणतात की, आम्हाला १ हजार रुपये द्या तरच आम्ही आमचा मुलगा तीन दिवस शाळेत पाठवू. संस्था चालक पैसे देऊन विद्यार्थी पटसंख्या जास्त दाखवित आहेत. अमरावती येथे एका विद्यार्थ्यांचा भाव १५०० रुपये एवढा झालेला आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे.

समितीने विचारणा केली असता, शिक्षण विभागाने यासंदर्भात एक ऑनलाईन पद्धत चालू केली होती त्यासंदर्भातीत सद्यःस्थिती विषयी विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाने एमआयएस ऑन लाईन पद्धत सुरु केली असून त्यास यूआयडी लिंकअप केलेले आहे. विद्यार्थ्यांच्या पटसंख्येची तपासणी झाल्यानंतर विभागाच्या माध्यमातून काही शिफारशी केल्या जाणार आहेत. हा प्रकार नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन थांबविता येईल. एमआयएस आणि युआयडी या ऑन लाईन सिस्टीममुळे हे ड्युप्लीकेशन थांबविणे शक्य होईल. परंतु वस्तुतःत ते शक्य नाही. ही मोहिम पूर्ण झाल्यानंतर ज्या शिफारशी करण्यात येतील, त्या शिफारशींच्या अनुषंगाने मंत्रिमंडळ निर्णय घेईल. या संदर्भात पुढे काय कार्यवाही करावयाची यासंबंधीचे निर्णय मंत्रिमंडळ घेणार आहे. एमआयएस आणि युआयडी सिस्टीममुळे ड्युप्लीकेशन कमी करणे शक्य आहे.

समितीने अशीही विचारणा केली की, शिक्षण विभागातर्फे शाळा तपासणीसाठी शिक्षण निरीक्षक नेमलेले आहेत, गटशिक्षण अधिकारी नेमलेले आहेत, ते शाळांना भेटी देऊन तपासणी करीत असतात. असे प्रकार या अधिकाऱ्यांच्या का लक्षात आले नाहीत ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, ही पद्धत कुचकामी ठरल्यामुळे असे प्रकार या राज्यात घडले आहेत. परंतु आता जी पटसंख्या तपासणी मोहिम हाती घेतली आहे, त्यात या अधिकाऱ्यांचा समावेश करुन घेतलेला नाही.

पटपडताळणी मोहिमेचा संपूर्ण डाटा विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल समितीला सादर करण्याबाबतचे निदेश समितीने दिले असता विभागिय सचिवांनी समितीला आश्वासित केले की, पट पडताळणी मोहिमेचा अहवाल पूर्ण स्वरुपात प्राप्त आल्यानंतर अंतिम कार्यवाही बाबतची अहवाल समितीस सादर करण्यात येईल.

**अभिप्राय व शिफारशी :**

५.१९ "शिक्षण संस्थांना दिलेल्या सहायक अनुदानाची लेखापरीक्षा" या आक्षेपाशी संबंधित परिच्छेदातील माहिती देण्यास ५ वर्षाचा विलंब झाला आहे व विलंबनाची दिलेली कारणे संयुक्तिक नाहीत. कारवाई करण्यास विलंब झाला असल्याची वस्तुस्थिती विभागाने मान्य केली आहे.

महालेखापालांनी नमूद केलेल्या अभिप्रायाच्या संदर्भात पर्यायाने समितीच्या कामकाजाकडे विभाग गांभिर्याने लक्ष देत नाही हेच यावरुन स्पष्ट होते. ५ वर्षाचा विलंब करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करताना त्यांना फक्त कारणे दाखवा नोटीस दिली. या बद्दल समितीने नाराजी व्यक्त केली. संबंधितावर कारवाई करण्यासाठी समितीने १५ दिवसाचा कालावधी दिला असता संबंधितावर १५ दिवसात दोषारोप पत्र दाखल करण्याचे सचिवांनी समितीस आश्वासन दिले होते त्याप्रमाणे शिक्षण संचालकांनी त्यांचे अधिनस्त संबंधित अधिकाऱ्यांकडून खुलासे मागविले असून संचालनालयाकडून खुलासे प्राप्त झाल्यावर पुढील आवश्यक कारवाई करण्यात येणार आहे. **सबब, याबाबत समितीला दिलेल्या आश्वासनानुसार शिक्षण संचालकांकडून संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर केव्हा व कोणती कारवाई करण्यात आली आहे याची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

५.२० ३१ जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांना दिलेल्या सहाय्यित अनुदानापैकी रु.७.०६ कोटीची शिल्लक रक्कम त्यांनी वेळीच समायोजित केली नाही. निधी अखर्चित राहिला तर तो शासनास वास्तविक पहाता विभागाला वितरित केलेला निधी अखर्चित राहिला तर त्यासंदर्भातील निर्धारणाचे काम पूर्ण झाले नसले तरी अखर्चित निधी ऑगस्ट अखेर पर्यन्त परत केला पाहिजे व निर्धारण झाल्यानंतर निधी वितरीत केला पाहिजे. जिल्हा परिषदेच्या निर्धारणाचे काम वेळेवर झालेले नाही. शिक्षणासारखा महत्त्वाचा विषय असतांना सुद्धा निधी खर्च झालेला नाही त्यामुळे विभागाने संबंधितांवर कोणतीही कारवाई केली नाही. **अनुदान निर्धारणासंदर्भात सर्व विभागीय शिक्षण उपसंचालकांना अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले असून अहवाल प्राप्त करण्यासाठी संचालनालयातील १ अधिक्षक व वरिष्ठ लिपिक यांचा विभागीय स्तरावर दौरा निश्चित करुन अनुदान निर्धारणाचे काम पूर्ण करण्यात येत असल्याचे शिक्षण संचालनालयाकडून कळविण्यात आले आहे. सबब, त्यानुसार विभाग निहाय उक्त विशेष पथकाने केलेला निर्धारणाच्या कामाचा अहवाल समितीस लवकरात लवकर सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

५.२१ शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, जळगांव यांच्या कार्यक्षेत्रातील खाजगी माध्यमिक शाळांमधील सन २००४-२००५ मध्ये अतिरिक्त ठरविलेल्या ११ शिक्षकांची सोय केल्याशिवाय १२६ नवीन शिक्षकांची नियुक्ती केली. दरवर्षी संच मान्यतेनुसार शिक्षकांची संख्या निश्चित केली जाते. काही ठिकाणी अतिरिक्त शिक्षक ठरले तर त्यांना त्याच जिल्ह्यात समायोजित केले जाते. त्या वर्षी समायोजन करण्याच्या प्रक्रियेला उशीर झाला होता. ज्यांनी उशीर केला त्यांच्या विरुद्ध विभागाने कारवाई करावी. **११ शिक्षकांची सोय होण्यापूर्वीच १२६ नवीन शिक्षकांची भरती करण्यात आली. परंतु त्या ११ शिक्षकांचे वेतन चालूच राहिले. त्यामुळे ११ लाख रुपयांचा अतिरिक्त खर्च झाला आहे. ज्यांनी ही चूक केली आहे त्यांच्या विरुद्ध कारवाई करण्यात आली नाही. हा मुद्दा समितीसमोर चर्चेस येईलपर्यंत विभागाने स्वतःहून उक्त प्रकरणी कारवाई करणे आवश्यक होते असे समितीचे स्पष्ट मत आहे. याबाबत**

**विभागाने अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई न केल्यामुळे अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन न करता नवीन शिक्षकांची नियुक्त केली जाते त्यामुळे कनिष्ठ स्तरावर विभागाबाबत चांगला संदेश जात नाही. याबाबत समितीने खेद व्यक्त केला असून या मुद्याबाबत संबंधिताविरुद्ध जबाबदारी निश्चित करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

५.२२ आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत शासनाने काही निर्णय घेतलेला नाही. **कोणाला आर्थिकदृष्ट्या मागासलेले म्हणावयाचे ते शासनाला जाहीर (Notify) करावे लागेल आणि ते करण्याचा शासनाला अधिकार आहे. आर्थिकदृष्ट्या मागास या प्रवर्गामध्ये अल्पसंख्याकांना समाविष्ट करण्याबाबतची मागणी करण्यात येत आहे व सदर मुद्दयाबाबत तातडीने कार्यवाही करण्याबाबत समितीस सचिवांनी आश्वासित करुनही केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती समितीस प्राप्त झाली नसल्याने याबाबत समितीला निश्चित निष्कर्षाप्रत येता आले नाही. सबब सदर कार्यवाहीची माहिती समितीला तातडीने सादर करावी, तसेच उक्त माहिती समितीला न पाठविल्या प्रकरणी जबाबदारी निश्चित करुन त्याच्या विरुद्ध कारवाई करावी व त्याबाबतची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

५.२३ ज्या शाळांचा निकाल कमी लागला आहे अशा शाळांविरुद्ध कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले होते. परंतु या निर्णयाच्या विरोधात संबंधित संस्थांकडून अपील करण्यात आले. त्यामुळे या शाळांना सुधारणा करण्याची संधी देण्यात आलेली आहे. आता त्या शाळांच्या निकालामध्ये सुधारणा झालेली आहे. शाळेत विद्यार्थी शिकत असताना शाळा बंद करण्यासारखी कारवाई करता येत नसली तरी शाळांचे निकालामध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. ज्या शाळांचा ३ वर्षामध्ये ० ते ३० टक्के निकाल लागलेला आहे अशा एकूण राज्यात १७८ शाळा राज्यात आहेत. या १७८ शाळांमधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून शासन ह्या शाळा बंद करीत नाही. हे काही अशी खरे असले तरी या शाळा चालू राहिल्यास शाळांमधील मुले उत्तीर्ण व अनुत्तीर्ण होवोत, शिक्षकांचे वेतन चालू असते. याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. जोपर्यंत त्यांना आर्थिक झळ बसणार नाही तोपर्यंत यामध्ये काही सुधारणा होणार नाही. **त्यामुळे शाळांचे निकाल चांगले लागले नाही तर त्यांची मान्यता रद्द करण्याची किंवा शिक्षकांचे वेतनवाढ रोखण्याची कारवाई शासनाने करावी अशी समितीची शिफारस आहे.**

**५.२४ काही ठिकाणी अनधिकृतपणे शाळा चालतात. त्या शाळांमधील मुलांना अधिकृत असलेल्या शाळेत परीक्षेसाठी बसविले जाते. त्यामुळे शाळेच्या निकालावर परिणाम होतो, हे लक्षात घेता राज्यातील अनधिकृत शाळांची संख्या, त्या शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या व प्रत्यक्षात असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या त्या शाळांवर करण्यात आलेल्या कारवाईची माहिती समितीला त्वरीत देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

५.२५ ज्यावेळी शासनाकडून शाळेला मान्यता दिली जाते त्यावेळी त्यांनी शाळेत मूलभूत उदा. मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी आदी सुविधा उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. ज्यांनी त्या सुविधा पुरविल्या नाहीत त्यांची मागाहून मान्यता काढण्याची कारवाई करावी लागते. **देवाडीया उच्च माध्यमिक शाळेत शिक्षकांच्या वेतनासाठी मंजूर असलेल्या अनुदानापेक्षा जास्त अनुदान दिले गेले होते. त्यामुळे संबंधित उप संचालकांविरुद्ध कारवाई करण्याचे प्रस्तावित केले आहे. त्यांच्यावर दोषारोपपत्र दाखल करण्याचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवावयाचा आहे. ही बाब विचारात घेता या उप संचालकावर कारवाई करण्यासाठी विभागाने समितीसमोर साक्षीच्या वेळेपर्यंत विषय चर्चेस येण्याची वाट पहाणे योग्य नाही. याप्रकरणी विभागाने त्वरेने संबंधित प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे अभिप्राय मागविण्यासाठी यापूर्वीच पाठवून सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्रायानुसार पुढील कारवाई करणे समितीला अपेक्षित होते. उलट या प्रकरणी कालापव्यय करण्याचा प्रयत्न एकप्रकारे विभागाने केला आहे. सबब, आतातरी विभागाने त्वरेने कारवाई करुन संबंधित उपसंचालक सेवानिवृत्त होण्यापूर्वी त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

५.२६ जळगाव जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात झालेल्या दिरंगाईबाबत श्री.अनिल बिऱ्हाडे व श्री.डी.ओ.सोनावणे, कनिष्ठ लिपिक यांची विभागीय चौकशी सुरु करण्याचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.जळगाव यांना दिनांक १५/७/२००८ च्या पत्रान्वये सादर करण्यात आला, तसेच दिनांक ८/९/२००८ अन्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. याप्रकरणी ३ वर्षाचा कालावधी झ ाला आहे. **श्री.सोनावणे यांच्याविरुद्ध विभागाने कारवाई केली असून त्यांच्या कायम स्वरुपी दोन वेतनवाढी रोखण्यात आल्या आहेत. त्यांच्यावर कारवाई कधी व केव्हापासून करण्यात आली याची माहिती समितीला देण्यात यावी. तसेच श्री.बिऱ्हाडे, कनिष्ठ लिपिक यांचे विरुद्ध शिस्तभंग विषयक कारवाई करुन अहवाल सादर करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांना माध्यमिक शिक्षण संचालनालयाने कळविले आहे. सबब, त्यानुसार त्यांच्यावर केलेल्या कारवाईची माहिती देखील समितीला देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

५.२७ राज्यात शाळांतील बनावट पटसंख्येचा विषय सध्या ऐरणीवर आहे. नांदेड जिल्ह्यातील जिल्हाधिकारी डॉ.श्रीकर परदेशी यांनी बोगस पटसंख्येचा प्रकार उघडकीस आणला आहे. त्यामुळे बनावट विद्यार्थ्यांची तपासणी करण्याच्या मोहिमेला शिक्षण खात्याने मान्यता दिली होती. त्यांच्या मदतीला महसूल विभागातील कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. शासनाकडून प्रत्येक अनुदानित शाळेला अनुदान दिले जाते. त्यामध्ये मोठ्या संख्येने जिल्हा परिषदांच्या शाळा आहेत. नांदेडचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर राज्यातील विद्यार्थ्यांची नोंदणी झालेली पटसंख्या व प्रत्यक्षात असलेल्या विद्यार्थ्यांची तपासणी केली असता साधारणपणे २० टक्के तफावत असल्याचे आढळून आले आहे तर खाजगी शाळांमध्ये २५ टक्के तफावत दिसून आली आहे. या तपासणीमध्ये जवळच्या आजुबाजूच्या

शाळेतील मुलांना जादा पटसंख्या दाखविण्यासाठी तर वर्गात बसविणे, बाहेरच्या राज्यातील विद्यार्थ्यांना वर्गात बसविणे असे प्रकार निदर्शनास आले आहेत. यावरुन प्रत्येक शाळेमध्ये बोगस विद्यार्थी बसविण्याचा प्रयत्न झालेला आहे.

५.२८ बनावट पटसंख्येमुळे साधारणत: चार गोष्टीवर परिणाम होतो. संच मान्यतेप्रमाणे विद्यार्थी आणि शिक्षकांची संख्या निर्धारित केली जाते. परंतु अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांची व शिक्षकांची संख्या मोठ्या प्रमाणात दाखविण्यात येते. पर्यायाने शासनाकडून मोठ्या प्रमाणात अनुदान त्या संस्था प्राप्त करुन घेतात. बनावट पटसंख्येमुळे शासनाच्या मिड-डे मिल योजनेमध्ये पुरविण्यात येणाऱ्या साहित्यांची संख्या वाढते. विद्यार्थ्यांच्या बनावट पटसंख्येमुळे गणवेशाचे वाटप मोठ्या प्रमाणात करावे लागते. विद्यार्थ्यांसाठी मोफत पाटी-पुस्तक योजना आहे तसेच शिष्यवृत्ती आहे या चारही गोष्टीत मोठ्या प्रमाणात अपेक्षित भार अंदाजित वित्तीय (Financial implecation extrapolate) शासनावर पडतो.

५.२९ नांदेड येथील शाळेत पटसंख्येच्या बाबतीत जो प्रकार आढळून आला, असाच प्रकार जर संपूर्ण राज्यात सुरु असेल तर त्यातून सुमारे अडीच ते तीन हजार कोटी रुपये विद्यार्थ्यांच्या पटसंख्येवर खर्च होत आहे. संपूर्ण राज्यात तीन दिवस विद्यार्थ्यांची उपस्थितीची पडताळणी मोहिम सुरु झालेली आहे. राज्यात वेगवेगळी पथके तयार करुन शाळांची तपासणी करण्यात येत असून विद्यार्थी पट संख्येच्या बाबतीतील अहवाल रोज शासनास सादर होत असतो. अहवालाची माहिती प्राप्त झाल्यानंतर डाटा फिडींग करण्यात येत आहेत.

५.३० विद्यार्थी एका शाळेतून दुसरीकडे जाऊ नये, तसेच विद्यार्थी ओळखले जावेत म्हणून त्यांच्या हाताच्या बोटाला शाई लावली जाते. ती शाई तीन दिवसापेक्षा जास्त दिवस पुसली जाणार नाही अशी ती शाई आहे. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांची मोजणी झाली, त्या विद्यार्थ्याला दुसऱ्या शाळेत दाखविता येणार नाही. राज्यातील इतर संस्थांनी विद्यार्थ्यांच्या पटसंख्येच्या नोंदवहीमध्ये बदल करण्यास सुरुवात केली आहे. उप संचालकांकडून १ ऑगस्ट प्रमाणे संच मान्यतेचा जो विद्यार्थी संख्येचा आकडा मंजूर करुन घेतला आहे. तो आकडा आपल्या पटपडताळणी मध्ये आधार म्हणून धरला जाणार आहे. अनेक शाळांमध्ये बनावट पटसंख्या दाखविली जात आहे. त्यासाठी शाळा तपासणीचे काम हाती घेतले आहे. याबाबतीत आता विभागीय कार्यालयामध्ये विविध अनुभव यावयास लागले आहेत. अमरावती विभागीय आयुक्तांनी माहिती देताना सांगितले की, तपासणी चालू असताना विद्यार्थ्यांना शाळेत पाठविण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांनी भाव ठरविले आहेत. त्या विद्यार्थ्यांचे पालक म्हणतात की, १ हजार रुपये दिले तरच आम्ही आमचा मुलगा तीन दिवस शाळेत पाठवू. संस्था चालक पैसे देऊन विद्यार्थी पटसंख्या जास्त दाखवित आहेत. अमरावती येथे एका विद्यार्थ्यांचा भाव १५०० रुपये एवढा झालेला आहे. ही बाब आहे. शिक्षणाच्या एक प्रकारे बाजार मांडला आहे असे समितीला नाईलाजास्तव अत्यंत खेदाने नमूद करु इच्छिते.

५.३१ विद्यार्थ्यांच्या पटसंख्येची तपासणी झाल्यानंतर विभागाच्या माध्यमातून काही शिफारशी केल्या जाणार आहेत. हा प्रकार नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन थांबविता येईल. एमआयएस आणि युआयडी या ऑन लाईन सिस्टीममुळे हे ड्युप्लीकेशन थांबविणे शक्य होईल. परंतु फिजीकली ते शक्य नाही. ही मोहिम पूर्ण झाल्यानंतर ज्या शिफारशी करण्यात येतील, या संदर्भात पुढे काय कार्यवाही करावयाची यासंबंधीचे निर्णय मंत्रिमंडळ घेणार आहे.

५.३२ शिक्षण विभागातर्फे शाळा तपासणीसाठी शिक्षण निरीक्षक नेमलेले आहेत, गटशिक्षण अधिकारी नेमलेले आहेत, ते शाळांना भेटी देऊन तपासणी करीत असतात. आपल्या तपासणीच्या वेळी उक्त अधिकाऱ्यांनी शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची वर्ग निहाय प्रवेश संख्या व तपासणीचे वेळी आढळून आलेली विद्यार्थ्यांची वर्ग संख्या यांची तपासणी केली असती तर बोगस पटनोंदणीचा आकडा त्यांच्या सहज लक्षात आला असता असे समितीला वाटते. शासनाची सिस्टीम अपयशी ठरल्यामुळे पटसंख्येत वाढ करण्याचे प्रकार राज्यात घडले आहेत. परंतु आता जी पटसंख्या तपासणी मोहिम हाती घेतली आहे, त्यात या अधिकाऱ्यांचा समावेश करुन घेतलेला नाही. **राज्यातील ज्या जिल्ह्यामध्ये पटसंख्या वाढवून घेवून शासनाचे अनुदान घेतले आहे अशा शाळांची चौकशी करून दोषी आढळून आलेल्या शाळेच्या मुख्यध्यापकांवर/संस्थाचालकांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी. शिक्षणाधिकारी, उप शिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी व विस्तार अधिकारी शिक्षण तसेच त्या जिल्ह्यातील शिक्षण निरिक्षकांची चौकशी करुन चौकशीत ते दोषी आढळून आल्यास त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी. तसेच पटपडताळणी मोहिमेचा संपूर्ण डाटा विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर व त्यावर अंतिम कार्यवाही झाल्यावर अहवालाची प्रत समितीस सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

# उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## ६. शिक्षण संस्थांना दिलेल्या सहायक अनुदानाची लेखा परीक्षा

६.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या **परिच्छेद क्र.३.५ "शिक्षण संस्थांना दिलेल्या सहायक अनुदानाची लेखा परीक्षा"** या संदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले.

**६.२ निर्धारण केल्याविना अनुदानांचे प्रदान -** ऑक्टोबर १९७९ च्या शासन निर्णयानुसार, महाविद्यालयांना त्या वर्षाच्या अंदाजित खर्चाच्या आधारावर तदर्थ वेतन अनुदाने देय होती. महाविद्यालयांनी सादर केलेल्या लेखापरीक्षण वार्षिक लेखा विवरणाच्या आधारावर सहसंचालक, उच्च शिक्षण हे या अनुदानांचे निर्धारण करतात.

सात प्रादेशिक विभागांतील, ७८० महाविद्यालयांचे सहसंचालकांद्वारे तदर्थ अनुदानांचे निर्धारण हे तीन ते १० वर्ष थकित होते. या महाविद्यालयांना गेल्या चार वर्षात (निर्धारणाशिवाय) दिलेली तदर्थ अनुदाने खालील प्रमाणे होती.

| सहसंचालकाच्या कार्यालयाचे नाव (प्रादेशिक) | महाविद्यालयांची संख्या | निर्धारण केलेले शेवटचे वर्ष | निर्धारण न करता दिलेले अनुदान (रुपये कोटीमध्ये) | कालावधी |
|---|---|---|---|---|
| औरंगाबाद | ७५ | २००२-०३ | १२६.८८ | २००३-२००५ |
| जळगाव | ७१ | २००१-०२ | १९१.५६ | २००२-२००५ |
| कोल्हापूर | १३२ | २००२-०३ | २३५.१४ | २००३-२००५ |
| मुंबई | १७७ | २००२-०३ | ३३९.५६ | २००३-२००५ |
| नागपूर | १४६ | २००१-०२ | २४१.४४ | २००२-२००५ |
| नांदेड | ५६ | २००१-०२ | १६६.९७ | २००२-२००५ |
| पुणे | १२३ | १९९५-९६ | ४८८.२२ | २००१-२००५ |
| | **७८०** | | **१७८९.७७** | |

अशाप्रकारे, ७८० महाविद्यालयांना प्रदान केलेले रु.१७८९.७७ कोटीचे अनुदान तीन ते १० वर्षांपर्यंत निर्धारणाशिवाय राहिले असे दिसून आले की, सहसंचालकांनी अनुदानांचे निर्धारण न केल्यामुळे, मे २००६ पर्यंत, २१७ महाविद्यालयांत रु.१६.१९ कोटींचा निधी पडून राहिला. औरंगाबाद (रु.६.६५ कोटी), कोल्हापूर (रु.५.१९ कोटी), मुंबई (रु.०.९३ कोटी), नांदेड (रु.२.३८ कोटी) व पुणे (रु.०.२४ कोटी)

उत्तरामध्ये, शासनाने निर्धारण न करण्याचा संबंध (ऑगस्ट २००६) मनुष्य बळाची टंचाई या कारणाशी लावला आणि असे नमूद केले की, फेब्रुवारी २००७ पर्यंत निर्धारण पूर्ण केले जाईल.

**ज्ञापन :**

**६.३** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

मा.महालेखापाल, नागपूर यांनी सन २००५-२००६ च्या नागरी अहवालात संचालनालयातील अधिपत्याखाली विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग कार्यालय आहे व त्याच्या मार्फत अनुदान निर्धारणाचे काम चालते. मा.संचालनालयाने अनुदान निर्धारणाबाबत सहसंचालकाच्या वारंवार बैठका व आढावा घेऊन अनुदान निर्धारणावर भर दिला व त्याप्रमाणे सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी प्रत्यक्ष केलेले अनुदान निर्धारण, महाविद्यालयाचे संख्यानिहाय माहिती सोबतच्या तक्त्यामध्ये सादर करण्यात येत आहे.

| सहसंचालकांच्या प्रादेशिक कार्यालयाचे नाव | एकूण महाविद्यालये | अनुदान निर्धारण झालेल्या महाविद्या यांची एकूण संख्या | अनुदान निर्धारण वर्ष | एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| औरंगाबाद | ७५ | ७५ | २००५-२००६<br>२००७-२००८ | १००% |
| जळगांव | ७१ | ७१ | २००५-२००६<br>२००७-२००८ | १००% |
| कोल्हापूर | १३२ | ३७ | २००५-२००६ | २४% |
| मुंबई | १७७ | २२ | ० | १३% |
| नागपूर | १४६ | १४६ | २००५-२००६<br>२००७-२००८ | १००% |
| नांदेड | ५६ | ५६ | २००५-२००६<br>२००७-२००८ | १००% |
| पुणे | १२३ | ३० | २००६-२००७ | २४% |
| | **७८०** | **४३७** | | **५६%** |

वरील नमूद केलेल्या महाविद्यालयाचे सहसंचालक यांनी सन २००७-२००८ मध्ये अनुदान निर्धारणाचे ५६% काम केलेले आहे व संचालनालयास उच्च शिक्षण म.रा.पुणे-१ येथे फॉर्म नं.५,६ भरुन सादर केलेले आहे.

१) सहसंचालक मुंबई, पुणे व कोल्हापूर/कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची संख्या अत्यल्प व नगण्य असल्याने मनुष्यबळाअभावी अनेक महाविद्यालयांचे अनुदान निर्धारण प्रलंबित आहे. परंतु गेल्या अनेक वर्षांपासून सर्व महाविद्यालयांकडून हे कार्यालय प्रपत्र ५ मध्ये स्वयंनिर्धारण करुन अनुदान वितरीत करीत असल्याने वेतन किंवा वेतनेत्तर अनुदानाचे अतिप्रदान झालेले नाही. तथापि आता अनुदान निर्धारणाचे काम पूर्ण करण्यासाठी विशेष मोहिम राबवुन या शैक्षणिक वर्षा अखेर ते काम पूर्ण करण्याचे काम सुरु आहे. तरी कृपया सदर परिच्छेद वगळण्यात यावा.

**वेतन अनुदानाचे जादा प्रदान -**

**६.४** आधीच्या वर्षामध्ये जादा प्रदान केलेले वेतन अनुदान चालू वर्षातील देय अनुदानामधून वजा करावयाचे होते असे दिसून आले की, नागपूर व नांदेड विभागातील पाच महाविद्यालयांमध्ये महाराष्ट्र कला आणि वाणिज्य महाविद्यालय, निलंगा, नुतन महाविद्यालय, सेतू, पीपल्स कॉलेज, नांदेड, पी.पी.शैक्षणिक महाविद्यालय, गोंदिया आणि एस.एन.मोर महाविद्यालय, तुमसर आधीच्या वर्षात (२००२-२००३ ते २००४-२००५) जादा प्रदान केलेले रु.७५.९६ लाखांचे वेतन अनुदान चालू वर्षाच्या अनुदानातून वजा करण्याऐवजी चालू वर्षाच्या तदर्थ देय अनुदानात वाढविण्यात आले, परिणामी रु.७५.९६ लाखाचे वेतन अनुदान जादा प्रदान झाले.

शासनाने नमूद केले (ऑगस्ट २००६) की, जादा प्रदान केलेले वेतन अनुदान, निर्धारण करुन ऑक्टोबर २००६ पर्यंत वसूल करण्यात येईल.

**ज्ञापन :**

६.५ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

अनुदान निर्धारण सन २००५-२००६ पर्यंत झालेले आहे व जादा वेतन अनुदान निर्धारणामध्ये समायोजित केली आहे.

**शिक्षण फी वसुलीचे परिगणन करण्याकरिता विचारात घेतलेली विद्यार्थ्यांची संख्या -**

**६.६** महाविद्यालये विद्यार्थ्यांकडून जी शिक्षण फी वसूल करतात ती वजा करुन महाविद्यालयांना वेतन अनुदान देय असते. तथापि, विभागाने शिक्षण फी वजा न करता वेतन अनुदानाचे प्रदान करणे चालू ठेवले.

असे दिसून आले की, तीन महाविद्यालयात, प्रशासकीय अधिकाऱ्यांनी त्या वर्षात नोंदविलेल्या स्नातक पूर्व विद्यार्थ्यांच्या संख्येपेक्षा कमी विद्यार्थी वसुलीयोग्य शिक्षण फी ची परिगणना करण्याकरिता विचारात घेतले. याचा परिणाम खालील तपशीलाप्रमाणे रु.११.७९ लाखाचे जादा अनुदान प्रदान करण्यात झाला.

**(रुपये कोटीमध्ये)**

| महाविद्यालयाचे नाव | वर्ष | नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | शिक्षण परिगणनासाठी विचारात घेतलेली विद्यार्थी संख्या | फरक | वेतन अनुदानाचे जादा प्रदान रु.८०० दरमहा प्रती विद्यार्थी |
|---|---|---|---|---|---|
| जे.एम.पटेल कॉलेज, भंडारा | २००३-०४<br>२००४-०५ | ९७३<br>१६९९ | ४७८<br>११९२ | ४९५<br>५०७ | ३.९६<br>४.०६ |
| आर.एम.पटेल कॉलेज, भंडारा | २००१-०२ | २६१ | २३९ | २२ | ०.१८ |
| सी.जे.पटेल कॉलेज, तिरोडा | २००१-०२<br>२००४-०५ | २८७<br>७८१ | २७८<br>३४१ | ९<br>४४० | ०.०७<br>३.५२ |
| **एकूण** | | **४००१** | **२५२८** | **१४७३** | **११.७९** |

चर्चेमध्ये (ऑगस्ट २००६) शासनाने नमूद केले की, निर्धारण करताना नोंदविलेले व विचारात घेतलेले विद्यार्थी यातील फरक हा महाविद्यालयांच्या असहाय्यित पाठ्यक्रमाकरिता नोंदविलेल्या विद्यार्थ्यांच्या अंतर्भावामुळे आहे. तथापि, या विधानाला पुष्टि देण्याकरीता काही तपशील सादर केला गेला नाही.

**ज्ञापन :**

**६.७** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या अहवालामध्ये पान क्र.७६ तक्त्यावरती (रुपये कोटीमध्ये) लिहिले आहे. ते (रुपये लाखात) असे आवश्यक आहे. कारण तक्ता वरील मूळ मुद्यात लाखात असा उल्लेख आहे. शिवाय प्रत्यक्ष परिगणना केली असता,

४९५ x ८०० = ३९६०००/- येते.

परिच्छेदामध्ये नमूद केलेली रक्कम अनुदान निर्धारणामध्ये वसुल केलेली आहे.

१. जे.एम.पटेल महाविद्यालय, भंडारा
   अनुदान निर्धारण २००५-०६
   **रुपये ८०१६००/-**

२. आर.एम.पटेल गर्ल्स कॉलेज, भंडारा.
   अनुदान निर्धारण २००५-०६
   **रुपये ०१७६००/-**

३. सी.जे.पटेल कला व वाणिज्य महाविद्यालय, तिरोडा
   अनुदान निर्धारण २००५-०६
   **रुपये ३५९२००/-**

अशी एकूण तीन महाविद्यालयाचे **रुपये ११,७८,०००/-** एवढी रक्कम वसुली केली आहे.

**परिवहन भत्त्यावरील जादा खर्च -**

**६.८**शासनाने डिसेंबर १९९८ मध्ये निर्गमित केलेल्या आणि मे २००३ मध्ये पुनरुच्चार केलेल्या आदेशानुसार सुट्टीच्या कालावधीत, ज्या दिवशी अध्यापन कर्मचारी कामावर हजर राहतात त्या दिवसांच्या प्रमाणात परिवहन भत्ता अनुज्ञेय होता. मुंबई विभागात महाविद्यालयांनी कामावर हजर राहिलेल्या दिवसांच्या प्रमाणात कर्मचाऱ्यांना परिवहन भत्ता देण्याऐवजी संपूर्ण सुट्टीच्या कालावधीसाठी परिवहन भत्ता प्रदान केला ज्याचा परिणाम ४,६०८ अधिव्याख्यात्यांना २००१-२००२ ते २००४-२००५ या कालावधीत परिवहन भत्त्यावर रु.१.६२ कोटीचे जादा प्रदान करण्यात झाला. शासनाने ही चूक स्विकारली (ऑगस्ट २००६) आणि झालेले जादा प्रदान वसूल करण्यास संमती दर्शविली.

**ज्ञापन :**

**६.९** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

परिवहन भत्त्यावरील ज्यादा खर्च रु.१.६२ कोटी भारताचे नियंत्रक व महालेखापाल परिक्षक यांनी अनुदानीत महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांना दिर्घकालीन सुट्टीच्या कालावधीत प्रदान केलेल्या परिवहन भत्त्याच्या वसुलीबाबत परिच्छेद काढल्यावर तो मान्य करुन त्या संदर्भात सर्व महाविद्यालयांना दिनांक ९/१०/२००७ व १४/११/२००७ रोजी आदेशपत्र काढण्यात आले सर्व महाविद्यालयांकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर असे निदर्शनास आले की, सरसकट सर्व अधिव्याख्यात्यांना दिर्घकालीन सुट्टींच्या कालावधीत परिवहन भत्ता अदा करण्यात आलेला नाही. मा.महालेखापाल, नागपूर यांनी सरसकट सर्व अधिव्याख्यात्यांना परिवहन भत्ता अदा केला आहे, असे गृहीत धरुन एकूण वसूलपात्र रक्कम रुपये १.६२ कोटी दर्शविली. परंतु, ती सर्व रक्कम वसूलीस पात्र ठरत नाही, असे दिसून आले. प्रत्यक्ष वसुलपात्र रक्कम रु.४१ लाख इतकी निघाली व त्यानुसार सदर रक्कम वसुल करण्यात आली आहे. त्यामुळे उर्वरित रु.१.२१ कोटीची वसूली करण्यात आली नाही. मुंबई विभाग वगळता इतर विभागामध्ये परिवहन भत्त्याचे जादा प्रदान झाल्याचे आढळून आले नाही. तरी कृपया हा परिच्छेद वगळण्यात यावा.

**महाविद्यालयाकडून फी ची अनधिकृत वसुली -**

**६.१०** शासकीय आदेशात (१९७९) असे विनिर्दिष्ट केले आहे की, जी फी शासन किंवा विद्यापीठाने अधिकृत केलेली नाही ती विद्यार्थ्यांकडून वसूल करु नये असे आढळून आले की, २००१-२००२ ते २००४-२००५ या कालावधीत नाशिक आणि औरंगाबाद येथील प्रत्येकी एका महाविद्यालयाने

विद्यापीठ क्षेत्र विकास फी, प्रयोगशाळा विकास फी, केंद्र फी, मोडतोड फी आणि संगणक फी अशा रु.७४.८९ लाखाच्या फी अनधिकृतरीत्या विद्यार्थ्यांकडून वसूल केल्या.

शासनाने नमूद केले (ऑगस्ट २००६) की, अनधिकृत फी वसुलीची पडताळणी केली जाईल आणि संबंधित विद्यार्थ्यांना फी परत करण्याची कार्यवाही केली जाईल.

**ज्ञापन :**

**६.११** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

१. सरस्वती भवन कला व वाणिज्य, औरंगाबाद यांनी फी रु.२०,०३,०००/- सन २००५-२००६ च्या अनुदान निर्धारणामध्ये वसुली केली आहे.

२. एच.पी.टी.कला व आर.वाय.के.विज्ञान महाविद्यालय, नाशिक सन २००१-२००२ ते २००४-२००५ या वर्षात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून अनधिकृत फी रु.९,१५,७००/- संबंधीत महाविद्यालयाकडून वसुली करण्यात आलेली आहे. उच्च शिक्षण संचालनालयाशी संबंधित फक्त एच.पी.टी.महाविद्यालय, नाशिक यांच्याकडून रु.९,१५,७००/- एवढी रक्कम वसुली करावयाची होती. ती या कार्यालयांनी कार्यवाही पुर्ण केलेली आहे.

३. तरी पुढील वसुली ही शालेय शिक्षण विभाग, यांच्या कार्यक्षेत्रात आर.वाय.के.सायन्स, ज्युनिअर कॉलेज, नाशिक यांच्याकडून रु.२९.७० लाख वसुली करावयाचे आहे. याबाबत उपसंचालक शालेय शिक्षण, नाशिक विभाग, शालेय शिक्षण यांना पुढील परिच्छेदाबाबत वसुली कळविलेली आहे. या कार्यालयाच्या अखात्यारितील बाबीबाबतची कार्यवाही पुर्ण झाली असल्याने परिच्छेद वगळण्यात यावा.

**निर्धारणात शिक्षण फी ची घट -**

**६.१२** शासनाने मागील वर्षाच्या वेतन अनुदानाच्या पाच टक्के एवढी रक्कम बिगर वेतन अनुदान म्हणून विद्यार्थ्यांकडून वसुली केल्या जाणाऱ्या शिक्षण फी मधून वर्ग करण्याची मुभा दिली (सप्टेंबर २००३).

कोल्हापूर विभागातील सहा महाविद्यालयांच्या वार्षिक लेखा विवरणावरुन असे दिसून आले की, महाविद्यालयांनी बिगर वेतन खर्चाकरिता शिक्षण फी (वेतन अनुदानाच्या पाच टक्क्यांएवढी) वर्ग केली नव्हती. तथापि, निर्धारण करणाऱ्या अधिकाऱ्यांनी २००३-२००४ व २००४-२००५ या वर्षाच्या वेतन अनुदानाच्या निर्धारणात चुकीने रु.१७.९५ लाख शिक्षण फी बिगर वेतन अनुदानाकरिता वर्ग केल्याचे

दाखविले. या रकमा निर्धारण केलेल्या वेतन अनुदानातून वजा केल्या नाहीत. बिगर वेतन अनुदानाचे निर्धारण सुद्धा प्रलंबित होते.

उत्तरामध्ये शासनाने जादा बिगर वेतन अनुदान वसूल करण्याचे आणि चूक केलेल्या अधिकाऱ्यांविरुद्ध योग्य कार्यवाही केल्याबद्दल कळविण्याचे मान्य केले (ऑगस्ट २००६).

**ज्ञापन :**

**६.१३** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

शासन निर्णय क्र.एनजीसी-२००३/३५४/०३/माशि-३, दिनांक २३/९/२००३ व शा.नि.क्र.एनजीसी-२००३/३५४/०३/माशि ३ दिनांक १६/२/२००४ व शासन पत्र क्र.एनजीसी-२००३/३५४/०३/माशि-३, दिनांक ५/१०/२००४ अन्वये मा.महालेखाकार यांचे लेखापरिक्षण अहवालातील आक्षेपाच्या अनुषंगाने महाविद्यालयांचे (डी.डी.शिंदे सरकार महाविद्यालय कोल्हापूर, मीनलेबेन मेहता महाविद्यालय, पांचगणी, सांगोला महाविद्यालय सांगोला, शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज, वाय सी महाविद्यालय (के एम सी), कोल्हापूर आणि वाय सी कॉलेज, वारणा) वेतन अनुदान निर्धारण केले. त्यामध्ये शिक्षण शुल्कातून वेतनेत्तर अनुदानाकडे वर्ग केलेली रक्कम अमान्य करुन सुधारित वेतन अनुदान निर्धारण अहवाल तयार केला आहे.

**लेखापरीक्षित विवरणपत्रे मिळाल्याशिवाय अनुदानांचे प्रदान-**

**६.१४** संचालक, उच्च शिक्षण यांनी निर्गमित केलेल्या (ऑक्टोबर १९७९) अनुदेशानुसार, महाविद्यालयांना प्राप्त होणाऱ्या अनुदानाचे सनदी लेखापालांकडून लेखापरीक्षण व्हावयास पाहिजे होते आणि महाविद्यालयांची लेखापरीक्षित विवरणपत्रे सहसंचालकांना दर वर्षी ऑगस्ट पर्यंत सादर करावयाची होती. करारनिर्दिष्ट तारखापर्यंत जी महाविद्यालये लेख्यांची लेखापरीक्षित विवरण पत्रे सादर करणार नाहीत त्यांना अनुदान देय नव्हते असे दिसून आले की, जळगांव भागातील २० आणि नांदेड विभागातील ११ महाविद्यालयांनी चार वर्षाच्या कालावधीकरीता लेख्यांची लेखापरीक्षित विवरणपत्रे सादर केली नव्हती. तथापि, सहसंचालकांनी २००१-२००२ ते २००४-२००५ या वर्षात या महाविद्यालयांना अनुदानांचे (रु.५१.३० कोटी) प्रदान करणे सुरुच ठेवले **(विवरणपत्र क्र.१५)**

उत्तरामध्ये शासनाने नमूद केले (ऑगस्ट २००६) की, नांदेड विभागात जबाबदारी निश्चित केली जाईल व जळगांव विभागाकरिता सविस्तर स्पष्टीकरण मागविले जाईल.

**ज्ञापन :**

**६.१५** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

सन २००५-२००६ च्या नागरी अहवालातील लेखापरीक्षीत विवरणपत्रे मिळाल्याशिवाय अनुदानांचे प्रदान,

१) सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगांव, यांनी २० महाविद्यालयांची व

२) सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग यांनी ११ महाविद्यालयांची चारही वर्षाच्या कालावधीची लेखापरिक्षीत विवरण-पत्रे सादर केली आहेत. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगांव आणि नांदेड यांनी सदरच्या महाविद्यालयाचे लेखा परिक्षण अहवाल प्राप्त करुन घेण्याचे आणि अनुदान निर्धारणाचे काम पूर्ण केलेले आहे.

तसेच सदर महाविद्यालयांचे लेखापरिक्षण अहवाल प्राप्त करुन घेण्यासाठी याबाबत महाविद्यालयांना वेळावेळी नोटीसा व स्मरणपत्रे देण्याची कार्यवाही संबंधीत सहसंचालकांनी केलेली आहे.

सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगांव आणि नांदेड यांनी सदरील महाविद्यालयांना वेळोवेळी नोटीसा व स्मरणपत्रे दिलेली आहेत. तसेच ऑडीट रिपोर्ट प्राप्त करुन घेण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही केल्याने संबंधीत सहसंचालकांवर कारवाई करणे आवश्यक वाटले नाही.

अनुदान वितरण करण्यापुर्वी सर्व महाविद्यालयांचे लेखापरिक्षण विवरणपत्र घेण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

**कर्मचारीवर्गाला घरभाडे भत्याचे (एच आर ए) नियमबाह्य प्रदान -**

**६.१६** उच्च शिक्षण संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या (जानेवारी १९९९) अनुदेशानुसार, व्यवस्थापनाने तरतूद केलेल्या निवासस्थानात राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना HRA देय नव्हता.

असे दिसून आले की, पुण्यातील एका शैक्षणिक संस्थेने (फर्ग्युसन महाविद्यालय) १३ शिक्षकांसाठी निवासस्थानाची तरतूद केली आणि २००१-२००२ व २००४-२००५ या कालावधीत त्यांना रु.७.४९ लाख HRA सुद्धा प्रदान केला. शासनाने चूक स्वीकार (ऑगस्ट २००६) केली आणि रक्कम वसूल करण्याचे मान्य केले.

**ज्ञापन :**

६.१७ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे यांचेकडून घरभाडे भत्त्याची वसुली करण्यात आलेली आहे व डी.डी.क्रमांक ०४६६४० दिनांक ६/१०/२००७ अन्वये रक्कम रुपये ९,३६,०००/- एवढी रक्कम चलनाने स्टेट बँक, पुणे येथे भरणा करण्यात आलेली आहे. वसुलीची कार्यवाही केली आहे.

**कमी नावनोंदणी असणाऱ्या महाविद्यालयांना अनुदानाचे नियमबाह्य प्रदान -**

**६.१८** शासनाच्या प्रमाणकांप्रमाणे (१९७९) शाखेतील पदवी पाठ्यक्रमाच्या प्रथम वर्षासाठी नागरी क्षेत्राकरीता कमीतकमी ४० विद्यार्थी व आदिवासी/ग्रामीण क्षेत्राकरीता कमीतकमी ३० विद्यार्थी ही नावनोंदणीची अट पूर्ण करण्यात महाविद्यालयांना अपयश आले तर त्यांना अनुदान देय नव्हते. चार सहसंचालकांच्या अधिकारक्षेत्रात असलेल्या २२ महाविद्यालयात (परिशिष्ट ३.५), **(विवरणपत्र क्र.१६)** १९९९-२००० ते २००४-२००५ या कालावधीत विद्यार्थ्यांची किमान नाव नोंदणी ही शासनाने निश्चित केलेल्या प्रमाणकांपेक्षा कमी होती. तथापि, विभागाने त्या महाविद्यालयांना अनुदानाचे प्रदान करणे सुरु ठेवले. परिणामी रु.३.६३ कोटीचे नियमबाह्य अनुदान प्रदान करण्यात आले. त्यापैकी धुळे, नांदेड, परभणी आणि सोलापूर जिल्ह्यातील पाच महाविद्यालयात १९९९-२००० ते २००४-२००५ या कालावधीत फक्त २ ते १४ विद्यार्थ्यांकरिता प्रत्येकी दोन ते तीन अधिव्याख्यात्यांची नेमणूक (वेतन रु.०.९३ कोटी) करण्यात आली.

उत्तरात, शासनाने नमूद केले (ऑगस्ट २००६) की, संबंधित महाविद्यालयांकडून स्पष्टीकरण प्राप्त करुन सुधारित कार्यवाही केली जाईल.

**ज्ञापन :**

**६.१९** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला. शासन निर्णय दिनांक २४/३/९४ शा.नि.२७.५.९७ व शा.नि.दि.१६.१०.९७ व शासन पत्र दिनांक ३०.१२.१९८२, दिनांक २७.२.८४, दिनांक ८.६.९६ व दिनांक १९.७.९७ वरील सर्व शासन निर्णय/पत्रे पाहाता महाविद्यालयातील अभ्यासक्रम, तुकडी, विषय, यामधील विद्यार्थी संख्या कमी झाली तर कायम शिक्षकांना अतिरिक्त ठरवू नये, असे स्पष्ट आदेश आहेत. यामध्ये खुलासा किमान विद्यार्थी संख्या नसलेले वर्ग जोपर्यंत महाविद्यालयात चालू राहतील तोपर्यंत त्या वर्गावर शिकविणारे कायम शिक्षक जरी अतिरिक्त झाले तरी त्यांच्या वेतनावर अनुदान देय राहील, असे स्पष्ट आदेश आहेत. तसेच जोपर्यंत शिक्षकास शून्य कार्यभार होत नाही. तोपर्यंत त्यांना अतिरिक्त ठरविता येत नाही. महालेखाकार यांनी ज्या महाविद्यालयामध्ये विद्यार्थी संख्या कमी आहे. म्हणून अतिरिक्त अनुदान दिले असा मुद्दा उपस्थित केलेला आहे. ज्या महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या तुकडीमध्ये ४० विद्यार्थी संख्येची अट नसल्याने जो

जादा आर्थिक भार काढलेला आहे. हे योग्य वाटत नाही. कारण शासन-निर्णय दिनांक २९/१२/१९९९ मधील स्पष्टीकरणामध्ये प्रत्येक शाखेमध्ये किमान विद्यार्थी संख्या असावी. उदा. १ शाखा म्हणजे कला शाखा, वाणिज्य शाखा, विज्ञान शाखा असे प्रत्येक शाखेमध्ये किती विद्यार्थी संख्या असावी याचे स्पष्टीकरण दिलेले आहे. त्यामुळे हा मुद्दा येथे लागू होत नाही. महालेखाकार यांनी तुकड्यांमध्ये किमान ३० किंवा ४० विद्यार्थी संख्या असतील हे ज्या वेळेला महाविद्यालय अनुदानावर आणले जाते त्यावेळी गृहीत धरणे आवश्यक आहे. परंतु या शासन निर्णयावर कोणतीही त्रुटी किंवा मार्गदर्शन न विचारल्याने संदिग्धता निर्माण झालेली आहे.

१. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग यांनी संबंधीत महाविद्यालयाचे अनुदान निर्धारण करुन वसुलीची कार्यवाही पुर्ण केली आहे.
२. सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग यांची वसुलीची कार्यवाही पूर्ण झाली आहे.
३. सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग यांनी त्यांच्या अखात्यारितील महाविद्यालयाची वसुली केली आहे.
४. सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग यांनी महाविद्यालयाचे प्रकरण न्यायालयात दाखल केल्याने न्यायालयीन आदेश झाल्यावरच पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे कळविलेले आहे. त्यामुळे २२ महाविद्यालयांपैकी मुंबई विभागाचे महाविद्यालय वगळता २१ महाविद्यालयाबाबत देय अथवा वसुलीबाबतची कार्यवाही पुर्ण झाल्याने परिच्छेद वगळण्यात यावा.

**साक्ष :**

६.२० उपरोक्त परिच्छेदांच्या संदर्भात समितीने दिनांक १३ जुलै, २०११ रोजी सचिव, उच्च तंत्रशिक्षण विभाग यांची साक्ष घेतली. फेब्रुवारी, २००७ पर्यंत अनुदानाच्या निर्धारणाचे काम पूर्ण केले जाईल असे सांगूनही हे काम अद्यापही पूर्ण झालेले नाही. याबाबतची कारणमिमांसा समितीने विचारली असता, विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, राज्यामध्ये एकूण ११५० अनुदानित महाविद्यालये आहेत. महाविद्यालयांना अनुदान देण्याची प्रक्रिया शासनामार्फत होत असते. सन २००७ पूर्वी वेतन निश्चित पथक असल्यामुळे प्रत्येक महाविद्यालयाला पूर्वीची वेतन देयके बघून अनुदान देण्याची पद्धत सुरु होती. त्यावेळी ठोक स्वरुपात अनुदान दिले जात होते. यानंतर पद्धतीमध्ये बरीच सुधारणा करण्यात आली. सन २००९-२०१० मध्ये औरंगाबाद, जळगाव, नागपूर, नांदेड, अमरावती या विभागामध्ये अनुदान निर्धारणाचे १०० टक्के काम पूर्ण झालेले आहे. मार्च २०११ पासून प्रत्येक सहसंचालक कार्यालयामध्ये वेतन पथक कार्यान्वीत केलेले आहे.

शासनाच्या धोरणाप्रमाणे, सन २००१ नंतर मान्यता दिलेल्या महाविद्यालयांना अनुदान देण्याची पद्धत बंद करण्यात आलेली आहे. सन २००१ नंतरच्या नवीन संस्थेतील व जुन्या संस्थेतील नव्या अभ्यासक्रमाला अनुदान दिले जात नाही.

महाविद्यालयांना केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाबाबत समितीने विचारणा केली असता, अनुदानित महाविद्यालयामधील शिक्षकांच्या वेतनावर २२८२ कोटी रुपये निधी मंजूर असून राज्यातील १७६६ महाविद्यालये विना अनुदानित तत्त्वावर सुरु आहेत. महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (युनिव्हर्सिटी ग्रँट कमिशन) मिळणाऱ्या विषयी समितीने माहिती विचारली असता, विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, २२८२ कोटी रुपये राज्य शासनाच्या अर्थसंकल्पामधून दिले जातात. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (युजीसी कडून) वेतन पुनरीक्षण झाल्यानंतर जी वाढ होते, त्यातील ८० टक्के फरकाची रक्कम दिली जाते.

त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, अनुदानित महाविद्यालयातील उच्च उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांची जास्त शुल्क भरण्याची क्षमता असूनही अनुदानित महाविद्यालय असल्यामुळे त्यांना केवळ दीड ते दोन हजार रुपये एवढे शुल्क भरावे लागते. मात्र उपनगरातील व ग्रामीण भागातील विना अनुदानित महाविद्यालयातील गरीब विद्यार्थ्यांची क्षमता नसतानाही त्याला पाच ते सहा हजार रुपये शुल्क भरावे लागते. उच्च उत्पन्न गटातील विद्यार्थ्याकडून शुल्काची रक्कम घेतली तर पाहिजेच त्याच बरोबर आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या विद्यार्थ्यांना शुल्कामध्ये सवलत दिली पाहिजे.

तसेच शासनाने सन २००१ नंतरच्या अभ्यासक्रमाला अनुदान देणे बंद केले आहे. सन १९८९-१९९० पासून काही अभ्यासक्रम असे आहेत, की ज्यांना अजूनही अनुदान दिले जात नाही असे समितीने विदित केले असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, संगणक, शारीरिक शिक्षण इत्यादी ४ विषयाच्या संदर्भात ही अडचण आहे. या संदर्भात न्यायालयांमध्ये प्रकरण दाखल केले आहे. ज्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्क भरण्याची क्षमता आहे, जे उच्च उत्पन्न गटातील आहेत. त्यांच्याकडून शैक्षणिक शुल्काची रक्कम घ्यावी व जे आर्थिकदृष्ट्या मागास आहेत, अशा गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काच्या रकमेमध्ये सवलत द्यावी. याकरिता उत्पन्नाचे गट निश्चित करता येतील. तसेच व्यवस्थापन जागा (मॅनेजमेंट सीटस) वाढवून होणारा खर्चाची आपल्याला भरपाई करता येईल असे समितीने मत व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सुरुवातीला सर्व महाविद्यालयांना अनुदान दिले जात होते. मात्र यामुळे खूप मोठ्या प्रमाणात अनुदान द्यावे लागत होते यामुळे शासनाने अनुदान देणे बंद केले. यावर समितीने मत व्यक्त केले की, आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना शुल्कामध्ये सवलत मिळाली पाहिजे व उच्च उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांकडून शुल्क घेतली गेली पाहिजे.

समितीने अशी शिफारस केली की, सध्या २२८२ कोटी रुपये अनुदानावर खर्च होत आहेत. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सवलत दिली जाते. मात्र १२०० विनाअनुदानित विद्यालयातील विद्यार्थ्यांचा मोठा प्रश्न आहे. अनुदानित महाविद्यालयातील उच्च उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांकडून देखील केवळ नाममात्र शुल्क घेतले जाते व विना अनुदानित महाविद्यालयातील आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्याला तुलनेने जास्त शुल्क भरावे लागते. अनुदानित महाविद्यालयातील उच्च उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्क घ्यावे. या रकमेतून विना अनुदान तत्त्वावरील महाविद्यालयातील आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना सवलत द्यावी. या करिता विभागाने पहाणी करावी. यासंदर्भात समितीकडून शासनाला शिफारस केली जाईल याबाबत शासनाला धोरणात्मक निर्णय घ्यावा लागणार आहे. या संदर्भात विभागीय सचिवांनी समितीला अशी माहिती दिली की, विना अनुदानीत महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना समाजकल्याण विभागाकडून शुल्काच्या रकमेची प्रतिपूर्ती केली जाते.

कॉम्प्युटर आणि इलेक्ट्रॉनिक्स विषयाच्या संदर्भात सद्यःस्थिती अशी आहे की, काही महाविद्यालयांना फायदा झाला तर काही महाविद्यालयांना दिला नाही असा भेदभाव का करण्यात आला. अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, या संदर्भात विधिमंडळामध्ये झालेल्या चर्चेच्या वेळी शासनाकडून प्रस्ताव विचाराधीन आहे असे सांगण्यात आले होते. त्या प्रस्तावाची मंत्रिमंडळ टिप्पणी तयार करुन मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव आणण्याचा प्रयत्न केला. मंत्रिमंडळाचा प्रस्ताव तयार करुन मुख्य सचिव कार्यालयास प्रती सादर केल्या आहेत. मंत्रिमंडळ टिप्पणी तयार करताना त्यात वरील वस्तुस्थिती मांडण्यात आली आहे. लवकरच मंत्रिमंडळासमोर हा विषय येण्याची शक्यता आहे असे सांगण्यात आले.

त्यावर समितीने अशी विचारणा केली की, सहसंचालक, मुंबई, पुणे व कोल्हापूर या कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांची रिक्त पदे न भरण्याची कारणे काय आहेत ? यावर विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, १०३० पदे मंजूर असून त्यापैकी ५२८ पदे भरली आहेत व ५०२ पदे रिक्त आहेत. शिक्षकीय पदे ९९३ असून त्यापैकी ५१४ पदे भरली आहेत व ४७९ पदे रिक्त आहेत. शिक्षकीय पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेत येतात. सन २००७ व २००८ मध्ये आयोगाकडे मागणीपत्र सादर केले आहे. त्यांच्याकडून उमेदवार उपलब्ध झालेले नाहीत. शिक्षकीय पदांमध्ये सर्वसाधारणपणे वैद्यकीय शिक्षण व उच्च शिक्षणाच्या शासकीय महाविद्यालयातील रिक्त पदांचे प्रमाण फार मोठे आहे. दोन-तीन वर्षे लोकसेवा आयोगाला मागणीपत्र पाठवून, जाहिरात देऊनही शासकीय महाविद्यालयातील सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापकांच्या पदांसाठी उमेदवार न मिळाल्यामुळे रिक्त आहेत.

रिक्त असलेली ५०२ पदे तात्पुरत्या स्वरुपात भरली जातील काय ? अशी समितीने विचारणा केली असता, सध्या तासिका पद्धतीने नियुक्ती करुन वर्ग सुरु ठेवले आहेत, अशी विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली. याच संदर्भात समितीला असेही सांगण्यात आले की, नेट-सेट परीक्षा उत्तीर्ण झालेले प्राध्यापक उपलब्ध होत नाहीत. एम.ए, एम.एड उत्तीर्ण झालेले उमेदवार उपलब्ध आहेत, परंतु त्यांना सेवेत घेता येत नाही म्हणून पदे रिक्त आहेत. रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही युद्ध पातळीवर सुरु आहे. लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र सादर केले आहे. उमेदवार उपलब्ध होतील त्यानुसार पदे भरली जातील. अ, ब, क व ड संवर्गातील पदे विचारात घेतली तर २५२४ पदे मंजूर असून त्यापैकी १५९९ पदे भरली आहेत व ९२५ पदे रिक्त आहेत. प्राध्यापकांची पदे वगळता इतर ४०० पदे क आणि ड संवर्गातील पदे असल्यामुळे भरती करण्यास बंदी आहे. अ व ब संवर्गातील पदांचे मागणीपत्र लोकसेवा आयोगाकडे सादर केले आहे.

नागपूर आणि नांदेड विभागातील ५ महाविद्यालयांना सन २००२-२००३ ते २००४-२००५ मध्ये जादा प्रदान केलेले रु. ७५.९६ लाख अनुदानाची निर्धारणा केव्हा करण्यात आली. या प्रकरणी कोण जबाबदार आहे. समितीने अशी विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, विद्यमान वर्षाचे अनुदान देत असताना मागील वर्षाचे अतिरिक्त अनुदान वसूल केले जाते. हा अहवाल सन २००४ अखेरचा आहे. सन २००५-२००६ मध्ये ती रक्कम समायोजित करुन त्या वर्षाचा निधी दिला गेला. यावर समितीने अशी विचारणा केली की, आगाऊ रक्कम देण्याची योजना नसताना जादा निधी का दिला ? याची जबाबदारी कोणावर निश्चित केली ? ज्यांना निधी वितरण करण्याचा अधिकार आहे ते जाणुनबुजून जादा निधी वितरित करतात. यावर महालेखापालांनी सांगितले की, सन २००२-२००३ ते सन २००४-२००५ मध्ये अतिरिक्त वेतन अनुदान म्हणून ७५ लाख रुपये दिले गेले. सन २००६ च्या अहवालातील लेखा परिच्छेदाला सन २००७ मध्ये उत्तर दिले गेले. तेव्हाच्या परिस्थितीनुसार वसूली केलेली असल्यामुळे महालेखाकार कार्यालयाकडून कोणतेही अभिप्राय नाहीत.

या संदर्भात विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली की, हे सगळे मुद्दे अनुदान निर्धारणाच्या पद्धतीशी निगडित आहेत. जुलै, २००७ नंतर वेतन पथक सुरु झाले. शिक्षकांचे वेतन बँकेमार्फत अदा होऊ लागले. पूर्वी सरसकट रक्कम संस्थेला दिली जात असे. आता तसा प्रकार होत नाही. आगाऊ ७५ लाख रुपये कोणाच्या चुकीमुळे दिले गेले हे दाखवून देऊन संबंधीतांचे नाव आणि संबंधीतांवर कोणती कारवाई केली याबाबतचा तपशिल समितीला कळविण्याबाबत विभागास निदेश दिले होते. त्यामुळे या

संदर्भातील आपले अभिप्राय समितीला नोंदवून निश्चित निकर्षा प्रत समिती येवू शकत नाही. तथापि समितीचा अहवाल तयार होईपर्यंत देखील विभागाकडून याबाबत माहिती प्राप्त झाली नाही.

अनुदान वितरण करण्याची पद्धती बाबत विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली की, संबंधित महाविद्यालयाला विद्यार्थी संख्येच्या आधारावर निकषाप्रमाणे शिक्षक व शिक्षकेतर पदे किती मंजूर होतात हे ठरविले जाते. त्या महाविद्यालयाकडून त्यांच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाचे वेतन देयक तयार करुन सहसंचालकांकडे सादर केले जाते. त्या टप्प्यावर ते तपासले जात नाही. विद्यार्थी संख्येची तपासणी ऑक्टोबरमध्ये केली जाते. सह संचालकांकडून विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात शिक्षक किती आहेत हे पाहिले जाते. मूळ पद्धत अशी होती. त्रैमासिक अनुदान दिले जात होते. सह संचालकांकडे संबंधित महाविद्यालयाकडून प्रस्ताव आल्यानंतर तदर्थ तत्त्वावर देयक जशास तसे तत्त्वावर स्वीकृत केले जाते. जास्तीचा निधी लेखापरीक्षण अहवाल घेऊन रक्कम समायोजित करुन पुढील हप्ता दिला जात होता. आता ती पद्धत सुधारित करण्यात आली. २००७ मध्ये वेतनपथक स्थापन केले गेल्यानंतर प्रत्येक शिक्षकाचे वेतन तपासून देयक मंजूर करण्याची पद्धत लागू झाली. सह संचालक कार्यालयात आकडेवारी जाते. त्या महाविद्यालयातील एखादा कर्मचारी निवृत्त होणार असेल, त्याची वेतनवाढ असेल किंवा पदोन्नती मिळवली असेल तर तो फरक ताबडतोब मिळत नाही, तेवढा फरक येतो. पुढील वर्षी रक्कम वितरीत करताना समायोजित करुन दिली जाते. पदोन्नती, वेतनवाढ, निवृत्ती आदी नोंदी एका मिनिटात उपलब्ध होतील या दृष्टीने संगणकीकरण झाले पाहिजे ? असे समितीने मत व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, २००७ मध्ये वेतन पथक आल्यानंतर हा विषय संपुष्टात आला आहे. शासनाचे ७५ लाख रुपये वापरले गेले. ज्यांच्याकडून निधी वितरित केला जातो त्यांच्यावर विभागाचे नियंत्रण आहे की नाही ? ज्या व्यक्तीमुळे हे जादा पैसे दिले गेले त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन त्याबाबतची माहिती समितीला कळवावी असे निदेश संबंधितांना समितीने साक्षीच्या वेळी दिले.

शैक्षणिक शुल्क वसुली परिगणना करताना विद्यार्थ्यांची संख्या कमी विचारात घेतल्याप्रकरणी कोण जबाबदार आहे व त्यांचेवर काय कारवाई करण्यात आली? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, जे.एम.पटेल महाविद्यालय, भंडारा, आर.एम.पटेल गर्ल्स कॉलेज, भंडारा व सी.जे.पटेल कला व वाणिज्य महाविद्यालय, तिरोडा येथे संबंधित प्राचार्यामार्फत शैक्षणिक शुल्क जमा करण्याची पद्धत आहे. रु.११.७८ लाख त्यांनी वसूल केले नाहीत. लगेच पुढील वर्षीच्या

त्यांच्या अनुदानातून रु.११.७८ लाख वसूल केले. विद्यार्थ्यांकडून ट्यूशन फी वसूल केली पाहिजे होती ती संबंधित महाविद्यालयांनी वसूल केली नाही.

अनुदानित महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांना दिर्घ कालीन सुट्टीच्या कालावधीत रु.४१ लाख एवढी रक्कम परिवहन भत्त्यापोटी दिली गेली याला कोण जबाबदार आहे व ही रक्कम केव्हा वसूल करण्यात आली ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, १.६२ कोटी रुपये एवढी रक्कम महालेखाकार यांच्या अहवालात नमूद केली आहे. त्यांनी तपशिलवार (Work out) करताना सर्व महाविद्यालयांची संख्या गुणिले ८०० याप्रमाणे रक्कम परिगणित केली आहे. मुंबई विभागामध्ये ४६०८ इतकी संख्या होती. सन २००५-२००६ मध्ये त्यांनी सरसकट ८०० ने गुणले. त्यामुळे १.६२ कोटी रुपये इतकी रक्कम वसूलपात्र दर्शविली. प्रत्यक्ष तपासणी केली असताना ४१ लाख रुपये जादा दिले गेल्याचे दिसून आले. ती सर्व रक्कम वसूल केली आहे.

महालेखाकारांनी असे निदर्शनास आणून दिले की, लेखापरीक्षण काही टप्प्यामध्ये होत असते. ज्यावेळी लेखापरीक्षक एखाद्या ठिकाणी जाऊन पहिल्यांदा तपासणी करतो, त्यावेळी काही बाबीच्या संदर्भात तो तेथे ज्ञापन निर्गमित करतो. यानंतर त्या बाबत उच्च पातळीवर कळवले जाते. यानंतर महालेखाकार यांना कळविले जाते. खुलासा विभागाकडून आधीच दिला गेला असता तर हा सर्व वेळ वाचला असता. ही जबाबदारी संबंधित अधिकाऱ्याची आहे. महालेखाकार यांना योग्य माहिती मिळाली पाहिजे. ४१ लाख रुपयांची रक्कम महालेखापालांच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, याबाबत पुर्वीच माहिती दिली असती तर ही रक्कम कमी झाली असती. आता ही रक्कम वसुल करण्यात आलेली आहे. यावर महालेखाकारांनी समितीला विदित केले की, या उदाहरणावरुन कशा प्रकारे नियंत्रण आहे, हे दिसून येत आहे. देयक न तपासता अदा होत आहेत. या संदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, आता संगणकीकरणाचे काम पूर्ण झालेले आहे. तसेच वेतनपथक तयार केल्यामुळे असे प्रकार घडत नाहीत. ही सर्व प्रकरणे सन २००१ ते सन २००४-२००५ या कालावधीतील आहेत.

समितीने अशी विचारणा केली की, औरंगाबाद व नाशिक येथील दोन महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून अनधिकृतपणे शुल्क वसुली केली त्यांचेवर शासनाने काय कारवाई केली. या शुल्कांची रक्कम विद्यार्थ्यांना परत करण्यात आली आहे काय, तसेच आर.वाय.के.विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, नाशिक यांचेकडून वसूल करावयाची रु.२९.७० लाख फीची रक्कम वसुल करण्यात आली आहे काय, असल्यास, केव्हा ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, सरस्वती भवन कला व वाणिज्य

महाविद्यालय, औरंगाबाद या महाविद्यालयाकडून २० लाख ३ हजार रुपयांची वसुली करण्यात आली आहे. सन २००५-२००६ च्या अनुदान निर्धारणामध्ये वसुली केली आहे. एच.पी.टी. कला, नाशिक या महाविद्यालयाकडून ९ लाख १५ हजार रु. वसूल केले आहेत. तसेच आर.वाय.के.विज्ञान, कनिष्ठ महाविद्यालय, नाशिक यांच्याकडून रु.२९.७० लाख रु.वसुली करावयाची असून याबाबत उपसंचालक, शालेय शिक्षण, नाशिक विभाग यांना कळविण्यात आले आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, हा निधी जर ५ ते ६ वर्षे वापरला असेल तर तो निधी व्याजासह परत केला पाहिजे. सदर रक्कम दुसऱ्याच वर्षी दिली गेली असेल तर व्याजाचा प्रश्न येत नाही ज्यांनी अधिक फी वसूल केली आहे. त्यांच्या उत्पन्नातून ही रक्कम वसूल केली पाहिजे. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००५-२००६ मध्ये हा निधी परत केला आहे.

सन २००१-२००२ ते २००४-२००५ या वर्षात अनुदानांची लेखा परीक्षण विवरणपत्रे प्राप्त झाली नसताना जळगाव विभागातील २० व नांदेड विभागातील ११ महाविद्यालयांना रु.५१.३० कोटींचे अनुदान प्रदान करण्यात आल्याप्रकरणी कोण जबाबदार आहेत व त्यांचेवर काय कारवाई करण्यात आली ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सन २००३-२००४ पासून वेतनेतर अनुदान देणे बंद केले आहे. नियमाप्रमाणे हा आक्षेप योग्य आहे. लेखापरीक्षण अहवाल असल्याशिवाय अनुदान देऊ नये, असा नियम आहे. मात्र काही संस्थांकडे मागणी करुनही त्यांनी लेखापरीक्षण अहवाल दिला नाही. यामध्ये शिक्षकांचे नुकसान होऊ नये याकरिता सहानुभूतीच्या भावनेने अनुदान देण्यात आले होते. मात्र यानंतर ६ महिने अनुदान बंद केले. त्यानंतर लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाले. लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्या नंतर पुढील अनुदान देण्यात आले आहे. या ठिकाणी नियमाप्रमाणे कारवाई केलेली आहे. पुढील लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतरच अनुदान दिलेले आहे. मात्र सुरुवातीला लेखे न घेता अनुदान देण्यात आले. ही चूक झालेली आहे.

यावर महालेखाकारांनी असे मत व्यक्त केले की, लेखापरीक्षण पूर्ण झाल्यानंतर निधी देण्याची तरतूद आहे. मात्र असे प्रकार वारंवार घडत असतील तर आर्थिक शिस्तीचा गंभीर मुद्दा उपस्थित होण्याची शक्यता आहे. संपूर्ण लेखापरीक्षण तपासले तर अशा प्रकारच्या अनेक घटना निदर्शनास येतील. हे प्रकरण केवळ एक उदाहरण आहे. या संदर्भात आम्ही पुन्हा एकदा परिपत्रक काढू असे विभागाकडून सांगण्यात आले.

निवासस्थानाची तरतूद केलेल्या १३ शिक्षकांना रु.७.४९ लाख एवढा घर भाडे भत्ता अदा करणाऱ्या फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे येथील संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर काय कारवाई

करण्यात आली ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी दिनांक ६.१०.२००७ रोजी ९ लाख ३६ हजार रुपयांची वसुली करण्यात आली आहे असे सांगितले.

सन २००४-२००५ मध्ये अतिरिक्त घरभाडेभत्ता कोणत्या कर्मचाऱ्यांना दिलेला आहे, हे समितीला कळविण्यात येईल, असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीला दिले होते. त्याबाबतची माहिती विभागाने अद्यापपर्यंत समितीस सादर केलेली नाही, यावर समितीने नाराजी व्यक्त केली. अशी प्रकरणे समोर आल्यानंतर वसुली केली जाते. तोपर्यंत त्याबाबत काहीही कार्यवाही केली जात नाही. जे कर्मचारी चुकीचे काम करीत आहेत. त्यांच्यावर दंडात्मक कारवाई होत नाही. तोपर्यंत पैसे वापरण्याचे प्रकार सुरुच राहतात. शासकीय निवासस्थानामध्ये राहणाऱ्या शिक्षकांना घरभाडे भत्ता कसा काय दिला जातो हा प्रश्न गंभीर आहे. संबंधितांना केवळ समज न देता त्यांच्यावर कडक कारवाई करावी व केलेल्या कारवाईचा तपशिल समितीस देण्याबाबतचे निदेश समितीने दिले.

कमी नाव नोंदणी असणाऱ्या महाविद्यालयांना अनुदान प्रदान करणेबाबत शासनाचा निर्णय काय आहे व त्यानुसारच अनुदान देण्यात येते काय ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, विद्यार्थी संख्येच्या संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्णय जाहीर केलेला आहे. एखादा अभ्यासक्रम सुरु केल्यानंतर पुढील वर्षी तुकडीमधील विद्यार्थी संख्या कमी झाली तरी देखील कायम शिक्षकांना अतिरिक्त ठरविण्यात येऊ नये, असा स्पष्ट आदेश आहे. त्यामुळे विद्यार्थी कमी झाले तरी देखील शिक्षकांना काढता येत नाही. तसेच जोपर्यंत शिक्षकास शून्य कार्यभार होत नाही तोपर्यंत त्यांना अतिरिक्त ठरविता येत नाही. या ठिकाणी विद्यार्थ्यांची संख्या कमी झाल्यामुळे शिक्षकांची बदली करावयास हवी होती, असे या आक्षेपावरुन दिसून येत आहे.

ज्यावेळी अतिरिक्त विद्यार्थी होतात, त्यावेळी काय केले जाते. महाविद्यालयात एफवायजेसीमध्ये एकेका वर्गामध्ये १०० ते १२० विद्यार्थी असतात. त्यांना मंजुरी दिली जाते काय ? एका तुकडीमध्ये ९० विद्यार्थी मान्य असताना त्यापेक्षा कितीतरी जास्त विद्यार्थ्यांना बसविले जाते ? त्यांना शासन परवानगी देत नाही. ती विद्यापीठाची जबाबदारी असते. असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, मान्य प्रवेश संख्येपेक्षा जास्त अर्ज आले आणि संस्थेला अधिक विद्यार्थी घेऊन शिकवायचे असेल तर विद्यापीठाकडे अगोदर अर्ज करावा लागतो. प्रवेशसंख्येपेक्षा १० टक्के अधिक विद्यार्थी संख्या वाढवून देता येते.

समितीने विभागीय प्रतिनिधीच्या असे निदर्शनास आणून दिले की, १२० पेक्षा जास्त किंवा १५० पर्यंत विद्यार्थी वर्गात असतात. प्रवेश संख्येपेक्षा कितीतरी जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश दिले आहेत. यावर

विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली की, ती विद्यापीठाची जबाबदारी आहे. त्यांना शासनाकडून मान्यता दिली जात नाही. विद्यापीठाला १० टक्क्यापेक्षा जास्त संख्येला मान्यता देण्याचा अधिकार नाही. शासन पहिल्यांदा मंजुरी देते. त्यानंतर संख्या वाढवावयाची असेल तर विद्यापीठ संलग्नीकरण (Affiliation) देते. नियमित शिक्षणक्रमामध्ये वाढीव प्रवेश दिल्यामुळे तुकडी मंजूर केली जाते असे होत नाही. विद्यापीठ कायद्यामुळे पुढील वर्षी तुकडी सुरु करावयाची असेल तर अगोदरच्या वर्षी ऑक्टोबरपर्यंत अर्ज करावा लागतो.

**अभिप्राय व शिफारशी :**

६.२१ समितीसमोर आलेल्या उपरोक्त माहितीवरुन असे दिसून येते की, राज्यामध्ये एकूण ११५० अनुदानित महाविद्यालये आहेत. या महाविद्यालयांना अनुदान देण्याची प्रक्रिया शासनामार्फत होते. राज्यात १७६६ महाविद्यालये विना अनुदानित तत्त्वावर सुरु आहेत. शासनाचे प्रतिवर्षी २२८२ कोटी रुपये महाविद्यालयांना देण्यात येणाऱ्या अनुदानावर खर्च होत आहेत. महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सवलत दिली जाते. मात्र विनाअनुदानित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा मोठा प्रश्न आहे. अनुदानित महाविद्यालयातील उच्च उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांकडून नाममात्र शुल्क घेतले जाते परंतु विना अनुदानित महाविद्यालयातील आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्याला तुलनेने जास्त शैक्षणिक शुल्क भरावे लागते. **अनुदानित महाविद्यालयातील उच्च उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्क घेवून त्या रकमेतून विना अनुदान तत्त्वावरील महाविद्यालयातील आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना सवलत देण्याच्या दृष्टीने शासनाने पहाणी करावी व या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा व त्याबाबतची सविस्तर माहिती तीन महिन्यात समितीला पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

६.२२ सहसंचालक, मुंबई, पुणे व कोल्हापूर या कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्यात आली नाहीत. १०३० पदे मंजूर असून त्यापैकी ५२८ पदे भरली आहेत व ५०२ पदे रिक्त आहेत. शिक्षकीय पदे ९९३ असून त्यापैकी ५१४ पदे भरली आहेत व ४७९ पदे रिक्त आहेत. शिक्षकीय पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेत येतात. २००७ व २००८ मध्ये आयोगाकडे मागणीपत्र सादर केले आहे. त्यांच्याकडून उमेदवार उपलब्ध झालेले नाहीत. शिक्षकीय पदांमध्ये सर्वसाधारणपणे वैद्यकीय शिक्षण व उच्च शिक्षणाच्या शासकीय महाविद्यालयातील रिक्त पदांचे प्रमाण फार मोठे आहे. दोन-तीन वर्षे लोकसेवा आयोगाला मागणीपत्र पाठवून, जाहिरात देऊनही शासकीय महाविद्यालयातील सहयोगी

प्राध्यापक, प्राध्यापकांच्या पदांसाठी उमेदवार न मिळाल्यामुळे रिक्त आहेत. ५०२ रिक्त पदे आहेत, सदर पदावर तासिका पद्धतीने प्राध्यापकांची नियुक्ती करुन वर्ग सुरु ठेवले आहेत.

६.२३ नेट सेट परीक्षा उत्तीर्ण झालेले प्राध्यापक उपलब्ध होत नाहीत. एम.ए, एम.एड उत्तीर्ण झालेले उमेदवार उपलब्ध आहेत, परंतु त्यांना सेवेत घेता येत नाही म्हणून पदे रिक्त आहेत. रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही युद्ध पातळीवर सुरु आहे. लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र सादर केले आहे. उमेदवार उपलब्ध होतील त्यानुसार पदे भरली जातील. अ, ब, क व ड संवर्गातील पदे विचारात घेतली तर २५२४ पदे मंजूर असून त्यापैकी १५९९ पदे भरली आहेत व ९२५ पदे रिक्त आहेत. प्राध्यापकांची पदे वगळता इतर ४०० पदे क आणि ड संवर्गातील पदे असल्यामुळे भरती करण्यास बंदी आहे. अ व ब संवर्गातील पदांचे मागणीपत्र लोकसेवा आयोगाकडे सादर केले आहे. महाविद्यालयातील रिक्त पदे लोकसेवा आयोगाकडे वारंवार मागणी करुनही भरण्यात आलेली नाहीत. या संदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठपुरावा करावा तसेच या प्रकरणी वरीष्ठ पातळीवर त्वरित बैठक आयोजित करुन रिक्त पदे भरण्यास कोणत्या अडचणी आहेत व त्यांचे कसे निराकरण करता येईल याबाबत ठोस निर्णय घेण्यात यावा व याबाबतची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी.

६.२४ सन २००२-२००३ ते सन २००४-२००५ मध्ये अतिरिक्त वेतन अनुदान म्हणून ७५ लाख रुपये दिले गेले. सन २००६ च्या अहवालातील लेखा परिच्छेदाला सन २००७ मध्ये उत्तर दिले गेले. तेव्हाच्या परिस्थितीनुसार वसूली केलेली असल्यामुळे महालेखाकार कार्यालयाकडून कोणतेही अभिप्राय नाहीत. ही बाब अनुदान निर्धारणाच्या पद्धतीशी निगडित आहेत. जुलै, २००७ नंतर वेतन पथक सुरु झाले. शिक्षकांचे वेतन बँकेमार्फत अदा होऊ लागले. पूर्वी सरसकट रक्कम संस्थेला दिली जात असे. आता तसा प्रकार होत नाही. **आगाऊ ७५ लाख रुपये कोणाच्या चुकीमुळे दिले गेले, त्या संबंधीतांचे नाव आणि त्यांच्यावर कोणती कारवाई केली याबाबतचा तपशिल समितीला कळविण्याबाबत विभागास निदेश देऊनही अद्यापपर्यंत विभागाकडून याबाबत माहिती प्राप्त झाली नाही. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते व आगाऊ ७५ लाख रुपयाचे अनुदान ज्यांच्या चुकीमुळे दिले गेले त्या संबंधिताविरुद्ध केलेल्या कारवाईची माहिती समितीला त्वरित देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

६.२५ सन १९७९ च्या शासन निर्णयात जी फी शासन किंवा विद्यापीठाने अधिकृत केलेली नाही ती फी विद्यार्थ्यांकडून वसूल करु नये असे नमूद केले असताना देखील सन २००१-२००२ ते सन २००४-२००५ या कालावधीत नाशिक व औरंगाबाद येथील महाविद्यालयांनी विद्यापीठ क्षेत्र विकास फी, प्रयोग शाळा विकास फी, केंद्र फी, मोडतोड फी आणि संगणक फी अशा स्वरुपाच्या फी अनधिकृतरित्या

विद्यार्थ्यांकडून वसूल केल्या होत्या. ज्या महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून अनधिकृतपणे शुल्क वसुली केली त्यांचेवर शासनाने कारवाई केली असून या शुल्कांची काही रक्कम विद्यार्थ्यांना परत करण्यात आली आहे. सरस्वती भवन कला व वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद या महाविद्यालयाकडून २० लाख ३ हजार रुपयांची वसुली करण्यात आली आहे. सन २००५-२००६ च्या अनुदान निर्धारणामध्ये वसुली केली आहे. एच.पी.टी. कला, नाशिक या महाविद्यालयाकडून ९ लाख १५ हजार रु. वसूल केले आहेत. तसेच **आर.वाय.के.विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, नाशिक यांच्याकडून रु.२९.७० लाख रु.वसुली करावयाची असून याबाबत उपसंचालक, शालेय शिक्षण, नाशिक विभाग यांना कळविण्यात आले आहे.** हा निधी या महाविद्यालयांची विद्यार्थ्यांकडून अनधिकृतपुणे वसूल केलेला असल्याने सदर रक्कम विद्यार्थ्यांना प्रचलित असलेल्या व्याजासह परत करावी, अशी समितीची शिफारस आहे. **सदर रक्कम दुसऱ्याच वर्षी दिली गेली असेल तर व्याजाचा प्रश्न येत नाही मात्र हा निधी जर ५ ते ६ वर्षे वापरला असेल तर तो निधी व्याजासह परत घेण्यात यावा व ज्यांनी अधिक फी वसूल केली आहे त्यांच्या पगारातून ही रक्कम वसूल करण्यात यावी, अशीही समितीची शिफारस आहे.**

६.२६ सन २००१-२००२ ते २००४-२००५ या वर्षात अनुदानांची लेखा परीक्षण विवरणपत्रे प्राप्त झाली नसताना जळगाव विभागातील २० व नांदेड विभागातील ११ महाविद्यालयांना रु.५१.३० कोटींचे अनुदान प्रदान करण्यात आले आहे. सन २००३-२००४ पासून वेतनेतर अनुदान देणे बंद केले आहे. नियमाप्रमाणे हा आक्षेप योग्य आहे. लेखापरीक्षण अहवाल असल्याशिवाय अनुदान देऊ नये, असा नियम आहे. मात्र काही संस्थांकडे मागणी करुनही त्यांनी लेखापरीक्षण अहवाल दिला नाही. यामध्ये शिक्षकांचे नुकसान होऊ नये. याकरिता सहानुभूतीच्या भावनेने अनुदान देण्यात आले होते. मात्र यानंतर ६ महिने अनुदान बंद केले. त्यानंतर लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाले. लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील अनुदान देण्यात आले आहे. या ठिकाणी नियमाप्रमाणे कारवाई केलेली आहे. पुढील लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतरच अनुदान दिलेले आहे. मात्र सुरुवातीला लेखे न घेता अनुदान देण्यात आले. ही चूक झालेली आहे. **लेखापरीक्षण पूर्ण झाल्यानंतर निधी देण्याची तरतूद आहे. मात्र असे प्रकार वारंवार घडत आहेत. त्यामुळे आर्थिक शिस्तीचा मुद्दा उपस्थित झाला आहे. संपूर्ण लेखापरीक्षण तपासले तर अशा प्रकारच्या अनेक घटना निदर्शनास येतील. हे प्रकरण केवळ एक उदाहरण आहे. त्यामुळे या प्रकरणी ज्यांनी चूक केली आहे. त्या संबंधितांची चौकशी करुन चौकशीत दोषी आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी व त्याबाबतची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

६.२७ निवासस्थानाची तरतूद केलेल्या १३ शिक्षकांना रु.७.४९ लाख एवढा घरभाडे भत्ता अदा करणाऱ्या फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे येथील संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करण्यात आली नसून दिनांक ६.१०.२००७ रोजी ९ लाख ३६ हजार रुपयांची वसुली करण्यात आली आहे. सन २००४-२००५ मध्ये अतिरिक्त घरभाडेभत्ता कोणत्या कर्मचाऱ्याने दिलेला आहे याची माहिती समितीला कळविण्यात येईल, असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीला दिले होते. सदर माहिती विभागाने अद्यापपर्यंत समितीस सादर केलेली नाही, यावर समितीने नाराजी व्यक्त करताना असे नमूद केले की, अशी प्रकरणे समितीसमोर आल्यानंतर वसुली केली जाते. तोपर्यंत त्याबाबत काहीही कार्यवाही केली जात नाही. **जे कर्मचारी बेजबाबदारपणे काम करीत आहेत त्यांच्यावर दंडात्मक कारवाई होत नाही तोपर्यंत पैसे वापरण्याचे प्रकार सुरुच राहतात. शासकीय निवासस्थानामध्ये राहणाऱ्या शिक्षकांना घरभाडे भत्ता दिला जातो ही बाब गंभीर आहे. त्यामुळे या प्रकरणी संबंधितांना केवळ समज न देता त्यांच्यावर कडक शिस्तभंगाची कारवाई करावी व केलेल्या कारवाईचा तपशिल समितीस ३ महिन्यात देण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

# उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## ७. डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रविद्याविषयक विद्यापीठाची कार्ये

७.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालामधील **परिच्छेद क्र.३.६ "डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रविद्याविषयक विद्यापीठाची कार्ये"** या संदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले.

७.२ विद्यापीठाचे २००१-०२ ते २००५-०६ या कालावधीतील जमा आणि खर्च खाली तपशीलवार दिले आहेत.

**(रु.लाखात)**

| वर्ष | जमा | | | | खर्च | |
|---|---|---|---|---|---|---|
| | राज्य सरकार अनुदान | | केंद्र शासन अनुदान | स्वतःची जमा | महसूली | भांडवली |
| | आवर्ती | अनावर्ती | | | | |
| २००१-२००२ | १८७.६६ | ------ | ३३.०० | १६८.०८ | २९०.६९ | २५८.७७ |
| २००२-२००३ | १५०.२० | ५६०.८२ | ---- | १५४.१८ | ३२०.७० | १७७.९१ |
| २००३-२००४ | १३९.९२ | ३५३.०० | १७.५० | २०५.२४ | ३१६.२७ | ५१२.०४ |
| २००४-२००५ | १५८.८२ | ९४०.०० | २३०.०० | २०३.४९ | ३५७.८१ | १००७.५६ |
| २००५-२००६ | २०२.०८ | ---- | ३००.०० | ----- | ---- | ----- |

टीप : २००५-२००६ ची आकडेवारी त्या वर्षाचे लेखे जुलै, २००६ पर्यंत पूर्ण न झाल्याने उपलब्ध नाही.

**आवर्ती अनुदाने :**

**७.३** विद्यापीठातील कर्मचाऱ्यांचा पगार व कार्यालयीन खर्च भागविण्यासाठी राज्य शासन वार्षिक आवर्ती अनुदाने देते. विद्यापीठाची स्वतःची मिळकत समायोजित केल्यानंतर अनुदानाची रक्कम ठरविली जाते. शासनाकडून अनुदाने चार हप्त्यात वर्षाच्या अंदाजीत आवर्ती खर्च लक्षात घेऊन दिली जातात. पहिले तीन हप्ते अग्रीम अनुदान म्हणून द्यावयाचे असतात आणि शेवटचा हप्ता अगोदरच्या वर्षातील खर्चाचे लेखापरीक्षा झालेले विवरणपत्र मिळाल्यांनतर द्यावयाचा असतो. शेवटचा हप्ता देताना अगोदरच्या वर्षामध्ये जर काही जादा अनुदान दिले गेले असल्यास ते समायोजित करावयाचे असते. परंतु असे लक्षात आले की वरील कार्यपद्धतीस चिकटून न राहता अनुदाने देण्यात आली होती. २००१-२००२ ते २००४-२००५ या वर्षातील विद्यापीठाचे लेखे खर्चापेक्षा जमा जास्त दाखवत असल्याचे दिसून आले. विद्यापीठाच्या ३१ मार्च, २००५ अखेरच्या लेख्यामध्ये रू. ५.०३ कोटी इतकी रक्कम जादा मिळकत

म्हणून दाखविण्यात आली. ह्यावरून असे दिसून येते की, विद्यापीठास त्यांच्या गरजेपेक्षा जादा अनुदान देण्यात आले होते.

**ज्ञापन :**

**७.४** विद्यापीठाच्या २००१-२००२ ते २००५-२००६ या कालावधीतील जमा व खर्च याचा तपशील तपासला असता सन २००५-२००६ च्या ताळेबंद व जमा खर्चानुसार रुपये ९.३६ कोटी इतकी (अनुदान व स्वत:ची मिळकत) जमा झाली असून रुपये ३.६४ कोटी इतका खर्च झालेला असून रुपये ५.७२ कोटी इतकी रक्कम खर्चापेक्षा जास्त जमा झालेली आहे व पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार देय वेतन फरकाची रक्कम देण्यासाठी व अन्य उद्दिष्टांसाठी त्वरीत खर्च होऊ शकणारी अशी एकूण रु.२.४१ कोटी इतकी रक्कम शिलकेत ठेवून उर्वरित रु.३.३१ कोटी ही रक्कम २००७-२००८ पासूनच्या अनुदानातून टप्प्याटप्प्याने समायोजित करण्यात येईल.

**लेखे तयार करणे :**

**७.५** कायद्याच्या कलम ७० नुसार विद्यापीठाचे वार्षिक लेखे शासनास दर वर्षी १५ ऑगस्ट पूर्वी सादर करावयाचे होते. परंतु असे लक्षात आले की, २००१-२००२ ते २००४-२००५ या वर्षाचे लेखे सादर करावयाच्या नियत दिनांकानंतर सहा ते वीस महिने विलंबाने तयार करण्यात आले. जुलै २००६ अखेर पर्यंत एकही लेखा शासनास सादर करण्यात आला नव्हता. कुलसचिवांनी असे म्हटले आहे (जुलै २००६) की अर्थविषय अधिकाऱ्याचे पद १९९८ ते डिसेंबर २००४ या कालावधीत रिकामे होते त्यामुळे प्रभारी अधिकारी लेखे वेळेत तयार करु शकला नाही. असे लेखी माहितीत नमूद करण्यात आले असले तरी हे उत्तर असे दर्शविते की, विद्यापीठाने विद्यापीठ कायद्यातील लेखे तयार करणे व ते शासनास सादर करणे याबाबतीतील तरतूदींचा भंग केला आहे. तसेच लेखे वेळेत तयार होत नसल्याने हे स्पष्ट होत नव्हते की, खर्च कसे नियंत्रित केले जात होते आणि गरजा कशा निर्धारित केल्या जात होत्या.

**ज्ञापन :**

**७.५** समितीला पुरविलेल्या लेखी माहिती लेखे तयार करण्याच्या कामात काहीसा उशीर झाला आहे ही वस्तुस्थिती आहे असे मान्य केले आहे. तथापि खर्चावर योग्य ते नियंत्रण ठेवण्यात येत होते. २००१-२००२ ते २००४-२००५ या वर्षीचे लेखे तंत्रशिक्षण संचालनालय यांना दिनांक १०/१०/२००६ रोजी सादर करण्यात आले आहेत. तसेच यापुढे सदर लेखे वेळेत सादर होतील याची दक्षता घेण्यात

येईल. वित्त अधिकाऱ्याचे पद भरण्याबद्दल वारंवार स्मरणपत्रे पाठविण्यात आलेली होती तथापि ते पद भरले न गेल्यामुळे लेखे वेळेत तयार होऊ शकले नाहीत.

सदर वित्त अधिकाऱ्याचे पद भरले गेले नव्हते तरीही विद्यापीठाने अर्थ विषयक व्यवहाराची संपूर्ण काळजी घेऊन जमा व खर्चाचा हिशेब ठेवला होता व त्यातून खर्चावर योग्य ते नियंत्रण ठेवले होते.

सर्व विभाग प्रमुखांची नियमित बैठक घेऊन खरेदी करायच्या वस्तूंचा फार बारकाईने आढावा घेतला जात होता. अत्यंत आवश्यक अशाच वस्तूंची खरेदी केली जात होती. असे करत असता विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणावर कोणताही विपरीत परिणाम होत नाही तसेच शिक्षणाचा आवश्यक तो दर्जा राखला जातो. याची पुरेशी काळजी घेतली गेली आहे. अशा प्रकारे खर्चावर नियंत्रण ठेवले होते.

सन २००५-२००६ चे वार्षिक हिशोब दिनांक २२/०६/२००७ रोजी शासनाकडे सादर करण्यात आले आहेत. २००६-२००७ चे हिशोब दिनांक २९/१२/२००७ रोजी सादर केले आहेत.

**अभ्यासक्रमांची अधिस्विकृतता**

**७.६** विद्यापीठाला त्याच्या सर्व अभ्यासक्रमासाठी ऑल इंडिया कौन्सील फॉर टेक्निकल एज्युकेशन या केंद्र शासनाच्या सांविधिनिक संस्थेकडून अधिस्विकृतता मिळविणे आवश्यक होते. सात पदवी पूर्व अभ्यासक्रमापैकी चार अभ्यास क्रम AICTE कडून मे, २००३ मध्ये तीन वर्षाकरीता अधिस्विकृत झाले होते. त्याचप्रमाणे आठ पदविका अभ्यासक्रमापैकी पाच अभ्यासक्रम फेब्रुवारी, २००५ मध्ये तीन वर्षाकरीता अधिस्वीकृत झाले होते. उर्वरित पूर्व पदवी आणि पदविका अभ्यासक्रम AICTE विहित मानकांपेक्षा (१५:१) उच्च शिष्य गुरु गुणोत्तर (२९:१), अधिवक्त्यांची कमी अर्हता व अनुभव आणि जागा आणि साहित्य वस्तूंचा अभाव यामुळे अधिस्विकृत केले गेले नाही. असे ही लक्षात आले की, विद्यापीठाकडून पदव्युत्तर अभ्यासक्रम आणि अत्युच्च पदवी अभ्यासक्रम अधिस्विकृत करुन घेण्यासाठी प्रयत्न झाले नाहीत. या बाबीविषयी कुलसचिवाकडे विद्यापीठाकडून पदव्युत्तर आणि अत्युच्च अभ्यासक्रम अधिस्विकृत करुन घेण्यासाठी केलेल्या प्रयत्नाविषयी उत्तर नव्हते.

**ज्ञापन :**

७.७ विद्यापीठात शिकवत असलेल्या पदवीपूर्व, पदविका तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रम या सर्वांना AICTE ची मान्यता आहे. संगणक व माहिती तंत्रज्ञान हे दोन अभ्यासक्रम वगळता अन्य सर्व पदवी अभ्यासक्रमांना AICTE कडून अधिस्वीकृतता (मानांकन) मिळाले आहे. वरील दोन अभ्यासक्रमांच्या मान्यतेसाठी पुनश्च पाठपुरावा करण्यात येत आहे. त्यासाठी पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

संबंधित विभागात प्रशिक्षणाकरिता आवश्यक तो कर्मचारी वर्ग उपलब्ध करण्यात आला असून संबंधित प्रयोगशाळेत पुरेसे साहित्य व अन्य गरजा पूर्ण करण्यात आल्या आहेत. अशा प्रकारे प्राथमिक तयारी पूर्ण झाली असून मध्यवर्ती शासनाकडे अधिस्वीकृततेसाठी अर्ज करणेचे काम हाती घेतले आहे.

**नोकऱ्या देणे**

७.८ विद्यापीठाने दिलेल्या तंत्रविषयक शिक्षणाची गुणवत्ता अजमावण्यासाठी विद्यार्थ्यांनी त्यांचा अभ्यास पूर्ण केल्यानंतर त्यांनी मिळविलेल्या नोकऱ्यांचे प्रमाण हे अनेक मानकांपैकी एक मानक होते. २००३-२००४ ते २००५-२००६ या कालावधीत अंदाजे २०१ विद्यार्थी म्हणजे २० टक्के विद्यार्थी विद्यापीठ क्षेत्र आणि क्षेत्राबाहेरील मुलाखतीद्वारे नोकऱ्या मिळविण्यात यशस्वी झाले. यापैकी २६ विद्यार्थी लागून असलेल्या औद्योगिक क्षेत्रामध्ये नोकरीस लागले.

याप्रमाणे नोकऱ्या निर्माण करण्याकरीता उद्योगाशी परिणामकारकपणे संपर्क साधण्याचे उद्दीष्ट पूर्णत: साध्य झाले नव्हते.

**ज्ञापन :**

**७.९** विद्यापीठाने उद्योगक्षेत्राशी संपर्क साधून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांची विद्यापीठात शिकत असतानाच नोकरीसाठी निवड व्हावी यासाठी Training and Placement Officer ची दिनांक १४/१२/२००५ पासून नेमणूक करण्यात आलेली असून त्यांनी उद्योगक्षेत्राशी परिणामकारकरित्या संपर्क साधला आहे व आतापर्यंत प्रतीवर्षी खालीलप्रमाणे विद्यार्थ्यांची नोकरीकरीता निवड झालेली आहे.

| वर्ष | उत्तीर्ण विद्यार्थ्यांची संख्या (पदवी) | नोकरीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|
| २००५-२००६ | ३६२ | ७९ |
| २००६-२००७ | ३६५ | १८७ |

विद्यापीठाच्या परिसरात असलेल्या उद्योगक्षेत्राच्या गरजेनुसार तंत्रज्ञान अभ्यासक्रमात सुधारणा करुन आवश्यक ते तंत्रज्ञान विद्यार्थ्यांना अवगत करण्यात येत आहे. असे केल्याने विद्यार्थ्यांची नोकरीसाठी होणाऱ्या निवडीचे प्रमाणही वाढण्यास मदत होत आहे.

**<u>रिकामी पदे</u>**

७.१० कर्मचारी वर्गाच्या वेगवेगळ्या संवर्गात २६ ते ६४ टक्के या प्रमाणांत खाली दर्शविल्याप्रमाणे रिकामी पदे होती.

| | **अधिकारी/कर्मचारी** | **शासनाकडून मंजूर झालेली पदे** | **भरलेली पदे** | **रिक्त पदांची टक्केवारी** |
|---|---|---|---|---|
| पदवी अभ्यासक्रम | प्राध्यापक | ११ | ४ | ६४ |
| | सहा.प्राध्यापक | २३ | १७ | २६ |
| | अधिव्याखाता | ६१ | ४३ | ३० |
| | बिगर-अध्यापन | १२० | ७९ | ३४ |
| पदविका अभ्यासक्रम | अध्यापन | ४७ | ३२ | ३२ |
| | बिगर अध्यापन | ५९ | ३९ | ३४ |

विद्युत अभियांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंचार अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी आणि माहिती तंत्रज्ञान या चार विभागामध्ये १९९५ मध्ये पहिले तीन अभ्यासक्रम आणि २००१ मध्ये माहिती तंत्रज्ञान अभ्यासक्रम सुरु झाल्यापासून कोणत्याही अध्यापकाची भरती करण्यात आली नव्हती. हे अभ्यासक्रम सुरु चालविण्यासाठी विद्यापीठाने अधिव्याख्यात्यांची नेमणूक केली होती.

कुलसचिवाने या रिकाम्या पदांकरीता विद्यापीठाची जागा दूर असणे ह्या घटकांस जबाबदार धरले.

हे उत्तर समर्थनीय नव्हते कारण नेहमीचे अर्हताप्राप्त अध्यापन अधिव्याख्याता मिळणे ही AICTE कडून विद्यापीठाने चालवलेल्या अभ्यासक्रमांना अधिस्विकृतता मिळण्यासाठी अनेक आवश्यक बाबींपैकी एक बाब आहे. शिवाय नेहमीचे अर्हताप्राप्त अधिव्याख्याता न मिळणे ही बाब शिक्षणाच्या गुणवत्तेवर वाईट परिणाम सुद्धा करु शकते. तसेच अधिव्याख्यात्यांचा तुटवडा असूनसुद्धा विद्यापीठाने अध्यापकांना उच्च शिक्षणाकरीता इतर ठिकाणी म्हटल्याप्रमाणे पाठविणे चालू ठेवले होते.

**ज्ञापन :**

**७.११** विद्यापीठाच्या वेगवेगळ्या अध्यापक संवर्गातील पदे भरण्याबाबतची कार्यवाही यापूर्वीच हाती घेण्यात आली असून नेमणूकीचे आदेश दिलेल्यापैकी बहुसंख्य पदांवर उमेदवार प्रत्यक्ष हजर झाले आहेत, बिगर अध्यापक पदांपैकी जी पदे रिक्त आहेत अशी सर्व पदे भरण्यासंबंधी कार्यवाही सुरु आहे.

A.I.C.T.E. च्या मानकानुसार अर्हताप्राप्त अध्यापक अधिव्याख्याता मिळविण्याचे सतत प्रयत्न सुरु आहेत. उपलब्ध शिक्षकांना ते शिकवत असलेल्या अभ्यासक्रमाचे अद्ययावत तंत्रज्ञान अवगत असणे ही एक आवश्यक बाब समजून त्यांना वेळोवेळी उच्च शिक्षणाकरिता पाठविले जाते.

त्याबाबतची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| | **कर्मचारी वर्ग** | **शासनाकडून मंजूर झालेली पदे** | **भरलेली पदे** | **रिक्त पदे** |
|---|---|---|---|---|
| पदवी अभ्यासक्रम | प्राध्यापक | ११ | ०५ | ०६ |
| | सहा.प्राध्यापक | २३ | २१ | ०२ |
| | अधिव्याख्याता | ६१ | ५१ | १० |
| | बिगर-अध्यापन | १२० | ७५ | ४५ |
| पदविका अभ्यासक्रम | अध्यापन | ५६ | ३३ | २३ |
| | बिगर अध्यापन | ६० | ३२ | २८ |

सध्या विद्यापीठात कार्यरत असणाऱ्या ६९ शिक्षक वर्गापैकी ०८ शिक्षक उच्च शिक्षणासाठी प्रतिनियुक्तीने पाठविण्यात आले आहेत. यापैकी पाच शिक्षकांचा परसेवा काल पूर्ण झाला असून ते लवकरच विद्यापीठ सेवेत रुजु होतील.

उच्च प्रशासकीय पदे भरण्यात बऱ्याच अडचणी येत आहेत. कार्यकारी मंडळाकरिता नेमावयाच्या सभासदांची नावे लवकरच अंतिम होतील. बिंदू नामावली प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. रिक्त पदे भरण्यात कोर्ट केसेसमुळेही अडथळे आले आहेत. योग्य प्रशिक्षित व अनुभवी उमेदवारांचा प्रतिसाद अल्प असल्यामुळे रिक्त पदे भरली गेली नाहीत. असे असले तरी यातून मार्ग शोधून प्रशिक्षकांचा तुटवडा कमी करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

**वार्षिक अहवाल**

७.१२ विद्यापीठ कायद्यामध्ये विहित केल्याप्रमाणे विद्यापीठाच्या संपादणूकीवर एक अहवाल तयार करुन प्रत्येक वर्षी १५ मे ला शासनास सादर करावयाचा असतो असे दिसून आले आहे की, (मे २००६) विद्यापीठाची सुरुवात झाल्यापासून अशा तऱ्हेचा अहवाल तयार करण्यात आला नव्हता. लेखापरीक्षणाने ही बाब लक्षांत आणून दिल्यानंतर वर्ष २००५-२००६ करीता एक वार्षिक अहवाल तयार करण्यात आला परंतु तो शासनास सादर करण्यात आला नव्हता.

**ज्ञापन :**

**७.१३** विद्यापीठ कायद्यामध्ये विहीत केल्याप्रमाणे सन २००५ व २००६ चे दोन्ही अहवाल आता शासनाला सादर करण्यात आले आहेत.

सन २००५-२००६ चा अहवाल दिनांक ०३/०२/२००७ व २००६-२००७ चा अहवाल दिनांक ०१/०९/२००७ रोजी सादर करण्यात आला आहे.

वार्षिक अहवाल तयार करण्यात गतकाळात उशीर झाला हे मान्य आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांची पदे न भरली गेल्याने या कामात दिरंगाई झाली आहे. वित्त अधिकारी पदावर नियमित नेमणूक व्हावी म्हणून सतत प्रयत्न सुरु आहेत. अशी परिस्थिती असली तरी आता यापुढे वार्षिक अहवाल तयार करण्यात दिरंगाई होणार नाही याची योग्य ती दक्षता घेतली जात आहे.

**उपसंहार-**

**७.१४** वार्षिक लेखे तयार करण्यातील विलंब, मालमत्त्यावरील घसाऱ्याची तरतूद न करणे आणि प्रत्येक वर्षी खर्च न केलेली मोठ्या प्रमाणातील शिल्लक पडून रहाणे या बाबी निकृष्ट आर्थिक व्यवस्थापन दर्शवितात. नोकऱ्यांच्या संधी कमी उपलब्ध करुन देणे ही बाब उद्योगांशी संपर्काचा अभाव असल्याचे दाखवून देते. तंत्रज्ञान हस्तांतरीत करण्यासाठी सेवा विस्तार केंद्रे स्थापण्यात आली नव्हती. AICTE कडून देण्यात आलेले अनुदान वापरण्यात आलेले दिसून आले नाही किंवा त्याचा अत्यंत उशीरा वापर करण्यात आला होता. विद्यापीठ व प्रशासकीय इमारतीचे बांधकाम डिसेंबर १९९९ मध्ये सुरु झाले तथापि, पूर्ण झाले नव्हते. विद्यापीठ निवासी असूनसुद्धा वसतिगृहांची उपलब्धता गरजेनुसार नव्हती. परिणामत: वसतिगृहांमध्ये अतिगर्दी होत होती. अध्यापक कर्मचारी वर्गाची मोठ्या प्रमाणात कमतरता असूनसुद्धा विद्यापीठाने आपला कर्मचारी वर्ग उच्च शिक्षणांसाठी परसेवेवर पाठविणे चालूच ठेवले होते.

**ज्ञापन :**

**७.१५** प्रस्तुत परिच्छेदामध्ये नमूद करण्यात आलेल्या उणिवांबाबत सविस्तर माहिती संदर्भ क्रमांकानुसार देण्यात आली आहे. दर्शविण्यात आलेल्या त्रुटींपैकी त्या दूर करण्याबाबत योग्य ती काळजी घेण्यात येत आहे. तसेच यापुढील काळात अशा प्रकारच्या त्रुटी रहाणार नाहीत याची अधिक दक्षता घेण्यात येईल. त्याप्रमाणे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना सूचना दिल्या आहेत.

अधिकच्या वसतिगृह बांधकामाकरीता विद्यापीठाने आवश्यक तो प्रस्ताव महाराष्ट्र शासन तसेच विद्यापीठ अनुदान मंडळ (UGC) यांचेकडे सादर केला आहे.

**शिफारशी -**

**७.१६** विद्यापीठाने खालील बाबींची खातर जमा करुन घेतली पाहिजे.

- वार्षिक लेखे वेळेत तयार करुन शासनास सादर करणे.

- ➢ आपल्या सर्व अभ्यासक्रमासाठी अधिस्विकृतता मिळविण्यासाठी AICTE च्या सर्व अटी पूर्ण करणे.
- ➢ तंत्रज्ञान हस्तांतरीत करण्यासाठी सेवा विस्तार केंद्रांची गतीने स्थापना करणे.
- ➢ इमारतींचे बांधकामात आणि पायाभूत सुविधा पुरविण्यात गती आणणे.
- ➢ विद्याशाखेच्या सदस्यांना उच्च शिक्षणांकरीता परसेवेवर विद्याविषयक कार्यक्रमांत अडथळा न येता पाठविणे.
- ➢ वेगवेगळ्या चळवळीचे परिणामकारक संनियंत्रण करण्यासाठी सांविधिक समित्यांच्या नियमित बैठका घेणे.

ही बाब शासनाच्या प्रधान सचिवास ऑगस्ट २००६ मध्ये कळविण्यात आली. उत्तर अद्याप नाही (ऑक्टोबर २००६).

**ज्ञापन :**

- ❖ वार्षिक लेखे वेळेत तयार करण्यात येतील व शासनास सादर करण्यात येतील.
- ❖ AICTE च्या सर्व अटी पूर्ण करुन अभ्यासक्रमासाठी अधिस्विकृतता मिळवण्यात येईल.
- ❖ सेवा केंद्राची स्थापना लवकरच करण्यात येईल. विविध स्तरावर प्रयत्न करण्यात येत आहेत आणि इमारतीचे बांधकाम व पायाभूत सुविधा पुरवण्यात गती आणण्यात येईल.
- ❖ विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात अडथळा येणार नाही अशा प्रकारे विद्याशाखेच्या सदस्यांना उच्च शिक्षणाकरिता परसेवेवर पाठविण्यात येईल.
- ❖ वेगवेगळ्या चळवळीचे परिणामकारक संनियंत्रण करण्यासाठी नियमित बैठका घेतल्या जातील.

**साक्ष :**

७.१७ उपरोक्त लेखी माहितीच्या संदर्भात समितीने दिनांक ९ फेब्रुवारी व १ मार्च, २०११ रोजी उच्च व तंत्रशिक्षण सचिवांची साक्ष घेतली व साक्षीच्यावेळी सचिवांनी समितीस अशी माहिती दिली की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रविद्याविषयक विद्यापीठाची स्थापना १९८९ मध्ये करण्यात आली. १९८९ च्या कायद्यांतर्गत अस्तित्वात असलेल्या तंत्रनिकेतनाचा दर्जा वाढवून तंत्रशिक्षणाच्या सोयी-सुविधा पुरविण्यासाठी आणि प्रदेशाचा आर्थिक विकास वाढविण्यासाठी राज्य सरकारने उक्त विद्यापीठाची स्थापना केली. २० विद्यार्थ्यांच्या पेट्रोकेमिकल इंजिनिअरींग ब्रँचद्वारे हे विद्यापीठ सुरु झाले. विद्यापीठामध्ये सध्या एम.टेक. आणि पी.एचडी अभ्यासक्रम सुरु आहेत. पदवीसाठी (डिग्रीसाठी) २६०० आणि पदविकेसाठी (डिप्लोमासाठी) २७०० विद्यार्थी आहेत. पदविकेसाठी (डिप्लोमासाठी) वेगळी संस्था

(इन्स्टीट्युट) आहे. विद्यापीठाकडे ४७६ एकर जमीन आहे. स्थापनेच्या वेळी एका अभ्यासक्रमाने सुरु झालेल्या विद्यापीठात सध्या ८ पदविका आणि ६ पदव्युत्तर अभ्यासक्रम अशाप्रकारे १४ अभ्यासक्रम सुरु आहेत. शिवाय पाणी गुणात्मकता व्यवस्थापनाचा अभ्यासक्रम चालविला जात आहे. सध्या सिंगल कॅम्पस विद्यापीठ आहे. शासनाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क निश्चित केले असून, त्यानुसार विद्यार्थ्यांकडून वार्षिक एकूण २४ हजार रुपये शुल्क घेतले जाते. त्यामध्ये १५ हजार रुपये शिकवणी शुल्क, ४ हजार रुपये दुरुस्ती निधी आणि ५ हजार रुपये विकास निधी अंतर्भूत आहे. विद्यापीठातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन महाराष्ट्र सरकारकडून अदा केले जाते. विद्यापीठामध्ये ९५ शिक्षकांची पदे असून, १२५ पदे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची आहेत. शिक्षकांची ६४ पदे, म्हणजेच जवळजवळ ७० टक्के पदे भरलेली आहेत. विद्यापीठाला १०० टक्के निधी राज्य सरकारकडून मिळत आहे. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय असले तरी अभ्यासक्रमांसाठी ए.आय.सी.टी.ई. ची परवानगी घ्यावी लागते. ११ व्या पंचवार्षिक योजनेत यु.जी.एस.सी. ने ९.७६ कोटी रुपयांचा निधी वेगवेगळ्या योजनांसाठी दिला होता. विद्यापीठांतील काही पदांवरील कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी यु.जी.एस.सी. २०१२ पर्यंत निधी देणार आहे. २०१२ नंतर सदरहू निधी अदा करण्याबाबतचा प्रस्ताव (विभागाने) शासनाकडे सादर केला आहे. विद्यापीठामध्ये सी.ई.टी.च्या कॉमन प्रवेश पद्धतीनुसार प्रवेश प्रक्रिया पार पाडली जाते. रायगड, रत्नागिरी, ठाणे व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी १५ टक्के जागा राखीव असून, उर्वरित ८५ टक्के जागा इतर जिल्ह्यांतून भरल्या जातात. सर्व प्रवेश गुणवत्तेनुसार होतात. विद्यापीठाच्या माध्यमातून जाहिरात देऊन, प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली जाते.

७.१८ रायगड, रत्नागिरी, ठाणे व सिंधुदुर्ग या चार जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांसाठी १५ टक्के जागा राखीव ठेवल्या जातात. त्यांना नियमित प्रवेश प्रक्रियेतून प्रवेश मिळाला नाही तर, पुन्हा १५ टक्के कोट्यातून प्रवेशासाठी अर्ज करावा लागतो. समितीचे मत असे आहे की, विद्यार्थी जर या चार जिल्ह्यातील असेल तर त्याला नव्याने अर्ज करावयास लागू नये. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, कोकणातील चार जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांसाठी १५ टक्के जागा राखीव ठेवल्या आहेत त्यांचे प्रवेश संचालक, तंत्रशिक्षण यांच्या माध्यमातूनच होऊ शकतात. याबाबत विद्यापीठाची संबंधित विभागाबरोबर चर्चा सुद्धा झाली आहे. सन २०११-२०१२ या वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये हे होऊ शकेल. विद्यार्थी जर उक्त चार जिल्ह्यांपैकी कोणत्याही जिल्ह्यातील असल्यास त्याला थेट १५ टक्के कोट्यातून प्रवेश मिळेल. सन २०११-१२ पासून ही पद्धत अंमलात आणणार आहोत. हे विद्यापीठ कोकणातील

विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्यासाठी स्थापन झाले आहे. १५ टक्के जागा कोकणातील विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवल्या जात असल्याचे विभागाने सांगितले.

७.१८ महालेखापरीक्षकांचे असे मत आहे की, विद्यापीठाने आपले लेखे वेळोवेळी योग्य त्या नोंदी घेवून नियमानुसार ठेवलेले नाहीत सन २००५ पासून विद्यापीठाचे लेखे महालेखापरीक्षकांकडे सादर केलेले नाहीत. सन २००६ पासून ते सन २००९-२०१० पर्यंतचे वार्षिक लेखे विद्यापीठाने शासनाकडे नियमितपणे सादर केले आहेत. डॉ.बाबासाहेब तंत्रशिक्षण विद्यापीठ संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांच्याकडे लेखे सादर करते व ते शासनाकडे सादर करतात व सन २००६-०७, २००७-०८, २००८-०९ आणि २००९-२०१० या वर्षांची माहिती संचालक, तंत्रशिक्षण यांना सादर केलेली आहे. त्यांनी विभागाकडून महालेखापाल कार्यालयाला माहिती सादर करणे आवश्यक असतानाही त्यांनी महालेखापाल कार्यालयाला माहिती सादर केलेली नाही.

७.१९ महालेखाकारांचे म्हणणे आहे की, आपल्या विद्यापीठाकडून लेखे उपलब्ध झालेले नाहीत त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, संचालक, तंत्रशिक्षण यांचेकडे लेखे सादर केलेले आहे. त्यांनी महालेखाकारांना लेखे सादर केले आहेत किंवा नाही याची माहिती नाही. विद्यापीठाचे सन २००७-०८, २००८-०९ पर्यंत लेखापरीक्षण झालेले आहे. तसेच या अगोदरच्या वर्षाचे देखील लेखापरीक्षण झालेले आहे. सन २००५-०६ मधील लेखापरीक्षण परिच्छेदाबाबतचे स्पष्टीकरण विभागाकडून सन २००७ पर्यंत देण्यात आलेले नाही. आपल्याकडून लेखे दिले जात नाही. शासनाकडून मिळालेला निधी कसा खर्च केला त्याचे स्पष्टीकरण महालेखाकारांना देण्यात येत नाही असे महालेखाकारांचे म्हणणे आहे. तर लेखे शासनाला सादर केले असे विद्यापीठाचे म्हणणे आहे.

७.२० समितीने असे मत व्यक्त केले की, तंत्रशिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांना शासनामार्फत वेतन दिले जाते. त्या व्यतिरिक्त विद्यापीठ विद्यार्थ्यांकडून २४ हजार वार्षिक शुल्क घेत आहे. तेव्हा अनुदान आणि विद्यापीठाचे उत्पन्न याचे लेखापरीक्षण सादर केले पाहिजे. यावर विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, सन २००५-०६ मध्ये ३.२१ कोटी रक्कम समायोजित केली. सन २००६-०७ मध्ये ०.६० लाख समायोजित करण्यात आली. सन २००७-०८ मध्ये २.७१ कोटी राहिले होते त्यापैकी ०.८७ कोटी इतकी रक्कम जमा केली. सन २००८-०९ मध्ये १.८३ कोटी रकमेपैकी ०.५२ लाख जमा केली. संचालकांकडून महालेखापालांना अहवाल दिला जातो. तेव्हा उर्वरित रक्कम वजा करुन समायोजित केलेली आहे. सन २००५-०६ ची रक्कम होती ती पूर्ण जमा झालेली आहे.

७.२१ महालेखापालांनी असे सांगितले की, we have not received any progress report or explanation for the year २००५-२००६ also. The Government may also indicate the progress of these schemes. त्यावर सचिवांनी असे सांगितले की, सन २००५-०६ मध्ये ज्या सूचना केलेल्या आहेत त्याप्रमाणे सुधारणा केलेल्या आहेत. समितीने अशी विचारणा केली की, विभागाने महालेखाकार कार्यालयाला माहिती का सादर केली नाही ? विद्यापीठ सांगत आहे की, आम्ही माहिती दिलेली आहे. महालेखाकार कार्यालयाला माहिती प्राप्त झालेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. तेव्हा प्रथम त्या दोन्ही विभागांनी एकमेकांमध्ये समन्वय साधून नेमकी वस्तुस्थिती काय आहे ते स्पष्ट करावे.

७.२२ महालेखाकारांकडून जे आक्षेप घेण्यात आलेले आहेत त्याबाबतीत आपण पूर्तता केली असल्यास तसे महालेखाकार कार्यालयाला कळवावे. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, ज्या सूचना केल्या होत्या त्याप्रमाणे कारवाई केलेली आहे. तरी सुद्धा ज्या संबंधी महालेखाकारांकडे माहिती प्राप्त झ ाली नाही त्याबाबत समन्वय साधण्यात येईल. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती अद्याप समितीस प्राप्त झालेली नाही.

७.२३ प्रत्येक वर्षी अहवाल सादर होतो काय असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी असे सांगितले की, प्रत्येक वर्षी अहवाल सादर होतो. तसेच तो विधानसभेला सादर होत नाही. कारण त्याच्या मराठी भाषेतील प्रती उपलब्ध नाहीत. समितीने अशी विचारणा केली की, रिक्त पदे केव्हा भरणार आहात ? अद्यापपर्यंत बिंदू नामावली अद्ययावत केलेली नाही. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, रिक्त पदांची जाहिरात दिलेली आहे तथापि, महाड तालुक्यातून उमेदवार मिळत नाहीत. तसेच सन २००५-०६ मध्ये बिंदू नामावली अद्ययावत नव्हती. नवी मुंबईतील सहाय्यक आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांच्या कार्यालयाकडून बिंदू नामावली अद्ययावत करुन घेतलेली आहे. दुसरे म्हणजे उच्च शिक्षित प्राध्यापक महाडसारख्या दूरच्या भागात जाण्यास तयार होत नाही.

७.२४ समितीने अशी विचारणा केली की, आपल्या विद्यापीठात कोणते अभ्यासक्रम शिकविण्यात येतात ? यावर विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली की, कंपन्यांकडून मागणी असेल त्याप्रमाणे अभ्यासक्रम सुरु केलेले आहेत. पाणी गुणात्मक व्यवस्थापनाचे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना कंपनीमध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून सुरुवातीस महिन्याला साधारणतः २० हजार रुपये पगार मिळतो. कम्युनिटी पॉलिटेक्निकमध्ये या संदर्भातील अभ्यासक्रम सुरु आहेत. सदर ठिकाणी २९६१ लोकांना प्रशिक्षण दिले

आहे व त्यातील २२०० लोकांना रोजगार देखील उपलब्ध झाला आहे. तांत्रिक कामगार वर्ग चांगला आहे. सदर ठिकाणी औद्योगिक क्षेत्र जवळ असल्यामुळे त्याप्रमाणे अभ्यास देखील केला जातो.

७.२५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र विद्याविषयक विद्यापीठ, लोणेरे येथे रोजगार उपलब्ध होईल अशाप्रकारचे तांत्रिक कोर्सेस कोकणामध्ये येणे गरजेचे आहे. तसेच कोकणामध्ये मत्स्यव्यवसायाचे संबंधीचे कोर्सेस चांगल्यारितीने होऊ शकतात. महाराष्ट्राला ७०० कि.मी. चा समुद्र किनारा लाभला आहे आणि त्या दृष्टीने पर्यटनलादेखील मोठ्या प्रमाणात वाव मिळू शकेल. विभागाने मत्स्यव्यवसाय, पर्यटन, फळबागासंबंधित व मरिन इंजिनिअरिंगसंदर्भातील कोर्सेस सुरु करणे फार गरजेचे आहे. सावंतवाडीला लाकडाच्या विविध वस्तू बनविल्या जातात. कुटीर उद्योगाला देखील वाव आहे. आपण त्या संदर्भातील अभ्यासक्रम सुरु करण्याचा विचार करावा अशी सूचना समितीने विभागास केली असता या संदर्भात विभागाने सांगितले की, अभ्यासक्रम ठरविण्यात येत आहे. राज्यातील प्रत्येक तालुक्यात आय.टी.आय आहे. त्यामध्ये हे अभ्यासक्रम सुरु आहेत. लोणेरे या ठिकाणाहून २९६१ लोकांना प्रशिक्षण दिले आहे व त्यातील २२०० लोकांना रोजगार देखील उपलब्ध झाला आहे.

७.२६ समितीने अशी विचारणा केली की, विद्यापीठात शिकवत असलेल्या पदवीपूर्व, पदविका तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रम या सर्वांना एआयसीटीईची मान्यता आहे. संगणक व माहिती तंत्रज्ञान हे दोन अभ्यासक्रम वगळता अन्य सर्व पदवी अभ्यासक्रमांना एआयसीटीईकडून अधिस्वीकृतता मिळाली आहे. यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, वॉशिंग्टन अकॉर्ड ही आंतरराष्ट्रीय दर्जाची मानांकन देणारी संस्था आहे त्यांनी सांगितले आहे की, आपण मानांकन देताना आंतरराष्ट्रीय मानकाचे अनुसरण केले पाहिजे. त्यामुळे एआयसीटीई अगोदर अभ्यासक्रमासंदर्भात त्यांचे मानांकन घेते. परिणामी, सध्या त्यांच्याकडे बरीच कार्यवाही प्रलंबित आहे.

७.२७ समितीने अशी विचारणा केली की, महालेखापरीक्षकांनी विद्यापीठात अनियमितता झाल्याबाबत कोणते आक्षेप नोंदविलेले आहेत व त्याबाबत महालेखाकारांना खुलासा कळविला असल्यास त्याची थोडक्यात माहिती समितीला देण्यात यावी. सदर वर्षाचे लेखे महालेखाकार यांना सादर केले आहेत काय, नसल्यास, याची कारणे काय आहेत व महालेखाकार यांना माहिती सादर न करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ? याबाबत विभागीय सचिवांनी असे सांगितले की, २००५ ते मार्च २००६ पर्यंतची चाचणी लेखापरीक्षाची सर्व माहिती महालेखाकारांना देण्यात आलेली आहे. तसेच लोकलेखा समितीला देखील २००८ मध्ये ही माहिती दिलेली असून त्यानुषंगाने ही साक्ष घेण्यात येत आहे. चाचणी लेखापरीक्षण झाले. त्यानंतर नियमित लेखापरीक्षण

घेण्यात आले. त्यामध्ये १३ परिच्छेद होते व ते सर्व परिच्छेद वगळण्यात आलेले आहेत. महालेखापालांनी नियमित लेखापरीक्षा परिच्छेद वगळलेले आहे. त्यावर महालेखाकारांनी मात्र असे सांगितले की, सदर परिच्छेद त्यांनी वगळलेले नाहीत यावर विभागीय सचिवांनी स्थानिक लेखापरिक्षणाबाबत विषय आहे असे सांगितले असता महालेखापालांनी सांगितले की, २००७ नंतर आपल्या विभागाकडून कोणतेही अहवाल महालेखापाल कार्यालयास पाठविलेले नाहीत.

७.२८ विद्यापीठाच्या संदर्भात महालेखापालांना कोणतीच माहिती दिली जात नाही असा जो मुद्दा होता त्याबाबतीत विभागीय सचिवांनी महालेखापालांना दिनांक ७-४-२००८ रोजी पाठविण्यात आलेले पत्र समितीस सादर केले व स्थानिक लेखापरीक्षण घेण्यात आल्यानंतर त्यासंबंधातील परिच्छेद वगळण्यात आले. सन २००९ मध्ये नियमित लेखापरीक्षण घेण्यात आले आणि त्यामधील ३ परिच्छेद वगळण्यात आले. यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, विद्यापीठाने खुलासा विभागाकडे पाठविल्यानंतर तो विभागाने महालेखापालांकडे दिला असेल किंवा विद्यापीठाने परस्पर तो महालेखापालांना दिला असेल. यावर समितीने असे सांगितले की, विद्यापीठ परस्पर खुलासा महालेखापालांना पाठवू शकत नाही. खुलासा विभागामार्फत महालेखापालांना पाठविला जातो व ही कार्यपद्धती आहे. त्यावर महालेखापाल यांनी असे सांगितले की, There are two issues. One is the local audit and another is the regular audit. Please don't link up these two things. यावर सचिवांनी खुलासा केला की, I am answering on the issue that we have sent reply in २००८. We have given the information, and I have got the copy.

७.२९ यावर समितीने विचारणा केली की, परिच्छेदांसबंधीचा खुलासा साक्षीच्या ४ दिवस आधी महालेखापालांना दिला जातो असा अनुभव आहे व यासंबंधी समितीने वेळोवेळी नाराजी व्यक्त केली आहे. सन २००७ नंतरचा खुलासा प्राप्त झालेला नाही असे महालेखापालांचे म्हणणे आहे आणि तो खुलासा महालेखापालांना दिलेला आहे असे विभागाचे म्हणणे आहे. विभागाने सन २००८ चा खुलासा महालेखापालांना सादर केलेला आहे काय, याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, २००८ चा खुलासा महालेखापाल कार्यालयास सादर केला आहे. सदरहू खुलाशाच्या पत्रावर पोच मिळाल्याचा दिनांक काय आहे ? असे समितीने विचारले असता दिनांक १७ जून, २००८ चे पत्र आहे परंतू त्यावर पोच घेतलेली नाही असे विभागाने सांगितले. विभागाने पत्र दिल्यानंतर त्यावर पोच घेणे आवश्यक आहे असे समितीने विभागास सांगितले असता वित्त सचिवांनी सांगितले की, सर्वसाधारणपणे महालेखापाल कार्यालयाकडून पोच पावती दिली जात नाही. यावर समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले की, जर पोच मागितली तर ती देण्यास महालेखापाल कार्यालय "नाही" म्हणू शकत नाही. विभागाकडून

समितीला खुलाशाची एक प्रत प्राप्त झाली आहे. परंतु सदर खुलासा महालेखापाल कार्यालयाकडून तपासून घेऊन तो समितीला पाठविणे आवश्यक होते. तसेच महालेखाकार यांना दिलेल्या पत्राची पोच घेणे आवश्यक होते, तसे विभागाने केलेले नसल्यामुळे विभागाचे म्हणणे योग्य नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. विभागाने यापुढे काळजी घेण्यात येईल असे आश्वासन समितीस दिले. विद्यापीठात शिकविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमाची यादी समितीला देण्याबाबत विभागास सांगितले असता सदरहू माहिती समितीला देण्यात येईल, असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले परंतु समितीचा अहवाल तयार होईपर्यंत देखील सदरहू माहिती समितीस प्राप्त झाली नाही. परिणामी या संदर्भातील आपले अभिप्राय समिती देवू शकत नाही.

७.३० समितीने अशी विचारणा केली की, विद्यापीठात शिकविण्यात येत असलेल्या अभ्यासक्रमास AICTE ची मान्यता आहे काय ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, सुरुवातीला AICTE ची मान्यता घेऊन पदवीपूर्व पदविका तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु केले जातात. NBA अभ्यासक्रमासाठी सुरुवातीला AICTE ची मान्यता घ्यावी लागत होती. आता NBA ही स्वतंत्र संस्था झालेली आहे. अभ्यासक्रम सुरु केल्यानंतर तीन वर्षांनी अधिकृत अर्ज करावा लागतो व त्यानंतर त्यास AICTE कडून मानांकन मिळते. या मानांकनामुळे विद्यापीठातून शिकविल्या जाणाऱ्या (कोर्सेस व्हॅल्यूएशन) अभ्यासक्रमाचे मुल्यांकन काय आहे हे समजते.

**अभिप्राय व शिफारशी :**

**७.३१** भारताचे नियंत्रक व लेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्रमांक ३.६ बाबत विभागाकडून प्राप्त झालेली लेखी माहिती व प्रत्यक्ष साक्षीचे वेळी दिलेल्या तोंडी माहितीच्या आधारे समितीने पुढीलप्रमाणे अभिप्राय व शिफारशी सादर केलेल्या आहेत.

**७.३२** या परिच्छेदासंबंधात महालेखाकारांनी प्रामुख्याने असा आक्षेप नोंदविला आहे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्र विद्याविषयक विद्यापीठाने आपले लेखे वेळोवेळी योग्य त्या नोंदी घेवून नियमानुसार ठेवलेले नाहीत. सन २००५ पासून विद्यापीठाचे लेखे महालेखापरीक्षकांकडे सादर केलेले नाहीत. सन २००६ पासून ते सन २००९-२०१० पर्यंतचे वार्षिक लेखे विद्यापीठ संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांच्याकडे सादर करते व संचालनालय शासनाकडे सादर करतात व शासनामार्फत ते विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना सादर केले जातात असे असतानाही विभागाकडून महालेखाकार कार्यालयास माहिती सादर झालेली नाही त्यामुळे शासनाकडून मिळालेला निधी विद्यापीठाने कसा खर्च

केला याची माहिती महालेखाकारांना मिळाली नाही. तंत्र शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांना शासनामार्फत वेतन दिले जाते. त्या व्यतिरिक्त विद्यापीठ विद्यार्थ्यांकडून २४ हजार रुपये वार्षिक शुल्क घेते. त्यामुळे अनुदान आणि विद्यापीठाचे उत्पन्न याचे लेखापरिक्षण होणे आवश्यक आहे. परंतु महालेखाकार यांना सन २००५-२००६ या वर्षाची कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. वास्तविक पहाता राज्यातील कृषी व अकृषी विद्यापीठाचे **वार्षिक प्रशासन तसेच लेखाविषयक अहवाल संबंधित मंत्रालयीन विभागाकडून प्रत्येक वर्षी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना अधिनियमातील तरतूदीनुसार सादर केले जातात. त्याच धर्तीवर उच्च तंत्र विद्यापीठाचे अहवाल सभागृहांना का सादर करण्यात आलेले नाहीत याबाबत शासनाने चौकशी करुन त्याबाबतची माहिती समितीला त्वरित पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**७.३३** परिच्छेदासंबंधीचा खुलासा साक्षीच्या चार दिवस आधी महालेखापालांना दिला जातो असा अनुभव समितीला आलेला आहे. यांसबंधी समितीने वेळोवेळी नाराजी व्यक्त केली आहे. सन २००७ नंतरचा खुलासा विभागाने महालेखापालांना दिलेला आहे. तसे दिनांक १७ जून, २००८ चे पत्र आहे. परंतु त्यावर पोच घेतलेली नाही. परिच्छेदावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापन महालेखाकार यांच्याकडून तपासून घेवून समितीला माहिती देणे आवश्यक होते तसेच महालेखाकार यांना दिलेल्या पत्राची पोच घेणे आवश्यक होते. विभागाने नेहमीच्या शासन कार्यपद्धतीचा अवलंब केलेला नसल्यामुळे विभागाचे म्हणणे योग्य नसल्याचे समितीच्या निदर्शनास आलेले आहे. विभागाने या पुढील काळात पत्र पाठविण्याची व्यवस्था करताना विहित शासन कार्यपद्धतीचा अवलंब केला जाईल याची दक्षता घ्यावी.

**७.३४ महालेखापरीक्षकांनी विद्यापीठात अनियमितता झाल्याबाबत आक्षेप नोंदविलेले आहेत व त्याबाबत महालेखाकारांना खुलासा कळविण्यात आलेला नाही. त्यामुळे महालेखाकार यांना माहिती सादर न करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात यावी. चौकशीत दोषी आढळून आलेल्या अधिकाऱ्याविरुद्ध योग्य ती कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**७.३५** डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रविद्याविषयक विद्यापीठ प्रत्येक वर्षी अहवाल संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयाला सादर करते परंतु अद्यापपर्यंत सदर अहवाल मराठीत भाषांतर केलेला नसल्यामुळे विधानसभेला सादर केलेला नाही. हे विभागाने दिलेले कारण समितीला मान्य होण्यासारखे नाही कारण राज्यातील इतर कृषी व अकृषी विद्यापीठांचे वार्षिक अहवाल व **लेखाविषयक अहवाल इंग्रजी व मराठी भाषेत एकत्रितपणे सादर केले जातात ही बाब विचारात घेता त्याच धर्तीवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्र विद्यापीठाने आपले वार्षिक व लेखाविषयक अहवाल प्रत्येक वर्षी अधिवेशन काळात**

**विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना सादर करण्याची कार्यपद्धती शासनाने सुरु करावी अशी समितीची शिफारस आहे.**

**७.३६** विद्यापीठामध्ये ९५ शिक्षकांची पदे असून १२५ पदे शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची आहेत शिक्षकांची ६४ पदे भरली असून ३० पदे रिक्त आहेत. विद्यापीठाने २००५-२००६ पर्यंत बिंदू नामावली अद्ययावत केलेली नव्हती. **आताच नवी मुंबईतील सहाय्यक आयुक्त मागासवर्ग कक्ष यांच्या कार्यालयाकडून बिंदू नामावली अद्ययावत करून घेतलेली असली तरी विद्यापीठाकडे ३० टक्के शिक्षकांची पदे रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. शिवाय विद्यार्थी तंत्र शिक्षणापासून वंचित राहत असल्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रविद्याविषयक विद्यापीठातील शिक्षकांची पदे तातडीने भरण्यात यावीत व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

# अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

**८. अन्न सुरक्षा, अनुदान व अन्नधान्याचे व्यवस्थापन-**

८.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचा परि.क्र.३.७ "अन्न सुरक्षा, अनुदान व अन्नधान्याचे व्यवस्थापन" या संदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

**अर्थसंकल्प व खर्च-**

**८.२** २००१-०६ या कालावधीमधील पीडीएस व अन्नपुर्णा योजने अंतर्गत अर्थसंकल्पीय नियतवाटप व प्रत्यक्ष करण्यात आलेला खर्च खालीलप्रमाणे आहे.

(रुपये कोटीत)

| वर्ष | अर्थसंकल्प | | खर्च | | बचत | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पीडीएस | अन्नपूर्णा | पीडीएस | अन्नपूर्णा | पीडीएस | अन्नपूर्णा |
| २००१-०२ | १.९५५.३० | ०.५० | १,०८०.६१ | ०.१२ | ८७४.७० | ०.३८ |
| २००२-०३ | २,०७६.३२ | ०१५ | १,२८२.३६ | ०.१५ | ७९३.९६ | ०.०० |
| २००३-०४ | २,५२४.६१ | ८.७८ | १,२४९.०८ | १.२६ | १,२७५.५३ | ७.५२ |
| २००४-०५ | २,७७१.८६ | ५.०० | २,६८९.५२ | २.७८ | ८२.३४ | २.२२ |
| २००५-०६ | १,४८५.७३ | ०.०० | १,५५६.१६ | ७.७८ | (-) ७०.४३ | (-) ७.७८ |
| **एकूण** | **१०,८१३.८२** | **१४.४३** | **७,८५७.७३** | **१२.०९** | **२,९५६.०९** | **२.३४** |

वरील तपशीलावरुन असे दिसून येते की, गहू व तांदळाची कमी उचलण केल्यामुळे पीडीएस व अन्नपुर्णा योजनेमधील निधीचा कमी उपयोग करण्यात आला होता.

**ज्ञापन :**

८.३ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने पुढील प्रमाणे खुलासा केला.

सन २००१-२००२ ते २००५-२००६ या कालावधीत खुल्या बाजारातील जीवनावश्यक वस्तुंचे दर आणि एपीएल योजनेअंतर्गत वितरीत होणाऱ्या शिधावस्तुचे दर जवळपास सारखेच असल्यामुळे एपीएल योजनेअंतर्गत धान्याच्या नियतनाची उचल केवळ २.५३% एवढीच झाली आहे. परिणामी सदर योजनेकरीता करण्यात आलेल्या अनुदानामध्ये बचत झाली आहे. तसेच सन २००१-०२ ते सन २००५-०६ या कालावधीमध्ये बीपीएल योजनेअंतर्गत नियतनाची उचल ६५% तसेच अंत्योदय योजनेअंतर्गत नियतनाची उचल ९०.८६% एवढी आहे. त्यामुळे बीपीएल आणि अंत्योदय योजनांकरिता मंजूर करण्यात

आलेले अनुदान जवळपास संपुर्णपणे खर्च करण्यात आले आहे. तथापि, एपीएल योजनेअंतर्गत धान्याची उचल केवळ २.५३% एवढीच झाल्यामुळे पीडीएस अंतर्गत अनुदानाची बचत झाली आहे.

अन्नपुर्णा योजना राज्यामध्ये दिनांक १.०४.२००१ पासुन राबविण्यात येत आहे. प्रस्तुत योजनेअंतर्गत केंद्र शासनाने राज्याला १,२०,००० एवढा लाभार्थी इष्टांक निश्चित करुन दिला आहे. त्यानुसार प्रतिलाभार्थी दरमहा १० किलोप्रमाणे केंद्र शासनाकडून नियतन मंजूर करण्यात येते. सन २००१-०२ ते २००५-०६ या कालावधीमध्ये राज्याला नेमून दिलेल्या इष्टांकापेक्षा राज्यामध्ये प्रत्यक्षात कमी लाभार्थी असल्यामुळे मंजूर नियतनापेक्षा कमी अन्नधान्याचे वितरण झाल्यामुळे सन २००१-०२ ते २००५-०६ या कालावधीत अन्नपुर्णा योजनेअंतर्गत एकुण रु.२.३४ कोटी एवढी बचत झाली आहे.

**अन्नधान्याचे नियतवाटप, उचलण व वितरणावाटप, उचलण व वितरण व वितरणपयोग करण्यात आला होती उचलण केल्यामुळे पीडीएस व अन्य-**

८.४ २००१-०६ या कालावधीत पीडीएस अंतर्गत नियतवाटप, उचलण व वितरण या बाबतचा तपशील खालीलप्रमाणे होता.

(मात्रा लाख मे.ट.मध्ये)

| वर्ष | भारत सरकारद्वारा नियतन | | राज्याद्वारे केलेली उचलण | | वितरण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ |
| २००१-०२ | ७.७४ | ९.२३ | ७.८४ | ४.४३ | ८.५३ | ५.१८ |
| २००२-०३ | ५०.३७ | २७.१९ | १०.५८ | ६.०५ | ११.५९ | ६.७८ |
| २००३-०४ | ४८.३४ | २६.१० | १३.२२ | ७.१० | १३.४१ | ७.२० |
| २००४-०५ | ४७.४९ | २६.९८ | १५.०६ | ८.८१ | १५.०२ | ८.५० |
| २००५-०६ | ३५.९६ | १८.४३ | १४.६३ | ८.६९ | १४.६३ | ८.९१ |
| **एकूण** | **१८९.९०** | **१०७.९३** | **६१.३३** | **३५.०८** | **६३.१८** | **३६.५७** |

टिप : २००१-०४ मधील झालेले जादा वितरण मागील मालसाठ्यामधून होते.

वरील तक्त्यामधील तपशीलावरुन असे दिसून येते की, भारत सरकारने केलेल्या नियतनाच्या तुलनेत अन्नधान्याची उचलण फक्त ३२ टक्के एवढीच होती.

**ज्ञापन :**

८.५ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने पुढील प्रमाणे खुलासा केला.

अंत्योदय अन्न योजना, बी.पी.एल. आणि ए.पी.एल. या तीनही योजनांच्या नियतनाची एकत्रित उचल दाखविण्यात आल्यामुळे उचलीची टक्केवारी कमी झाली आहे. या कालावधीत खुल्या बाजारातील

जीवनावश्यक वस्तुंचे दर आणि एपीएल योजेनेअंतर्गत वितरीत होणाऱ्या शिधावस्तुचे दर (खाली नमूद केल्यानुसार) जवळपास सारखेच असल्यामुळे एपीएल योजनेअंतर्गत धान्याच्या नियतनाची उचल केवळ २.५३% एवढीच झाली आहे. योजनानिहाय धान्याच्या नियतनाची उचल विचारात घेतली तर सन २००१-०२ ते २००५-०६ या कालावधीमध्ये बीपीएल योजनेअंतर्गत नियतनाची उचल ६५% तसेच अंत्योदय योजनेअंतर्गत नियतनाची उचल ९०.८६% एवढी आहे.

सन २००१ ते २००६ या कालावधीत खुल्या बाजारातील गव्हाचे दर रु.६.९७ ते ८.८७/- आणि तांदळाचे दर रु.११.२१ ते ११.९४/- प्रति किलो एवढे होते.

तर सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील एपीएल योजनेअंतर्गत दर खालीलप्रमाणे होते.

१. दि.१५/७/२००२ पासून गव्हाचे दर रु.७.२५/- आणि तांदळाचे दर रु.१०.००/-प्रति किलो याप्रमाणे होते.
२. दि.२१/८/२००४ पासून गव्हाचे दर रु.७.००/- आणि तांदळाचे दर रु.०९.६०/- प्रति किलो याप्रमाणे होते.

**अन्नधान्याची उलचण व गोदामे भाड्याने घेणे-**

८.६ अन्नधान्याची (मुख्यत्वेकरुन गहू व तांदूळ) उचलण विभागाद्वारे माल पोहचवणी आदेशामध्ये (डीओ) नमुद केलेल्या मात्रेसाठीच्या अग्रिमाचे प्रदान केल्यानंतर केली जाते. राज्य शासनाच्या नागरी पुरवठा विभागाने प्रत्यक्ष उचलण केलेल्या अन्नधान्याच्या मात्रेनुसार एफसीआयद्वारा अग्रिमाचे समायोजन करण्यात येते. प्रत्यक्ष उलचण केलेल्या अन्नधान्याचा एफसीआयला प्रदान केलेल्या अग्रिमाशी ताळमेळ न घातल्यामुळे २००५-०६ पर्यंतच्या कालावधीसाठी एफसीआयला देण्यात आलेल्या अग्रिम प्रदानापैकी रुपये १.०४ कोटीचे अग्रिमाचे समायोजन प्रलंबित राहिले होते.

**ज्ञापन :**

**८.७** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने पुढील प्रमाणे खुलासा केला.

जिल्हा पुरवठा कार्यालयांच्या व्यपगत धान्य साठ्याच्या अनुषंगाने दि.३१.०३.२०१० पर्यंतच्या प्रलंबित रकमांबाबत भारतीय अन्न महामंडळाचे प्रतिनिधी, वित्तीय सल्लागार आणि उप सचिव कार्यालयाचे प्रतिनिधी तसेच संबधित जिल्हा पुरवठा अधिकारी यांचा जिल्हानिहाय आढावा माहे जुलै-ऑगस्ट २००९ मध्ये घेण्यात आला असून शासनास येणे असलेल्या रकमांचा ताळमेळ घालण्यात आला आहे. त्यामध्ये भारतीय अन्न महामंडळाकडून जिल्हा पुरवठा कार्यालयांना येणे असलेली रु.६७.०४/-

एवढी रक्कम पुढील नियतनामध्ये समायोजनद्वारे आणि अथवा अदायगी करुन देण्याचे भारतीय अन्न महामंडळाने मान्य केले आहे.

त्यानुसार उपरोक्त नमूद रु.६७.०४/- एवढ्या रकमेपैकी रु.दि.११.०१.२०११ पर्यंत रु.३५.४३/- कोटी एवढ्या रकमेचे समायोजन भारतीय अन्न महामंडळाकडून करण्यात आले आहे.

**भाड्याने घेतलेल्या गोदामांचा वापर न करणे-**

८.९ जुलै २००१ पूर्वी अन्नधान्य एफसीआयच्या गोदामांमधून राज्य शासनाच्या गोदामांमध्ये हस्तांतरीत करण्यात येत होते. जुलै २००१ पासून शिधावाटप नियंत्रक, मुंबई अन्नधान्याची पोहचवणी एफसीआयच्या गोदामामधून थेट रास्त भाव धान्य दुकानांमध्ये करीत होते. शिधावाटप नियंत्रक, मुंबई यांच्या नियंत्रणाखाली असलेली आठ गोदामे विनावापर पडून होती त्यापैकी दोन गोदामे खाजगी व्यक्तींकडून भाड्याने घेण्यात आली होती. जुलै २००१ ते मार्च २००६ या कालावधीत शिधावाटप नियंत्रकांनी या भाड्याने घेतलेल्या गोदामांसाठी रुपये २२.७१ लाख एवढे भाडे दिले होते. विभागाने उत्तर दिले होते की (ऑगस्ट २००६) न्यायालयीन दाव्यांमुळे ही भाड्याची गोदामे सोडण्यात आली नव्हती. विभागाचे उत्तरांत ही भाड्याने घेतलेली गोदामे का वापरण्यात आली नाही या बाबत कारण्यांबाबत काहीही म्हटले नव्हते.

**ज्ञापन :**

**८.१०** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने पुढील प्रमाणे खुलासा केला.

नियंत्रक, मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र यांच्या अखत्यारितील असलेल्या आठ गोदामांपैकी न्यू परेल व शिवडी ही दोन गोदामे खाजगी व्यक्तींकडून भाड्याने घेण्यात आली होती.

१. **न्यू परेल गोदाम :-** मे.एन.एम.वाडीया चॅरिटिज ट्रस्ट यांच्या मालकीच्या न्यू परेल येथील जागेवर अन्नधान्याच्या साठवणूकीकरीता सन १९४४ मध्ये शासनाने गोदामे बांधली होती. सदर जागेची मालकी सन १९८९ मध्ये मे.प्राईम प्रॉप.प्राय.लि. यांच्याकडे हस्तांतरीत झाल्यानंतर जागेच्या भाड्यापोटी जुलै २००१ ते ऑक्टोबर, २००५ या कालावधीत रु.१०,१६,६५२/- इतकी रक्कम अदा करण्यात आली होती. सदर गोदामाची जागा मे.प्राईम प्रॉप.प्राय.लि. यांना परत करण्याचा शासन निर्णय दिनांक २३.३.२००५ रोजी घेण्यात आला असून, दिनांक ३१.१०.२००५ रोजी सदर गोदामाची जागा परत करण्यात आले आहे.

२. **शिवडी गोदाम :-** मे.खंडेलवाल इंजिनिअर कंपनीकडून अन्नधान्याच्या साठवणूकीकरीता सन १९६९ पासून गोदाम भाड्याने घेण्यात आले होते. शासन निर्णय दिनांक २२.१.२००८ व शासन निर्णय शुद्धीपत्रक दिनांक २५.१.२००८ अन्वये, सदरचे गोदाम मे.खंडेलवाल इंजिनिअर कंपनीस परत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर गोादामाच्या भाड्यापोटी जुलै, २००१ ते मार्च, २००६ या कालावधीत रु.१२,४८,७५६/- इतकी रक्कम अदा करण्यात आली होती.

३. **अदा केलेले एकूण भाडे :-** जुलै, २००१ ते मार्च, २००६ या कालावधीत न्यू परेल गोदाम व शिवडी गोदाम या दोन गोदामावरील भाड्यापोटी एकूण रु.२२,६५,४०८/- इतकी रक्कम अदा करण्यात आली होती.

४. **गोदामे विनावापर राहण्याची कारणे :-** माहे जुलै, २००१ पूर्वी, मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून उचल केलेले धान्य राज्य शासनाच्या गोदामात साठविले जात असे त्यामुळे, शासनास गोदामाची आवश्यकता होती. सदर गोदामातील व्यवस्थापन केंद्रिय वखार महामंडळ व महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांच्याकडे होते. तथापि, सन १९९७ पासून लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण वखार महामंडळाकडे पुरेसे प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध नसल्याने सदर गोदामातील केंद्रिय वखार महामंडळ व महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांच्याकडून सदर गोदामांचे व्यवस्थापन काढून घेण्यात आले व नियंत्रक, मुंबई-ठाणे शिधावाटप यांच्या कार्यालयाकडे दिनांक १.७.२००१ पासून सोपविण्यात आले व सदर गोदामातील माथाडी कामगारांच्या सेवा दिनांक ३०.६.२००१ पासून बंद करण्यात आल्या परिणामी गोदामातील कामगारांनी मा.न्यायालयात याचिका दाखल केली. दरम्यानच्या कालावधीत संघटीत शिधावाटप संस्था भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून धान्याची उचल करुन थेट शिधावाटप दुकानामध्ये पोहोच करीत असल्यामुळे, अन्नधान्य साठवणूकीकरीता मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात शासकीय गोदामाची आवश्यकता राहिली नाही. एकंदरीत न्यायालयीन प्रक्रियेमुळे गोदामे मूळ मालकांना परत करण्यास विलंब झाला. सबब, सदर कालीवधीत गोदामे विनावापर राहिली.

५. **भारतीय अन्न महामंडळाचे बोरिवली येथील गोदामे विनावापर राहिलेला कालावधी:-**

| गोदाम क्रमांक | गोदामातील कामकाज बंद केल्याचा दिनांक | गोदाम परत केल्याचा दिनांक | गोदाम विनावापर राहिल्याचा कालावधी |
|---|---|---|---|
| ११ | १.७.२००१ | १.१.२००८ | ६ वर्षे ५ महिने |
| १२ | १.७.२००१ | १.१.२००८ | ६ वर्षे ५ महिने |
| २२ | १.७.२००१ | २१.७.२००२ | ११ महिने २० दिवस |

६ **गोदामे विनावापर राहण्याची कारणे :-** माहे जुलै, २००१ पुर्वी, मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून उचल केलेले धान्य राज्य शासनाच्या गोदामात साठविले जात असे त्यामुळे, शासनास गोदामाची आवश्यकता होती. सदर गोदामातील व्यवस्थापन केंद्रिय वखार महामंडळ व महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांच्याकडे होते. तथापि, सन १९९७ पासून लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत होणारे अन्नधान्य कमी झाल्याने तसेच, वखार महामंडळाकडे पुरेसे प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध नसल्याने केंद्रिय वखार महामंडळ व महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांच्याकडून सदर गोदामांचे व्यवस्थापन काढून घेण्यात आले व नियंत्रक, मुंबई-ठाणे शिधावाटप यांच्या कार्यालयाकडे दिनांक १.७.२००१ पासून सोपविण्यात आले व सदर गोदामातील माथाडी कामगारांच्या सेवा दिनांक ३०.६.२००१ पासून बंद करण्यात आल्या. परिणामी गोदामातील कामगारांनी मा.न्यायालयात याचिका दाखल केली. दरम्यानच्या कालावधीत संघटीत शिधावाटप संस्था भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून धान्याची उचल करुन थेट शिधावाटप दुकानामध्ये पोहोच करीत असल्यामुळे, अन्नधान्य साठवणूकीकरीता मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात शासकीय गोदामाची आवश्यकता राहिली नाही. एकंदरीत न्यायालयीन प्रक्रियेमुळे गोदामे मूळ मालकांना परत करण्यास विलंब झाला. सदर कालीवधीत गोदामे विनावापर राहिली.

**अन्नधान्याची चाचणी न करणे-**

८.११ अन्नधान्याची विहित गुणवत्तेबाबतची खात्री करण्यासाठी पीडीएस नियंत्रण आदेश २००१ मध्ये गोदामामधून अन्नधान्य उचलण्यापूर्वी एफसआयच्या गोदामामधील अन्नधान्याचे एफसीआय कर्मचारी व विभागाच्या कर्मचाऱ्यांनी संयुक्त निरीक्षण करण्याची तरतूद आहे, असे निदर्शनास आले की, २००१-०६ या कालावधीत मुंबई व सोलापूर या जिल्ह्यांमध्ये असे संयुक्त निरीक्षण करण्यात आले नव्हते.

पीडीएस नियंत्रण आदेशामध्ये एफसीआयने वितरणासाठी दिलेल्या अन्नधान्य साठ्याचे सीलबंद नमुने राज्य शासनाला देण्याची देखील तरतूद होती. या जिल्ह्यांमध्ये हे नमुने देखील देण्यात आले नव्हते.

त्याचप्रमाणे राज्य शासनाने दिलेल्या निर्देशानुसार (नोव्हेंबर, २००४) धानातील आर्दता प्रमाण धान खरेदीपूर्वी करावी व धानातील आर्द्रता प्रमाण (१७ टक्के) विहित विनिर्देशाखाली असल्यास धानाची खरेदी करण्यात येऊ नये. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये आर्द्रतामापी उपलब्ध नसल्यामुळे धानाची आर्द्रता तपासणी करणे शक्य झाले नाही.

**ज्ञापन :**

**८.१२** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने पुढील प्रमाणे खुलासा केला.

सन २००४-०५ मध्ये सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये आर्द्रता मापीने न तपासता खरेदी केलेले धानाचा उतारा ६७% मिळाला व धान एफएक्यू दर्जाचे आढळले. प्राप्त झालेला सर्व तांदूळ भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करण्यात आला आहे. ज्या अर्थी काहीही तुट आलेली नाही त्याअर्थी या धानाची आर्द्रता ही विहित विनिर्देशातील होती. परंतु पुढील खरीप पणन हंगामापासून धानाची खरेदी आर्द्रता मापीने तपासणी करुन करण्यात आलेली आहे. सर्व खरेदी केंद्राबरोबर (सिंधुदुर्गसहीत) आर्द्रता मापी आढळल्या आहेत.

**अंत्योदय अन्न योजना-**

८.१३ गरीबातल्या गरीबासाठी अंत्योदय अन्न योजना (एएवाय) मार्च २००१ मध्ये लागू करण्यात आली. या योजनेंतर्गत टीपीडीएससाठी लागू असलेल्या दरापेक्षा कमी दराने अन्नधान्याचा पुरवठा करण्यात येतो.

राज्य शासनाच्या निर्देशांनुसार या योजनेसाठीच्या लक्ष निर्धारित लाभधारकांची निवड बीपीएल लाभधारकांमधून करावयाची होती व त्यांची यादी उत्पन्नानुसार चढत्या क्रमाने बनवायची होती व त्यामुळे कमी उत्पन्न असलेल्यांना प्राधान्य मिळणार होते. त्या त्या ग्राम सेवकांनी तपशीलाबाबत दिलेल्या दाखल्यासह बीपीएल कुटुंब प्रमुखाकडून मागविण्यात आलेल्या अर्जावर ग्रामसभेची मंजूरी आवश्यक होती त्यानंतरच लाभधारकाचे नाव निर्धारित होत होते. या योजनेंतर्गत ओळख पटविण्यात आलेले १०.०२ लाख लाभधारक होते (मे २००१).

असे निदर्शनास आले की, मुंबई ("ई" प्रभाग) व सोलापूर जिल्ह्यांमध्ये एएवायसाठी निवड करण्यात आलेल्या ४,५४० लाभधारकांच्या बाबतीत बीपीएल कुटुंबाची यादी उत्पन्नानुसार चढत्या क्रमाने बनविण्यात आली नव्हती. त्याशिवाय सांगोला व देवगड गट (सिंधुदुर्ग जिल्हा) येथे ५६१ एएवाय

शिधावाटप पत्रिका दारिद्र्य रेषेवरील लाभधारकांना जारी करण्यात आल्या होत्या. त्याशिवाय, देवगड गटामधील २९ लाभधारकांची नावे ग्राम सभेने नामंजूर केलेली असतांनाही त्यांची निवड करण्यात आली होती व त्यांना एएवाय शिधावाटप पत्रिका देण्यात आल्या होत्या. चार गटांमध्ये (बारामती, पंढरपूर, सोलापूर व मुंबईचेडी, ई व एफ परिमंडळे) २,३७२ लाभधारकांना त्यांची गावे नगरपालिकेने/ग्रामसभेने मंजूर केलेली नसतांनाही त्यांना शिधावाटप पत्रिका देण्यात आल्या होत्या.

**ज्ञापन :**

**८.१४** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने पुढील प्रमाणे खुलासा केला.

अ) **मुंबई-** मुंबई "ई" परिमंडळ कार्यालयाच्या क्षेत्रात शिधावाटप अधिकारी यांचे अहवालानुसार निवड करण्यात आलेल्या लाभ धारकांच्या याद्या उत्पन्नाच्या चढत्या क्रमांने तयार करण्यात आल्या असून सदर लाभार्थ्यांपैकी कमीत कमी उत्पन्न असलेल्या लाभार्थ्यांनाच अंत्योदय अन्न योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे. तसेच "ड", "ई" व "फ" परिमंडळांतर्गत अंत्योदय योजनेकरिता लाभधारकांना नगरपालिका/ग्रामसभा यांचे मान्यतेने शिधापत्रिकांचे वितरण केलेले आहे.

(ब) **सोलापूर -** तहसिलदार, पंढरपूर, सांगोला, सोलापूर यांचेकडील अभिलेखानुसार व अहवालानुसार अंत्योदय अन्न योजनेचे निवड करण्यात आलेल्या लाभधारकांच्या याद्या उत्पन्नाच्या चढत्या क्रमाने तयार करण्यात आल्या आहेत. सदर लाभार्थ्यांपैकी कमीत कमी उत्पन्न असलेल्या ५६१ लाभार्थ्यांना अंत्योदय अन्न योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.

पंढरपूर, सांगोला, सोलापूर या तालुक्यामध्ये निवड करण्यात आलेल्या अंत्योदय अन्न योजनेच्या लाभार्थ्यांना नगरपालिका व ग्रामसभेत ठराव घेऊन त्यांच्या मान्यतेनेच लाभ देण्यात आलेले आहेत.

(क) **सिंधुदूर्ग -** शिरगांव येथे २९ लाभार्थी आयआरडीपी यादीत नसल्याचा फरक काढण्यात आला आहे. शिरगांव गावासाठी सन १९९७-९८ मध्ये दारिद्र्यरेषेखालील कुटूंबाची यादी आली असता ती नामंजूर करण्यात आली होती. परंतु त्यानंतर ऑक्टोबर १९९८ मध्ये सदर यादीत आणखी काही नांवे समाविष्ट करण्यासाठी सुचविण्यात येवून दारिद्र्यरेषेच्या यादीत मंजूरी देण्यात आली होती. त्यानंतर सदर मंजूरी दिलेल्या यादीतून अंत्योदय अन्न योजनेच्या लाभार्थींची निवड करण्यात आली. ग्रामसभेने दारिद्र्यरेषेखालील यादीस दिलेल्या मंजूरीच्या ठरावाची प्रत महालेखापाल/लेखानिरीक्षण पथकास तपासणीचे वेळी सादर करण्यात आली होती.

(ड) **पुणे -** बारामती तालुक्यामध्ये एकूण २३१ अंत्योदय लाभार्थ्याचा समावेश होतो. विस्तारित अंत्योदय योजनेंतर्गत ४ गावातील ५७ लाभार्थ्याचे अर्ज ग्रामसेवकांनी जे मंजूर केले होते, त्याकामी, त्याचवेळी

ग्रामसभेचे ठराव घेतलेले आहेत. हे पूर्वीच मान्य झालेले आहे. लेखा परिक्षणानंतर उर्वरित १७४ अर्जांवर ग्रामसेवकांमार्फत पात्र/अपात्र शेरे पूर्तता करण्यात येवून त्याबाबत ग्रामसभेचे ठराव घेतलेले आहेत. तसेच १७४ अर्जातील यादीवर ग्रामसेवक यांच्या तपासणीनंतर सह्या घेतलेल्या आहेत.

२ गावातील २८ लाभार्थ्यांच्या अर्जावर स्वस्त धान्य दुकानदार यांच्या स्वाक्षऱ्या आढळल्या अशा लाभार्थ्यांच्या अर्जावर ग्रामसेवक यांचेकडून (तपासणीनंतर) फेरतपासणी करुन घेवून कुटूंबप्रमुखाकडून माहिती घेवून व त्यावर कुटूंबप्रमुखांच्या सह्या घेतलेल्या आहेत. वरील परिस्थिती पहाता २३१ लाभार्थ्यांच्या बाबतीत ग्रामसभेचे ठराव घेऊन त्यांना अंत्योदय योजनेचा लाभ देणेत येत आहे.

बारामती तालुक्याकरिता लोकसंख्येच्या प्रमाणानुसार इष्टांक १०३३० लाभार्थ्यांचा देण्यात आलेला होता. त्यापैकी आतापर्यंत ९६९७ लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली असून त्यांचे ग्रामसभेचे व नगर पालिकेचे ठराव घेवून चावडी वाचनही केलेले आहे. तसेच निवडलेल्या व सद्या लाभ घेत असलेला एकही लाभार्थी ठराव घेणेचा शिल्लक नाही. तसेच अद्याप इष्टांक पूर्तता करणेकामी ६३३ लाभार्थ्यांची ठराव व निकष पूर्तता होत नसल्याने निवड करणेची शिल्लक आहे.

**अन्नपूर्णा योजना-**

८.१५ अन्नपूर्णा योजना एप्रिल २००० पासून लागू करण्यात आली त्या अंतर्गत ज्यांना वृद्ध निवृत्तीवेतन मिळत नाही अशा ६५ वर्षापेक्षा जास्त वय असणाऱ्या निराधार व्यक्तिंना १० किलो अन्नधान्य मोफत पुरविण्यात येते. योजनेच्या पात्रता निकषानुसार, लाभधारकाचा फोटो, वया बाबतचा दाखला, उत्पन्न व राहण्याचे ठिकाण या बाबतचा तपशील सादर करावा लागतो. अर्जदाराचे नांव तलाठी/ग्रामसेवक यांनी शिफारसित करावयाचे असून त्यास तहसीलदाराची मान्यता असणे आवश्यक असते.

व्यक्तिंना वृद्ध निवृत्ती वेतन मिळते की नाही यांची तपासणी न करताच मुंबईतील प्रभागात (जी प्रभाग) २,५६१ लाभधारकांची निवड करण्यात आली होती. त्या व्यतिरिक्त सोलापूर जिल्हांमधील मोहोळ व सांगोला गटामध्ये व उस्मानाबाद जिल्ह्यामधील वाशी गटामध्ये उत्पन्नाचा दाखला, राहण्याचे ठिकाण, वय व फोटो सादर केलेले नसतांनाही ३८८ लाभधारकांची निवड करण्यात आली होती. त्याशिवाय तलाठ्याची शिफारस व तहसीलदाराची मान्यता नसतांनाही २०२ लाभधारकांची निवड करण्यात आली होती.

२००४-०६ या कालावधीत १७ जिल्ह्यांमध्ये लाभधारक १९,६९७ क्विंटल अन्नधान्यासाठी पात्र असतांना ४८,८२५ लाभधारकांना २३,५३६.४० क्विंटल अन्नधान्याचे वाटप करण्यात आले होते परिणाम

स्वरुप ३,८३९.४० क्विंटल जास्त अन्नधान्याचे वाटप करण्यात आले होते. त्याचा तपशील **(विवरणपत्र क्र.१७)** मध्ये दिलेला आहे. अतिरिक्त अन्नधान्याचे वाटप केल्यामुळे अतिरिक्त अनुदानावरील खर्च रुपये १८.८१ लाख एवढा झाला होता. या योजनेंतर्गत अन्नधान्य मोफत वितरित करण्यात येत असल्यामुळे अन्नधान्याच्या गैरवापराची शक्यता नाकारता येत नाही.

**ज्ञापन :**

**८.१६** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने पुढील प्रमाणे खुलासा केला.

१. नियंत्रक शिधावाटप, मुंबई यांच्या अधिपत्याखालील जी-परिमंडळामध्ये ज्या ६५ वर्षावरील व्यक्तींनी अन्नपुर्णा योजनेकरीता विहीत नमुन्यात फोटोसह अर्ज केले आहेत त्यांनी अर्जातील अ.क्र.६ च्या मुद्दा क्र.१, २, ३ अन्वये अर्जदार कोणत्याही निवृत्ती वेतन योजना, संजय गांधी निराधार योजना तसेच इंदिरा गांधी भूमीहीन वृद्ध शेतमजूर सहाय्य योजनांचा लाभ घेत नसल्याबाबत तहसिलदार कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या उपरोक्त योजनांच्या लाभार्थ्यांच्या यादीत नसल्याची खात्री करुन तसेच शिधावाटप निरीक्षकामार्फत प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन त्यांना अन्नपुर्णा योजनेअंतर्गत शिधापत्रिका वितरीत करण्यात आल्या आहेत. तसेच सर्व अर्जदारांचे फोटो शिधापत्रिका व मुळ अर्जांवर लावण्यात आले आहेत.

२. सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ आणि सांगोला तालुक्यातील अन्नपुर्णा योजनेच्या लाभधारकांकडून उत्पन्नाचा दाखला, रहिवाशी असल्याबाबतचा दाखला, लाभधारकांचे फोटो, वय, उत्पन्न अवलंबिता याबाबत तपासणी करुन सर्व अर्जावर तलाठी/ग्रामसेवक यांच्या शिफारशी घेण्यात आल्या आहेत तसेच सर्व अर्जांवर तहसिलदारांची मंजूरी घेण्यात आली आहे.

३. उस्मानाबाद जिल्ह्यातील वाशी तालुक्यामध्ये अन्नपुर्णा योजनेअंतर्गत १२८ लाभार्थी निवडण्यात आले होते. यापैकी ३६ लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळत असल्यामुळे त्यांची नावे अन्नपुर्णा योजनेच्या लाभार्थी यादीतून वगळण्यात आली आहेत. या सर्व लाभधारकांडून उत्पन्नाचा दाखला, रहिवाशी असल्याबाबतचा दाखला, वय, उत्पन्न अवलंबिता याबाबत तपासणी करुन सर्व अर्जावर तलाठी/ग्रामसेवक यांच्या शिफारशी घेण्यात आल्या आहेत तसेच सर्व अर्जांवर तहसिलदारांची मंजूरी घेण्यात आली आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील अन्नपुर्णा लाभार्थ्यांची यादी तयार करण्याचे काम श्री. एस.आर.बळे, तत्कालीन तहसिलदार, वाशी श्री.एन.बी.लांडगे तत्कालीन नायब तहसिलदार, वाशी आणि श्री.ए.के.वाघमारे तत्कालीन अव्वल कारकून, वाशी यांनी केले होते. यापैकी श्री.एस.आर.बळे

आणि श्री.ए.के.वाघमारे हे सद्यःस्थितीत नायब तहसिलदार, तुळजापूर या पदावर कार्यरत आहेत. श्री.ए.के.वाघमारे यांनी वाशी तालुक्यातील अन्नपुर्णा योजनेच्या लाभार्थ्यांची निवड करताना शासन निर्णयातील तरतूदीचे पालन केले नसल्यामुळे त्यांना दि.०८.१२.२०१० रोजी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात येत असल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद यांनी दि.०९.१२.२०१० रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. (जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद यांच्या दि.०९.१२.२०१० रोजीच्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे.)

महालेखापाल कार्यालयाने एकूण १७ (अन्न धान्य वितरण अधिकारी पुणे आणि नागपूर यांच्या सह) जिल्ह्यांनी काही महिन्यांमध्ये विहीत मर्यादेपेक्षा जास्त धान्याचे वाटप केले असल्याबाबत आक्षेप घेतला आहे यासंदर्भात सर्व संबंधित जिल्ह्यांकडून माहिती मागविण्यात आली होती. जिल्ह्यांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार या जिल्ह्यांनी काही महिन्यांमध्ये जास्त धान्य वाटप केले असल्याचे निदर्शनास येत असून सदर जास्त धान्याचे वाटप मुख्यतः भारतीय अन्न महामंडळाच्या बेस डेपोमध्ये नियमित पुरेशा प्रमाणात धान्य उपलब्ध नसणे, धान्य उचलीच्या कालावधीत भारतीय अन्न महामंडळाचे धान्य उचलीच्या कालावधीत भारतीय अन्न महामंडळाचे धान्याचे रॅक लागल्यामुळे धान्य उचलीची कार्यवाही बंद असणे, त्यामुळे सदर धान्य पुढील महिन्यात किंवा शासनाकडून मुदतवाढ मिळाल्यानंतर उचल करुन वाटप करण्यात येते, या सर्व परिस्थितीत अन्नपुर्णा योजनेचे लाभार्थी शासकीय योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये याकरीता मागील कालावधीतील शिल्लक धान्यासोबत चालू महिन्याचेही धान्य वाटप केल्यामुळे त्या-त्या महिन्यामध्ये जास्त धान्याचे वाटप झाले असल्याचे दिसून येते. मात्र सर्व जिल्ह्यांनी त्यांना संपुर्ण वर्षाकरीता मंजूर केलेल्या धान्याच्या नियतनाच्या मर्यादेमध्येच धान्याचे वाटप केले आहे. ही बाब विचारात घेता जिल्ह्यांनी जास्त धान्याचे वाटप केले नाही तसेच त्यामुळे शासनास जादा खर्च करावा लागला अशी वस्तुस्थिती नाही.

**शिधावाटप पत्रिकेचा आढावा-**

८.१७ राज्यामध्ये तीन प्रकारच्या शिधावाटप पत्रिका वापरात आहेत. ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये एक लाखापेक्षा जास्त आहे त्यांना पांढरी शिधावाटप पत्रिका जारी करण्यात येते, ज्यांचे वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षा कमी परंतु रुपये २५,९०४ पेक्षा जास्त आहे त्यांना केशरी रंगाची शिधावाटप पत्रिका जारी करण्यात येते तर ज्यांचे वार्षिक उत्पन्न रुपये २५,९०४ पेक्षा कमी आहे त्यांना पिवळ्या रंगाची शिधावाटप जारी करण्यात येते. मार्च २००३ अखेर नऊ जिल्ह्यांमध्ये (शिधावाटप पत्रिकेतंर्गत

येणाऱ्या व्यक्तींची संख्या ४४७.५८ लाख) प्रकल्पीत लोकसंख्येपेक्षा (३३९.६३ लाख) १०७.९५ लाख जादा होती. एकूण लोकसंख्येमध्ये शिधावाटप पत्रिकेसाठी अर्ज न केलेल्या लोकांचाही अंतर्भाव असल्यामुळे ही तफावत विचार करण्यासारखी होती. विभागाने एप्रिल २००३ ते मार्च २००६ या कालावधीसाठी शिधावाटप पत्रिकेवरील एककांच्या संख्येबाबतची माहिती संकलित केलेली नव्हती.

अपात्र कुटुंब वगळण्यासाठी व पात्र कुटुंब अंतर्भूत करण्यासाठी पीडीएस (नियंत्रण) आदेश २००१ अनुसार राज्य शासनाला बीपीएल व अंत्योदय कुटुंबाच्या यादीचा प्रतिवर्ष आढावा घेणे आवश्यक आहे. याबाबत राज्य शासनाने जानेवारी २००३ मध्ये निर्देश जारी केले होते. उस्मानाबाद जिल्ह्यांमधील पांच गटामध्ये १,०६३ बीपीएल/एएवाय शिधावाटप पत्रिका १२ ते १६ महिन्यांच्या विलंबानंतर म्हणजे फेब्रुवारी-जुलै २००४ मध्ये रद्द करण्यात आल्या होत्या. शिधावाटप पत्रिका विलंबाने रद्द केल्यामुळे मध्यंतरीच्या कालावधीमध्ये अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा अपात्र शिधावाटप पत्रिका धारकांना करण्यात आला होता.

सात जिल्ह्यांमधील निवड करण्यात आलेल्या नमुना २१ गटांमध्ये असे निदर्शनास आले की, बीपीएल/एएवाय कुटुंबाचा आढावा सहा जिल्ह्यांमधील १४ गटांमध्ये घेण्यात आला नव्हता. मुंबई मध्ये ("ई" प्रभाग) ९७८ दुकानांपैकी ५०५ दुकानांमधील शिधावाटप पत्रिकांचा आढावा घेण्यात आला नव्हता.

**ज्ञापन :**

**८.१८** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने पुढील प्रमाणे खुलासा केला.

अ) नियंत्रक शिधावाटप कार्यालय.

माहे मार्च, २००३ अखेर राज्यातील ९ जिल्ह्यांमध्ये शिधावाटप पत्रिकेतंर्गत येणाऱ्या व्यक्तीची संख्या ४४७.५८ लाख दर्शविली असून ही संख्या अंदाजित लोकसंख्येपेक्षा (३३९.६३) १०७.९५ लाख ने जादा असल्याचे नमूद केले आहे. सदर ९ जिल्ह्यांमध्ये मुंबईचाही अंतर्भाव असल्याचे नमूद केले आहे. सदर ९ जिल्ह्यांमध्ये मुंबईचाही अंतर्भाव करण्यात आला असून विशेष म्हणजे या ९ जिल्ह्यांमध्ये ठाणे जिल्ह्याचा समावेश नाही. या ठिकाणी ही बाब स्पष्ट करावीशी वाटते की, मुंबईच्या माहितीमध्ये मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्राची एकत्रित माहिती दिलेली असते. तसेच मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात ठाणे जिल्ह्यातील ६ महानगरपालिका व दोन नगरपालिका क्षेत्रांचा समावेश होत असून यामध्ये जवळपास १ कोटी लोकसंख्या आहे. ही बाब विचारात घेता मुंबईमध्ये ठाणे जिल्ह्यातील मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात अंतर्भूत असलेल्या लोकसंख्येचा विचार केल्यास परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे अंदाजित लोकसंख्येपेक्षा शिधापत्रिकेंतर्गत येणाऱ्या व्यक्तींची संख्या जास्त दिसणार नाही. तसेच उलटपक्षी मुंबई-

ठाणे शिधावाटप क्षेत्रामध्ये मार्च २००३ च्या एकूण शिधापत्रिकांचा विचार केल्यास मार्च, २००३ मध्ये एकूण ३९६३९०६ एवढ्या शिधापत्रिका होत्या. त्यापैकी सदर शिधापत्रिकेमधून ठाणे जिल्ह्यातील मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात समाविष्ट असलेल्या एकूण ११६३१५८ शिधापत्रिका आहेत. सदर ठाणे जिल्ह्यातील शिधापत्रिका वजा केल्यास मुंबई शहरातील शिधापत्रिकांची संख्या २८००७४८ एवढी राहील. मुंबई शहरातील ठाणे जिल्ह्याच्या शिधापत्रिका वजा करुन येणारी शिधापत्रिकांची संख्या विचारात घेतल्यास ती अंदाजित लोकसंख्येपेक्षा जास्त होणार नाही. या उपर मार्च, २००३ मध्ये मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रामध्ये वर नमूद केल्याप्रमाणे ३९६३९०६ एवढ्या शिधापत्रिका असल्यामुळे सदर शिधापत्रिका या मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रामधील एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात योग्य असल्याचे दिसते.

**रास्त भाव दुकानांचे कामकाज-**

८.१९ रास्त भाव दुकानांच्या कार्यक्षम कामकाजावरच पीडीएसचे यश मोठ्या प्रमाणावर अवलंबून असते. पीडीएस नियंत्रण आदेश २००१ मध्ये विनिर्दिष्टित करण्यात आले आहे की रास्त भाव दुकान अनुज्ञप्ती धारकाला लाभधारकांची यादी, हक्कदार अत्यावश्यक वस्तुची यादी, जारी करण्याचे प्रमाण व तक्रार निवारण करणारे अधिकारी याबाबतचा तपशील दुकानावर दर्शविणे आवश्यक आहे, असे निदर्शनास आले की (सप्टेंबर २००५) मध्ये सात जिल्ह्यांत १४ दुकांनांमध्ये असा तपशील नोटीस बोर्डावर दर्शविण्यात आला नव्हता व ५९ दुकांनांमध्ये दर्शविण्यात आलेली माहिती अपूर्ण होती. नियंत्रण आदेशानुसार अन्नधान्याचे नमुने दर्शविणे आवश्यक असतांनाही २९ दुकांनामध्ये असे नमुने दर्शविण्यात आलेले नव्हते. जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांद्वारा रास्त भाव दुकांनांना नियमित भेटी देऊन पीडीएस नियंत्रण आदेशांचे पालन होते की नाही याबाबत विभागाने खात्री करुन घेतली नव्हती.

**ज्ञापन :**

**८.२०** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने पुढील प्रमाणे खुलासा केला.

सप्टेंबर, २००५ मध्ये ज्या सात जिल्ह्यातील एकूण १०२ रास्तभाव दुकानांच्या तपासणीमध्ये त्रुटी आढळून आल्याचे नमूद केले आहे, ती दुकाने कोणत्या जिल्ह्यातील व कोणत्या तालुक्यातील आहेत, याबाबतची माहिती देण्यात आलेली नाही.

त्यामुळे त्या रास्त भाव दुकानासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची पडताळणी करता येत नाही. असे असले तरी लाभार्थ्यांची यादी, हक्कदार, अत्यावश्यक वस्तूची यादी, देय प्रमाण, इत्यादीबाबतची माहिती दर्शविणे व पॉलीथीन पिशव्यांमधून धान्याचे नमुने प्रदर्शित करणे, इत्यादि बाबत शासनाने वेळोवेळी आदेश काढून क्षेत्रिय कार्यालयांना सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार क्षेत्रीय कार्यालयातील संबधित

अधिकाऱ्यांकडून सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार क्षेत्रीय कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांकडून रास्तभाव दुकानांना भेटी देवून पी.डी.एस नियंत्रण आदेश-२००१ मधील तरतूदींचे पालन होते की नाही, याबाबत खात्री केली जाते. ज्या रास्तभाव दुकानदारांकडून शासनाच्या आदेशांचे पालन केले जात नसल्याचे आढळून येते, त्यांच्याविरुद्ध दंडनीय कारवाईसह दुकान निलंबित अथवा रद्द करण्याची कार्यवाही सक्षम प्राधिकाऱ्यांकडून करण्यात येते.

**रास्त भाव दुकानांचे निरीक्षण-**

८.२१ सार्वजनिक वितरण व्यवस्था (नियंत्रण) आदेश २००१ मध्ये असे विहीत करण्यात आले होते की, राज्य शासनाने रास्त भाव दुकानांचे पदनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याद्वारे कमीत कमी सहा महिन्यातून एकदा नियमित निरीक्षण होते की नाही याबाबत खात्री करुन घेणे आवश्यक होते. त्यानुसार, विभागाने रास्त भाव दुकानांचे निरीक्षण करण्यासाठी अतिरिक्त जिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार, पुरवठा निरीक्षण अधिकारी व पुरवठा निरिक्षक अशा विविध अधिकाऱ्यांच्या बाबतीत निकष निश्चित केले होते.

सोलापूर जिल्हांमध्ये ३,५१६ ते ३,६२४ दुकानांचे निरीक्षण २०००-०५ या कालावधीत करणे आवश्यक होते. परंतु, निश्चित करण्यात आलेले लक्ष्य २,३०० ते ३,४८० दुकाने एवढेच होते व त्यात तीन ते ५५ टक्के तुटवडा होता. या कमी निश्चित करण्यात आलेल्या लक्ष्याच्या तुलनेत प्रत्यक्ष कामगिरीमध्ये २०००-०५ या कालावधीत चार ते ५८ टक्के तुटवडा होता. जिल्हा पुरवठा अधिकारी सोलापूर यांनी नायब तहसिलदारांसाठी कोणतेही लक्ष्य निश्तिच केले नव्हते.

सिंधुदूर्ग जिल्ह्यांच्या दोन गटामध्ये लक्षपूर्ती मधील तुटवडा ११ ते ४८ टक्के होता. जालना व उस्मानाबाद जिल्ह्यांमध्ये व पुणे जिल्ह्यांच्या तीन गटामध्ये निश्चित करण्यात आलेले लक्ष्य व त्यांची पूर्ती याबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नव्हती.

लेखापरीक्षणाने विभागीय अधिकाऱ्यांसोबत केलेल्या सिंधुदूर्ग जिल्ह्यामधील तीन गटामधील १२ दुकानांच्या संयुक्त तपासणीत असे निदर्शनास आले की, विभागीय अधिकाऱ्यांनी आठ दुकांनांचे निरीक्षण मागील दोन ते पाच वर्षामध्ये केलेलेच नव्हते. अशा रितीने, रास्त भाव दुकानांचे निरीक्षण विविध जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांकडून दुर्लक्षित केले गेले होते. निरिक्षणाअभावी रास्त भाव दुकानांचे कार्य व्यवस्थीतपणे चालते की नाही याबाबत खात्रीकरुन घेण्यात येत नव्हती.

**ज्ञापन :**

**८.२२** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने पुढील प्रमाणे खुलासा केला.

राज्यातील रास्तभाव दुकानांच्या तपासण्या करण्याबाबत पी.डी.एस.नियंत्रण आदेश-२००१ पूर्वीही दिनांक १२.११.१९९१, दिनांक २७.५.१९९२, दिनांक ५.६.१९९७ व दिनांक १३.७.१९९९ तसेच त्यानंतर दिनांक १७.४.२००१ व दिनांक ६.९.२००३ च्या शासन निर्णय व परिपत्रकान्वये आदेश पारित करुन अधिकाऱ्यांच्या विविध स्तरावर करावयाच्या रास्त भाव दुकान तपासणीचे प्रमाण ठरवून दिले आहे.

तथापि, काही जिल्ह्यांमध्ये विहित प्रमाणापेक्षा कमी तपासण्या झाल्या असल्याचे निदर्शनास आले आहे. शासनाने ठरविलेल्या प्रमाणानुसार रास्त भाव दुकानांच्या तपासण्या करण्याबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्यांना शासन स्तरावरुन वेळोवेळी सूचना देण्यात येतात. प्रस्तुत परिच्छेदामधील आक्षेपास अनुसरुन रास्तभाव दुकानाच्या तपासण्या विहित प्रमाणानुसार कटाक्षाने व काटेकोरपणे करण्याबाबत पुन्हा नव्याने क्षेत्रिय अधिकाऱ्यांना शासनस्तरावरुन सूचना देण्यात येतील.

**साक्ष :**

८.२३ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक १९.१.२०११ व दिनांक १.३.२०११ रोजी सचिव अन्न व नागरी पुरवठा यांची साक्ष तर दिनांक २९.६.२०१० रोजी ओरस जि.सिंधुदूर्ग येथे स्थानिक विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

८.२४ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या दिनांक ३१ मार्च, २००६ रोजी संपलेल्या अहवाल वर्षातील नागरी अहवालातील परिच्छेद क्रमांक ३.७ "अन्न सुरक्षा, अनुदान व अन्नधान्याचे व्यवस्थापन" मध्ये अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या संबंधात माहितीचा आढावा घेतलेला आहे. त्यामध्ये एकूण १९ परिच्छेद आहेत. त्यापैकी केवळ १३ परिच्छेदांची माहिती विभागाने दिलेली आहे व ६ परिच्छेदांची माहिती समितीच्या साक्षीच्या बैठकीच्या दिवसापर्यंत अप्राप्त होती. तसेच, ज्या १३ परिच्छेदांची माहिती विभागाने दिलेली आहे ती समितीच्या बैठकीच्या केवळ एक दिवस अगोदर दिलेली आहे. त्यामुळे समितीला त्यावर आधारित प्रश्नावली व अनुपूरक प्रश्नावली तयार करता आली नाही. असे सचिवाच्या निदर्शनास आणून दिली त्याचबरोबर दुसऱ्या महत्त्वाच्या गोष्टीकडे विभागाचे लक्ष वेधले की, या १३ परिच्छेदांची माहिती ज्या प्रकारे समिती कार्यालयास प्राप्त झाली त्यावरुन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामध्ये समन्वय कक्षाचे अस्तित्व आहे की नाही असा प्रश्न उपस्थित होतो. कारण ज्या ज्या कार्यासनाशी संबधित हे परिच्छेद होते त्या त्या कार्यासनाच्या कक्ष अधिकाऱ्यांनी त्याबाबतची माहिती समितीला परस्पर दिलेली आहे. समित्यांच्या कामकाजासंदर्भात प्रत्येक

मंत्रालयीन विभागामध्ये एक मध्यवर्ती स्वतंत्र समन्वय कक्ष असतो आणि त्या कक्षामार्फत विभागामध्ये असलेल्या विविध कार्यासनाशी संबंधित कामांचा समन्वय साधून समितीला वैधानिक माहिती एकत्रित स्वरुपात उपलब्ध करुन दिली जाण्याची प्रथा गेल्या अनेक वर्षांपासून अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग वगळता इतर विभागामध्ये सुरु आहे. त्याप्रमाणे अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत केलेले दिसून येत नाही. जर विभागामध्ये अशाप्रकारचा समन्वय कक्ष अस्तित्वात असेल तर प्रत्येक कार्यासनाकडून स्वतंत्रपणे माहिती का आणून देण्यात आली. तसेच, दिलेली माहिती ही समितीच्या बैठकीच्या केवळ एक दिवस प्राप्त झाल्याने समिती कार्यालयास त्यावर आधारित प्रश्नावलीही तयार करता आली नाही. समितीचे सदस्य समितीच्या बैठकीमध्ये एक बेस म्हणून या प्रश्नावलीचा वापर करतात व विषयांच्या अनुषंगाने उपस्थित होणारे इतर अनुपुरक प्रश्नही समितीच्या बैठकीत विचारले जातात. परंतु स्पष्टीकरणात्मक ज्ञापने बैठकीचा आदल्या दिवशी प्राप्त झाल्यामुळे समिती कार्यालयास प्रश्नावली तयार करता आली नाही व समिती सदस्यांना ज्ञापने व त्या अनुषंगाने तयार करण्यात येणारी प्रश्नावली बैठकीच्या आदल्या दिवशी प्राप्त न झाल्याने त्यांना सदर परिच्छेदाचा अभ्यास करता आला नाही.

८.२५ विभागाकडून माहिती बैठकीच्या आदल्या दिवशी प्राप्त झाल्यामूळे समितीच्या सदस्यांना पूर्वतयारी करण्यासाठी आवश्यक तेवढा अवधी मिळाला नसल्यामुळे समितीच्या दि.१९ जानेवारी, २०११ रोजीच्या बैठकीचे कामकाजास सुरुवात करण्यापूर्वी मा.समिती प्रमुखांनी समितीची नाराजी विभागाच्या अधिकाऱ्यांसमोर व्यक्त केली. वेगवेगळ्या विभागांच्या संदर्भात लोकलेखा समितीच्या बैठकीत चर्चा केली जाते. कमी अधिक प्रमाणात त्या त्या विभागाचे सचिव, सह सचिव, उप सचिव समितीने लेखापरिक्षणासंदर्भात ज्या परिच्छेदांवर आक्षेप घेतलेले असतात, त्या आक्षेपांचे समाधान करतात व पर्यायाने समितीचे काम पूर्ण करण्यास मदत करत असतात. लोकलेखा समितीपुढे साक्षीसाठी येणाऱ्या विविध विभागांच्या अनुभवावरुन दुर्दैवाने समितीस नाईलाजास्तव असे मत व्यक्त करावे लागत आहे की, अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून समितीला योग्य तो प्रतिसाद मिळत नाही. विभागाच्या अधिकाऱ्यांकडून समितीला जी वेळोवेळी आश्वासित माहिती दिली पाहिजे जी वेळेवर मिळत नाही. परंतु, काही तुरळक अपवाद वगळता आश्वासित माहिती वेळेवर सादर केली जाताना दिसत नाही. याबाबतीत मंत्रालयीन सर्वच विभागाची एकंदर उदासिनताच दिसून येते. त्यामुळे इतर विभागांच्या तुलनेने अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाबाबतीत समितीचे काम फार मागे राहिलेले आहे.

८.२६ या संदर्भात सचिवांनी समितीस असे सांगितले की, समितीने उपस्थित केलेल्या मुद्दयाची नोंद विभागाने घेतलेली आहे. यापुढे अशाप्रकारची परिस्थिती उदभवू न देण्याची दक्षता घेतली जाईल. तसेच, समन्वय म्हणून सह सचिव श्री. माळवदकर यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. समितीला जी माहिती सादर करावयाची होती त्यापैकी बरीचशी माहिती जिल्ह्यांकडून येत असते. बऱ्याचशा जिल्ह्यांकडून ही माहिती येण्यास उशीर झाल्यामुळे विभागास ती समितीला सादर करण्यास उशीर झालेला आहे. बैठकीपूर्वी या विषयाबाबत सचिवांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांची एक बैठक घेतली होती त्यावेळी माहिती वेळेवर सादर करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. तसेच, पुणे येथे दिनांक ४ फेब्रुवारी, २०११ रोजी एक राज्यस्तरीय बैठक घेतली जाणार आहे. त्या बैठकीतही हा विषय चर्चेला घेतला जाणार आहे. समितीने मागितलेली माहिती वेळेवर मिळाली पाहिजे यामध्ये कोणाचेही दुमत होणार नाही. याची नोंद विभागाने घेतली असून अशी परिस्थिती पुन्हा उद्‌भवू नये याकरिता योग्य ती कार्यवाही करण्याचे प्रयत्नही केले जातील असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले.

८.२७ सर्वसामान्य माणसाला, गरिबांना अन्नधान्य मिळावे या हेतूने सार्वजनिक वितरण व्यवस्थेची यंत्रणा उभी केलेली आहे. एखाद्या स्वस्त धान्य दुकानदाराला दुकान दिल्यानंतर त्याला किती कमिशन दिले जाते ? तसेच, एक हजार युनिटला एकूण किती टन धान्याचा पुरवठा सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमातून वाटप करण्यासाठी केला जातो ? त्याच्याकडे १० हजार युनिट असतील तर त्याला किती कर्मचारी दिले जातात ? त्याला महिन्याला किती फायदा होतो ? तसेच १० हजार युनिटची परवानगी असलेल्या स्वस्त धान्य दुकानाला किती टन धान्याचा पुरवठा वितरणासाठी केला जातो ? त्याला किती कमिशन मिळते आणि स्वस्त धान्य दुकानामध्ये किती माणसे कामासाठी दिली जातात ? या सर्व-मुद्दयांची माहिती समितीला देण्यासंदर्भात विभागीय सचिवांना सुचित केले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, या प्रश्नाची व्याप्ती फार मोठी आहे. तसेच या प्रश्नाच्या बाबतीत अभ्यास सुरु आहे. एका स्वस्त धान्य दुकानामध्ये ए.पी.एल. व बी.पी.एल. अशी वेगवेगळी रेशनकार्डे असतात. या वेगवेगळ्या उत्पन्न गटांचे किमान मासिक उत्पन्न किती असावे याबाबतचे वर्गीकरण/विश्लेषण (ॲनेलिसिस) करुन तसेच स्वस्त धान्य दुकानांना कमीत कमी किती उत्पन्न मिळावे याबाबत योग्य तो निर्णय घेण्यांत येईल. समितीने विचारलेल्या प्रश्नाची व्याप्ती मोठी असल्यामुळे सदर माहिती समितीला लेखी स्वरुपात द्यावी असे निदेश समितीने विभागास दिले होते विभागाकडून एका रेशन दुकानदाराला एकूण किती कोटा मंजूर केला जातो. या संदर्भातील माहिती खालीलप्रमाणे प्राप्त झाली.

८.२८ सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत दुकाननिहाय अन्नधान्याचे नियतन मंजूर केले जात नसून, शिधापत्रिकानिहाय अन्नधान्याचे नियतन मंजूर केले जाते.

शिधावस्तूंच्या किंमती व परिमाण पुढील प्रमाणे ठेवण्यात आले होते.

| **अ.क्र.** | **वस्तूचे नाव** | **सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरित करण्यात येणाऱ्या शिधा वस्तुंच्या किंमती (रुपये प्रति किलो/लिटर)** | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | बीपीएल | अंत्योदय अन्न योजना | अन्नपूर्णा योजना | एपीएल |
| १ | गहू | ५.०० | २.०० | विनामुल्य | ७.२० |
| २ | तांदुळ | ६.०० | ३.०० | | ९.६० |
| ३ | साखर | १३.५० | १३.५० | १३.५० | २०.०० |
| ४ | तूरडाळ | ५५.०० | ५५.०० | ५५.०० | ५५.०० |
| ५ | पामतेल | ३०.०० | ३०.०० | ३०.०० | ३०.०० |

| **अ.क्र.** | **वस्तूचे नाव** | **सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरित करण्यात येणाऱ्या शिधा वस्तुंच्या वाटपाचे परिमाण (दरमहा)** | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | बीपीएल | अंत्योदय अन्न योजना | अन्नपूर्णा योजना | एपीएल |
| १ | गहू व तांदूळ | ३५ किलो प्रतिकार्ड (गहू + तांदुळ) | ३५ किलो प्रतिकार्ड (गहू + तांदुळ) | १० किलो प्रतिकार्ड (गहू + तांदुळ) | १५ किलो प्रतिकार्ड (गहू + तांदुळ)* |
| २ | साखर | ५०० ग्रॅम प्रति माणशी | ५०० ग्रॅम प्रति माणशी | ५०० ग्रॅम प्रति माणशी | २ किलो प्रतिकार्ड |
| ३ | तूरडाळ | १ किलो प्रतिकार्ड | १ किलो प्रतिकार्ड | १ किलो प्रतिकार्ड | १ किलो प्रतिकार्ड |
| ४ | पामतेल | १ किलो प्रतिकार्ड | १ किलो प्रतिकार्ड | १ किलो प्रतिकार्ड | १ किलो प्रतिकार्ड |

तसेच, स्वस्त धान्य दुकानदारास या धान्यामध्ये प्रति क्विंटलमागे ५० रुपये इतके कमिशन दिले जाते.

**८.२९** समितीने उपस्थित केलेला दुसरा मुद्दा म्हणजे दुकानदाराला पुरेसे उत्पन्न मिळाले नाही तर, ते गैरव्यवहार करु शकतात. हे प्रकार कसे कमी करता येतील याबाबतीतही योग्य तो अभ्यास करुन योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले. तसेच ही दुकाने महिला बचत गटांना प्राधान्याने देण्याचे शासनाचे धोरण आहे. असेही सचिवांनी समितीला सांगितले.

८.३० या स्वस्त धान्य दुकानांमधून धान्याची अफरातफर होते की नाही ? तसेच, या स्वस्त धान्य दुकानांमध्ये गोडावूनमधून पुरविण्यात येणाऱ्या धान्याच्या विवरणपत्रामध्ये व प्रत्यक्ष वाटप करण्यात येणाऱ्या धान्यामध्ये गैरव्यवहार होतो का ? विवरणपत्रावर दाखविण्यात आलेले सर्व धान्य सार्वजनिक

वितरण प्रणालीद्वारे वाटप केले जाते की, त्यापैकी काही धान्याचे काळा बाजार होऊन ते खुल्या बाजारामध्ये चढ्या भावाने विकून नफा कमविला जातो ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, सन २००७ मध्ये ही स्वस्त धान्य दुकाने बचत गटांना देण्याचा निर्णय घेण्यात आला होता परंतु, त्यावर काही लोक कोर्टात गेल्यामुळे त्याच्या अंमलबजावणीस उशीर झाला. त्यानंतर सुप्रिम कोर्टाच्या निर्णयानुसार सन २०१० पासून नव्याने द्यावयाची स्वस्त धान्य दुकाने महिला बचत गटांना देण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु, या गोष्टीचा महत्त्वाचा भाग म्हणजे ही स्वस्त धान्य दुकाने महिला बचत गटांना दिल्यानंतर ती चालविण्याची त्यांची आर्थिक कुवत आहे की नाही ? या दुकानांपासून त्यांना उत्पन्न मिळणार की नाही ? त्यांना काही उधारी किंवा अन्य मदत देता येईल का याबाबत अभ्यास सुरु आहे.

८.३१ तसेच स्वस्त धान्य दुकानांमधून होणाऱ्या धान्याच्या अफरातफरीच्या संदर्भात विभागाने निश्चितरित्या कारवाईच्या प्रक्रियेस सुरुवात केलेली आहे.

८.३२ यापूर्वी ज्यांना स्वस्त धान्य दुकानाचे वाटप केले असेल ती स्वस्त धान्य दुकाने बंद असतील तर ती महिला बचत गटांना दिली पाहिजेत. महिला बचत गटांना ही दुकाने दिली तर गुंतवणुक, जागा, साठवण, देखभाल इत्यादी प्रश्नही येतात. तर अशी बंद असलेली दुकाने महिला बचत गटांना देण्याबाबत शासनाचे नेमके धोरण काय आहे. विभागाकडून बचत गटांना रेशन दुकान देण्याबाबतचे प्रमाणक काय आहेत याविषयी समितीला खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

८.३३ "शासन निर्णय दिनांक ३.११.२००७ नुसार सध्याची रास्त भाव दुकाने/किरकोळ केरोसीन परवाने तसेच ठेवून, आजमितीस रद्द असलेली व यापुढे रद्द होणारी, राजीनामा दिलेली व लोकसंख्या वाढीमुळे द्यावयाची, तसेच, विविध कारणांमुळे भविष्यात द्यावयाची रास्तभाव दुकाने व किरकोळ केरोसीन परवाने स्वयंसहायता गटांना देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच, जेथे स्वयंसहायता गट उपलब्ध होणार नाहीत अशा ठिकाणी सध्याच्या प्राथम्यसूचीनुसार रास्तभाव दुकाने व किरकोळ केरोसीन परवाने मंजूर करण्यात यावीत असाही निर्णय शासनाने घेतला आहे.

८.३४ रास्तभाव दुकाने व किरकोळ केरोसीन परवाने मंजूर करण्याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते.

(अ) ज्या गावात/क्षेत्रात, नवीन रास्तभाव दुकाने व किरकोळ केरोसीन परवाना मंजूर करावयाचा असेल तेथे एकाच वेळी एकत्रित जाहिरनामा प्रसिद्ध करण्यात यावा.

(ब) ज्या गावात क्षेत्रात रास्तभाव दुकान अस्तित्वात असेल व आता फक्त किरकोळ केरोसीन परवाना मंजूर करावयाचा असेल तेथे फक्त किरकोळ केरोसीन परवाना मंजूर करण्यासाठी जाहिरनामा प्रसिद्ध करण्यात यावा.

(क) ज्या गावात/क्षेत्रात, किरकोळ केरोसीन परवाना अस्तित्वात असेल व आता फक्त रास्तभाव दुकान मंजूर करावयाचे असेल तेथे फक्त रास्तभाव दुकान मंजूर करण्यासाठी जाहिरनामा प्रसिद्ध करण्यात येतो.

**स्वयंसहायता गटांकडून अर्ज मागविणे व स्वयंसहायता गटाची निवड करणे-**

**८.३५** उपरोक्त प्रमाणे प्रसिद्ध केलेल्या जाहिरनाम्यास प्रतिसाद म्हणून संबंधित गावातील/क्षेत्रातील स्वयंसहायता गटांनाच अर्ज करता येईल. अशा स्वयंसहायता गटांकडून आलेल्या अर्जांमधून, स्वयंसहायता गटाची निवड खालीलप्रमाणे करण्यात येते-

(अ) स्वयंसहायता गटांची निवड करताना महिला स्वयंसहायता गटांना प्रथम प्राधान्य राहील. महिला स्वयंसहायता गट उपलब्ध न झाल्यास पुरुष स्वयंसहायता गटाचा विचार करण्यात यावा. स्वयंसहायता गटाची निवड करताना, ज्येष्ठ, वर्धनक्षम व नियमित कार्यरत असलेल्या, अंतर्गत व्यवहार पारदर्शक व परतफेड चोख व नियमित असलेल्या स्वयंसहायता गटास प्राधान्य देण्यात यावे. निवड करावयाच्या गटाचे हिशेब व लेखे अद्ययावत असावेत व परतफेडीचे प्रमाण किमान ८०% असावे.

(ब) स्वयंसहायता गटांची निवड करण्याचे काम सध्याचे रास्तभाव दुकाने व किरकोळ परवाना मंजूर करणारे परवाना प्राधिकारी (सध्या मुंबई ठाणे शिधावाटप क्षेत्रात नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, पुणे, नागपूर व सोलापूर शहरात सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी व अन्य क्षेत्रात संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी परवाना मंजूर करणारे प्राधिकारी आहेत.) यांच्या अध्यक्षततेखालील समिती करेल.

(क) या समितीमध्ये संबंधित जिल्हा समन्वयक माविम, प्रकल्प संचालक ग्रामीण विकास यंत्रणा किंवा किमान वर्ग-२ दर्जाचा प्रतिनिधी व संबंधित तहसिलदार हे सदस्य असतील. आदिवासी प्रकल्प क्षेत्रातील तालुक्यांमध्ये, प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास, महानगरपालिका क्षेत्रात संबंधित प्रभाग अधिकारी व नगरपालिका क्षेत्रात मुख्याधिकारी, नगरपालिका यांना या समितीवर सहसदस्य म्हणून घेण्यात यावे."

८.३६ विभागीय सचिवांनी असेही सांगितले की, छत्तीसगढमध्ये स्वस्त धान्य दुकान बाबतीत जी व्यवस्था आहे तिचा अभ्यास केला असता तेथे बऱ्याच सुधारणा झालेल्या असल्याचे दिसून आले. त्यांच्या प्रमाणे करावयाचे झाले तर विभागाला २-३ गोष्टी कराव्या लागतील. त्याबाबतीत विभाग एक कॅबिनेट नोटही तयार करीत आहे. छत्तीसगढमध्ये त्यांनी जेवढी व्यक्तिगत स्वस्त धान्य दुकाने होती ती त्यांनी सहकारी संस्था किंवा महिला बचतगटांना तसेच ग्रामपंचायत सारख्या संस्थांना चालविण्यास दिल्याचे निदर्शनास येते.

८.३७ याबाबतीत एक टाईप प्लान करुन प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये दोन भाग असणारी दुकाने नव्याने बांधली पाहिजेत. त्यामध्ये फ्रंट पोर्शन म्हणजे सेलिंग एरिया असला पाहिजे. त्याचप्रमाणे धान्य स्टोअरेज करण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली पाहिजे. तसेच, रेशन घेण्यास येणाऱ्यांनाही उभे राहण्यासाठी काही व्यवस्था केली पाहिजे. तसेच, राज्य व राष्ट्रीय स्तरावर आज संगणकीकरणाचे प्रयत्न सुरु आहेत. रेशनिंग कार्डच्या बाबतीत संगणकीकरणाचे नियोजन करण्याबाबत ग्रामविकास विभागाच्या मदतीने ग्रामीण भागामध्ये व नगरविकास विभागाच्या वतीने शहरी भागात प्रयत्न करता येतील का ? त्याकरिता आर्थिक सहाय्य उपलब्ध होऊ शकेल का याबाबतीत चर्चा केली जाईल. रेशनकार्डद्वारे स्वस्त धान्य देण्याची मूलभूत सुविधा सगळीकडे उपलब्ध झाली पाहिजे यामध्ये कोणाचे दुमत होणार नाही.

८.३८ शासन सार्वजनिक वितरण प्रणाली या माध्यमातून राज्यातील १० टक्के किंवा अधिक ए.पी.एल.व बी.पी.एल.जनतेवर ७ हजार कोटी रुपये खर्च करते. या सबसिडीमधून शासन निरनिराळ्या प्रकारच्या अन्नधान्य वाटपाच्या योजना राबविते या सर्व योजनांच्या माध्यमातून शासन एकूण ११००० कोटी रुपयांची सबसिडी बी.पी.एल. आणि ए.पी.एल. धान्यांवर प्रदान करते. याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, याकरिता लवकरच विभागाच्या माध्यमातून उपाययोजना करण्यात येणार आहेत.

८.३९ सार्वजनिक वितरण प्रणाली मधील गोंधळाला आळा घालण्याकरिता सार्वजनिक वितरण प्रणाली लवकरात लवकर फुल प्रुफ बनविणे आवश्यक आहे. या प्रणालीमध्ये कोणत्याही प्रकारचे घोटाळे व काळाबाजार होण्याकरिता त्रुटी राहता कामा नये, असे समितीने मत व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, याकरिता संगणकीकरण करण्याचा प्रस्ताव उच्चाधिकारी समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे. परंतु सार्वजनिक वितरण प्रणालीमध्ये बायोमॅट्रिक्स सिस्टम येणार आहे, असे एका वर्षापासून विभागाकडून सांगण्यात येत आहे याबाबत समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, बायोमॅट्रिक्स व संगणकीकरणाचे प्रयत्न गेल्या दीड वर्षापासून

चालू आहेत. परंतु, यामध्ये काही तांत्रिक आणि वस्तुनिष्ठ अडचणी येत आहेत, बायोमॅट्रिक्स आणि संगणकीकरणाकरिता पतदर्शी प्रकल्प यंत्रणा सातारा जिल्ह्यामध्ये राबविण्याचे प्रस्तावित आहे. यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांच्या पातळीवर बैठकाही झालेल्या आहेत. छत्तीसगड राज्यामध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण करण्यात आलेले असून त्या अंतर्गत प्रायण गोदाम तसेच लाभार्थी व शिधावाटप दुकाने यांची माहिती ऑन लाईन प्रणालीनुसार कार्यान्वीत करण्यात येते. यामध्ये अद्याप बायोमॅट्रीक प्रणाली अंतर्भूत करण्यात आलेली नाही. सार्वजनिक वितरण प्रणालीमध्ये त्रुटींमुळे होणाऱ्या गैरव्यवहारांना आळा घालण्याकरिता ही प्रणाली सुधारण्याची विभागाची तयारी आहे. तसेच याकरिता विभागास लोकप्रतिनिधींच्या सूचनांची आणि सहकार्याची आवश्यकता आहे असेही सचिवांनी समितीस सांगितले.

८.४० सार्वजनिक वितरण प्रणालीचे संगणकीकरण कधी होणार? या समितीने विचारलेल्या प्रश्नाबाबत विभागाकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली. "या विभागाच्या e-PDS योजनेअंतर्गत सातारा जिल्ह्यात पथदर्शी प्रकल्प राबविण्याची योजना आहे, या योजनेअंतर्गत बायोमॅट्रीक माहितीसह UIDAL अंतर्गत प्राप्त होणारा माहिती कोष (Database) चा वापर करण्यात येत आहे.

८.४१ UIDAI योजनेसंदर्भात सातारा येथे राबविण्यात येणाऱ्या पथदर्शी प्रकल्पामध्ये UIDAI अंतर्गत बायोमेट्रीक डेटासह माहिती कोष उपलब्ध होत असल्याने सदर बाब वगळून पुढील घटकांचा समावेश करुन प्रस्ताव दि.१५/२/२०११ रोजी उच्चाधिकार समितीच्या बैठकीत सादर करण्यात आला आहे.

Ration Card Management

FPS Management

Back-Office Application

Supply Chain Management

M.I.S.

८.४२ सदर खर्च भागविण्याकरिता सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दिनांक १८/६/२०१० मध्ये नमूद केल्यानुसार ई-गर्व्हनन्स विषयी योजनांच्या अंमलबजावणीसाठी सन २०१०-११ या आर्थिक वर्षापासून विभागाकरिता असलेल्या नियतव्ययापैकी अर्धा टक्का इतके नियतव्यय दरवर्षी राखून ठेवण्याचे निर्देश आहेत.

या विभागाच्या योजनांतर्गत व योजनेत्तर असे मिळून एकूण तरतूद ही रु.३८४१.०५ कोटी इतकी असून त्याच्यात अर्धा टक्का म्हणजे रु.१९.५० कोटी इतकी येते. म्हणजेच सन २०१०-११ या आर्थिक

वर्षासाठी रु.१९.५० कोटी इतका निधी ई-गर्व्हनन्स प्रकल्पासाठी या विभागास उपलब्ध आहे. या निधीमधून पथदर्शी प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

८.४३ सदर पथदर्शी प्रकल्प सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी पार्क, पुणे विद्यापीठ येथे स्थित या केंद्र शासनाच्या सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी विभागाच्या अंगीकृत संस्थेकडून राबविण्यात येणार आहे. उपरोक्त प्रस्तावानुसार पथदर्शी प्रकल्प यशस्वीरित्या सातारा जिल्ह्यात अंमलबजावणी झाल्यानंतर अशाच प्रकारचे पथदर्शी प्रकल्प सर्व जिल्ह्यामध्ये राबविण्यात येणार आहेत. संगणीकरण प्रकल्प संपूर्ण राज्यात राबविण्याकरिता सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी या संस्थेचा प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्त करण्याचे देखील प्रस्तावित सातारा येथे पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी तयार करण्यात आलेले सॉफ्टवेअर ॲप्लीकेशन राज्यव्यापी प्रकल्प राबविताना वापरण्यात येणार असल्याने राज्यव्यापी प्रकल्पामध्ये सॉफ्टवेअर ॲप्लीकेशनसाठी स्वतंत्र वित्तीय भार येणार नाही. परिणामी प्रकल्पाच्या खर्चामध्ये बचत होईल. सदरचा पथदर्शी प्रकल्प पूर्ण होण्यास साधारणत: आठ महिन्यांचा कालावधी अपेक्षित आहे."

८.४४ शिधावाटप वितरण व्यवस्था संगणीकृत करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी, केंद्र सरकार, पुणे विद्यापीठ आणि अन्न व नागरी पुरवठा विभाग, महाराष्ट्र शासन यांनी पब्लिक डिस्ट्रिब्यूशन सिस्टिमबाबत एक ई-गव्हर्नन्स प्रोजेक्ट तयार केलेला आहे त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येणार आहे व पायलट प्रोजेक्ट सातारा जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

८.४५ त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, ग्रामीण भाग, ग्रामीण भागातील शिक्षित, अशिक्षित जनता, ग्रामीण भागात उपलब्ध असलेल्या संगणकीय पायाभूत सुविधा, ग्रामीण भागातील भाषा यांचा विचार पायलट प्रोजेक्ट राबविण्यापूर्वी विभागाने करावा. संगणक हाताळण्याचे ज्ञान असलेल्या लोकांची संख्या शहरी भागामध्ये मोठया प्रमाणावर असली तरी ग्रामीण भागात अद्यापपर्यंत लाखो लोकांना संगणक कसा असतो, याचेही ज्ञान नाही. त्यामुळे संगणकीकृत व्यवस्था निर्माण करतांना प्रत्यक्षात जनतेला त्याचा उपयोग करता आला पाहिजे, याचाही विचार करणे गरजेचे आहे.

८.४६ सातारा जिल्ह्यात पायलट प्रोजेक्ट सुरु करण्यात येणार आहे. या माध्यमातून प्रकल्प राबविण्यायोग्य आहे किंवा नाही, किती लोक त्याचा प्रत्यक्षात उपयोग करतात, त्यामध्ये कोणकोणत्या अडचणी आहेत, कोणते बदल करावे लागतील, याची सर्व माहिती विभागाला मिळणार आहे. त्याचा अभ्यास केल्यानंतरच संपूर्ण महाराष्ट्रात हा प्रकल्प राबविण्याचा निर्णय घ्यावा व आवश्यक

सामुग्री/मशिनरी खरेदी करावी, अशीही समितीची सूचना आहे. अन्यथा, सामुग्री/मशिनरी येऊ पडेल, ती कार्यान्वित करण्यात येईल. परंतु लोकांचा सहभाग नसल्यामुळे ती धुळ खात पडेल, असे होऊ नये. याचीही दक्षता विभागाने घ्यावी अशीही सूचना समितीने विभागास केली.

८.४७ महालेखाकारांनी असे मत व्यक्त केले की, To make this discussion effective can you tell the time frame in which the biometrics will be completed? याबाबत सचिवांनी खुलासा केला की, या विषयाच्या संदर्भात एक वेगळी बैठक आयोजित करण्याची गरज आहे. कारण यामध्ये समितीचा अधिक वेळ जाण्याची शक्यता आहे. यासंदर्भात पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन करण्यात येणार असल्याचे सचिवांनी सांगितले व त्यास समितीने मान्यता दिली. त्यानुसार दिनांक १/३/२०१२ रोजीच्या बैठकीत विभागाने शिधावाटप वितरण व्यवस्थेसंदर्भात संगणकीय सादरीकरण केले.

८.४८ अन्नसुरक्षा अनुदान व अन्नधान्ये वाटप, अर्थसंकल्प व खर्च या संदर्भात सचिवांनी समितीस अशी माहिती दिली की, ए.पी.एल.च्या धान्य खरेदी व वाटपामध्ये झालेल्या कमी खर्चाबाबत मुद्दा उपस्थित केलेला आहे. या परिच्छेदाचे खात्याने जे उत्तर दिलेले आहे, ते असे आहे की, मध्यंतरी सार्वजनिक वितरण प्रणालीचे धान्याचे दर आणि खुल्या बाजारातील धान्याचे दर यामध्ये जास्त तफावत नसल्यामुळे ग्राहक व लाभार्थींनी खुल्या बाजारातूनच धान्य विकत घेणे पसंत केलेले आहे. यामुळे पी.डी.एस.ची धान्याची उचल कमी झालेली आहे. यावर महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले की, The Planning Commission has made study in the year २००५-०६ and it has been found that in Maharashtra there are maximum number of exclusions. The genuine people have been excluded from the system. The poorest of the poor have not been included in this whereas there has been inclusion of wrong category in this. Efforts should be made to improve the situation. You are saying that you are introducing biometrics and you are making efforts to improve the situation. Our question is what improvements have occurred in the system ?

८.४९ याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, नॅशनल कॉन्सिल ऑफ अप्लाईड इकॉनॉमिक रिसर्चने महाराष्ट्रातील सार्वजनिक वितरण प्रणालीचा अभ्यास केलेला आहे. राष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्रातील सार्वजनिक वितरण प्रणालीबाबत ५-६ मुद्दे उपस्थित झालेले आहेत यामध्ये काही मुद्दे इन्क्लूजन ॲन्ड इनक्यूजन ऑफ एरर संदर्भात आहेत. एक्सक्लूजन मुद्यांमध्ये एक मुद्दा असा आहे की, पात्रता नसतांनाही काही लाभार्थ्यांची नावे बी.पी.एल.यादीमध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहेत. इन्क्लूजन मुद्यांमध्ये एक मुद्दा असा आहे की, पात्रता असतांनाही काही लाभार्थ्यांची नावे

बी.पी.एल.च्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात आलेली नाहीत. यामुळे जनमाणसांमध्ये एक प्रकारचा असंतोष निर्माण होतो.

८.५० केंद्र सरकार बी.पी.एल. लाभार्थी अंतर्गत एकूण ६५.३४ लाख लाभार्थी विचारात घेऊन अन्नधान्य देते. परंतु प्रत्यक्षरित्या सर्वेक्षणानुसार आणि बी.पी.एल. च्या आताच्या यादीनुसार ६९.१४ लाख लाभार्थी असून त्याप्रमाणात अन्न धान्य आवश्यक आहे. बी.पी.एल. लाभार्थीचे प्रमाण वाढविण्याचा व बी.पी.एल. यादीमध्ये समावेश करण्याकरिता (I.R.D.P.) सन १९९७ च्या आणि सन २००२ च्या पहाणीचा संदर्भ घ्यावयाचा हेही ठरविणे आवश्यक आहे. काही ठिकाणी रेशन दुकानदारांनी व पांढऱ्या शिधापत्रिकाधारकांनी स्वस्त धान्याकरिता बोगस रेशनकार्ड काढलेले आहेत.

८.५१ आय.आर.डी.पी.च्या १९९७ च्या सर्वेक्षणानुसार अनेक बी.पी.एल. आणि ए.पी.एल.कार्डधारकांची नावे अपात्र व पात्र आहेत. तसेच, सन २००२ च्या पाहणीनुसार बरेच लोक बी.पी.एल. ची मर्यादा ओलांडून ए.पी.एल.मध्ये आलेले आहेत. तसेच, काही लोक ए.पी.एल.मधून बी.पी.एल.मध्ये आलेली असतात. त्याचप्रमाणे बी.पी.एल. आणि ए.पी.एल. च्या यादीमध्ये अन्य पात्र नावांचा समावेश होऊन या टक्क्यामध्ये वाढ होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. केंद्रशासनाने या बीपीएल लाभार्थ्यांची संख्या वाढविण्याची आवश्यकता आहे. सन २००२ च्या सर्वेनुसार बीपीएल लाभार्थ्यांना शिधापत्रिका देण्याच्या अनुषंगाने विभागाच्या माध्यमातून तशा प्रकारचा प्रस्ताव तयार करुन मंत्रीमंडळाच्या मान्यतेकरिता पाठविण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

८.५२ बोगस रेशन कार्ड वगळण्याचे काम विभागाच्या माध्यमातून चालू आहे, असे विभागाचे म्हणणे आहे. खऱ्या लाभार्थीची नावे बी.पी.एल. आणि ए.पी.एल.यादीमध्ये येत नाहीत. दुकानदारांकडूनच २०० ते ४०० बोगस रेशनकार्ड वापरले जातात. त्या बोगस रेशन कार्डवर धान्य घेऊन काळया बाजारात चढया भावाने त्याची विक्री करुन नफा कमाविला जातो. बोगस रेशनकार्ड शोध मोहिमेनुसार कार्ड कमी झाल्यामुळे त्या प्रमाणात दुकाने कमी झाली का? या संदर्भात विभागाकडून खालील माहिती प्राप्त झाली.

८.५३ "शासन परिपत्रक दिनांक ११.९.२००९ च्या परिपत्रकान्वये सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना राज्यात अपात्र शिधापत्रिका शोध मोहिम राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार राज्यात १२.७५ लक्ष एवढ्या शिधापत्रिका अपात्र ठरुन रद्द करण्यात आलेल्या आहेत व त्या प्रमाणात सदर शिधापत्रिकेवरील अन्नधान्याचा कोटाही कमी करण्यात आला आहे. अपात्र शिधापत्रिका शोध मोहिमेंतर्गत शिधापत्रिकाधारकांना विनामूल्य विहित नमून्यातील फॉर्म्स पुरविण्यात येऊन सदर फॉर्ममध्ये शिधापत्रिकाधारकांनी स्वत:ची व कुटूंबाची माहिती भरुन निवासाच्या पुराव्याचे कागदपत्रासह फॉर्म

शिधावाटप दुकानात जमा करावयाचा होता. ज्या शिधापत्रिका धारकांनी विहित नमून्यातील फॉर्म व निवासी पुरावा सादर केला अशा शिधापत्रिकाधारकांच्या शिधापत्रिका तपासणीअंती पूर्ववत सुरु ठेवण्यात आल्या असून ज्या शिधापत्रिकाधारकांनी विहित नमून्यातील फॉर्म व निवासी पुरावा सादर केला अशा शिधापत्रिकाधारकांच्या शिधापत्रिका अपात्र ठरवून रद्द करण्यात आलेल्या आहेत. विशिष्ट युनिट संख्येवर तसेच महसूली गावाच्या असंमत तत्त्वावर दुकानाची आवश्यकता ठरविली जात असल्याने शिधा पत्रिका रद्द करण्यामुळे दुकाने कमी होण्याचा प्रश्न उद्‍भवत नाही".

८.५४ सहावा वेतन आयोग लागू झालेल्या पगारदार लोकांची नावे ए.पी.एल.यादीतून वगळण्यात यावीत कारण त्यांचे उत्पन्न सहजपणे १,००,००० पेक्षा जास्त झालेले आहे, ए.पी.एल.ची उत्पन्न मर्यादा ओलांडलेल्या उत्पन्नधारकांस ए.पी.एल.चे धान्य देणे हे इतर ए.पी.एल.धारकांवर अन्याय केल्यासारखे आहे. यासंदर्भात विभागाने क्षेत्रीय यंत्रणेला योग्य त्या सूचना दिलेल्या आहेत. तसेच ए.पी.एल. शासकीय कर्मचारी, पगारदार लोक यांनी रेशनकार्ड प्राप्त करुन घ्यावे काय याबद्दल सचिवांनी भाष्य करण्याचे नाकारले. परंतु पगारदार शासकीय कर्मचाऱ्यांचे रेशन बंद करण्याबाबत काय कार्यवाही करण्यात येत आहे याबाबत माहिती विभागाकडून खालीलप्रमाणे प्राप्त झाली.

८.५५ "मा.सर्वोच्च न्यायालयाने याचिका क्र.१९६/२००१ अंतर्गत दिनांक ३१.८.२०१० रोजी झालेल्या सुनावणीत खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत:-

अ) सर्व प्रकारच्या अनधिकृत (बोगस) शिधापत्रिकांच्या संदर्भात वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, ज्यांच्याकडे अद्यापी अनधिकृत (बोगस) शिधापत्रिका आहेत, त्यांनी त्या जवळच्या पुरवठा कार्यालयात जमा कराव्यात.

ब) अनधिकृत (बोगस) शिधापत्रिकाधारकांनी त्यांच्या अनधिकृत (बोगस) शिधापत्रिका पुरवठा कार्यालयात जमा न केल्यास त्यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा.

सदर कार्यवाही दिनांक ३०.९.२०१० पर्यंत पूर्ण करणेबाबत सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना दिनांक ९ सप्टेंबर, २०१० च्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्या होत्या त्यानुसार राज्यात सप्टेंबर, २०१० अखेर १३६०६ एवढ्या शिधापत्रिका शिधापत्रिकाधारकांनी शासन जमा केल्या आहेत.

क) शासकीय कर्मचारी, निमशासकीय कर्मचारी, खाजगी कंपनी/कारखाने व ज्यांचे वार्षिक उत्पन्न रु.१ लाखापेक्षा जास्त आहे अशा आस्थापनेवरील कर्मचारी/अधिकारी यांच्याकडे असलेल्या शिधापत्रिका बदलून घेण्याबाबत संबंधित कार्यालयांना व कर्मचाऱ्यांना कळविण्याबाबत दिनांक ४.११.२०१० च्या

बैठकीत सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत व त्यानुसार सर्वच जिल्ह्यात कार्यवाही सुरु आहे."

८.५६ रेशन कार्डांचा कोणकोणत्या ठिकाणी कोणत्या स्वरुपात वापर करुन घेता येऊ शकतो. याकरिता विभागाने सूचना काढून त्या विभागीय तालुका पातळीवर जारी केलेल्या आहेत. रेशन कार्डाचे पुरावा दाखवून कोणत्याही गृहसंकुल योजनेमध्ये बी.पी.एल. आणि ए.पी.एल.धारक म्हणून कार्ड दाखवून त्याचा वापर करुन फायदा करुन घेणे किंवा त्या कार्डावर धान्य घेणे योग्य नाही. याकरिता विभागाने योग्य त्या सूचना विभागीय व तालुका पातळीवर जारी केलेल्या आहेत. असे विभागीय सचिवांनी सांगितले असता, यावर महालेखाकारांनी असे मत व्यक्त केले की, There is repeatedly exclusion and inclusion errors. Now, we are in year २०११. Recently, the State Government is taking initiatives and there is going to be analysis of the B.P.L. with regard to the education income criteria and other parameters. We would like to question whether the department is now taking concerted efforts ? What efforts is the department taking to ensure that the system is full-proof ? यावर सचिवांनी सांगितले की, We have taken number of measures. We are introducing biometrics. UDI linked ration cards.

८.५७ ज्यावेळी तहसिल कार्यालयामध्ये कार्ड देण्यात येतात त्यावेळी ज्या इसमाला कार्ड दिले जाते. त्या इसमाच्या शेतीचा ७/१२ व घराचा तपशील तहसिल कार्यालयामध्ये उपलब्ध असतो. त्याच्या कार्डानुसार मेळ घालणे आवश्यक आहे. सार्वजनिक वितरण प्रणालीमध्ये कार्ड देण्याकरिता, उत्पन्नाचा मेळ घालण्याकरिता सक्षम यंत्रणा तयार करणे आवश्यक आहे. समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, जमीन व घर वडिलांच्या नावावर दाखवून मुलगा स्वत:जवळ काहीही नाही असे दाखवून बी.पी.एल.कार्ड मिळवून योजनेचा लाभ घेतो. तसेच केंद्र सरकारचे बी.पी.एल.च्या यादीबाबतचे जे धोरण आहे, त्यामध्ये केंद्रशासनाने केलेल्या निश्चित सूचनांचा सविस्तरपणे विचार करण्याची गरज आहे. दहा वर्षांपासून एकाच सर्वेक्षणाचा संदर्भ बी.पी.एल.यादीकरिता घेतला जातो. हे चुकीचे आहे. बदलती आर्थिक परिस्थिती ही सतत चालू राहणारी पद्धती असून ही संपूर्णपणे आर्थिक घटना (टोटली इकॉनॉमिकल फिनोमेना) आहे. दहा वर्षांमध्ये अनेक लोक श्रीमंत होतात, तसेच गरीबही होतात. बी.पी.एल.आणि ए.पी.एल.ची यादी तयार करण्याकरिता जे संदर्भ घेण्यात येतात, ते गोठावता (फ्रिज करता) येत नाहीत. याबाबत सचिवांनी समितीस माहिती दिली की, ग्रामीण भागामध्ये ग्रामविकास विभाग आणि शहरी भागामध्ये नगरविकास विभाग बी.पी.एल.आणि ए.पी.एल. ची यादी तयार करण्याकरिता नोडल एजन्सी म्हणून काम करीत असतात. यांना केंद्रशासनाच्या प्लानिंग कमिशनचे गाईडलाईन्स

असतात. या नोडल एजन्सीने या यादी तयार करीत असतांनाही पात्र उमेदवार (लाभार्थी) राहून गेले असतील किंवा काही अपात्र लाभार्थ्यांची नावेही या यादीमध्ये समाविष्ट केली जात असतील तर त्याची चौकशी करुन योग्य ती कारवाई केली जाईल व यासंदर्भातील पात्र व अपात्र उमेदवारांच्या नावाबाबत करावयाची ती योग्य कारवाई चावडीवाचनाच्या माध्यमातून केली जाईल, असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले.

८.५८ गेल्या २० वर्षापासून मुंबईमध्ये बी.पी.एल.ची यादी तयार केली गेली असून मुंबईमधील बी.पी.एल.ची यादी अंतीम स्वरुपाची करण्याची कार्यवाही नगरविकास विभागामार्फत सुरु असल्याचे विभागाने लेखी स्वरुपात कळविले आहे. याबाबत असे निदर्शनास आणण्यात येते की, मुंबई मधील बी.पी.एल. यादीच्या संदर्भात विभागीय सचिवांनी समितीला अशी माहिती दिली होती की, मुंबई मधील बी.पी.एल.ची यादी आय.आर.डी.पी.च्या सर्व्हेनुसार तयार केली असून ती अंतिमत: वित्त आयोगासमोर मान्यतेकरिता पाठविण्यात आलेली आहे. समितीच्या बैठकीचे कार्यवृत्त सचिवांना पाठविल्यानंतर त्यामध्ये बदल करुन त्यांनी अंतीम स्वरुपाची कार्यवाही नगरविकास विभागामार्फत सुरु असल्याचे समितीस कळविले आहे. दोन्ही उत्तरात विरोधाभास असल्याचे समितीला दिसून येत असल्याने अन्न व नागरी पुरवठा विभागाने नगरविकास विभागाकडे पाठपुरावा करुन मुंबईमधील बी.पी.एल.संदर्भात समितीस माहिती कळविणे आवश्यक आहे असे समितीने सूचित केले.

८.५९ मुंबई मधील बी.पी.एल.यादीच्या संदर्भात अन्न व नागरी पुरवठा विभागाने नगरविकास विभागाकडे लेखी मागणी केली आहे. मुंबई आणि ठाण्याची अंतिम यादी नगरविकास विभागाने तयार केलेली नाही. यासंदर्भात सर्व्हे केलेला आहे. त्यांनी अजूनपर्यंत अंतिम यादी तयार केलेली नाही. अंतीम यादी प्राप्त झाल्यानंतर यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले. मुंबई व ठाण्यातील बी.पी.एल.यादीच्या संदर्भात सचिवांनी समितीस अशी माहिती दिली की, रजिस्ट्रेशन रेकॉर्ड तसेच पीडीएस रेकॉर्ड क्रॉस चेक करणार आहोत. तहसिल कार्यालयाकडून सर्व माहिती तपासली जाईल. आता शासन यु.आय.डी. लिंक्ड रेशन कार्ड प्रस्तावित करीत आहे. तसेच संगणकीकरण करण्यासाठी निविदा माहिती व तंत्रज्ञान विभागाने अंतिम केली आहे.

८.६० तसेच सन २००२ ची बी.पी.एल. यादी कधी अंमलात येणार याबाबतची माहिती विभागाकडून पुढीलप्रमाणे प्राप्त झाली. "सन २००२ मधील दारिद्र्यरेषेखालील ग्रामीण भागातील सर्वेक्षणाचे काम ग्रामविकास विभागाच्या यंत्रणेमार्फत तर शहरी भागातील सर्वेक्षणाचे काम नगर विकास विभागाच्या यंत्रणेमार्फत करण्यात येते. ग्रामीण भागातील सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले असून शहरी

भागातील सर्वेक्षणाचे काम अंतिमतः नुकतेच पूर्ण झाले असून त्यानुसार पात्र लाभार्थ्यांना शिधापत्रिका वितरीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे."

८.६१ गावातील एखाद्या बचत गटाने दुकानदाराविषयी तक्रार केल्यास त्यासंदर्भातील योग्य ती चौकशी पूर्ण केल्यानंतर जिल्हा पुरवठा अधिकारी दुकानाचा परवाना रद्द करतो. त्यानंतर संबंधित दुकानदार आयुक्तांकडे जाऊन स्थगिती मिळवून घेतो, अशा वेळेस विभागाकडून कोणती कार्यवाही केली जाणार आहे ? यामधील सत्यता पडताळूनच संबंधित दुकानदाराचा परवाना रद्द करावा किंवा कसे यासंदर्भातील योग्य तो निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. याकरिता कोणते धोरण ठरविले जाणार आहे ? याबाबत विभागीय सचिवांनी असे सांगितले की, यामध्ये संबंधित दुकानदाराची चौकशी केल्यानंतर त्याच्या दुकानाचा परवाना रद्द करावा किंवा कसे याबाबत उचित निर्णय घेतला जातो. जर एखाद्या दुकानदाराचे परवाना रद्द करण्याचा निर्णय झाला असेल तर, त्याला नैसर्गिक न्यायाच्या तत्वावर म्हणणे, दुकानदाराला त्याची बाजू मांडण्याची संधी दिली जाते. त्यावेळी त्यांना अपील करण्याची संधी दिली जाते. यासंदर्भात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही केली जाते. यासंदर्भात योग्य ती चौकशी करुन वस्तुनिष्ठ निर्णय घेतला जातो.

८.६२ एखाद्या दुकानदाराने अपील केल्यानंतर त्याच्या बाजूने निर्णय गेलेला आहे किंवा त्याच्या विरोधात निर्णय गेलेला आहे याची प्रत्येक जिल्ह्याची माहिती विभागाकडे उपलब्ध आहे काय ? यामध्ये बहुतांश दुकानदाराच्या बाजूने निर्णय लागतो, ही वस्तुस्थिती आहे. यासंदर्भात मागाहून पुरविली. लेखी स्वरुपात माहिती खालीलप्रमाणे आहे.

**क्षेत्रिय स्तरावर निलंबित / रद्द केलेल्या रास्तभाव दुकानांच्या**
**अपील प्रकरणांवरील निर्णयांचा जिल्हानिहाय तपशील-ना.पु.२१/२३ (२०१०)**

| जिल्हा | सुनावणी अंती मंजूर | सुनावणी अंती नामंजूर |
|---|---|---|
| **मुंबई** | १४४ | ९ |
| **ठाणे** | १८ | १ |
| **रायगड** | ७ | १ |
| **रत्नागिरी** | ० | ० |
| **सिंधुदुर्ग** | ० | ० |
| **औरंगाबाद** | २ | ० |
| **जालना** | ३ | ० |
| **परभणी** | १ | ० |
| **हिंगोली** | ० | ० |

| | | |
|---|---|---|
| **बीड** | ४ | ० |
| **नांदेड** | २ | ० |
| **उस्मानाबाद** | २ | ० |
| **लातूर** | ० | ० |
| **पुणे** | २ | ३ |
| **सोलापूर** | ८ | ३ |
| **सातारा** | -- | -- |
| **सांगली** | ५ | -- |
| **कोल्हापूर** | २ | -- |
| **नाशिक** | ४ | -- |
| **जळगांव** | ३ | -- |
| **धुळे** | १३ | ९ |
| **नंदुरबार** | ४ | -- |
| **अहमदनगर** | ३ | -- |
| **अमरावती** | ८ | २ |
| **वाशिम** | ४ | २ |
| **अकोला** | २ | -- |
| **यवतमाळ** | ७ | २ |
| **बुलडाणा** | ५ | -- |
| **नागपूर** | १३ | -- |
| **वर्धा** | -- | -- |
| **गोंदिया** | -- | -- |
| **चंद्रपूर** | -- | -- |
| **गडचिरोली** | -- | -- |
| **भंडारा** | ३ | १ |
| **एकूण** | **२६९** | **३३** |

क्षेत्रिय स्तरावर निलंबित / रद्द केलेल्या रास्तभाव दुकानांच्या अपील प्रकरणांवरील निर्णयांचा जिल्हानिहाय तपशील विभागाने दिलेला आहे. त्यामध्ये मुंबई जिल्ह्यात सुनावणीअंती मंजूर १४४ प्रकरणे व सुनावणीअंती नामंजूर ९ प्रकरणे आहेत. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये सुनावणीअंती एकूण २६९ प्रकरणे मंजूर तर ३३ प्रकरणे नामंजूर झालेली आहेत. विभागाने दिलेल्या आकडेवारीवरुन दिसून येते की, नामंजूर झाल्याची प्रकरणे फारच कमी आहेत. अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय

सचिवांनी सांगितले की, कोणती प्रकरणे नामंजूर करावीत यासंदर्भातील निर्णय क्वासी ज्युडिशिअल ॲथॉरिटी (Quasijudicial Authority) घेते. तेव्हा त्यावर विभागाने भाष्य करणे योग्य होणार नाही.

८.६३ वैजापूर जि.औरंगाबाद येथे ११३ किरकोळ रॉकेल धारकांचे परवाने आहेत. पण आज त्यांना १० वर्षे होऊनसुध्दा त्यांचे नूतनीकरण करण्यात आलेले नाही. यामध्ये जुन्या दुकानदारांचे संबंधितांबरोबर हितसंबंध जुळलेले आहेत. तेच दुकानदार त्याचा फायदा उचलतात. यासंदर्भात सचिवांनी समितीला अशी माहिती दिली की, चुकीच्या लोकांना दुकानाचे परवाने दिल्याची औरंगाबादमधील घटना सर्वांनाच माहित असेल. यासंदर्भात जिल्हाधिकारी आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना निर्गमित केल्या होत्या. त्यानंतर अनेक लोकांच्या दुकानांचा परवाना रद्द करण्याची कार्यवाही करण्यात आली होती. तसेच ज्यांनी चुकीच्या मार्गाचा अवलंब करुन दुकानाचे परवाने दिले होते, अशा संबंधित लोकांच्या विरोधात कारवाई करण्याच्या सूचना विभागाला दिल्या होत्या. तसेच बी.पी.एल. सर्व्हेचे काम सुशिक्षित बेरोजगारांच्या संस्थेस देण्यात आले होते. पण ते काम व्यवस्थित झाले नाही. अश्या तक्रारी होत्या. त्यामुळे यावेळेस बी.पी.एल. सर्व्हेचे काम करताना सुधारणा करण्यात याव्यात, असे निदेश समितीने विभागाला दिले.

८.६४ आदिवासींमधील पारधी, भिल्ल समाजाच्या लोकांचा समावेश बी.पी.एल.च्या यादीमध्ये झाला पाहिजे. कारण बी.पी.एल. ची यादी तयार करताना या समाजाचे लोक कधी ऊस तोडणीसाठी तर कधी विटांच्या कारखान्यात काम करण्यासाठी गेलेले असल्याने या यादीमध्ये त्यांचा समावेश होत नाही. त्यामुळे त्यांना या योजनेचा लाभ घेता येत नाही. या योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये भिल्ल व पारधी समाजाच्या लोकांचाही समावेश केला पाहिजे अशी सूचना समितीने विभागास दिली असता, विभागाकडून खालील माहिती प्राप्त झाली.

८.६५ "ग्रामविकास विभाग व नगर विकास विभाग यांचेकडून अनुक्रमे ग्रामीण व शहरी भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटूंबांचे सर्वेक्षण करण्यात येते. सदर विभागाकडून प्राप्त झालेल्या याद्यांनुसार व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार पात्र लाभार्थ्यांना या विभागाकडून दारिद्र्यरेषेखालील शिधापत्रिका वितरीत करण्यात येतात. सदर यादीमध्ये आदिवासी समाज भिल्ल, पारधी या समाजातील कुटूंबांचा समावेश असल्यास त्यांनाही दारिद्र्यरेषेखालील शिधापत्रिका वितरीत करण्यात येतील. विशिष्ट जाती अथवा समाजास पिवळ्या शिधापत्रिका देण्याचे धोरण नसून यादीतील कुटुंबांना पिवळ्या बीपीएल शिधापत्रिका देण्याचे धोरण आहे." याच संदर्भात समितीने असेही प्रतिपादन केले की, रेशनिंगचा कोटा वाढवून देण्यावर मर्यादा असली पाहिजे. कारण त्यामध्ये अनेकांचे इंटरेस्ट असतात. रेशनिंगचा कोटा हा

प्रत्येकासाठी असतो. कुटुंबातील वाढलेल्या सदस्याप्रमाणे तो वाढवून दिला जातो. हा रेशनिंगचा कोटा वाढवून देत असताना माननीय आमदारांनी सांगितले म्हणून वाढवून दिला असेही प्रकारही यामध्ये होतात. किंवा हा कोटा वाढवून देणाऱ्याकडून त्याला त्यामुळे काय फायदा होईल हे पाहिले जाते. दक्षता समितीचे सदस्य होण्यातही असे अनेकांची इच्छा असते तसाच हा प्रकार आहे. त्यामुळे या व्यवहारात पारदर्शकता आली पाहिजे. असे सूचित केले असता सचिवांनी रेशनिंग कोट्याच्या संदर्भात समितीला विनंती केली की, कोटा केवळ नियमाप्रमाणेच दिला जावा. नियमाव्यतिरिक्त तो कोणालाही वाढवून देता कामा नये अशी समितीने शिफारस केली पाहिजे. असे जर झाले तर, त्यामध्ये चालणारे गैरप्रकार बंद होतील.

८.६६ समितीने याच अनुषंगाने अहमदनगर जिल्ह्यात बावर नावाची एक गॅस वितरक कंपनी आहे. या कंपनीबाबत ग्राहकांना रेशनिंग कार्डाची पडताळणी (व्हेरिफिकेशन) न करणे, गॅसच्या सिलिंडरसाठी अधिकची रक्कम आकारुन, जेवढया किंमतीचे सिलिंडर आहे तेवढ्या किंमतीच्या पावत्या न देणे, गॅस सिलेंडरचे ब्लॅक मार्केटिंग करणे वगैरे तक्रारी आहेत. असे निदर्शनास आणून दिले असता या प्रकरणाबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, या प्रकरणी जिल्हा पुरवठा अधिकारी, अहमदनगर यांनी तपासणी केली असून त्यामध्ये सदर एजन्सी दोषी असल्याचे आढळून आले त्यामुळे सदर एजन्सी रद्द किंवा निलंबित करण्याची शिफारस भारत गॅस लिमिटेड यांच्याकडे केलेली आहे. **(विवरण क्र.१८)** कंपनी डिस्ट्रीब्युशनशिप मंजूर करते. एजन्सी व कंपनी यांच्यात करार झालेला असतो. जर कराराचा भंग झाला तर नैसर्गिक न्याय तत्त्वानुसार शो-कॉज नोटीस देऊन कारवाई करता येते. विभागाला इसेन्शिअल कमॉडीटीज ॲक्ट प्रमाणे तपासणी करण्याचे अधिकार आहेत.

८.६७ समितीने अशी विचारणा केली की, दिनांक २३ जानेवारी, २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार ग्रामीण पातळीवर दक्षता समिती, तालुका समिती, जिल्हा समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या समित्या आजच्या तारखेमध्ये अस्तित्वात आहेत का ? आणि जरी अस्तित्वात असल्या तरी त्या कार्यरत आहेत का ? कारण त्या अस्तित्वात असत्या तर इतक्या तक्रारी आल्याच नसत्या. असे समितीने प्रतिपादन केले असता विभागाकडून दक्षता समितीच्या कामकाजाबाबत पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली आहे.

- सार्वजनिक वितरण व्यवस्थेवरील देखरेखीत जनतेचा सहभाग राहण्याच्या दृष्टीने सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरीत करण्यात येणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंच्या वितरणावर देखरेख ठेवण्यासाठी राज्य शासनाने राज्यात ग्राम, तालुका, नगरपालिका, महानगरपालिका आणि

जिल्हास्तरावर दक्षता समित्या गठीत केल्या आहेत. तसेच राज्यस्तरीय सल्लागार समितीही गठीत करण्यात आली आहे.

- शासन निर्णय क्र.दक्षस-१००७/प्र.क्र.५४८/नापु-२१ दिनांक २३ जानेवारी, २००८, दिनांक ९ एप्रिल, २००८ दिनांक ३० ऑगस्ट, २००८, दिनांक २६ मे, २००९, दिनांक ५ एप्रिल, २०१० व दिनांक २१ ऑक्टोबर, २०१० तसेच, सदर क्रमांकाचे अर्धशासकीय पत्र दिनांक २२ एप्रिल, २००८ व ३ मे, २०१० व शासन परिपत्रक दिनांक ३ जुलै, २००९ व दिनांक २० मार्च, २०१० अन्वये दक्षता समित्यांबाबत आवश्यक त्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.
- शासन निर्णय दिनांक २३.०१.२००८ मधील मुद्दा क्र.७ मध्ये दक्षता समित्यांच्या बैठकांबाबत सविस्तर सूचना देण्यात आल्या असून, त्यामध्ये "दक्षता समित्या स्थायी स्वरुपाच्या समित्या असल्यामुळे त्यावरील सर्व किंवा काही अशासकीय सदस्यांची नियुक्ती होणे बाकी असले तरीही, दक्षता समित्यांच्या बैठका नियमितपणे घेण्यात याव्यात" असे नमूद करण्यात आले आहे.
- शासन परिपत्रक क्र.दक्षस-१००७/प्र.क्र.५४८/नापु-२१, दि.३.७.२००९ अन्वये सर्व स्तरावरील दक्षता समित्यांच्या बैठका नियमितपणे आयोजित न केल्यास, सर्व स्तरावरील दक्षता समित्यांच्या सदस्य सचिवांविरुद्ध कर्तव्यपुर्तीबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक), नियम, १९७९ चे उल्लंघन केल्याबाबत शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी व याबाबतची कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी यांनी करावी, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, यापुढे दक्षता समित्यांच्या बैठका नियमितपणे आयोजित केल्या जातात किंवा कसे या बाबीवर संबंधित अपर जिल्हाधिकारी आणि नियंत्रक शिधावाटप, मुंबई यांनी स्वत: जातीने लक्ष देऊन त्याबाबतचा अहवाल प्रधान सचिवांना प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेपर्यंत सादर करण्याबाबत उचित कार्यवाही करावी, अशा सूचनाही सदर शासन परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना देण्यात आल्या आहेत.
- मा.मंत्री (अ.ना.पु.व ग्रा.सं.) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या दिनांक १८.१.२०१० रोजीच्या राज्यस्तरीय आढावा बैठकीमध्येही विविध स्तरावरील दक्षता समित्यांचे गठन व त्यांच्या बैठका यासंबंधी चर्चा झाली असून त्या बाबत सर्व संबंधीतांना आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या आहेत.

- दक्षता समित्यांसंबंधीच्या विविध मुद्दांबाबत क्षेत्रिय स्तरावरुन मागविण्यात आलेल्या मार्गदर्शनास अनुसरुन शासन परिपत्रक दिनांक : २० मार्च, २०१० अन्वये सविस्तर सुचना देण्यात आल्या आहेत. या मध्ये इतर सुचनांबरोबरच दक्षता समित्यांच्या बैठका नियमितपणे घेण्याबाबत व दक्षता समित्यांच्या बैठका नियमितपणे आयोजित न करणाऱ्या सदस्य सचिवांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत तसेच याबाबतची माहिती शासनास सादर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.
- राज्याच्या विधानमंडळाच्या अधिवेशनांमध्ये दोन्ही सभागृहांमध्ये दक्षता समित्यांबाबत अनेक वेळा चर्चा झाली आहे. सन २०१० च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्येही सभागृहात दक्षता समित्यांविषयी मुद्दा उपस्थित होऊन त्यावर चर्चा झाली आहे. सदर अधिवेशनामध्ये विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक ५७६८ (घुईखेड, जिल्हा अमरावती येथील दक्षता समितीबाबत) संबंधी चर्चेवेळी मा.मंत्री महोदयांनी नियमितपणे दक्षता समित्यांच्या बैठका आयोजित न करणाऱ्या सदस्य सचिवांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत आश्वासन दिले आहे. तथापि, सदर आश्वासनाची प्रत अद्याप विभागास प्राप्त झालेली नाही.
- अर्धशासकीय पत्र दिनांक ०३ मे, २०१० अन्वये सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांच्या स्तरावरुन राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी व नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांना दक्षता समित्यांबाबतची व त्यांच्या बैठकांबाबतची माहिती तसेच, दक्षता समित्यांच्या बैठका नियमितपणे आयोजित न करणाऱ्या किती सदस्य सचिवांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे याबाबतची माहिती तात्काळ व यापुढे नियमितपणे शासनास सादर करण्याबाबत त्यांच्या स्तरावरुन सर्व संबंधितांना सुचना देण्यात याव्यात असे कळविण्यात आले आहे.
- शासन पत्र दिनांक ५ मे, २०१० अन्वये दक्षता समित्यांच्या बैठका नियमितपणे आयोजित न करणाऱ्या किती सदस्य सचिवांवर व कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली आहे याबाबतची माहिती शासनास सादर करण्याच्या सुचना नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई व सर्व उप आयुक्त (पुरवठा) यांना देण्यात आल्या आहेत.

गोडावून मधून येणाऱ्या प्रत्येक पोत्यातील धान्य कमी असते. दुसरे म्हणजे हे स्वस्त धान्य दुकानदार त्यांना जेवढ्या धान्याची उचल नेमून दिलेली असते त्याच्या अर्धीच धान्याची उचल करतात त्याकरिता अर्धेच चलन फाडले जाते. तसेच गोडाऊन मधून जे धान्य रेशनिंग दुकानामध्ये येते त्याचे

वजन कमी असते त्यामुळे त्याचा नाहक फटका रेशन दुकानदारांना बसतो याबाबत निश्चित वस्तुस्थिती काय आहे अशी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधीनी सांगितले की, एफ.सी.आय.कडून जे धान्य येते त्याचे इलेक्ट्रॉनिक काट्यावर वजन केले जाते. पोत्याच्या वजनामुळे ते वजन कमी जास्त होऊ शकते. तालुका स्तरावर धान्याचे ट्रक येतात, त्याचे मोजमाप केले आणि वजन कमी भरले तर त्याची तफावत त्यांनीच दूर करुन द्यायला हवी. इलेक्ट्रॉनिक काट्याने एकदा वजन केले, त्यानंतर पुन्हा वजन केले तर ते कमी दाखविते. अशा प्रकारच्या सिस्टीममध्ये उणिवा आहेत. सिस्टीममध्ये अशा काही प्रकरणात उणिवा निदर्शनास आल्या तर त्या कशा कमी होतील, त्याकडे लक्ष देण्यात येईल, असे सचिवानी सांगितले. याकरिता दुकान व गोडावून हे एकाच ठिकाणी असले पाहिजे व त्यावर नियंत्रण असले पाहिजे. त्याकरिता काही केले जाणार आहे का ? असे समितीने विभागीय सचिवांना विचारले असता, याबाबत सचिवांनी खुलासा केला की, यु.आय.डी. लिंक्ड अप व बायोमेट्रिक प्रणाली अवलंबिण्याचा जो विषय आहे त्यामध्ये याही गोष्टीचा समावेश केलेला आहे. त्याद्वारे असे प्रकार कसे कमी करता येतील याबाबत कार्यवाही केली जाणार आहे.

८.६८ अन्नधान्याचे वाटप एफसीआयकडून गोडाऊन व गोडाऊन ते रास्त भाव दुकानात कसे होते, याबाबतची माहिती विभागाकडून पुढीलप्रमाणे प्राप्त झाली. "मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्राव्यतिरिक्त जिल्हास्तरावर शासकीय गोदामातून सदर अन्नधान्य शिधावाटप दुकानदार त्यांच्या दुकानास संलग्न असलेल्या लाभार्थी संख्येनुसार तहसिलदारांकडे आवश्यक ती रक्कम चलनाने भरणा करुन उचल करतात. त्यासाठी त्यांना वाहतूक रिबेट देण्यात येते. मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रामध्ये दुकानदारांनी नियुक्त केलेल्या संलन्न संस्थामार्फत (नियंत्रक शिधावाटप, मुंबई यांनी मंजूरी दिलेल्या) भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून नियतनाची उचल करुन दुकानांमध्ये पोहचविण्यात येते. गोडाऊनमधून माल कधी येतो व बऱ्याचवेळा चलन अर्धे फाडण्यात येते त्यांच्यावरती काय नियंत्रण आहे याबाबतची विभागाकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली आहे.

८.६९ गोदाम व्यवस्थापकांना सुचना या पुस्तिकेतील सुचनानुसार रास्त भाव दुकानदारांना १००% पोत्यांचे वजन करुन दिले जाते. सर्व पोत्यांचे वजन हे रास्त भाव दुकानदार किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींना प्राधिकार पत्रावर (परमिट) नमूद करुन सदर धान्य वितरीत केले जाते. धान्य साठा कमी असल्यामुळे किंवा अन्य कोणत्या कारणांमुळे प्राधिकार पत्रात (परमिट) नमूद केलेले पूर्ण धान्याचे परिमाण दुकानदारास दिले नसल्यास प्राधिकार पत्रावर (परमिट) तशी नोंद घेऊन मूळ प्राधिकार पत्र दुकानदारास परत करण्यात येते. दुसऱ्यांदा धान्य देण्यापूर्वी राहिलेले धान्य तंतोतंत

बरोबर आहे. याची खात्री करुन शिल्लक धान्य पूर्णपणे दुकानदारास देण्यात येते व मूळ प्राधिकार पत्र (परमिट) गोदामातील अभिलेख्यात ठेवण्यात येते. तथापि, सध्या केंद्राकडून धान्याचा वाढीव कोटा मिळत असल्याने व त्यानुसार रास्त भाव दुकानदारांना वाढीव कोटा वितरीत करण्यात येत असल्याने शासकीय गोदामातून कमी धान्य देण्यात येत नाही".

८.७० राज्यात अनेक ठिकाणी गॅस सिलेंडरचा कृत्रिम तुटवडा निर्माण केला जातो. ९० टक्के सिलेंडरचा पुरवठा हॉटेल व्यावसायिकांना केला जातो. परिणामी घरगुती गॅस धारकांना त्याचा फटका बसतो आणि त्यांना प्रतिक्षेमध्ये रहावे लागते. एखाद्या विभागात १०० सिलेंडरचा पुरवठा करण्याची मागणी केली असता त्या ठिकाणी फक्त ५० सिलेंडर पुरविले जातात. उर्वरित ५० सिलेंडर शहरातील कागदोपत्री गॅसधारक नसणाऱ्या लोकांकडे असल्याचे निदर्शनास आलेले आहे. हे लक्षात घेता अनधिकृतपणे सिलेंडर वापरणाऱ्या लोकांचा शोध घेऊन त्यांच्या विरोधात कडक कारवाई करण्याची गरज आहे. असे समितीने विभागाला सुचित केले असता विभागाने अनधिकृतपणे जाणाऱ्या क्र.गॅस सिलेंडरच्या संदर्भात मार्केटमध्ये, हॉटेल चालकाकडे त्यावर केलेल्या पुढीलप्रमाणे माहिती दिली. "एलपीजी आदेश, २००० नुसार देण्यात आलेल्या अधिकारांतर्गत अशाप्रकारे अवैधरित्या घरगुती गॅस सिलेंडरचा वापर होत असल्याचे आढळून आल्यास सदर गॅस सिलेंडरचा साठा जप्त करण्यात येऊन सदर गॅस सिलेंडर संबंधित तेल कंपनीकडे सुपुर्द करण्यात येतात."

८.७१ घरगुती गॅस सिलेंडरचा उपयोग वाणिज्यिक प्रयोजनासाठी करण्यात येतो. उदाहरण बघितले तर हॉटेल मालकाने सिलेंडर वापरले तर हॉटेल मालकावर कारवाई करण्यात येते. परंतु, सिलेंडर कोणी उपलब्ध करुन दिले, याबाबतचा शोध घेतला जात नाही व त्यांच्यावर कारवाई होत नाही. जर वितरकांनी सिलेंडर उपलब्ध करुन दिले असेल तर त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे. त्याबाबत सचिवांनी असा खुलासा केला की, हा चौकशीचा भाग आहे. चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी हे शोधून काढले पाहिजे. विभागाकडून अशा सूचना देण्यात येतात की, सविस्तर चौकशी करावी व जे जे जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई करावी.

८.७२ यासंदर्भात जर कायदा अपुरा पडत असेल तर कायद्यात दुरुस्ती केली पाहिजे. आज सर्रास घरगुती गॅस सिलेंडरचा उपयोग व्यावसायिक कारणासाठी केला जातो. त्यामुळे त्यांना कायद्याचा बडगा दाखविला पाहिजे. असे समितीने मत व्यक्त केले असता, त्यावर सचिवानी खुलासा केला की, इसेंशिअल कमॉडिटी ॲक्टमध्ये केंद्र शासनाने विशेष तरतूद केली होती व हा अजामीनपत्र गुन्हा केला होता. ही दुरुस्ती सुरुवातीला ५ वर्षासाठी आणण्यात आली होती व त्यानंतर पुढे ५-५ वर्षासाठी ३ वेळा

मुदत वाढ देण्यात आली होती. सन १९९८ मध्ये ही विशेष तरतूद वगळण्यात आली. ही तरतूद असतांना अतिशय जलद निर्णय होत होते. विशेष न्यायालय स्थापन करण्याची सोय त्यामध्ये होती. हा गुन्हा अजामिनपत्र होता. परंतु ही तरतूद वगळण्यात आल्यामुळे आता हे निर्बंध राहिलेले नाहीत. गुजरात राज्याच्या माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली केंद्र शासनाने वर्किंग ग्रुप नेमलेला आहे. ही तरतूद पुन्हा आणावी. अशा प्रकारची शिफारस या वर्किंग ग्रुपने केलेली आहे. परंतु अद्याप केंद्र शासनाने निर्णय घेतलेला नाही. राज्य शासन असा कायदा करु शकत नाही कारण हा कायदा केंद्र सरकारचा आहे.

८.७३ विभागीय सचिवांनी केलेल्या उपरोक्त खुलाश्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, एखाद्या राज्याला गरज वाटत असेल तर कायदा केला पाहिजे. केंद्र शासनाच्या कायद्याशी सुसंगत कायदा राज्य शासन करु शकते. केंद्र शासनाने मुदतवाढ दिली नाही म्हणून राज्य सरकार गप्प बसू शकत नाही. या संदर्भात सचिवांनी असे सांगितले की, पूर्वी करण्यात आलेल्या तरतुदीमुळे जो फायदा होत होता तो आता कमी झाला आहे. म्हणून केंद्र शासनाला राज्य शासनाने अशी विनंती केली आहे की, इसेंशिअल कमॉडिटी ॲक्टमध्ये अजामिनपात्र गुन्ह्या संबंधात असलेल्या विशेष तरतूदीस मुदत वाढ देण्यात यावी.

८.७४ केंद्र सरकारचा कायदा असला तरी राज्य सरकार देखील आपला स्वतःचा कायदा करु शकते, फक्त तो घटनेशी विसंगत असता कामा नये. सन १९९८ पासून स्पेशल प्रोव्हीजन लॅप्स झाली त्यानंतर राज्य सरकारने या संदर्भात काहीही केले नाही. इन्सेन्शिअल कमॉडिटी ॲक्ट नुसार विभाग कारवाई करु शकते. याबाबत विभागीय सचिवांनी उपरोक्त विषयाचा अभ्यास करुन काय करता येईल ते पहावयास लागेल असे आश्वासन समितीस दिले. तसेच केंद्र सरकारने स्पेशल प्रोव्हिजनला मुदतवाढ नाकारल्यानंतर ही मुदतवाढ मिळण्यासाठी विभागाने वारंवार केंद्र सरकारकडे पाठपुरावा केलेला आहे. केंद्र सरकारने विशेष बाब म्हणून मुदतवाढ दिली तर विभागाला ती लगेच लागू करता येईल असेही सचिवांनी समितीस सांगितले.

८.७५ आताच्या प्रचलित कायद्यानुसार जर एखाद्याने गुन्हा केला तर त्यास शिक्षेची काय तरतूद आहे ? अशी समितीने विचारणा केली असता, सचिवांनी खुलासा केला की, एखाद्याने गुन्हा केला असेल तर त्याला सदर कायद्यातील कलम ७ (१) मधील पोट कलम (a) (i) नुसार एक वर्षापर्यंतची तुरुंगवासाची व पोट कलम (a) (ii) नुसार जास्तीत जास्त सात वर्षाच्या तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद आहे. त्यावर समितीने विचारणा केली की, आतापर्यंत एकाला तरी पाच वर्षे गुन्ह्याची शिक्षा केलेली आहे

काय ? जर एखादा कोणी सापडला तर त्यावर कायद्यानुसार कारवाई केली जात नाही ही वस्तुस्थिती आहे. याबाबत सचिवानी सांगितले की, कायद्यानुसार कारवाई करता येते. परंतु कायद्याचा वापर चांगला केला पाहिजे. तो तेवढया प्रमाणात झालेला नाही.

८.७६ घरगुती गॅस मार्केट/हॉटेलमध्ये वापरल्यानंतर काय दंड आकारण्यात येतो या प्रश्नाचे लेखी उत्तर पुढील प्रमाणे दिले आहे, "एलपीजी आदेश २००० नुसार देण्यात आलेल्या अधिकारांतर्गत अशा प्रकारे अवैधरित्या घरगुती गॅस सिलेंडरचा वापर होत असल्याचे आढळून आल्यास सदर गॅस सिलेंडरचा साठा जप्त करण्यात येऊन सदर गॅस सिलेंडर संबंधित तेल कंपनीकडे सुपूर्द करण्यात येतात. त्या अनुषंगाने दंडात्मक कारवाई संबंधित तेल कंपनीमार्फत करण्यात येते. याचा अर्थ कारवाई करण्याचा अधिकार संबंधित तेल कंपन्यांना आहे. आपणाला नाही." अवैधरित्या घरगुती गॅस सिलेंडरचा वापर केल्याचे आढळून आल्यानंतर पाच-सहा जणांना तरी आपण तुरुंगामध्ये पाठविले आहे काय ? त्यावर सचिवानी खुलासा केला की, नाशिकमध्ये जवळपास १६५ धाडी टाकल्या. त्यामध्ये जवळपास २१ जणांना अटक केलेली आहे. २० ठिकाणी गुन्हे दाखल केलेले आहेत. तर ३ लाख ८१ हजार रुपयांची मालमत्ता जप्त केलेली आहे. यासंदर्भात महालेखाकारांनी मत व्यक्त केले की, I would like to point out one case of Jalgoan District. During our field inspection report/audit on २३rd December, २०१० there were १० to १२ kerosene trucks. However, the D.S.O.,Jalgaon do not found any G.P.S. system. Sir, G.P.S. system was not installed there. The Department should prevent the black marketing of kerosene. I would request the departmental representative to take action in this matter. याबाबत विभागाने असा खुलासा केला की, This is very vital issue and we will look into it. बऱ्याच ठिकाणी जी.पी.एस.सिस्टीम बसविली आहे. परंतु ती प्राथमिक अवस्थेत असल्यामुळे ती पूर्णपणे कार्यान्वित झालेली नाही. ज्याठिकाणी जी.पी.एस.सिस्टीम बसविली नाही त्याठिकाणी ती बसविण्याची कार्यवाही जिल्हा प्रशासनामार्फत सुरु आहे.

८.७७ महालेखाकारांनी विभागीय सचिवांना विचारणा केली की, The departmental representative just now explained to this august Committee that they are taking one pilot project in Satara District. We have just pointed out one example of black-marketing of kerosene in Jalgaon District. If necessary I will also give the evidance. The department should have a time frame policy to implement the new system effectively. याबाबत सचिवांनी असे सांगितले की, आता सर्व ठिकाणी जी.पी.एस.सिस्टीम बसविण्यास सुरुवात केलेली आहे आणि ती कशाप्रकारे फूलप्रुफ होईल यासाठी प्रयत्न सुरु आहे. यावर महालेखाकार यांनी सांगितले की, The

Audit enquiry No १८, D.S.O. Jalgaon and G.P.S. was not installed on the kerosene tankers. सचिवांनी खुलासा केला की, We will locate it. I will also take the above reference and I will check up about it. Sir I will also call the details of this case. परंतु जी सबसिडी देण्यात येणार आहे तिचा वापर योग्यप्रकारे झाला पाहिजे. याबाबत सचिवांनी सांगितले की, सध्या याबाबत केंद्रिय मंत्री (वित्त) यांनी अर्थसंकल्पीय भाषणामध्ये केरोसिनच्या कॅश सबसीडी बाबत घोषणा केली आहे. हे सर्व बँकेशी लिंक करण्याचा विचार करण्यात येईल.

८.७८ अन्नधान्य भेसळीच्या संदर्भात केंद्र आणि राज्य शासनाचा जो कायदा आहे. त्या कायद्यामध्ये असलेल्या शिक्षेच्या तरतुदींची माहिती समितीला देण्याचे विभागीय सचिवानी आश्वासित केले होते त्यासंदर्भातील माहिती विभागाकडून प्राप्त झाली आहे. **(विवरण क्र.१९)** रेशनिंग धान्य दुकानाशी संबंधित असलेले विभागाचे कर्मचारी/अधिकारी तसेच रेशनिंग दुकानदारांना आणि समितीच्या सदस्यांना यासंबंधी प्रशिक्षण दिले पाहिजे, असे समितीने सुचविले असता, प्रशिक्षण देण्याबाबत शासन स्तरावरुन योग्य ती कार्यवाही करण्याबाबत विचार करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीला दिले. याच अनुषंगाने समितीने रिक्त पदांबाबतचा आढावा घेतला असता आकृतीबंधानुसार त्या कार्यालयात ८१७८ पदे मंजूर असून, त्यापैकी गट 'अ' ते 'ड' मधील जवळपास २००३ पदे रिक्त आहेत. विभागाच्या जिल्हा यंत्रणेतील कार्यालयांसाठी ४७२१ पदे मंजूर असून त्यापैकी रिक्त पदे १०२१ आहेत. एवढी पदे रिक्त ठेवून यंत्रणा सक्षमपणे काम कसे करु शकेल ? याबाबत सचिवांनी सांगितले की, या विभागात महसूल विभागाचे कर्मचारी प्रतिनियुक्तीवर आले आहेत. त्यावर समितीने हा स्वतंत्र विभाग करण्यात यावा, अशी सूचना केली.

८.७९ सचिवांनी समितीस पुढे अशी माहिती दिली की, रिक्त पदासंदर्भात मुख्य सचिवांनी एक बैठक आयोजित केली होती. त्या बैठकीस महसूल विभागाचे सचिव, वित्त विभागाचे प्रधान सचिव उपस्थित होते. त्यावेळी अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागात कर्मचारी अत्यंत कमी असल्यामुळे कसे काम करावयाचे, याबाबत चर्चा झाली. महसूल आणि अन्न न नागरी पुरवठा या विभागाची विभागणी न झाल्यामुळे पदे रिक्त राहिली आहेत. सदरहू बैठकीत मुख्य सचिवांनी असे सांगितले की, या दोन्ही विभागाचे विभाजन होण्यास वेळ लागत असेल तर रिक्त पदे तातडीने भरली पाहिजेत. त्या दृष्टीकोनातून महसूल आणि अन्न व नागरी पुरवठा खाते प्रयत्न करीत आहे. या विभागांची विभागणी न झाल्यामुळे पदे रिक्त राहिली आहेत, परंतु पदे भरण्याची जबाबदारी महसूल विभागाची होती.

८.८० अन्न व नागरी पुरवठा हे स्वतंत्र खाते असून या विभागाचे वेगळे अर्थसंकल्प आहे. या विभागाचे वेगळे सचिव व माननीय मंत्री महोदय आहेत. स्वतंत्र कर्मचारी वर्ग आहे. हा विभाग स्वयंपूर्ण विभाग व्हायला पाहिजे. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचा कारभार अगदी स्वच्छ व व्यवस्थितरित्या घालावा. गोरगरिबांना स्वस्तात धान्य मिळावे अशी आमची अपेक्षा आहे. बाहेर सुशिक्षित बेरोजगार तरुणांना नोकऱ्या मिळत नाहीत. या खात्यामध्ये तीन चार हजार कर्मचारी/ अधिकाऱ्यांची भरती करण्यात यावी की, जेणेकरुन विभागाचा कार्यभार सुव्यवस्थित चालेल आणि सुशिक्षित बेकारांच्या हाताला काम मिळेल. पदे भरण्याबाबतची कार्यवाही तातडीने करण्यात यावी. अशी समितीने सूचना केली असता त्याबाबत माहिती घेण्याचे सचिवांनी आश्वासित केले.

८.८१ अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण खात्याच्या कारभारात सचिवांनी स्वतः जातीने लक्ष द्यावे. या खात्याचा नावलौकिक आहे. महसूल विभाग हा अतिशय भ्रष्ट विभाग आहे. श्री.यशवंत सोनावणे, अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्याबाबतीत जी घटना घडली तसे प्रकार होऊ नयेत, म्हणून या खात्याच्या कारभारात लक्ष देणे आवश्यक आहे. गॅसचा काळा बाजार, पेट्रोलमध्ये भेसळ, डिझेल रॉकेल टँकरमध्ये भेसळ असे प्रकार सतत कोठे ना कोठे होत असतात, या घटनाना पायबंद बसला पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले.

८.८२ दिनांक १ जानेवारी ते दिनांक १ डिसेंबर, २०१० अखेर मासिक अहवाल जिल्हा पुरवठा अधिकारी, ठाणे, बीड, हिंगोली आणि नागपूर ही जिल्हे वगळता बाकी कोणत्याही जिल्ह्याकडून आलेला नाही. राज्यातील ३५ जिल्ह्यातील फक्त चार जिल्ह्यातूनच अहवाल आलेले आहेत, ही एक शोकांतिका आहे. या चारच जिल्ह्याचे पुरवठा अधिकारी आदेश मानतात बाकी इतर जिल्हे आदेश मानत नाहीत असे मत समितीने व्यक्त केले असता याबाबत सचिवांनी सांगितले की, उर्वरित जिल्ह्यांना सूचना दिलेल्या आहेत. काही ठिकाणी "कारणे दाखवा नोटीस" बजाविण्यात आलेली आहे. आता ऑनलाईन कॉन्फरन्स सेवा सुरु झालेली आहे त्यामुळे अशा बाबींसाठी जास्त वेळ लागावयास नको. असे समितीने सांगितले असता, सचिवांनी खुलासा केला की, या संदर्भात दोनदा व्हिडीओ कॉन्फरन्स जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांसोबत घेतलेली आहे.

८.८३ शासनाच्या विविध खात्यातील अतिशय महत्वाचे असे हे खाते आहे. त्यामुळे हे खाते सक्षम व्हावे. अशी समितीची प्रामाणिक इच्छा आहे. या देशातील गोरगरिबांना चांगले अन्न खायला मिळाले पाहिजे, असा समितीचा दृष्टीकोन आहे. या खात्याच्या यंत्रणेने अतिशय चांगल्या प्रकारे काम

करुन दारिद्रय रेषेखालील लोकांना पोटभर अन्न मिळाले पाहिजे. हीच समितीची प्रामाणिक इच्छा आहे, असे मत समितीने व्यक्त केले.

८.८४ विभागाकडून स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाची माहिती महालेखाकार कार्यालयास वेळेवर जात नसल्यासंदर्भात महालेखाकारांनी विभागीय सचिवांना सांगितले की, Our office did not receive replies to the field inspection reports in time. I would, therefore request to the departmental Representative to submit detail replies to our office in time then we will certainly go through it. त्यावर सचिवांनी सांगितले की, We will discuss this matter with the office of the Accountant General. It is my feeling that there should be a better co-ordination between my office any the office of the Accountant General Let us have a better Co-ordination. समितीने असे सुचित केले की, The department must have a meeting with the Comptroller and Auditor General in every three months. The department should also conduct an internal meeting in very month. (परिच्छेदांसंदर्भात महालेखाकारासोबत तीन महिन्यातून एकदा तरी विभागाने बैठक घ्यावी व त्याचबरोबर विभागाने महिन्यातून एकदा अंतर्गत बैठक घ्यावी.) अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचा कारभार सुरळित चालावा. या संदर्भात समिती मार्फत काही चांगल्या सूचना शासनास निश्चितपणे करण्यात येतील.

८.८५ दिनांक २९ जून, २०१० रोजी ओरस जिल्हा सिंधुदुर्ग येथे परिच्छेद क्रमांक ३.७.१०.१ "रास्त भाव दुकानांचे कामकाज" या संदर्भात स्थानिक विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. सदर साक्षीच्यावेळी समितीने उपरोक्त लेखापरिच्छेदासंदर्भात खुलासा करण्यास सांगितले असता, जिल्हापुरवठा अधिकारी, सिंधुदूर्ग यांनी समितीस अशी माहिती दिली की, राज्य शासनाने रास्त भाव दुकानांचे पदनिदेशित केलेल्या अधिकाऱ्यांद्वारे निरीक्षण होते की नाही याबाबत खात्री करुन घेणे आवश्यक होते. त्यानुसार विभागाने रास्त भाव दुकानांचे निरीक्षण करण्यासाठी अतिरिक्त जिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार, पुरवठा निरीक्षण अधिकारी व पुरवठा निरीक्षक अशा विविध अधिकाऱ्यांच्या बाबतीत निकष निश्चित केले होते. सिंधुदूर्ग जिल्ह्यांच्या दोन गटामध्ये लक्षपूर्तीमधील तुटवडा ११ ते ४८ टक्के होता. तसेच लेखापरीक्षकांनी विभागीय अधिकाऱ्यांसोबत केलेल्या सिंधुदूर्ग जिल्ह्यातील तीन गटामधील १२ दुकानांच्या संयुक्त तपासणीत असे निदर्शनास आले की, विभागीय अधिकाऱ्यांनी आठ दुकानांचे निरिक्षण मागील दोन ते पाच वर्षांमध्ये केलेलेच नव्हते. अशा रितीने रास्त भाव दुकानांचे निरीक्षण विविध जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांकडून दुर्लक्षित केले गेले होते. निरीक्षणाअभावी रास्त भाव दुकानांचे कार्य व्यवस्थितपणे चालते किंवा नाही.

याबाबत खात्री करुन घेण्यात येत नव्हती असा लेखापरीक्षकांचा आक्षेप आहे. यासंदर्भात सर्व संबंधित अधिकाऱ्यांना तपासणी करण्याबाबत वेळोवेळी लेखी परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात आलेल्या आहेत.

८.८६ विभागीय प्रतिनिधींना केलेल्या खुलाश्याच्या संदर्भात समितीने नाराजी व्यक्त करुन समितीने असे मत व्यक्त केले की, संबंधित अधिकाऱ्यांना तपासणी करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत, एवढेच स्पष्टीकरण विभागाने केलेले दिसते. परंतु यासंदर्भात शासनाने कार्यपद्धती तयार केलेली आहे. तसेच या कार्यपद्धतीला नियमाचे स्वरुप आहे. असे असतांना निश्चित केलेल्या कार्यपद्धतीनुसार विभागाकडून तपासण्यात केल्या जात नाहीत. असे महालेखापरीक्षकांनी निदर्शनास आणून दिले असले तरी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत या योजनेचे संनियंत्रण केले जाते. ही बाब त्याचवेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या लक्षात यावयास हवी होती. परंतु, ते काम महालेखापरीक्षकांना करावे लागले आहे. ६ महिन्यांतून एकदा तपासणी झाली पाहिजे, अशाप्रकारचे बंधन असतांना ५-६ वर्षे तपासणी झालेली नाही.

८.८७ सिंधुदूर्ग हा एक प्रगतीशील जिल्हा आहे. शासनाने गरीब लोकांना अन्नधान्य सुलभ पद्धतीने मिळावे यादृष्टीने विविध योजना राबविलेल्या आहेत. गरीबांच्या घरापर्यंत धान्य पोहोचले पाहिजे, यासाठी शासनामार्फत सबसिडी देऊन एक परिपूर्ण यंत्रणा सरकारने उभारली आहे. परंतु ही संपूर्ण यंत्रणा खिळखिळी करण्याचे काम अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण अधिकाऱ्यांनी केले आहे. यासंदर्भात समितीने अधिक खोलात जाण्याचा विचार केला तर कोणत्या अधिकाऱ्यांनी तपासण्या केल्या नाहीत, किती वेळा तपासण्या करणे अपेक्षित होते, तपासण्या न करण्याची कारणे काय आहेत, ग्राहकांपर्यंत प्रत्यक्षात अन्नधान्य पोहोचले किंवा नाही, गरीबांना द्यावयाचे अन्नधान्य काळ्या बाजारात विकले गेले आहे किंवा काय, यासंदर्भात ज्या अधिकाऱ्यांनी संनियंत्रण करावयाचे होते, त्यांनी त्यांचे कर्तव्य का बजावले नाही, संबंधितांवर कारवाई का केली नाही असे अनेक प्रश्न निर्माण होऊ शकतात. वरिष्ठ अधिकाऱ्यापासून कनिष्ठ कर्मचाऱ्यांपर्यंत एक संपूर्ण यंत्रणा असतांना या सर्व प्रश्नांची उत्तरे लोकलेखा समितीने शोधावित, अशी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण अधिकाऱ्यांची अपेक्षा आहे का? हे काम लोकलेखा समितीचे आहे का? जर विभागीय अधिकारी त्यांची कर्तव्ये योग्य पद्धतीने बजावित नसतील तर लोकलेखा समितीला हे काम करावे लागेल. या सर्व प्रश्नांची उत्तरे समितीला बैठकीच्या वेळी अपेक्षित होती. ही सर्व चर्चा झाल्यानंतर महालेखापरिक्षक यांनी घेतलेल्या आक्षेपाबाबत विभागाने दिलेले स्पष्टीकरण मान्य करावयाचे किंवा नाही, याचा निर्णय समितीला घ्यावयाचा होता व त्यासाठीच समिती या ठिकाणी आलेली आहे. यासंदर्भात दोषी असलेल्या तत्कालीन व आताच्या प्रत्येक

अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची वेळ आली तर तशा प्रकारची शिफारसही समिती करु शकते याची अधिकाऱ्यांनी गांभिर्याने नोंद घ्यावी, असे मत समितीने नाईलाजास्तव व्यक्त केले.

८.८८ समितीने उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांबाबतचा खुलासा, संबंधित अधिकाऱ्यांची नावे, त्याचा कार्यकाळ आणि तपासणीबाबतची सर्व सविस्तर माहिती विभागामार्फत जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांनी त्यांच्या डेस्क-१०/पुशा-२/धा.दु./५५/२०१० दिनांक २४.८.२०१० रोजीच्या पत्रान्वये सादर केली. त्याचा समावेश अहवालाच्या शेवटी समाविष्ट केले आहे. **(विवरण क्र.२०)** याच अनुषंगाने समितीने एक गंभीर बाब अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या निदर्शनास आणून दिली की, रोजगार हमी योजनेमध्ये मजुरांना मजुरीच्या रकमेपैकी ५० टक्के रक्कम रोख स्वरुपात व ५० टक्के रकमेएवढी धान्य दिले जाते. परंतु प्रत्यक्षात मजुरांना धान्य दिले गेले नाही व रोजगार हमी योजनेच्या कामाच्या कंत्राटदारांनी संबंधित अधिकाऱ्यांशी संगनमत करुन धान्य काळ्या बाजारात विकले, असे प्रकरण मध्यंतरी उजेडात आले होते. यासंदर्भात जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांपासून विविध यंत्रणेच्या १२ अधिकाऱ्यांना अटक झाली होती व त्यांना निलंबित करण्यात आले होते. परंतु, नंतर ते अधिकारी जामीनावर सुटले. यासंदर्भात पुढे कोणती कारवाई झाली आहे? याबाबत जिल्हाधिकारी यांनी खुलासा केला की, सर्व अधिकारी पुन्हा पुनःस्थापित झाले आहेत. या प्रकरणी अधिकाऱ्यांचा सहभाग नाही, अशा प्रकारचे निष्कर्ष शासनाने काढल्यानंतर त्यांच्याविरुद्ध दोषारोप ठेवण्यात आले नाही व त्यांना पुन्हा सेवेत रुजू करुन घेण्यात आले आहे.

८.८९ तत्कालीन जिल्हाधिकारी व तत्कालीन पोलीस अधिक्षक यांच्या भांडणामुळे हे प्रकरण उघडकीस आले होते. यामध्ये एका दुकानदाराने आत्महत्या देखील केली होती. परस्पर गोडाऊनमधून धान्य बाहेर बाजारात विकले गेले, त्याच्या दुकानापर्यंत माल आला नव्हता. परंतु, त्याला दोषी धरण्यात आले होते म्हणून त्या दुकानदाराने आत्महत्या केली. यासंदर्भात शासनाने जे निष्कर्ष काढले आहे, ते मात्र पटण्यासारखे नाही. यासंदर्भातील तपशीलवार माहिती जिल्हाधिकारी यांनी समितीला सादर करावी, असे समितीने निदेश दिले होते. त्याबाबत जिल्हाधिकारी सिंधुदूर्ग यांनी सांगितले की, सदर प्रकरण उजेडात आल्यानंतर तत्कालीन प्रकल्प अधिकारी, उपविभागीय अधिकारी यांना अटक करण्यात आली होती, अतिरिक्त जिल्हाधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, दोषारोप दाखल करण्यास शासनाने परवानगी नाकारली होती. सदर अधिकाऱ्यांना त्यावेळी निलंबित करण्यात आले होते. परंतु, नंतर त्यांना पुन्हा कामावर रुजू करुन घेण्यात आले आहे. पोलिसांनी चार्जशिट दाखल करण्याबाबतची परवानगी मागितली होती. परंतु, महसूल विभागाने परवानगी नाकारली आहे. सदर प्रकरण सन २००७ चे आहे.

८.९० विभागाकडून सन २००७ मधील रोजगार हमी योजनेच्या तपशिलवार कामाच्या कंत्राटदारांनी संबंधित अधिकाऱ्यांशी संगनमत करुन धान्य काळाबाजारात विकले यासंदर्भातील लेखी स्वरुपात प्राप्त झालेली तपशिलावर माहिती पुढीलप्रमाणे आहे. "सिंधुदूर्ग जिल्ह्यातील शासकीय गोदामातील स्वस्त धान्य गैरमार्गाने वाहतूक करीत असताना पोलिसांनी पकडले. सदर घटनेच्या अनुषंगाने कुडाळ शासकीय गोदामाचे विशेष भूसंपादन अधिकारी यांचेमार्फत सखोल तपासणी करुन चौकशी अहवाल प्राप्त करण्यात आला. चौकशी अहवालाच्या अनुषंगाने सदर अनियमिततेस जबाबदार वर्ग १ च्या अधिकाऱ्यांविरुद्धच्या विभागीय चौकशीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला व त्याच अनियमिततेशी संबंधित वर्ग ३ च्या कर्मचाऱ्यांविरुद्धची विभागीय चौकशीची प्रक्रिया जिल्हाधिकारी स्तरावर करण्यात येत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले. प्रचलित नियमातील तरतूदीनुसार, एकाच अनियमिततेशी संबंधित जबाबदार सर्व दोषी अधिकारी व कर्मचारी यांची एकत्रित विभागीय चौकशी करुन सदर अनियमिततेचा परस्पर संबंध प्रस्थापित करणे आवश्यक असल्याने जिल्हाधिकारी स्तरावरील वर्ग ३ च्या कर्मचाऱ्यांविरुद्धची विभागीय चौकशी बंद करुन वर्ग १ व वर्ग ३ च्या अधिकारी/कर्मचारी यांचा एकत्रित समावेश असलेला विभागीय चौकशीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण यांना पाठविण्याचे निर्देश शासन स्तरावरुन देण्यात आले आहेत. सदर एकत्रित विभागीय चौकशीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, कोकण यांचेकडून शासनास अद्याप प्राप्त झालेला नाही. तथापि, वरीलप्रमाणे शासकीय अन्नधान्य अपहार प्रकरणी संपुर्ण ग्रामिण रोजगार हमी योजनेच्या कामातील कंत्राटदारांनी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेशी संगनमत करुन धान्य काळ्या बाजारात विकले, अशी घटना पोलिस खात्याने उघडकीस आणलेली नाही".

८.९१ याच अनुषंगाने सद्य:स्थितीत कोणकोणत्या योजनांच्या माध्यमातून अन्नधान्य दिले जाते? असे समितीने विचारले असता जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी असे सांगितले की, रोजगार हमी योजना आता बंद झाली आहे अन्नपूर्णा योजनेमध्ये १२८० लाभार्थी आहेत. समितीने तालुका निहाय माहितीची तपासणी केल्याबाबतचे अहवाल तयार करण्यात आले असल्यास त्याची मागणी केली असता जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी तालुका निहाय माहिती सध्या उपलब्ध नाही. मागील काळात निवडणुकीची आचारसंहिता व निवडणुकीच्या कामांमुळे तपासण्या झाल्या नव्हत्या. तथापि, ५ तालुक्यांचा आढावा घेण्यात आला आहे. त्यावर समितीने असे निदर्शनास आणून दिले की, सहा महिन्यातून एकदा तपासणी करावी, असा शासनाच्या नियम आहे. निवडणुकीचे काम केवळ २ महिन्यांपुरते होते. अधिकारी ज्यावेळी तपासणी करण्यासाठी जातात त्यावेळी त्यांच्याकडे प्रवास दैनंदिनी ती उपलबध्द नसल्याचे समितीला

सांगण्यात आले. जी माहिती समितीला सादर करण्यात आलेली आहे ती केवळ औपचारिकता करण्यासाठी दिलेली आहे, असे समितीचे मत झाले आहे, कारण समितीला देण्यात येत असलेल्या लेखी व मौखिक माहिती अनेक त्रुटी आहेत. अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे लेखापरीक्षकांनी आक्षेप घेतले आहेत. अधिकाऱ्यांनी समितीचे कामकाज गांभीर्याने घेतलेले दिसत नाही.

८.९२ समितीने या चर्चेच्या अनुषंगाने जी माहिती विचारलेली आहे ती सादर करण्यासाठी काही दिवसांची मुदत देण्यात येत आहे या मुदतीत सर्व माहिती समितीला सादर करण्यात यावी. ही सर्व माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी समितीला सादर करावी असे समितीने निदेश दिले असता त्यानुसार माहे जुलै २०१० या कालावधीत दैनंदिनीच्या (टूर डायरी) प्रती **(विवरण क्र.२१)** सादर करण्यात आल्या आहेत.

८.९३ सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत राज्यातील आश्रमशाळांना देखील धान्याचा पुरवठा करण्यात येतो. या जिल्ह्यात एकूण किती आश्रमशाळा आहेत ? व दारिद्र्य रेषेखालील शिधापत्रिका धारकांची संख्या किती आहे याबाबत समितीने विचारले असता, समितीला आश्रमशाळांची संख्या देण्यात आली नाही. केवळ ९३८ बीपीएलधारक लाभार्थी असल्याचे सांगण्यात आले. शालेय पोषण आहार बीपीएलधारकांव्यतिरिक्त अन्य काही मुलांना देण्यात येतो काय? या भागात साडेचार टक्के अनुसूचित जातीची लोकसंख्या आहे तसेच एकूण किती विद्यार्थी आहेत. किती शाळांमध्ये खिचडी तयार करुन देण्यात येते. याबाबत जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी सांगितले की, इयत्ता पहिली व पाचवी पर्यंत १६२२ विद्यार्थी व इयत्ता सातवी ते दहावीच्या ७१० विद्यार्थ्यांना खिचडीचे वाटप करण्यात येते. इयत्ता पहिली ते पाचवीमध्ये ६७,८०७ विद्यार्थी आहेत. इयत्ता सहावी ते आठवीमध्ये ४७,०१५ विद्यार्थी आहेत. महिन्यातून दोन वेळा धान्याचे वाटप करण्यात येते. तसेच महिला बचत गटांच्या माध्यमातून केवळ नगरपालिकांच्या शाळांमध्ये खिचडी तयार करुन देण्यात येते. सर्व शाळांना वेळेच्यावेळी धान्याचा पुरवठा करण्यात येतो याची तपासणी नियमितपणे करण्यात येते असल्याचे विभागाने सांगितले.

८.९४ अनेक ठिकाणी धान्यांचा पुरवठा व्यवस्थित केला जात नाही. रास्त धान्य दुकानात धान्य पोहचत नाही. लाभार्थ्यांना धान्य मिळत नाही. अशा प्रकारच्या अनेक तक्रारी लोकप्रतिनिधी यांच्याकडे येत असतात. स्वस्त धान्य दुकानातून धान्याचा पुरवठा करण्यात येतो. याबाबत नियमितपणे तपासणी करण्यात येते असे विभागाने नमूद केले तसेच खिचडीसाठी शासनाकडून तांदूळ उपलब्ध करुन देण्यात येतो. मूगदाळ ग्राम शिक्षण समितीच्या माध्यमातून खरेदी करण्यात येते. स्वस्त धान्य दुकानाच्या संदर्भात समिती प्रमुख यांनी पुणे जिल्ह्यातील आपल्या कसबापेठ या आपल्या मतदार संघातील घटनेबाबत अशी माहिती दिली की, गोडाऊनच्या नोंदीनुसार २२ पोते धान्य शाळेला दिल्याचे

नमूद केले होते. परंतु प्रत्यक्षात सदर धान्य शाळेला मिळालेले नाही. शाळेतील शिपाई व मुख्याध्यापक यांनी मिळून ते धान्य परस्पर गायब केले होते. असे अनेक प्रकार उघडकीस येत आहेत. शासन चांगली योजना तयार करते परंतु तिची अंमलबजावणी अधिकारी नीटपणे करीत नाहीत. ही मोठी शोकांतिका आहे असे समितीने खेदाने मत व्यक्त केले.

८.९५ धान्य पुरवठा करण्याचे अधिकार शालेय शिक्षण खात्याकडे देण्यात आले आहेत. त्यांनी कंत्राटदार नियुक्त करुन सदर धान्य एफ.सी.आय. च्या गोडाऊनमधून उचलून शाळांना पुरवावयाचे आहे, परंतु अनेक वेळा शाळांना धान्याचा पुरवठा होत नाही. शाळांना धान्याचा पुरवठा होतो किंवा नाही याची तपासणी करण्यासाठी प्रत्येक गाव पातळीवर ग्रामशिक्षण समित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे. या समितीमध्ये स्थानिक पदाधिकारी व मुख्याध्यापक हे सचिव असतात. सिंधुदूर्ग जिल्ह्यातील प्रत्येक गावात ग्रामशिक्षण समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

८.९६ याबाबत समितीने असे सूचित केले की, गाव पातळीवर योग्यप्रमाणात धान्याचा पुरवठा होतो किंवा नाही. यामध्ये भ्रष्टाचार होऊ नये याची काळजी घेणे आवश्यक आहे. यासाठी काऊंटर चेक ठेवण्याची नितांत गरज आहे. याबाबत विभागाने खुलासा केला की, आता नवीन पद्धतीचा अवलंब करण्यात येत आहे. आता गोडाऊन मधून धान्य निघाल्यानंतर ज्या गावात धान्य जाणार आहे तेथील सरपंच व काही ठराविक नागरिकांच्या मोबाईलवर एस.एम.एस.करण्यात येणार आहे. त्यामध्ये किती धान्य पाठविण्यात आले याची माहिती मिळणार आहे.

८.९७ एक महिन्यातून दोन वेळा धान्य वाटप करण्यात येते. पहिल्या पंधरावड्यात एक ते पाच तारखेपर्यंत धान्य देण्यात येते. त्यानंतर १५ तारखेनंतर २५ तारखेपर्यंत धान्याचे वाटप करण्यात येते. पाच दिवसांमध्ये धान्य वाटप करावे अशा सूचना संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत. परंतु ग्रामीण भागात या प्रमाणे धान्याचे वाटप होत नाही. या संदर्भात लोकप्रतिनिधींनी आपल्या भागात लक्ष ठेवणे आवश्यक आहे. धान्य केव्हा आले, किती आले, त्याचे वाटप व्यवस्थित होते किंवा नाही याकडे लक्ष देण्यासाठी आपल्या विश्वासातील दोन माणसे कामास लावली पाहिजेत. त्यांच्याकडून वेळच्या वेळी माहिती घेतली पाहिजे. कारण रास्त धान्य दुकाने म्हणजे भ्रष्टाचाराचे कुरण झाले आहे असे मत समितीने व्यक्त केले.

८.९८ महिला बचत गटांना खिचडी तयार करण्याचे कंत्राट देण्यात येते. त्यांना दोन रुपये साठ पैसे एका विद्यार्थ्यामागे मिळतात, त्याचप्रमाणे तेलासाठी ५० पैसे मिळतात. काही ठिकाणी महिला बचत गटांच्या नावे कंत्राटे आहेत, सन २०१०-११ या वर्षी बचत गटांना खिचडी तयार करण्याचे कंत्राट

देण्यात आले असल्याचे जिल्हाधिकारी सिंधुदूर्ग यांनी सांगितले व याबाबत असे स्पष्टीकरण दिले की, अंगणवाडींना सुद्धा धान्य देऊन महिला बचत गटांकडून खिचडी तयार करुन घेण्यात येते. ग्रामशिक्षण समित्यांमार्फत ही सर्व कामे करण्यात येतात. ग्राम शिक्षण समितीमार्फत महिला बचत गटांना कंत्राटे देण्यात येतात. तसेच विभागाने सिंधुदूर्ग जिल्हा महिला बचत गटांच्या नावे खिचडी तयार करण्याचे कंत्राट ही योजना अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत राबविण्यात येत नाही असे लेखी स्वरुपात समितीला नंतर कळविले.

८.९९ समितीने साक्षीच्या वेळी अशी विचारणा केली की, सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये दक्षता समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत काय? या दक्षता समितीमध्ये एक नगरसेवक, जिल्हा परिषद व पंचायत समितीचे सदस्य तसेच एक महिला सदस्या असतात. त्या समितीचा पदसिद्ध अध्यक्ष हा आमदार असतो. तालुका स्तरावर या समित्या स्थापन करण्यात येतात. या दक्षता समित्यामार्फत तालुक्यात जी बोगस कामे होतात त्यावर या समित्या लक्ष ठेवतात. यासाठी सर्वच तालुक्यामध्ये दक्षता समित्या स्थापन करणे आवश्यक आहेत. याबाबत जिल्हाधिकारी यांनी समितीस आश्वासन दिले की, असे सर्व तालुक्यामध्ये दक्षता समित्या स्थापन करण्यात येतील. त्यानुसार सिंधुदूर्ग जिल्ह्यातील सर्व स्तरावरील दक्षता समित्यांची स्थापना करुन समित्यांच्या सदस्यांच्या नियुक्तीसह समित्या गठित करण्यात आल्या आहेत. सिंधुदूर्ग जिल्ह्यात रॉकेल वाटपाची काय परिस्थिती आहे, असे समितीने विचारले असता विभागाने खुलासा केला की, एकूण जो कोटा आहे त्याच्या ६० ते ६५ टक्के रॉकेल मिळते. एकूण २३६४ लिटर रॉकेल मिळते. ज्यांच्याकडे दोन गॅस सिलेंडर आहेत त्यांना रॉकेल मिळत नाही. जे रॉकेल मिळते त्याचे वाटप ३६१८० लाभधारकांना करण्यात येते.

८.१०० सन २००४-२००५ मध्ये सिंधुदूर्ग जिल्ह्यात ३ गटामधील १२ दुकानाच्या संपूर्ण तपासणीत विभागीय अधिकाऱ्यांनी ८ दुकानांचे निरीक्षण मागील २ ते ५ वर्षात केले नाही. ती दुकाने कोणती याबाबतची माहिती विभागाने समितीच्या बैठकीच्या वेळी तयार करुन ठेवावयास पाहिजे होती. परंतु आठ दुकाने कोणती आहेत त्याची माहिती विभागाला मिळत नाही. ती दुकाने आता दिसून येत नाहीत अशी माहिती समितीला दिली होती. ही बाब गंभीर स्वरुपाची आहे असे मत समितीने व्यक्त केले.

८.१०१ या बैठकीला कोकण विभागाचे उपायुक्त उपस्थित होते त्यांनी उपायुक्त यांनी समितीला असा खुलासा केला की, तपासण्याचे प्रमाण कमी आहे, ही वस्तुस्थिती आहे. तसेच गेल्या वर्षी ५२ टक्के इष्टांक होता परंतु, तपासण्या कमी झालेल्या आहेत. यासंदर्भातील सर्व अभिलेख विभागाकडून उपलब्ध करुन घेऊन समितीला सविस्तर माहिती सादर करण्यात येईल असे आश्वासन त्यांनी समितीला दिले. त्यानुसार विभागाकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

८.१०२ "सिंधुदूर्ग जिल्ह्यातील रास्त भाव दुकानांच्या तपासणीबाबतच्या इष्टांकाच्या **(विवरण क्र.२२)** ची प्रत सोबत जोडली आहे. उर्वरित मुद्दयाबाबतची माहिती अतिरिक्त जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांच्याकडून मागविण्यात आलेली आहे. तथापि, सदरहू माहिती संपूर्ण जिल्ह्यातील रास्त भाव दुकानांच्या तपासणीबाबत असून ती दुकाननिहाय व तारीखनिहाय द्यावयाची असल्यामुळे तिचा आवाका मोठा आहे. सदरहू माहितीचे संकलन अप्पर जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांच्याकडून करण्यात येत आहे".

८.१०३ लेखापरीक्षकांनी जो आक्षेप काढला आहे. त्याची प्रत विभागाला पाठविण्यात आलेली आहे. त्यानंतर समितीनेही विभागाला पत्र पाठविलेले आहे. त्यामुळे सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन घेऊन आवश्यक ती सर्व माहिती समितीला आज सादर करणे अपेक्षित होते. अधिकाऱ्यांनी हा विषय गांभीर्याने घेतलेला नाही, असे लक्षात येते. तत्कालीन अधिकारी कोण होते, त्यांचा कालावधी किती होता, त्यांनी किती ठिकाणी तपासण्या केल्या. तारखा कोणत्या आहेत, प्रत्येक अधिकाऱ्यांसाठी तपसणीचा इष्टांक किती होता. इष्टांकपूर्ती त्यांनी किती टक्के केलेली आहे. इष्टांकपूर्ती केली नसेल तर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर कोणती कारवाई केली आहे. दुकानांची यादी, अशी सर्व माहिती समितीला मिळणे आवश्यक होते. परंतु ही माहिती आपल्याकडून मिळालेली नाही. जी माहिती समितीला सादर करण्यात आलेली आहे. त्यामध्ये आताच्या पुरवठा अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासणीच्या तारखा आणि पूर्वीच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासणीच्या तारखा जुळत नाहीत.

८.१०४ यापूर्वी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांचा अतिरिक्त कार्यभार, श्री.मोरे पुनर्वसन अधिकारी यांच्याकडे होता. त्यापूर्वी श्री.निलेश जाधव यांच्याकडे ३ महिने कार्यभार होता. असे विभागाकडून सांगण्यात आले. विभागाकडून प्राप्त झालेल्या माहिती वरुन असे दिसून येते की, कोणी अधिकारी जबाबदारी घेण्यास तयार नाही. सदर बैठकीकरिता समितीने असेही कळविले होते की, तत्कालीन सर्व अधिकाऱ्यांना साक्षीसाठी बोलविण्यात यावे. हे प्रकरण जरी छोटे वाटत असले तरी यंत्रणेमधील त्रुटी दूर करणे, हा समितीचा मूळ उद्देश आहे. त्यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, संपूर्ण तपशील घेण्याचा ज्यावेळी प्रयत्न करण्यात आला. त्यावेळी ६ दुकाने जागेवर सापडत नव्हती व त्यांची माहिती मिळत नव्हती. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, दुकाने जागेवर सापडत नाही. तपासणी केल्या जात नाही, याचा अर्थ दुकाने बोगस होती, दुकाने रेकॉर्डवर दाखविण्यात आली असतील आणि अन्न धान्य काळ्या बाजारात विकले गेले असेल, अशी शंका घेण्यास पुरेसा वाव आहे. हे प्रकरण फार गंभीर आहे. त्यामुळे याबाबत समितीस जिल्हाधिकाऱ्याकडून कारवाई अहवाल पाहिजे. असे निदेश समितीने विभागास दिले होते. त्यानुसार या संदर्भात विभागाकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

८.१०५ सिंधुदूर्ग जिल्ह्यातील सर्व रास्त भाव धान्य दुकानांची तपासणी शासनाच्या निकषानुसार सहा महिन्यातून एकदा करणेकामी दिनांक १५ ऑगस्ट, २०१० पूर्वी सर्व दुकानांची तपासणी

करण्यासाठी विशेष मोहिम राबविण्यात आली आहे. त्यानुसार दिनांक १५.८.२०१० नंतर आढावा घेऊन सर्व दुकानांची तपासणी झाल्याबाबतची जिल्हा स्तरावर खात्री करण्यात आली आहे.

८.१०६ तसेच ज्या जिल्ह्यांमध्ये विहित प्रमाणापेक्षा कमी तपासण्या झाल्या असल्याचे निदर्शनास आले आहे ते जिल्हे कोणते आहेत? कमी तपासणी करण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांची नावे, शासनाने ठरविलेल्या प्रमाणानुसार रास्त भाव दुकानांच्या तपासण्या करण्याबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्यांना शासन स्तरावरुन वेळोवेळी सूचना देवूनही कार्यवाही न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे, यावर सचिवांनी अशी माहिती दिली की, विहित प्रमाणापेक्षा कमी तपासण्या झालेले सिंधुदूर्ग, सोलापूर, जालना, उस्मानाबाद व पुणे जिल्हे आहेत. नैसर्गिक आपत्ती, पूर, लोकसभा, विधानसभा तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या निवडणुका आणि वेळोवेळी अधिकाऱ्यांची रिक्त असलेली पदे यामुळे इष्टांकाप्रमाणे रास्त भाव दुकानांच्या तपासण्या करणे शक्य झाले नसल्याचे संबंधित अप्पर जिल्हाधिकारी यांनी कळविले आहे.

८.१०७ कमी तपासण्या केल्याबाबत ५ अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीसा देण्यात आल्या होत्या. या अधिकाऱ्यांवर केलेल्या कारवाईचा अहवाल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे/ अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा | पदावरील कालावधी | नोटीसमधील दोषारोपाचे स्वरुप | नोटीस दिल्याची तारीख | खुलासा प्राप्त झाल्याची तारीख | कारवाईची सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | श्री.आर.डी.कदम, तत्कालिन तहसिलदार, दोडामार्ग (सेवानिवृत्तीचा दिनांक ३१.०५.२००५) | २३.०७.२००४ ते ३१.५.२००५ | सासोली, कुडासे व तेरवण मेढे या दुकानांची त्यांच्या कालावधीत एकदाही तपासणी केली नाही. | ०२.०८.२०१० | - | सेवानिवृत्त होऊन पाच वर्षाहून अधिक कालावधी लोटला असल्यामुळे कारवाई करता येत नाही. |
| २) | श्री.एस.एस.चिपकर, तत्कालिन तहसिलदार, देवगड (सेवानिवृत्तीचा दिनांक २८.०२.२००५) | ११.०७.२००३ ते २८.०२.२००५ | शिरगाव नं.२ व पडेल या दुकानांची सुमारे एक वर्षाच्या कालावधीत एकदाही तपासणी केली नाही. (अनुक्रमे ७.१.२००४ ते २८.०२.२००५ व १३.८.२००३ ते २५.१०.२००४) तसेच नाडण या दुकानाची त्यांच्या कार्यकाळात एकदाही तपासणी केली नाही. | ०२.०८.२०१० | २१.०८.२०१० | सेवानिवृत्त होऊन पाच वर्षाहून अधिक कालावधी लोटला असल्यामुळे कारवाई करता येत नाही. |
| ३) | श्री.ए.एन.मालवणकर, तत्कालीन पुरवठा निरीक्षक, देवगड | ०४.०७.२००३ ते ०१.०६.२००६ | शिरगाव नं.२, पडेल, नाडण या दुकानांची नियमितपणे तपासणी केलेली नाही. | ०२.०८.२०१० | ०४.१०.२०१० | ताकीद देण्यात आली. (दि.१५.१०.२०१०) |
| ४) | श्री.ए.जी.शेळके, तत्कालिन पुरवठा निरीक्षक, देवगड | ११.०७.२००० ते ०३.०७.२००३ | शिरगाव नं.२, पडेल व नाडण या दुकानांची नियमितपणे मुदतीत तपासणी केली नाही. | २४.०८.२०१० | २४.०८.२०१० | ताकीद देण्यात आली. (दि.१५.१०.२०१०) |
| ५) | श्री.डी.डी.नडे, तत्कालिन जिल्हा पुरवठा अधिकारी, सिंधुदुर्ग | १७.०५.२००३ ते २५.४.२००६ | तालुका स्तरावरील तपासणी कर्मचारी यांचेवर नियंत्रण नव्हते. तसेच तपासण्यांचा आढावा घेतला नाही. | २१.०८.२०१० | १४.१०.२०१० | ताकीद देण्यात आली. (दि.१५.१०.२०१०) |

८.१०८ विभागाकडून प्राप्त झालेली उपरोक्त माहिती बघता सन २००३ मध्ये कोण अधिकारी होते की, त्यांनी कारवाई करण्यास विलंब केला, याबाबतही खुलासा होण्याची आवश्यकता आहे. कारण माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या जज्जमेंटनुसार सेवानिवृत्त झालेल्या कर्मचारी/अधिकाऱ्यांवर कारवाई करता येते, दंड वसूल करता येतो आणि शिक्षाही करता येते. परंतु, संबंधित अधिकाऱ्यांवर एवढे दोषारोप असूनही त्यांना फक्त ताकीदच देण्यात आली आहे. ही बाब योग्य नाही. यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, या प्रकरणी जिल्हा स्तरावर चौकशी केलेली आहे. तसेच या सर्व प्रकरणांचा आढावा घेऊन कारवाई करण्याबाबत एवढा उशीर का झाला या संदर्भात काय कारवाई करता येईल. ते पहावे लागेल असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले. परंतु यासंदर्भातील माहिती अद्यापपर्यंत समितीस प्राप्त झालेली नाही.

८.१०९ स्वस्त धान्य दुकानांची एकदाही तपासणी केली गेली नाही व दुकानांची नियमित मुदतीत तपासणी केली नाही असे दोषारोप असतानाही कर्मचाऱ्यांना फक्त ताकीद देण्यात येते. ही बाब समितीची एकप्रकारे चेष्टा करण्यासारखी आहे. ज्या अधिकाऱ्यांकडून दुकानांची नियमित मुदतीत तपासणी केली नाही. त्या अधिकाऱ्यांची पदोन्नती व वेतनवाढ का थांबविण्यात आली नाही. असे जेव्हा समितीने विभागीय सचिवांनी विचारले तेव्हा विभागीय सचिवांनी सांगितले या विभागात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामध्ये महसूल विभागाचे कर्मचारी असल्यामुळे त्यांच्याविरुद्ध कारवाई करता येत नाही. त्यामुळे या दोन विभागाच्या विभाजनाबाबत निर्णय होणे महत्त्वाचे आहे.

८.११० समितीने अशी विचारणा केली की, शासनाने बोगस कार्ड शोध मोहिम राबविली होती. या जिल्ह्यात किती बोगस कार्ड आढळून आली आहेत. याबाबत जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी खुलासा केला की, या जिल्ह्यात एकूण २ लाख २४ हजार रेशन कार्डापैकी ६९३९ बोगस कार्डस् आढळून आली आहेत व त्यापैकी १३६८ बी.पी.एल. ची आहेत. ३१ मे, २०१० अखेर बी.पी.एल. कार्ड धारकांची संख्या ५३३६५ एवढी आहे.

८.१११ अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचा कारभार समितीला निराशाजनक वाटतो आहे. समितीकडून एक प्रश्नावली उपायुक्त यांच्याकडे पाठविण्यात येईल. उपायुक्तांनी प्रश्नावली संदर्भातील सर्व माहिती संकलित करुन समितीला सादर करावी.

वास्तविक पाहता, ज्यावेळी समिती साक्ष घेण्यासाठी जाते त्यावेळी विभागाकडून परिपूर्ण माहिती समितीला सादर करण्यात येत असते. परंतु आजच्या साक्षीत संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती सादर केलेली नाही. विभागाच्या अधिकाऱ्यांना दैनंदिन कामकाजात कोणकोणत्या अडचणी येतात, कर्मचारीवृंद, अधिकारी वर्ग पुरेसा आहे का, वगैरे काही अडचणी समितीसमोर मांडावयाच्या असतील तर त्यांनी मांडाव्यात. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी समितीला माहिती दिली की, महसूल विभाग आणि पुरवठा विभाग या दोन्ही विभागामध्ये हे निश्चित झाले नव्हते की, पुरवठा विभागाची पदे कोणी भरावयाची आहेत. महसूल विभागाचे लोक पुरवठा विभागात कार्यरत आहेत. त्यामुळे महसूल विभागाची पदे रिक्त आहेत. सद्य:स्थितीत ३८ लिपिक पुरवठा विभागात काम करीत आहेत व तेवढी पदे महसूल विभागात रिक्त आहेत. पुरवठा विभागात महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचारी नकोत, असे त्यांचे म्हणणे आहे. तथापि, याबाबतचा अंतिम निर्णय अद्याप झालेला नाही. पूर्वीपासून महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचारी पुरवठा विभागात काम करतात. आता पुरवठा विभागाने असा निर्णय घेतला आहे की, स्वत:चे संवर्ग तयार करावे. यासंदर्भात न्यायालयात केस झाल्यामुळे पुरवठा विभागाची पदे भरु नये, असे पुरवठा विभागाकडून जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात पुरवठा विभागाची पदे रिक्त आहेत. यासंदर्भात दोन विभागाचे एकमत अद्याप झालेले नाही. ३८ पदे पुरवठा विभागाला महसूल विभागाने दिलेली असल्यामुळे महसूल विभागाची ३८ पदे रिक्त आहेत.

संपूर्ण राज्यात पुरवठा विभागाची एकंदर किती पदे रिक्त आहेत. पुरवठा विभागाची पदे पुरवठा विभागाकडूनच भरली जावीत. पुरवठा विभागात महसूल विभागाचे अधिकारी/कर्मचारी नकोत. महसूल विभागाची अनेक पदे पुरवठा विभागाकडे कळविण्यात आली आहे. यासंदर्भात विभागाने खुलासा केला की, या विभागाच्या आकृतिबंधानुसार विभागाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांसाठी मिळून ८१७८ पदे मंजूर असून, यापैकी गट-अ ते ड मधील जवळपास २००३ पदे रिक्त आहेत. विभागाच्या जिल्हा यंत्रणेतील कार्यालयांसाठी ४७२१ पदे मंजूर असन त्यापैकी रिक्त पदे १०२१ आहेत. विभागाच्या गट-अ संवर्गातील पदांवर त्या-त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमात विहित केल्यानुसार ५०% पदे महसूल यंत्रणेतील अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीवर बदलीने भरण्याची तरतूद आहे. या तरतूदीनुसार

महसूल यंत्रणेतील अधिकारी विभागात कार्यरत आहेत. तथापि, गट-ब-अराजपत्रित, गट-क व ड संवर्गातील पदांच्या सेवाप्रवेश नियमामध्ये महसूल यंत्रणेतील कर्मचाऱ्यांसाठी प्रमाण विहित केलेले नाही. परंतु तालुका व जिल्हास्तरावर पुरवठा विभाग अनुक्रमे तहसिलदार व जिल्हाधिकारी यांच्या अधिपत्याखाली असल्याने जिल्हास्तरावर एकूण रिक्त पदे विचारात घेऊन नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना पुरवठा विभागाकडे कामकाज चालविण्याच्या दृष्टीने कार्यरत ठेवले जाते. तथापि, पुरवठा विभागाच्या मंजूर पदांवर स्वतंत्र पद भरती करण्याचा प्रस्ताव सध्या शासन स्तरावर विचाराधीन आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

८.११२ समितीसमोर आलेल्या उपरोक्त माहितीवरुन असे दिसून येते की, शिधावाटप वितरण व्यवस्था संगणकीकृत करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी, केंद्र सरकार, पुणे विद्यापीठ आणि अन्न व नागरी पुरवठा विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सार्वजनिक वितरण प्रणालीबाबत एक ई-गव्हर्नन्स प्रोजेक्ट तयार केलेला असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येणार आहे व पायलट प्रोजेक्ट सातारा जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे.

८.११३ ग्रामीण भाग, ग्रामीण भागातील शिक्षित, अशिक्षित जनता, ग्रामीण भागात उपलब्ध असलेल्या संगणकीय पायाभूत सुविधा, ग्रामीण भागातील भाषा यांचा विचार पायलट प्रोजेक्ट राबविण्यापूर्वी विभागाने करावा. संगणक हाताळण्याचे ज्ञान असलेल्या लोकांची संख्या शहरी भागामध्ये मोठया प्रमाणावर असली तरी ग्रामीण भागात अद्यापपर्यंत लाखो लोकांना संगणक कसा असतो, याचेही ज्ञान नाही. त्यामुळे संगणकीकृत व्यवस्था निर्माण करतांना प्रत्यक्षात जनतेला त्याचा उपयोग करता आला पाहिजे, याचाही विचार करणे गरजेचे आहे.

**८.११४ सातारा जिल्ह्यात पायलट प्रोजेक्ट सुरु करण्यात येणार आहे. या माध्यमातून संपूर्ण राज्यात हा प्रकल्प राबविण्यायोग्य आहे किंवा नाही, किती लोक त्याचा प्रत्यक्षात उपयोग करतात, त्यामध्ये कोणकोणत्या अडचणी आहेत, कोणते बदल करावे लागतील, याची सर्व माहिती विभागाने एकत्रित करुन त्याचा अभ्यास करुन नंतरच त्यासाठी लागणारे आवश्यक सामुग्री, मशिनरी, खरेदी करावी व त्याचा उपयोग संपूर्ण महाराष्ट्रात करण्यात यावा. तसेच**

**यासंदर्भात विभागाने सातारा येथे यशस्वी झालेले ई-गर्व्हनन्स या प्रोजेक्टची संपूर्ण माहिती समितीला देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

८.११५ एखाद्या बचत गटाने दुकानदाराविषयी तक्रार केल्यास त्यासंदर्भातील योग्य ती चौकशी पूर्ण केल्यानंतर जिल्हा पुरवठा अधिकारी दुकानाचा परवाना रद्द करतो. त्यानंतर संबंधित दुकानदार आयुक्तांकडे जाऊन स्थगिती मिळवून घेतो. यामधील सत्यता पडताळूनच संबंधित दुकानदाराचा परवाना रद्द करावा किंवा कसे यासंदर्भातील योग्य तो निर्णय घेण्यात येतो. एखाद्या दुकानदाराचे परवाना रद्द करण्याचा निर्णय झाला असेल तर, त्याला नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार बाजू मांडण्याची संधी दिली जाते. त्यावेळी त्यांना अपील करण्याची संधी दिली जाते. यासंदर्भात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही केली जाते. यासंदर्भात योग्य ती चौकशी करुन वस्तुनिष्ठ निर्णय घेतला जातो.

८.११६ एखाद्या दुकानदाराने अपील केल्यानंतर त्याच्या बाजूने निर्णय गेलेला आहे किंवा त्याच्या विरोधात निर्णय गेलेला आहे याची प्रत्येक जिल्ह्याची माहिती देण्यास सांगितले होते. त्यानुसार क्षेत्रिय स्तरावर निलंबित / रद्द केलेल्या रास्तभाव दुकानांच्या अपील प्रकरणांवरील निर्णयांचा जिल्हानिहाय तपशील विभागाने दिलेला आहे. त्यामध्ये मुंबई जिल्ह्यात सुनावणीअंती मंजूर १४४ प्रकरणे व सुनावणीअंती नामंजूर ९ प्रकरणे आहेत. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये सुनावणीअंती एकूण २६९ प्रकरणे मंजूर तर ३३ प्रकरणे नामंजूर झालेली आहेत. विभागाने दिलेल्या आकडेवारीवरुन असे दिसून येते की, दुकानाचा परवाना नामंजूर झाल्याची प्रकरणे फारच कमी आहेत. कोणती प्रकरणे नामंजूर करावीत यासंदर्भातील निर्णय क्वासी ज्युडिशिअल ॲथॉरिटी (Quasijudicial Authority) घेत असते. असे असले तरी, विभाग संबंधित दुकानदाराच्या विरोधातील वस्तुस्थिती प्रभावीपणे सादर करीत नसल्याचे समितीस वाटते. **यामध्ये काही अधिकाऱ्यांचा सहभाग असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे याप्रकरणी चौकशी करुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

८.११७ वैजापूर, जि.औरंगाबाद येथे ११३ किरकोळ रॉकेल धारकांचे परवाने आहेत. पण त्यांना १० वर्षे होऊनसुद्धा त्यांचे नुतनीकरण करण्यात आलेले नाही. यामध्ये जुन्या दुकानदारांचे संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्याबरोबर हितसंबंध असल्याचे दिसून येत आहे.

दुकानदार त्याचा फायदा उचलतात. चुकीच्या लोकांना दुकानाचे परवाने दिल्याची औरंगाबादमधील घटना आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना निर्गमित केल्या होत्या. त्यानंतर अनेक लोकांच्या दुकानांचा परवाना रद्द करण्याची कार्यवाही करण्यात आली होती. **तसेच ज्यांनी चुकीच्या मार्गाचा अवलंब करुन दुकानाचे परवाने दिले होते, अशा संबंधित अधिकाऱ्याच्या विरोधात कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि, कारवाई केल्याची माहिती अद्याप समितीस प्राप्त झालेली नाही. अतः या प्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

८.११८ रेशनिंगचा कोटा वाढवून देण्यावर मर्यादा असली पाहिजे. कारण त्यामध्ये अनेकांचे हितसंबंध असतात. रेशनिंगचा कोटा हा प्रत्येकासाठी असतो. कुटुंबातील वाढलेल्या सदस्याप्रमाणे तो वाढवून दिला जातो. हा रेशनिंगचा कोटा वाढवून देत असताना वरिष्ठांचा दबाव आणून कोटा वाढवून घेतल्याचे अनेक प्रकार उघडकीस आलेले आहेत. हा कोटा वाढवून देणाऱ्याला काय फायदा होईल हे पाहिले जाते. दक्षता समितीचे सदस्य होण्यातही अनेकांची इच्छा असते तसाच प्रकार हा कोटा वाढवून देण्यामध्ये आहे. **त्यामुळे या व्यवहारात पारदर्शकता आणण्यासाठी तसेच यामध्ये चालणारे गैरव्यवहार बंद होण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी व कोटा केवळ नियमाप्रमाणेच दिला जावा. तसेच नियमा व्यतिरिक्त कोटा कोणालाही वाढवून देता कामा नये, अशी समितीची शिफारस आहे.**

८.११९ राज्यात अनेक ठिकाणी गॅस सिलेंडरचा कृत्रिम तुटवडा निर्माण केला जातो. ९० टक्के सिलेंडरचा पुरवठा हॉटेल व्यावसायिकांना केला जातो. परिणामी घरगुती गॅस धारकांना त्याचा फटका बसतो आणि त्यांना प्रतिक्षेमध्ये रहावे लागते. एखाद्या विभागात १०० सिलेंडरचा पुरवठा करण्याची मागणी केली असता त्या ठिकाणी फक्त ५० सिलेंडर पुरविले जातात. उर्वरित ५० सिलेंडर अधिकृतरित्या गॅस परवानाधारक नसलेल्या लोकांकडे असल्याचे निदर्शनास आलेले आहे. यासंदर्भात विभागाकडून कोणती कार्यवाही केली जात नाही. ही बाब विचारात घेता अनधिकृतपणे सिलेंडर वापरणाऱ्या लोकांचा शोध घेऊन त्यांच्याविरोधात कडक कारवाई करण्याची गरज आहे. सिलेंडर कोणी उपलब्ध करुन दिले, याबाबतचा शोध घेतला जात नाही व त्यांच्यावर कारवाई होत नाही. **जर वितरकांनी सिलेंडर उपलब्ध करुन दिले**

**असेल तर त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे. या प्रकरणी सविस्तर चौकशी करावी व जे जे जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

८.१२० यासंदर्भात कारवाई करण्यास जर कायदा अपुरा पडत असेल तर कायद्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. इसेंशिअल कमॉडिटी ॲक्टमध्ये केंद्र शासनाने विशेष तरतूद केली होती यानुसार घरगुती गॅस सिलेंडरचा उपयोग व्यावसायिक कारणासाठी केल्यास अजामीनपत्र गुन्हा होतो. ही दुरुस्ती सुरुवातीला ५ वर्षासाठी आणण्यात आली होती व त्यानंतर पुढे या तरतूदीत ५-५ वर्षासाठी ३ वेळा मुदतवाढ देण्यात आली होती. सन १९९८ मध्ये ही विशेष तरतूद वगळण्यात आली. ही तरतूद असतांना अतिशय जलद निर्णय होत होते. हा कायदा केंद्र सरकारचा असला तरी केंद्र शासनाच्या कायद्याशी सुसंगत कायदा राज्य शासन करु शकते. **केंद्र शासनाने मुदतवाढ दिली नाही म्हणून राज्य सरकार गप्प बसू शकत नाही. मुदत वाढीसाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा. तसेच केंद्र सरकारचा कायदा असला तरी राज्य शासनाने केंद्र शासनाच्या धर्तीवर कायदा करावा तथापि तो घटनेशी विसंगत असता कामा नये. याबाबत लवकरात लवकर आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**८.१२१ रेशनिंग धान्य दुकानाशी संबंधित असलेले विभागाचे कर्मचारी/अधिकारी यांना तसेच रेशनिंग दुकानदारांना आणि दक्षता समितीच्या सदस्यांना प्रशिक्षण देण्याबाबत शासन स्तरावरुन करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

८.१२२ अन्न व नागरी पुरवठा हे स्वतंत्र खाते असून या विभागाचा वेगळा अर्थसंकल्प आहे. या विभागाचे वेगळे सचिव, माननीय मंत्री महोदय आहेत. स्वतंत्र कर्मचारी वर्ग आहे. हा विभाग स्वयंपूर्ण विभाग व्हायला पाहिजे. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचा कारभार अगदी स्वच्छ व व्यवस्थितरित्या व्हावा. गोरगरिबांना स्वस्तात धान्य मिळावे अशी समितीची अपेक्षा आहे. सुशिक्षित बेरोजगार तरुणांना नोकऱ्या मिळत नाहीत. **या खात्यामध्ये तीन ते चार हजार कर्मचारी/ अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. विभागाचा कार्यभार सुव्यवस्थित चालण्यासाठी आणि सुशिक्षित बेरोजगारांना काम मिळण्याकरीता या विभागात रिक्त असलेल्या**

**पदांचा सर्वंकष आढावा घेवून सदर रिक्त पदे विहित कालमर्यादेत भरण्याच्या दृष्टीने शासन स्तरावरुन प्रयत्न करावेत व रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही तातडीने करण्यात यावी व त्याबाबतची माहिती समितीला पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

८.१२३ "सिंधुदूर्ग जिल्ह्यातील शासकीय गोदामातील स्वस्त धान्य गैरमार्गाने वाहतूक करीत असताना पोलिसांनी पकडले. सदर घटनेच्या अनुषंगाने कुडाळ शासकीय गोदामाचे विशेष भूसंपादन अधिकारी यांचेमार्फत सखोल तपासणी करुन चौकशी अहवाल प्राप्त करण्यात आला. चौकशी अहवालाच्या अनुषंगाने सदर अनियमिततेस जबाबदार वर्ग १ च्या अधिकाऱ्यांविरुद्धच्या विभागीय चौकशीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला व त्याच अनियमिततेशी संबंधित वर्ग ३ च्या कर्मचाऱ्यांविरुद्धची विभागीय चौकशीची प्रक्रिया जिल्हाधिकारी स्तरावर करण्यात येत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले. प्रचलित नियमातील तरतूदीनुसार, एकाच अनियमिततेशी संबंधित जबाबदार सर्व दोषी अधिकारी व कर्मचारी यांची एकत्रित विभागीय चौकशी करुन सदर अनियमिततेच्या परस्पर संबंध प्रस्थापित करणे आवश्यक असल्याने जिल्हाधिकारी स्तरावरील वर्ग ३ च्या कर्मचाऱ्यांविरुद्धची विभागीय चौकशी बंद करुन वर्ग १ व वर्ग ३ च्या अधिकारी/कर्मचारी यांचा एकत्रित समावेश असलेला विभागीय चौकशीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण यांना पाठविण्याचे निर्देश शासन स्तरावरुन देण्यात आले आहेत. सदर एकत्रित विभागीय चौकशीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, कोकण यांचेकडून शासनास अद्याप प्राप्त झालेला नाही. **सन २००७ पासून अधिकारी/कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी प्रलंबित असून अद्याप चौकशी पूर्ण झालेली नाही. पाच वर्षापासून प्रलंबित असलेली विभागीय चौकशी तातडीने पूर्ण करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

८.१२४ अनेक ठिकाणी धान्यांचा पुरवठा व्यवस्थित केला जात नाही. रास्त धान्य दुकानात धान्य पोहचत नाही. लाभार्थ्यांना धान्य मिळत नाही. अशा प्रकारच्या अनेक तक्रारी लोकप्रतिनिधींकडे येत असतात. स्वस्त धान्य दुकानाच्या संदर्भात समितीने पुणे जिल्ह्यातील कसबापेठ या मतदार संघातील घटनेबाबत अशी माहिती दिली की, गोडाऊनच्या नोंदीनुसार २२ पोते धान्य शाळेला दिल्याचे नमूद केले होते. परंतु प्रत्यक्षात सदर धान्य शाळेला मिळालेले नाही. शाळेतील शिपाई व मुख्याध्यापक यांनी मिळून ते धान्य परस्पर गायब केले होते. असे

अनेक प्रकार उघडकीस येत आहेत. शासन चांगली योजना तयार करते परंतु तिची अंमलबजावणी अधिकारी नीटपणे करीत नाहीत. असे समितीचे स्पष्ट मत असून विभागाच्या या नाकर्तेपणाबद्दल समिती तीव्र नापसंती व खेद व्यक्त करते.

८.१२५ धान्य पुरवठा करण्याचे अधिकार शालेय शिक्षण खात्याकडे देण्यात आले आहेत. त्यांनी कंत्राटदार नियुक्त करुन सदर धान्य एफ.सी.आय. च्या गोडाऊनमधून उचलून शाळांना पुरवावयाचे आहे, परंतु अनेक वेळा शाळांना धान्याचा पुरवठा होत नाही. शाळांना धान्याचा पुरवठा होतो किंवा नाही याची तपासणी करण्यासाठी प्रत्येक गाव पातळीवर ग्रामशिक्षण समित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे. या समितीमध्ये स्थानिक पदाधिकारी व मुख्याध्यापक हे सचिव असतात. सिंधुदूर्ग जिल्ह्यातील प्रत्येक गावात ग्रामशिक्षण समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. परंतु त्यांच्याकडून काऊंटर चेक गाव पातळीवर ठेवला जात नाही. यामध्ये भ्रष्टाचार रोखण्याच्या दृष्टीने काळजी घेणे आवश्यक आहे. कारण रास्त धान्य दुकाने म्हणजे भ्रष्टाचाराचे कुरण झाले आहे. असे समितीचे मत आहे. काऊंटर चेक ठेवण्यासाठी नवीन पद्धतीचा अवलंब करण्यात येत आहे. **यानुसार गोडाऊन मधून निघाल्यानंतर ज्या गावात धान्य जाणार आहे तेथील सरपंच व काही ठराविक नागरिकांच्या मोबाईलवर एस.एम.एस.पाठविण्याची सुरु करण्यात येणारी नवीन पद्धती तातडीने कार्यान्वीत करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

८.१२६ सन २००४-२००५ मध्ये सिंधुदूर्ग जिल्ह्यात ३ गटामधील १२ दुकानाच्या संपूर्ण तपासणीत विभागीय अधिकाऱ्यांनी ८ दुकानांचे निरीक्षण मागील २ ते ५ वर्षात केले नाही. ती दुकाने कोणती याबाबतची माहिती विभागाने समितीच्या बैठकीच्या वेळी तयार करुन ठेवावयास पाहिजे होती. परंतु आठ दुकाने कोणती आहेत त्याची माहिती विभागाला मिळत नाही. महालेखाकारांच्या कार्यालयामध्ये माहिती उपलब्ध असणे आवश्यक होते परंतु विभागाकडून माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्यामुळे भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या कार्यालयात माहिती उपलब्ध नाही. विभागाकडे अभिलेख उपलब्ध नाही हे योग्य नाही. अभिलेख सांभाळण्याची ज्यांची जबाबदारी होती त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. या विभागाकडून समितीला व महालेखाकार कार्यालयाला माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही हे

योग्य नाही. लेखी स्पष्टीकरणाव्यतिरिक्त विभागाला जर समितीला काही अधिकची माहिती द्यावयाची असेल तर तशी संधी समितीकडून दिली जाते. साक्षीच्या वेळी पुरवठा अधिकाऱ्यांनी काहीही खुलासा केलेला नाही. ही बाब गंभीर स्वरुपाची आहे असे मत समितीने व्यक्त केले.

८.१२७ कोकण विभागाचे उपायुक्त यांनी समितीला तपासण्याचे प्रमाण कमी आहे, ही वस्तुस्थिती मान्य केली तसेच गेल्या वर्षी ५२ टक्के इष्टांक होता परंतु, तपासण्या कमी झालेल्या आहेत. सर्व अभिलेख विभागाकडून उपलब्ध करुन घेऊन समितीला सविस्तर माहिती सादर करण्यात येईल असे आश्वासन त्यांनी समितीला दिले. त्यानुसार विभागाकडून माहिती प्राप्त होणे आवश्यक होते. परंतु विभागाकडून सन २००० ते २००६ पर्यंत सिंधुदूर्ग जिल्ह्यातील रास्त भाव दुकानाच्या तपासण्या केल्याचे कळविले आहे व समितीने जून २०१० मध्ये भेट दिल्यानंतर ऑगस्ट, २०१० मध्ये विशेष मोहिम राबवून तपासणी केल्याचे कळविले आहे. जुलै २०१० या कालावधीची दैनंदिनीची (टूर डायरी) माहिती समितीला देण्यात आली आहे. याप्रकरणी आताच्या पुरवठा अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासणीच्या तारखा जुळत नाहीत. शासनाच्या यंत्रणेमधील त्रुटी दूर करणे हा समितीचा मूळ उद्देश आहे. विभागाने समितीला माहिती देताना सांगितले की, सहा दुकाने जागेवर सापडत नव्हती व त्यांची माहिती मिळत नव्हती. त्यामुळे ही दुकाने बोगस असल्याचे मत समितीने व्यक्त केले. याबाबत सिंधुदूर्ग जिल्हाधिकाऱ्यामार्फत कारवाई अहवाल सादर करण्याचे निदेश समितीने दिले असता जिल्हाधिकारी सिंधुदूर्ग यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती पुढीलप्रमाणे आहे.

८.१२८ महालेखापाल, मुंबई यांनी सिंधुदूर्ग जिल्ह्यातील रास्त भाव दुकानांची २ ते ५ वर्षात केलेल्या तपासणी संदर्भात घेतलेल्या आक्षेपात ८ रास्त भाव दुकानापैकी प्रत्यक्षात २ धान्य दुकानांची तपासणी विलंबाने झाली आहे. परंतु आठही धान्य दुकानांच्या तपासणीत कोणतेही गंभीर स्वरुपाचे दोष तपासणी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आलेले नाहीत.

८.१२९ विलंबाने तपासण्या केलेल्या कालावधीत कार्यरत असलेले तहसिलदार १) श्री.आर.डी.कदम, माजी तहसिलदार, दोडामार्ग २) श्री.एस.एस.चिपकर, माजी तहसिलदार, देवगड ३) श्री.ए.एन.मालवणकर, माजी पुरवठा निरीक्षक, देवगड ४) श्री.ए.जी.शेळके, माजी पुरवठा निरीक्षक देवगड यांनी शासनाच्या निकषानुसार तपासणी का केली नाही याबाबतचा खुलासा इकडील कार्यालयीन कारणे दाखवा नोटीस क्र.डेस्क-१०, पुशा२/लोलेस. रा.भा.धा.दु.

तपासणी/२०१० दि.  जुलै, २०१० अन्वये खुलासा मागविण्यात आलेला आहे. प्रस्तुतचा खुलासा प्राप्त होताच त्यांचेविरुद्ध योग्य ती कारवाई करण्यात येत आहे.

८.१३० त्याचप्रमाणे तहसिलदार मालवण यांच्या पुरवठाविषयक कामकाजावर नियंत्रण नसल्याबाबत व त्यांचे कार्य कालावधीत रास्त भाव धान्य दुकानांच्या अतिशय कमी तपासण्या केल्याबाबत त्यांच्या दोन वेतनवाढी का रोखण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा जिल्हाधिकारी यांचेकडील कारणे दाखवा नोटीस क्र.डेस्क-१०/पुशा-२/लोलेस/रा.भा.धा.दु.तपासणी/२०१० दि.२१/८/२०१० अन्वये मागविण्यात आलेला आहे. सदरचा खुलासा प्राप्त होताच योग्य ती कारवाई करण्यात येत आहे.

८.१३१ तसेच सन २०००-२००५ या कालावधीत उक्त नमुद केलेल्या रास्त भाव दुकानांची दोन ते पाच वर्षात एकदाही तपासणी झाली नसल्याबाबत जिल्हा स्तरावरुन खात्री करण्यात आली. याबाबत तत्कालीन श्री.डी.डी.नडे, जिल्हा पुरवठा अधिकारी, सिंधुदुर्ग यांचेकडून जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांचेकडील कारणे दाखवा नोटीस क्र.डेस्क-१०/पुशा-२/लोलेस/रा.भा.धा.दु.तपासणी/२०१० दि.२१/८/२०१० अन्वये खुलासा मागविण्यात आलेला आहे. संबंधितांकडून खुलासा प्राप्त होताच योग्य ती कारवाई करण्यात येत आहे.

८.१३२ सार्वजनिक वितरण व्यवस्था नियंत्रण आदेश २००१ अन्वये तपासणी अधिकारीनिहाय खालीलप्रमाणे रास्त भाव दुकान तपासणीचा इष्टांक विहित केलेला आहे.

| अ.क्र. | तपासणी अधिकाऱ्याचे पद | इष्टांक |
|---|---|---|
| १ | अप्पर जिल्हाधिकारी | ४ |
| २ | जिल्हा पुरवठा अधिकारी | ४ |
| ३ | उपविभागीय अधिकारी | ४ |
| ४ | तहसिलदार | ६ |
| ५ | पुरवठा निरीक्षण अधिकारी | १० |
| ६ | पुरवठा निरीक्षक | १० |

८.१३३ शासनाने वरीलप्रमाणे विहीत केलेल्या इष्टांकानुसार सन २००९-२०१० व माहे एप्रिल २०१० ते जून २०१० या कालावधीत सिंधुदूर्ग जिल्ह्यातील तहसिलदार/पुरवठा निरीक्षक

यांनी रास्त भाव दुकानांच्या तपासण्या केलेल्याबाबतचा आढावा घेवून इष्टांक पूर्ण न केलेल्या तहसिलदार/पुरवठा निरीक्षक यांना कारणे दाखवा नोटीस इकडील क्र.डेस्क-१०/पुशा-२/लोलेस/रा.भा.धा.दु.तपासणी/२०१०    जुलै, २०१० अन्वये काढण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार त्यांचेकडून खुलासा प्राप्त होताच त्यांचेविरुद्ध योग्य ती कारवाई करण्यात येत आहे."

८.१३४ सिंधुदूर्ग जिल्ह्यातील रास्त भावाची सापडत नसलेली ८ दुकाने व त्यांच्या तपासण्या करण्यात येत नसल्याप्रकरणी समितीने घेतलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी सिंधुदूर्ग यांच्याकडून कारवाई सुरु असल्याचे सांगण्यात आले आहे. **या सर्व प्रकरणांचा जिल्हा स्तरावर सुरु असलेल्या कारवाईचा तातडीने आढावा घेवून संबंधितांवर कडक कारवाई करण्यात यावी व कारवाई पूर्ण झाल्याची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

८.१३५ आताच्या पुरवठा अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासणीच्या तारखा आणि पूर्वीच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासणीच्या तारखा जुळत नाहीत अशा प्रकारच्या यंत्रणेमधील त्रुटी दूर करणे, हा समितीचा मूळ उद्देश आहे. संपूर्ण तपशील घेण्याचा ज्यावेळी प्रयत्न करण्यात आला त्यावेळी ६ दुकाने जागेवर सापडत नव्हती व त्यांची माहिती मिळत नव्हती. याचा अर्थ दुकाने बोगस होती, दुकाने रेकॉर्डवर दाखविण्यात आली असतील आणि अन्न धान्य काळ्या बाजारात विकले गेले असेल, अशी शंका घेण्यास पुरेसा वाव असल्याचे मत समितीने व्यक्त केले. हे प्रकरण फार गंभीर आहे.

८.१३६ दिनांक १५ ऑगस्ट, २०१० पूर्वी सर्व दुकानांची तपासणी करण्यासाठी विशेष मोहिम राबविण्यात आली. त्यानुसार दिनांक १५.८.२०१० नंतर आढावा घेऊन सर्व दुकानांची तपासणी झाल्याबाबतची जिल्हा स्तरावर खात्री करण्यात आली आहे.

८.१३७ ज्या जिल्ह्यांमध्ये विहित प्रमाणापेक्षा कमी तपासण्या झाल्या असल्याचे निदर्शनास आले आहे ते जिल्हे सिंधुदूर्ग, सोलापूर, जालना, उस्मानाबाद व पुणे असे आहेत. नैसर्गिक आपत्ती, पूर, लोकसभा, विधानसभा तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या निवडणुका आणि वेळोवेळी अधिकाऱ्यांची रिक्त असलेली पदे यामुळे इष्टांकाप्रमाणे रास्त भाव दुकानांच्या तपासण्या करणे शक्य झाले नसल्याचे संबंधित अप्पर जिल्हाधिकारी यांनी कळविले आहे.

८.१३८ एकदाही तपासणी केली गेली नाही व दुकानांची नियमित मुदतीत तपासणी केली नाही असे दोषारोप असतानाही कर्मचाऱ्यांना फक्त ताकीद देण्यात येते. ही बाब

समितीची दिशाभूल करणारी आहे. **त्या अधिकाऱ्यांची पदोन्नती व वेतनवाढ थांबविणे आवश्यक होते असे मत समितीने मत व्यक्त केले. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामध्ये महसूल विभागाचे कर्मचारी असल्यामुळे महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांविरुद्ध कारवाई करता येत नाही. यासंदर्भात महसूल सचिवांना कळविण्यात यावे तसेच या दोन विभागामध्ये विभाजनाबाबतचा प्रलंबित असलेला निर्णय तातडीने घेण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

८.१३९ महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचारी पुरवठा विभागात प्रतिनियुक्तीवर काम करतात. आता पुरवठा विभागाने असा निर्णय घेतला आहे की, स्वतःचे संवर्ग तयार करावेत. यासंदर्भात न्यायालयात केस झाल्यामुळे पुरवठा विभागाची पदे भरु नये, असे पुरवठा विभागाकडून जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात पुरवठा विभागाची पदे रिक्त आहेत. यासंदर्भात दोन विभागाचे अद्याप एकमत झालेले नाही. ३८ पदे पुरवठा विभागाला महसूल विभागाने दिलेली असल्यामुळे महसूल विभागाची ३८ पदे रिक्त आहेत. मिळून ८१७८ पदे मंजूर असून, यापैकी गट-अ ते ड मधील जवळपास २००३ पदे रिक्त आहेत. विभागाच्या जिल्हा यंत्रणेतील कार्यालयांसाठी ४७२१ पदे मंजूर असून त्यापैकी रिक्त पदे १०२१ आहेत. विभागाच्या गट-अ संवर्गातील पदांवर त्या-त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमात विहित केल्यानुसार ५०% पदे महसूल यंत्रणेतील अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीवर बदलीने भरण्याची तरतूद आहे. या तरतूदीनुसार महसूल यंत्रणेतील अधिकारी विभागात कार्यरत आहेत. गट-ब-अराजपत्रित, गट-क व ड संवर्गातील पदांच्या सेवाप्रवेश नियमामध्ये महसूल यंत्रणेतील कर्मचाऱ्यांसाठी प्रमाण विहित केलेले नाही. परंतु तालुका व जिल्हास्तरावर पुरवठा विभाग अनुक्रमे तहसिलदार व जिल्हाधिकारी यांच्या अधिपत्याखाली असल्याने जिल्हास्तरावर एकूण रिक्त पदे विचारात घेऊन नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना पुरवठा विभागाकडे कामकाज चालविण्याच्या दृष्टीने कार्यरत ठेवले जाते. **पुरवठा विभागाच्या मंजूर पदांवर स्वतंत्र पद भरती करण्याचा शासन स्तरावर विचाराधीन असलेल्या प्रस्तावावर लवकरात लवकर कार्यवाही करण्यात यावी व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

# वित्त / गृह विभाग

## ९. वाहतुक भत्त्याचे अतिरिक्त प्रदान-

९.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील वित्त व गृह विभागाचा **परिच्छेद क्र.४.१.१. "वाहतुक भत्त्याचे अतिरिक्त प्रदान"** यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

९.२ वाहतूक भत्त्याचे प्रदान करतांना चुकीचे दर अंगिकारल्यामुळे, नागपुरात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना रु.६.४५ कोटीचे अतिरिक्त प्रदान झाले.

पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार, कर्मचाऱ्यांना त्यांच्या निवासस्थानापासून कर्तव्य स्थानांपर्यंत जाण्यायेण्याच्या खर्चाची भरपाई करण्याकरीता १ ऑक्टोबर, १९९८ पासून वाहतूक भत्ता देय होता.

स्थानिक पूरक भत्त्याच्या प्रयोजनार्थ केलेले शहरांचे वर्गीकरण वाहतूक भत्त्याचा देय दर निश्चित करण्याकरिता अंगिकारावयाचे होते.

नागपूरातील २८ आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचे (DDOs) अभिलेख तपासले (फेब्रुवारी २००६) असता असे उघडकीस आले की, तीन प्रवर्गाच्या कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्त्याचे प्रदान अनुज्ञेय मासिक दर अनुक्रमे रु.४००, रु.२०० व रु.७५ याऐवजी रु.८००, रु.४०० व रु.१०० ने करण्यात आले. ही बाब वित्त विभागाच्या निदर्शनास (सप्टेंबर, २००५) आणली असता नागपूर शहराचे वर्गीकरण "ब १" वर्ग शहर (मार्च २००५ पर्यंत) आहे याची वित्त विभागाने पुष्टि केली आणि त्यामुळे, नागपुरात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना मार्च, २००५ पर्यंत "इतर ठिकाणांकरिता" देय असलेल्या दराने वाहतूक भत्ता देय होता. नागपूर शहराचे वर्गीकरण १ एप्रिल, २००५ पासून "अ" वर्ग म्हणून करण्यात आले होते. याप्रमाणे, वाहतूक भत्त्याच्या प्रदानाकरिता चुकीचे दर अंगिकार केल्यामुळे मार्च, २००५ पर्यंत १२ विभागांमध्ये रु.६.४५ कोटीचे अतिरिक्त प्रदान झाले. अन्य कार्यालयांमध्ये या स्थितीचे पुनरावलोकन करणे आवश्यक आहे.

ही बाब वित्त विभागाच्या सचिवांना कळविली होती (मे, २००६). त्यांनी अतिरिक्त प्रदान झाल्याची पुष्टि (ऑक्टोबर, २००६) केली.

**<u>वित्त विभाग</u>**

**<u>ज्ञापन :-</u>**

९.३ उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वित्त विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला आहे.

महालेखापाल, नागपूर यांच्या कार्यालयाच्या दिनांक २३.९.२००५ च्या पत्रान्वये करण्यात आलेल्या विचारणेच्या अनुषंगाने वाहतूक भत्त्याच्या मंजूरीच्या प्रयोजनार्थ नागपूर शहराच्या वर्गीकरणाविषयीची वस्तुस्थिती दिनांक १३.१०.२००५ च्या शासनपत्रान्वये स्पष्ट करण्यात आली होती. तसेच, त्या कार्यालयाच्या दिनांक ३.५.२००६ च्या पत्रासंदर्भात, या प्रकरणी वाहतूक भत्त्याचे झालेले अतिरिक्त प्रदान हे चुकीचे दर लागू केल्याने झाले असल्याचे या विभागाच्या दिनांक २.८.२००६ च्या पत्रान्वये स्पष्ट करण्यात आले आहे. वाहतूक भत्त्याच्या मंजूरीविषयीच्या या विभागाच्या आदेशांतील तरतुदी स्वयंस्पष्ट आहेत. यासंबंधीच्या आदेशातील तरतुदींची योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी वेगवेगळ्या प्रशासकीय विभागांच्या अखत्यारित असलेल्या संबंधित कार्यालयांची आहे.

या संदर्भात आपल्या अखत्यारितील नागपूर नागरी समूह क्षेत्रातील सर्व कार्यालयांना कळवून वाहतूक भत्त्याच्या अतिप्रदानित रकमेची वसूली करण्यात यावी आणि या अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर आवश्यक ती कार्यवाही सुरु करण्यात यावी, असे या विभागाच्या दिनांक १६ जुलै, २००७ च्या पत्रान्वये सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना कळविण्यात आले होते. वाहतूक भत्त्याच्या मंजुरीसंदर्भातील सर्वसाधारण धोरण ठरविण्यापुरतीच या विभागाची मर्यादित भूमिका आहे. या विभागाने वरील पत्रान्वये कळविल्याप्रमाणे आपल्या अखत्यारितील सर्व कार्यालयांकडून अतिप्रदानित रकमेची वसुली करुन त्याबाबतचा अहवाल महालेखापाल कार्यालयास सादर करावयाची जबाबदारी ही त्या-त्या प्रशासकीय विभागांची आहे. या बाबीशी या विभागाचा संबंध नाही. त्यामुळे झालेल्या वसुलीचा तपशील या विभागाने ठेवण्याचा प्रश्न उद्‍भवत नाही.

तथापि, या प्रकरणी अतिप्रदानित रकमेच्या वसुलीबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाविरुद्ध मा.उच्च न्यायालयात विनंती याचिका क्रमांक ४६६१/२००७ दाखल करण्यात आली आहे. संबंधित याचिकाकर्ते हे विधी व न्याय विभागाचे कर्मचारी असल्याने आवश्यक ते शपथपत्र दाखल करण्याची कार्यवाही ही त्या विभागाकडून करण्यात येत आहे. त्या याचिकेच्या

दिनांक ९ ऑक्टोबर, २००७ रोजीच्या सुनावणीअंती दिलेल्या अंतरिम आदेशाद्वारे मा.न्यायालयाने सदर याचिकेवरील निर्णय होईपर्यंत वसुलीस स्थगिती दिली असल्याचे आणि सदर स्थगितीचा निर्णय हा सर्व वसूलीप्राप्त कर्मचाऱ्यांच्या प्रकरणी लागू असल्याचे आणि विधी व न्याय विभागानेही स्पष्ट केले आहे. (उच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रत व विधी व न्याय विभागाच्या अभिमतांची प्रत संलग्न)

**गृह विभाग**

**ज्ञापन :**

९.४ उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने पुढील प्रमाणे खुलासा केला आहे.

१. शासन निर्णय क्र.घभाभ/१०९८/सीआर ८२/९८/एसईआर-५, दिनांक ११.१२.१९९८ अन्वये नागपूर शहर हे स्थानिक पूरक भत्ता व घरभाडे भत्ता या प्रयोजनाकरिता "बी-१" या प्रवर्गात मोडत असल्याने नागपूर पोलीस आयुक्तालयांच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना शासन निर्णय क्र.वाहभ-१०९८/प्र.क्र.८३/९८/सेवा-५, दिनांक १४.१२.१९९८ अन्वये इतर मथळ्याखालील सदर नमूद दराप्रमाणे वाहतूक भत्ता प्रदान करणे आवश्यक होते. परंतु त्याऐवजी वाहतूक भत्ता हा "अ-१" आणि "अ" या शहराकरिता अनुज्ञेय असणाऱ्या दराने अदा करण्यात आल्याने रुपये १,०७,४७,८००/- इतक्या रकमेचे अतिप्रदान झाले आहे.

२. नागपूर शहराचे उक्त शा.नि.अन्वये "ब" वर्गात वर्गीकरण होण्यापूर्वी शा.नि.क्र. घभाभ-१०९३/७६/सेवा-५, दिनांक २ सप्टेंबर, १९९३ अन्वये स्थानिक पूरक भत्ता व घरभाडे भत्ता अनुज्ञेयतेसाठी नागपूर शहराचे (महानगरपालिका) वर्गीकरण "अ" मध्ये होते. त्यानुषंगाने नागपूर शहर हे "अ" प्रवर्गात असल्याचे गृहीत धरुन नागपूर शहरातील सर्व राज्य शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता प्रदान करण्यात आलेला आहे. त्यामध्ये पोलीस आयुक्तालयातील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना देखील दि.१.१०.१९९८ ते दि.३१.१२.२००३ पर्यंत वाहतूक भत्ता अदा करण्यात आला आहे. तसेच ऑक्टोबर, १९९८ ते डिसेंबर, २००३ पर्यंत पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांची वेतन देयकेदेखील कोषागाराने कोणतेही आक्षेप न घेता पारीत केली असल्याने "अ-१" व "अ" वर्गवारीप्रमाणे अदा करण्यात आलेला वाहतूक भत्ता नागपूर शहराकरिता अनुज्ञेय आहे अशी धारणा झाली होती. तथापि, कोषागार अधिकारी

नागपूर यांनी नागपूर शहर हे "ब-१" वर्गवारी मध्ये मोडत असल्याच्या सूचना दिल्याने सदर "अ-१" व "अ" वर्गवारीप्रमाणे देण्यात येत असलेला वाहतूक भत्ता बंद करण्यात आला व "ब-१" वर्गवारीप्रमाणे अदा करण्यास सुरुवात केली. त्यामुळे पूर्वीची अतिप्रदान झालेली रक्कम संबंधितांकडून वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येणार होती, परंतु सदर वसुली करु नये यासाठी राजपत्रित अधिकाऱ्यांनी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे याचिका क्रमांक ४६६१/२००७ दाखल केली होती त्यामुळे वसुली करण्यात आली नव्हती.

३. सदर याचिकेवर मा.उच्च न्यायालयाने दिनांक ९ ऑक्टोबर, २००७ रोजी दिलेल्या निकालाने वसुलीस स्थगित दिलेली नाही. वसुली केलेली असेल तर ती न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहणार आहे. त्यामुळे पोलीस आयुक्त, नागपूर यांच्या आस्थापनेवरील कार्यालयांकडून जून, २००८ पासून पोलीस आयुक्त, नागपूर यांनी संबंधित पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनातून प्रतिमहा रु.१००/- व रु.२००/- प्रमाणे कपात करुन रक्कम शासनखाती भरण्याची कार्यवाही सुरु केली आहे, तरी सदर स्पष्टीकरण मान्य करण्याची विनंती आहे.

**साक्ष :**

९.५ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने ५ ऑक्टोबर, २०१० रोजी प्रधान सचिव, गृह विभाग व प्रधान सचिव, वित्त विभाग यांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी गृह विभागाच्या प्रधान सचिवांनी उपरोक्त परिच्छेदासंदर्भात खुलासा करताना असे सांगितले की, गृह विभागाकडून अतिरिक्त प्रदान केलेल्या ७१ लाख रुपयांची वसुली करण्यात आली आहे. जास्त दराने दिलेल्या वाहतूक भत्त्याची संपूर्ण वसुली झालेली आहे.

९.६ सदर रक्कम प्रत्यक्षात वसूल करण्यात आली आहे का ? रक्कम अतिरिक्त प्रदान झाल्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, रक्कम प्रत्यक्षात वसूल करण्यात आली आहे. अतिरिक्त प्रदान करण्याच्या बाबतीत आहरण व संवितरण अधिकारी यांच्याकडून ही चूक झालेली आहे. नागपूर येथील बऱ्याच कार्यालयांकडून अशाप्रकारे वाहतूक भत्त्याचे अतिरिक्त प्रदान करण्यात आले होते. अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

९.७ या संदर्भात वित्त विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, महालेखाकार यांनी जो आक्षेप घेतला आहे, तो बरोबर आहे. नागपूर शहर हे 'ब-१' वर्गात मोडणारे असल्यामुळे त्याप्रमाणे भत्ता प्रदान करण्याऐवजी 'अ-१' आणि 'अ' या शहराकरिता अनुज्ञेय असणाऱ्या दराने भत्ता अदा करण्यात आला आहे. महालेखाकार यांनी ही वस्तुस्थिती लक्षात आणून दिल्यानंतर वित्त विभागाने सर्व संबंधित विभागाच्या सचिवांना अतिरिक्त प्रदान करण्यात आलेली रक्कम संबंधितांकडून वसूल करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

९.८ ज्या विभागातील कर्मचारी, अधिकारी यांना वाहतूक भत्त्याचे अतिरिक्त प्रदान करण्यात आले आहे, त्यांची यादी वाचण्यास उपमहालेखाकार यांना समितीने सांगितले असता, कृषी विभाग, पशुसंवर्धन विभाग, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, गृह विभाग, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, विधी व न्याय विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, महसूल व वन विभाग, ग्राम विकास विभाग आणि पाणीपुरवठा विभाग, सामाजिक न्याय व सांस्कृतिक कार्य विभाग, विशेष सहाय्य विभाग, नगर विकास विभाग या विभागांनी अतिरिक्त भत्त्याचे प्रदान केले आहे अशी माहिती समितीस मिळाली.

९.९ नागपूर शहर हे बी-१ प्रवर्गात मोडत असतानाही १०-१५ विभागांनी अतिरिक्त भत्त्याचे प्रदान केलेले आहे, ही अतिशय गंभीर बाब आहे. एखाद्या विभागाकडून चूक होऊ शकते. परंतु, या ठिकाणी १०-१५ विभागांकडून एकत्रितपणे अशी चूक झाली आहे, याचे नेमके कारण काय आहे ? या संदर्भात माहिती देताना वित्त सचिवांनी सांगितले की, शासन निर्णयाची अचूक अर्थउकल न केल्यामुळे ही चूक झाली असावी, असे वाटते. नागपूर शहराचे 'ब' वर्गात वर्गीकरण होण्यापूर्वी दिनांक २ सप्टेंबर, १९९३ च्या शासन निर्णयान्वये स्थानिक पूरक भत्ता व घरभाडे भत्ता अनुज्ञेयतेसाठी नागपूर शहराचे वर्गीकरण 'अ' मध्ये होते. त्यानुषंगाने नागपूर शहर हे 'अ' प्रवर्गात असल्याचे गृहित धरुन नागपूर शहरातील सर्व राज्य शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता प्रदान करण्यात आलेला आहे. ही बाब महालेखाकार यांनी निदर्शनास आणून दिल्यानंतर वित्त विभागाने अतिरिक्त प्रदान केलेली रक्कम संबंधितांकडून वसूल करावी, अशा प्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत. गृह विभागाशी

संबंधित वसूल करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणेच उच्च व तंत्रशिक्षण विभागानेही रक्कम वसूल केली आहे.

९.१० यासंदर्भात मधल्या कालावधीत अशी परिस्थिती निर्माण झाली होती की, या प्रकरणी अतिप्रदानीत रकमेच्या वसुलीबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाविरुद्ध विधी व न्याय विभागाच्या कर्मचाऱ्यांनी माननीय उच्च न्यायालयात विनंती याचिका दाखल केली होती व यांसदर्भात न्यायालयाने स्थगिती दिली होती. वित्त विभागाने यासंदर्भातील खुलासा विधी व न्याय विभागाकडून घेतला असता त्या विभागाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, न्यायालयाची स्थगिती असल्यामुळे वसुली करण्यात येऊ नये अन्यथा न्यायालयाचा अवमान होऊ शकेल. त्यामुळे वसुलीची कार्यवाही स्थगित करण्यात आली होती. यानंतर उच्च न्यायालयाच्या वकिलांमार्फत विधी व न्याय विभागाने आवश्यक ते शपथपत्र सादर करावे, अशा प्रकारच्या सूचना त्या विभागाला देण्यात आल्या होत्या. संदर्भात वेळोवेळी कोणती प्रगती झाली याबाबतची माहिती वित्त विभागाला सरकारी वकिलांकडून मिळाली नव्हती. वित्त विभागाने यासंदर्भात चौकशी केल्यानंतर अशी माहिती मिळाली की, उच्च न्यायालयाने सदर विनंती याचिका फेटाळली असून आता स्थगितीचा प्रश्न उद्भवत नाही.

९.११ विधी व न्याय विभागाच्या कर्मचाऱ्यांनी विनंती याचिका केली होती. इतर विभागांची वसूली का थांबविण्यात आली ? तसेच वाहतूक भत्त्याचे अतिरिक्त प्रदान कोणत्या वर्षात करण्यात आले आहे अशी विचारणा समितीने केली असता वित्त सचिवांनी सांगितले की, उच्च न्यायालयाने स्थगिती दिली होती व विधी व न्याय विभागाने असे अभिप्राय दिले होते की, हे स्थगिती आदेश सर्वसमावेशक आहेत व वाहतूक भत्त्याचे अतिरिक्त प्रदान सन २००५-२००६ या वर्षात करण्यात आले आहे. आता वसुलीला स्थगिती नाही. त्यामुळे सर्व विभागांना तसेच कोषागार अधिकारी यांना ३ महिन्यांच्या आत सदर वसुली करण्यात यावी अशी सूचना देण्यात येईल असे आश्वासन वित्त सचिवांनी समितीस दिले. त्यानुसार पत्र क्र.संकीर्ण १००६/प्र.क्र.४६/सेवा-५, दि.११.१०.२०१० च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे असे वित्त विभागाने कळविले आहे. परंतु त्यासंदर्भातील पुढील माहिती समितीला अद्यापपर्यंत वित्त विभागाकडून प्राप्त झाली नाही.

९.१२ स्थगिती केव्हा उठविण्यात आली ? या संदर्भात माहिती देताना वित्त सचिवांनी सांगितले की, २३ जुलै, २००८ ला स्थगिती उठविण्यात आली आहे. तथापि, वित्त विभाग पक्षकार नव्हती त्यामुळे वित्त विभागाला त्याची माहिती मिळालेली नाही. परंतु स्थगिती आदेश निष्कासित झाल्यानंतर बराच काळ गेला आहे. वसुलीसाठी एवढा कालावधी का लागला ? अशी विचारणा समितीने केली असता, वित्त विभागाला याची माहिती मिळाली नव्हती व आता आदेशाची प्रत वित्त विभागाने मागवून घेतली आहे असा खुलासा वित्त विभागाने केला. वित्त विभागाला माहिती मिळाली नाही, असे उत्तर समितीला अपेक्षित नाही. स्थगिती उठविल्याची माहिती २ वर्षापर्यंत मिळत नाही, हे कारण न पटण्यासारखे असल्यामुळे समितीने यासंदर्भात नाराजी व्यक्त केली, तसेच या संदर्भात जे कोणी जबाबदार असतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित केली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले.

९.१३ सदर अनियमितता कोणाकडून झाली, त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे ? याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रथम वसुलीची कार्यवाही सुरु करण्यात येईल व त्यानंतर जबाबदारी निश्चित करण्यात येईल. परंतु वसुलीचा आणि कारवाई करण्याचा काहीही संबंध नाही अशी विचारणा समितीने केली असता, वसुलीची आणि कारवाईची कार्यवाही एकत्रितपणे करण्यात येईल. संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी करण्याबाबतचे आदेश संबंधित सचिवांना देण्यात येतील असे विभागीय सचिवांनी दिले. यासंदर्भात वसुली व करावयाच्या कारवाईबाबतची माहिती समितीला सादर करण्यात यावी. तसेच, विभागीय चौकशी विहित मुदतीत पूर्ण करण्यात यावी असे निदेश समितीने विभागीय सचिवांना दिले.

९.१४ शासनाची एवढी मोठी रक्कम ५-६ वर्षे वापरण्यात आली आहे. त्यामुळे व्याजासह ही रक्कम वसूल केली पाहिजे. ज्यांच्याकडून ही अनियमितता घडली आहे त्यांच्याकडून व्याजाची वसूली करण्यात येईल का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सर्व संबंधितांची विभागीय चौकशी करावी लागेल. ज्यांना ही रक्कम अदा करण्यात आली आहे त्या कर्मचाऱ्यांकडून व्याज वसूल करावे, तथापि, ही बाब तपासून पहाण्यात येईल असे आश्वासन दिले त्यानुसार पत्र क्र.संकीर्ण १००६/प्र.क्र.४६/सेवा-५,

दि.११.१०.२०१० च्या पत्रान्वये सूचित केले आहे. परंतु कर्मचाऱ्यांकडून व्याज वसूल केले किंवा नाही या संदर्भातील माहिती अद्यापपर्यंत समितीला प्राप्त झाली नाही.

९.१५ विधी व न्याय विभागाच्या कर्मचाऱ्यांनी उच्च न्यायालयात विनंती याचिका दाखल केली होती. त्यामध्ये वित्त विभाग पक्षकार नव्हती त्यामुळे यासंदर्भात वित्त विभागास काहीही माहिती मिळाली नाही अशी माहिती वित्त सचिवांनी समितीला दिली असता समितीने विभागाला निदर्शनास आणून दिले की, समितीकडे काही दस्तऐवज आहेत व त्यामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

**Civ.** (C-II) No. 13610/07 F.F.22-11-2007

Writ Petition No. 4661/2007

The High Court Gazetted Officers Association,

High Court, Nagpur, through its General Secretary

Shri. K.S.Behare & one another

......versus.......

The State of Maharashtra, the Principal Secretary,

Finance Department, Mumbai & Three others.

९.१६ याचाच अर्थ असा आहे की, वित्त विभागाला पक्षकार करण्यात आले होते. याबाबत खुलासा करताना वित्त सचिवांनी सांगितले की, वित्तीय बाबींशी संबंधित प्रत्येक विनंती याचिकेमध्ये वित्त विभागाला पक्षकार करण्यात येत असते. परंतु, अशा याचिकांवर संबंधित विभागाकडून कार्यवाही करण्यात येत असते. याप्रकरणी विधी व न्याय विभागाने कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

९.१७ याचिकेचा निर्णय लागल्यानंतर तो कळविण्याबाबतचा मुद्दा आहे. ज्यांनी हे कळविले नाही त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ? ही वित्त विभागाची फसवणूक आहे असे मत समितीने व्यक्त केले. त्यावर सरकारी अभियोक्ता यांनी सदर याचिकेवरील माहिती वित्त विभागास का कळविले नाही, याबाबतची माहिती घेऊन ती समितीला सादर करण्यात येईल असे आश्वासन वित्त सचिवांनी दिले. त्यानुसार वित्त विभागाने पत्र क्र.संकीर्ण १००६/सं.क्र.४६/सेवा-५, दि.१४.२.२०११ अन्वये विधी व न्याय विभागाकडून

माहिती मागविण्यात आली असे कळविले आहे. परंतु सदर माहिती अद्यापपर्यंत समितीस प्राप्त झाली नाही.

९.१८ सरकारी अभियोक्ता यांनी जरी कळविले नाही तरी वित्त विभागाने माहिती घेणे गरजेचे होते. प्रत्येक विभागांमध्ये अंतर्गत लेखापरीक्षकांमार्फत लेखापरीक्षण करुन घेण्यात येत असते. ही बाब विभागाच्या लक्षात का आली नाही ? यावर उत्तर देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, शहराच्या वर्गीकरणाबाबत शासनाकडून खुलासा मागविण्यात आला होता. त्यानंतर रक्कम प्रदान करण्यात आली आहे. कोणीही जाणीवपूर्वक अनियमितता केलेली नाही.

९.१९ विभागाने उपरोक्त केलेला खुलाश्यावर समितीचे समाधान न झाल्यामुळे दिनांक २२ फेब्रुवारी, २०११ रोजी अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, सचिव, (ले व को) वित्त विभाग तसेच सरकारी वकील, मुंबई, उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांची साक्ष घेण्यात आली. सदर साक्षीच्या वेळी वाहतूक भत्त्याचे प्रदान करताना चुकीचे दर अंगिकारल्यामुळे नागपूरात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या रु.६.४५ कोटीचे अतिरिक्त प्रदान झाले होते त्याची वसुली केली असे पूर्वीच्या साक्षीचे वेळी विभागाने सांगितले होते. त्यासंदर्भात विभागाने सविस्तर खुलासा करावा असे समितीने सांगितले असता, विधी व न्याय विभागाचे प्रधान सचिव यांनी सांगितले की, नागपूर शहर हे "ब-१" वर्गात मोडणारे असल्यामुळे त्याप्रमाणे भत्ता प्रदान करण्याऐवजी "अ-१" आणि 'अ' या शहराकरिता अनुज्ञेय असणाऱ्या दराने भत्ता अदा करण्यात आला आहे. महालेखाकार यांनी ही वस्तुस्थिती लक्षात आणून दिल्यानंतर अतिरिक्त प्रदान केलेली रक्कम वसूल करावी असे निर्देश देण्यात आले होते. त्यानुषंगाने प्रत्येक विभागाने वसुली केलेली आहे.

९.२० अतिप्रदान झालेली रक्कम वसूल झालेली आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, उच्च न्यायालयाची वसुली पूर्ण झाली आहे. जिल्हा न्यायालयाची प्रत्येकी १० लाख रुपये वसुली झालेली आहे त्यातील चार हजार रुपये वसुली होऊ शकत नाहीत अशी परिस्थिती दिसते पण ते वसूल करण्याचे विभाग प्रयत्न करीत आहे, असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

९.२१ वसुली करण्यात आली नाही ही चूक कोणी केली? ज्यांनी चूक केली त्यांच्या बाबतीत काय कारवाई केली? यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, जे अतिरिक्त प्रदान झालेले आहे त्यासंबंधीची याचिका नागपूर, उच्च न्यायालयात दाखल केली आहे त्यासंबंधीची सद्यस्थितीची माहिती अशी आहे की, ती याचिका क्लोज फॉर जजमेंट झालेली आहे. या संदर्भातील अधिक माहिती देताना सरकारी वकील मुंबई, उच्च न्यायालय, नागपूर, खंडपीठ यांनी सांगितले की, समितीच्या मागील साक्षीमध्ये ज्या लोकांना भत्ते देण्यात आले ते विधी व न्याय विभागाचे कर्मचारी आहेत असे निदर्शनास आले होते ते तसे नसून हे उच्च न्यायालयाचे कर्मचारी आहेत. याचिकेमध्ये कोणत्याही प्रकारचे अंतरिम आदेश देण्यात आले नव्हते. यासंदर्भात शासनाला वारंवार पत्राने कळविण्यात आले आहे. सरकारी वकिलाच्या कार्यालयातर्फे कोणताही दुर्लक्षितपणा झालेला नाही. तिसरी गोष्ट म्हणजे खंडपीठाने ही याचिका क्लोज फॉर जजमेंट केली आहे. या याचिकेवरील अंतिम निकाल एका आठवड्यात अपेक्षित आहे.

९.२२ जे अतिरिक्त प्रदान झालेले आहे त्यासंदर्भातील परिपत्रकाची अर्थउकल योग्य न झाल्यामुळे हे अतिरिक्त प्रदान झालेले आहे तसेच अतिरिक्त प्रदान केलेली रक्कम ही मोठी आहे तेव्हा ही चूक कोणी केली हे समितीला कळले पाहिजे असे निदेश समितीने विभागास दिले असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, दिनांक १ ऑक्टोबर, १९९८ पासून कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता देय होता. स्थानिक पूरक भत्त्याच्या प्रयोजनार्थ केलेले शहराचे वर्गीकरण देय दर निश्चित करण्याकरिता अंगिकारावयाचे होते त्यामध्ये संभ्रम होतो.

९.२३ अतिरिक्त खर्च प्रदान केल्या संदर्भातल्या याचिकेवरील निकाल एका आठवडयात अपेक्षित आहे तर एका आठवडयानंतर जो काही निर्णय होईल तो समितीला कळविण्यात यावा तसेच अशा चूका होणार नाहीत यासंबंधी कटाक्षाने काळजी घेण्यात यावी. वाहतूक भत्त्याच्या संदर्भातील शासन निर्णयाचे अर्थउकल बरोबर केलेली नाही या संदर्भात विधी व न्याय विभागाने संबंधिताकडून खुलासा घेऊन समितीला कळवावा. ज्यांनी योग्य अर्थउकल केली नाही त्यांच्याकडून विधी व न्याय विभागाने खुलासा घेऊन समितीला तो कळवावा. शासनाने उच्च न्यायालयाला पैसे दिले आणि उच्च न्यायालयाने ते कर्मचाऱ्यांना दिले त्या संबंधीचे शासन निर्णयाचे अर्थउकल बरोबर झालेली नाही त्यामुळे उच्च न्यायालय असेल किंवा अन्य

कोणतेही न्यायालय असेल त्यांना कायद्याच्या पुढे जाता येणार नाही. वाहतूक भत्त्याच्या संदर्भातील अर्थउकल बरोबर केलेली नाही यासंदर्भात विधी व न्याय विभागाने संबंधिताकडून खुलासा घेवून समितीला कळवावा असे निदेश समितीने विभागास दिले. परंतु विभागाकडून अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झाली नाही. तसेच न्यायालयाचा निकाल अद्यापपर्यंत समितीस कळविला नाही.

९.२४ Why the officials from the Treasury Department allowed this Bill? The Treasury Department should have returned this Bill. The Treasury Department should not have allowed this Bill. अशी विचारणा उपमहालेखाकार यांनी केली असता, सचिव, वित्त विभाग (ले. व ह.) यांनी खुलासा केला की, शासन निर्णय दि.११/१२/१९९८ अन्वये नागपूर शहर हे स्थानिक पुरक भत्ता व घरभाडे भत्ता या प्रयोजनाकरिता "बी-१" या प्रवर्गात मोडत असताना नागपूर पोलीस आयुक्तालयांच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना वाहतूक भत्ता "अ" या शहराकरिता अनुज्ञेय असणाऱ्या दराने अदा करण्यात आला. यापूर्वी शासन निर्णय दि. २ सप्टेंबर, १९९३ अन्वये स्थानिक पुरक भत्ता व घरभाडे भत्ता अनुज्ञेयतेसाठी नागपूर शहराचे (महानगरपालिका) वर्गीकरण "अ" मध्ये होते त्या अनुषंगाने नागपूर शहर हे "अ" प्रवर्गात असल्याचे गृहीत धरुन नागपूर शहरातील सर्व राज्य शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांना पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना देखील दि. १-१०-१९९८ ते दि.३१-१२-२००३ पर्यंत "अ" वर्गा प्रमाणे वाहतूक भत्ता अदा करण्यात आला. त्यानंतर पुन्हा सन २००५ मध्ये नागपूर शहराचे वर्गीकरण "अ" वर्ग शहरात करण्यात आले. तसेच सदर याचिकेवर माननीय उच्च न्यायालयाने दिनांक ९ ऑक्टोबर, २००७ रोजी दिलेल्या निकालाने वसुलीस स्थगिती दिलेली नाही. वसुली केलेली असेल तर ती न्यायालयीन निर्णयाच्या अधीन रहाणार आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

९.२५ समिती समोर आलेल्या उपरोक्त माहितीवरुन नागपूर शहराचे वर्गीकरण "ब-१" वर्ग शहरात होत असून देखिल त्याचे वर्गीकरण "अ" वर्ग म्हणून करण्यात येवून वाहतुक भत्त्याच्या प्रदानाकरीता चुकीचा दर अंगिकारल्यामुळे मार्च, २००५ पर्यंत १२ विभागांमध्ये रु.६.४५ कोटींचे अतिरिक्त प्रदान झाले आहे.

९.२६ गृह विभागाकडून अतिरिक्त प्रदान केलेल्या ७१ लाख रूपयांची वसूली करण्यात आली आहे. जास्त दराने दिलेल्या वाहतूक भत्यांची संपूर्ण वसूली झालेली आहे.

९.२७ समितीसमोर आलेल्या माहितीवरुन नागपूर येथील बऱ्याच कार्यालयांनी वाहतूक भत्याचे अतिरिक्त प्रदान केल्याचे दिसून आले. नागपूर शहर "बी-१" वर्गात असतानाही रोजगार व स्वंयरोजगार विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, गृह विभाग, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, विधी व न्याय विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, महसूल व वन विभाग, विशेष सहाय्य विभाग व नगरविकास विभाग या विभागांनी अतिरिक्त भत्याचे प्रदान केले आहे. ही बाब अतिशय गंभीर आहे असे समितीचे स्पष्ट मत असून एक प्रकारे ही वित्तीय अनियमितता आहे असे समितीला वाटते.

९.२८ नागपूर शहरातील सर्व राज्य शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांना अतिरिक्त वाहतूक भत्ता प्रदान करण्यात आल्याची बाब महालेखाकार यांनी निदर्शनास आणून दिल्यांनतर वित्त विभागाने अतिरिक्त प्रदान केलेली रक्कम संबंधिताकडून वसूल करण्याबाबत सूचना दिलेल्या होत्या. त्याप्रमाणे गृह तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाने रक्कम वसूल केली आहे. याप्रकरणी झालेल्या अतिप्रदान रक्कमेच्या वसूलीबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाविरुद्ध विधी व न्याय विभागाच्या कर्मचाऱ्यांनी माननीय उच्च न्यायालयात जनहीत याचिका दाखल केली होती व यासंदर्भात न्यायालयाने स्थगिती दिली होती. याबाबत वेळोवेळी कोणती प्रगती झाली याची माहिती वित्त विभागाला सरकारी वकीलाकडून मिळाली नाही. आता उच्च न्यायालयाने सदर विनंती याचिका फेटाळली असून दिनांक २३ जुलै, २००८ ला स्थगिती उठविण्यात आली आहे. स्थगिती उठविल्याची माहिती २ वर्षापर्यंत वित्त विभागास मिळत नाही. हे कारण पटण्यासारखे नाही. त्यामुळे समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करते. **एवढे गंभीर प्रकरण असताना सरकारी अभियोक्ता यांनी याचिकेवरील माहिती वित्त विभागास का कळविली नाही याची माहिती घेवून समितीला कळविण्याचे आश्वासन वित्त सचिवांनी देवूनही अद्याप समितीस माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे यासंदर्भात जे कोणी जबाबदार असतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व याप्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

९.२९ अतिरिक्त रक्कम प्रदान केल्यासंदर्भातील याचिकेवरील निकालाचा निर्णय समितीस कळविण्यात यावा तसेच वाहतूक भत्याच्या संदर्भातील शासन निर्णयाचा अर्थउकल देखिल बरोबर केलेला नाही. **या संदर्भात विधी व न्याय विभागाने संबंधिताकडून खुलासा घेवून समितीला कळविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

## गृह विभाग

### १०. परवानाधारकास दाखविलेली अवाजवी मेहरबानी -

१०.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ च्या नागरी अहवालामधील **परिच्छेद क्र.४.२.१ "परवानाधारकास दाखविलेली अवाजवी मेहरबानी"** या संदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले.

१०.२ कराराच्या तरतुदी अंमलात आणण्यामध्ये आलेल्या अपयशामुळे जहाज शुल्क रु.१.५९ कोटी इतक्या रकमेची कमी वसुली आणि परवानाधारकास रु.६७.४२ लाख इतक्या रकमेचा अवाजवी फायदा.

शासनाने हितसंबंधित विकासकांबरोबर बांधा, स्वामित्व पत्कार, वापरा, सहभागी व्हा आणि हस्तांतरीत करा या तत्त्वावर लहान बंधारे व बंदरे यांच्या विकासासाठी सामंजस्य करार करण्याचे ठरविले (नोव्हेंबर २०००). त्यानुसार महाराष्ट्र सागरी मंडळाकडून मे. बालाजी लिझिंग ॲण्ड इंडस्ट्रिज कंपनी लिमिटेड (परवानाधारक) यांचेबरोबर रायगड जिल्ह्यातील दिघी येथील एका बंदराचा विकास करण्यासाठी एक करार करण्यात आला (मार्च २००२). बांधकामासाठी ठरवून दिलेला कालावधी पाच वर्षाचा होता. करारानुसार व्यापारी व्यवहार सुरु झाल्यानंतर (विकास कामे पूर्ण झाल्यानंतर) परवानाधारकाने बंदरामध्ये हाताळल्या गेलेल्या जहाज मालाकरीता उतरणावळ व जहाज वाहतूक शुल्क म्हणून रु.३ प्र.मे.ट. या दराने येणारी रक्कम महाराष्ट्र सागरी मंडळास द्यावयाची होती.

मार्च २००२ मध्ये केलेल्या करारात बंदराचे बांधकाम पूर्ण होण्यापूर्वी जहाज मालाच्या हाताळणीसंबंधात कोणतीही तरतूद नसल्यामुळे महाराष्ट्र सागरी मंडळाने परवानाधारकास दुसऱ्या करारान्वये अस्तित्वात असलेल्या लहान बंधाऱ्यावरुन जहाज मालाची हाताळणी करण्यास परवानगी दिली. ह्या कराराप्रमाणे परवानाधारकाने जहाज माल व जहाजासंबंधित असलेले शुल्क शासनाने ऑगस्ट २००१ मध्ये निश्चित केलेल्या दरपत्रकानुसार महाराष्ट्र सागरी मंडळास द्यावयाचे होते (वेळोवेळी दुरुस्ती झाल्याप्रमाणे). परवानाधारकावर लहान बंधारा सुस्थितीत ठेवणे व त्याची देखभाल करणे याचे बंधन होते. ते न पाळल्यास महाराष्ट्र सागरी मंडळ आवश्यक ती दुरुस्ती-देखभाल कामे परवानाधारकाच्या खर्चाने करुन घेऊ शकत होते.

परीक्षणामध्ये असे दिसून आले (डिसेंबर २००५) की, ऑक्टोबर २००२ ते एप्रिल २००४ या कालावधीत परवानाधारकाने ३.१० लाख मेट्रिक टन इतके बॉक्साईट हाताळले होते ज्याकरीता त्याने जहाज वाहतूक शुल्क म्हणून मार्च २००२ च्या करारातील तरतूद दर्शवून जरी बंदराचे विकासकाम पूर्ण झाले नव्हते तरी शासनाने निश्चित केलेल्या रु.३० प्रती मेट्रिक टन या ऐवजी रु.३ प्रती मेट्रिक टन या दराने अदायगी केली.

जरी महाराष्ट्र सागरी मंडळाने परवानाधारकास उतरणावळ व जहाज वाहतूक शुल्क म्हणून रु.३०/-प्रती मेट्रिक टन या दराने अदायगी करण्यासंबंधी निर्देशित केले होते (मार्च २००३) तरी परवानाधारकाने मंडळास रु.३/-प्रती मेट्रिक टन या दराने शुल्क आकारण्यासंबंधी विनंती केली. यावर मंडळाने रु.३/-प्रती मेट्रिक टन हा सवलतीचा दर मिळविण्यासाठी परवानाधारकासमोर एक छोटा बंधारा व संबंधित दोन मालमत्ता भाडे तत्त्वावर घेण्यासंबंधीचा पर्याय ठेवला (जुलै २००४). या मालमत्तेसाठी भाडेपट्टयाचा हप्ता शासकीय मूल्यनिर्धारकाकडून निश्चित व्हावयाचा होता. महाराष्ट्र सागरी मंडळाने असे सुद्धा मान्य केले की, परवानाधारकाने छोट्या बंधाऱ्याच्या देखभाल दुरुस्तीवर खर्च केलेली रु. ६७.४२ लाख ही रक्कम त्याने देय असलेल्या भाडे पट्टयाच्या रकमेपोटी समायोजीत केली जाईल.

याप्रमाणे रु.१.८५ कोटी इतकी किंमत असलेला छोटा बंधारा व संबंधित मालमत्ता परवानाधारकास भाडेपट्टा तत्त्वावर देण्यात आले. महाराष्ट्र सागरी मंडळाने असेही निर्देशित केले (सप्टेंबर २००५) की, परवानाधारकाने ऑक्टोबर २००२ ते एप्रिल २००४ या दरम्यान केलेल्या बॉक्साईट हाताळणीचे जहाज वाहतूक शुल्क रु.३०/-प्रती मेट्रिक टन या दराने द्यावयाचे आहे. तथापि जुलै २००६ अखेर पर्यंत परवानाधारकाने फरकाची रक्कम रु.८३.७० लाख दिलेली नव्हती.

परवानाधारकाने भाडेपट्टा हप्त्याची अंतिम अदायगी दिनांक ३० मे, २००५ या तारखेस दिली असल्याचे दिसून आले. यानुसार एप्रिल २००५ पर्यंत हाताळणी केलेल्या संपूर्ण मालावर रु.३/-प्रती मेट्रिक टन ऐवजी रु.३०/- प्रती मेट्रिक टन या दराने शुल्क आकारावयाचे होते. तसे न झाल्यामुळे परवानाधारकाकडून मे २००४ ते एप्रिल २००५ पर्यंत हाताळणी झालेल्या २.८१ मेट्रिक टन बॉक्साईट संबंधी आकारलेले उतरणावळ व जहाज वाहतूक शुल्क रु.७५.८७ लाख इतक्या रकमेने कमी वसूल झाले.

परवानाधारकाबरोबर झालेल्या करारातील तरतुदींचे पालन करण्यात आलेल्या अपयशामुळे फक्त रु.१.५९ कोटी (रु.८३.७० लाख आणि रु.७५.८७ लाख) इतक्या रकमेची कमी वसूली झाली एवढे नाही तर परवानाधारकास रु.६७.४२ लाख इतक्या रकमेचा अवाजवी फायदासुद्धा झाला.

ही बाब शासनाचे प्रधान सचिव यांचे निदर्शनास मे २००६ मध्ये आणली. उत्तर आलेले नाही (ऑक्टोबर २००६).

**ज्ञापन :**

१०.३ यासंदर्भात विभागाने पाठविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, दिनांक २२.१०.२००२ रोजी स्वतंत्र करारनामा स्वाक्षांकित झाल्यानंतर मे.बालाजी लिजिंग अँड इंडस्ट्रिज कंपनी लिमिटेड कंपनीने दिघी जेट्टीवरुन दि.१.७.२००४ पर्यंत ३,१०,१९७ मेट्रिक टन बॉक्साईट या मालाची हाताळणी केलेली आहे. तथापि सदरच्या जेट्टीवरुन करण्यात येणारी मालहाताळणी हा दिघी बंदर विकास प्रकल्पाचाच एक भाग असल्याचे नमूद करुन कंपनीने दिनांक ४.८.२००१ च्या अधिसूचनेनुसार रु.३०/- प्रति मेट्रिक टन प्रमाणे चढणावळ/उतरणावळ शुल्काची रक्कम भरण्यास नकार दर्शविला आहे.

दिनांक २२.१०.२००२ पासून कंपनीने केलेल्या ३,१०,१९७ मे.टन. बॉक्साईट हाताळणीपोटीच्या प्रलंबित चढणावळ/उतरणावळ शुल्काची दिनांक १.७.२००४ अखेरची थकबाकीची रक्कम रु.८३,७५,३१९/- इतकी येते.

मे.बालाजी लिजिंग यांचेकडे दिनांक १.७.२००४ रोजी चढणावळ/उतरणावळ शुल्कापोटी प्रलंबित असलेले रु.८३,७५,३१९/- व प्रत्येक शिपमेंट प्रमाणे देय असलेल्या चढणावळ/उतरणावळ शुल्क वेळीच अदा न केल्यामुळे ती रक्कम ज्या दिनांकापासून थकित आहे त्या दिनांकापासून त्या रकमेवर दिनांक २२.१०.२००२ रोजीच्या करारनाम्यातील कलम क्र.४२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रतिवर्षी १८ टक्के या दराने व्याज आकारणे आवश्यक आहे. सदर रक्कमेच्या वसूली करीता स्थानिक अधिकाऱ्यांमार्फत तसेच महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

मे २००४ ते एप्रिल २००५ या कालावधीत २.९१ मेट्रिक टन बॉक्साईट माल हाताळणी केली आहे. वरील संपूर्ण मालाकरिता रुपये ३/- प्रती मेट्रिक टन ऐवजी रुपये ३०/-प्रती मेट्रिक

टन या दराने शुल्क आकारावयाचे होते. त्यानुसार महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाची जेट्टी मेसर्स बालाजी लिजिंग कंपनी त्यांचे माल हाताळणीसाठी वापरण्यास देण्यात आली होती. सदर जेट्टी व त्या लगतची शासकीय मालमत्ता मेसर्स बालाजी लिजिंग कंपनीला विकण्याबाबतच्या प्रस्तावास महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या दिनांक १.७.२००४ रोजीच्या चाळीसाव्या बैठकीत बोर्डाने खालील प्रमाणे मान्यता दिली.

सर्वानुमते ठराव करण्यात येतो की,

- महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या मालकीची दिघी येथील जेट्टी व त्या लगतची शासकीय मालमत्ता मे.मुझुमदार ॲड असोसिएटस प्रा.लि. यांनी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डास सादर केलेल्या तपशिलानुसार रु.२,५२,१०,०००/- या रक्कमेला मेसर्स बालाजी लिजिंग लि. या कंपनीला विकण्याकरिता मान्यता देण्यात येत असून सदरची जेट्टी व त्या लगतच्या शासकीय मालमत्तेची मालकी दिनांक १७.३.२००२ रोजीच्या सवलत करारनाम्याचा ५० वर्षाचा कालावधी संपुष्टात येणे किंवा कोणत्याही कारणास्तव हा करारनामा ५० वर्षाचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी संपुष्टात येणे या पैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत मे.बालाजी लिजिंग लि. या कंपनीकडे राहील असे ठरविण्यात येऊन सदरहू रक्कमेचा भरणा ह्या तीन महिन्यात अथवा हाताळणी सुरु होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत कंपनीने करावा अन्यथा सदर रक्कमेवर १८ टक्के व्याज आकारण्यात यावे असे ठरविण्यात आले.
- सदर कंपनीने जेट्टी दुरुस्तीसाठी केलेल्या खर्चासंदर्भात महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या पॅनलवरील सनदी लेखापाल यांच्या परिक्षण अहवालाच्या आधारे प्रमाणित केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती सदर कंपनीस करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
- सदर जेट्टीची लिज किंमत भरुन घेतल्यानंतर मे.बालाजी लिजिंग ॲड इंडस्ट्रिज कंपनी.लि. यांच्याकडून माल हाताळणीसाठी रुपये ३/- प्रति टन या प्रमाणे शुल्क म्हणजेच दिनांक १७.३.२००२ च्या सवलत करारनाम्यानुसार आकारण्यात यावे.

दिघी पोर्ट येथील महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या मालकी हक्काच्या जागेचा वाणिज्यिक वापर करण्याच्या दृष्टीने सदरची जागा ही संबंधित विकासकाच्या नावे खरेदीतत्त्वाच्या अधीन

राहून हस्तांतरीत करण्यात यावी असा विचार करण्यात आला. त्यानुसार महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या मालकी हक्काच्या जागेचे मुल्यांकन करणाऱ्या शासनमान्य संस्थेकडून म्हणजेच मुजुमदार असोसिएटस लि. यांचेकडून मुल्यांकन रुपये २,५२,१०,०००/- याप्रमाणे करण्यात आले आणि सदर मुल्यांकन हे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या दिनांक १.७.२००४ रोजी झालेल्या ४० व्या बैठकीत मान्य करण्यात आले. बोर्डाने असेही मान्य केले की, विकासकास जेट्टीच्या दुरुस्तीसाठी जो काही खर्च येईल तो एकूण किंमतीतून वजा करण्यात येईल. एकूण दुरुस्तीचा खर्च रुपये ६७.४२ लाख इतका झाला असून तो बोर्डाच्या पॅनलवर असलेल्या चार्टर्ड अकाऊंटंट i.e. S.P.N.R. ASSOCIATES यांचेकडून त्यांचे पत्र क्र.एसपीएनआर/एमएमबी/कोर/०९, दिनांक २७.११.२००४ अन्वये तपासण्यात आला आहे.

**साक्ष :**

१०.४ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक १९.१०.२०१० रोजी सचिव, बंदरे व उत्पादन शुल्क विभागांच्या सचिवांची व अन्य विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. त्यावेळी अधिक माहिती जाणून घेण्याचा दृष्टीने समितीने मे. बालाजी लिजिंग अँड इंडस्ट्रिज कंपनी लि. या परवानाधारक कंपनीबरोबर झालेल्या करारातील तरतुदीचे पालन करण्यात आलेल्या अपयशामुळे शासनाला रु. १.५९ कोटी एवढ्या रकमेची कमी वसुली झाली व परवानाधारकास रु. ६७.४२ लाख एवढा अवाजवी फायदा झाला या महालेखापालांच्या आक्षेपाबाबत विभागास खुलासा करण्यास सांगितला असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, यामध्ये प्रामुख्याने दोन मुद्दे आहेत. ते म्हणजे बालाजी लिजिंग अँड कंपनीबरोबर सुरुवातीला सन २००२ मध्ये सवलत करारनामा केला होता. त्यावेळेस बंदराची हद्द ठरविलेली नव्हती. तसेच महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या शेजारी एक जेट्टी होती ती या सवलत करारनाम्यामध्ये धरली नव्हती. त्या जेट्टीचे मुल्यांकन काढून पैसे वसूल केल्यानंतर मगच ती त्या विकासकाला देऊ शकतो व त्यानुसार हा सवलत करारनामा सन २००२ मध्ये झाला. परंतु जेट्टीचे मुल्यांकन त्यात समाविष्ट केलेले नव्हते आणि म्हणून ती जेट्टी विकासकाला हवाली करण्यात आली नव्हती. परंतु विकासकाने शासनाला आणि पर्यायाने बोर्डाला विनंती केली की, सदर जेट्टी आम्हाला वापरण्याची परवानगी द्यावी कारण त्या जेट्टीची सुधारणा करुन ती वापरण्यायोग्य करण्यासाठी कंपनीने ६७ लाख रुपये इतका खर्च करावा लागेल. पण जोपर्यंत त्याचे मुल्यांकन सार्वजनिक

बांधकाम विभागाकडून निर्धारण होऊन येत नाही तोपर्यंत पैसे घेऊ नये अशा आधारावर त्यांना ही जेट्टी वापरण्याची परवानगी दिली होती. त्यानंतर शासनाने मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये निर्णय घेऊन बंदर धोरण तयार केले व त्याच दरम्यान बोर्डाकडून निर्धारण होऊन मे, २००४ ते २००५ या कालावधीतील वॉर्पेज प्रती टन नियमानुसार व परवानगी घेतल्यानंतर ३ रुपये प्रती मेट्रिक टन अमुक इतका येईल असे ठरले. परवानगीपूर्वी मात्र अशा वॉर्पेजचा दर प्रति मेट्रिक टन ३० रुपये एवढा आकारावा लागला. अशा प्रकारे ऑक्टोबर, २००२ ते एप्रिल, २००४ या कालावधीमध्ये ३ लाख १० हजार मेट्रिक टन बॉक्सॉईट निर्यात केले पण पैसे भरताना मात्र ३ रुपये प्रती टन नुसारच भरले. वास्तविक या कालावधीत ३० रुपये प्रती टनप्रमाणे पैसे भरावयाचे होते म्हणून यातील फरक प्रती मेट्रिक टन रु. २७ एवढा आहे. त्यानुसार हा फरक साधारणपणे ८३.७० लाख एवढा त्या कंपनीकडून वसूल करावा लागेल.

१०.५ कंपनीकडून वसुल करावयाची रक्कम कधीपर्यंत वसूल करणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता या रकमेच्या वसुलीसाठी सन २००७ मध्ये त्यांना पत्र दिलेले आहे. त्यात त्यांनी काही मुद्दे मांडले केलेले आहेत. पण महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून या दोन वर्षात वसुलीबाबत कोणतीही कारवाई झाल्याचे दिसत नाही. परंतु ही वसुली करावीच लागेल असे विभागीय सचिवांनी सांगितले. सन २००७ मध्ये वसुलीसाठी विभागाने पत्र लिहिलेले आहे. आता २०११ साल सुरु आहे. तरीसुद्धा विभाग मात्र कंपनीची खात्री देते की, मार्च २०११ पर्यंत विभागाचे नियमानुसार जे १८ टक्के व्याज ठरलेले आहे त्यासह ही वसुली होऊ शकेल. याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली असता, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाला या वसुलीबाबतचे सक्त निर्देश देण्यात येतील, असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

१०.६ शासनाच्या नियमानुसार ३० रुपये प्रती मेट्रिक टनप्रमाणे शुल्क आकारावयाचे होते तर मग कंपनीने ३ रुपयाप्रमाणे पैसे दिले ते पैसे का घेतले ? अशी विचारणा समितीने केली असता, सन २००२ ते २००४ या कालावधीतील हा करार होता, तो आता संपला आहे. त्यानंतर जेट्टीचे मुल्यांकन केले आणि सन २००५ मध्ये त्या कंपनीकडून २.५२ कोटी एवढी रक्कम वसूल केली आहे. ऑक्टोबर, २००२ ते एप्रिल, २००४ या कालावधीच्या दरम्यान २७ रुपये सवलत कंपनीने स्वत:कडेच ठेवून घेतले ही वसुली शासनाला करणे आवश्यक आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

१०.७ ही वसुली या वर्षाच्या म्हणजेच सन २०१० वर्षाअखेरपर्यंत होणार काय ? तसेच ही वसुली करण्याबाबत कालबद्ध कार्यक्रम समितीला पाहिजे. यावर वसुलीबाबत सुचना देण्यात येतील व मार्च, २०११ पर्यंत या कंपनीला वेळ देऊ अन्यथा त्यांच्या करारनाम्यात जे ठरलेले आहे त्यासंदर्भात बोर्डाकडून बंधने आणता येतील. कारण ही रक्कम भरली नाही तर त्यांचे कामकाज थांबविणे सुद्धा शक्य आहे. अशा प्रकारचे निर्देश महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाला देण्यात येतील असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले. त्याचबरोबर ही कंपनी तेथे ग्रीन फिल्ड पोर्ट डेव्हलप करीत आहे व नव्याने बंदर धोरण (पोर्ट पॉलिसी) सुद्धा आणले आहे. यासंदर्भात कंपनीकडे १७ वेळा पत्रव्यवहार केलेला आहे. आता जबरदस्तीनेच ही वसुली करावी लागेल, त्याशिवाय लवकर पैसे मिळणार नाहीत, अशी ही माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

१०.८ महालेखापालांनी सांगितले आहे की, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने अवाजवी फायदा करुन देण्याबाबतचा निर्णय घेतला आहे. परंतु तसे न करता एवढी रक्कम या कंपनीकडे वसुली होणे बाकी आहे व त्याकडे मेरीटाईम बोर्डाकडून अक्षम्य दुर्लक्ष झालेले आहे व ज्यांनी कोणी वसुलीबाबत दिरंगाई केली असेल त्यांच्यावर कारवाई सुद्धा व्हायला पाहिजे. यावर याबाबत कारवाईबाबत सुचना निर्गमित झालेल्या आहेत. तसेच ही वसुली करण्याबाबत निर्देश देखील तात्काळ देण्यात येतील. तसेच रक्कम वसुलीबाबतची कार्यवाही सुरुच आहे. त्या अनुषंगाने पत्रव्यवहार सुरुच आहे. मार्च २०११ पर्यंत कुठल्याही परिस्थितीत ही वसुली दंडनीय व्याजास करण्यात येईल असे आश्वासन विभागाने समितीस दिले.

१०.९ शिस्त लावण्यासाठी व्याजासह वसुली तर करावीच लागेल असे मत समितीने व्यक्त केले तसेच शासन काही सावकारी करीत नाही पण यासंदर्भात बोर्डाकडून दिरंगाई झालेली आहे त्याबद्दल समिती नाराजी व्यक्त केली व आता ही वसुली कुठल्याही परिस्थितीत मार्च, २०११ पर्यंत करण्यात यावी व समितीला तसे कळविण्यात यावे असे निदेश समितीने विभागास दिले. परंतु समितीने दिलेल्या निदेशानुसार विभागीय सचिवांनी वसुली मार्च २०११ पर्यंत करण्यात येईल असे आश्वासन दिले. पण सदर आश्वासनाबाबत विभागाकडून कोणतीही माहिती समितीला प्राप्त झाली नाही.

१०.१० दिघी पोर्ट येथील महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या मालकी हक्काची जागा विकासकाच्या नावे हस्तांतरित करण्याबाबत काय निर्णय झाला व त्या जागेचे अंतिम मुल्यांकन किती ठरविण्यात आले ? अशी विचारणा समितीने केली असता महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या मालकीची दिघी येथील जेट्टी व त्यालगतची शासकीय जागा ही बोर्डाला सादर केलेल्या तपशीलानुसार रु.२.५२ कोटी एवढ्या रकमेला बालाजी लिजिंग लि. या कंपनीला विकण्यासाठी मान्यता देण्यात आली. तसेच या रकमेपैकी कंपनीने रु.६७ लाख एवढा खर्च देखभाल व जेट्टी सुस्थितीत तसेच सुधारणा करण्यासाठी केला असून तेवढी रक्कम वजा करुन उर्वरित रक्कम वसूल करण्याचा निर्णय बोर्डाने घेतला आहे व ही रक्कम ३ महिन्यात वसूल करावी असे ठरले. तीन महिन्यात जर ही रक्कम वसूल झाली नाही तर त्यानंतरच्या कालावधीसाठी उर्वरित रकमेवर १८ टक्क्यानुसार व्याज आकारण्यात येईल. ही रक्कम मे, २००४ पासून आपल्याला वसूल करावयाची आहे. मुद्दा असा आहे की, जेट्टी वापरण्यावरील निर्धारण आणि त्याचे पैसे न भरता ती वापरल्यानंतर ३० रुपयाऐवजी ३ रुपये शुल्क भरले ती फरकाची रक्कम असे एकूण ८३ लाख रुपये व त्याचे ७ वर्षाचे व्याज आणि सन २००४ मध्ये त्याचे मुल्यांकन काढले व ते मुल्यांकन अमुक इतके याप्रमाणे ही रक्कम २.५२ कोटी एवढी रक्कम ३ महिन्यात भरावी व त्यातून ६७ लाख रुपये वजा करुन उर्वरित रक्कम ७५ टक्के त्यांनी भरले. उरलेली रक्कम ६ महिन्यात भरण्यात येईल पण मधल्या कालावधीत बोर्डाने निर्णय घेतला त्यानुसार उशीर झालेल्या कालावधीचे व्याज द्यावे लागेल. त्यानंतर ३ रुपये प्रमाणे वार्पेज शुल्क कंपनीने भरलेले होते ते ३० रुपये प्रती मेट्रिक टन प्रमाणे भरावयाचे होते. अशा प्रकारे २७ रुपयाचा जो फरक आहे ती रक्कम व्याजासह वसूल करावी. तसेच जेट्टीचे मुल्यांकन कळविल्यानंतर ती रक्कम ३ महिन्यानंतर भरण्यात आली व त्या रकमेवर १८ टक्क्याने व्याज वसूल करावयाचे आहे असे हे दोन मुद्दे असून त्यांची पुर्तता करुन समितीला तसे कळविण्यात येईल अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

१०.११ मे.बालाजी लिजिंग लि. यांच्याकडे ३,१०,१९७ मे.टन बॉक्साईटच्या हाताळणीपोटीच्या चढणावळ/उतरणावळ शुल्कापोटी प्रलंबित असलेले रु. ८३,७५,३१९/- व थकित रकमेवरील १८ टक्के दराने व्याजाची रक्कम वसुलीकरिता अधिकाऱ्यांमार्फत व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून काय कार्यवाही करण्यात आली ? यावर यासंबंधी पत्रव्यवहार

सुरु आहे, तसेच ही वसुली होईपर्यंत विभाग कार्यवाही करत राहणार अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

१०.१२ महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे अधिकार काय आहेत ? अशी विचारणा केली असता जमीन महसुलीची वसुली करण्याचे अधिकार बोर्डाला नाहीत. एक तर त्या कंपनीची पुढील मदत शासनाला थांबविता येऊ शकते अथवा जिल्हाधिकाऱ्यांकडे हे महसूल वसुलीचे अधिकार असल्याने त्यांच्याकडे तसा प्रस्ताव पाठवावा लागेल. तसेच शासनाने त्यांना २००७ मध्ये तसे कळविलेले आहे. त्यानुसार देखील हे वॉर्पेज शुल्कामधील फरकाची रक्कम वसूल करण्यासाठी त्यांना मार्च, २०११ पर्यंत मुदत देऊ. तरी देखील वसुली झाली नाही तर सवलत करारनामा करण्यात आलेला आहे तो रद्द सुद्धा करता येते. त्या अनुषंगाने पुढील कारवाई शासनाला करता येईल अशी माहिती विभागाने दिली.

१०.१३ शासन अशा बाबींचा वेळोवेळी आढावा घेत नाही काय ? सन २००५-०६ मधील ही रक्कम असताना देखील बोर्डाला शासनाने जाब विचारलेला नाही. ही बाब खेदजनक आहे असे मत समितीने व्यक्त केले असता त्यांना कळविले आहे पण या कामात दिरंगाई झाले हेही तितकेच खरे आहे, यात वाद नाही. मन लावून वसुली करावयास पाहिजे होती पण तशी ती झाली नाही. आता यावर उपाय इतकाच आहे की, मार्च, २०११ पर्यंत त्यांना मुदत द्यावी आणि त्यानंतर पुढील कारवाई, जी आपल्याला शक्य आहे ती सर्व करावी लागेल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

१०.१४ एखादा शेतकरी जर कर्ज भरु शकत नसला तर त्याच घरातील भांडी बाहेर फेकली जातात आणि दुसरीकडे मात्र अशा बड्या कंपन्यांवर अशा प्रकारे मेहेरबानी दाखविण्याचे कारण काय ? सन २००५-०६ मधील परिच्छेद असल्याने शासनाने लक्ष घालणे आवश्यक होते.याचा अर्थ असा होतो की, मे.बालाजी लिजिंग कंपनी आणि शासनाचे अधिकारी यांच्यामध्ये हातमिळवणी झालेली असावी. याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, लक्ष घातलेले आहे पण वसुली झालेली नाही ही बाब खरी आहे. कारण आपल्याला महसुलीच्या वसुलीचे अधिकार नाहीत. पण मार्च, २०११ पर्यंत कुठल्याही परिस्थितीत ही वसुली करण्यात येईल.

१०.१५ अशा प्रकारे शासनाचे कोट्यावधी रुपयांचे येणे असताना एखाद्या कंपनीवर एवढे प्रेम दाखवून रक्कम थकित ठेवणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. म्हणून महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने यामध्ये तात्काळ लक्ष घालून ही वसुली करावी अन्यथा त्यांच्याशी केलेले करारपत्र रद्द करावे, असे निदेश समितीने विभागास दिले. यावर हा करार विभागाला रद्दही करता येऊ शकतो, कारण तशी तरतूद आहे. त्यानुसार समितीला पुर्तता अहवाल कळविण्यात येईल. परंतु विभागाकडून माहिती अद्याप समितीस प्राप्त झाली नाही.

**अभिप्राय व शिफारशी :**

१०.१६ मे.बालाजी लिजिंग अँड कंपनी लि. या परवानाधारक कंपनीबरोबर झालेल्या करारातील तरतुदीचे पालन करण्यात आलेल्या अपयशामुळे शासनाला रू.१.५९ कोटी एवढ्या रकमेची कमी वसुली झाली व परवानाधारकांस रू.६७.४२ लाख एवढा अवाजवी फायदा झाला. सन २००२ मध्ये मे.बालाजी लिजिंग अँड कंपनी बरोबर सवलत करारनामा केला होता. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या शेजारी एक जेट्टी होती ती या सवलत करारनाम्यामध्ये धरली नव्हती. सदर जेट्टी मे. बालाजी अँड कंपनीला त्यांचे माल हाताळणीसाठी वापरण्यास देण्यात आली होती. त्यानुसार सन २००४ ते २००५ या कालावधीतील वॉर्पेज प्रती टन नियमानुसार व परवानगी घेतल्यानंतर ३ रूपये प्रति मेट्रिक टन इतका येईल असे ठरले होते. त्यामुळे परवानगीपूर्वी वॉर्पेजचा दर प्रति मे. टन ३० रूपये एवढा आकारणे आवश्यक होते. तथापि, कंपनीने ३ रूपये प्रती टन नुसारच ३ लाख १० हजार मे.टन बॉक्साईट निर्यातीवर पैसे भरले व फरक रू.८३.७० लाख कंपनीकडून वसूल करणे आवश्यक होते. तथापि, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने या वसुलीसंदर्भात कंपनीस सन २००७ मध्ये पत्राद्वारे कळवून देखिल अद्यापपर्यंत वसुलीची कार्यवाही झालेली नसल्याने समितीने नाराजी व्यक्त केली. चार-चार वर्षे उलटून गेल्यावर देखिल वसुली न झाल्यामुळे सदर वसुली न होण्यामागे कंपनी तसेच शासनाचे अधिकारी यांचे संगनमत असण्याची शक्यता नाकारता येत नाही या निष्कर्षाप्रत समिती आली. सदर वसुली कोणत्याही परिस्थितीत मार्च, २०११ पूर्वी १८% व्याजसह करण्यात येईल असे आश्वासन समितीस देण्यात आले परंतु अद्याप पर्यंत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला देण्यात आलेली नाही.

१०.१७ सन २००५-२००६ मधील ही रक्कम असताना देखील बोर्डाला शासनाने जाब विचारलेला नाही. ही बाब खेदजनक असल्याचे मत समितीने व्यक्त केले. **महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने यामध्ये तात्काळ लक्ष घालून वसूली करावी व रकमेचा भरणा करण्यास मे.बालाजी लिजिंग कंपनी तयार नसेल तर त्यांचेशी करण्यात आलेला करार रद्द करुन वसुलीबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी अशी समिती शिफारस करीत आहे. तसेच या वसुली प्रकरणी ज्या अधिकाऱ्यांनी निष्काळजीपणा दाखविला आहे त्यांची देखिल चौकशी करुन दोषी असलेल्या व्यक्तींविरुद्ध कडक कारवाई करावी, अशी समिती शिफारस करीत आहे. वसुलीच्या कार्यवाहीची तसेच दोषींविरुद्ध केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी, अशीही समितीची शिफारस आहे.**

## जलसंपदा विभाग

### ११. चलत अग्रीमाची अनधिकृत अदायगी -

**११.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालामधील **परिच्छेद क्र. ४.२.६ "चलत अग्रीमाची अनधिकृत अदायगी"** या संदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले.

११.२ रु.२०.७० कोटी इतक्या रकमेचा चलत अग्रीम कंत्राटदारास कंत्राट अटींच्या विरोधात देण्यात आला.

माती बंधाऱ्याचे बांधकाम आणि अर्जुन मध्यम पाटबंधारे प्रकल्प रत्नागिरीचे अनुलग्नक बांधकाम असे एकूण रु. ९४.६८ कोटी किंमतीचे काम एका कंत्राटदारास ६० महिन्यांच्या ठराविक मुदतीत पूर्ण करण्याच्या अटीवर देण्यात आले (जुलै २००१). तपासाअंती कार्यकारी अभियंता, रत्नागिरी पाटबंधारे विभाग (दक्षिण) यांचे अभिलेखे असे दर्शवितात की, प्रारुप निविदा सादरीकरण मान्य करताना मुख्य अभियंता, कोकण प्रदेश यांनी कंत्राट निविदेतील चलत अग्रीमासंबंधी असलेले कलम क्र.१६ रद्द केले होते. कंत्राटदाराने इतर दोन भागातील दोन चालू कामाचे साधारण रु.४० कोटी इतक्या रकमेचे देणे शासनाकडून प्रलंबित असल्यामुळे या कामाकरीता रु.२२ कोटी इतका चलत अग्रीम मिळावा अशी विनंती केली. कामाला गती येण्याच्या हेतूने शासनाने रु.१४.२० कोटी इतका १५ टक्के व्याज असलेला व सोयीच्या हप्त्यात वसूल होणारा चलत अग्रीम (स्वीकृत रु. ९४.६८ कोटी निविदा किंमतीच्या १५ टक्के) मंजूर केला. सदर चलत अग्रीम कंत्राटदाराच्या मार्च २००२ ते मार्च २००४ या कालावधीत चालू खात्यातील देयकांवर (R.A. Bills) दिला. २००३-२००४ च्या जिल्हा दर सूचीनुसार सुधारीत झालेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे रु.६.५९ कोटी इतका चलत अग्रीम मंजूर केला (मार्च २००५) आणि रु.६.५० कोटी इतकी रक्कम मार्च २००५ मध्ये अदा केली. जमीन ताब्यात घेणे आणि पुनर्वसन याबाबतच्या अडचणींमुळे सदरहू काम मार्च २००५ मध्ये सुरु झाले. संपूर्ण चलत अग्रीम मार्च आणि एप्रिल २००६ मध्ये वसूल करण्यात आला परंतु रु.७.८८ कोटी व्याजाची रक्कम मे २००६ पर्यंत वसूल करण्यात आली नव्हती.

प्रारुप निविदेतून चलत अग्रीमासंबंधी असलेले कलम रद्द केल्यामुळे, निविदा अंतिमतः मान्य केल्यानंतर चलत अग्रीम मान्य केल्याने निविदा कार्यपद्धतीस बाधा आली आणि इतर निविदाकारांना त्यांच्या बोलींची (Offers) नोंद घेत असताना ह्या फायद्यापासून त्यांना वंचित केले. याप्रमाणे निवडलेल्या कंत्राटदारास चलत अग्रीमाचा अवाजवी फायदा देण्यात आला.

कार्यकारी अभियंत्याने यावर असे उत्तर दिले की, (ऑक्टोबर २००५) चलत अग्रीम शासनाकडून मंजूर करण्यात आला. जमीन ताब्यात घेणे आणि पुनर्वसन याबाबतच्या अडचणींमुळे सदर काम मार्च २००५ पर्यंत सुरु झाले नव्हते आणि वसुली करण्यात आली नव्हती. त्यांनी पुढे असे म्हटले की, (मे २००६) चलत अग्रीमाची वसुली मार्च/एप्रिल २००६ मध्ये करण्यात आली. कंत्राटदाराची व्याज सोडून देण्याबाबतची विनंती विचाराधीन होती. सदर उत्तर योग्य नव्हते कारण ही अदायगी कंत्राट अटींच्या विरोधात होती. कामाची गती वाढविण्याचा हेतु सुद्धा साध्य झाला नव्हता.

ही बाब शासनाच्या प्रधान सचिवांस जून २००६ मध्ये कळविण्यात आली. अद्याप उत्तर नाही (ऑगस्ट २००६).

**ज्ञापन :**

**११.३** या संदर्भात विभागाने पाठविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, सुसज्जता अग्रीम देण्याची तरतूद मंजूर निविदेमध्ये नव्हती हे खरे आहे. परंतु कंत्राटदार मे.मोहिते ॲण्ड मोहिते यांनी त्यांचे पत्र दिनांक ३०.१.२००२ अन्वये पाटबंधारे खात्यातील महाराष्ट्रातील त्यांचेकडील इतर कामांचे प्रदान न झाल्यामुळे व त्यांच्या आर्थिक अडचणींमुळे अर्जुना मध्यम प्रकल्पाचे काम सुरळीतपणे व वेळेवर पूर्ण करण्यासाठी सुसज्जता अग्रीमाची मागणी केली होती. कोकण विकासाच्या कालबद्ध कार्यक्रमात अर्जुना मध्यम प्रकल्पाचा समावेश आहे व प्रकल्पाचे काम गतीने सुरु राहावे यासाठी कंत्राटदाराचे विनंतीचा विचार करुन शासन ज्ञापन पत्र क्र.अर्जुना १०.०२/२४८(२९/२००२) म.प्र.दिनांक २२.३.२००२ अन्वये प्रथमतः स्विकृत निविदेच्या (रु.१४६८.३३ लक्ष) १५ टक्के रु.१४२०.२५ लक्ष इतका चलत अग्रीम मंजूर करण्यात आला. तद्नंतर द्वितीय सुधारित अंदाजपत्रकाला मान्यता मिळाल्याने निविदेअंतर्गत बाबींची सुधारित किंमत रु.१३८६६.०० लक्ष इतकी झाल्याने मे.मोहिते ॲन्ड मोहिते कंत्राटदार यांचे दिनांक १०.३.२००५ चे पत्रान्वये त्यांनी वाढीव किंमतीच्या १५

टक्के इतका चलत अग्रीम मिळणेबाबत विनंती केल्यानुसार, शासन जलसंपदा विभागाकडील ज्ञापन क्र.अर्जुना/१०.०५/३२९(८३/०५) म.प्र.दि.३०.३.२००५ अन्वये वाढीव किंमतीच्या अनुषंगाने रु.६५९.६५ लक्ष इतका चलत अग्रीम मंजूर झाला. कंत्राटदारास एकुण (१४२०.२५ +६५०.००) २०७०.२५ लक्ष इतकी रक्कम अदा करण्यात आली. कंत्राटदाराकडून चलत अग्रीम रु.२०७०.२५ लक्ष माहे ४/२००६ अखेर पूर्णपणे वसूल करण्यात आला आहे. चलत अग्रीमाच्या व्याज वसूलीबाबत स्वतंत्रपणे कार्यवाही सुरु आहे.

निविदा अंतिम झाल्यावर व कंत्राटदाराने कामास सुरुवात केल्यानंतर त्यांच्या अडचणींचा विचार करुन शासनाने चलत अग्रीम मंजूर केला आहे. कंत्राटदाराची इतर कामाची देयके शासनाकडे प्रलंबित नसती तर त्यास चलत अग्रीम देण्याचा प्रश्न उद्‌भवला नसता व त्यास अर्जुना प्रकल्पावर अपेक्षित प्रगती करता आली असती. त्यामुळे चलत अग्रीम मान्य केल्याने निविदा प्रक्रियेस बाधा आलेली नाही किंवा इतर निविदाकारांना त्यांच्या फायद्यापासून वंचित केले नाही.

कंत्राटदाराने आतापर्यंत केलेल्या कामाचे अंदाजे ४० कोटी रुपये देणे शासनाकडे प्रलंबित आहे. शासनाकडील प्रलंबित रक्कम विचारात घेता कंत्राटदारास चलत अग्रीमाचा अवाजवी फायदा देणेत आला नाही.

महालेखापालांनी शासनाच्या प्रधान सचिवांना जून, २००६ मध्ये कळविलेल्या अभिप्रायाचे उत्तर ऑगस्ट २००६ पर्यंत देखील महालेखापालाना मिळालेले नव्हते त्या बाबतचे स्पष्टीकरण अथवा कारणे शासनाने आपल्या ज्ञापनात नमूद केली नसल्याचे समितीला ज्ञापनावरुन दिसून येते.

**महालेखापालांनी अनौपचारिक संदर्भान्वये उपस्थित केलेला मुद्दा :**

१) कंत्राटदाराला अदा केलेला रु. २०.७० कोटी सुसज्जता अग्रिम (मोबिलायझेशन ॲडव्हान्स) हा निविदा शर्तीचे उल्लंघन करणारा असल्याने शासनाकडील खुलासा मान्य करता येत नाही. प्रारुप निविदेतून सुसज्जता अग्रिमाची (मोबिलायझेशन ॲडव्हान्सची) शर्त वगळण्यात आल्यानंतर पुढे निविदा मंजूरीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर बेकायदेशीररित्या सुसज्जता अग्रिम (मोबिलायझेशन ॲडव्हान्स) मंजूर करण्यात आला. त्यामुळे इतर निविदाकारांना या फायद्यापासून वंचित व्हावे लागले.

अशाप्रकारे निवडक ठेकेदारांना सुसज्जता अग्रिमाची (मोबिलायझेशन ॲडव्हान्सचा) अयोग्य पद्धतीने फायदा देण्यात आला. यामध्ये कामाला गती देण्याचा उद्देश साध्य झालेला नाही. लोकलेखा समितीला सादर होणाऱ्या खुलाशात याबाबतचा अंतर्भाव करण्यात यावा.

२) लोकलेखा समितीला सादर होणाऱ्या खुलाश्यात सुसज्जता अग्रिमाचे (मोबिलायझेशन ॲडव्हान्सचे) व्याज वसुलीबाबतची प्रगती तसेच काम पूर्ण करणेबाबतचा अंतर्भाव करण्यात यावा.

लोकलेखा समितीला परिपूर्ण व अचूक उत्तराची अपेक्षा आहे.

**शासनाचे अभिप्राय :**

११.४ सर्वसाधारणपणे निविदा ५ टक्के सुसज्जता अग्रिम (मोबिलायझेशन ॲडव्हान्स) व १० टक्के मशिनरी ॲडव्हान्स अशी तरतूद असते. परंतु या निविदेमध्ये सुसज्जता अग्रिमाची (मोबिलायझेशन ॲडव्हान्सची) तरतूद निविदा प्रक्रियेमध्ये रद्द करण्यात आलेली आहे. मंजूर निविदेत सुसज्जता अग्रिमाची (मोबिलायझेशन ॲडव्हान्सची) तरतूद नसल्याने कंत्राटदारांनी त्यांचे दिनांक ३०.०१.०२ चे पत्रान्वये पाटबंधारे खात्यातील महाराष्ट्रातील त्यांचेकडील अंदाजे रु. ४०.०० कोटीचे इतर कामांचे प्रदान न झाल्यामुळे व त्यांच्या आर्थिक अडचणीमुळे अर्जुना मध्यम प्रकल्पाचे काम सुरळीतपणे व वेळेवर पूर्ण करण्यासाठी सुसज्जता अग्रिमाची (मोबिलायझेशन ॲडव्हान्सची) मागणी केली. कोंकण विकासाच्या कालबध्द कार्यक्रमात अर्जुना मध्यम प्रकल्पाचा समावेश आहे व प्रकल्पाचे काम गतीने सुरु रहावे यासाठी कंत्राटदाराचे विनंतीचा विचार करून शासन ज्ञापन क्र. अर्जुना १०.०२/२४८(२९/२००२)म.प्र.दि. २२.३.२००२ अन्वये प्रथमतः स्वीकृत निविदेच्या (रु.१४६८.३३) १५ टक्के रु. १४२०.२५ लक्ष इतका सुसज्जता अग्रिम (मोबिलायझेशन ॲडव्हान्स) मंजूर करण्यात आला.

तद्नंतर द्वितीय सुधारित अंदाजपत्रकाला मान्यता मिळाल्याने निविदेअंतर्गत बाबीची सुधारीत किंमत रु. १३८६६.०० लक्ष इतकी झाल्याने मोहिते ॲंड मोहिते कंत्राटदार यांचे दि. १०.३.२००५ चे पत्रान्वये त्यांनी वाढीव किंमतीच्या १५ टक्के इतका सुसज्जता अग्रिम (मोबिलायझेशन ॲडव्हान्स) मिळणेबाबत विनंती केल्यानुसार शासन जलसंपदा विभागाकडील ज्ञापन क्र. क्र.अर्जुना/१०.०५/३२९(८३/०५) म.प्र.दि.३०.३.२००५ अन्वये वाढीव किंमतीच्या

अनुषंगाने रु.६५९.६५ लक्ष इतका सुसज्जता अग्रिम (मोबिलायझेशन ॲडव्हान्स) मंजूर झाला. कंत्राटदारास एकुण (१४२०.२५ +६५०.००) २०७०.२५ लक्ष इतका सुसज्जता अग्रिम (मोबिलायझेशन ॲडव्हान्स) १५ टक्के व्याज दराने अदा करण्यात आला व तो कंत्राटदाराकडून माहे ४/०६ अखेर पूर्णपणे वसूल करण्यात आला आहे.

निविदा निश्चित झाल्यानंतर व कंत्राटदाराने काम चालू केल्यानंतर शासनाने त्यास सुसज्जता अग्रीम मंजूर केलेले आहे.

सुसज्जता अग्रीमाची शर्त ही प्रत्येक ब-१ निविदेत समाविष्ट असते. ही शर्त या कामाच्या प्रारुप निविदेतदेखील समाविष्ट होती. तथापि सदर प्रारुप निविदेस मान्यता देताना मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोकण प्रदेश मुंबई यांनी सदरची शर्त वगळण्याचे निर्देश दिले. त्याप्रमाणे निविदा पुस्तिका तयार करताना ही शर्त वगळण्यात आली. निविदा प्राप्त झाल्यानंतर मे.मोहिते ॲन्ड मोहिते इंजि. ॲन्ड कॉन्ट्र. यांची निविदा सर्वात कमी रकमेची असल्याने त्यांचेशी चर्चा करण्यात आली.

सुसज्जता अग्रीम सर्वप्रथम मंजूर करण्यापूर्वी भू संपादन प्रक्रीया सुरु करण्यात आली होती. तसेच, काही क्षेत्र हे खाजगी वाटाघाटीद्वारे ताब्यात घेण्यात आले होते. तसेच कंत्राटदाराने यंत्र सामुग्री व मनुष्यबळ कार्यक्षेत्रावर आणून काम सुरु करण्याची तयारी देखील केलेली होती. तथापि, अत्यल्प प्राप्त अनुदानामुळे कामाची गती ठेकेदारास राखता आला नाही. तसेच कंत्राटदाराने खात्याच्या इतर कामात मोठी गुंतवणूक केलेली असल्याने स्वबळावर कामाची गती राखण्याची त्याची क्षमता नव्हती. तथापि, प्रमुख्याने हे काम कोकण विकास कार्यक्रमांतर्गत समाविष्ट असल्याने ते पूर्ण करण्यास प्रथम प्राधान्य होते. त्यामुळे खाते सदरचे काम गतीमान करण्याबाबत आग्रही होते व कंत्राटदाराची ते गतीमान करण्याची क्षमता राहीली नव्हती. सरतेशेवटी कंत्राटदाराने सदरचे काम गतीमान करण्याच्या दृष्टीने सुसज्जता अग्रीम मंजूर करण्याबाबत खात्याकडे मागणी केली तथापि, सदरची शर्त मंजूर निविदेमध्ये अंतर्भूत नसल्याने खात्याने सदरचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला व शासनाने त्यास वेळोवेळी मान्यता दिली.

दरम्यानचे काळात काम सुरु असताना प्रकल्पग्रस्तांनी खाजगी वाटाघाटीद्वारे जमिनी माहे १/२००३ मध्ये खात्यास हस्तांतर केलेल्या होत्या. त्यांची त्यांनी परत मागणी केली व

एवढे करून ते थांबले नाहीत तर भूसंपादन व पुनर्वसनाचा तातडीने निपटारा करण्याच्या विषयावर त्यांनी माहे ८/२००३ व ११/२००३ मध्ये आंदोलन छेडले व धरणाचे संपूर्ण काम माहे ११/२००३ मध्ये बंद पाडले. यादरम्यान कंत्राटदाराने काम करण्याबाबत सर्व नियोजन केलेले होते, तथापि, खात्याच्या ताब्यात संपादित जमीन नसल्याने व प्रकल्पग्रस्तांचा प्रखर विरोध असल्याने तो काम करू शकत नव्हता. मात्र डाव्या तीरावरील खाजगी वाटाघाटीने काही जमीनधारकांनी जमीनी ताब्यात दिल्या होत्या. त्याठिकाणी माहे ११/२००३ पासून जलरोधक खंदक खोदाईचे व त्यानुषंगाने धरणाचे काम कंत्राटदाराने सुरु ठेवले होते.

सदरची परिस्थिती माहे ९/२००५ पर्यन्त तशीच राहिली. दरम्यानच्या काळात मंत्री/विविध अधिकारी स्तरावर प्रकल्पग्रस्तांच्या बैठका आयोजित केल्या व त्यांचे मन वळवण्यात खाते यशस्वी झाले व माहे ९/२००५ मध्ये काम जोमाने सुरु झाले.

त्यानंतर आज अखेर प्रकल्पाच्या धरणाचे काम कधीही बंद झालेले नाही या काळात कंत्राटदाराने कामाची प्रगती अंदाजे ६० ते ६५ टक्के एवढी केली आहे.

मागील २-३ वर्षाच्या काळात प्रकल्पास पुरेसे अनुदान प्राप्त झाले नाही. तरीदेखील कंत्राटदाराने या कामात स्वबळावर स्वत:ची मोठी आर्थिक गुंतवणुक करुन ते जवळ जवळ नियोजनानुसार त्या टप्प्यात नेलेले आहे.

प्रारुप निविदेत सुसज्जता अग्रीमाची तरतुद वगळलेली असल्याने निविदा निश्चित झाल्यानंतर सदर शर्तीमध्ये बदल करण्याची कार्यवाही ही निविदा शर्तीना बाधा आणणारी व इतर पात्र ठेकेदारांना या सुविधेपासून वंचित ठेवणारी असून ठराविक कंत्राटदारास लाभ मिळवून देणारी असल्याचे मत महालेखापालांनी प्रतिपादन केलेले आहे. तथापि, वर सविस्तरपणे नमूद केलेल्या विवेचनानुसार महालेखापालांचा हा आक्षेप योग्य नाही. तसेच खात्याने ठेकेदारास कोणतीही अन्य प्रकारे मदत केलेली नाही.

शासनाने सुसज्जता अग्रीम मंजूर करताना घातलेल्या अटी या निविदेचा भाग समजण्यात आलेल्या आहेत. सुसज्जता अग्रीमाची अट जरी निविदेतून वगळण्यात आलेली असली, तरी जर खात्याच्या चुकीमुळे काम पूर्ण होण्यास विलंब लागला तर कंत्राटदारास द्यावयाच्या नुकसानभरपाईची अट मंजूर निविदेत अंतर्भूत असल्याने ठेकेदाराने त्याअंतर्गत व्याजमाफीची मागणी केली. याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला. तथापि

शासनाने सदरचा प्रस्ताव अमान्य केला व लवकरात लवकर व्याजाची वसुली करण्याचे आदेश दिले. झालेल्या प्रकारात कंत्राटदाराची काहीही चूक नसल्याने सदरचा प्रस्ताव नियामक मंडळाच्या बैठकीपुढे ठेवण्यात आला. याविषयी सदर बैठकीत चर्चा होवून प्रस्ताव वित्त विभागास सादर करावा व त्यांच्या पुढील मतानुसार पुढील कार्यवाही करण्याचे ठरले. त्यानुसार प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात आला आहे व यावर निर्णय होईपर्यत व्याज वसूली पुढे ढकलण्यात आली आहे.

**साक्ष :**

**११.५** उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासंदर्भात समितीने दिनांक २२ फेब्रुवारी, २०११ रोजी सचिव, जलसंपदा विभाग व अन्य विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष घेतली. त्यावेळी जमिनी ताब्यात घेणे आणि पुनर्वसन याबाबतचे काम पूर्ण होण्यापूर्वीच कंत्राटदाराला रुपये २०.७० कोटी रकमेचा चलत अग्रीम कंत्राट अटीच्या विरोधात कसा काय देण्यात आला ? या संदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, अर्जुना मध्यम प्रकल्पाचे हे काम आहे. या कामाचे आदेश प्रत्यक्षात जुलै २००१ मध्ये देण्यात आले होते. निविदा प्रक्रिया सुरु होती. तसेच त्यावेळी भूसंपादनाचे काम सुरु होते. काही ठिकाणी खाजगी वाटाघाटी सुरु होत्या. कामाचे आदेश दिले होते. निविदेमध्ये चलत अग्रिम देण्याची तरतूद नव्हती. कंत्राटदाराने चलत अग्रिम मागणी केल्यानंतर क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी सदर प्रस्ताव शासनास सादर केला. शासन स्तरावरुन अग्रीम देण्यास मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पाच्या कामाची सद्यस्थिती पाहिली तर धरणाचे काम ९७ टक्के पूर्ण झाले आहे. सांडवा काढण्याचे काम ९० टक्के पूर्ण झाले आहे. आयसीपीयूचे काम ७० टक्के पूर्ण झाले आहे. आज या धरणाची साठवणूक क्षमता ७४ दशलक्ष घनमीटर इतकी आहे. आता १० दशलक्ष घन मीटर इतका पाणी साठा होत आहे. जून २०११ पर्यंत काम पूर्ण होणार असून पूर्ण क्षमतेने पाणीसाठा करण्याची योजना कार्यान्वित केली आहे. हे धरण रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा तालुक्यात आहे.

११.६ अग्रिम देण्याची तरतूद निविदेमध्ये नसताना २० कोटी रुपये अग्रिम रक्कम कशी काय दिली आहे. धरणाचे काम सुरु केल्यानंतर निधी द्यावयास पाहिजे होता. तसेच निविदेमध्ये ज्या अटी व शर्ती होत्या त्या प्रमाणे कामे केल्याचे दिसून येत नाही. अशी विचारणा

समितीने केली असता, विभागीय सचिवांनी असे सांगितले की, सन १९८१ पासून चलत अग्रिम देण्याची तरतूद होती. तसा शासन निर्णय होता. मार्च २००० मध्ये एक परिपत्रक काढण्यात आले त्यामध्ये नवीन कामाची निविदा काढतांना चलत अग्रिम, यंत्रसामुग्री अग्रिम देण्याची तरतूद करु नये, असे नमूद केले होते. ही निविदा प्रक्रिया मार्च २००० नंतर सुरु झाली. यासंदर्भात जून २००० मध्ये परिपत्रक काढण्यात आले होते. त्यामध्ये असे नमूद केले की, सदर परिपत्रक रद्द समजण्यात यावे. अशा शासन स्तरावरुन सूचना देण्यात आल्या होत्या. त्या सूचना संबंधित मुख्य अभियंता कार्यालयास मिळाल्या नसल्यामुळे त्यांनी निविदेचा मसुदा तयार करताना किंवा निविदा काढतांना चलत अग्रिम देण्यासंदर्भातील विषय क्षेत्रिय स्तरावरुन शासन स्तरावर पाठविला. कामाची प्रगती पाहून शासनाने चलत अग्रिम देण्यास मान्यता दिली.

११.७ कार्यादेश दिल्यावर ४० टक्क्यावर असलेल्या निविदेवर आक्षेप घेतल्यानंतर सदर काम त्याच एजन्सीला १० ते १५ टक्के रक्कम कमी करुन देण्यात येत आहे असे समितीने विचारताच विभागीय सचिवांनी तसेच वित्त सचिवांनी सांगितले की, कार्यादेश दिल्यानंतर असे होत नाही. त्यावर समितीने असे विचारले की, काळू धरणाबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीने) निविदा काढली होती. या धरणासाठी २००० कोटी रुपयांची निविदा आली होती. ही निविदा ४० टक्क्यापेक्षा जास्त असल्याची हरकत माननीय मुख्यमंत्री व इतरांनी घेतल्यानंतर सदर निविदाधारक कंपनीने १० ते १५ टक्के रक्कम कमी करण्याची तयारी दर्शविली होती. सदर काम करण्यास सदर निविदाधारक कंपनी तयार झाली. यामध्ये ५०० ते १००० कोटी रुपयांचा फरक निर्माण झालेला आहे. यावर विभागीय सचिवांनी माहिती दिली की, समितीने ज्या धरणाचा उल्लेख केला त्याची माहिती घेऊन सविस्तर माहिती समितीला सादर करण्यात येईल. विभागीय सचिवांनी समितीला आश्वासित केल्याप्रमाणे विभागाकडून माहिती प्राप्त झाली असून त्यात असे नमूद करण्यात आले आहे की, काळू प्रकल्पाच्या निविदेत प्रकल्पासाठी लागणारी वनजमीन भूमी संपादन व पर्यावरण मान्यता घेण्याची तरतूद आहे. सदर मान्यता घेण्यास किमान २ ते ३ वर्षांचा कालावधी लागणार आहे. सदर मान्यता प्राप्त झाल्यानंतर प्रकल्पाचे काम सुरु करावयाचे होते. त्यामुळे ३ वर्षांची काल्पनिक भाववाढ गृहित धरुन काम सुरु करतेवेळची निविदेची अद्ययावत किंमत काढण्यात आली होती. त्यास त्यावेळचा (निविदा सादर झाल्यानंतर ३ वर्षाचा) मूळ निर्देशांक गृहित

धरण्यात येऊन त्या अद्ययावत किंमतीवर ४ टक्के अधिक्याची निविदा स्विकृत करण्यात आली. सदर निविदेची येणारी किंमत ही अंदाजित किंमतीवर ४४.८३ टक्के जादा येत होती.

११.८ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वरील प्रमाणे वाढीव अद्ययावत किंमतीवर हरकत घेतल्यानंतर याबाबत ठेकेदारासमवेत बैठक घेऊन चर्चा व पुन्हा वाटाघाटी करण्यात आल्या. त्यामध्ये तीन वर्षाची भाववाढ वजाती करुन निविदेची अद्ययावत किंमत निविदा बोलावलेल्या वर्षाच्या प्रचलित दरसूचीप्रमाणे काढण्यात आली व या किंमतीवर निविदा दाखल करतानाचा मूळ निर्देशांक धरण्याच्या अटीवर ४ टक्के जादा दराने काम करण्यास राजी असल्याचे कंत्राटदाराने सांगितले व तसे लेखी पत्र दिले. मूळ निविदेत हीच शर्त असल्याने त्यानुसार ४ टक्के अधिक्याची निविदा स्वीकृत करण्यात आली.

११.९ काळू प्रकल्पाच्या निविदा कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश यांनी काढली आहे. सदर निविदेची अंदाजपत्रकीय किंमत ४२१.५८ कोटी होती. अद्ययावत किंमत ४३३.८५ कोटी होती. सदर किंमतीवर ४ टक्के अधिक्याने निविदा स्वीकृत करण्यात आली आहे. त्यामुळे निविदेची अधिक्यासह किंमत ४५१.२१ कोटी येते. प्रकल्पावर कुठलेच काम चालू झाले नव्हते. वरील कामाच्या हितार्थ ठेकेदारासमवेत पुन्हा वाटाघाटी करुन सुधारित कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. यासंपूर्ण चलत अग्रिमाच्या प्रकरणाच्या संदर्भातील माहिती महालेखाकार यांच्या आक्षेपासह समितीला सादर करण्यात यावी असे निदेश समितीने विभागाला दिले असता, चलत अग्रिम रक्कम १५ टक्के व्याजाने दिली होती. मूळ रक्कम वसूल झालेली आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

११.१० चलत अग्रिम रकमेवरील १५ टक्के व्याजाची वसुली करण्यात आली आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सन १९८१ पासून चलत अग्रिम देण्याची तरतूद होती. मार्च २००० मध्ये जे परिपत्रक काढण्यात आले त्यामध्ये यासंदर्भातील सूचना देण्यात आली होती. त्यानंतर जून २००० मध्ये एक परिपत्रक काढून मार्च २००० मध्ये जे परिपत्रक काढले ते रद्द करण्यात आले. अर्जुना मध्यम प्रकल्पाच्या कामाची गती चांगली आहे सदर काम चालू राहावे यासाठी चलत अग्रिम देण्यात आला. चलत अग्रिम वर १५ टक्के व्याज आकारण्यात आले आहे व्याजाची रक्कम माफ करावी

अशी मागणी त्यांनी केली आहे. त्यांची मागणी शासनाने अमान्य केली आहे तसेच या प्रकल्पाचे काम जवळपास अंतिम टप्प्यात आले आहे. या वर्षात पूर्ण क्षमतेने पाण्याचा साठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

११.११ आतापर्यंत प्रकल्पाची ही कामे पूर्ण व्हावयास पाहिजे होती. तसेच चलत अग्रिम देण्याची पद्धत बंद करण्यात यावी असे मत समितीने व्यक्त केले असता, ऑक्टोबर, २०१० मध्ये यासंदर्भातील निर्णय घेण्यात आला आहे. यापुढे निविदेमध्ये चलत अग्रिमाची तरतूद ठेवण्यात येऊ नये असा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

११.१२ संबंधित कंत्राटदाराची रक्कम देयकातून आगाऊ कपात केली आहे काय ? तसेच संबंधित कंत्राटदाराच्या देयकातून व्याजाची कपात का केली नाही ? तसेच निविदा नोटीसमध्ये अग्रिम देता येत नाही, दिला तर त्याच्या देयकातून अग्रिमाची रक्कम व्याजासहित कपात करायला हवी. सदर प्रकरण हे पाच ते सहा वर्षापूर्वीचे आहे. अशी किती प्रकरणे आहेत ? याचीही माहिती समितीला देण्यात यावी. कामे करीत असताना सर्व नियम धाब्यावर बसवून कामे करणे हे योग्य नाही. तसेच सदर परिच्छेद महालेखाकारांनी काढला म्हणून तो लोकलेखा समितीपुढे चर्चेस आला. त्यामुळेच याप्रकरणातील गांर्भिय समितीपुढे आले याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली.

११.१३ यासंदर्भात समितीने अशी विचारणा केली की, सदर कामासाठी किती कोटी रुपयांचा खर्च येणार आहे ? तसेच यासंदर्भातील अंदाजपत्रक सुधारित केलेले आहे काय ? व सदर कामाला गती मिळालेली आहे काय ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यावेळी असणाऱ्या दराप्रमाणे कामाची किंमत ठरलेली होती. सदर प्रकल्पामध्ये प्रकल्पग्रस्तांची जमीन संपादित केलेली असून त्यांची इतरत्र निवासाची सोय करण्यात आलेली आहे. प्रकल्पग्रस्तांसाठी सर्व नागरी सोयी-सुविधा पूर्ण केलेल्या आहेत. या प्रकल्पाच्या संदर्भातील निविदा दरसूचीप्रमाणे काढण्यात आली होती.

११.१४ मर्जीतील संबंधित कंत्राटदाराना २० कोटी रुपये दिलेले आहेत ही बाब समितीने विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणून दिली व अशी विचारणा केली की, सदर कामाची निविदा कोणत्या वर्षी मागविण्यात आली होती ? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, सन १९९९ ते २००० च्या सुमारास निविदा मागविण्यात आली होती. व

यासंदर्भातील कार्यादेश जुलै, २००१ मध्ये दिलेले होते. यामध्ये दरसूची ही १९९३-१९९४ ची होती. त्यानंतर सन २००१ मध्ये निविदा काढली होती.

११.१५ विभागीय सचिवांनी केलेल्या खुलाश्यावर समितीचे समाधान झाले नाही. त्यामुळे समितीने याविषयाचा अभ्यास करण्यासाठी संपुर्ण प्रकरणाची माहिती लेखी स्वरुपात समितीला देण्यात यावी, असे निदेश समितीने दिले. समितीस विभागाकडून नस्तीच्या स्वरुपात माहिती प्राप्त झालेली आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

**११.१६** समितीला प्राप्त झालेल्या लेखी व तोंडी माहितीवरुन असे दिसून येते, चलत अग्रिम देण्याची तरतूद निविदेमध्ये नसताना कंत्राटदाराला २० कोटी रुपये अग्रिम रक्कम दिली आहे. धरणाचे काम सुरु केल्यानंतर निधी द्यावयास पाहिजे होता. तसेच निविदेमध्ये ज्या अटी व शर्ती होत्या त्याप्रमाणे कामे केल्याचे दिसून येत नाही. सन १९८१ पासून चलत अग्रिम देण्याची तरतूद होती. तसा शासन निर्णय होता. मार्च २००० मध्ये एक परिपत्रक काढण्यात आले त्यामध्ये नवीन कामाची निविदा काढतांना चलत अग्रिम, यंत्रसामुग्री अग्रिम देण्याची तरतूद करु नये, असे नमूद केले होते. ही निविदा प्रक्रिया मार्च २००० नंतर सुरु झाली. यासंदर्भात जून २००० मध्ये काढलेल्या परिपत्रकान्वये मार्च, २००० मध्ये काढलेले परिपत्रक रद्द करण्यात आले व यासंदर्भातील सूचना संबंधितांना शासन स्तरावरुन देण्यात आल्या होत्या. सदर सूचना संबंधित मुख्य अभियंता कार्यालयास मिळाल्या नसल्यामुळे त्यांनी निविदेचा मसुदा तयार करताना किंवा निविदा काढतांना चलत अग्रिम देण्यासंदर्भातील अट निविदेत नमूद केली नव्हती. नंतर कामाची प्रगती पाहून शासनाने चलत अग्रिम देण्यास मान्यता दिली होती.

**११.१७ शासनाच्या निविदेमध्ये चलत अग्रिमाची अट नमूद केली नव्हती. परंतु पुढे निविदा मंजूरीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर चलत अग्रिम मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे इतर निविदाकारांना या फायद्यापासून वंचित राहावे लागले व अशा प्रकारे चलत अग्रिमाचा अयोग्य पध्दतीने फायदा घेण्यात आला हे महालेखापालांचे आक्षेप चुकीचे आहेत असे म्हणता येत नाही. परंतु मार्च, २००० मध्ये नविन कामाची निविदा काढतांना चलत अग्रिम, यंत्रसामुग्री अग्रिम देण्याची तरतूद करु नये असे परिपत्रक काढल्यावर जून, २००० मध्ये नविन परिपत्रक काढून मार्च, २००० चे परिपत्रक रद्द करण्यामागील कोणती भूमिका होती हे समितीस**

स्पष्ट झाले नाही. त्यामुळे मार्च, २००० व जून, २००० ची परिपत्रके निर्गमित करण्यामागील शासनाचा उद्देश काय होता. याची माहिती समितीस तात्काळ देण्यात यावी तसेच आगामी कालावधीत एखाद्या प्रकल्पाबाबत निविदा प्रक्रिया सुरु केल्यावर व नंतर निविदा प्रक्रिया मंजूर झाल्यावर त्यातील अटी व शर्तींमध्ये बदल करण्यात येणार नाहीत, याबाबत विभागाने दक्षता घ्यावी अशी समितीची शिफारस आहे.

११.१८ याच संदर्भात समितीला असेही दिसून आले आहे की, महालेखापालांनी सदर परिच्छेदाच्या संदर्भात व्यक्त केलेले अभिप्राय विभागाला जून २००६ मध्ये कळविले असून परिच्छेदाच्या संदर्भात महालेखापरिक्षकांच्या आक्षेपाना ऑगस्ट २००६ अखेरपर्यंत देखील विभागाने त्याबाबतची माहिती महालेखापालाना पाठविलेली नाही यावरुन महालेखापालांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबतची माहिती विहित कालमर्यादेमध्ये पाठविण्याची खबरदारी विभागाकडून घेतली जात नसल्याचे स्पष्ट होते. इतर परिच्छेदांच्या बाबतीत देखील महालेखापालांनी उपस्थित केलेल्या मुद्दाबाबत विहित कालमर्यादेत कार्यवाही केली जात नाही ही बाब विचारात घेता या संदर्भात सर्व मंत्रालयीन विभागाना मुख्य सचिवांच्या सहीने सविस्तर परिपत्रक काढून सूचना द्याव्यात व इत:पर अशाप्रकारे महालेखापालांनी विचारणा केलेल्या मुद्दयाबाबतचे स्पष्टीकरण त्वरीत पाठविण्याच्या दृष्टीने सतर्क राहण्याबाबत सूचित करावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

**१२. कामाचे अनियमित वाटप :**

१२.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालामधील **परिच्छेद क्र. ४.२.७ "कामाचे अनियमित वाटप"** या संदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले.

१२.२ रूपये ३.६९ कोटी किंमतीचे वेगवेगळ्या ठिकाणी करावयाचे एक स्वतंत्र काम एका कंत्राटदारास निविदा न मागविता अतिरिक्त बाब म्हणून नियमांतील तरतूदीचा भंग करून देण्यात आले.

सूर्या पाटबंधारे प्रकल्पाच्या सूर्या बँक कॅनलच्या सात किलोमीटर लांब असलेल्या डहाणू शाखा कॅनलच्या सिमेंट कॉंक्रीट लाईनिंगचे रू. १.६५ कोटीचे काम एका कंत्राटदारास ७ फेब्रुवारी, २००४ ला देण्यात आले, दिनांक ६ ऑगस्ट, २००४ या वेळेपर्यंत पूर्ण व्हावयास हवे असलेल्या ह्या कामाचा कालावधी दिनांक ३१ डिसेंबर, २००५ पर्यंत वाढविण्यात आला, परंतु हे काम मे, २००६ पर्यंत पूर्ण करण्यात आले नव्हते.

कार्यकारी अभियंता, सूर्या कॅनल डिव्हीजन / डहाणू यांचे अभिलेखे तपासले असता असे दिसून आले की, सूर्या राईट बँक कॅनलच्या १८ कि.मी. डिस्ट्रीब्युटरी नं.२ चे सिमेंट कॉंक्रीट लाईनिंगचे कंत्राटदारास दिलेल्या कामाशी संबंधीत नसलेले रू.३.६९ कोटीचे काम सदर कंत्राटदारास नियमांतील तरतूदींचा स्पष्टपणे भंग करून देण्यात आले (नोव्हेंबर, २००४).

कार्यकारी अभियंत्यांने असे सांगितले की, (मे, २००६ ) ज्या उपविभागाकडून जी कालवा पद्धती सांभाळली जात होती त्यातच सदरहू कामाचा भाग असल्यामुळे ते काम त्याच कंत्राटदारास देण्यात आले. निविदा कार्यपद्धतीच्या अवलंबामुळे निविदाकारांनी जादा दर नोंदविल्यामुळे खर्चात वाढ होण्याची तसेच कामास विलंब लागण्याची शक्यता होती. मुख्य अभियंत्याने सुध्दा ह्या कारवाईस मान्यता दिली आहे.

सदरहू उत्तर स्वीकारता येत नाही कारण कंत्राटदारास दिलेल्या मुळ कामाशी या कामाचा संबंध नव्हता. सूर्या बँक कॅनलच्या डिस्ट्रीब्युटरी नं.२ च्या सिमेंट कॉंक्रीट लाइनिंग कामाचा जे अतिरिक्त बाब म्हणून देण्यात आले होते ते डहाणू शाखा कॅनल च्या मूळ सिमेंट कॉंक्रीट लाईनिंगच्या कामाशी संबंधित नव्हते आणि कामाची जागा वेगळ्या ठिकाणी होती.

महाराष्ट्र सार्वजनिक कामे नियम पुस्तिकेच्या तरतूदीनुसार नेहमीच्या निविदा कार्यपद्धतीचा अवलंब केल्यानंतर सदरहू काम द्यावयास हवे होते.

या प्रमाणे रू.३.६९ कोटी किंमतीचे दिलेले काम नियमबाह्य होते.

ही बाब शासनाचे प्रधान सचिवांस जून २००६ मध्ये कळविण्यात आले. अद्याप उत्तर नाही. (ऑक्टोबर, २००६)

**<u>ज्ञापन:</u>**

१२.३ या संदर्भात विभागाने पाठविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद करण्यात आले आहे की, सूर्या प्रकल्पाची प्रकल्पीय सिंचन क्षमता १२१८८ हेक्टर होती. विना अस्तरीकरणाच्या कालव्यातून होणारा पाणी नाश कमी करून या प्रकल्पाची सिंचन क्षमता १४६९६ हेक्टर इतकी वाढविण्यात आली. याकरीता मुख्य कालवा, शाखा कालवा व वितरीका यांना अस्तरीकरण प्रस्तावित करण्यात आले होते.

याच प्रस्तावाचा भाग म्हणून डहाणू शाखा कालव्याचे अस्तरीकरणाचे काम हाती घेण्यात आले. शाखा कालव्याची लांबी ७ कि.मी. इतकी आहे. त्यापैकी कि.मी. १ ते ३ इतके लांबीचे काम निविदा क्रमांक ब-१/२४(२००३-२००४) अंतर्गत चालू होते. निविदा किंमत ८१.४६ लक्ष इतकी होती. कार्यारंभ आदेश कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र. सूकावि.१/लेशा/आ.२/८८८दिनांक ७/२/२००४ अन्वये देण्यात आले. मूळ कालावधी ६ महिन्याचा होता अंतिमतः या कामास दिनांक ३१/३/२००७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. सद्यःस्थितीत हे काम डिसेंबर, २००६ मध्ये पूर्ण झालेले आहे. अंतीम देयक निधी अभावी प्रलंबित आहे.

तसेच डहाणू शाखा कि.मी. ४ ते ७ इतकी लांबीचे काम निविदा क्रमांक ब-१/२३ (२००३-२००४) अंतर्गत चालू होते. निविदा किंमत ७६.८३ लक्ष इतकी होती. सदर निविदा ह्या ४.५० टक्के अधिक दराने स्विकारण्यात आल्या होत्या. कार्यारंभ आदेश कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्रमांक सूकावि.१/लेशा/आ.२/८८९/२००४ दिनांक ७/२/२००४ अन्वये देण्यात आले. मूळ कालावधी ६ महिन्याचा होता अंतिमतः त्यास दिनांक ३१/३/२००७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. सदरचे काम डिसेंबर, २००६ मध्ये पूर्ण झालेले आहे. अंतिम देयक निधी अभावी प्रलंबित आहे.

याच प्रकल्पांतर्गत सूर्या उजवा तीर कालव्यावर डहाणू शाखा कालव्याच्या परिसरात वितरीका क्रमांक २ असून या वितरीकेचे अस्तरीकरण विरहित काम पूर्वीच पूर्ण झाले होते व त्यावर सिंचन चालू होते. सदर वितरीका अस्तरीकरणविरहीत असल्याने व कोकणातील विशिष्ट भौगोलिक रचना विचारात घेता वितरीकेच्या शिर्ष भागात पाणी झिरपा होऊन आजूबाजूची शेती नापीक होत होती. त्याचवेळी पुच्छ भागात पाणी मिळत नव्हते. म्हणून या वितरीकेस प्रकल्पातील तरतूदीप्रमाणे अस्तरीकरण करणे आवश्यक होते. त्याअनुषंगाने विभागाने त्यांचे पत्र क्र. सूकावि/ता.१/३७५८/२००४ दिनांक १६/७/२००४ अन्वये या शाखेचे कि.मी. १ ते १८ ची अंदाजपत्रके सादर करून कामाची निकड लक्षात घेता निविदा क्रमांक ब-१/२४ (डहाणू शाखा कि.मी. १ ते ३) या निविदेस वितरीका क्रमांक २ मधील कि.मी. १० ते १८ (किंमत रू.१६३ लक्ष) जोडण्यात यावीत. तसेच निविदा ब-१/२३ (डहाणू शाखा कि.मी. ४ ते ७) या निविदेस वितरीका क्रमांक २ मधील कि.मी. १ ते ९ (किंमत रु.२०५ लक्ष) जोडण्यात यावीत असा प्रस्ताव सादर केला. त्या अनुषंगाने मंडळ कार्यालयाने त्यांचे पत्र क्र. ठापामं/प्रशा.२/सूउतिकि./वि.२/अस्तरीकरण/५७९८, दिनांक २४/८/२००४ अन्वये प्रदेश कार्यालयास प्रस्ताव सादर केला. प्रदेश कार्यालयाने या प्रस्तावास त्यांचे पत्र क्र. २१८०/सूर्या/(३/२००३)/तां.६/२८३५, दिनांक ३०/८/२००४ अन्वये मान्यता दिली. त्याअनुषंगाने कि.मी. १० ते १८ ज्या कामाचा सविस्तर प्रस्ताव (अनुसूची -ब) विभागाने त्यांचे पत्र क्र. सूकावि/लेशा/आ.२/५४९६, दिनांक ६/१०/२००४ अन्वये सादर केला. या प्रस्तावास मंडळ कार्यालयाने पत्र क्र. ठापामं/आ.९/७३९/२००४ दिनांक ६/११/२००४ रोजी मान्यता दिली. त्याअनुषंगाने विभागाने कंत्राटदारास विभागाचे गोपनीय पत्र क्र. सूकावि.१/लेशा/२५० दिनांक २५/११/२००४ अन्वये कळविले. तसेच त्या अंतर्गत कि.मी. १ ते ९ या कामाचा सविस्तर प्रस्ताव सूकावि.१/लेशा/आ.२/५४९७/२००४, दिनांक ६/१०/२००४ अन्वये सादर केला या प्रस्तावास मंडळाने त्यांचे पत्र क्र. ठापामं/आ.९/७४०, दिनांक ६/११/२००४ अन्वये मान्यता दिली. त्या अनुषंगाने विभागाने कंत्राटदारास विभागाचे गोपनीय पत्र क्र. सूकावि.१/लेशा/आ.२/२४९/२००४, दिनांक २५/११/२००४ अन्वये कळविले. सदर कामे त्वरीत सुरु करण्यात येऊन चांगली प्रगती राखून डिसेंबर, २००६ मध्ये पूर्ण करण्यात आले. फक्त अंतिम देयक देणे शिल्लक आहे.

सदर कामे जोडून देण्यामागची कारणे खालीलप्रमाणे आहेत -

१) अस्तरीकरणाचे काम सु.प्र.मा. प्राप्त प्रस्तावात समाविष्ट होते.

२) सदर वितरीका अस्तरीकरण विरहीत होती व त्यावर सिंचन होत होते. परंतु वितरीका अस्तरीकरण विरहीत असल्याने शिर्ष भागात पाझर होऊन आजूबाजूची शेती नापीक होत हाती व पुच्छ भागात पाणी मिळत नव्हते. शिर्ष भागाच्या तशा स्वरुपाच्या तक्रारी उर्से ग्रामपंचायत, सारणी ग्रामपंचायत यांनी केल्या होत्या. तसेच ठराव पण करून उपविभागीय अभियंता, सूर्या प्रकल्प पालघर शाखा उपविभाग, वाणगांव यांना निवेदन दिल्याचे दिसून येते व जमीन नापीक होत असल्याने वर्ष २००४ मध्ये झिरपा अगोदर कमी करावा व नंतरच पाणी सोडावे अशा अर्थाची निवेदने शेतकरी यांनी अर्जाद्वारे केली होती. परंतू त्याच वेळेस पुच्छ भागास पाणी देणे आवश्यक होते. याचा विचार करता अस्तरीकरणाचे काम तातडीने करणे आवश्यक होते.

३) कोकण विभागामध्ये सिंचन हंगाम १५ डिसेंबर ते १५ मे या कालावधीत असतो. या कालावधीमध्ये विनाखंड पाणी सोडले जाते. याचा विचार करता निविदा प्रक्रियेस लागणारा विलंब टाळून तातडीने काम करणे आवश्यक होते. त्यामुळेच ही कामे जोडून टप्प्या टप्प्याने (प्राथम्याने ज्या ठिकाणी समस्या आहेत त्या ठिकाणची कामे अगोदर हाती घेवून) पूर्ण करण्यात आली.

४) अशा पध्दतीची विनिर्देशकाची कामे (Specification) डहाणू शाखा कालवा व्यतिरिक्त या परिसरात प्रगतीपथावर नव्हती. म्हणून कंत्राटदाराची सक्षमता याचा विचार करून कामे जोडण्यात आली.

५) ह्या कामावरती भाववाढ, कलम ३८ अंतर्गत वाढीव कामावर व परिमाणावर देण्यात येणारे सुधारीत दर लागू नव्हते. तशी अट प्रस्तावातच कंत्राटदाराला घालण्यात आली होती. यापोटी होणाऱ्या खर्चामध्ये बचत झाली आहे (कि.मी.१ ते ९ रू.२०.१४ लक्ष) व (कि.मी.१० ते १८ रू. १८.१४ लक्ष)

६) डहाणू शाखा व वितरीका क्रमांक २ या एकाच वितरण प्रणालीचा भाग असून निविदा कलम १४ खाली ही कार्यवाही करण्यात आली आहे.

**<u>महालेखापालांनी अनौपचारिक संदर्भान्वये उपस्थित केलेला मुद्दा :</u>**

**<u>कामाचे अनियमित वाटप-</u>**

**१२.४** शासनाचे सदरहू उत्तर स्वीकारता येत नाही, कारण कंत्राटदारास दिलेल्या मुळ कामाशी या कामाचा संबंध नव्हता. सूर्या उजवा कालवा वितरिका क्र. २ च्या वज्रचुर्ण संधानक, अस्तरीकरणाचे काम जे अतिरिक्त बाब म्हणून देण्यात आले होते ते डहाणू शाखा कालव्याच्या मुळ वज्रचुर्ण संधानकाच्या कामाशी संबंधित नव्हती आणि कामाची जागा वेगवेगळया ठिकाणी होती. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेच्या तरतुदीनुसार नेहमीच्या निविदा कार्यपध्दतीचा अवलंब केल्यानंतर सदरहू काम द्यावयास हवे होते.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद २०० मध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार जर निकडीचे काम असल्यास वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्याऐवजी वेगळया सक्षम कंत्राटदाराकडून स्पर्धात्मक निविदा मागविण्यात येतात.

लोकलेखा समितीस वरील मुद्दयांचे तपशिलवार स्पष्टीकरणासह उत्तर द्यावयाचे आहे.पुढील पूर्णतः आणि बिनचूक उत्तर लोकलेखा समितीस दाखवावयाचे आहे.

**शासनाचे अभिप्राय :**

**१२.५** सूर्या प्रकल्पाचे कालवे व वितरण व्यवस्थेचे अस्तरीकरण केल्यानंतर सूर्या प्रकल्पाची सिंचन क्षमता १२१८८ हेक्टर क्षेत्रावरून १४६९६ हेक्टर क्षेत्राइतपत वाढणार आहे. सदरची वाढ ही २०.५८ टक्के इतकी आहे.

फेब्रुवारी २००४ मध्ये डहाणू शाखा कालव्याच्या अस्तरीकरणाचे कि.मी. ० ते ३ व कि.मी. ४ ते ७ या दोन भागात काम हाती घेण्यात आले होते. संबंधित ठेकेदाराने सदरचे काम ऑगस्ट २००४ पर्यन्त पूर्ण करणे अपेक्षित होते. मूळतः कोकण प्रदेशात सिंचनासह स्थापत्य बांधकामासाठी उपलब्ध होणारा कालावधी डिसेंबर ते मे अशा प्रकारे ५ महिन्याचा खूपच कमी/अत्यल्प असतो. डहाणू शाखा कालव्याचे नमूद निविदेतील अस्तरीकरणाचे काम हे सिंचनाच्या कालावधीमध्येच कालव्याच्या दोन आवर्तनातील बंद कालावधीत सुमारे ६ दिवसाच्या काळात करण्याचे नियोजन होते. ६ दिवसाचे आवर्तन बंद कालावधीत कालवा कोरडा होऊन निविदेतील नमूद अस्तरीकरणाचे काम पूर्ण करून कालव्यातून या कामासाठीची

यंत्रसामुग्री आणि बांधकामाचे साहित्य कालव्याच्या बाहेर काढणे आवश्यक होते. जेणेकरून ६ व्या दिवशी आवर्तनासाठी पाणी सोडणे शक्य झाले असते. परंतू कालव्यात ६ दिवस पाणी राहिल्यामुळे ठेकेदाराची यंत्र सामुग्री बांधकाम साहित्य व मजूर हे विनाकामाचे ६ दिवस राहिले असते. ही बाब निविदेत अपेक्षित नव्हती.

सूर्या उजवा कालव्याच्या सुरुवातीच्या भागातील वितरीका क्र.२ वरील आवर्तनाचा बंद कालावधी व डहाणू शाखेवरील कामाचा विनाकाम (idle) कालावधी हा जुळत होता म्हणून डहाणू शाखेवरील विनाकाम (idle) कालावधीत यंत्रसामुग्री, साहित्य व मजूर हे सूर्या उजवा कालव्याच्या वितरीका क्र.२ वरील कामासाठी वापरणे शक्य होते. त्यामुळे विनाकाम (idle) साठीच्या देय रक्कमेचा प्रश्न सुटत होता. त्याच दरम्यान वितरीका क्र. २ वरील लाभधारकांनी अस्तरीकरण करण्यासाठी उग्र स्वरुपाची निदर्शने केली होती. पाझरामुळे त्यांचे पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान होत होते. एक वर्ष सिंचन झाले नाही तरी हरकत नाही. परंतू अस्तरीकरणाचे काम पूर्ण करण्यात यावे अशी त्यांनी संमती दिली होती. आवर्तनाचा बंद कालावधी व डहाणू शाखेवरील कामाचा विनाकाम (idle) कालावधी जुळत असल्याने तसेच ठेकेदाराने जादा दराशिवाय तसेच भाववाढीशिवाय काम करण्याचे मान्य केल्याने वितरीका क्र. २ चे अस्तरीकरणाचे काम डहाणू शाखेवरील काम करीत असलेल्या त्याच ठेकेदारास देण्यात आले.

त्याच ठेकेदारास काम देण्यात आल्याने विनाकाम (idle) कालावधीसाठी यंत्रसामुग्री, साहित्य व मजूरापोटी द्यावयाची रक्कम देण्याची गरज उरली नाही. डहाणू शाखेवरील कामापेक्षा कमी दराने वितरीका क्र. २ वरील अस्तरीकरणाचे काम ठेकेदाराने केले आहे. तसेच भाववाढीतही बचत झालेली आहे. एकूणच सर्व प्रकारे रु. ५७.८४ लक्ष रक्कमेची बचत झालेली आहे व वितरीका क्र.२ वरील लाभधारकांना सिंचनाचा लाभ मिळालेला आहे. पाणी नाशातही बचत झालेली आहे व वहन क्षमतेची कार्यक्षमता वाढलेली आहे. वितरिका क्र.२ च्या अस्तरीकरणामुळे झालेले सर्व फायदे पहाता सदरचा परिच्छेद कृपया वगळण्यात यावा.

**साक्ष :**

१२.६ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक २२ फेब्रुवारी, २०११ रोजी सचिव, जलसंपदा विभाग व अन्य विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष घेतली. त्यावेळी सूर्या पाटबंधारे प्रकल्पांतर्गत डहाणू शाखा कॅनालच्या सिमेंट काँक्रीट लाईनिंगचे रुपये १.६५ कोटीचे काम ठरलेल्या मुदतीत केले नव्हते, तसेच सूर्या उजवा बँक कॅनॉलच्या १८ कि.मी. वितरीका क्र.२ चे कामांशी संबंधित नसलेले रुपये ३.६९ कोटीचे काम सदर कंत्राटदारास नियमातील तरतुदीचा भंग करुन निविदा न मागविता देण्यात आले याबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सूर्या प्रकल्पाची प्रकल्पीय सिंचन क्षमता १२१८८ हेक्टर होती. विना अस्तरीकरणाच्या कालव्यातून होणारा पाणी नाश कमी करुन या प्रकल्पाची सिंचन क्षमता १४६९६ हेक्टर इतकी वाढविण्यात आली. याकरिता मुख्य कालवा, शाखा कालवा व वितरिका यांना अस्तरीकरण करण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. याच प्रस्तावाचा भाग म्हणून डहाणू शाखा कालव्याचे अस्तरीकरणाचे काम हाती घेण्यात आले.

१२.७ मूळ अंदाजपत्रकात डहाणू शाखा कालव्याचे अस्तरीकरणाचे काम होते काय? असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मुख्य कालवा, शाखा कालवा व वितरिका यांच्या अस्तरीकरणाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने डहाणू शाखा कालव्याच्या अस्तरीकरणाचे काम हाती घेण्यात आले होते. सूर्या उजवा तीर कालव्यावर डहाणू शाखा कालव्याची वितरिका क्रमांक २ असून या वितरिकेचे अस्तरीकरणविरहित काम पूर्ण झालेले आहे व त्यावर सिंचन चालू होते. सदर वितरिका अस्तरीकरणविरहित असल्याने व कोकणातील विशिष्ट भौगोलिक रचना विचारात घेता शीर्ष भागात पाणी झिरपा होऊन आजुबाजूची शेती नापीक होत होती. त्याचवेळी पुच्छ भागात पाणी मिळत नव्हते. म्हणून या वितरिकेस प्रकल्पातील तरतुदीप्रमाणे अस्तरीकरण करणे आवश्यक आहे. सदर कामास मुख्य अभियंता स्तरावर मान्यता देण्यात आली होती. डिसेंबर, २००६ मध्ये काम पूर्ण करण्यात आले होते.

१२.८ सदर कामाच्या संदर्भात वित्तीय सल्लागार यांनी कोणता अभिप्राय दिलेला आहे ? या कामाला कोणाचीही मान्यता न घेता स्वत:हून काम केलेले आहे. सदर कामाला

माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मान्यता दिली होती काय ? असे समितीने विचारले असता याबाबत सदर कामास मुख्य अभियंता स्तरावर मान्यता दिलेली होती असे विभागीय सचिवांनी सांगितले.

१२.९ मुख्य अभियंता, उप अभियंता यांना निविदा न काढता कामे देण्याचा अधिकार आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, पाटबंधारे विभागाच्या मॅन्युअलप्रमाणे जाहीर निविदा बोलावून कामे हाती घेता येतात. डहाणू शाखा व वितरिका क्रमांक २ या एकाच वितरण प्रणालीचा भाग असून निविदा कलम १४ खाली ही कार्यवाही करण्यात आली आहे.

१२.१० मूळ कामामध्ये डहाणू शाखा कालव्याच्या अस्तरीकरणाच्या कामाचा समावेश नाही ही वस्तुस्थिती असताना सदरहू काम रिव्हाईज करुन त्याबाबत शासनाची परवानगी घेतली होती काय ? तसेच यासंदर्भात मुख्य अभियंता यांनी सचिवांसमवेत चर्चा केली होती काय ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, विशिष्ट कामाबद्दल शासनाकडे प्रस्ताव आलेला नव्हता. परंतु सदर प्रस्ताव मंजूर केल्यानंतर निविदेमधील क्रमांक १४ मधील शर्तीचा वापर करुन आवश्यक असेल असे एखादे काम फेरबदल करण्याचा अधिकार मुख्य अभियंता यांना आहे व त्यांनी तो करावा असे असून त्याचा आधार घेऊन पुढील कार्यवाही केलेली आहे.

१२.११ डहाणू शाखा कालव्याचे अस्तरीकरणाचे ४ ते ७ कि.मी. इतक्या लांबीचे काम झाले आहे. परंतु, सदर कामाचे प्राधिकार मुख्य अभियंता स्तरावर पण सचिव स्तरावर नव्हते. मंत्री स्तरावर होते की नाही याबद्दल समितीने अनभिज्ञता व्यक्त केली. तसेच या प्रस्तावाच्या संदर्भात आंतर वित्त सल्लागाराचा सल्ला घेतला जात नाही त्यांच्याकडे प्रस्ताव जातच नाहीत त्यामुळे त्यांच्याकडील आवक व जावक नोंदवही तपासण्याची आवश्यकता आहे, असे समितीने नमूद केले. एखादे लहान/मोठे काम राहिले असेल आणि त्यासंबंधीची मागणी असेल तर ते करण्यास हरकत नाही पण संपूर्ण प्रकल्पामध्येच जर हे काम नव्हते तर हे काम कसे केले? याबद्दल समितीने आश्चर्य व्यक्त केले तसेच विभागीय सचिवांनी दिलेल्या उत्तराने समितीचे जर समाधान होत नसेल तर यासंदर्भातील अहवाल समितीला शासनाकडे सादर करावा लागेल तसेच या प्रकरणाची लाचलुचपत विरोधी शाळेमार्फत चौकशी करण्यात यावी अशी ही

शिफारस समितीला शासनाला करावी लागेल असे मत समितीने व्यक्त केले असता, डहाणू वितरिका क्रमांक २ हा सूर्याप्रकल्पाचा भाग आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

१२.१२ "The reply is not tenable, as the work was not related to the original work awarded to the contractor. The work of cement concrete lining of Distributory No. २ of Surya right bank canal, awarded as an extra item, was not part of the original work of cement concrete lining of the Dahanu branch canal and was located at a different site." असा महालेखापालांचा आक्षेप होता. अंदाजपत्रक मंजुर करताना आमदारांनी पाच-दहा लाख रुपये मागितले तर दिले जात नाहीत पण या ठिकाणी चार ते पाच कोटी रुपयाचे काम करण्यात आले आहे. हे काम वित्तीय सल्लागारांना माहीत होते काय, याबाबतीत वित्त सचिवांचे मत विचारले असता वित्त सचिवांनी सांगितले की, मूळ काम ७ कि.मी. चे होते. जादा बाबीचे म्हणून १८ कि.मी. चे काम दिले. साधारणत: १० ते २० टक्क्या पर्यंत ज्यादा बाबींचे काम देण्यात येते. त्यामुळे या बाबींचे समर्थन करणे कठीण आहे.

१२.१३ यासंदर्भात विभागीय समितीला अशी माहिती दिली की, सूर्या प्रकल्पाचे कालवे व वितरण व्यवस्थेचे अस्तरीकरण केल्यानंतर सूर्या प्रकल्पाची सिंचन क्षमता १२१८८ हेक्टर क्षेत्रावरुन १४६९६ हेक्टर इतकी वाढविण्यात आली. जेथे अस्तरीकरण केलेले आहे त्या ठिकाणच्या ग्रामपंचायतीतील ८ लोकांनी त्यांना पाणी नको असे सांगितले होते त्यामुळे तेथील पाणी बंद करण्यात आले. ती जमीन पाणथळी होती म्हणून लोकांनी अस्तरीकरणाची मागणी केली होती आणि लोकांची मागणी तीव्र स्वरुपाची होती. या संदर्भात नुकसान भरपाई देण्यात यावी असे म्हटले होते पण नुकसान भरपाई न घेता त्या ऐवजी अस्तरीकरणाचे काम केले त्यामुळे ५७.८४ लाख रुपयाची बचत झाली. या ठेकेदारास कुठेही भाववाढ दिलेली नाही. निविदेचे अधिक्य दिले नाही. मूळ निविदेमध्ये चांगले दर आले होते त्या दराप्रमाणे काम केले त्यामुळे लोकांचा प्रश्न मिटला.

१२.१४ लोकहिता करिता काही काम केले असेल तर ते समिति मान्य करील पण हे १७ ते १८ कि.मी. चे काम होते. अतिरिक्त काम मूळ कामाच्या ५ ते १० टक्के असेल तर त्याबाबतीत समितीचे काही म्हणणे नाही. परंतु मूळ काम १६५ लाख रुपयाचे असताना ३.६९ कोटी रुपये अदा करण्यात आलेले आहे म्हणजे मूळ कामाच्या अडीच पट रक्कम अदा झालेली

आहे, असे असताना वित्त विभागाने हे काम कसे मंजूर केले तसेच यासंदर्भात वित्त विभागाचा अभिप्राय घेतला होता काय? अशी समितीने विचारणा केली असता सूर्या प्रकल्पाची किंमत जास्त होती असे विभागीय सचिवांनी सांगितले.

१२.१५ जलसंपदा विभागामध्ये बऱ्याच वर्षापासून अशा प्रकारची कामे चालू आहेत आणि आता तर ती अधिक जलद गतीने चालू आहेत या खात्यातील अधिकारी शासनाचे अधिकारी म्हणून काम करीत नाहीत तर ते एखाद्या कंपनीच्या व्यवस्थापकाप्रमाणे काम करतात. हे सर्व अधिकारी हुशार आणि एकमेकांना मिळालेले असतात. त्यांच्यांवर वचक ठेवण्यासंदर्भात शासनास सूचना करावी असे मत समितीने व्यक्त केले असता हे काम देतांना ५७.८४ लाख रुपयाची बचत झालेली आहे, शेतकऱ्यांचा फायदा झालेला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले असता महालेखाकारानी असे सांगितले की, The work which was due for completion by August 2004 was allowed extension upto December 2005. However, the work had not been completed till May, 2006.

१२.१६ या सर्व प्रकरणामध्ये वित्तीय सल्लागारांची भूमिका काय आहे? जलसंपदा विभाग त्यांच्याकडे प्रस्ताव पाठवते काय, त्यांचे अभिप्राय काय आहेत या संबंधीचा आढावा विभागाने घेतला आहे काय, याबाबत विभागाकडून समाधानकारक उत्तर आले नाही. परंतु प्रत्येक विभागीय स्तरावर लेखापालाचे पद असते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

१२.१७ वित्त विभाग निधी वितरीत करते. सदर मुद्दा राज्याच्या वित्तीय बाबीशी संबंधीत आहे. मग वित्तीय सल्लागार काय काम करतात हे पाहण्याचे काम वित्त सचिवांचे नाही काय? वेगवेगळ्या खात्यात निष्क्रिय अधिकारी बसलेले आहेत त्यांच्या बाबतीत कोणी चौकशी करीत नाही काय? अशी विचारणा समितीने वित्त सचिवांना केली असता, यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाला अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याबाबत सांगण्यात येणार असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

१२.१८ सामान्य प्रशासन विभागामार्फत आंतर वित्त सल्लागारांची नियुक्ती होत असेल तर त्यांची काय जबाबदारी आहे, विभागाने त्यांच्यासमवेत कशाप्रकारे सल्लामसलत केली पाहिजे यासंबंधीचे नियम असतील तर त्या नियमासंबंधीची माहिती तसेच या संदर्भात सामान्य

प्रशासन विभागाचे परिपत्रक मागविण्यात यावे असे निदेश समितीने विभागीय सचिवांना दिले. परंतु विभागाकडून अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झाली नाही.

१२.१९ डहाणू शाखा अस्तरीकरणाच्या कामाबाबत वित्तीय सल्लागाराच्या कामकाजाविषयी वित्त सचिवांनी सांगितले की, काही विभागाने आपल्या अधिकाऱ्यांना त्यांच्या स्तरावर कामांना मंजुरी देण्याचे अधिकार दिलेले आहेत. सदर कामाला कार्यकारी अभियंता स्तरावर मंजुरी देण्यात आलेली आहे म्हणून येथे उपस्थित असलेल्या आंतर वित्त सल्लागारांचा या कामाशी संबंध येत नाही.

१२.२० आंतर वित्तीय सल्लागाराच्या कामकाजाविषयी व ही पदे कशासाठी निर्माण केली आहेत. या संदर्भातील अधिक माहिती जाणून घेण्याकरीता विधीमंडळाचे वित्तीय सल्लागार यांचे मत विचारले असता वित्तीय सल्लागारांनी सांगितले की, वित्तीय सल्लागार ही पदे जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागात कार्यरत आहेत. सर्व विभागांच्या अर्थसंकल्पास वित्त विभागाने मान्यता द्यावी ही कायद्यातील तरतूद आहे. उपरोक्त तीन विभागात ही पदे कार्यरत आहेत. या तीन विभागात जास्त वित्तीय कामे असल्यामुळे तेथे ही पदे नियुक्त करण्यात आली आहेत. या तीन विभागात जास्त आर्थिक व्यवहार होत असतात. त्या सर्व प्रस्तावांची छाननी वित्तीय सल्लागार यांनी करावी व काही निर्णय हे त्या-त्या विभागाने घ्यावेत. या मागील उद्देश असा होता की, कमीत कमी नस्त्या वित्त विभागाकडे जातील. ही सर्व सामान्य पद्धत सर्वांना माहिती आहे. वित्त विभागाकडून काही निविदांना मान्यता घेण्यात येते. त्या त्या विभागात कामे व्यवस्थित होतात किंवा नाहीत हे वित्तीय सल्लागार पाहतो. ठराविक रकमेच्या वरील कामांना वित्त विभागाची परवानगी घ्यावी लागते. या विभागातील काही निर्णय सचिव पातळीवर घेण्यात येतात. वित्त विभागातील सह सचिव किंवा उप सचिव दर्जाचे अधिकारी यांना वित्तीय सल्लागार म्हणून नियुक्त करण्यात येते. काही वेळा वित्तीय सल्लागार यांच्याकडे नस्ती जात नाही ही मूळ अडचण आहे. आंतर वित्तीय सल्लागारांच्या बाबतीत शासन पातळीवर फार मोठी चर्चा झालेली आहे. काही बाबतीत तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यामुळे वित्तीय सल्लागाराच्या अधिकारांबाबत अंतिम निर्णय झालेला नाही.

**अभिप्राय व शिफारशी :**

१२.२१ सूर्या उजवा बँक कॅनलच्या १८ कि.मी. वितरिका क्र.२ चे सिमेंट काँक्रीट लाईनिंगचे कंत्राटदारास दिलेल्या कामाशी संबंधीत नसलेले रू.३.६९ कोटीचे काम सदर कंत्राटदारास नियमांतील तरतूदींचा स्पष्टपणे भंग करून देण्यात आले.

१२.२२ सूर्या बँक कॅनलच्या वितरिका क्र.२ च्या सिमेंट काँक्रीट लाइनिंगचे काम जे अतिरिक्त बाब म्हणून देण्यात आले होते ते डहाणू शाखा कॅनलच्या मूळ सिमेंट काँक्रीट लाईनिंगच्या कामाशी संबंधित नव्हते आणि कामाची जागा वेगळी होती. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेच्या तरतूदीनुसार नेहमीच्या निविदा कार्यपद्धतीचा अवलंब केल्यानंतर सदरहू काम द्यावयास हवे होते.

१२.२३ मुख्य अभियंता, उप अभियंता यांना निविदा न काढता कामे देण्याचा अधिकार नसून त्यांना पाटबंधारे विभागाच्या मॅन्युअलप्रमाणे जाहीर निवादा बोलावून कामे हाती घेता येतात. डहाणू शाखा व वितरिका क्रमांक २ या एकाच वितरण प्रणालीचा भाग असून निविदा कलम १४ खाली ही कार्यवाही करण्यात आली आहे. म्हणजेच मूळ कामामध्ये डहाणू शाखा कालव्याचे अस्तरीकरण या कामाचा अंतर्भाव नव्हता.

१२.२३ या प्रस्तावाच्या संदर्भात आंतर वित्त सल्लागाराचा सल्ला घेतला नसून त्यांच्याकडे प्रस्ताव पाठविले जात नाहीत. मूळ काम ७ कि.मी. चे होते जादा बाबीचे म्हणून १८ कि.मी.चे काम दिले. साधारणत: १० ते २० टक्क्यापर्यंत ज्यादा बाबींचे काम देण्यात येते. त्यामुळे या बाबींचे समर्थन करणे कठीण असल्याचे महालेखाकारांचे म्हणणे आहे. संपुर्ण प्रक्रल्पामध्येच जर हे काम नव्हते तर हे काम कसे केले? याबद्दल समितीने आश्चर्य व्यक्त केले. **विभागाकडून समाधानकारक उत्तर प्राप्त झाले नसल्याने याप्रकरणाची लाचलुचपत विरोधी शाखेमार्फत चौकशी करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी शिफारस समिती करीत आहे.**

**१२.२४ जलसंपदा विभागामध्ये बऱ्याच वर्षापासून अशा प्रकारची कामे चालू आहेत आणि आता तर ती अधिक जलद गतीने चालू आहेत. या खात्यातील अधिकारी शासनाचे अधिकारी म्हणून काम करीत नसून ते एखाद्या कंपनीच्या व्यवस्थापकाप्रमाणे काम करतात. या सर्व**

**अधिकाऱ्यांचे एकमेकांशी संगनमत झालेले असते त्यामुळे त्यांच्यांवर नियंत्रण ठेवण्यासंदर्भात शासनाने मार्गदर्शक सूचना काढावी, अशी समितीची शिफारस आहे.**

१२.२५ वेगवेगळ्या खात्यात निष्क्रीय अधिकारी बसलेले आहेत त्यांच्या बाबतीत कोणी चौकशी करीत नाही. सामान्य प्रशासन विभागाला अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याबाबत वित्त विभागामार्फत सांगण्यात येणार होते. परंतु अद्याप तशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. तसेच **सामान्य प्रशासन विभागामार्फत आंतर वित्त सल्लागारांची नियुक्ती होत असेल तर त्यांच्या सेवाशर्ती, जबाबदारी काय आहे. त्यांनी विभागांना कशी सल्लामसलत करणे आवश्यक आहे. त्या संबंधी असलेल्या नियमांची व परिपत्रकाची माहिती सामान्य प्रशासन विभागाने समितीस द्यावी, अशी शिफारस समिती करीत आहे.**

१२.२६ वित्तीय सल्लागार ही पदे जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागात कार्यरत आहेत. सर्व विभागांच्या अर्थसंकल्पास वित्त विभागाने मान्यता द्यावी ही कायद्यातील तरतूद आहे. उपरोक्त तीन विभागात ही पदे कार्यरत आहेत. या तीन विभागात जास्त वित्तीय कामे असल्यामुळे तेथे ही पदे नियुक्त करण्यात आली आहेत. या तीन विभागात जास्त आर्थिक व्यवहार होत असतात. त्या सर्व प्रस्तावांची छाननी वित्तीय सल्लागार यांनी करावी व काही निर्णय हे त्या-त्या विभागाने घ्यावेत. या मागील उद्देश असा होता की, कमीत कमी नस्त्या या वित्त विभागाकडे जातील. वित्त विभागाकडून काही निविदांना मान्यता घेण्यात येते. त्या त्या विभागात कामे व्यवस्थित होतात किंवा नाहीत हे वित्तीय सल्लागार पाहतो. ठराविक रकमेच्या वरील कामांना वित्त विभागाची परवानगी घ्यावी लागते. त्या विभागातील काही निर्णय सचिव पातळीवर घेण्यात येतात. **वित्त विभागातील सह सचिव किंवा उप सचिव दर्जाचे अधिकारी यांना वित्तीय सल्लागार म्हणून नियुक्त करण्यात येते. काही वेळा वित्तीय सल्लागार यांच्याकडे नस्ती जात नाही कारण अद्याप वित्तीय सल्लागाराच्या अधिकारांबाबत अंतिम निर्णय झालेला नाही. त्यामुळे वित्तीय सल्लागारास विभागाच्या सर्व वित्तीय बाबीवर पूर्णता नियंत्रण ठेवता येत नाही. त्यांना विभागाच्या सर्व वित्तीय बाबीवर नियंत्रण ठेवता यावे याकरीता राज्य शासनाच्या अखत्यारितील वित्तीय सल्लागारांच्या अधिकारांबाबत अंतिम निर्णय शासनाने घ्यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

**१३. कंत्राटदाराला अतिरिक्त प्रदान-**

१३.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालामधील परिच्छेद क्र.४.२.८ "कंत्राटदाराला अतिरिक्त प्रदान" या संदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले.

१३.२ संकल्प चित्रातील बदलानुसार करारमुल्य कमी न केल्यामुळे रु.२.६८ कोटीचे अतिरिक्त प्रदान.

वरणगाव उपसा सिंचन योजनेचे संकल्प चित्र तयार करणे, नियोजन आणि rising main सह intake well, approach channel, jack well, पंप गृह यांचे बांधकाम व पंपाचे उत्पादन व मांडणीसह पूर्ण योजना कार्यान्वित करण्याचे काम एका कंत्राटदारास रु.९३.३३ कोटीच्या ठोक रकमी करारनाम्यावर जुलै २००६ पर्यंत पूर्ण करण्याकरिता दिले होते. विभागाच्या संकल्पचित्रातील १.९ मीटर व्यासाच्या ११,२८० मीटर लांबीचा (५,५५० मीटरचा पहिला टप्पा व ५,७३० मीटरचा दुसरा टप्पा) mild steel नळांच्या rising main च्या दोन ओळी बांधणे हा या करारनाम्याचा पाया होता. करारनाम्यात अशी तरतूद होती की, जर कंत्राटदाराचा प्रस्ताव त्याच्या स्वतःच्या संकल्प चित्रांप्रमाणे असेल तर सर्व संकल्पचित्रे व रेखांकन हे अधिक्षक अभियंता, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना (CDO), नासिक यांचेकडून तपासून घेतले जातील. शिवाय, करारनाम्यात अशी तरतूद होती की, कामातील वाढ किंवा घट याचे विनिमयन करारनाम्यात नोंदविलेल्या दराप्रमाणे होईल.

कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, जळगांव (EE) यांच्या अभिलेख्यांच्या तपासणीत (जून २००२ व डिसेंबर २००५) असे उघडकीस आले की, मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास मंडळ, जळगांव यांनी निविदा स्विकृती (जुलै १९९९) नंतर CDO यांनी तपासलेले (नोव्हेंबर १९९९) कंत्राटदारांच्या rising main च्या संकल्प चित्रास मंजूरी दिली होती (डिसेंबर २००५). यात १.८४ मीटर व्यासाच्या mild steel च्या ८,६४० मीटर लांबीच्या नळांच्या दोन ओळींची सरळ संरेखेत मांडणी करण्याची योजना होती. Rising main ची कमी झालेली लांबी (२,६४० मिटरने) आणि कमी व्यासांच्या नळ्यांच्या वापरामुळे करार मूल्यात रु.१३.६७ कोटीची घट झाली (न पुरवठा केल्याच्या नळ्यांची किंमत), ज्यामुळे कंत्राटदारास दिल्या जाणाऱ्या प्रदानांमध्ये प्रमाणानुसार घट करणे आवश्यक होते. तथापि, तसे केले नाही

ज्यामुळे करारनाम्यांतील अटीचे उल्लंघन झाले आणि मे २००५ पर्यंत निष्पादित ३.४० मीटरच्या rising main च्या कामात कंत्राटदारास रु.२.६८ कोटीचे अतिरिक्त प्रदान झाले.

EE यांनी नमूद (डिसेंबर २००५) केले की, कंत्राटदाराचे संकल्पचित्र स्वीकारल्यामुळे बरेच बदल झाले व त्यामुळे निरनिराळे फेरबदल करावे लागले परिणामी विभागाच्या अंदाजपत्रकाच्या तुलनेत कामाच्या काही घटकांवर जास्त खर्च करावा लागेल.

हे उत्तर मान्य नव्हते कारण कंत्राटदाराने निविदेत उद्धृत केलेल्या सर्व घटकांचा विचार करुनच स्वत:चे दर सादर केले होते. rising main च्या नळाची लांबी व व्यास कमी झाल्यामुळे प्रत्यक्ष केलेल्या कामानुसार प्रदान सीमित करणे बंधनकारक होते.

ही बाब शासनाच्या प्रधान सचिवांना कळविली होती (मे २००६). उत्तर आलेले नाही (ऑक्टोबर २००६).

**ज्ञापन :**

१३.३ या संदर्भात विभागाने पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, ही निविदेविषयी व कामाची वस्तुस्थिती असल्याने यावर कोणतेही अभिप्राय नाहीत.

संबंधीत निविदा ही टर्न की स्वरुपाची क-निविदा असल्याने ह्या करारांतर्गत ठेकेदारास निविदेअंतर्गत असणाऱ्या विविध घटकांच्या विवरणासह काम करणे बंधनकारक असतेच त्याचप्रमाणे योजनेची तांत्रिक परिपूर्णता करणे आवश्यक ठरते. या निविदेअंतर्गत ठेकेदारास प्रस्तावित साठवण तलावात १०.६० घ.मी./सें.दराने पाणी टाकणे आवश्यक असून तो ठेकेदार ही बाब कोणत्याही मार्गाने पूर्ण करु शकतो. ह्याकरीता संबंधीत ठेकदार हा त्यांच्या विविध योजनांवरील अनुभव सध्या इतरत्र सुरु असलेल्या अशाच प्रकारच्या योजनांवर येणाऱ्या अडचणी, संकल्पनाचे नविन तंत्र इ.चा उपयोग करु शकतो. ह्या सर्व बाबी ब-१ निविदेअंतर्गत करता येणे शक्य नसते. ब-१ निविदे अंतर्गत ठेकेदार हा त्या योजनेच्या भौतिक व तांत्रिक सांध्यास बांधील नसतो.

पाटबंधारे विभागाने या योजनेचे सुधारित प्रस्ताव व ह्या योजनेचे अंदाजपत्रक योग्य तऱ्हेने व विविध तांत्रिक उपाययोजना करुन सादर व्हावे हा हेतू ठेवून सादर केले होते.

सुधारित प्रस्ताव करीत असतांना खालील प्रमुख तांत्रिक बाबींचा विचार व समावेश करण्यात आलेला आहे.

१) रायझिंग मेन मधील प्रवाहाचा वेग हा २ मी. प्रतिसेकंद असावा.

२) साठवण तलावात रायझिंग मेन मधून येणारा संवर्ग हा १०.६० घन मीटर प्रती सेकंद या दराने असावा.

ठेकेदाराने सादर केलेल्या व पाटबंधारे विभागाने स्विकारलेल्या सुधारीत प्रस्तावात वरील दोन्ही तांत्रिक बाबींचा समावेश असून यामध्ये कोणताही बदल केलेला नाही.

विभागाने सादर केलेल्या योजनेच्या संकल्पनात तसेच विविध घटकांची परिमाणे ही संबंधीत ठेकेदाराने सादर केलेल्या सुधारीत संकल्पनानुसार कमी अधिक प्रमाणात बदललेली आहेत. कित्येक घटकांची परिमाणे ही कमी झालेली असली तरी अन्य घटकांची परिमाणे ही जास्त प्रमाणात वाढल्याचे दिसून येते. कमी जास्त झालेल्या घटकांच्या परिमाणांचा अभ्यास केला असता, ठेकेदारास योजनेचे संपूर्ण काम पूर्ण झाल्यानंतर द्यावयाच्या रकमेत विशेष फरक पडत नसल्याचे दिसून येते.

मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांनी मंजूर केलेल्या "पेमेंट शेड्यूल" मध्ये पाईप लाईनची कमी होणारी लांबी तसेच पाईपाचा कमी होणारा व्यास ह्याचा विचार केलेला आहे. रायझिंग मेन च्या टप्पा-१ व टप्पा-२ साठी निविदेत रु.५७४७.४६ लक्ष ऐवजी फक्त रु.५१९१.९४ लक्ष मंजूर केलेले आहेत. म्हणजे रायझिंग मेन या घटकांसाठी पेमेंट शेड्युल मध्येच रु.५५५.५२ लक्ष ची बचत करण्यात आलेली आहे.

निविदेअंतर्गत असणाऱ्या कलम-६ नुसार जर विविध घटकांमध्ये कमी होणाऱ्या परिमाणासाठी प्रस्तावित किंमत कमी केली तर वाढीव परिमाणांसाठी अतिरिक्त रक्कम ठेकेदारास द्यावी लागेल. या योजनेमध्ये संबंधीत ठेकेदाराने सादर केलेल्या सुधारित प्रस्तावानुसार ज्याप्रमाणे काही घटकांची परिमाणे कमी होत असतील त्याप्रमाणे जास्त घटकांची परिमाणेही वाढत आहेत. निविदेतील कलम-६ अवलंब केला तर संबंधीत ठेकेदाराकडून विविध घटकांच्या वाढीव परिमाणांसाठी अतिरिक्त रकमेच्या मागणीची शक्यता नाकारता येत नाही. त्याऐवजी मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांनी मंजूर केलेल्या पेमेंट शेड्यूल नुसारच ठेकेदारांस रक्कम अदा करणे योग्य राहील,

अन्यथा मंजूर पेमेंट शेड्यूल व ठेकेदारांकडून केली जाणारी अतिरिक्त रकमेची मागणी यामध्ये कोणताही समतोल राहणार नाही.

या योजनेतील रायझिंग मेन ची कमी झालेली लांबी व कमी झालेला पाईपाचा व्यास या बाबींचा विचार मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांनी पेमेंट शेड्यूल मंजूर करतानाच केलेला आहे. म्हणून ठेकेदारास रु.२.६८ कोटी अतिरिक्त रक्कम अदा केल्याचा आर्थिक आक्षेप मागे घेण्याची व सदर परिच्छेद वगळण्याबाबत विनंती आहे.

वरणगांव तळवेल परिसर सिंचन योजनेच्या विविध घटकामध्ये होणारे बदल

उध्दरण नलिकेच्या संपूर्ण लांबीत रु. १३.६७ कोटीची बचत होत असल्याची व पर्यायाने ३४०० मी. लांबीत रु. २.६८ कोटीची बचत होत असल्याची सविस्तर आकडेमोड लेखा परिच्छेदामध्ये दिलेली नसल्याने संपूर्ण निविदेतील बाबींचे तुलनात्मक विवरण सादर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | बाब | अंदाजित किंमत (रु.लक्ष) | आर्थिक आक्षेपानंतर कमी करण्यात आलेली रक्कम | कपाती नंतरची किंमत (रु.लक्ष) | संकल्पीत बदलामुळे होणारी अतिरिक्त वाढ (रु.लक्ष) | नव्याने संभावित किंमत (रु.लक्ष) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | इन्टेक वेल | ४८.२० | | ४८.२० | ३०० | ३४८.३० | प्रत्यक्ष स्थळावर इन्टेक वेलचे बांधकाम करण्यासाठी आजच्या परिस्थितीनुसार कॉफर डॅमचे बांधकाम करणे आवश्यक आहे.म्हणून कॉफर डॅमची अंदाजित रक्कम रु.३०० लक्ष चा समावेश केलेला आहे. |
| २ | कनेक्टींग मेन | २४३.५६ | | २४३.५६ | १०८.५६ | ३४३.९७ | प्रस्तावित तलावावरुन पाणी उचलण्यासाठी जोड पाईपांची लांबी वाढविणे आवश्यक होते. वाढणाऱ्या जोड पाईपांची अतिरिक्त किंमत रु.१०८.३७ लक्ष चा समावेश केलेला आहे. |
| ३ | जॅकवेल व पंप हाऊस | २४३.६० | | २४५१.५१ | १४२.४९ | ३८६.९७ | १. पोहोच कालवा व जॅकवेल मध्ये होणाऱ्या वाढीव परिमाणांची अंदाजित किंमत रु.९१.३० लक्ष<br>२.सब स्टेशनसाठी करावयाच्या अतिरिक्त |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | कामाची अंदाजित किंमत रु.४१.१९ लक्ष<br>३. जॅकवेल साठीचा पोहोच रस्त्याची अंदाजित किंमत रु.१०.०० लक्ष एकूण रु.१४२.४९ |
| ४ | पंपींग मशिनरी | २६७७.६१ | २२६.११ | २४५१.५१ | ५००.०० | २९५१.५ | १. पंपींग मशिनरीसाठी लागणाऱ्या अतिरिक्त सुटे भाग यांची अंदाजित किंमत रु.४०० लक्ष<br>२.पंपाच्या पाईपामध्ये होणाऱ्या वाढीची अंदाजित किंमत रु.१००.०० लक्ष<br>एकूण रु.५००.०० लक्ष |
| ५ | रायझिंग मेन टप्पा-१ व टप्पा-२ | ५६१३.७१ | १४३२.३५ | ४१८१.३६ | ९९०.४२ | ५१७१.७८ | १. प्रत्यक्ष सिंचनासाठी लागणाऱ्या अतिरिक्त पाईपांची अंदाजित किंमत रु.२४८.८३ लक्ष<br>२. पोहोच रस्ता व अतिरिक्त पाईप लाईनसाठी लागणारे भूसंपादन अंदाजित रु.२५.०० लक्ष<br>३. डिलीव्हरी चेंबरचे बांधकाम रु.५०.०० लक्ष<br>४. रायझिंग मेन च्या संपूर्ण लांबीत आवश्यक भूसंपादन रु.४०४.८६ लक्ष<br>५. अतिरिक्त पाईप लाईनचे मुरुम बेडींग रु.११.७३ लक्ष<br>६. कठीण खडकाचे अतिरिक्त खोदकाम अंदाजित रु.१०० लक्ष<br>७. एक सब स्टेशन रद्द केल्याने होणारी बचत रु.१५० लक्ष |
| ६ | संपवेल ओव्हर हेड पंप हाऊस | १०३.२२ | | १०३.२२ | २२५.७७ | ३२८.९९ | १. पंप हाऊसच्या सर्वसाधारण आराखड्यात होणाऱ्या बदलामुळे रु.१२५.७७ लक्ष<br>२. आवश्यक व्हॉल्व्ह ची संख्या |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | डिलीव्हरी चेंबर टप्पा-२ | | | | | | वाढल्यामुळे होणारी अतिरिक्त किंमत रु.१००.०० लक्ष |
| ७ | लाभक्षेत्र सर्व्हेक्षण | १०४.६८ | | १०४.६८ | | १०४.६८ | - |
| ८ | संकल्पना ची देयके | ८९.२२ | | ८९.२२ | | ८९.२२ | - |
| | **एकूण** | **९११५.८०** | **१६५८.४६** | **७४५७.३४** | **२२६७.०५** | **९७२४.३९** | |

वरील तक्त्याचा अभ्यास केला असता संबंधीत ठेकेदारास या योजनेच्या संपूर्ण कामाअंती कोणत्याही प्रकारचा आर्थिक फायदा विभागाने केलेला नाही.

ही निविदा "टर्न की" स्वरुपाची असल्याने ठेकेदार या योजनेसाठी स्वतःचे संकल्पन नियोजन करु शकतो. ठेकेदारास काही घटकांमध्ये होणारा फायदा जर लक्षात घेता तर त्यास होणारा तोटा सुद्धा विचारात घ्यावा लागेल म्हणून नव्याने प्रस्थापित संकल्पनात ठेकेदारास अतिरिक्त रकमेचा फायदा देण्यात आलेला आहे. हा आर्थिक आक्षेप योग्य नाही.

**महालेखापालांनी अनौपचारीक संदर्भान्वये उपस्थित केलेला मुद्दा**

**As per general requirement No. 23 (iv) of Design criteria for tender offer for Lump sum contract based on his alternative design and drawings submitted by him. If during scrutiny of detailed Design and calculations any change which are found necessary in the opinion of competent authority who approves the drawing and Designs shall be incorporated without altering the lump sum quotation.**

1) **In the present case quantities and items were suggested by contractor in his own design the question of operation of Clause b does not arise.**
2) **Moreover as per tender condition of C of reduction in length and diameter of mild steel rising main of Varangao lift Irrigation Scheme. The Department is entitled to rebate.**
3) **However, a copy of Tapi Irrigation Development Corporation letter No 1471/2000 dated 23/3/2000 along with Detailed calculations may be enclosed.**
4) **Please confirm whether the final result of 10.64 Cubic meter of pumping has been achieved or not may be incorporated in Government Memorandum.**

**शासनाचे अभिप्राय :**

१३.४ सदर बाब निविदा शर्त असल्याने कोणतेही अभिप्राय नाहीत.

कंत्राटदाराने दिलेल्या संकल्पनात एकूण विसर्ग १०.६० घ.मी./से. हा बदलवण्यात आलेला नाही. त्यामुळे कंत्राटदाराने दिलेले संकल्पन मान्य करण्यात आले.

उच्च नलिकेच्या लांबीत व व्यासात झालेले बदल, अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगांव यांनी पत्र क्रमांक १४७१ दिनांक २३/३/२००० अन्वये मंजुर पेमेंट शेड्युल मध्ये विचारात घेतलेले आहेत. उर्ध्व नलिकेसाठी रूपये ५७४७.४६ लक्षच्या तुलनेत रूपये ५१९१.९४ लक्ष किंमतीस मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामुळे रूपये ५५५.५२ लक्षची बचत झाली असून त्यानुसार अदायगी करण्यात आलेली आहे.

अधीक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगांव यांचे उपरोक्त पत्राची प्रत सहपत्रासोबत जोडली आहे.

संकल्पनात उर्ध्व नलिकेसाठी १०.६० घ.मी./से. विसर्गाची तपासणी केली असून प्रत्यक्षिक काम पुर्ण झाल्यानंतर याबाबत उद्दीष्ट पुर्ती होईल.

वरील मुद्दे विचारात घेता सदरचा परिच्छेद कृपया वगळण्यात यावा.

**साक्ष :**

१३.५ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक २२ फेब्रुवारी, २०११ रोजी सचिव, जलसंपदा विभाग व अन्य विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. त्यावेळी वरणगांव उपसा सिंचन योजनेची सविस्तर माहिती समितीला देण्यात यावी व या प्रकल्पामध्ये कंत्राटदार बदलण्यात आला आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, वरणगांव-तळवेल उपसा सिंचन ही संपूर्ण योजना कार्यान्वित करण्याचे काम एका कंत्राटदाराला एकुण रु.९३.३३ कोटी रुपयास (Lump Sum) देण्यात आले होते. या कामामध्ये rising main सह intake well, approach channel, jack well व पंपगृहाचे बांधकाम करावयाचे होते. या निविदेअंतर्गत कंत्राटदारास प्रस्तावित साठवण तलावात १०.६० घनमीटर प्रति सेकंद दराने पाणी टाकणे आवश्यक होते. त्यानुसार कामे करण्यात येत आहेत. जी एकूण ठोक रक्कम (Lump Sum) ठरविण्यात

आलेली आहे त्या रकमेपेक्षा जास्त रक्कम या कामासाठी लागणार नाही. मूळ रकमेतच ठेकेदार ही सर्व कामे करुन देणार आहे.

१३.६ वरणगांव-तळवेल उपसा सिंचन कामाची जी किंमत होती, त्याचे कच्चे अंदाजपत्रक (रफ एस्टिमेट) केले आहे काय ? असे विचारले असता, उपसा सिंचन योजनेचे काम आहे. त्याचे अंदाजपत्रक तयार करुन निविदा काढण्यात आली होती. यामध्ये पंपगृहाचे बांधकाम, पंपांचे उत्पादन व मांडणीसह पूर्ण योजना कार्यान्वित करण्याचे काम एका कंत्राटदारास रुपये ९३.३३ कोटीच्या ठोक रकमी करारनाम्यावर जुलै, २००६ पर्यंत पूर्ण करण्याकरिता दिले होते. यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नव्हता.

१३.७ यासंदर्भात महालेखाकारांच्या आक्षेपासंदर्भात समितीने विचारणा केली असता, महालेखापाल यांनी असे सांगितले की, As the length and diameter of the rising main was reduced, Department was bound to restrict the payments as per actual execution of the work, या आक्षेपाबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, एखाद्या कामाच्या बाबीसंदर्भात वाढ झाली तर त्याची रक्कम अदा करणार नाही. पंपांचे उत्पादन व मांडणीसह पूर्ण योजना कार्यान्वित करण्याचे काम एका कंत्राटदारास रुपये ९३.३३ कोटीच्या ठोक रकमी करारनाम्यावर जुलै, २००६ पर्यंत पूर्ण करण्याकरिता दिले होते. आतापर्यंत ८८ कोटी ८५ लक्ष ९३ हजार रुपयांचा खर्च झालेला आहे.

१३.८ करारनाम्यानुसार जुलै, २००६ पर्यंत काम पूर्ण व्हायला पाहिजे होते. ते काही पुर्ण झालेले नाही. यासंदर्भात कोणती कारवाई केलेली आहे ? संबंधित कंत्राटदारास दंड लावण्यात आला आहे काय, तसेच १०.६० घनमीटर पम्पिंगबाबतचा अंतिम निर्णय झाला आहे किंवा नाही ? यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, (CDO) नाशिक यांच्याकडून पाणी एका ठिकाणाहून उचलून दुसऱ्या ठिकाणी नेण्याच्या संदर्भातील डिझाईन्स तयार करुन घेतले आहे. यामधील तरतुदीनुसार कामाचा व्याप निश्चित केलेला आहे. यामधील शिर्षामध्ये कोणताही बदल केलेला नाही. पेमेंट शेड्युलमध्ये पाईपलाईनची कमी होणारी लांबी तसेच पाईपचा कमी होणारा व्यास यांचा विचार केलेला आहे. संबंधित कंत्राटदारास रु.९३.३३ कोटीच्या ठोक रकमी करारनाम्यानुसार जुलै २००६ पर्यंत काम पूर्ण करण्यास सांगण्यात आले होते. त्यांना कोणत्याही प्रकारे अधिक रक्कम

अदा केलेली नाही. यासंदर्भात त्यांनी नवीन डिझाईन्स दिलेले आहे. संबंधित कंत्राटदारास ९३.३३ कोटी रुपयांचे पेमेंट करण्यात येणार आहे. मुख्य अभियंता यांनी सदर डिझाईन्सला मान्यता दिलेली आहे. ठराविक किंमतीमध्ये काम पूर्ण करणे हा विभागाचा मुख्य उद्देश होता. त्यामुळे काम पूर्ण करण्यास प्राधान्य देण्यात आले. सदर काम डिसेंबर, २०१० अखेरपर्यंत पूर्ण करावयास हवे होते. परंतु निधीच्या अडचणीमुळे काही अडचणी निर्माण झालेल्या आहेत.

१३.९ तथापि, पाईपलाईनचे काम २००६ मध्ये पूर्ण करावयाचे होते परंतु काम पुर्ण न झाल्यामुळे यामध्ये सर्व पद्धतीची तपासणी करण्याची गरज आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, यासंदर्भात खुलासा करताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, महाजनकोकडून १७७ कोटी रुपये मिळणे अपेक्षित असताना फक्त १६९ कोटी रुपये दिलेले आहेत. परंतु सदर योजना तापी पाटबंधारे महामंडळ आणि महाजनको हे संयुक्तपणे राबविणार आहे. तापी महामंडळाकडून फारसा विशेष निधी प्राप्त झाला नसल्यामुळे या कामास मुदतवाढ दिलेली आहे. परिणामी काम थांबलेले आहे. सदर काम जुलै, २००६ पर्यंत पूर्ण करावयाचे होते. परंतु सदर योजना तापी पाटबंधारे महामंडळ आणि महाजनको यांनी संयुक्तपणे राबविणार आहे. तापी पाटबंधारे महामंडळाकडून फारसा विशेष निधी प्राप्त झाला नसल्यामुळे या कामास मुदत वाढ दिलेली आहे.

१३.१० The original contract was based on the departmental design for two rows of rising mains of mild steel pipes of १.९ diameter and length ११,२८० metres. The original cost for single row was Rs.१५,८४९/- and the cost for two rows was Rs.३१,६९९/-. However as per the contractor's design approved by the Chief Engineer, the diameter and length of pipes was reduced to १.८४ metres and ८,६४० metres respectively. After reduction, the cost for single row would be Rs.१२,७७९/- and for two rows Rs.२५,५५९/-. The reduction in length and diameter of the rising main caused a corresponding reduction in the contract value by Rs.१३.६७ crores, which necessitated proportionate reduction in the payment to be released to the contractor. This was, however, not done which led to violation of contractual provisions and extra payment of Rs. २.६८ crores to the contractor. अशी माहिती महालेखापाल यांना दिली असता, विभागीय सचिवांना सांगितले की, The work of designing,

planning and construction of intake well, approach channel, jack well, pump house, manufacturing and installation of pumping machinery including rising main and commissioning it was entrusted to a contractor on lump sum contract for Rs.९३.३३ crore. Due to adoption of contractor's design, there have been many changes, which led to various modifications resulting in more expenditure on some components of work as compared to the Department's estimate. As the work was entrusted to the contractor on lump sum contract for Rs.९३.३३ crore the Department would not pay more than the contract amount to the contractor.

१३.११ या संदर्भात महालेखापाल यांनी विदित केले की, The contractor had made his offer after taking into consideration all the parameters stipulated in the tender. Since, the length and diameter of the rising main was reduced, Department was bound to restrict the payments as per actual execution of the work. यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, The work was entrusted to a contractor on lump sum contract for Rs. ९३.३३ crore and the Department would not pay more than the contract amount to the contractor.

१३.१२ या मुद्दयाच्या संदर्भात सविस्तर माहिती विभागाने द्यावी असे महालेखापालांनी विभागीय सचिवांनी सांगितले विभागाच्या संकल्पचित्रातील १.९ मीटर व्यासाच्या ११२८० मीटर लांबीचा माईल्ड स्टील नळांच्या रायझिंग मेनच्या दोन ओळी बांधणे हा करारनाम्याचा पाया होता. परंतु, कार्यकारी अभियंता यांनी कंत्राटदाराच्या रायझिंग मेनच्या संकल्पचित्रास मंजूरी दिली होती. यात १.८४ मीटर व्यासाच्या माईल्ड स्टीलच्या ८६४० मीटर लांबीच्या नळांच्या दोन ओळींची सरळ संरेखेत मांडणी करण्याची योजना होती. रायझिंग मेनची कमी झालेली लांबी आणि कमी व्यासाच्या नळ्यांच्या वापरामुळे करार मूल्यात रुपये १३.६७ कोटीची घट झाली. ज्यामुळे कंत्राटदारास दिल्या जाणाऱ्या प्रदानामध्ये प्रमाणानुसार घट करणे आवश्यक होते. तथापि, तसे केले नाही ज्यामुळे करारनाम्यातील अटीचे उल्लंघन झाले आणि रुपये २.६८ कोटी अतिरिक्त प्रदान झाले. करारनाम्यातील अटींचे उल्लंघन आणि मे २००५ पर्यंत निष्पादित ३.४० मीटरच्या rising main च्या कामात कंत्राटदारास रुपये २.६८ कोटी अतिरिक्त प्रदान झाल्याचा महालेखाकारांचा आक्षेप असल्याचे समितीने विदित केले.या मुद्दयाच्या संदर्भात समितीने जी माहिती मागितलेली आहे ती देण्याचे निदेश समितीने विभागीय सचिवांना दिले.

**अभिप्राय व शिफारशी :**

१३.१३ वरणगाव उपसा सिंचन योजनेचे संकल्प चित्र तयार करणे, नियोजन आणि rising main सह intakewell, approach channel, jack well, पंप गृहाचे बांधकाम, पंपाचे उत्पादन व मांडणीसह पूर्ण योजना कार्यान्वित करण्याचे काम एका कंत्राटदारास रु.९३.३३ कोटीच्या ठोक रकमी करारनाम्यावर जुलै २००६ पर्यंत पूर्ण करण्याकरिता दिले होते.

१३.१४ विभागाच्या संकल्पचित्रातील १.९ मीटर व्यासाच्या ११२८० मीटर लांबीचा माईल्ड स्टील नळांच्या रायझिंग मेनच्या दोन ओळी बांधणे हा करारनाम्याचा पाया होता. परंतु, कार्यकारी अभियंता यांनी कंत्राटदाराच्या रायझिंग मेनच्या संकल्पचित्रास मंजूरी दिली होती. यात १.८४ मीटर व्यासाच्या माईल्ड स्टीलच्या ८६४० मीटर लांबीच्या नळांच्या दोन ओळींची सरळ संरेखेत मांडणी करण्याची योजना होती. रायझिंग मेनची कमी झालेली लांबी आणि कमी व्यासाच्या नळ्यांच्या वापरामुळे करार मूल्यात रुपये १३.६७ कोटीची घट झाली. ज्यामुळे कंत्राटदारास दिल्या जाणाऱ्या प्रदानामध्ये प्रमाणानुसार घट करणे आवश्यक होते. तथापि, तसे केले नाही त्यामुळे करारनाम्यातील अटीचे उल्लंघन झाले आणि रुपये २.६८ कोटी अतिरिक्त प्रदान झाले. **करारनाम्यातील अटींचे उल्लंघन का करण्यात आले याबाबत समितीला माहिती देण्यात यावी व करारनाम्यातील अटींचे उल्लंघन करणाऱ्या संबंधिताची चौकशी करुन चौकशीत दोषी आढळलेल्यांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

## सार्वजनिक बांधकाम विभाग

### १४. पुलाचे बांधकामावर निष्फळ खर्च-

१४.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील **परिच्छेद क्र. ४.३.३ "पुलाचे बांधकामावर निष्फळ खर्च"** बाबत खालील अभिप्राय महालेखापरिक्षकांनी व्यक्त केले आहेत.

१४.२ पोहोच रस्त्यासाठी (Approch road) जमिनीचे संपादन न करता केलेल्या पुलाच्या बांधकामावर झालेल्या रु.२.०५ कोटींचा निष्फळ खर्च.

शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने रेवस पोयनाड नागोठणे रस्ता एस.एच ८६ यावर मानकुले आणि धेरंड यामध्ये एका मोठ्या पुलाच्या बांधकामासाठी रु.८.४७ कोटीची प्रशासकीय मान्यता दिली. (फेब्रुवारी १९९७). ही मान्यता देताना पुलासाठी व पोहोच मार्गासाठी आवश्यक असलेली जमीन त्यास तांत्रिक मान्यता देण्यापूर्वी उपलब्ध करुन घेणे, असे करार निविष्ट करण्यात आले होते, असे असताना सुद्धा मुख्य अभियंता, मुंबई प्रदेश यांनी पुलाच्या बांधकामावर रु.२.४९ कोटी खर्च करण्याकरिता, पुलाच्या पोहोच मार्गाकरीता, आवश्यक असलेली जमीन उपलब्ध करुन घेतली आहे की नाही याची शहानिशा न करता, तांत्रिक मान्यता दिली. (जून १९९९). तथापि पुल पोहोच मार्गाविना विनावापर पडून राहू नये म्हणून त्यास लागणाऱ्या आवश्यक जमिनीसाठी आवश्यक ते प्रयत्न करावेत असे निर्देशित केले.

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग, जिल्हा रायगड यांनी रु.१.९८ कोटी खर्च येणारे हे काम कंत्राटदारास दिले. (ऑक्टोबर, २००२) जे त्याने रु.२.०५ कोटी खर्च करुन फेब्रुवारी, २००४ मध्ये पूर्ण केले.

अभिलेख्यांची चाचणी परिक्षा (डिसेंबर, २००५) असे दाखविते की, जरी भुसंपादन अधिकारी, अलिबाग यांचेबरोबर जमीन उपलब्ध करुन घेण्याची कारवाई मार्च, १९९७ पासून सुरु करण्यात आली तरी स्थानिक भात शेती करणाऱ्या शेतकऱ्यांकडून विरोध होत असल्यामुळे जुलै, २००६ पर्यंत जमीन संपादित झाली नव्हती. जेव्हा कार्यकारी अभियंत्यांने सक्तीने जमीन संपादन करण्याची कारवाई सुचविली (जून २००५) तेव्हा जिल्हाधिकारी रायगडने असे कळविले (ऑगस्ट, २००५) की, सदर जमीन कोस्टल रेग्युलेटरी झोन अंतर्गत येत असल्यामुळे

त्याकरीता कोस्टल रेग्युलेटरी ॲथॉरिटीची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. कार्यकारी अभियंत्याने मार्च, २००६ मध्येच तशी परवानगी कोस्टल रेग्युलेटरी ॲथॉरिटीकडून मागितली आणि ती जुलै २००६ पर्यंत मिळाली नाही.

याप्रमाणे मुख्य अभियंत्यांकडून त्या कामास तांत्रिक मान्यता देणे व त्याप्रमाणे पुलाच्या पोहोच मार्गासाठी आवश्यक ती जमिन संपादित न करता कार्यकारी अभियंत्यांकडून त्यावर कारवाई होणे यामुळे सदर पुल विनावापर पडून राहिला आणि त्यावर खर्च झालेले रु.२.०५ कोटी व्यर्थ गेले.

ही बाब शासनाचे प्रधान सचिव यांस जून, २००६ मध्ये कळविली. अद्याप उत्तर नाही (ऑक्टोबर, २००६).

**ज्ञापन :**

१४.३ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

रेवस-पोयनाड-नागोठणे-रस्ता राज्य महामार्ग क्र.८६ यावर मानकुले व धेरंड यामध्ये बांधण्यात आलेल्या मोठ्या पुलाचे पोहोच रस्त्यासाठी जमीन संपादनाचे प्रयत्न पुल बांधण्याच्या पूर्वीपासून म्हणजेच मार्च ९७ या विभागामार्फत चालू आहेत. याबाबत आतापर्यंत करण्यात आलेल्या प्रयत्नांची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे :-

१) जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे मार्च ९७ मध्ये प्रथम प्रस्ताव सादर करण्यात आला.

२) सदर रस्ता धेरंड बाजूने नेण्याच्या सूचना प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी, यांजकडे नोव्हेंबर, २००२ मध्ये सुधारित प्रस्ताव सादर.

३) जिल्हाधिकारी, यांनी त्रुटी काढल्यानंतर त्रुटींची पूर्तता करुन दि.२३.१.२००४ रोजी प्रस्ताव सादर.

४) जमीन नुकसान भरपाईसाठी रु.७५.०० लाख इतकी रक्कम भूसंपादन अधिकारी यांजकडे नोव्हेंबर, २००५ मध्ये जमा करण्यात आली आहे.

५) दिनांक ३१.१.२००६, दिनांक २१.६.२००६ व दिनांक १०.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये तातडीचे कलम लावून जमीन संपादन करण्याबाबत जिल्हाधिकारी, यांना कळविण्यात आले आहे.

दिनांक २८.६.२००५ रोजी जिल्हाधिकारी यांजकडे सादर केलेल्या प्रस्तावासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी प्रस्तावित क्षेत्र हे सी.आर.झेड. अंतर्गत येत असल्याने किनारा विनियम प्राधिकरणाचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार दिनांक २१.३.२००६ व दिनांक १०.८.२००७ अन्वये किनारा विनियम प्राधिकरणाला प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. अद्याप त्यांचेकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळालेले नाही.

याबाबत किनारा विनियम प्राधिकरण, मुंबई तसेच जिल्हाधिकारी रायगड, यांचेबरोबर समक्ष चर्चा करण्यात येऊन जमिन संपादनाबाबत मंजुरी मिळण्याबाबतचे प्रयत्न चालू आहेत.

**साक्ष :**

१४.४ समितीने दिनांक १५ फेब्रुवारी व २१ फेब्रुवारी, २०११ रोजी सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, रायगड जिल्ह्यातील रेवस-पोयनाड-नागोठणे हा रस्ता एस.एच.८६ आहे या रस्त्यांच्या बांधकामासाठी ८ कोटी ४७ लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे व त्याचे अंदाजपत्रक १९९७ मध्ये करण्यात आले असून १९९७ मध्ये कामाला मान्यता देण्यात आलेली आहे, तरी अद्याप रस्त्याचे काम पूर्ण का करण्यात आले नाही.

१४.५ यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, तेथील पुलाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सन १९९७ पासून रस्ता करण्यास तेथील स्थानिकांचा विरोध असल्यामुळे तेथील अलाईनमेंट बदलावी अशी मागणी होती. अलाईनमेंट बदलण्याची प्रक्रिया सुरु आहे.

१४.६ समितीने अशी विचारणा केली की, स्थानिक नागरिकांचा विरोध होता तर आपण संबंधित लोकप्रतिनिधींची भेट घेऊन येणाऱ्या अडचणीसंदर्भात त्यांच्या सोबत स्थानिक स्तरावर बैठक घेतली आहे काय ? या कामासाठी विभागाने किती वेळा पाठपुरावा केला आहे. जिल्हाधिकारी यांच्याकडे अनेक भूसंपादनाची कामे असतात. त्यामुळे विभागाने या कामाचा सतत पाठपुरावा करावयास पाहिजे होता. जमीन मोजणीसाठी कोणत्या वर्षी किती रुपये देण्यात आले आहेत. तसेच जमीन मोजणीसाठी विभागाने पाठपुरावा केला आहे काय?

१४.७ याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, स्थानिक स्तरावर ग्रामसभा घेऊन लोकांना मार्गदर्शन करण्यात आले, भूसंपादनासाठीची बैठक फेब्रुवारी व डिसेंबर, २०१०

मध्ये घेण्यात आली होती. ही जागा एमआयडीसीमध्ये जात असल्यामुळे हा रस्ता व्हावा यासाठी एमआयडीसीचे अधिकारी व जिल्हाधिकारी यांच्यासोबत बैठक घेण्यात आली.

१४.८ सन १९९७ मध्ये जमीन मोजण्यासाठी ८० हजार रुपये देण्यात आले आहेत व सन २००५ मध्ये जमिनीची किंमत म्हणून ७५ लाख रुपये भरण्यात आले आहेत. रस्ता होण्यासाठी सन १९९७ पासून जिल्हाधिकारी यांच्याकडे विभागाकडून अनेक वेळा पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. त्यावर समितीने विचारणा केली की, सार्वजनिक बांधकाम विभागाने स्पील ओव्हरवर कामे करावीत. ही तांत्रिक बाब आहे हे मान्य आहे. महाराष्ट्रामध्ये स्पील ओव्हरची कामे सार्वजनिक बांधकाम विभागाने किती केली आहेत. स्पील ओव्हरची एकूण किती कामे होती व किती पूर्ण झाली आहेत. स्पील ओव्हर कॉस्ट आणि एकूण कामाची संख्या यासंदर्भातील सविस्तर माहिती समितीला मिळाली पाहिजे. त्यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, ५५०० ते ६००० कोटी रुपयांची कामे असावीत. यासंदर्भातील माहिती नियोजन विभागाकडून घेऊन देण्यात येईल. दोन वर्षापूर्वी जी पाच कोटी रुपयांची कामे होती ती पूर्ण करण्यात आली आहेत. पाच-पाच कोटी रुपयांची कामे मिळून जवळपास १५०० कोटी रुपयांची स्पील ओव्हरची कामे आहेत. ती कामे पूर्ण झाली आहेत. यासंदर्भात तसेच केंद्र सरकारच्या निधीतून केलेल्या कामाची माहिती देण्याचे समितीला आश्वासित केल्यानुसार विभागाने आश्वासित माहिती सादर केलेली आहे. **(विवरण क्र.२३)**

१४.९ समितीने अशी विचारणा केली की, विधानसभेमध्ये दिनांक १७.४.२००७ रोजी अहवाल सादर केल्यानंतर तीन महिन्यात ज्ञापने यावयास पाहिजे होती. यानंतर सन २००७ पासून सन २०११ पर्यंत सात वेळा स्मरणपत्रे पाठविण्यात आली आहेत सतत पाठपुरावा करुनही विभागाकडून माहिती येत नाही. तसेच प्रत्यक्ष जागेवर कामे सुद्धा होत नाहीत. ज्ञापने का पाठविण्यात आली नाहीत याची माहिती देण्यात यावी. ज्या कामांमध्ये स्थानिक अडचण निर्माण होते त्या ठिकाणी स्थानिक लोकप्रतिनिधींचे सहकार्य घ्यावयास पाहिजे. या ठिकाणी जमीन संपादन करण्यासाठी जर शेतकऱ्यांचा विरोध होता तर ही बाब स्थानिक लोकप्रतिनिधीच्या निदर्शनास आणली आहे काय ? ग्रामपंचायत सरपंच, जिल्हा परिषद सदस्य, नगरपालिका सदस्य यांच्या निदर्शनास आणून हे प्रश्न सुटणार नाहीत. हा विषय राज्य पातळीवरचा आहे. त्यासाठी लागणारा निधी राज्य स्तरावरील आहे. स्थानिक आमदारांचा निधी

खर्च होत नसेल तर त्यामध्ये काय अडचणी आहेत याची माहिती त्यांना द्यावयास पाहिजे. याबाबत विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठपुरावा करण्यात आलेला आहे.

१४.१० त्यावर समितीने विचारणा केली की, जिल्हाधिकारी यांच्याकडे भूसंपादनाची अनेक प्रकरणे असतात त्यामुळे हा प्रश्न जिल्हाधिकारी यांच्याकडे न देता या कामासाठी अधिकार प्रदान करुन एखादा विशेष अधिकारी नेमावयास पाहिजे होता. आता तेथे टाटा व रिलायन्स या कंपन्यानी जमिनी घेतल्या असल्यामुळे त्या जमिनीचे भाव वाढले आहेत. त्यामुळे लोकांना जमिनीची किंमत जास्त हवी आहे. ज्याप्रमाणे डीएसआर वाढतो त्याचप्रमाणे लोकांच्या जमिनीचे भाव वाढतात. तसेच या कामासाठी सीआरझेडची परवानगी मिळाली आहे काय ?

१४.११ त्यावर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, सीआरझेडची परवानगी घेण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. या कामासाठी सीआरझेडची परवानगी नाही हे महालेखाकार यांच्या निदर्शनास आणून दिले आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सीआरझेड व भूसंपादन करण्याबाबत नगरपालिकेला पत्र दिलेले आहे. यासंदर्भात ज्या त्रुटी काढल्या होत्या त्या त्रुटींची पूर्तता सन २०१० मध्ये करुन देण्यात आलेली आहे. यासंदर्भातील माहिती त्यांच्याकडून मिळालेली नाही.

१४.१२ महालेखाकार यांनी समितीस पुढील मुद्दा निदर्शनास आणून दिला की, we received the reply from the Department in the year २००८, but the said reply does not bears the signature of the Secretary. It was signed by the Section Officer.

१४.१३ समितीने विचारणा केला की, सन २००८ मध्ये कक्ष अधिकारी यांनी पत्र पाठविले आहे. सदर पत्र सचिवांच्या सहीने पाठवावयास पाहिजे. मंत्रालयातील प्रक्रिया तशीच आहे. कक्ष अधिकारी यांनी थेट महालेखाकार यांना पत्र कसे काय पाठविले आहे. या पत्राला सचिवांची मान्यता घेतली आहे काय ? त्यावर विभागीय सचिवांनी खुलासा केली की, कक्ष अधिकारी यांनी जरी पत्र पाठविले असले तरी टिप्पणीवर सचिवांची मान्यता घेण्यात येते. अशा प्रकारची कार्यवाही मंत्रालयात आहे.

१४.१४ समितीने विचारणा केली की, महालेखाकारांनी आपणास दिनांक २० एप्रिल, २००९ रोजी जे पत्र पाठविले आहे, त्यात असे म्हटले आहे की, "With reference to your

Letter No.नागरी/१३५६/प्र.क्र.०१/प्रशा-५ dated १२.०३.२००९, it is stated that the reply in respect of the abovementioned para furnished by you vide your letter dated १६.०२.२००८, has already been returned vide this Office's Letter No. Report-II/ DP-२५ / R२००५-०६/ PWD/६३२ dated १४.०३.२००८, requesting to send the same in the UOR format duly approved by the Secretary, Public Works Department, Government of Maharashtra." या पत्रात महालेखापालांनी असा आक्षेप घेतला आहे की, तुम्ही कक्ष अधिकाऱ्यांच्या सहीने पत्रे महालेखापालांना दिलेली आहेत. सदर पत्रांना प्रधान सचिवांनी मान्यता दिली आहे किंवा नाही याबाबत कक्ष अधिकाऱ्यांच्या पत्रामध्ये कुठेही उल्लेख करण्यात आलेला दिसून येत नाही. त्यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, महालेखापालांना आक्षेपासंबंधीचा खुलासा सादर करण्यासंबंधीचे पत्र कक्ष अधिकारी यांच्या सहीने पाठविले आहे. सदर खुलासा हा प्रधान सचिव यांची मान्यता घेऊन कक्ष अधिकारी यांच्या सहीने करीत असतो. मंत्रालयात कक्ष अधिकाऱ्यांच्या सहीनेच पत्रव्यवहार करण्यासंबंधीची पद्धत आहे. परंतु प्रत्येक गोष्टीस प्रधान सचिव अथवा सचिव यांची मान्यता घेतलेली असते.

१४.१५ समितीने विचारणा केली की, कक्ष अधिकाऱ्यांच्या सहीने पत्रव्यवहार होतो या गोष्टीची समितीला माहिती आहे. महालेखापालांनी घेतलेल्या आक्षेपासंबंधीच्या खुलाश्याचे पत्र प्रधान सचिव वा सचिव यांच्या मान्यतेने पाठविले आहे अशा प्रकारचा उल्लेख कक्ष अधिकारी यांनी पाठविलेल्या पत्रात असणे आवश्यक आहे, असे समितीला वाटते. सचिवांनी यापुढे विभाग अशी काळजी घेईल असे समितीला आश्वासित केले. पुढे समितीने विचारणा केली की, २००७ पासून ते १५ फेब्रुवारी, २०११ या कालावधीत लोकलेखा समितीने सहा स्मरणपत्रे पाठविली आहेत. परंतु त्या पत्रांच्या संदर्भात आपल्या विभागाकडून कोणत्याही प्रकारचे उत्तर समितीला प्राप्त झालेले नाही. समितीने पाठविलेल्या पत्राच्या अनुषंगाने विभागाने उत्तरे का पाठविली नाहीत? विभागीय सचिवांनी खुलासा केला की, महालेखापालांना अंतिम खुलाश्यासंबंधीचे पहिले पत्र दिनांक १६.२.२००८ रोजी पाठविले आहे आणि शेवटचे पत्र दिनांक १२.३.२००९ रोजी पाठविले आहे.

१४.१६ रेवस-पोयनाड-नागोठणे या रस्त्याच्या कामासाठी भूसंपादनाचे काम अद्यापही झालेले नाही. टाटा आणि रिलायन्स यांच्या प्रकल्पांना स्थानिक लोकांचा विरोध आहे. त्या प्रकल्पासाठी लागणाऱ्या जमिनी भूसंपादनाच्या कामासाठी अधिकारी वा जिल्हाधिकारी गेले तर

स्थानिक लोक त्यांच्या गाड्या अडवितात. परंतु रेवस-पोयनाड-नागोठणे या रस्त्याच्या कामासाठी जमीन संपादनाच्या बाबतीत स्थानिक आमदारांना, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांना विश्वासात घेतले असते तर काही तरी मार्ग निघाला असता अशी समितीने विचारणा केली असता त्यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, २००५-०६ मध्ये जमिनीची संयुक्त मोजणी करण्यासाठी अधिकारी गेले होते परंतु त्यास विरोध झाल्यामुळे संयुक्त मोजणीचे काम करता आले नाही.

१४.१७ जमीन संपादनासाठी जिल्हाधिकारी वा भूसंपादन अधिकारी जेव्हा जागेवर जातात, तेव्हा त्यांच्या गाडीवर स्थानिक लोक दगडफेक करतात. म्हणून जमीन संपादनाच्या बाबतीत आणि विकास कामांच्या बाबतीत विभागांकडून स्थानिक लोकप्रतिनिधींना वा जिल्हा परिषद अध्यक्षांना व इतर पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेतले पाहिजे. स्थानिक लोकप्रतिनिधींना विकास कामांबाबत विचारले जात नाही. रेवस-पोयनाड-नागोठणे या रस्त्याच्या कामाच्या प्रगतीबाबत लोकप्रतिनिधींनी वारंवार विचारणा केली, परंतु त्यांना सार्वजनिक बांधकाम खात्याकडून या रस्त्याच्या बाबतीत माहिती दिली गेली नाही. लोकप्रतिनिधींनी या विषयाच्या बाबतीत सभागृहात कपात सूचना मांडूनही माहिती मिळत नाही. नाईलाजाने या विषयाच्या बाबतीत एक रुपयाची कपात सूचना टाकावी लागेल. रेवस-पोयनाड-नागोठणे रस्त्याचे काम मार्गी लागण्यासाठी बाबतीत स्थानिक लोप्रतिनिधी आणि जिल्हा परिषदेचे अध्यक्ष व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व स्थानिक शेतकरी यांची एक बैठक घेणाच्या संदर्भातील समितीच्या सूचनेस विभागीय सचिवांनी मान्यता दर्शविली.

१४.१८ समितीने अशी विचारणा केली की, महालेखाकार यांच्याकडे पाठविलेले परंतु समितीकडे न पाठविलेल्या आक्षेपासंदर्भातील खुलाश्यांबाबत जे अधिकारी जबाबदार असतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी. सदर अधिकाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली याची माहिती समितीला सादर करण्यात यावी. संबंधित अधिकाऱ्यांना ताकीद देण्यात आली अशा प्रकारची कारवाई समितीला अभिप्रेत नाही. त्यामुळे समिती प्रमुखांनी 'कडक कारवाई' हा शब्दप्रयोग केला आहे. ज्या अधिकाऱ्यांनी समितीला वेळीच खुलासे पाठविले नाहीत त्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केली पाहिजे असे समितीचे मत आहे.

१४.१९ समितीने २००७ पासून ते १५ फेब्रुवारी, २०११ या कालावधीत आक्षेपासंदर्भात सहा स्मरणपत्रे पाठविली आहेत. समितीचे अमूक अमूक विषयाचे पत्र प्राप्त झाले, त्याबाबतीत योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे असे दोन ओळीचे पत्र समितीला विभागाने का दिले नाही ? यावर विभागीय प्रतिनिधींनी यापुढे काळजी घेण्यात येईल, असे समितीस सांगितले.

१४.२० आर्थिक वर्ष संपण्यास फक्त ४० दिवसांचा कालावधी राहिला असताना मंजूर कामांसाठी एका पैशाची देखील विभागाकडून तरतूद केली गेली नाही. मंजूर असलेल्या कामांना देखील पैसे उपलब्ध करुन दिले जात नाहीत. त्यामुळे ठेकेदार काम करण्यास तयार होत नाही. अलिबाग तालुक्यातील रस्त्यांवर मोठ-मोठे खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे पर्यटकांचे येण्याचे प्रमाण खूपच कमी झालेले आहे. अलिबाग शहरामध्ये हजारो, लाखो पर्यटक भेट देतात. म्हणून खास बाब म्हणून का होईना मंजूर कामांना मोठ्या प्रमाणात पैसे उपलब्ध करुन द्यावेत. संपूर्ण कोकणात अशीच परिस्थिती आहे. अलिबाग तालुक्यात मोठ-मोठे उद्योग सुरु झाले आहेत, पर्यायाने मोठया कंटेनर्सची वाहतूक रस्त्यावरुन होते. या कंटेनर्सच्या वाहतुकीमुळे रस्त्यांवर वीस-वीस फुटाचे खड्डे पडलेले आहेत. या वाहतुकीमुळे सर्वच रस्ते खराब झालेले आहे. त्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी तेथे कार्यरत असलेल्या उद्योगांनी अथवा शासनाने पैसे उपलब्ध करुन दिले पाहिजे. रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी तसेच पर्यटन विकासाच्या कामासाठी लागणारी रक्कम कधी रिलीज करणार ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, या वर्षी एकूण बजेटच्या फक्त ५० टक्के एवढीच तरतूद रिलिज झालेली आहे.

१४.२१ दिनांक १५ फेब्रुवारी, २०११ रोजीच्या साक्षीच्या अनुषंगाने दिनांक २१ फेब्रुवारी, २०११ रोजी साक्ष घेण्यात आली. सार्वजनिक बांधकाम विभागाने आपले काम पूर्ण केले आहे, तसेच संपादन संस्था म्हणून आवश्यक तेवढी रक्कम देखील भरलेली आहे. पण अद्याप महसूल विभागाचे काम बाकी आहे. भू-संपादन अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यवाहीला विलंब लावलेला आहे. यानुषंगाने समितीला महसूल विभागाकडून विलंबाचे कारण काय याबाबतची माहिती जाणून घ्यावयाची आहे. रेवस-पोयनाड-नागोठणे रस्ता राज्य महामार्ग क्र. ८६ यावर मानकुले व धेरंड यामध्ये बांधण्यात आलेल्या मोठ्या पुलाच्या पोहोच रस्त्यासाठी जमीन संपादनाचे प्रयत्न पूल बांधण्याच्या पूर्वीपासून म्हणजेच मार्च १९९७ पासून या विभागामार्फत

चालू आहेत. या अनुषंगाने महसूल विभागाकडे हा प्रस्ताव कधी प्राप्त झाला व मधल्या काळात कोणते प्रयत्न करण्यात आले आणि कामामध्ये कोणत्या अडचणी आल्या, स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन आवश्यक ती मदत केली आहे काय, तसेच या कामासाठी जी जमीन संपादित करावयाची आहे त्याची सद्य:स्थिती समितीला अवगत करण्याविषयी समितीने सांगितले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, हा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे दि. २८ जून, २००५ रोजी प्राप्त झाला होता परंतु त्यात त्रुटी असल्यामुळे त्यांचे निराकरण करण्यासाठी तो प्रस्ताव पुन्हा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे परत पाठविण्यात आला.

१४.२२ समितीच्या माहितीप्रमाणे सन १९९७ मध्येच हा प्रस्ताव आपल्या विभागाकडे प्राप्त झाला होता आणि आपण सन २००२ मध्ये त्यातील त्रुटींची पुर्तता करण्यासाठी पुन्हा त्याच विभागाकडे परत पाठविला आहे. तो अद्यापही परत आला नाही, असे समितीने विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, महसूल विभागाकडे प्रस्ताव सादर केला तेव्हा सीआरझेडचा क्लिअरन्स दिलेला नव्हता म्हणून तो प्रस्ताव परत पाठविण्यात आला होता.

१४.२३ आपल्या विभागाला मूळ प्रस्ताव कधी प्राप्त झाला आहे ? अशी समितीने विचारणा केली असता, मूळ प्रस्ताव दि. २८.०६.२००५ रोजी प्राप्त झाला असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. प्रस्ताव त्यापूर्वीच प्राप्त झालेला आहे व मार्च, १९९७ मध्ये जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे मूळ प्रस्ताव सादर करण्यात आला आहे असे समितीने निदर्शनास आणून दिले असता, या प्रकरणाचा मूळ प्रस्ताव २५ मार्च, १९९७ मध्ये राज्य मार्ग परिवहन विभाग यांच्याकडून सादर करण्यात आला असून तेव्हापासून हे प्रकरण सुरु आहे, असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१४.२४ सन १९९७ मध्ये या प्रस्तावातील त्रुटींची पुर्तता करण्यासाठी परत पाठविल्यानंतर त्या विभागाने सुधारित प्रस्ताव कधी पाठविला ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, दिनांक २५ मार्च, १९९७ रोजी मूळ प्रस्ताव महसूल विभागाला सादर करण्यात आला होता. त्यातील त्रुटींची पुर्तता केल्यानंतर पुन्हा १७ मे, १९९७ रोजी महसूल विभागाला सादर करण्यात आला. सन १९९९ मध्ये संयुक्त मोजणीसाठी या विभागाला कळविले होते पण कापणीची कामे पूर्ण झालेली नसल्याने

त्याचबरोबर कब्जेदारांनी विरोध दर्शविल्यामुळे संयुक्त मोजणी होऊ शकली नाही. त्यानंतर दि. ३०.११.२००२ रोजी लोकप्रतिनिधी आणि स्थानिक लोकांनी केलेल्या मागणीनुसार अलाईनमेंटची आखणी करावयाची होती. पुन्हा तसा प्रस्ताव सन २००५ मध्ये त्या विभागाकडे सादर करण्यात आला होता व सन २००२ ते सन २००५ असा तीन वर्षांचा काळ लोटला. या काळामध्ये कोणतीही प्रक्रिया पूर्ण झाली नाही. कारण स्थानिक लोकांचा विरोध असल्यामुळे कोणतेच काम झाले नाही.

१४.२५ तीन-तीन वर्षे शासकीय कामाची संयुक्त मोजणी होत नसेल व याबाबत शासन तसेच जिल्हाधिकाऱ्यांची अशी अवस्था असेल तर सामान्य माणसाचे काय ? म्हणून या कामामध्ये कोणाकडून दिरंगाई झालेली आहे त्यांच्यावर काय कारवाई केली आहे ? या ठिकाणी छोट्याशा रस्त्याच्या कामासाठी जी जमीन संपादित करावयाची होती त्यामध्ये काही घरे जात होती आणि त्यांचे म्हणणे असे होते की, जी रचना (अलाईनमेंट) आहे ती थोडीसी बाजूने घेतली तर सध्या जी घरे जाणार आहेत ती जाणार नाहीत. यातून मार्ग काढला नाही व दिरंगाई केली याला जबाबदार कोण आहे ? हा प्रश्न सोडविण्यासाठी विभागाने स्थानिक लोकप्रतिनिधींशी चर्चा केलेली दिसत नाही. खरे तर स्थानिक लोकप्रतिनिधी हा एक प्रकारे सरकारी अधिकारी आणि जनता यातील दुवा असतो. अशा परिस्थितीत खरे तर मतदारसंघातील काम होणे हेच उद्दिष्ट असते. खरे तर या ठिकाणी सध्याची जी रचना (अलाईनमेंट) आहे ती बदलली तर लोकांची घरेही जात नाहीत, शिवाय जमिनीचे संरक्षण सुद्धा होईल. सध्याच्या परिस्थितीत या भागातील लोकांना चिखलातून रस्ता काढून जावे लागते. या ठिकाणी सन १९३५ सालापासून रस्ताच नाही आणि आपल्याकडून केवळ एवढेही काम होत नाही, जागा बदलण्यास लोकांची हरकत नाही तर उलट ते खुशीने देण्यास तयार आहेत, तरी देखील तीन वर्षात आपण काहीच प्रयत्न केले नाहीत. याबाबतची कारणमिमांसा समितीने विचारली असता, उप जिल्हाधिकारी (भूसंपादन) यांनी असा खुलासा केला की, मे २००९ ला या जिल्ह्यात रुजू झाल्यानंतर लगेच ९ फेब्रुवारी, २०१० रोजी संपादन संस्थेबरोबर बैठक घेतली व या बैठकीत संबंधित उप अभियंता श्री. शेख, तसेच टीआयएलआर यांच्याबरोबर चर्चा करुन यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणात जनतेने आपल्यासमोर दोन पर्याय ठेवले असून त्यानुषंगाने सुधारित प्रस्ताव दिला तर हे काम

लवकरात लवकर करता येईल असेही त्यांना सांगितले. त्यानंतर पुन्हा दि. १९ मे, २०१० रोजी एक बैठक घेतली, तरी सुद्धा समोरच्या बाजूने प्रतिसाद मिळाला नाही. यामध्ये जनतेकडून मारहाण झाली असल्याचे टीआयएलआरचे म्हणणे होते. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, म्हणूनच विभागाने लोकप्रतिनिधींसोबत चर्चा करणे आवश्यक असते, जनतेला विश्वासात घेण्यासाठी तो एक प्रकारचा दुवाच असतो आणि मार्ग सुद्धा निघू शकतो पण प्रशासनाच्या वतीने अशा प्रकारे कुठलेही प्रयत्न झालेले दिसत नाहीत ही बाब योग्य वाटत नाही. सन २००९ पासून भूसंपादनाची किती प्रकरणे आपण मार्गी लावली आहेत ? असे समितीने विचारले असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, मुंबई-गोवा महामार्गावरील भूसंपादनात ८० गावांची जमीन संपादित केली व ही कार्यवाही आता शेवटच्या टप्प्यात आहे. त्यावर समितीने येथे तर केवळ आठ-दहा घरांचाच प्रश्न आहे व त्यातूनही आपल्याला मार्ग काढता येत नाही. भूसंपादन प्रक्रियेत किती लोकांना जमिनीचा मोबदला वाटप करावयाचा राहिला आहे ? कारण मुंबई-गोवा रस्त्यावर पेण येथील जागा एमएमआरडीएने २९ वर्षापूर्वी ताब्यात घेतली होती त्या जमिनीचा अद्यापही मोबदला मिळालेला नाही. रायगड जिल्ह्यातील सन १९९७ पासूनचे हे प्रकरण असून आज २०११ हे वर्ष सुरु आहे पण अद्यापही भूसंपादन झाले नाही. यामध्ये केवळ आठ-दहा घरांचाच प्रश्न आहे. कारण या लोकांची सध्याची रचना बदलण्याची विनंती आहे. शेवटी रस्ता झाला पाहिजे असा हेतू लक्षात घेतला तर यातून कसा तरी मार्ग काढण्याची गरज आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने संपादन संस्था म्हणून आवश्यक ती रक्कम देखील भरलेली आहे, वेळोवेळी ज्या त्रुटी निघाल्या त्यांची पुर्तता करुन सुधारित प्रस्ताव महसूल विभागाकडे पाठविलेला आहे पण असे लक्षात येते की, गावकऱ्यांचा विरोध असल्यामुळे संयुक्त मोजणीच्या वेळेस मारहाण झाली, दगडफेक झाली, जीवाला धोका असतो म्हणून भीती वाटते. पण प्रश्न अद्यापही सुटलेला नाही. यामध्ये लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन मार्ग काढण्याचा प्रयत्न केला काय तर ते देखील विभागाने केलेले दिसत नाही. जिल्हाधिकारी म्हणून लोकप्रतिनिधींना कधी तरी बोलावले अथवा त्यांच्याकडे एखादे पत्र पाठवून बैठक आयोजित केली होती काय ? गावकऱ्यांचे असे असते की, जेवढे थांबायचे तेवढे थांबतात, कारण दिवसेंदिवस जमिनीचे पैसे वाढत जातात आणि ही वृत्ती आहे. इतकी वर्षे या प्रकरणाकडे कोणीच लक्ष दिलेले नाही. आपण यासंदर्भात उप विभागीय अधिकारी तसेच

तहसीलदार यांची ज्याप्रमाणे बैठक बोलावतो त्याप्रमाणे लोकप्रतिनिधींना कधी तरी पाचारण केले होते काय ? अधिकाऱ्यांनी ज्या गतीने काम करायला पाहिजे तसे न केल्यामुळे हे प्रकरण प्रलंबित राहिले. अशा प्रकारे या कामासाठी पैसे असूनही काम पूर्ण झालेले नाही. पण केवळ इच्छाशक्ती नसल्यामुळेच हे काम राहिले, यासंबंधीचा खुलासा करण्यास सांगितले असता विभागीय प्रतिनिधींनी या कामास झालेल्या विलंबाबाबत समितीसमोर दिलगिरी व्यक्त केली. तसेच जी दिशा बदलावयाची आहे त्यासाठी संबंधित शेतकरी, लोकप्रतिनिधी यांच्याबरोबर चर्चा करुन ताबडतोब संयुक्त मोजणी करुन भूसंपादनाची कार्यवाही करुन एक आठवड्याच्या आत समितीला अहवाल सादर करण्याचे समितीस आश्वासन दिले. तथापि, अद्याप आश्वासित माहिती प्राप्त झाले नाही.

१४.२६ एका छोट्या पुलाचे बांधकाम करण्यासाठी इतकी वर्षे लागतात. ही शरमेची बाब आहे असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती ठरु नये. नागांव बंदराला जाताना ब्रिजचे रेलिंग सुद्धा नाही, हे लक्षात घेता कुठल्याही क्षणाला तेथे अपघात होण्याची शक्यता आहे किंवा कोणताही मेंटेनन्स नाही समितीने अशी विचारणा केला असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, यासंबंधीच्या सूचना ताबडतोब देऊन या पुलाचे काम करण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करण्यात येतील असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीला दिले.

१४.२७ या कामासाठी किनारा विनियमन प्राधिकरणाची (कोस्टल रेग्युलेशन ऑथॉरिटीची) परवानगी घेतलेली आहे काय ? असे समितीने विचारले असता ही परवानगी संपादन संस्थेने घ्यावयाची असते. सीआरझेड मॅनेजमेंटकडून अशी परवानगी घ्यावयाची असते व त्यासाठी त्यांच्याकडे सन २००५ मध्येच प्रस्ताव पाठविला असून त्याचा पाठपुरावा वेळोवेळी विभागाने केलेला आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी प्रतिपादन केले. त्यावर समितीने असे प्रतिपादन केले की, या भागात मॅनग्रोव्हज किंवा घरे सुध्दा नाहीत, फक्त चिखलच आहे आणि आजची साक्ष झाल्यानंतर कदाचित या कामाला गती मिळेल.

१४.२८ सध्या रायगड जिल्ह्यामध्ये किती जमीन भूसंपादनाची प्रकरणे शिल्लक आहेत ? पेण नगरपालिकेने औद्योगिक विकासासाठी महामार्गालगतच्या संपादित केलेल्या जागेचे पेमेंट अद्याप केलेले नाही. याविषयी समितीने विचारले असता या संदर्भातील माहिती घेऊन समितीस पाठविण्यात येईल असे जिल्हाधिकारी यांनी समितीला आश्वासित केले तथापि,

अद्याप अहवाल तयार होईपर्यंत समितीस माहिती प्राप्त झालेली नाही. तसेच रायगड जिल्ह्यामध्ये दुर्लक्षित प्रकरणे नाहीत. रस्त्याची दिशा बदलण्यामुळे, शेतकऱ्यांची घरे वाचवण्याकरिता या कामास वेळ लागला आहे, हे काम या आठवड्यामध्ये पूर्ण करु असेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस आश्वासित केले. तथापि, या कामाच्या सद्य:स्थितीची माहिती समितीस प्राप्त झालेली नाही.

१४.२९ अक्सा, नागाव येथील पूलाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे काय, असे समितीने विचारले असता, अक्सा बीच येथील पूलाचे काम पूर्ण झालेले आहे. पूलाच्या पोचमार्ग रस्त्याला भराव टाकावा लागणार आहे. मात्र तेथे आता तिवरांची झाडे उगवली आहेत. पूर्वी माती काम करावयाचे होते व त्या करिता ६० लाख रुपये लागणार होते. आता त्या कामासाठी २ कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून तो प्रस्ताव देखील पुढे पाठवला जाणार आहे, तसेच कामाची किंमत वाढली असली तरी देखील या कामाचे प्रोसेस करण्याचे आश्वासन विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिले.

१४.३० कोकणातील पूलांची अवस्था अतिशय वाईट आहे. सध्या किती पुलांची कामे शिल्लक राहिली आहेत ? अशी समितीने विचारणा केली असता, एकूण ४ प्रस्ताव नाबार्डकडे पाठविले आहेत. राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देण्यासाठी काही प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आले आहेत. तसेच उर्वरित ३ पूलांचे काम टप्प्याटप्प्याने पूर्ण केले जाणार आहे. दाभोळ व जयगडचा प्रस्ताव नंतर पाठविला जाणार आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी प्रतिपादित केले. बाणकोट ते हरिहरेश्वर या रस्त्याचे काम कधी सुरु होईल व माजगाव हे एक पर्यटन केंद्र आहे. तेथील रस्त्याची दुरुस्ती केली पाहिजे. ५ ते ६ कोटी रुपये खर्च केल्यास तेथील काम होऊ शकेल याविषयी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी कामे पूर्ण करण्याबाबत कार्यवाही केली जाईल, असे सांगितले.

१४.३१ ज्या ठिकाणी पूलाची कामे सुरु आहेत, त्या करिता सीआरझेडची परवानगी घेतली आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, कामे पूर्ण करण्याच्या संदर्भात कोस्टल मॅनेजमेंटकडे पाठपुरावा सुरु आहे. शासनाच्या नवीन धोरणामुळे ही परवानगी लवकरात लवकर मिळेल. तसेच जोड रस्त्याची कामे पूर्ण करण्याबाबत देखील पाठपुरावा केला जाईल.

१४.३१ कोयना, मागोठणे येथील भूसंपादनाच्या फरकाची रक्कम बरीच जास्त आहे. त्यावेळी लोकांना ७५ लाख रुपये देण्याचे ठरले होते. मात्र आता बराच कालावधी गेल्यामुळे रक्कम वाढवून द्यावी अशी लोक मागणी करतील. त्यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, आता रस्त्याची रचना बदलली जाणार आहे. येथील काही जमीन टाटा कंपनीने संपादित केलेली आहे, ही जमीन शासनास देण्याची त्यांची तयारी आहे. त्यांना देखील या रस्त्याचा उपयोग होणार आहे.

१४.३५ याच अनुषंगाने समितीने सचिवांच्या निदर्शनास आणून दिले की, रेवस येथे एक ब्रिटीशकालीन पूल पडला आहे. त्याची तात्काळ दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे, असे समितीने प्रतिपादन केले असता या पूलाचे काम सुरु केलेले आहे. हे काम निधी अभावी थांबलेले नाही. १५ ते २० दिवसांमध्ये स्लॅब लेव्हलपर्यंत काम येईल, असे विभागीय प्रतिनिधींनी आश्वासन दिले. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, अलिबाग, मुरुड ही चांगली पर्यटन स्थळे आहेत. त्यांचा विकास केला पाहिजे. येथील रस्त्यांचा विकास केला पाहिजे. तसेच जिल्हापरिषद अध्यक्ष, पंचायत समितीचे सभापती तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांना स्थानिक कार्यक्रमासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी बोलाविले पाहिजे. मात्र कोणालाही आमंत्रित केले जात नाही, अशी तक्रार आहे. त्यावर विभागीय प्रतिनिधींनी आश्वासित केले की, यापुढे जिल्ह्यातील कार्यक्रमांना सर्वांना आमंत्रित केले जाईल.

१४.३६ समितीने पुढे या परिच्छेद संदर्भात स्पष्टीकरणात्मक ज्ञापने समितीला बैठकीच्या दिवशी सुद्धा न पाठविण्याऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कडक कारवाई केली आहे याची समितीला माहिती देण्यात यावी. त्यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, या संदर्भात चौकशी सुरु असून सदर ज्ञापने संमत करण्याकरिता महालेखाकार कार्यालयात पाठविण्यात आलेली आहेत. सदर ज्ञापने संमत अद्याप व्हावयाची आहेत, म्हणून ती ज्ञापने समितीकडे पाठविण्यात आली नाहीत.

१४.३७ समितीने विभागाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, १० वर्षापूर्वीचे काम पूर्ण करण्यासाठी समितीला अशा प्रकारची बैठक आयोजित करावी लागणे ही बाब काही बरोबर नाही. यासंदर्भात विभागाने योग्य तो पाठपुरावा करून सदर काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे, एवढीच समितीची अपेक्षा आहे. आज संगणकीकरण झालेले आहे. त्याचा

देखील विभागाने योग्य तो उपयोग केला पाहिजे. विकासाच्या कामाला विभागाने गती देण्यासाठी योग्य ती पावले उचलली पाहिजेत. सदर प्रश्न रायगड जिल्ह्यातील आहे. त्यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींशी संपर्कात राहून काम पूर्ण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एखादे काम २०-२० वर्षे पूर्ण होत नसेल तर, हे काही योग्य नाही. याविषयाच्या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभाग, महसूल विभाग यांनी गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

**अभिप्राय व शिफारशी -**

१४.३८ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेदावर महालेखापालांनी आक्षेप घेतले होते. महालेखापालांच्या आक्षेपांची पूर्तता ५-५ वर्षे होवून देखिल करण्यात येत नाही असे समितीस बैठकीचेवेळी निदर्शनास आले. लोकलेखा समितीस विनाविलंब सर्व माहिती सादर करावी तसेच महालेखाकार यांच्या कार्यालयाकडून विहित कालावधीत स्पष्टीकरणात्मक ज्ञापने संमत करुन घ्यावीत अशा प्रकारच्या सूचना वेळोवेळी शासनाने सर्व मंत्रालयीन विभागांना केलेल्या आहे असे असताना देखिल, **भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या नागरी अहवालातील सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधीत परिच्छेद विहित मुदतीमध्ये महालेखाकार यांच्या कार्यालयाकडून तपासून घेवून त्याची स्पष्टीकरणात्मक ज्ञापने लोकलेखा समितीस सादर करण्यात येत नसल्यामुळे समितीने याप्रकरणी तीव्र नापसंती व्यक्त केली व याबाबत जे अधिकारी जबाबदार असतील त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

१४.३९ शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने रेवस-पोयनाड-नागोठणे रस्ता राज्य महामार्ग क्रमांक ८६ यावर मानकुले अणि धेरंड यामध्ये एका मोठ्या पुलाच्या बांधकामासाठी रु.८.४७ कोटीची प्रशासकीय मान्यता सन १९९७ मध्ये दिली. मुख्य अभियंता, मुंबई, मुंबई प्रदेश यांनी पुलाच्या बांधकामावर रु.२.४९ कोटी खर्च करण्याकरिता, पुलाच्या पोहोच मार्गाकरिता, आवश्यक असलेली जमीन उपलब्ध करुन घेतली आहे की नाही याची शहानिशा न करता, तांत्रिक मान्यता जून १९९९ मध्ये दिली. तथापि, पोहोच मार्गाविना पूल विनावापर पडून आहे.

१४.४० पोहोच मार्गाच्या कामास स्थानिक लोकांचा विरोध असल्यामुळे कोणतेच काम झ ाले नाही. हा प्रश्न सोडविण्यासाठी विभागाने स्थानिक लोकप्रतिनिधीची कोणतीही मदत घेतली नाही. लोकप्रतिनिधी हा सरकारी अधिकारी आणि जनता यातील दुवा असतो. मतदार संघातील रखडलेली कामे निकालात काढण्याचे उद्दिष्ट्य हे लोकप्रतिनिधीचे असते. **सध्या प्रस्तावित असलेल्या पोहोच रस्त्याच्या मार्गात थोडा बदल केला तर लोकांची घरे जात नाहीत व जमिनीचे संरक्षण होते. सन १९३५ पासून या भागात रस्ता नसल्याचे तसेच जागा बदलल्यास पोहोच रस्त्यास लोकांची हरकत नसल्याचे समिती सदस्यांनी सांगितले. तीन-तीन वर्षे शासकीय कामाची संयुक्त मोजणी सुद्धा होवू शकली नाही ही खेदाची बाब आहे. त्यामुळे या कामामध्ये कोणाकडून दिरंगाई झालेली आहे व त्यांच्यावर काय कारवाई केली आहे याची सविस्तर माहिती समितीला देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

१४.४१ रायगड जिल्ह्यातील सन १९९७ पासूनचे पोहोच मार्गाचे प्रकरण असून आज २०११ हे वर्ष सुरु आहे. केवळ आठ-दहा घरांचाच प्रश्न असताना अद्यापपर्यंत पोहोच मार्गासाठी भूसंपादन झाले नाही. लोकांची सध्याच्या प्रस्तावित रस्त्याची जागा बदलण्याची विनंती मान्य केल्यास प्रश्न तातडीने मार्गी लागू शकतो. याबाबत **जिल्हाधिकारी, रायगड यांनी लोकप्रतिनिधीशी चर्चा करुन ताबडतोब संयुक्त मोजणी करुन भूसंपादनाची कार्यवाही करुन एक आठवड्याच्या आत समितीला अहवाल सादर करण्याचे आश्वासित करुनही अद्याप समितीला माहिती प्राप्त झाली नसल्याने समिती याप्रकरणी तीव्र नापसंती व्यक्त करते व आश्वासित माहिती विलंबाने पाठविण्याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्याची चौकशी करुन त्यांचेविरुद्ध योग्य ती कारवाई करण्यात यावी तसेच रस्त्यासाठी आवश्यक असलेल्या जमिनीची संयुक्त मोजणी करुन भूसंपादनाची कार्यवाही तातडीने करावी व या संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला द्यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

## आदिवासी विकास विभाग

**१५. विजेच्या पंपावरील निष्फळ खर्च :-**

१५.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालामधील **परिच्छेद क्र.४.३.५ "विजेच्या पंपावरील निष्फळ खर्च"** या संदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले.

**कार्यान्वीत न होणाऱ्या विजेच्या पंपावर केलेला रु.१७.६७ कोटीचा निष्फळ खर्च :-**

१५.२ शासनाने आयुक्त, आदिवासी विकास विभागातर्फे आदिवासी शेतकऱ्यांना वीज पंप संच पुरविण्याची योजना सुरु केली (१९७३). पंप सेट्स बसविण्याची व त्यासाठी वीज पुरवठा महाराष्ट्र राज्य वीज मंडळातर्फे करण्याची जबाबदारी आदिवासी विकास महामंडळावर सोपविण्यात आली (जुलै ९२). एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी यांनी याबाबतचे सर्व सोपस्कार पूर्ण झाल्याची खात्री करुन घ्यावयाची होती आणि आदिवासी विकास विभागाचे अतिरिक्त आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीने लाभधारकांना पंप सेटस् सुपूर्द करण्याची मंजूरी देण्यापूर्वी त्यांचेकडून आलेल्या अर्जाची छाननी करावयाची होती.

आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांचे अभिलेख्यांची छाननी व मिळविलेल्या माहितीवरुन (जून २००६) पुढे असे दिसून आले की, विभागाने १९९९-२००० आणि २००२-२००३ या दरम्यान १६,८१५ वीजेचे पंप सेटस्ची खरेदी करुन त्यांचे वाटप केले होते. त्यापैकी १७.६७ कोटी किंमतीचे ११,८६७ पंप सेटस् मे २००६ पर्यंत कार्यान्वीत झाले नव्हते. आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांनी वीज जोडणीकरीता सादर केलेल्या ७,५८८ प्रकरणी महाराष्ट्र राज्य वीज मंडळाने मागणी पत्रास मंजूरी दिली नव्हती, ३,९१२ प्रकरणी महाराष्ट्र राज्य वीज मंडळाने सर्व सोपस्कार पूर्ण केल्यानंतरही वीज पुरवली नव्हती आणि ३६७ पंप आदिवासी विकास महामंडळाकडे काही लाभधारकांचा मृत्यु झाल्यामुळे तर काहींची बदली झ ाल्यामुळे तसेच पडून होते. जरी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या दिनांक ३१ मार्च, २००० रोजी संपलेल्या वर्षाच्या अहवालात अशाच प्रकारच्या नोंदी घेतल्या होत्या तरी विभागाने वीज पंप सेट्सचा पुरवठा २००३-०४ पर्यंत चालू ठेवला होता. लोकलेखा समितीने त्यांच्या २००३-०४ च्या १३ व्या अहवालात अशी शिफारस केली होती की, मार्च २००४ पर्यंत सर्व वीज पंप सेटस् कार्यान्वीत व्हावयास पाहिजेत आणि त्यासंबंधातील कार्यवाही अहवाल

लोकलेखा समितीस एप्रिल २००४ पर्यंत सादर व्हावयाचा होता. तथापि लोकलेखा समितीच्या शिफारशी असून सुद्धा १९९९-२००० आणि २००२-०३ या दरम्यान प्राप्त केलेले ११,८६७ वीज पंप सेटस् अकार्यान्वीत राहिले. परिणामी रु.१७.६७ कोटीचा खर्च वाया गेला.

आयुक्तांनी असे उत्तर दिले (नोव्हेंबर २००५) की, २००३-२००४ आणि २००४-२००५ या वर्षात महाराष्ट्र राज्य वीज मंडळास रु.३५.४३ कोटी सर्व वीज पंप सेटस् कार्यान्वीत करण्यासाठी मंजूर केले होते आणि ही बाब गतीशील करण्यासाठी उच्चस्तरीय बैठका (जून २००४, जुलै २००५ आणि ऑक्टोबर २००५) बोलावल्या होत्या.

दिलेले उत्तर स्वीकारता येत नव्हते कारण लोकलेखा समितीने शिफारशी केल्या असतानासुद्धा वीज पंप सेटस् अकार्यान्वीत राहिले होते.

सदर बाब शासनाचे सचिव यांना मे २००६ मध्ये कळविण्यात आली होती. अद्याप उत्तर नाही. (ऑक्टोबर २००६)

**ज्ञापन :**

**१५.३** अकार्यान्वीत व कार्यान्वीत वीजपंपाची तुलनात्मक स्थिती (पंप संख्या) पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | माहे जून, २००६ अखेर स्थिती | जानेवारी २००८ अखेर स्थिती | दरम्यानचे काळातील प्रगती |
|---|---|---|---|---|
| १ | एकूण अकार्यान्वीत पंप संख्या | १५,३५२ | ११,४२७ | ३,९२५ |
| २ | वीज मंडळाकडून डिमांडनोट देणे बाकी | ७,७८० | ६,१६३ | १,६१७ |
| ३ | सर्व पूर्तता होऊनही वीज पुरवठा बाकी | ६,३०० | ४,२८१ | २,०१९ |

वरील तुलनात्मक स्थितीवरुन निदर्शनास येईल की, माहे, २००६ एकूण अकार्यान्वीत असलेल्या पंप संख्येमध्ये माहे जानेवारी, २००८ अखेर घट झालेली असून त्या दरम्यान एकूण ३९२५ अकार्यान्वीत वीजपंप प्रत्यक्ष कार्यान्वीत झालेले आहेत. तसेच वीजमंडळाकडून एकूण

१६१७ वीज पंपाकरिता मागणीपत्रे देण्यात आली आहेत. त्यामुळे सर्व सोपस्कार पुर्ण केल्यानंतरही वीज पुरवठा बाकी असलेल्या पंप संख्येत घट झाल्याचे स्पष्ट होईल.

विभागाने वीज पंप सेटचा पुरवठा सन २००२-२००३ नंतर थांबवलेला असून २००३-२००४ ते आजतागायत म्हणजे सन २००७-२००८ पर्यंत एकही वीजपंप मंजूर केलेला नाही. या वस्तुस्थितीची कृपया नोंद व्हावी.

वीज पंपसेट अकार्यान्वीत राहण्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत :-

१) वीज मंडळाचे पातळीवर वीज पुरवठ्यासाठी आवश्यक असणारे साहित्य उदा. वीजेचे खांब, उच्च दाबाच्या तारा, डी.पी.या साहित्याची कमतरता. त्यामुळे मागणीपत्र निर्गमित न करणे.

२) आदिवासींचे पंपाकरिता वीज मंडळाकडून सुसाध्यता प्रमाणपत्रे आणि नजिकचे भविष्यात पंपांना वीज पुरवठा मिळण्याबाबत हमी देऊन सुद्धा वीज मंडळाकडे प्रचलित तंत्र सुधारणा व विकासासाठी पुरेसा निधी उपलब्ध नसणे.

३) राज्यातील ग्रामीण, शहरी आणि औद्योगिक क्षेत्राकडून वीजेची सातत्याने वाढती मागणी असुन सुद्धा पुरेसे वीज उत्पादन नसणे. परिणामी राज्यात सातत्याने लोडशेडिंग असणारी स्थिती.

त्यामुळे लोकलेखा समितीने शिफारशी केल्या असतांना सुद्धा केवळ वरील वस्तुस्थिती मुळेच वीजपंप अकार्यान्वीत राहिले आहेत. आदिवासीच्या वीज पंपास लवकरात लवकर वीज पुरवठा व्हावा या हेतूने आदिवासी विकास आयुक्तालयाकडून सन २००३-२००४ ते २००५-२००६ दरम्यान एकूण रुपये ६४३६.१७ लक्ष इतका विवक्षित निधी वीज मंडळास प्रत्यक्ष उपलब्ध करुन दिला आहे. त्यामुळे गत ३ वर्षात खालील संख्येचे वीजपंप कार्यान्वीत झालेले आहेत.

| अ.क्र. | वर्ष | वर्षात एकूण कार्यान्वीत पंप संख्या |
|---|---|---|
| १ | १ एप्रिल, २००४ ते ३१ मार्च, २००५ | १,७११ |
| २ | १ एप्रिल, २००५ ते ३१ मार्च, २००६ | १,८९६ |
| ३ | १ एप्रिल, २००६ ते ३१ मार्च, २००७ | २,६१७ |
| ४ | १ एप्रिल, २००७ ते जानेवारी, २००८ | १,९६६ |

तसेच याबाबत वेळोवेळी उच्चस्तरीय बैठका घेऊन अकार्यान्वीत वीज पंपास लवकरात लवकर वीज पुरवठा व्हावा या हेतूने पाठपुरावा करण्यात येत आहे.

**साक्ष :**

**१५.४** उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात समितीने दिनांक २ फेब्रुवारी, २०११ रोजी प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग व प्रधान सचिव, उर्जा विभाग यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सन १९९९-२००० व २००२-२००३ दरम्यान १६,८१५ वीज पंप संचाचे वाटप केले. त्यापैकी ११,८६७ पंप संच मे, २००६ पर्यंत कार्यान्वीत झाले नव्हते. ७,५८८ प्रकरणी वीज मंडळाने मागणीपत्रास मंजूरी दिली नव्हती, ३,९१२ प्रकरणी वीज मंडळाने सोपस्कार पूर्ण होऊनही वीज पुरवली नव्हती, तर ३६७ पंप आदिवासी विकास महामंडळाकडे पडून होते. अशा प्रकारच्या नोंदी महालेखापालांच्या अहवालात घेतल्या असतांनाही विभागाने सन २००३-२००४ पर्यंत वीज पंप संचाचा पुरवठा चालूच ठेवला या प्रकरणी कोण जबाबदार आहे ? याबाबत विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली की, सन २००२-२००३ मध्ये आदिवासी उप योजनेअंतर्गत तेल इंजिनचे व विजेच्या पंपाची योजना सुरु होती. ही योजना मागासवर्ग कल्याण निधीच्या माध्यमातून पूर्ण केली जाते. ज्या शेतकऱ्यांना विजेची जोडणी सन २००२ मध्ये शेती पंप खरेदी केल्यानंतर २००४ पर्यंत ही योजना चालू असेपर्यंत मिळाली नाही. अशा शेतकऱ्यांचे व आदिवासी शेतकऱ्यांचे शेती पंप प्रलंबित राहिलेले आहेत.

१५.५ ऊर्जा विभागाने सभागृहामध्ये तर असे सांगितले होते की, आमच्याकडे कोणत्याही शेतीच्या पंपांची जोडणी प्रलंबित नाही. दुर्गम भागातील काही ठिकाणी विजेच्या पंपांची विद्युत जोडणी प्रलंबित आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता, ऊर्जा विभागांच्या सचिवांनी समितीस असे सांगितले की, दिनांक ३१ मार्च, २०१० रोजी १,८९,००० याप्रमाणे ठेकेदारांना प्रत्येक भागामधील जोडणीची कामे पूर्ण करण्याकरिता कंत्राट दिलेले आहे. सदरहू कामे दिनांक ३१ मार्च, २०११ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहेत. ऊर्जा विभागाने दिनांक ३१ मार्च, २०१० नंतर धडक कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागातील आणि दुर्गम भागातील शेतकऱ्यांना आवश्यकतेप्रमाणे शेतीपंपाकरिता विजेच्या जोडण्या देण्यास सुरुवात केलेली आहे.

१५.६ या संदर्भात समितीने असे मत व्यक्त केले की, सन १९९९ ते २०११ पर्यंत एकूण १० ते ११ वर्षापासून आदिवासी व शेतकऱ्यांच्या विजेच्या जोडण्यांना प्राधान्य आणि

डी.पी.डी.सी. अंतर्गत सवलतीची तरतूद असतांनाही शेतकऱ्यांनी किंवा आदिवासी शेतकऱ्यांनी शेतीपंप विकत घेतल्यानंतरही चार ते पाच वर्ष विद्युत जोडण्या दिल्या जात नाहीत, हे राज्याच्या दृष्टीने प्रगतीचे लक्षण नाही. दिनांक ३१ मार्च, २०११ पर्यंत आदिवासी शेतकऱ्यांचे आणि शेतकऱ्यांच्या शेतीपंपाकरिता लागणाऱ्या विद्युत जोडणीची सर्व प्रलंबित कामे पूर्णपणे झाल्याचे आढळून येईल. यावर सचिव, उर्जा यांनी असे सांगितले की, मागील तीन वर्षांमध्ये महावितरणाच्या धडक कार्यक्रम योजनेअंतर्गत एकूण चार ते साडेचार हजार विद्युत जोडण्यांची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. आदिवासी विकास महामंडळाची आणि महावितरणाची विद्युत जोडण्यांच्या प्रलंबित कामांची संख्या जुळत नसून त्यामध्ये तफावत येत असल्याचे समितीने निदर्शनास आणले असता, विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, महावितरणाची प्रलंबित जोडण्यांची संख्या १२८७ असून महामंडळाची संख्या ३०२५ अशी आहे. यामध्ये या संख्येमधील तफावतीची कारणमीमांसा करुन ही माहिती समायोजित करुन घेऊ. विद्युत जोडण्यांचे जे कंत्राट खाजगी ठेकेदारांना देण्यात आले होते. त्याबाबत विभागाने अशी माहिती दिली की, खाजगी ठेकेदाराला तालुका व ग्रामीण पातळीवर शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे व आवश्यकतेप्रमाणे शेती पंपांच्या विद्युत जोडणीचे काम देण्यात आले होते. या कामांमध्ये १,८९,००० विद्युत जोडण्या याप्रमाणे प्रत्येक तालुका व ग्राम पातळीवर काम खाजगी ठेकेदारांवर सोपविण्यात आले होते. परंतु मध्यंतरीच्या काळामध्ये या ठेकेदारानी शेतकऱ्यांचे पंप बसविण्याच्या कामाचा वेग अतिशय कमी केला होता.

१५.७ शेती पंप आणि त्यांना देण्यात येणाऱ्या विद्युत जोडणीचे काम जरी ठेकेदारी पद्धतीने करण्यात आलेले असले तरी ही सर्व कामे पूर्ण झालेली आहेत काय ? समितीकडे अशाही तक्रारी आहेत की, विद्युत कर्मचारी, कार्यकारी अभियंता ते वायरमन पर्यंत कोणतेही अधिकारी व कर्मचारी तालुका किंवा ग्राम पातळीवर त्यांच्या कामाच्या ठिकाणी उपस्थित किंवा सेवेस हजर नसतात. ते कामाच्या ठिकाणी फक्त सहीकरिता येतात आणि त्यांच्या उपस्थितीची नोंद झाल्यानंतर ते परत शहराच्या ठिकाणी मुक्कामाकरिता जातात. त्यांची नेमणूक ग्रामीण पातळीवर असतांनाही त्यांचा मुक्काम हा शहरी भागातच आहे. मीटर बंद असतात, वीजेच्या तारा तुटलेल्या असतात, या सर्व समस्यांकडे वायरमनपासून ते कार्यकारी अभियंत्यापर्यंत कोणीही वीज कर्मचारी व अधिकारी लक्ष देऊन शेतकऱ्यांचा समस्यांचे निवारण करीत नाही.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे कर्मचारी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या समस्यांकडे त्या निवारण्याच्या दृष्टीकोनातून गांभीर्याने लक्ष घालत नाहीत. यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, परिमंडळ मुख्य अभियंता, मुख्य अभियंता, एस.ई. या सर्वांना महावितरणाने ग्रामीण पातळीवर व तालुका पातळीवरील वीज ग्राहकांच्या समस्यांकडे जातीने लक्ष देऊन त्या निवारण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. तरीही यासंदर्भात जर काही अनियमितता असेल तर ती तपासून त्याविरुद्ध कारवाई केली जाईल.

१५.८ यावर समितीने अशी विचारणा केली की, नागरिक व शेतकरी यांच्या तक्रारींकडे परिमंडळ अधिकारी लक्ष देत नाही, अशा अनेक तक्रारी महावितरणाकडे येत आहेत. सन १९९९-२००० व सन २००२-२००३ दरम्यान आदिवासी शेतकऱ्यांना पुरविलेले १,११,८६७ वीज पंप कार्यान्वीत न झाल्यामुळे विजेच्या पंपावर रु.१७.६७ कोटींचा खर्च वाया गेला, या महालेखापालांनी काढलेल्या आक्षेपावर खुलासा करावा. तसेच विद्युत जोडणी व त्यांच्या कार्याबाबत सन्माननीय सदस्यांच्या अनेक तक्रारी आहेत. महावितरणाचे कर्मचारी किती दिवसांमधून त्या ठिकाणी भेट देत असतात ? यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, दर आठ दिवसांनी महावितरणाचे कर्मचारी संबंधित ठिकाणी भेट देत असतात. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या विभागीय अधिकाऱ्यांना आता अशा सूचना देण्यात येतील की, ज्या ठिकाणी नागरिकांच्या अनेक समस्या तक्रारी आहेत, त्या ठिकाणी अचानक भेट देऊन संबंधित कर्मचारी त्या समस्या सोडवित आहेत का ? संबंधित ठिकाणी ते नियमित भेटी देत आहेत का ? याबाबतची माहिती घेण्यात यावी.

१५.९ सन १९९९ ते २००४ पर्यंत शेती पंपांचे वाटप चालू होते. तरीही या पंपाकरिता विजेच्या जोडण्या मात्र शेतकऱ्यांना अद्यापही पूर्णपणे मिळालेल्या नाहीत. अशी समितीने अशी विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी असे सांगितले की, १९९९ पासून शेती पंप वितरणाची योजना चालू होती. सन २००४ पर्यंत काही शेतकऱ्यांना शेती पंप वितरणाचे राहून गेले होते. त्यांनाही शेती पंप वितरीत करण्यात येत आहेत. शेतकऱ्यांना पंपाचे वितरण त्यांच्या मागणीप्रमाणे व आवश्यकतेप्रमाणे करण्यात आले होते की, जबरदस्तीने त्यांच्यावर पंप खरेदी लादण्यात आली होती ? काही शेतकऱ्यांना विजेची जोडणी नसतांनाही त्यांना जबरदस्तीने शेतीपंप खरेदी करण्यास भाग पाडले होते. त्यांनी शेती पंप खरेदी केल्यानंतरही चार ते पाच

वर्ष त्यांना विजेच्या जोडण्या देण्यात आल्या नव्हत्या. काही शेतकऱ्यांनी गरजेपोटी ते शेती पंप बाजारात नेऊन विकून टाकले आहेत. उर्जा विभागाच्या सचिवांनी विभागीय पातळीवरील शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे आणि तक्रारींकडे विशेष लक्ष देऊन त्यांच्या समस्या निवारण करण्याकरिता आवश्यक त्या सूचना द्याव्यात, अशी समितीने सूचना केली.

१५.१० शेतकऱ्यांच्या वीज पंप वाटपासंदर्भात सचिवांनी असा खुलासा केला की, शेतकऱ्यांना वीज पंपाचे वाटप करण्यात आले होते पण विद्युत जोडणी करण्यात आली नव्हती. शेतकऱ्यांची मागणी होती. विजेचे पंप संच पुरविण्याची योजना सन १९७२-७३ पासून सन २००३ पर्यंत सुरु होती. पण शेतकऱ्यांना विद्युत जोडणी न दिल्यामुळे २००३-२००४ पासून ही योजना बंद करण्यात आली. यावर समितीने अशी विचारणा केली की, आता पर्यंत किती वीज पंप संचांची खरेदी करण्यात आली, त्यापैकी किती वीज पंप संचाचे शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले आणि त्यामुळे आदिवासी क्षेत्रातील किती क्षेत्र सिंचनाखाली आले ? तसेच डिझ ेल पंप आणि वीज पंप संचाचे वाटप किती शेतकऱ्यांना करण्यात आले आणि त्यामुळे किती क्षेत्र सिंचनाखाली आले ? यावर वीज पंपाचे वाटप बंद असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

१५.११ आदिवासी विकास विभागाने गेल्या अनेक वर्षापासून डिझेल पंपाचे आणि वीज पंपाचे वाटप केलेले आहे त्यामुळे आदिवासी क्षेत्रातील सिंचनाच्या प्रमाणात किती टक्क्यांनी वाढ झालेली आहे आणि या योजनेंतर्गत एकूण किती खर्च झालेला आहे ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागाने अशी माहिती दिली की, आदिवासी विकास विभागामार्फत सन १९७३-७४ पासून विजपंप/तेलपंप पुरविण्याची योजना आदिवासी शेतकऱ्यांची जास्तीत जास्त जमीन ओलिताखाली आणून आर्थिक विकास साधण्याच्या दृष्टीने १०० टक्के अनुदानावर राबविली जात आहे. सन १९७३-१९७४ ते १९७९-१९८० या कालावधीत सरासरी सिंचनाखाली क्षेत्र एकूण १८,९५४ एकर एवढे होते. त्यामध्ये सन २००९-२०१० पावेतो २,६७,७२९ एवढी वाढ झाली आहे. सदर वाढ १४ पट (१४१२.५१%) एवढी आहे. तसेच या योजनेकरिता सन २००९-२०१० पर्यंत रु.२२७.३६ कोटी एवढा खर्च झालेला आहे.

**१५.१२** समितीने अशी माहिती विचारली की, विधानसभेमध्ये आदिवासी उपयोजना तसेच आदिवासी घटक योजनांच्या संदर्भात चर्चा होते. या योजनांच्या अंमलबजावणीसाठी

केलेल्या तरतूदी एक तर संपत नाही किंवा त्या शिल्लक राहतात, किंवा त्यावर कट लावला जातो. याबाबतीत आदिवासी विकास विभागाचा अनुभव काय आहे ? अंदाजपत्रकामध्ये जेवढ्या पैशांची तरतूद करण्यात येते ते सगळे पैसे खर्च होतात काय ? आश्रमशाळा असतील, विशेष घटक योजना असतील, विद्यार्थ्यांकरिता योजना असतील, शेतकऱ्यांकरिता योजना असतील या सर्व योजना फक्त कागदोपत्री तयार करण्यात येतात. प्रत्यक्षात या योजनांवर जो खर्च व्हायला पाहिजे तो होत नाही. त्यामुळे या योजनांचा १०० टक्के निकाल मिळाला नाही तरी किमान ८० ते ९० टक्के निकाल मिळाला पाहिजे असे विभागाला वाटते काय ? आदिवासी विकास विभागाच्या प्रधान सचिवांनी आदिवासी विकास विभागाच्या कामांची माहिती देताना आदिवासी विकास विभागाचा दरवर्षीचा योजनांतर्गत खर्च लोकसंख्येच्या प्रमाणात ९ टक्के आहे. आदिवासी विभागाचे यावर अप्रत्यक्ष नियंत्रण आहे. त्यापैकी कधी ५० टक्के तर कधी ४० टक्के खर्च आदिवासी विकास विभागामार्फत करण्यात येतो. त्यानंतर जनजाती उप योजनेसाठी ट्रायबल सब प्लॅनसाठी आदिवासी विकास विभागाकडून निधी देण्यात येतो. तसेच अधिसूचित जनजाती विभागामध्ये सिंचन, रस्ते, आरोग्य आणि शिक्षण अशा वेगवेगळ्या कामासाठी त्या त्या विभागांना काही ठराविक निधी देण्यात येतो. ज्या ठिकाणी ५० टक्के लाभार्थी आदिवासी आहेत अशा ठिकाणीच सिंचनाचा कार्यक्रम घेण्यात येतो. त्यामुळे आदिवासी शेतकऱ्यांना नक्कीच या योजनेचा लाभ होतो.

१५.१३ आरोग्याच्या बाबतीत आदिवासी क्षेत्रात प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम, तेथील कर्मचाऱ्यांच्या वेतनावर आणि औषधावर खर्च करण्यात येतो. डॉक्टर्स आणि नर्स जागेवर रहात नाहीत ही तक्रार येथेही आहे. शाळा आणि शिक्षण या विषयाच्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यामार्फत पाहणी करण्यात आली आहे. त्यामध्ये आमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता आहे. आदिवासी मुलांच्या शिक्षणावर ६० वर्षे खर्च करुनही वर्ग-१ आणि वर्ग-२ च्या पदासाठी आदिवासी उमेदवार मिळत नाहीत ही अतिशय दुर्देवाची बाब आहे. म्हणून शिक्षण पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल करण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात येणार आहे. आश्रमशाळा कोणासाठी चालविण्यात येतात, आजपर्यंत या आश्रमशाळातील किती विद्यार्थी मोठ्या पदावर गेलेले आहेत, त्यांची किती प्रगती झालेली आहे ? याचा विचार केला तर ज्या

प्रमाणात पैसा खर्च होतो त्या प्रमाणात आदिवासींची प्रगती व्हायला पाहिजे होती तशी झाल्याचे दिसत नाही.

१५.१४ घरांसाठी जो खर्च करण्यात येतो तो ग्रामविकास विभागामार्फत करण्यात येतो. त्यासंदर्भात एक ठोस कार्यक्रम घेण्यात आलेला आहे. त्यामुळे लोकांना घरे बांधलेली दिसतात. ही घरे आदिवासी लाभार्थींना स्वत: बांधता यावीत यासाठी बांधकामाच्या प्रत्येक टप्प्यानुसार त्यांना पैसे देता येतील काय याचा विचार सुरु आहे. यासंदर्भात माननीय राज्यपालांना विनंती केलेली आहे. तसेच एक कार्यसत्र सुद्धा घेण्याचे ठरविले आहे. आदिवासींसाठी काम करणाऱ्या श्रीमती मेधा पाटकर व विधानसभेचे सन्माननीय सदस्य श्री.विवेक पंडित यांचेही यासंदर्भातील मत विचारात घेऊन या कार्यक्रमामध्ये काही बदल करता येईल काय आणि आदिवासींवर लक्ष केंद्रीत कसे करता येईल या विषयीची चर्चा करण्यात येणार आहे. शिक्षणक्षेत्रात आमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता आहे.

१५.१५ समितीने असे मत व्यक्त केले की, आदिवासी घटक योजनेच्या संदर्भात वेगळा निधी देण्यात येतो तो प्रत्यक्षात खर्च होतो काय ? आदिवासींसाठी डीपीडीसीच्या काही योजना आहेत, समाजकल्याण खात्याच्या काही योजना आहेत, सर्वशिक्षा अभियानाच्या अंतर्गत केंद्र सरकारच्या काही योजना आहेत. तसेच आदिवासींसाठी आदिवासी विकास विभागाचे अंदाजपत्रक आहे. आदिवासी विकास विभागामार्फत काही योजना राबविल्या जातात. या सर्व योजनांमध्ये समन्वयाचा अभाव आहे काय ? या सर्व योजनांचे संनियंत्रण व्यवस्थित होत आहे काय हे विभागाने तज्ञांना बोलावून यासंदर्भात एक अभ्यासगट तयार करावा. त्यासाठी लागणाऱ्या खर्चाला शासनाची मान्यता मिळेल. आदिवासी गावांना भेटी द्याव्यात आणि आदिवासींसाठी करण्यात आलेल्या योजना आदिवासीपर्यंत का पोहचत नाहीत. याची तेथील आदिवासींकडून माहिती घ्यावी. विद्युत पंपाचे वाटप करण्यात आल्यानंतर ते ३-३ वर्षे पडून का रहातात ? हे विद्युतपंप जरी १०० दिवस चालले असते. उन्हाळ्यात विद्युत पुरवठा होत नसला तरी आदिवासी शेतकऱ्यांना किमान एक पीक घेता आले असते. लोकप्रतिनिधी कितीही जागरुक असले तरी त्यांना जेवढे प्राधान्य मिळावयास पाहिजे तेवढे मिळत नाही. त्यामुळे आदिवासी योजनांपासून फार मोठा घटक वंचित राहत आहे. या अनुषंगाने बिगर सरकारी संस्था वा सेवानिवृत्त अधिकारी या सर्वांना एकत्रित बोलावून ८ ते १० दिवसांच्या कालावधीसाठी एखादे चर्चासत्र आयोजित करावे. तसेच आदिवासी योजनांसाठी असलेला निधी खर्च होण्यासाठी, पायाभूत सुविधेच्या काही पद्धती असतील त्यांची अंमलबजावणी कशी होऊ

शकेल या संदर्भात वेगळ्या पद्धतीने विचार झाला पाहिजे, यासाठी ठोस पावले उचलली पाहिजेत.

१५.१६ अनेक सन्माननीय सदस्य विधानसभेमध्ये आदिवासींच्या संदर्भात बोलत असतात. या संदर्भात चांगल्या पद्धती कार्यरत करुन त्यांची ५ ते १० वर्षांसाठी अंमलबजावणी केल्यास त्याचा आदिवासींसाठी फायदा होऊ शकतो. एकीकडे निधी उपलब्ध असणे, कार्यक्षम अधिकारी असतात आणि दुसरीकडे आदिवासींच्या घरांपर्यंत शिक्षणाची योजना पोहचत नाही, त्यांना औषधे मिळत नाहीत, आदिवासी भागांमध्ये मोठ्या प्रमाणात कुपोषणाचे प्रमाण वाढलेले आहे. आदिवासींसाठी जो खर्च होतो त्यात पायाभूत सुविधा आणि व्यक्तिगत लाभासाठी होत असलेल्या खर्चाचे प्रमाण काय आहे ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, आदिवासी भागामध्ये ८० टक्के खर्च पायाभूत सुविधा करण्यासाठी आणि उर्वरित २० टक्के व्यक्तिगत लाभासाठी खर्च केला जातो. तसेच त्या भागामध्ये ५० टक्के जमीन आदिवासींची असायला पाहिजे. अशा प्रकारे तेथे ५० टक्के आदिवासींचा प्रभाव आहे काय ? हे सुद्धा बघितले जाते. त्यानंतरच तेथील कामे केली जातात. समितीने अशी विचारणा केली की, आदिवासी भागांमध्ये रुग्णालय, कार्यालयीन इमारती बांधायच्या असल्यास त्यासाठी आदिवासी योजनेतून खर्च केला जातो. याउलट आदिवासीच्या व्यक्तिगत विकासासाठी केवळ २० टक्के रक्कम खर्च केली जाते. त्यामुळे पायाभूत सुविधा झाली परंतु आदिवासींचा व्यक्तिगत विकास न झाल्यास त्याला काही अर्थ राहणार नाही.

१५.१७ आदिवासींसाठी असलेल्या व्यक्तिगत लाभांच्या योजनांमध्ये वाढ होणे गरजेचे आहे. यासाठी तेथे ५० टक्क्यांपेक्षा जास्त आदिवासींची जमीन असणे अत्यावश्यक आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले असता, समितीने असे मत व्यक्त केले की, याचा अर्थ तेथे ५० टक्के आदिवासी आणि ५० टक्के बिगर आदिवासी असल्याशिवाय निधी खर्च होऊ शकत नाही. त्यामुळे एखाद्या आदिवासी क्षेत्रात ३९ ते ४९ टक्के आदिवासी असल्यास त्या क्षेत्रामध्ये निधी खर्च करता येत नाही. परिणामी तेथील आदिवासी लाभापासून वंचित राहतात. याबाबत विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, या संदर्भात भारत सरकारने डॉ.नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली आहे. तसेच आदिवासींसाठी संपूर्ण खर्च हा टीएसपी मधूनच करायचा ही संकल्पना चुकीची आहे. त्यामुळे आदिवासींचा विकास होऊ शकणार नाही. म्हणून या संदर्भात केंद्र शासनाकडून निर्णय घेतला जाणार आहे. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, आदिवासींसाठी अनेक चांगल्या योजना आहेत. परंतु एखाद्या क्षेत्रात १०० टक्के आदिवासीच असू शकतील असे नाही. ते इतरत्र विखुरलेले असतात. त्यामुळे अनेक आदिवासी योजनांपासून वंचित राहतात. नक्षलग्रस्त भागात प्रोत्साहन

भत्ता, तसेच वन स्टेप प्रमोशन इत्यादी बाबींसाठी आदिवासी विकास विभागाकडून दिल्या जाणाऱ्या निधी संदर्भात विभागीय सचिवांनी असे सांगितले की, प्रोत्साहन भत्ता हा वेतनाचा भाग आहे. तो संबंधित विभाग आपल्या निधीतून देत असतात. परंतु अतिदुर्गम भागात ज्या ठिकाणी माणसे पोहचू शकत नाहीत अशा ठिकाणी अपारंपारिक ऊर्जेच्या आधारे विद्युतीकरण करण्यात येईल असे सांगण्यात आले होते त्याबाबत माहिती द्यावी असे सांगितले असता यावर विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली, जेथे माणसे जाऊ शकत नाहीत ती सर्व ठिकाणांचा शोध घेऊन तेथे अपारंपारिक ऊर्जा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे. अतिदुर्गम भागातील गावे व त्यांना कधी पर्यंत विद्युतीकरण पूर्ण करण्यात येईल. याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

१५.१८ दिनांक ३० नोव्हेंबर, २००९ पर्यंत ३४० गावे आणि ६६७ वाड्या/पाडे येथे अपारंपारिक विद्युतीकरण करण्यात आले आहे. खालील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे ६ गावे आणि ६४ वाड्या/पाडे येथे अपारंपारिक विद्युतीकरणाचे काम सुरु असून ते मार्च-२०११ पर्यंत पूर्ण करण्यात येईल.

| **अ.क्र.** | **विभागाचे नाव** | **जिल्ह्याचे नाव** | **एकूण गावे** | **एकूण वाड्या/पाडे** |
|---|---|---|---|---|
| १ | अमरावती | अमरावती | ०४ | ०१ |
| २ | नागपूर | चंद्रपूर | ०० | २२ |
| ३ | नाशिक | नंदुरबार | ०२ | २१ |
| ४ | पुणे | पुणे | ०० | १२ |
| ५ | ठाणे | रायगड | ०० | ०८ |
| | | **एकूण** | **०६** | **६४** |

प्रसंगत: असेही निदर्शनास आणण्यात येते की, उर्वरित १ गाव आणि ४२ वाड्या/पाडे यामध्ये अपारंपारिक विद्युतीकरणाचे काम महाऊर्जामार्फत हाती घेण्यात येणार असून ते आर्थिक वर्ष २०११-२०१२ मध्ये पूर्ण करण्यात येणार आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

१५.१९ शासनाने सन १९७३ मध्ये आदिवासी शेतकऱ्यांना वीज पंप संच पुरविण्याची योजना सुरु केली. हे वीज पंप संच बसविण्याची व त्यासाठी वीज पुरवठा महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातर्फे पुरविण्याची जबाबदारी आदिवासी विकास महामंडळावर सोपविण्यात आली होती. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी यांनी याबाबतचे सर्व सोपस्कार पूर्ण झाल्याची खात्री करुन द्यावयाची होती. समितीपुढे आलेल्या माहितीवरुन असे दिसून आले

की, सन १९९९-२००० व २००२-२००३ दरम्यान १६,८१५ वीज पंप संचांचे वाटप केले. त्यापैकी ११,८६७ वीज पंप संच मे, २००६ पर्यंत कार्यान्वीत झाले नव्हते. ७५८८ प्रकरणी वीज मंडळाने मागणी पत्रास मंजूरी दिली नव्हती व ३९१२ प्रकरणी वीज मंडळाने पूर्ण सोपस्कार होवूनही वीज पुरविली नव्हती. तर ३६७ पंप संच आदिवासी महामंडळाकडे पडून होते.

१५.२० आदिवासी हा घटक समाजातील कमकुवत घटकांपैकी आहे. आदिवासी क्षेत्राचा तसेच या क्षेत्रामध्ये राहणाऱ्या आदिवासींचा सर्वांगिण विकास होणे आवश्यक आहे. आदिवासी विकासाच्या विविध योजना राज्य व केंद्र शासनाकडून राबविण्यात येतात. या योजनांपैकी आदिवासी शेतकऱ्यांना वीज पंप/तेल पंप पुरविणे ही एक योजना होय. सन १९७३-१९७४ पासून ही योजना शासनाकडून राबविण्यात येत असून ३ दशके उलटून गेली तरी अद्यापपर्यंत सर्व आदिवासी शेतकऱ्यांना वीज पंप पुरविण्यात शासनास यश आलेले नाही. समितीसमोर आलेल्या माहितीमध्ये सन १९९९ ते २०११ पर्यंत एकूण १० ते ११ वर्षापासून आदिवासी व **शेतकऱ्यांच्या विजेच्या जोडण्यांना प्राधान्य आणि डि.पी.डी.सी. अंतर्गत सवलतीची तरतूद असताना आदिवासी शेतकऱ्यांनी शेतीपंप विकत घेतल्यानंतरही चार ते पाच वर्षे विद्युत जोडण्या दिल्या जात नाहीत. ही अतिशय खेदजनक बाब आहे. अशा प्रकारे आदिवासींना त्यांच्या हक्कांपासून वंचित ठेवून त्यांचा विकास खुंटत आहे. याबाबत समितीने तीव्र शब्दात नापसंती व्यक्त केली. तरी आदिवासी शेतकऱ्यांच्या वीज पंपाच्या विद्युत जोडणीची सर्व कामे तात्काळ पूर्ण करण्यात यावीत व त्याबाबतचा सविस्तर अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

१५.२१ महावितरणाची शेती पंपाच्या विद्युत जोडणीची संख्या १२८७ असून आदिवासी विकास महामंडळाची संख्या ३०२५ अशी आहे. वास्तविक पहाता, ही संख्या अतिशय मोजकीच संख्या आहे. त्यामुळे या संख्येमध्ये तफावत येण्याचे कोणतेही कारण असता कामा नये परंतु ही तफावत कशामुळे दिसत आहे तसेच तफावत असण्यामागील कारणमिमांसा ताळमेळ घालून शोधून काढण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासन दिले आहे. आदिवासीसाठी खरेदी केलेले एकूण विद्युत पंप त्यापैकी वाटप केलेले विद्युत पंप, विद्युत पंप न घेतलेल्या शेतकऱ्यांची संख्या यामध्ये संख्येचा ताळमेळ बसता नसल्याने **आदिवासी शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या शेती पंपाची संख्या व त्याकरिता करण्यात येत असलेली विद्युत जोडणीची संख्या याचा योग्य तो ताळमेळ घालण्यात यावा तसेच आदिवासी शेतकऱ्यांना**

**शेतीपंप पुरविण्यात आल्यानंतर तात्काळ विद्युत जोडणी देण्याबाबत शासनाने ठोस उपाययोजना करावी अशी समितीची शिफारस आहे.**

१५.२२ महावितरणाचे कार्यकारी अभियंता ते वायरमन पर्यंत कोणतेही अधिकारी व कर्मचारी तालुका किंवा ग्रामपातळीवर त्यांच्या कामाच्या ठिकाणी उपस्थित किंवा सेवेस हजर नसतात. त्यांची नेमणूक ग्रामीण पातळीवर असतानाही त्यांचा मुक्काम शहरी भागातच असतो. मीटर बंद असणे, वीजेच्या तारा तुटलेल्या असणे या सर्व समस्यांकडे वायरमन पासून ते कार्यकारी अभियंत्यापर्यंत कोणीही कर्मचारी व अधिकारी शेतकऱ्यांच्या समस्यांकडे व त्या निवारण्याच्या दृष्टीकोनातून गांभिर्याने लक्ष घालत नाहीत. नागरिक व शेतकरी यांच्या तक्रारीकडे स्थानिक अधिकारी लक्ष देत नसल्याच्या अनेक तक्रारी महावितरणाकडे येत असतात. ज्या ठिकाणी नागरिकांच्या अनेक तक्रारी व समस्या आहेत त्या तातडीने दूर करण्यासाठी विशेष लक्ष देवून त्यांचे योग्य निवारण करण्याकरीता आवश्यक त्या सूचना सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात याव्यात. तसेच अशा ठिकाणी वरीष्ठ अधिकाऱ्यांनी अचानक भेटी देवून त्यांचे कर्मचारी त्यांच्या नियुक्तीच्या ठिकाणी कार्यरत असून त्यांच्याकडे प्राप्त तक्रारींची दखल घेतात किंवा नाही याबाबत नियमित माहिती घ्यावी. **अशा अचानक दिलेल्या भेटीमध्ये संबंधित क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी त्यांच्या नियुक्तीच्या ठिकाणी आढळून न आल्यास तसेच त्यांच्याकडे ठेवण्यात आलेल्या तक्रार नोंदवहीत तक्रारी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांविरुद्ध कठोर कारवाई करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

१५.२३ आदिवासी विकास विभागाचा दर वर्षीचा योजनांतर्गत खर्च लोकसंख्येच्या ९ टक्के आहे. विभागामार्फत आदिवासींकरीता आश्रमशाळा, विशेष घटक योजना, शेतकऱ्यांकरीता योजना अशा विविध प्रकारच्या योजना राबविल्या जातात. परंतु या योजना फक्त कागदोपत्री तयार होतात त्या प्रत्यक्षात फार कमी प्रमाणात अंमलात आणण्यात येतात. त्यामुळे या योजनांवर जेवढा खर्च होणे अपेक्षित असते तेवढा खर्च होत नाही. योजनांचे संनियंत्रण योग्य प्रकारे होत नाही. आदिवासींच्या विकासाकरीता विविध विभागाच्या योजना असल्यास त्यात समन्वयाचा अभाव असतो. आदिवासींच्या उन्नतीकरीता काम करणाऱ्या अनेक संस्था/व्यक्ती या क्षेत्रात कार्यरत आहेत. या संस्थेच्या/व्यक्तींच्या अनुभवाचा शासनास निश्चित उपयोग करुन घेता येईल. त्यामुळे **आदिवासींच्या उन्नतीकरीता व त्यांच्यापर्यंत लाभ पोहोचण्याकरिता या क्षेत्रात काम करण्यास तज्ञांचा अभ्यासगट स्थापन करावा असे समितीचे मत आहे.**

स्वातंत्र्यानंतरच्या ६० वर्षानंतरही आदिवासींची प्रगती झालेली नाही. ही अतिशय दुर्देवी बाब आहे. शासनाच्या योजनांपासून मोठ्या प्रमाणातील आदिवासी वर्ग वंचित राहिला आहे. हे महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्याला नक्कीच भूषणावह नाही. त्यामुळे आदिवासी क्षेत्रात, काम करणाऱ्या अशासकीय संस्था, तज्ञ व्यक्ती आदींची वेळोवेळी चर्चा सत्रे आयोजित करुन आदिवासी योजनांसाठी असलेला विकास निधी आदिवासींच्या पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी, खर्च करण्यासाठी शासनाच्या कार्यपद्धतीमध्ये लवचिकता आणून त्यांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

# कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय (पशुसंवर्धन) विभाग

## १६. पशुसंवर्धन विभागातील अंतर्गत नियंत्रण यंत्रणा-

१६.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील **परिच्छेद क्र. ५.१ "पशुसंवर्धन विभागातील अंतर्गत नियंत्रण यंत्रणा"** या संदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले.

**अंदाजपत्रक तयार करणे :-**

**१६.२** सन २००१-०२ ते २००५-०६ कालावधीत अंदाजपत्रक आणि खर्चाचे आकडे खालील प्रमाणे होते :

| योजनेत्तर | | | | | योजना | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| योजनेत्तर योजना वर्ष | अंदाज पत्रकीय तरतूद | अंतिम पत्रकीय तरतूद | खर्च | अधिक्याची टक्केवारी (+)/ बचत (-) | अंदाज पत्रकीय तरतूद | अंतिम पत्रकीय तरतूद | खर्च | अधिक्याची टक्केवारी (+)/ बचत (-) |
| २००१-०२ | १५६.२४ | १५५.६० | १७८.९३ | (+) १५.०० | १३.५३ | १३.७९ | १६.३६ | (+) १८.९१ |
| २००२-०३ | २६०.९२ | १६७.३२ | १६९.२३ | (+) १.१४ | १४.३३ | ६.६७ | ५.९३ | (+) ११.१६ |
| २००३-०४ | १७१.५१ | १७२.५८ | १७०.८७ | (-) ०.९९ | १८.८४ | ९.१७ | २.१९ | (-) ७६.११ |
| २००४-०५ | १८१.६६ | १८५.७२ | १८२.९७ | (-) १.४८ | २८.४९ | २९.७६ | २४.१५ | (-) १६.१७ |
| २००५-०६ | १८३.४१ | २०१.१६ | २०५.०४ | (-) १.९३ | ४४.९३ | ४६.७९ | ३५.७८ | (-) २३.५३ |
| एकूण | | ८८२.३८ | ९०७.०४ | | | १०६.१८ | ८५.२१ | |

२००१-०६ कालावधीतील रुपये ९८८.५६ कोटीच्या अंतिम अनुदाना ऐवजी (योजना : रुपये १०६.१८ कोटी आणि योजनेत्तर रुपये ८८२.३८ कोटी) प्रत्यक्ष खर्च रुपये ९९२.२५ कोटी (योजना ८५.२१ कोटी आणि योजनेत्तर रुपये ९०७.०४ कोटी) होता.

क्षेत्रीय कार्यालयातर्फे आवश्यक निविष्टि (Input) प्राप्त करुन, आयुक्त अंदाज पत्रक तयार करतात. विनिर्दिष्टित मुदतीत, अंदाजपत्रक वित्त विभागाला सादर करण्यांत येते. असे निदर्शनास आले की २००१-०२, २००२-०३ आणि २००५-०६ कालावधीत योजनेत्तर खर्चात अधिक्य होते. (१.१४ ते १५ टक्के) इतरत्र २००२-०३ ते २००५-०६ कालावधीत योजना कार्यक्रमांत प्रचंड बचत (११.१६ ते ७६.११ टक्के) होती.

**ज्ञापन :**

१६.३ लेखापरीक्षकांनी निदर्शनास आणल्यानुसार सन २००२-०३ ते २००५-०६ या कालावधीत योजनांतर्गत खर्चातील बचतीबाबत खालीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे.

१. बिगर आदिवासी (सर्वसाधारण) योजनेंतर्गत सन २००३-०४ मध्ये स्थापीत ८८ आणि अनुशेषांतर्गत कार्यान्वित ५० श्रेणी-१, पशुवैद्यकीय दवाखान्यांकरिता पशुधन विकास

अधिकाऱ्यांची पद रिक्त असल्याने, त्यावर्षी व पुढील वर्षांमध्ये वेतनावरील खर्चामध्ये बचत झालेली आहे.

२. तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालयाची स्थापना या योजनेमध्ये पशुवैद्यकीय संस्थांना यंत्रसामुग्री, उपकरणे, साधन सामग्री खरेदी करुन पुरवठा करणे, या अंतर्गत सन २००४-०५ ते २००५-०६ या कालावधीत यंत्रसामग्री, उपकरणे व हत्यारे तसेच आवश्यक असलेली सर्व औषधे खरेदी करण्यासाठी विहीत दरकरार वेळेवर निश्चित न झाल्याने योजनांतर्गत खर्चात बचत झाली आहे. तसेच काही उपकोषागारांनी १५ फेब्रुवारी नंतर यंत्रसामग्री खरेदीची देयके पारीत न केल्याने तरतूदी प्रत्यार्पित करणे क्रमप्राप्त झाले.

३. केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत, केंद्र हिस्स्याचा अपेक्षित निधी पूर्णतः वितरीत न झाल्याने, केंद्र व त्या प्रमाणात राज्य हिस्स्याचा निधी प्रत्यार्पित करणे क्रमप्राप्त झाले. तसेच केंद्र शासनाकडून काही योजनांचा निधी मार्च अखेरीस प्राप्त झाल्याने, निधी खर्च करण्यास अत्यल्प वेळ मिळाल्याने अर्थसंकल्पित निधी प्रत्यार्पित करणे क्रमप्राप्त ठरले.

योजनेत्तर योजनेमध्ये एकूण मंजूर अनुदानाच्या ८५ टक्के एवढा खर्च वेतन या बाबीवर होत असून, वर्षभरातील अपेक्षित खर्चाच्या अंदाजानुसार त्या त्या वर्षामध्ये सुधारीत अंदाजान्वये वेतनासाठी आवश्यक तेवढ्या वाढीव तरतूदींची मागणी करण्यात आली होती. परंतु वित्त विभागाने पुशसंवर्धन विभागाच्या मागणीनुसार वेतनासाठीच्या वाढीव तरतूदी सुधारीत अंदाजान्वये पूर्णपणे मंजूर केल्या नाहीत. तथापि वेतन या बाबीवरील खर्च न टाळता येणारा असल्याने, योजनेत्तर योजनेमध्ये अंतिम मंजूर अनुदानापेक्षा जादा खर्च झाला आहे. वरीलप्रमाणे सविस्तर कारणमिमांसा संदर्भाधिन कालावधीतील प्रत्येक वर्षीच्या विनियोजन लेख्यांना सादर केलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद करण्यात आली आहेत.

**जिल्हा परिषदांना दिलेल्या अनुदानांचे निर्धारण :**

१६.४ शासनाच्या आदेशानुसार जिल्हापरिषदांना दिलेल्या अनुदानांचे, संबंधित विभागांनी निर्धारण करावयाचे असते. खर्चाचा अचूकपणा तपासून आणि उपयोजन प्रमाणपत्र पडताळून जिल्हापरिषदांना दिलेल्या अनुदानांची निर्धारण करण्याची जबाबदारी प्रादेशिक सहआयुक्तावर असते.

२००१-२००५, कालावधीत ३३ जिल्हापरिषदांना रु. ३२५.७२ कोटीचे अनुदान विभागाने दिले होते. २००२-०३ सालांत १६ जिल्हापरिषदांना, २९ जिल्हापरिषदांना २००३-०४ सालात आणि ३३ जिल्हापरिषदांना २००४-०५ सालात दिलेल्या अनुदानांची निर्धारणा झाली नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे जिल्हापरिषदांकडे अखर्चित रक्कम राहिली असल्यास आणि अनुदान इतरत्र अपवाहीत (Diverted) केले असल्याची निश्चिती (Ascertained) करता आली नाही. मार्च २००६ अखेर, २१ जिल्हापरिषदांकडून एकूण रु. ९.४५ कोटी वसूल करावयाचे असल्याचे अभिक्षण (Observed) करण्यात आले.

**ज्ञापन :**

१६.५ शासनाने प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त कार्यालयाकडे सदर काम वर्ग केल्यानंतर, विभागीय स्तरावरील अपुऱ्या व अप्रशिक्षित मनुष्यबळामुळे, तसेच जिल्हा परिषदांकडून निर्धारणासाठी आवश्यक अभिलेख वेळेवर प्राप्त न होण्याच्या कमी प्रतिसादामुळे, सदर कामाचा मोठ्या प्रमाणावर अनुशेष राहिला होता. तथापि आयुक्त कार्यालयाकडून प्रलंबित अनुदान निर्धारणाचे काम वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रादेशिक कार्यालयाकडे पाठपुरावा केला आहे. तसेच वेळोवेळी प्रादेशिक स्तरावरील संबंधित प्रशासन अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. आयुक्त कार्यालयाचे पत्र दि. १४/११/०८, दि. २८/०४/०९, दि. ३०/७/१०, दि. ३०/१०/२०१०, दि. १/११/१०, दि. ६/१२/१०, दि. ८/१२/१० व दि. १३/१२/१० अन्वये प्रलंबित निर्धारणाचे काम पूर्ण करणेबाबत सर्व संबंधितांना सक्त सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे जिल्हा परिषदांचे प्रलंबित निर्धारण पूर्ण करण्यात आले आहे.

| **वर्ष** | **लेखापरिक्षणात प्रलंबित निर्धारण असलेल्या जि.पं.ची संख्या** | **निर्धारण पूर्ण केलेल्या जि.पं.ची संख्या** | **निर्धारण प्रलंबित असलेल्या जि.पं.ची संख्या** |
|---|---|---|---|
| २००१-०२ | २ | २ | -- |
| २००२-०३ | १६ | १६ | -- |
| २००३-०४ | २९ | २७ | २ |
| २००४-०५ | ३३ | २७ | ६ |

वरीलप्रमाणे प्रलंबित निर्धारणाच्या कामाचा अधिकाधिक निपटारा करण्यात आला असून, उर्वरित जिल्हा परिषदांचे प्रलंबित निर्धारण जास्तीत जास्त लवकर पूर्ण होण्याच्या

दृष्टिने प्रादेशिक स्तरावरुन कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच त्याबाबत आयुक्तालय स्तरावर संनियंत्रण करण्यात येत आहे.

अखर्चित रकमा / वसूलपात्र रकमा जिल्हा परिषदांनी तातडीने शासनाकडे भरणेबाबत निर्देश दिलेले आहेत. अनुदान निर्धारणानुसार जिल्हा परिषदांकडून रु. ९.४५ कोटी वसुलपात्र रक्कमेपैकी सद्यस्थितीत खालील जिल्हा परिषदांकडील रु. ७.८१ कोटी वसुली झालेली आहे. उर्वरित वसुलीसाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | शासनाकडे जमा केलेल्या रक्कमा (रुपये) |
|---|---|---|
| १. | रत्नागिरी | १८,५९,२९८ |
| २. | नाशिक | ३०,५६,१४८ |
| ३. | धुळे | २०,५९,०२० |
| ४. | नंदुरबार | ३०,१९,३०१ |
| ५. | पुणे | २८,२४,३१३ |
| ६. | सांगली | १,१८,६१,२२३ |
| ७. | कोल्हापूर | ४०,७२,५५९ |
| ८. | लातुर | १८,५८,४२१ |
| ९. | बुलढाणा | २४,३१,७१३ |
| १०. | अकोला | १२,६२,५५२ |
| ११. | वाशिम | ३८,१३,८८६ |
| १२. | अमरावती | ६८,०६,२९१ |
| १३. | यवतमाळ | ६४,१९,१६२ |
| १४. | वर्धा | ७०,१८,३०२ |
| १५. | भंडारा | २८,८९,४२१ |
| १६. | गोंदिया | २९,६८,३१८ |
| १७. | चंद्रपूर | ७५,२६,७२६ |
| १८. | गडचिरोली | ६०,६२,८०० |
| | **एकूण** | **७,८१,०९,४५४** |

**त्वरेने (Rush) खर्च :**

१६.६ दोन चाचणी केलेल्या घटकांत (units), फक्त ६४ ते १०० टक्के योजना खर्च वित्तीय वर्षाच्या अखेरच्या तिमाहीत करण्यात आला. लाभार्थींच्या संख्येला अंतिम रुप देण्यांत, जिल्हापरिषदांच्या समितींना प्रस्ताव सादर करण्यात आणि शासनाला आणि लसी, यंत्रसामुग्री,

उपकरणे, औषधांचे दरपत्रक प्रक्रियेत, प्रक्रियात्मक उशीर झाल्याचे विभागाने म्हटले. तरीही सत्य उरते की दोन महिन्यांत त्वरेने खर्च करणे टाळण्यासाठी खर्चाचे नियतकालिक संनियंत्रण दोन घटकांत करण्यात आले नव्हते.

**ज्ञापन :**

१६.७ जिल्हास्तरीय योजना, संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा परिषदांमार्फत राबविण्यात येतात. त्यासाठी योजनेचे प्रस्ताव तयार करुन मंजूरीसाठी विषय समिती, स्थायी समिती व जि.प.सर्वसाधारण सभेमध्ये सादर करावे लागतात. सदर समित्यांच्या सभा वारंवार होत नसल्याने योजनेस व लाभार्थी निवडीस अंतिम मंजूरी मिळण्यास विलंब होतो. जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ नुसार संबंधित जिल्हा परिषद समित्यांच्या मंजूरीनंतरच कार्यान्वयीन अधिकाऱ्यास योजना राबविता येते.

वैयक्तिक लाभाच्या योजनअंतर्गत (दुधाळ जनावरांचे गट वाटप, शेळी गट वाटप इ.) लाभार्थ्यांची निवड करणे, लाभार्थ्यांचा ५० टक्के हिस्सा जमा करुन घेणे यांसाठी कालावधी लागतो. त्यामुळे त्या योजनांवर खर्च करणेस उशिर होतो.

पशुवैद्यकिय दवाखाने व पशुप्रथमोपचार केंद्राचे बांधकाम योजनेअंतर्गत, निवासी व बिगरनिवासी इमारतीचे नकाशे व अंदाजपत्रके, संबंधित जिल्हा परिषदांकडून तयार केले गेल्यावर, पशुसंवर्धन आयुक्तालयाकडून प्रशासकीय व वित्तीय मंजूरीसाठी शासनास सादर केले जातात. शासनाकडून प्रशासकीय व वित्तीय मंजूरी प्राप्त झाल्यानंतर, बांधकाम विभागाकडून प्रत्यक्ष कामास सुरुवात होते. या कार्यपद्धतीनुसार वर्षाच्या ७-८ महिने कालावधी नंतर प्रत्यक्ष खर्च शेवटच्या २ महिन्यांत दिसून येतो.

औषधे, लस, यंत्रसामग्री/साधनसामग्री यांचा दरकरार निश्चित करण्याची पद्धत विहीत कार्यप्रणालीनुसार विलंब होणारी असल्याने, त्या बाबीवरील खर्च वर्षाच्या शेवटी अपरिहार्यपणे करावा लागला.

वरील कारणांव्यतिरिक्त सन २००७-०८ पासून प्राप्त अर्थसंकल्पित तरतूदीच्या १/१२ प्रमाणे दरमहा खर्च करण्याच्या शासनाच्या सूचना असल्याने, वर्षाअखेरीस निधी खर्च न करता मासिक निधी वितरणानुसार खर्च करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

**विनियोजनांचे व्यपगत टाळण्यासाठी निधीचे आहरण :**

१६.८ अंदाज पत्रकात अनुदान व्यपगत होऊ नये म्हणून कोषागारांतून रक्कम आहरण करण्यास मुंबई वित्तीय नियमावलीत प्रतिषेध (Prohibit) करण्यात आला आहे. चाचणी केलेल्या चार जिल्ह्यातील सहा घटकांत (Units) २००१-०२ ते २००५-०६ आर्थिक वर्षाच्या अखेरीस रु. ०.०३ कोटी ते २.९० कोटी असंवितरीत राहीले. रक्कमांचे आहरण मार्च मध्ये करण्यात आले होते आणि दोन ते सात महिने दरम्यानच्या विलंबाने म्हणजे मे आणि नोव्हेंबर, दरम्यान संवितरण करण्यात आले संहितेच्या तरतूदीचे उल्लंघन करुन, विनियोजनाचे व्यपगत टाळण्यासाठी रकमांचे आहरण करण्यात आले.

**ज्ञापन :**

१६.९ कोषागारातून निधीचे आहरण करताना आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी सदर निधीचा विनियोग त्या आर्थिक वर्षातच होईल असे अपेक्षित केले होते व त्यादृष्टीने आवश्यक प्रयत्नही केले होते. परंतू संदर्भाधीन प्रकरणांमध्ये या आहरीत निधीतून ज्या बाबी/यंत्रसामग्री/साधनसामग्रीची खरेदी करावयाची होती त्यांचा पुरवठा वर्षअखेरीस न होऊ शकल्याने कोषागारातून आहरीत केलेला निधी संबंधित आर्थिक वर्षातच खर्च होऊ शकला नाही. परंतु असा अखर्चित राहिलेला निधी लगतच्या आर्थिक वर्षात अपेक्षित यंत्रसामग्री/साधनसामग्रीचा प्रत्यक्ष पुरवठा झाल्यानंतर संवितरण करण्यात आला. यानुसार स्पष्ट करण्यात येते की, केवळ निधी व्यपगत होऊ नये म्हणून संदर्भाधिन प्रकरणी कोषागारातून निधीचे आहरण केले गेले अशी वस्तुस्थिती नाही.

जिल्हा परिषदांच्या संदर्भात मंजूर निधी व्यपगत होवू नये म्हणून, वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, मंत्रालय, मुंबई-३२, दि.१० ऑक्टोबर, २००२ व वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण-१००२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, मंत्रालय, मुंबई-३२, दि.६ जून, २००८ नुसार आहरीत करण्यात आलेला व अखर्चित राहिलेला निधी पुढील आर्थिक वर्षात खर्च करण्यास अनुमती देण्यात आली आहे.

संक्षिप्त देयकांवर निधी कोषागारातून आहरण करण्याची पद्धती शासनाच्या निर्देशानुसार पूर्णपणे बंद करण्यात आलेली आहे. तसेच निधीची तातडीची निकड नसताना निधीचे कोषागारातून आहरण करण्यात येऊ नये याबाबत पशुसंवर्धन आयुक्तालयाचे स्तरावरुन

सर्व संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत व त्यांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता क्षेत्रिय आहरण व संवितरण अधिकाऱ्यांद्वारे घेण्यात येत आहे.

**अचानक रोखीची तपासणी :**

१६.१० मुंबई वित्तिय नियमावली १९५९ च्या नियम ५५ अन्वये, रोकड वहीतील रोख शिल्लक प्रत्यक्ष उपलब्ध असल्याची आणि तात्पुरती देखील, कोणतीही रक्कम दुर्विनियोजित (misappropriate) करण्यात आली नसल्याची खातरजमा करण्यासाठी रोख रकमेची अचानक तपासणी महिन्यातून एकदा करण्यात यावी. चाचणी केलेल्या आठ जिल्ह्यांतील ५४ आहरण आणि संवितरण अधिकाऱ्यापैकी सहा जिल्ह्यातील १० आहरण आणि संवितरण अधिकाऱ्यांनी एप्रिल २००१ आणि मार्च २००६ दरम्यान १० ते ६० महिने दरम्यान रोख रकमेची अचानक तपासणी केली नाही.

**ज्ञापन :**

१६.११ रोख रकमेची तपासणी करण्याबाबत पशुसंवर्धन आयुक्तालयाने लेखापरिक्षणाने निदर्शनास आणलेल्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना, तसेच विभागातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना मुंबई वित्तीय नियम, १९५९ मधील नियम ५५ अन्वये, कार्यालयीन रोखवहीची अचानक तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे सर्व प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त/पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांनी अधिनस्त कार्यालयांच्या तपासणीचे वेळी अचानक रोकड पडताळणी केल्याबाबत आढावा घेण्याविषयी सूचित करण्यात आलेले आहे. उपरोक्त सूचनास अनुसरुन विभागातील आहरण व संवितरण अधिकारी/प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त कार्यवाही करीत आहेत.

**कुक्कुट पालन संस्थांचे संनियंत्रण -**

**१६.१२** सन १९८६-२००६ कालावधीत कर्ज भांडवल आणि सहाय्यक अनुदानाच्या स्वरुपात, विभागामार्फत रु. ४८.५१ कोटींचे आर्थिक सहाय्य ७३ कुक्कुट पालन सहकारी संस्थांना देण्यात आले होते. कर्ज घेतलेल्याच्या नोंदवह्या ठेवणे, वसुली नोंदवही आणि व्याज आकारणीसाठी, विभागाने कोणत्याही मार्गदर्शक सूचना जारी केल्या नव्हत्या. निरीक्षण करण्यासाठी कर्ज वसुलीसाठी आणि संस्थांच्या कामकाजाचे मूल्यांकन करण्यासाठी,

जिल्हापरिषदांच्या कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली संनियंत्रण समितीची स्थापना डिसेंबर २००२ मध्ये करण्यांत आली. प्रत्येक तिमाहीत सभा घ्यायच्या होत्या.

चाचणी परिक्षण केलेल्या चार जिल्ह्यांपैकी, एका जिल्ह्यात (धुळे) सभा घेण्यात आल्या नव्हत्या आणि २००३-२००६ कालावधीतील तीन जिल्ह्यात सभा भरविण्यांतील तूट २५ ते १०० टक्के दरम्यान होती.

मार्च २००६ अखेर रु. ६१.०७ कोटीची (व्याज आणि दंडनीय व्याजासहीत) वसुली प्रलंबित होती. २००१-२००२ ते २००५-२००६ सालात रु. ६१.४४ कोटी वसुलीपैकी रु. ३७.१२ लाखाची वसुली केली. अशाप्रकारे, कुक्कुटपालन संस्थांना कर्जाचे व्यवस्थापन निकृष्ट होते.

**ज्ञापन :**

**१६.१३** राज्यातील ७३ कुक्कुटपालन सहकारी संस्थांनी कर्ज घेतल्याच्या नोंदवह्या ठेवणे, वसुली नोंदवह्या ठेवणे आणि व्याज आकारणीबाबत पशुसंवर्धन आयुक्तालयाकडून वेळोवेळी सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार व्याज आकारणी व वसूलीबाबत अद्ययावत नोंदी ठेवल्या जातात. आयुक्तालयाकडील खालील पत्रांद्वारे संबंधीत संस्थांचे अध्यक्ष, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांना सदर सूचना देण्यात आलेल्या आहेत.

१. आयुक्तालयाचे पत्र क्र. कुक्कुट ५३/३६२(२)/३३४६-३३७८/९८/पसं-२२, दि.१८.११.१९८८
२. आयुक्तालयाचे पत्र क्र. कुक्कुट ५३/४६२(१९)/१६९४/९३/पसं-२२, दि.१५.१०.१९९३.
३. आयुक्तालयाचे पत्र क्र. कुक्कुट १/२२०/८५१३/०५/पसं-१३, दि.२१.८.२००६
४. आयुक्तालयाचे पत्र क्र. कुक्कुट १/२२०/१५७५/०७/पसं-१३, दि.३.७.२००७
५. आयुक्तालयाचे पत्र क्र. पशुधन/कुक्कुट -१४३१/२००७/पसं-१३, दि.८.६.२००७

वरीलप्रमाणे संबंधित कुक्कुटपालन संस्थांना देण्यात आलेले कर्ज, व्याज आकारणी व वसुली यांबाबत जिल्हा व राज्य स्तरावर नियंत्रण ठेवण्यात येत आहे. त्याचप्रमाणे वरील सूचनांच्या अनुषंगाने, सन २००३-२००४ ते २००६-२००७ या वर्षात जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी स्तरावर, कुक्कुटपालन सहकारी संस्थांच्या एकूण १९० संनियंत्रण सभा घेण्यात आलेल्या आहेत.

लेखापरिक्षणात उपस्थित केलेल्या चार जिल्ह्यापैकी, औरंगाबाद जिल्हयातील भगवती कुक्कुटपालन संस्थेच्या सभा दिनांक ८/१२/२००३, ३/६/२००४, ८/१०/२००४, ५/३/२००५, ९/५/२००५, २६/९/२००५, ३/२/२००६ व १३/११/२००६ रोजी, तर श्रमिक कुक्कुटपालन सहकारी संस्थेच्या सभा दिनांक ८/१२/२००३, ३/६/२००४, ८/१०/२००४, ५/३/२००५, ९/५/२००५, २६/९/२००५, ३/२/२००६ व १३/११/२००६ रोजी घेण्यात आलेल्या आहेत. पुणे जिल्ह्यातील रासविनी पुरस्कृत कुक्कुट पालन सहकारी संस्थेच्या सभा दिनांक २३.९.२००३, २९.१२.२००३, ३१.५.२००४, १३.१२.२००४, १८.२.२००५, १३.३.२००६, १८.३.२००६, १२.१२.२००६, २६.२.२००७ व १४.५.२००७ रोजी घेण्यात आलेल्या आहेत. तसेच धुळे जिल्ह्यातील कुक्कुटपालन संस्थांच्या संनियंत्रण समिती सभा दिनांक ३१.३.२००७, ३१.७.२००७, २४.४.२००८, १९.११.२००८, ४.८.२००९, ८.२.२००१, १२.७.२०१०, १८.१०.२०१० रोजी घेण्यात आलेल्या आहेत.

मार्च २००६ अखेर, राज्यातील ७३ कुक्कुटपालन संस्थांकडील मुद्दल, व्याज व दंडव्याजासह एकूण रु. ६१.०४ कोटी एवढ्या वसूलपात्र रकमेपैकी, रु. ६.५१ कोटी एवढी प्रागतीक वसूली (१०.६६ टक्के) झालेली आहे. सन २००६-२००७ मध्ये रु ९३.३७ लाख वसुली झाल्याने, मार्च २००७ अखेर एकूण प्रागतीक वसूली रु. ७.४४ कोटी झालेली आहे. तसेच मार्च, २०१० अखेर रु. ८३.९६ कोटी एवढी प्रागतीक वसुली करण्यात आली आहे.

एकूण ७३ कुक्कुटपालन संस्थांपैकी, सन २००९-२०१० या वर्षापर्यंत २६ संस्था चालू असून, २८ संस्था बंद आणि १९ कुक्कुटपालन संस्था अवसायनात आहेत. बंद/अवसायनातील संस्थांच्या वसुलीसाठी, सदर संस्थांची मत्ता लिलावाद्वारे विक्री करण्यासाठी सहकार/पशुसंवर्धन विभागातील सेवानिवृत्त अधिकारी अवसायक म्हणून नेमणेबाबत आयुक्तालयाचे पत्र क्र. कुक्कुट ५३/१ संकीर्ण/५०५८/२००६ पसं १३, पुणे ०१ दिनांक १०.८.२००६ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तसेच सद्य:स्थितीत सुरु असणाऱ्या संस्थांच्या नियमित सभा घेऊन, कर्ज वसुलीकरीता संबंधित संस्थांचे अध्यक्ष, सहाय्यक निबंधक व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांना सूचना देण्यात आल्या आहेत. सदर संस्थांकडे थकबाकी न राहण्याच्या दृष्टिने, आयुक्तालयाने सदर संस्थांकडून दरमहा रु. १.०० लाख वसूलीचे उद्दिष्ट दिलेले आहे. तसेच याबाबत दिनांक १९.४.२००५ व दिनांक ९/४/२००८ रोजी संस्थांचे

अवसायक/सहाय्यक निबंधक यांची आढावा सभा घेऊन, बंद अवसायनातील संस्था चालू करणे, मालमत्तेचे संरक्षण करणे, संस्था भाड्याने देणे, अथवा यापैकी कोणत्याही गटामध्ये बसत नसल्यास, संस्थेची मालमत्ता विक्री करुन, शासकीय थकबाकी वसुल करणेसाठी विशेष मोहिम राबविण्यातबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त प्रमाणे खातेस्तरावरून कर्ज वसुलीकरीता प्रयत्न करुनही सहकारी संस्थांकडून अपेक्षित वसुली होत नसल्यास, दंडव्याज माफीसह मुद्दल व व्याजाचा एकरकमी भरणा करुन घेणेबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. प्रस्तावाची शासनस्तरावर छाननी करणेत येत आहे.

**जिल्हास्तरावरील वैरण विकास अवेक्षण -**

१६.१४ वैरणीची आवश्यकता आणि उपलब्धता याचा आढावा आणि हिरवी व सुकी वैरणयुक्त खाद्य हा कसा संतुलीत आहार आहे याचा प्रचार करण्याकरीता विस्तार चळवळ हाती घेणे हे विभागाचे एक महत्त्वाचे काम होते. मे २००४ मध्ये विभागाची पुनर्रचना करताना सह वैरण विकास अधिकाऱ्यांची दोन पदे काढून घेतली आणि ही दोन पदे जून २००६ पर्यंत रिकामी होती. प्रादेशिक स्तरावर वैरण विकास अधिकारी हे एकच पद होते. जिल्हा स्तरावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याकरिता कोणताही सह वैरण विकास अधिकारी नसल्याने प्रयोगनिर्देश भूखंडाकरीता बियाणांच्या छोट्या पेरीका वाटपाची योजना वाईट तऱ्हेने दुष्परिणामीत होण्याची भिती होती. विभागाची पुनर्रचना केल्यानंतर पशुसंवर्धन विभाग, कृषि विभाग किंवा वन विभाग यापैकी कोणता विभाग वैरण विकासाकरीता मुख्य संस्था म्हणून राहील याचा निर्णय शासनाने ऑगस्ट, २००६ पर्यंत घेतला नव्हता. याप्रमाणे वैरण व्यवस्थापनाच्या कार्याकडे विभागाने योग्य ते लक्ष दिले नव्हते.

**ज्ञापन :**

१६.१५ शासन निर्णय क्र. पसंप-१००१/प्र.क्र.२९९ (भाग-४) पदुम-१ दिनांक २५ मे, २००४ अन्वये जिल्हास्तरावरील व आयुक्त कार्यालयातील सहाय्यक वैरण विकास अधिकारी यांची १९ पदे अतिरिक्त ठरविण्यात आली. त्यामुळे सदर वर्षापासून केंद्र पुरस्कृत लघुप्रात्यक्षिक वैरण बियाणे वाटप योजना राबविण्याकरिता, जिल्हा स्तरावर पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालयातील सहाय्यक पशुधन विकास अधिकारी/पशुधन पर्यवेक्षक यांची मदत

घेण्यात येत आहे. परिणामी क्षेत्रिय स्तरावर सदर योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. सदर योजनेअंतर्गत सन २००३-२००४ मध्ये ५२,००० किलो, सन २००९-२०१० मध्ये ५८,९६० किलो व सन २०१०-२०११ मध्ये ६०,००० किलो बियाणांचे वाटप करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे प्रादेशिक स्तरावरील कार्यरत वैरण विकास अधिकाऱ्यांमार्फत वैरणीची आवश्यकता व उपलब्धता याबाबत नियमित आढावा घेण्यात येतो. तसेच हिरवी/वाळलेली वैरण व संतुलित आहार यांचे महत्त्व याबाबत शेतकरी व पशुपालकांमध्ये प्रचार करण्याकरिता, प्रादेशिक स्तरावरुन वैरण विकास अधिकाऱ्यांमार्फत प्रशिक्षण देण्यात येते. अशा रितीने राज्यात वैरण विकासाचा विस्तार कार्यक्रम विभागामार्फत यशस्वीपणे राबविण्यात येत आहे.

राज्यामध्ये पशुसंवर्धन विभागामार्फत वैरण विकासाच्या अनेक योजना राबविण्यात येत आहेत. यामध्ये लघुप्रात्यक्षिक वैरण बियाणे वाटप, शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याकरिता वैरण बियाणे वाटप, फॉडर ब्लॉक मेकिंग युनिट स्थापना, गवती कुरणांचा विकास, कडबाकुट्टी यंत्र वाटप, मूरघासाकरिता प्रोत्साहन, पशुखाद्य विश्लेषण प्रयोग शाळा बळकटीकरण इत्यादी योजना यशस्वीपणे राबविण्यात येत आहेत.

**पशुधनाच्या जनन क्षमता सुधारणा कार्यक्रमाचे संनियंत्रण :**

१६.१६ महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला यांची स्थापना एप्रिल २००२ मध्ये केद्रांकडून १०० टक्के सहाय्य घेऊन "नॅशनल प्रोजेक्ट फॉर कॅटल ॲन्ड बफेलो ब्रीडींग" च्या अंमलबजावणीकरीता करण्यात आली. याचे मुख्य उद्दिष्ट कृत्रिम रेतन कार्यक्रम आणि पशुधन उत्पादनाच्या सुधारित कार्यक्रम, जिल्ह्यावार कृत्रिम रेतनाचे लक्ष्य ठरवून अंमलात आणणे तसेच गोठीत वीर्याची गुणात्मकता सांभाळून गोठीत वीर्य प्रयोगशाळांची सुधारणा करुन कृत्रिम रेतन कामाच्या पाठपुरावा करणे हे होते. महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या कार्यभार निर्मितीपासून स्वतंत्रपणे हाकला गेला नाही तसेच त्याला पूरक ठरणारा तांत्रिक कर्मचारी वर्ग त्याच्या मदतीसाठी दिला गेला नाही. ज्याचा परिणाम संघटनात्मक नियंत्रण आणि त्याचे कार्य कमी होण्यामध्ये झाला. म.प.वि.मं.च्या कार्यकारी समितीस वर्षातून सहा वेळा एकत्र यावयाचे होते. परंतु २००४-२००५ या वर्षात ते एकदाही एकत्र आले नाही आणि २००५-२००६ मध्ये फक्त चार वेळा एकत्र आले. केंद्र शासनाने म.प.वि.मं. या प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी २००३-२००४ या वर्षात रु. १७.२० कोटी आणि

२००४-२००५ या वर्षात रु १७.१८ कोटी मंजूर केले. केंद्र शासनाने म.प.वि.मं. साठी सप्टेंबर २००३ मध्ये रु. ८.६० कोटी मुक्त केले, निधी मुक्त झाल्यापासून सहा महिन्यात प्रत्यक्ष लक्ष्य ठरवून तपशिलवार कामाची योजना व सूक्ष्म स्तर योजना सादर करावयाच्या होत्या. पुढील निधि भौतिक आणि आर्थिक प्रगती मिळविल्यानंतर तसेच राज्य शासनातर्फे लेखा परीक्षित लेखे, त्रैमासिक प्रगती अहवाल आणि वार्षिक प्रगती अहवाल सादर केल्यानंतर दिला जाणार होता. केंद्र शासनास सुक्ष्म स्तर योजना सहा महिन्याच्या विलंबानंतर मे २००४ मध्ये सादर केली. मुक्त केलेल्या रु. ८.६० कोटी पैकी म.प.वि. मंडळाने २००४-२००५ आणि २००५-२००६ या कालावधीत फक्त रु. ५.१८ कोटी खर्च केले. योजनेच्या मंद अंमलबजावणीमुळे उर्वरीत रक्कम केंद्र शासनाकडून देण्यात आली नाही. याप्रमाणे, म.प.वि.मं च्या अयोग्य कार्यशैलीमुळे राज्यामध्ये कृत्रिम रेतन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीवर खूप वाईट परिणाम झाला. २००१-०२ आणि २००४-०५ या दरम्यान कार्यक्रमाचे लक्ष्य ७.१ टक्क्यांनी कमी करुन सुद्धा कृत्रिम रेतन कार्यक्रमाची संपादणूक १७.२ टक्क्यांनी कमी झाली.

**ज्ञापन :**

**१६.१७** महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाची स्थापना एप्रिल, २००२ मध्ये झाली. प्रत्यक्षात सन २००५ मध्ये वळुमाता प्रक्षेत्रे, गोठित रेत प्रयोगशाळा आणि वळु संगोपन केंद्रांचे मंडळांकडे हस्तांतरण झाले. महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाच्या स्थापनेनंतर, सुरवातीच्या कालावधीत निर्धारीत बैठका झाल्या नाहीत. तथापि सद्य:स्थितीत नियमित बैठका होत असून, त्यानुसार कृत्रिम रेतन कार्यक्रमाचे योग्य ते संनियंत्रण करण्यात येत आहे. महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे पद पशुसंवर्धन विभागातील अतिरिक्त आयुक्त संवर्गातील आहे. पद मंजूरीनंतर सुरुवातीच्या कालावधीत पशुसंवर्धन सहआयुक्त संवर्गातील अधिकाऱ्यांकडे या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला होता. मात्र अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन या संवर्गातील जेष्ठतम अधिकाऱ्याची नियमित पदोन्नती झाल्यानंतर, मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे पद दि.२/८/२००७ रोजी अतिरिक्त आयुक्त संवर्गातील अधिकाऱ्याच्या नियुक्तीने भरण्यात आले. नियमित अधिकाऱ्याच्या सेवानिवृत्तीनंतर मार्च २००९ पासून रिक्त असून, सद्य:स्थितीत सदरचे पद भरण्याची कार्यवाही चालू आहे. तूर्त सदर पदांचा अतिरिक्त कार्यभार पशुसंवर्धन खात्यातील सहआयुक्त संवर्गातील अधिकाऱ्यांकडे दिलेला आहे.

केंद्र शासनाने राष्ट्रीय गुरे व म्हैस पैदास प्रकल्प योजनेखाली मंडळाला वितरीत केलेला रु.८.६० कोटीचा निधी सन २००४-२००५ व २००५-२००६ मध्ये ६०% खर्च झाला. तथापी सन २००६-२००७ व २००७-२००८ मध्ये निधीच्या विनियोगाचे प्रमाण समाधानकारक राहीले. सन २००८ अखेर संपूर्ण निधीचा विनियोग होवून, केंद्र शासनाकडे त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले आहे. यामुळेच केंद्र शासनाने ११ व्या पंचवार्षिक योजना कालावधीत NPCBB, Phase-II अंतर्गत, राज्यासाठी रु. ४७.१३ कोटी इतक्या भरीव निधीचा आराखडा मंजूर केला आहे.

कृत्रिम रेतन कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी मंडळाकडे कोणतीही स्वतंत्र यंत्रणा नाही. त्यामुळे राज्यातील कृत्रिम रेतन कार्यक्रम पशुसंवर्धन खात्याच्याच पशुवैद्यकिय दवाखाने व इतर संस्थांमार्फत राबविला जात आहे. खात्याच्या तांत्रिक संवर्गातील पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त राहिल्याने, कृत्रिम रेतन कार्यक्रमाची संपादणूक कमी झालेली आहे. सद्यस्थितीत सहाय्यक आयुक्त आणि पशुधन विकास अधिकारी या संवर्गातील ६१२ पदे रिक्त आहेत. सदर पदे भरण्यासाठी, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत निवडप्रक्रिया होणार असल्याने कृत्रिम रेतन कार्यक्रमाची क्षेत्रिय स्तरावर अंमलबजावणी करण्यात काही प्रमाणात अडचणी येत आहेत. त्याचप्रमाणे पशुधन पर्यवेक्षक या संवर्गातील ८६ पदे रिक्त असून, ती भरण्यासाठी खाते स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे. तथापी शासनाने गट-क आणि ड संवर्गातील पदे भरण्यावर तूर्त एक वर्षाकरिता बंदी घातली आहे. त्यामुळे या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या अन्य संस्थांबरोबर करार करुन, अतिरिक्त कृत्रिम रेतन केंद्रे कार्यान्वित करण्यात येत आहेत. अशा प्रकारे कृत्रिम रेतनाच्या कामात भरीव वाढ होण्यासाठी खाते स्तरावर प्रयत्न चालू आहेत.

उपरोक्त पार्श्वभूमीवर, सन २००४-२००५ मध्ये १६.२९ लक्ष, २००५-२००६ मध्ये १६.०४ लक्ष इतक्या जनावरांना कृत्रिम रेतन करण्यात आले होते. त्यात वाढ होऊन, सन २००८-२००९ मध्ये १८.४९ लक्ष इतकी कृत्रिम रेतनांची संख्या वाढली आहे. तसेच सन २००६-२००७ ते २००९-२०१० या वर्षात कृत्रिम रेतनांचे साध्य वाढत्या प्रमाणात आहे. त्याचप्रमाणे जन्मलेल्या वासरांची संख्या सन २००५-२००६ मध्ये ५.६१ लक्ष होती. ती सन २००९-१० मध्ये ६.२३ लक्ष एवढी झाली आहे. तसेच जन्मलेल्या वासरांच्या कृत्रिम रेतनाशी असलेल्या ३.०० या

सर्वसाधारण गुणोत्तराचा विचार करता, सन २००५-०६ मधील गुणोत्तर २.९० असे फायदेशीर आहे.

**अंतर्गत लेखापरिक्षणातील कमतरता :**

१६.१८ सहाय्यक संचालक, लेखा हा अंतर्गत लेखा परिक्षण विभागाचा प्रमुख होता असे दिसून आले की, कारभार आणि महत्व यानुसार लेखापरिक्षणीय युनीटसचे (२८२ १०) वर्गीकरण करण्यात आले नव्हते तसेच त्याचा लेखापरिक्षणाचा कालावधी ठरविण्यात आला नव्हता. यामुळे प्रत्येकी तीन सदस्य असलेल्या तीन लेखापरिक्षण गटास सर्व विभागांचे अंतर्गत लेखापरिक्षण ११ विभागास प्रत्येक वर्षी करणे भाग पडत होते. पुढे असे लक्षात आले की, एकूण २८२ विभागांपैकी ३८ विभागांचे (१३ टक्के) २००५-०६ मध्ये लेखापरिक्षण करण्यात आले. अतिरिक्त कर्मचारी वर्गाची नेमणूक या कामासाठी केली गेली नाही तर अंतर्गत लेखापरिक्षण हे सतत थकीत राहील. लेखापरिक्षण अधिकाऱ्यांनी असे म्हटले की, (मे २००६) या विभागासाठी अतिरिक्त कर्मचारी वर्ग देण्यासंबंधीचा प्रस्ताव विभागाच्या कमतरता समितीकडे सादर केलेला आहे. ज्यावर अद्याप निर्णय झालेला नाही.

**ज्ञापन :**

**१६.१९** पशुसंवर्धन आयुक्तालयाचे परिपत्रक क्र. लेपवि/संकीर्ण/मा.सू./२५५/०७ दि. १४/३/०७ नुसार विभागातील प्रत्येक कार्यालयाचे महत्त्व व आर्थिक कारभार विचारात घेऊन, लेखापरिक्षण कामाचे वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार कार्यालयनिहाय लेखापरिक्षणाचा कालावधी व मैनके ठरविण्यात आली आहेत.

सन २००४ मध्ये खात्याची पुर्नरचना होण्यापूर्वी, प्रत्येकी ३ कर्मचाऱ्यांच्या ८ पथकांमार्फत (एकूण २८ कर्मचारी) २८२ युनिटचे लेखापरिक्षण केले जात होते. पुर्नरचनेनंतर या कामासाठी केवळ १४ पदे मंजूर झाल्याने, लेखापरिक्षणाचे काम प्रलंबित राहिले आहे. तरीदेखील लेखापरिक्षण पथकामध्ये उपलब्धतेनुसार प्रादेशिक/जिल्हा कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा समावेश करुन, सध्याच्या मनुष्यबळाचा नियोजनबद्ध वापर केल्याने, सन २००६-२००७ मध्ये ८० कार्यालयांचे (३०२ वर्ष युनीट) व सन २००७-२००८ मध्ये ७२ कार्यालयांचे (३२८ वर्ष युनीट) लेखापरिक्षण करण्यात आले आहे. त्यानंतरच्या कालावधीत मंजूर १४ पदांपैकी ७

पदे रिक्त राहिल्याने, सन २००८-२००९ मध्ये ५४ कार्यालयांचे (२५२ वर्ष युनीट) व सन २००९-१० मध्ये ४३ कार्यालयांचे (१६७ वर्ष युनीट) लेखापरिक्षण करण्यात आले आहे.

लेखापरिक्षण कामासाठी जादा कर्मचारीवर्गाची मागणी दि. ११/९/२००७ रोजी पशुसंवर्धन विभागाच्या पुर्नविलोकन समितीकडे करण्यात आली आहे. उपलब्ध मनुष्यबळाच्या अधिकाधिक सुयोग्य वापर करुन, मैंनकांप्रमाणे सर्व प्रलंबित लेखापरिक्षण पूर्ण करण्याची दक्षता घेणेत येत आहे.

**तपासणी अहवालाची प्रलंबितता** :

१६.२० लेखापरिक्षणाने लक्षात आणून दिलेल्या कमतरताकडे त्वरीत लक्ष न दिल्यास त्या विभागाचे सामर्थ्य नाहीसे होते. मार्च २००५ अखेर ४७२ अंतर्गत लेखापरिक्षण तपासणी अहवालातील ११४१५ परिच्छेद प्रलंबित होते, ज्यापैकी ३१५ तपासणी अहवालांतील १०८८९ परिच्छेद तीन वर्षाहून जादा कालावधीकरीता खाली दर्शविल्याप्रमाणे प्रलंबित होते.

| तपासणी अहवालाची निर्गमित केल्याचे वर्ष | तपासणी अहवाल संख्या | प्रलंबित परिच्छेदांची संख्या |
|---|---|---|
| २००१-०१ पूर्वी | १३० | ८६९० |
| २०००-०१ | १२१ | ६१९ |
| २००१-०२ | ४० | ४०४ |
| २००२-०३ | २४ | ११७६ |
| एकूण | ३१५ | १०८८९ |

यावरुन असे दिसून येते की, विभागाने अंतर्गत लेखापरिक्षणाने दाखवून दिलेल्या चुका आणि कमतरता दुरुस्त करण्यासाठी पुरेशी उपक्रमशीलता राबविली नव्हती.

**ज्ञापन :**

**१६.२१** विभागातील अधिनस्त सर्व कार्यालयप्रमुखांना अंतर्गत लेखापरिक्षणाच्या आक्षेपांचा वेळेच्यावेळी निपटारा करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच सर्व नियंत्रक अधिकाऱ्यांना मासिक बैठकीत याविषयीचा नियमित आढावा घेण्याबाबत सूचित केले आहे. यासंदर्भात विभागामार्फत प्रलंबित लेखापरिक्षण परिच्छेदांचा जलद निपटारा होण्यासाठी सर्व प्रादेशिक स्तरांवर अनुपालन निपटारा धडक मोहिमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे अंतर्गत लेखापरिक्षणाच्या प्रलंबित परिच्छेदांपैकी एकूण १२७५ परिच्छेद निकाली निघालेले आहेत. तद्नंतर दि. १५/११/२०१० ते दि. ४/१२/२०१० या कालावधीत सर्व प्रादेशिक

स्तरांवर धडक कार्यक्रम राबविण्यात आला. त्यामध्ये एकूण १४९३ परिच्छेद निकाली काढण्यात आले. वरीलप्रमाणे एकूण २७६८ परिच्छेदांचा निपटारा करण्यात आला आहे. तसेच धडक मोहिमेंतर्गत तीन वर्षांपेक्षा अधिक कालावधीच्या आक्षेपांचा प्राधान्याने निपटारा करण्यात आला आहे. पुढील कालावधीत जास्तीत जास्त प्रलंबित परिच्छेद निकाली काढण्याच्या दृष्टीने, सर्व अधिनस्त कार्यालयप्रमुखांना आवश्यक त्या सूचना देण्यात येऊन प्रलंबित आक्षेपांचा निपटारा करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

**साक्ष :**

१६.२२ उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात लोकलेखा समितीने दिनांक २७ ऑक्टोबर, २०१० व ८ फेब्रुवारी, २०११ रोजी कृषी व पदुम (पशुसंवर्धन) विभागाचे सचिव यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सचिवांनी समितीस अशी माहिती दिली की, समितीने सन २००१-२००२, २००२-२००३ आणि २००५-२००६ या कालावधीत योजनेत्तर खर्चात अधिक्य होते. (१.१४ ते १५ टक्के) तर इतरत्र सन २००२-२००३ ते २००५-२००६ या कालावधीत योजना कार्यक्रमात प्रचंड बचत (११.१६ ते ७६.११ टक्के) होती याची कारणमिमांसा समितीने विचारली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सन २००१-२००२ व २००२-२००३ या वर्षामध्ये अतिरिक्त खर्च झालेला आहे. पगारावरील अतिरिक्त खर्चाची ही रक्कम आहे. त्याचप्रमाणे त्या काळात नवीन पदांची निर्मिती झाली होती. बी.डी.एस.योजना २००७ साली आल्यामुळे नवीन खर्च झालेला आहे. त्यामुळे काही ठिकाणी १८ टक्के अधिक खर्च झाला आहे. तसेच आर.सी.च्या दरात वाढ झाल्यामुळे अतिरिक्त खर्च झालेला आहे.

१६.२३ यावर समितीने महालेखापाल यांनी दर वर्षी अतिरिक्त खर्चाबाबत आक्षेप नोंदविल्यावर त्या-त्या वर्षात त्याचे स्पष्टीकरण विभागाने दिले होते काय? त्यावर महालेखाकरांनी अशी माहिती दिली की, The department has submitted the reply to our Office in January, 2009. However, that reply is silent as to what measures or steps the department has taken to avoid such kind of excess expenditure. Our department has pointed out this problem but yet it has not been sorted out by the department. The problem is still not solved. Till today, the same problem. I would further point out to the Committee that there is no assessment of the grants which are given to the Zilla Parishads. An amount of Rs.7.07 cores is still to be recovered. What is the position now ?

त्यावर विभागीय सचिवांनी An amount of Rs. 4.5 crores has been recovered. असे समितीस सांगितले.

१६.२४ महालेखाकारांनी पुन्हा अशी विचारणा केली की, When was it recovered ? Since when is it recovered ? Our information is that it is still to be recovered. When did you recover it ? Our department just now completed the review of it. याबाबत सचिवानी खुलासा केला की, The Department has recovered this amount in September, 2010. We have already recovered an amount of Rs. 4.5 crores and balance amount will be recovered.

१६.२५ दरवर्षीच्या लेखापरीक्षणामध्ये लेखी सूचना दिलेल्या असताना सुद्धा त्या दुरुस्त झालेल्या नाहीत, त्याची कारणे समितीने विचारली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सप्टेंबर, २०१० मध्ये ४.५ कोटी जिल्हा परिषदांकडून वसूली झाली आहे. अनुदान निर्धारणापैकी ५० टक्के वसूली झालेली आहे आणि उर्वरित ५० टक्के बाबत कार्यवाही चालू आहे. त्यावर बाकीची वसुली केव्हा करणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता जिल्हा परिषदांकडे यासंदर्भात पाठपुरावा केला जात आहे, त्यांच्याकडून अनुदान निर्धारणाची रक्कम येणे आवश्यक आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

१६.२६ अनुदान निर्धारण कामाचा अनुशेष हा मुख्यतः हा जिल्हा परिषदांच्या कमी प्रतिसादामुळे तसेच प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त या कार्यालयातील प्रशासन अधिकारी यांच्या दुर्लक्षामुळे व त्यांनी गांर्भीयाने लक्ष न पुरविल्यामुळे राहिला आहे. ज्यांच्यावर ही जबाबदारी सोपविली होती, त्यांच्याविरुद्ध विभागाने कारवाई केली आहे काय, याबाबत सचिवांनी विभागाकडे मनुष्यबळ कमी असल्याचे समितीस सांगितले.

१६.२७ समितीने विचारणा केली की, प्रशासकीय अधिकाऱ्यांनी लक्ष दिले नाही म्हणून वसुली कमी झालेली आहे, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले नव्हते असे लेखी उत्तर दिलेले आहे. आता संबंधित कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले आहे काय, तसेच मार्च, २००८ पर्यंत प्रलंबित निर्धारणाचे काम पूर्ण करण्याचे लक्ष ठेवण्यात आले होते असेही म्हटलेले आहे. आता २०१० सुरु आहे. प्रत्येक परिच्छेदास तेच तेच उत्तर दिलेले आहे.

१६.२८ सन २००१-२००२, २००२-२००३ आणि २००५-२००६ या कालावधीत योजनेतर खर्चात अधिक्य होते. (१.१४ ते १५ टक्के) तर इतरत्र सन २००२-२००३ ते २००५-२००६ या कालावधीत योजना कार्यक्रमात प्रचंड बचत (११.१६ ते ७६.११ टक्के) होती याची कारणे काय आहेत? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सन २००५-२००६ या कालावधीत चौथ्या तिमाहित १०.६६ कोटी रुपयाची बचत झाली होती. त्या कालावधीत ग्रामविकास विभागाकडून समायोजन ज्ञापन उशिरा निर्गमित झाले त्यामुळे प्रत्यक्ष झालेला खर्च महालेखापालांकडे न नोंदविला गेल्यामुळे बचत दिसत आहे. परंतु प्रत्यक्ष खर्च झालेला आहे, फक्त त्या रकमेचे समायोजन झालेले नव्हते. त्यावर समितीने विचारणा केली की, समितीच्या मागील बैठकीत कृषि व पदुम विभागाच्या सचिवांनी नव्याने कार्यभार घेतला होता. त्यामुळे समितीला संयुक्तिक उत्तरे मिळाली नव्हती म्हणून समितीची बैठक पुढे ढकलण्यात आली होती. खर्चाचे समायोजन उशिरा का झाले? यासंदर्भात विभागाने महालेखापालांसमवेत समन्वय का झाला नाही ? खर्चाचे समायोजन झालेले आहे, असे सचिवांनी सांगितले असले तरी महालेखापालांचे म्हणणे असे आहे की, पूर्ण समायोजन झालेले नाही. यावर विभागीय सचिवानी खुलासा केला की, तिसऱ्या आणि चौथ्या तिमाहीचे समायोजन ज्ञापन उशिरा निर्गमित झाले त्यामुळे समायोजन उशिरा झाले पण प्रत्यक्ष खर्च झालेला आहे.

१६.२९ समितीने कृषि व पदुम विभागातील रिक्त पदे भरण्यात आली आहेत काय? अशी विचारणा केली असता विभागीय सचिवानी खुलासा केला की, माननीय मंत्रिमहोदयांनी व सचिव स्वत: महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अधिकाऱ्यांबरोबर रिक्त पदे भरण्याच्या संदर्भात चर्चा करुन रिक्त पदे भरण्याच्या बाबतीत महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सांगितले आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने जाहिरात दिली आहे. पदे भरण्याची प्रक्रिया नुकतीच सुरु झालेली आहे. बऱ्याच वर्षापासून ही रिक्त पदे आहेत. गट-अ ची एकूण २५७२ पदे मंजूर होती त्यापैकी १९६२ पदे भरलेली आहेत आणि ६१० पदे रिक्त आहेत. गट- ब मध्ये एकूण ३९० पदे मंजूर होती. त्यापैकी १९८ पदे भरलेली आहेत आणि १९२ पदे रिक्त आहेत.

१६.३० रिक्त पदे किती दिवसात भरली जातील. कृषि व पदुम विभागात संपूर्ण राज्यामध्ये सद्य:स्थितीत एकूण किती पदे रिक्त आहेत? ही संपूर्ण रिक्त पदे एका वर्षात भरली जातील काय? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवानी असा खुलासा केला

की, सहाय्यक आयुक्ताच्या १५३ पदांसाठी दि.२९ एप्रिल, २००९ ला जाहिरात दिलेली आहे. ही पदे भरण्यासाठी तीन महिन्याचा कालावधी लागेल. पशुधन विकास अधिकाऱ्याच्या ५१ पदांसाठी नोव्हेंबरमध्ये मुलाखती घेतल्या आहेत. त्यासंबंधीचा निकाल महिन्याभरात येईल. त्याशिवाय पशुधन विकास अधिकाऱ्यासाठी आता १८३ पदांसाठी जाहिरात दिलेली आहे व गट-अ मध्ये ६१० आणि गट-ब मध्ये १९२ पदे रिक्त आहेत.

१६.३१ समितीने विचारणा केली की, मागील बैठकीत महालेखापालांनी असा प्रश्न विचारला होता की, "there is no assessment of the grants which are given to the Zilla Parishads. An amount of Rs. 7.07 crores is still to be recovered." यावर विभागीय सचिवानी खुलासा केला की, महालेखापालांकडे निर्धारण झाले आहे. प्रलंबित निर्धारणाचे काम पूर्ण करणेबाबत सर्व संबंधितांना सक्त सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे जिल्हा परिषदांचे प्रलंबित निर्धारण पूर्ण करण्यात आले आहे. सन २००१-२००२ मध्ये २ जिल्हा परिषदांचे, सन २००२-२००३ मध्ये १६ जिल्हा परिषदांचे, सन २००३-२००४ मध्ये २९ जिल्हा परिषदांचे आणि सन २००४-२००५ मध्ये ३२ जिल्हा परिषदांचे निर्धारण पूर्ण झाले आहे. सन २००५-२००६ चे निर्धारण शिल्लक आहे. ते त्वरित करुन घेण्यात येईल. जिल्हा परिषदांकडून अनुदान निर्धारणानुसार रु. ९.४५ कोटी वसुलपात्र रक्कमेपैकी सद्य:स्थितीत रु. ७.८१ कोटीची वसुली झालेली आहे असे लेखी माहितीत दिले होते ती रु. ७.९१ कोटी वसुली झालेली आहे. उर्वरित रक्कम सहा महिन्यात वसूल होईल.

१६.३२ समितीने विचारणा केली की, ही वसुली कधी पासून थकित होती? व अनुदानाच्या वसुलीस कोणाच्या चुकीमुळे विलंब झालेला आहे? याबाबत विभागीय सचिवानी खुलासा केला की, सन २००१ पासून ही वसुली थकित होती. कर्मचारी वर्ग कमी असल्यामुळे या कामामध्ये विलंब झालेला आहे.

१६.३३ यावर समितीने परिच्छेदाबाबत महालेखाकारांचे मत विचारले असता महालेखाकारांनी माहिती दिली की, The grants released to the Zilla Parishads are required to be assessed by the Department. The assessment work is incomplete for number of years, for number of Zilla Parishads. Every time they are saying that due to shortage of staff, they are not able to assess the grants. Due to non-assessment, it could not be ascertained whether any amount remained unutilized with the Zilla Parishads. The

Department can do the assessment work from the existing staff. The Department should prepare a time bound programme to complete the assessment work. Up till now, you should have completed the assessment work up to year 2009.

१६.३४ Committee also feel that the Department can do the assessment work from the existing staff असे समितीने सांगितले असता विभागीय सचिवानी असे सांगितले की, सहा महिने विशेष मोहिम घेऊन ७० जिल्हा परिषदांचे निर्धारण पूर्ण करण्यात आले आहे. बाकीच्या जिल्हा परिषदांचे निर्धारण देखील नियमित करावे याबाबतीत आयुक्तांकडून दक्षता घेतली जाईल.

१६.३५ रिक्त पदे भरण्याची बाब विभाग गंभीरतेने घेत नाही. गडचिरोली जिल्ह्यात डी.एच.ओ. पासून डी.डी.पर्यंतच्या सर्व पोस्ट रिक्त आहेत. त्या ठिकाणी जे उमेदवार जाण्यास तयार आहेत त्यांना तेथे नियुक्ती दिली जात नाही आणि जे उमेदवार तेथे जाण्यास इच्छूक नसतात त्यांना तेथे नियुक्ती दिली जाते. त्यामुळे तेथील पदे रिक्त राहतात ही परिस्थिती गडचिरोली जिल्ह्यातच नाही तर अशी परिस्थिती संपूर्ण महाराष्ट्र राज्यात निर्माण झालेली आहे. तसेच गडचिरोली जिल्ह्यातील रिक्त पदे भरण्याच्या संदर्भात विभागाने प्रयत्न केला होता काय? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवानी खुलासा केला की, संपूर्ण महाराष्ट्रात १/३ पदे रिक्त आहेत. ज्यांची गडचिरोली येथे नियुक्ती झालेली आहे आणि जे गडचिरोली येथे हजर होणार नाहीत त्यांच्या बाबतीत कारवाई करण्याच्या सूचना आयुक्तांना दिलेल्या आहेत. तसेच गडचिरोली जिल्ह्याचा आढावा घेऊन जास्तीत जास्त पदे भरण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

१६.३६ प्रलंबित अनुदान निर्धारणाच्या कामाबाबतची सद्य:स्थिती काय आहे ? असे समितीने विचारले असता, विभागीय सचिवानी असा खुलासा केला की, विशेष वसुली मोहिमेअंतर्गत रुपये ७.९१ कोटीची वसुली झालेली आहे. उर्वरित सर्व पैसे सहा महिन्याच्या आत वसूल केले जातील.

१६.३७ समितीने कोणत्या जिल्हा परिषदेची वसुली झालेली आहे? असे विचारले असता विभागीय सचिवांनी हिंगोली जिल्हा परिषदेकडून ८० लाख रुपये आणि अहमदनगर जिल्हा परिषदेकडून ७४ लाख रुपये वसूल करावयाचे आहेत. उर्वरित जिल्हा परिषदांची

वसुली झालेली आहे. समितीने जिल्हा परिषदांकडे प्रलंबित असलेल्या अनुदान निर्धारणाच्या रक्कमांचा एकत्रित अहवाल ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना कळवून त्यांची वसुली अर्थोपाय अग्रीमातून करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे काय ? अशी विचारणा केली असता विभागीय सचिवानी बरीचशी वसुली झालेली आहे. दोन जिल्हा परिषदांची वसुली राहिली आहे ती वसूल करण्यात येईल असे समितीस सांगितले. रु. १.५४ कोटी वसूल करावयाचे राहिले आहेत त्याबाबतचा प्रस्ताव दिला आहे काय ? असे समितीने विचारले असता, प्रस्ताव पाठविलेला आहे, असे विभागीय सचिवानी समितीस सांगितले त्यावर प्रस्ताव कोणत्या तारखेला पाठविला? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवानी खुलासा केला की, दिनांक २१ मे, २००९ रोजीच्या शासनाच्या शासन निर्णयानुसार ग्राम विकास विभागाने सर्व जिल्हा परिषदांना आणि त्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अशा सूचना दिल्या आहेत की, त्यांच्याकडे जो अखर्चित निधी आहे तो दि.३०/०६/२००९ पर्यंत भरण्यात यावा.

१६.३८ समितीने पुढे अशी विचारणा केली की, समितीच्या मागील बैठकीत सचिवांनी लेखी उत्तरात असे म्हटले होते की, प्रशासकीय अधिकाऱ्यांनी लक्ष दिले नाही म्हणून वसुली कमी झाली त्या प्रशासकीय अधिकाऱ्यावर काय कारवाई केली? त्यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, वसुलीच्या संदर्भात विशेष मोहिम (स्पेशल ड्राईव्ह) घेतली होती. आता वसुलीचे सर्व काम जवळपास संपत आले आहे.

१६.३९ समितीने पुढे विचारणा केली की, प्रशासकीय अधिकाऱ्याने लक्ष दिले नव्हते असे आपण सांगितले होते. विभागाने आता जी उत्तरे दिली आहेत त्यामध्ये सुसुत्रता दिसून येत नाही. अनुदानाच्या निर्धारणाच्या संदर्भात प्रत्येक वेळी वेगवेगळी कारणे सांगण्यात येतात. अनुदानाच्या निर्धारणाच्या पद्धतीमध्ये आपल्याला काही बदल सूचवावयाचे आहेत काय? त्यावर विभागीय सचिवानी खुलासा केला की, आता अर्थसंकल्प वितरण प्रणाली (बीडीएस सिस्टिम) आल्यापासून अनुदानाच्या निर्धारणास वेळ लागत नाही. सन २००६-२००७ पर्यंत अनुदानाच्या निर्धारणाच्या बाबतीत अडचण येत होती. अर्थसंकल्प वितरण प्रणालीमध्ये (बीडीएस सिस्टिममध्ये) ही अडचण येत नाही.

१६.४० समितीने विचारणा केली की, अर्थसंकल्प वितरण प्रणाली (बी.डी.एस. सिस्टिम) आल्यानंतर लेखापरिक्षण झालेले आहे काय? Does Auditor General have done audit after the implementation of the BDS System?

१६.४१ यावर महालेखाकारांनी प्रतिपादन केले की, we have done audit after the implementation of the BDS System and the Audit Report is being finalized. However, we are not satisfied with the performance of the Department. समितीने विभागास आपल्याला अनुदानाच्या निर्धारणाच्या बाबतीत काही सुधारणा करावयाच्या असतील तर त्या समिती समोर मांडाव्यात असे सांगितले, त्यावर विभागीय सचिवानी विशेष वसुली मोहिम सहा महिने घेण्यात आली आहे ती मोहिम पुढे सुरु ठेवून अनुशेष पूर्ण केला जाईल तसेच नवीन अनुशेष निर्माण होणार नाही याची दक्षता घेतली जाईल, असा खुलासा केला.

१६.४२ समितीने विचारणा केली की, अर्थसंकल्प वितरण प्रणाली (बीडीएस सिस्टिम) आल्यानंतर लेखापरिक्षकांनी पशुसंवर्धन विभागाचे लेखापरिक्षण केलेले आहे परंतु महालेखापालांचे म्हणणे असे आहे की, त्यांचे समाधान झालेले नाही. महालेखापालांनी आक्षेप घेतल्यानंतर तो मुद्दा लोकलेखा समितीसमोर येतो. या बाबतीत आयुक्तांचे काय मत आहे? यावर आयुक्तानी समितीस सांगितले की, सचिव महोदयांनी सांगितल्याप्रमाणे सन २००४-२००५ पर्यंतचे अनुदान निर्धारणाचे काम शिल्लक होते ते काम एक विशेष मोहिम घेऊन बहुतांश पूर्ण केले. हे काम विभागीय कार्यालयामधील प्रशासकीय अधिकारी करतात. त्यांना या संदर्भात प्रशिक्षण देऊन, विशेष बैठक घेऊन योग्य त्या सूचना देण्यात आल्या होत्या. चार-पाच वर्षापासून प्रलंबित काम होते ते एका वर्षाच्या काळात विशेष मोहिम घेऊन आठ-नऊ महिन्यात पूर्ण केले आहे. सन २००६-२००७ पासून अर्थसंकल्प वितरण प्रणाली (बीडीएस सिस्टिम) सुरु झाली आहे. एका वर्षाचे काम शिल्लक राहिले आहे ते विशेष मोहिम हाती घेऊन ६ महिन्यात पूर्ण करण्याची दक्षता घेण्यात येईल.

१६.४३ "दोन महिन्यात त्वरेने खर्च करणे टाळण्यासाठी खर्चाचे नियतकालिक संनियंत्रण दोन घटकात करण्यात आले नव्हते" या आक्षेपाबाबत विभागाचे काय म्हणणे आहे ? अशी समितीने विचारणा केली असता, सचिवांनी खुलासा केला की, सदर योजना ह्या जिल्हास्तरीय आहेत, त्या योजना जिल्हा परिषदामार्फत राबविल्या जातात. त्यासाठी योजनेचे

प्रस्ताव तयार करुन मंजुरीसाठी विषय समिती, स्थायी समिती व जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये सादर केले जातात. जिल्हा परिषदेच्या समितीच्या सभा वारंवार होत नसल्यामुळे लाभार्थी निवडीस अंतिम मंजुरी मिळण्यास विलंब होतो, तसेच पशुवैद्यकीय दवाखाने व पशुप्रथमोपचार केंद्राचे बांधकाम योजने अंतर्गत निवासी व बिगरनिवासी इमारतींचे नकाशे व अंदाजपत्रके, संबंधित जिल्हा परिषदांकडून तयार केले गेल्यावर पशुसंवर्धन आयुक्तालयाकडून प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्राप्त झाल्यानंतर बांधकाम विभागाकडून कामास प्रत्यक्ष सुरुवात होते. या कार्यपद्धतीस बराच विलंब होतो, त्यामुळे प्रत्यक्ष खर्च शेवटच्या दोन महिन्यात जास्त प्रमाणात होतो. तसेच साधनसामुग्री खरेदीच्या संदर्भात रेट कॉन्ट्रक्ट वेळोवेळी निश्चित होत असल्यामुळे ती खरेदी वर्षाच्या शेवटी होत असते. अशा विविध कारणांमुळे शेवटच्या तिमाहीमध्ये खर्च जास्त झालेला दिसतो आहे. आता अर्थसंकल्प वितरण प्रणाली (बी.डी.एस.ची कार्यप्रणाली) शासनाने सुरु केलेली आहे व ती प्रत्येक विभागास लागू करण्यात आली आहे. सदरहू बाबींसंबंधीची तरतूद त्याच महिन्यात खर्च करावी लागते, ती जर तरतूद वेळेवर खर्च केली नाही तर, ती रक्कम व्यपगत होते. अर्थसंकल्प वितरण प्रणालीमुळे (बी.डी.एस. कार्यप्रणालीमुळे) आता तरतूद वेळीच खर्च होईल. त्यामुळे यापुढे शेवटच्या तिमाहीमध्ये तरतूद मोठ्या प्रमाणात खर्च करण्याचा प्रश्न उद्‌भवणार नाही.

१६.४४ समितीने रेट कॉन्ट्रक्ट निश्चित होण्यासाठी विलंब का लागला ? याबाबत विचारणा केली असता, विभागीय सचिवानी खुलासा केला की, या योजने अंतर्गत विविध कामे करण्यासाठी तसेच साधनसामुग्री खरेदी करण्यासाठी निविदा मागविण्यात आली होती, परंतु त्यास प्रतिसाद मिळाला नाही. निविदा मागविणे आणि ते निश्चित करणे या प्रक्रियेस देखील उशीर होत होता, परंतु आता दर कराराची कार्यवाही एप्रिल पासूनच सुरु होणार असल्यामुळे आता विलंब लागणार नाही. आता अर्थसंकल्प वितरण प्रणाली (बी.डी.एस.कार्यप्रणाली) सुरु झाल्याने पुढील वर्षापासून असे प्रकार होणार नाहीत. बऱ्याच वेळा नाबार्ड, केंद्र व राज्य शासन यांच्याकडून निधी उशिराने प्राप्त होतो, त्यामुळे दर करार निश्चित होण्यास विलंब होतो.

१६.४५ आर्थिक वर्षाच्या सुरुवातीलाच दर करार निश्चित होणे गरजेचे होते, परंतु या प्रकरणांमध्ये तसे झालेले दिसत नाही. या प्रकरणातले दर करार कधी निश्चित झाले? अशी

विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवानी खुलासा केला की, या प्रकरणातील दर करार उशिराने निश्चित झाले आणि त्यामुळे वर्षाच्या शेवटच्या तिमाहीमध्ये मोठ्या प्रमाणात खर्च झालेला आहे. जिल्हा परिषदांचा समितीच्या सभा वेळोवेळी होत नसल्यामुळे, बांधकामे तसेच साधनसामुग्री खरेदीसाठी वित्त विभागाची व शासनाची मंजुरी मिळण्यास विलंब होणे, त्याचप्रमाणे नाबार्डचा निधीचा हिस्सा वेळेवर प्राप्त न होणे अशा विविध कारणांमुळे शेवटच्या तिमाहीमध्ये ६४ ते १०० टक्के खर्च झालेला आहे.

१६.४६ यावर समितीने विचारणा केली की, अर्थसंकल्प वितरण प्रणाली (बी.डी.एस. कार्यप्रणाली) कार्यान्वीत झाली आहे असे आपण म्हणता आहात. आताच्या परिस्थितीत काय पद्धत आहे ? यावर विभागीय सचिवानी सदर योजनांबाबत जानेवारी ते मार्च या तिमाहीमध्ये ४० टक्के खर्च झाला होता आणि एप्रिल ते डिसेंबर या कालावधीत ६० टक्के खर्च झालेला आहे असा खुलासा केला.

१६.४८ समितीने विचारणा केली की, योजनांच्या कामाच्या बाबतीत तिमाही नियोजन का करीत नाही ? तिमाही नियोजन सदर योजनांच्या कामांसंबंधीची तरतूद कालावधीत ती तरतूद खर्च झाली पाहिजे. अशा प्रकारचे नियोजन का करीत नाहीत ? यावर विभागीय सचिवानी खुलासा केला की, पूर्वी विविध कारणांमुळे योजनांच्या कामावरील निधी वर्षाच्या सुरुवातीला खर्च न होता, तो वर्षाच्या शेवटच्या तिमाहीमध्ये जास्त खर्च होत होता. परंतु आता अर्थसंकल्प वितरण प्रणालीच्या (बी.डी.एस.च्या कार्यप्रणालीच्या) माध्यमातून निधीचे वितरण होत असल्यामुळे तो निधी वेळेतच खर्च करावा लागतो. तो खर्च विहित कालावधीत केला नाही तर सदर निधी खर्च करण्यासाठी वित्त विभागाची मान्यता घ्यावी लागते. त्यामुळे योजनांच्या कामांवरील खर्च विहित कालावधीत केल्याशिवाय पर्याय नाही.

१६.४९ विनियोजनाचे व्यपगत टाळण्यासाठी सन २००१-२००२ ते सन २००५-२००६ या वर्षात ०.०३ ते २.९० कोटी असंवितरीत राहिलेल्या रक्कमाचे आहरण मार्चमध्ये करण्यात आले, यात संहितेच्या तरतूदीचे उल्लंघन झाले प्रकरणी समितीने खुलासा करण्यास सांगितले असता विभागीय सचिवानी पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे यांच्याकडून २००१-२००२ ते २००५-२००६ या कालावधीत काही बाबी व यंत्रसामग्री खरेदी करावयाची होती, परंतु निधी वेळेवर उपलब्ध होऊ न शकल्यामुळे सदरहू कालावधीतील निधी त्याच वर्षी खर्च होऊ शकलेला नाही.

ही तरतूद काही बाबीवर व साधनसामग्रीवर खर्च करावयाची होती, परंतु त्या बाबींचा पुरवठा वर्ष अखेरीस न होऊ शकल्यामुळे कोषागारातून काढलेला निधी त्या आर्थिक वर्षात संवितरीत होऊ शकला नाही. सदर बाबीवर व साधनसामग्रीवर खरेदी संदर्भात ३१ मार्च रोजी मान्यता मिळाली होती, त्यामुळे २ कोटी ८८ लाख रुपयांची रक्कम कोषागारातून आहरण करण्यात आली होती. प्रत्यक्षात साधनसामग्रीचा पुरवठा ११ जुलै रोजी झाला आहे. साधनसामग्रीचा पुरवठा झाल्यानंतर सदर निधीचे संवितरण करण्यात आले आहे. निधी व्यपगत होऊ नये म्हणून कोषागारातून अगोदरच रक्कम काढण्यात आली होती, अशी वस्तुस्थिती नाही असा खुलासा केला.

१६.५० समितीने विचारणा केली की, केंद्राच्या हिश्याची तरतूद प्राप्त होण्या अगोदरच राज्याच्या योजनांसाठीची तरतूद का करण्यात येत नाही ? त्यावर विभागीय सचिवानी खुलासा केला की, केंद्र शासनाकडून विविध योजनांसाठी येणारा हिस्सा उशिरा प्राप्त होतो. केंद्राकडून हिश्याची तरतूद प्राप्त झाल्यानंतर राज्य सरकार आपल्या हिश्याच्या रक्कमेची तरतूद करीत असते.

१६.५१ केंद्राकडून हिश्याची रक्कम मिळावी म्हणून विभागाकडून पाठपुरावा केला जातो काय ? केंद्र शासनाकडून हिश्याची रक्कम उशिरा येण्यामागची कारणे काय आहेत ? विभागाकडून सातत्याने पाठपुरावा केला जात नसल्यामुळे सदरची रक्कम उशिरा प्राप्त होते असे समितीचे मत झाले आहे. याबाबतीत समितीने वस्तुस्थिती विचारली असता केंद्र शासनाकडून विविध योजनांचा हिस्सा मिळावा म्हणून संबंधित विभागांकडून पाठपुरावा करण्यात येत असतो, असा विभागीय सचिवांनी खुलासा केला.

१६.५२ आठ जिल्ह्यातील ५४ आहरण आणि संवितरण अधिकाऱ्यांपैकी सहा जिल्ह्यातील १० आहरण आणि संवितरण अधिकाऱ्यांनी एप्रिल, २००१ आणि मार्च, २००६ दरम्यान १० ते ६० महिने दरम्यान रोख रकमेची अचानक तपासणी केली नव्हती याबाबतीत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, काही आहरण आणि संवितरण अधिकाऱ्यांनी रोख रकमेची तपासणी करण्यात आली नव्हती ही वस्तुस्थिती आहे. ही बाब लेखापरिक्षकांनी निदर्शनास आणून दिल्यानंतर पशुसंवर्धन आयुक्तालयाने त्यांच्या अखत्यारित असलेल्या राज्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना अचानक रोखवहीची तपासणी करण्याबाबतच्या सूचना दिनांक २०

जुलै, २००७, १४ सप्टेंबर, २०१०, १६ ऑक्टोबर, २०१० या पत्रान्वये दिलेल्या आहेत. ज्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी अचानक रोखवहीची तपासणी केली नाही, त्यांना समज देण्यात आली आहे. या प्रकरणी रोखवहीची प्रत्यक्षात तपासणी केली नाही, तपासणी उशिरा झालेली आहे. या प्रकरणी कोणत्याही प्रकारचा रकमेचा अपहार झालेला नाही. त्या अधिकाऱ्यांना सक्त ताकीद देण्यात आली आहे. यापुढे असा प्रकार निदर्शनास आला तर सक्त कारवाई करण्यात येईल अशा प्रकारची समज देण्यात आली आहे. रोखवहीची प्रत्यक्षात तपासणी नाही ही वस्तुस्थिती आहे, तपासणीचे काम नंतर करुन घेण्यात आले आहे व याबाबत संबंधितांना समज देखील दिलेली आहे.

१६.५३ सन १९८६ ते २००६ या काळात ७३ कुक्कुट पालन सहकारी संस्थांना रुपये ४८.५१ कोटीचे आर्थिक सहाय्य देण्यात आले. परंतु विभागाने त्याबाबत कोणत्याही मार्गदर्शक सूचना जारी केल्या नव्हत्या. संनियंत्रण समितीच्या ६ जिल्ह्यापैकी एका (धुळे) जिल्ह्यात सभा घेण्यात आल्या नव्हत्या त्यामागची कारणे काय आहेत ? सन २००६ मार्च अखेर रुपये ६१.०७ कोटी प्रलंबित वसुली होती याबाबतच्या सद्यःस्थितीबाबत खुलासा करण्यास समितीने सांगितले असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, १९८६ ते २००६ या काळात ७३ कुक्कुट पालन सहकारी संस्थांना कर्ज भांडवल आणि सहाय्यक अनुदानाच्या स्वरुपात विभागामार्फत ४८.५१ कोटी रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात आले होते. २००२ पासून सदर संस्थांचे कामकाज जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत झालेले आहे. त्यामुळे संनियंत्रण सभा झाल्या नव्हत्या. मागील कालावधीत १९० संनियंत्रण सभा झाल्या आहेत. या कुक्कुट पालन सहकारी संस्थाना ४८.५१ कोटी रुपयांच्या दिलेल्या कर्जापैकी ८.९६ कोटी रुपये वसूल झालेले आहेत. या एकूण ७३ संस्था पैकी सद्यःस्थितीत २६ संस्था चालू आहेत. २८ संस्था बंद आहेत. अन्य १९ संस्था अवसायानामध्ये निघालेल्या आहेत. या संस्थांना एन.सी.डी.सी.आणि राज्य शासनाने हमी दिली असल्याने शासनाला रक्कम भरावी लागली. राज्य शासनाची या संस्थांकडे रक्कम अडकलेली आहे, ती वसूल करण्यासाठी एक सविस्तर योजना तयार करण्यात येऊन त्या योजनेची टिप्पणी मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी येत्या दोन महिन्यात सादर करण्यात येईल. या संस्थांना ८० टक्के कर्ज आणि १५ टक्के आर्थिक सहाय्य राज्यशासनाकडून देण्यात येत होते. आता ६० टक्के कर्ज आणि ३५ टक्के भागभांडवल राज्य शासनाकडून देण्यात येते. परंतु, या संस्थांकडे

राज्य शासनाचा मोठा निधी अडकून पडल्याने कुक्कुट पालन सहकारी संस्थांना हमी द्यावयाची नाही असा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतलेला आहे.

१६.५४ समितीने विचारणा केली की, ग्रामीण भागात जनावरांवर औषधोपचार करण्यासंदर्भात फार मोठी अडचण झालेली आहे. ग्रामीण भागात पशुचिकित्सालये पुरेसे नाहीत, जी पशुचिकित्सालये आहेत ती नादुरुस्त आहेत. ग्रामीण भागातील पशुचिकित्सालयांच्या दुरुस्ती करण्याबाबत काय उपाययोजना करण्यात येणार आहे ? यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, पशुचिकित्सालय दुरुस्तीसाठी रु. १४७.३६ कोटीचे प्रकल्प मंजूर झाले आहेत. विद्यमान वर्षी या बाबीवर १२ कोटी रुपये खर्च करण्यात येत आहे. उर्वरित पशुचिकित्सालयासाठी ५५ कोटी रुपयांची प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे. यामध्ये पशुचिकित्सालयांची दुरुस्ती करण्यात येणार आहे, तसेच उपकरणे देखील उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

१६.५५ समितीने मार्च २००६ अखेर ६१.०७ कोटी रुपयांची कर्ज वसुली बाकी होती, त्याबाबतच्या सद्य:स्थितीबाबत विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, ८ कोटी ९६ लाख रुपयांची वसुली झालेली आहे. सद्य:स्थितीत २६ संस्था चालू आहेत. २८ संस्था बंद झाल्या आहेत. प्रत्यक्षात १९ संस्था अवसायानामध्ये निघालेल्या आहेत.

१६.५६ समितीने या संस्थांकडून वसुली केव्हापर्यंत होईल ? असे विचारले असता, विभागीय सचिवांनी या संस्थांनी जमिनी तारण ठेवलेल्या आहेत. त्या जमिनींचे लिलाव केले तरच ही कर्ज वसुली होऊ शकते. ज्या संस्थांकडे कर्ज थकित आहे, त्यांना एक रकमी चुकता करण्याबाबत संधी दिली जाईल. एक रकमी चुकता करुन उरलेले पैसे संस्था भरण्यास तयार असेल तर अशा संस्थांचा विचार केला जाईल असा खुलासा केला.

१६.५७ समितीने ज्या १९ कुक्कुटपालन सहकारी संस्था अवसायानामध्ये निघालेल्या आहेत, त्यांच्या सद्य:स्थितीबाबत विचारले असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, या संस्था २००४ पासून अवसायानामध्ये निघालेल्या आहेत. या संस्था चालकांना एक रकमी चुकतीची संधी देऊन त्यामधून काही मार्ग निघाला नाही तर त्या संस्थांकडून कर्ज वसुली केली जाईल. कर्ज वसुलीच्या संदर्भात एक योजना तयार करण्यात येईल आणि त्याप्रमाणे वसुलीची कार्यवाही सुरु करुन सदर योजनेबाबतची माहिती दोन महिन्यात सादर करण्यात

येईल. यावर समितीने अशी विचारणा केली की, या संस्थांचे व्यवस्थापन बरोबर नसल्याने या संस्था अवसायानामध्ये निघालेल्या आहेत असे आपल्याला वाटत नाही काय ? त्यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, या संस्थांचे व्यवस्थापन बरोबर नाही, ही वस्तुस्थिती आहे. जो पर्यंत या संस्थांचे संनियंत्रण विभागाच्या स्तरावर होते त्यावेळी सदर संस्था व्यवस्थित होत्या. ज्यावेळी या संस्थांचे संनियंत्रण विभागाकडे होते, त्यावेळी १९० सनियंत्रण सभा घेण्यात आल्या होत्या व त्यावेळी त्या संस्था व्यवस्थापनास चांगल्या प्रकारे मार्गदर्शन केलेले आहे.

१६.५८ या संस्थांचे व्यवस्थापन चांगले नाही म्हणून संस्था अवसायानामध्ये निघाल्या. आपण एक रकमी चुकता करण्याची तयारी दाखविली तरी या संस्थाकडून कर्जाची वसुली पूर्णपणे होईल असे समितीला वाटत नाही. म्हणून या संस्थांकडून कर्जाची वसुली करण्यासंदर्भात काही पर्यायी योजना तयार केली आहे काय अशी विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी या संस्था चालकांना एक रकमी चुकता करण्याची संधी देण्यात येणार आहे. जर एक रकमी चुकता प्रक्रियेमध्ये यश प्राप्त झाले नाही तर वसुली करण्यासंदर्भात एक योजना तयार केली जाईल असा खुलासा केला.

१६.५९ समितीचे असे मत आहे की, कुक्कुट पालन सहकारी संस्थांमध्ये फार मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. सदर संस्था चालक हे अधिकाऱ्यांशी संगनमत करुन केंद्र शासनाकडून अर्थसहाय्य घेतात आणि नंतर ती संस्था अवसायानामध्ये काढतात. अधिकाऱ्यांच्या सहकार्याशिवाय केंद्र सरकारची अर्थसहाय्य मिळणे शक्य नाही. अशा प्रकारास आळा घालण्यासाठी काही उपाययोजना करण्यात येणार आहे काय ? यावर यापुढे असे प्रकार होणार नाहीत याकडे लक्ष घातले जाईल, असे सचिवांनी समितीस सांगितले. समितीने विचारणा केली की, या संस्थांकडे एवढया मोठ्या प्रमाणात कर्जाची वसुली थकित आहे. सदरहू संस्थांकडून कर्ज वसुली होण्यासंदर्भात काय कार्यवाही केली गेली ? तसेच ज्या संस्था अवसायानामध्ये निघालेल्या आहेत, त्यांच्याकडून कर्ज वसुलीच्या संदर्भात काय कार्यवाही केली आहे ?

१६.६० यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, या संस्थांकडून आतापर्यंत ८ कोटी ९६ लाख रुपयांची कर्ज वसुली करण्यात आलेली आहे. सद्यःस्थितीत तरी या संस्थांकडून वसुलीच्या बाबतीत म्हणावा तेवढा प्रतिसाद मिळत नाही. त्यामुळे राज्य

मंत्रिमंडळाने दिनांक २४ नोव्हेंबर, २००१ रोजी कुक्कुट पालन सहकारी संस्थांना हमी द्यावयाची नाही, असा निर्णय घेतला आहे.

१६.६१ यावर समितीने विचारणा केली की, अवसायानामध्ये निघालेल्या संस्थांकडून कर्ज वसुली कशी केली जाणार आहे. तसेच अवसायानामध्ये निघालेल्या संस्थाकडून कर्जाची वसुली कशा पद्धतीने केली जाणार आहे ? विभागीय सचिवांनी खुलासा केली की, या संस्थांकडून कर्ज वसुली करावयाची असेल तर त्यांच्या ज्या जमिनी तारण आहेत, त्यांचा लिलाव करणे हा एक पर्याय आहे आणि दुसरा पर्याय एक रकमी चुकता करणे हा आहे. ज्या संस्था कर्ज भरु शकत नाही, त्या संस्थांच्या तारण असलेल्या जमिनींची विक्री करुन त्यातून मिळणाऱ्या पैशातून ही वसुली करण्यात येईल.

१६.६२ यावर या संस्थांच्या जमिनी तारण आहेत, त्यातून मिळणाऱ्या पैशातून सदरची कर्ज वसुली केली जाईल, असे या ठिकाणी सांगितले. या संस्थांच्या जमिनीची खरेदी करण्यास संस्था चालक पुढे येतात. त्याचे कारण असे की, आज त्या जमिनींचे भाव मोठ्या प्रमाणात वाढलेले आहेत. या संस्था गावापासून दोन-तीन कि.मी. अंतरावर असल्याने संस्था चालक जमीन घेण्यास उत्सुक आहेत. या जमिनींचा लिलाव करुन ती जमीन संस्था चालकांना देणे म्हणजे त्यांना हे योग्य होणार नाही. म्हणून या जमिनींच्या विक्रीच्या बाबतीत ठोस निर्णय घेतला पाहिजे. या संस्थांच्या कारभारात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे, असे मत समितीने व्यक्त केले.

१६.६३ यावर विभागीय प्रतिनिधीनी खुलासा केला की, २००४ पासून या संस्था अवसायानामध्ये निघालेल्या आहेत. तसेच या संस्थावर सहकार खात्याचे सहाय्यक निबंधकांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांच्या समवेत बैठक घेण्यात आली आहे. या संस्थांचे संनियंत्रण हे जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांकडे आहे. जिल्हा परिषदेच्या जिल्हास्तरीय समितीने यासंदर्भात वारंवार बैठका घेणे अपेक्षित आहे. ज्या संस्था सुरु आहेत, त्या कार्यक्षमपणे चालू आहेत की नाही याचा आढावा घेतला पाहिजे. त्याचप्रमाणे ज्या संस्था अवसायानामध्ये निघाल्या आहेत, त्यांच्याकडून वसुली कशा पद्धतीने करता येईल याचा देखील आढावा त्यांनी घेतला पाहिजे. ज्या संस्था अवसायानामध्ये निघाल्या आहेत त्या संस्था चालकांना एक रकमी चुकता करण्यासाची संधी देऊन जर त्यांनी प्रतिसाद दिला नाही तर त्यांच्या तारण असलेल्या

जमिनीची विक्री करुन वसुली करु. त्या जमिनीच्या किंमती किती पटीने वाढल्या आहेत काय आहेत काय याबाबतची चौकशी करु व जिल्हा उप निबंधक यांची मान्यता घेऊन अवसायानामध्ये निघालेल्या जमिनींची विक्री करण्यासंदर्भात प्रस्ताव तयार करण्यात येईल. त्याचप्रमाणे या जमिनी संदर्भात सार्वजनिक लिलाव करण्यात येईल. सार्वजनिक लिलाव मध्ये जी व्यक्ती जमिनीस जास्त भाव देईल त्यास सदर जमीन देण्यात येईल. खुल्या पद्धतीने लिलाव होणार असल्यामुळे कोणीही व्यक्ती जमीन विकत घेऊ शकतो. अवसायानामध्ये निघालेल्या संस्थांच्या तारण असलेल्या जमिनी संदर्भात सार्वजनिक लिलाव करुन त्यांच्याकडील थकित असलेली कर्ज वसुली करण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल.

१६.६४ समितीने एक रकमी चुकता करण्याच्या प्रक्रियेबाबत विचारले असता, विभागीय प्रतिनिधीनी खुलासा केला की, जेव्हा याचे लेखापरीक्षण झाले तेव्हा मुद्दल, व्याज आणि दंडात्मक व्याज असे एकंदर ६१ कोटी रुपये शिल्लक होते. सद्य:स्थितीमध्ये थकित रक्कम ८६ कोटी रुपयांची आहे. परंतु याबाबतीत वारंवार पाठपुरावा करुन देखील वसूली झालेली नाही. यामध्ये चुकीच्या नियोजनामुळे किंवा २००५-२००६ मध्ये बर्ड फ्ल्यू रोगाची साथ पसरल्यामुळे मध्यंतरीच्या काळामध्ये सेट बॅक बसला होता. परंतु आता आम्ही या निष्कर्षाप्रत आलो आहोत की, ज्याप्रमाणे शेतकऱ्यांची मध्यम मुदतीची, दीर्घ मुदतीची कर्जे घेतलेली आहेत आणि सतत प्रयत्न करुनही वसुली होऊ शकत नाही. त्यांच्या बाबतीत एक रकमी चुकता करण्याची प्रक्रिया केली त्या प्रमाणे दंडात्मक व्याज कमी करुन सरळ व्याज पूर्ण घेतले तरच याबाबत शक्य आहे. हा धोरणात्मक निर्णय असल्यामुळे याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर केला जाईल आणि तसे झाले तर मग पैसे वसूल होतील. अवसायानामध्ये गेलेल्या संस्थाच्या बाबतीत लिलावाची प्रक्रिया करण्यासाठी येत्या सहा महिन्यामध्ये प्रयत्न करु, असे समितीस सांगितले.

१६.६५ समितीने विचारणा केली की, शासनाने आदिवासी विकास कार्यक्रमांतर्गत निधी दिलेला आहे. ही बाब समाजकल्याण विभागाशी संबंधित असली तरी त्याबाबत आकडेवारी देण्यात यावी. आदिवासी विकास योजना या कार्यक्रमांतर्गत योजना राबविण्यात येत आहे, असे असताना त्याकरता काही निधी दिला असेलच याबाबत विभागीय प्रतिनिधीनी खुलासा केला की, एन.सी.डी.सी. च्या माध्यमातून निधी प्राप्त झाला आहे आणि शासनाने त्याला हमी दिली

आहे. डी.पी.डी.सी.च्या माध्यमातून निधीचे वाटप होते. एन.सी.डी.सी. मार्फत कुक्कुटपालन योजना राबविली जाते. तसेच एस.सी.पी. आणि टी.एस.पी. मध्ये मागासवर्गीयांच्या वैयक्तिक लाभार्थींसाठी योजना राबविली जाते.

१६.६६ समितीने विचारणा केली की, प्रामुख्याने या योजना समाजकल्याण विभागामार्फत, आदिवासी विकास विभागामार्फत राबविल्या जात आहेत. या दोन विभागांच्या बाबतीत सध्या परिस्थिती काय आहे? यावर विभागीय प्रतिनिधीने खुलासा केला की, या विभागांच्या अंतर्गत राबविणाऱ्या योजनांवर दरवर्षी खर्च केला जात आहे. अनुदान आणि लाभार्थींचा हिस्सा यासाठी कर्ज नसते.

१६.६७ केवळ अनुदान देऊन चालते काय ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधीनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेच्या माध्यमातून शेळी-मेंढी वाटप, गुरांचे वाटप इ. विविध योजना राबविल्या जातात. त्यामध्ये लाभार्थीचे ५० टक्के आणि ५० टक्के अनुदान देतो.

१६.६८ वास्तविक पहाता सहकार विभाग, पशुसंवर्धन विभाग यांनी या योजना यशस्वीपणे राबविल्या पाहिजेत. परंतु तसे झाले नाहीतर त्या-त्या संस्थांवर जबाबदारी निश्चित करून दिली जाते. प्रत्यक्षात याबाबत सहकार विभाग, पशुसंवर्धन विभागावर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करावयास पाहिजे, तशी ती करण्यात येत नाही. कारण यामध्ये शासनाच्या निधीचा दुरुपयोग होत आहे. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, यामध्ये कुक्कुटपालन संस्थाची तसेच सहकार विभाग व पशुसंवर्धन विभागाची महत्त्वाची जबाबदारी आहे. वसूली करण्याच्या बाबतीत सांगावयाचे तर सक्तीने वसूल करण्याचे अधिकार नसल्यामुळे याबाबतीत पाठपुरावा करणे, वारंवार पत्र लिहीण्याशिवाय पर्याय नाही.

१६.६९ ज्या-ज्या संस्थांना अनुदान देण्यात आलेले आहे, त्यातील किती संस्था चांगल्या प्रकारे कार्यरत आहेत ? १० टक्के संस्था सुरु आहेत की १०० टक्के सुरु आहेत ? याबाबत विभागीय सचिवानी खुलासा केला की, ७३ संस्थांपैकी २००९-२०१० या वर्षापर्यंत २६ संस्था सुरु आहेत म्हणजे हे प्रमाण ३० ते ३३ टक्क्यांपर्यंत आहे. तसेच २८ संस्था बंद असून आणि १९ संस्था अवसायनात आहेत. यावर समितीने पुन्हा विचारणा केली की, २६ संस्था यशस्वीपणे

कशा सुरु आहेत ? याबाबत विभागीय सचिवानी सांगितले की, सहकारी संस्थांची ते चालविण्याची मानसिकता आहे.

१६.७० ज्या संस्था बंद आहेत किंवा अवसायनात आहेत, त्याबाबतीत संबंधित अधिकाऱ्यांनी काय कारवाई केली ? त्यांची या संस्था चालविण्याची मानसिकता आहे काय ? परंतु केवळ शासनाचे अनुदान घेऊन या संस्था बंद करावयाच्या असतील तर शासनाने वेगळा विचार करण्याची आवश्यक आहे. त्यामुळे सध्या कोणत्या संस्था सुरु आहेत ? ज्या संस्था बंद असतील त्याची कारणे काय आहेत ? तसेच या संस्था सुरु होण्यासाठी विभागाने काय प्रयत्न केले आहेत ? याबाबतची माहिती समितीने विचारली असता, विभागीय समितीला सचिवांनी होकारार्थी उत्तर दिले. मात्र अद्यापही सदर माहिती विभागाकडून प्राप्त झालेली नाही.

१६.७१ जिल्हा स्तरावरील वैरण विकास अवेक्षणाच्या संदर्भातील मुद्दा आहे. विभागाने वैरण व्यवस्थापनाकडे योग्य लक्ष पुरविलेले नाही. याबाबत विभागाचे काय म्हणणे आहे? यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, दिनांक २५ मे, २००४ च्या शासन निर्णयाप्रमाणे आयुक्त कार्यालयाची पुनर्रचना करण्यात आली आहे. त्यामध्ये आयुक्त कार्यालयातील २ पदे, जिल्हा कार्यालयातील १२ पदे व प्रक्षेत्रामधील ५ अशी एकंदर १९ सहाय्यक वैरण विकास अधिकाऱ्यांची पदे अतिरिक्त ठरविण्यात आली. आता २००४-२००५ पासून जिल्हा स्तरावर पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालयातील सहाय्यक पशुधन विकास अधिकारी व पशुधन पर्यवेक्षक यांची मदत घेऊन आपण ही योजना राबवित आहोत. २००३-२००४ मध्ये ५२,००० किलो, २००५-२००६ मध्ये ४४,३०० किलो तसेच २००९-२०१० मध्ये ५८,९६० किलो, २०१०-२०११ मध्ये ६०,००० किलो बियाणांचे वाटप करण्यात आले आहे. सध्या जो कर्मचारी वर्ग उपलब्ध आहे, त्यांच्यामार्फतच काम करण्यात येत आहे.

१६.७२ समितीने "महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला यांच्या अयोग्य कार्यशैलीमुळे राज्यामध्ये कृत्रिम रेतन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीवर खूप वाईट परिणाम झाला." याबाबतीत विचारले असता, विभागीय सचिवांनी "महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे पद पशुसंवर्धन विभागातील अतिरिक्त आयुक्त संवर्गातील आहे. पद मंजूरीनंतर सुरुवातीच्या कालावधीत पशुसंवर्धन सहआयुक्त संवर्गातील अधिकाऱ्याकडे या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला. मंडळाकडे एकंदर ५१६ पदे मंजूर आहेत. त्यापैकी

३८१ पदे भरलेली असून १३५ पदे रिक्त आहेत. पण खर्चाचे प्रमाण पाहिले तर १० व्या पंचवार्षिक योजनेमध्ये १३ कोटी ८० लाख रुपये प्राप्त झाले होते आणि ते ३१ मार्चपर्यंत पूर्णपणे खर्च झाले आहेत. ३१ जानेवारी, २०११ अखेरपर्यंत ९.८२ कोटी रुपये खर्च झालेले आहेत आणि १०.८६ कोटी रुपयांचा निधी अखर्चित राहिलेला असून सदरहू निधी मार्च अखेरपर्यंत खर्च करण्याचा प्रयत्न करीत आहोत. मंडळाच्या सभेबाबत सांगावयाचे तर २००३-२००४ ते २००६-२००७ पर्यंत ९ सभा झालेल्या आहेत. २००७-२००८ मध्ये ६ सभा, २००८-२००९ मध्ये १० सभा व २०१०-२०११ मध्ये ७ सभा झालेल्या आहेत आता या सभा वेळेवर होत आहेत," अशी समितीस माहिती दिली.

१६.७३ अंतर्गत लेखा परीक्षणातील कमतरता याबाबत विभागाचे मत काय आहे व आतापर्यंत लेखापरिक्षणाचे निदर्शनास आणल्याप्रमाणे १८१ परिच्छेद प्रलंबित होते. त्यापैकी ७६ परिच्छेद निकालामध्ये काढले आहेत. परंतु २००४-२००५ पासून परिच्छेद प्रलंबित आहेत, त्याची कारणे काय आहेत? त्यावर विभागीय सचिवांनी पशु संवर्धन विभागाची १४ पदे व्यपगत झाल्यामुळे त्याचा लेखा परीक्षणाच्या कामावर परिणाम झालेला आहे. सदरहू पदे पुन्हा पुनरुज्जीवित करावीत यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. त्याबाबत वित्त विभाग आणि उच्चाधिकार समिती यांच्या मध्ये चर्चा सुरु आहे.

१६.७४ यावर समितीने शासनाकडे सदरहू प्रस्ताव कधी पाठविण्यात आला आहे? याबाबत विचारले असता विभागीय सचिवांनी शासनाकडे सदरहू प्रस्ताव फेब्रुवारी, २०१० मध्ये पाठविण्यात आला असून त्यास जवळजवळ दोन वर्षे झालेली आहेत. समितीने विभागामध्ये अंतर्गत लेखापरीक्षणाची पद्धती कशी आहे याबाबत विचारले असता, त्याबाबत महालेखाकार यांनी सांगितले की, The Department is required to conduct the internal audit of the auditable units every year. The internal audit is not taking place regularly. Only 25 per cent of the units are audited. 75 per cent of the auditable units are remained to be audited. Unless additional staffs are earmarked for this purpose, internal audit would continue to be in arrears.

१६.७५ त्यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, we are trying to revive the posts which have been lapsed due to the reorganisation of the Department. We have submitted a proposal to the Government ot revive the lapsed posts. The said proposal is

pending with the State Government. कर्मचारी नाहीत म्हणून लेखापरीक्षण होत नाही अशी स्थिती आहे. खात्याच्या पुनर्रचनेनंतर या कामासाठी केवळ १४ पदे मंजूर करण्यात आली आहेत. समितीला आपल्या अहवालामध्ये ही बाब नमूद करता येईल. पशुसंवर्धन विभागातील व्यपगत झालेली १४ पदे पुनरुज्जिवीत करावीत यासाठी २००९ मध्ये शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे. परंतु अजूनपर्यंत पाठपुरावा केला नसेल तर कसे कामकाज होणार? याबाबत पुढे काय कार्यवाही झाली आहे? समितीला लेखी स्वरुपामध्ये माहिती सादर करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले मात्र सदर माहिती प्राप्त झालेली नाही.

१६.७६ समितीने लेखापरीक्षण तपासणी अहवालातील ११४१५ परिच्छेद प्रलंबित होते. त्यापैकी ३१५ तपासणी अहवालातील ३ वर्षाहून अधिक काळी प्रलंबित असलेल्या १०८८९ परिच्छेदाबाबतच्या कार्यवाहीची सद्य:स्थितीबाबत विचारले असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, याबाबत विभागामार्फत प्रलंबित लेखापरिक्षण परिच्छेदांचा जलद निपटारा होण्यासाठी सर्व प्रादेशिक स्तरांवर अनुपालन निपटारा धडक मोहिमांचे आयोजन करण्यात आले आणि त्यामध्ये अंतर्गत लेखापरिक्षणाच्या प्रलंबित परिच्छेदांपैकी एकूण १२७५ परिच्छेद निकाली निघालेले आहेत. त्यानंतर दि.१५-११-२०१० ते दि.०४-१२-२०१० या कालावधीमध्ये सर्व प्रादेशिक स्तरांवर धडक कार्यक्रम राबविण्यात आला होता आणि त्यामध्ये एकंदर १४९३ परिच्छेद निकाली काढण्यात आले. अशाप्रकारे एकंदर २७६८ परिच्छेदांचा निपटारा करण्यात आला आहे. बऱ्याच ठिकाणी खात्याच्या पुर्नरचनेमध्ये काही संस्था बंद करण्यात आल्या तर काही दुसरीकडे वर्ग केल्या आहेत. तेथील लेखा आक्षेप अनुपालनाचे काम करण्यासाठी फेब्रुवारी महिन्यामध्ये विशेष मोहिम हाती घेण्यात आली असून त्यावेळी प्रलंबित लेखापरिक्षण परिच्छेदांचा निपटारा होईल यासाठी प्रयत्न करण्यात येईल.

१६.७७ यावर समितीने एकंदर ३१५ तपासणी अहवालातील १०८८९ परिच्छेद तीन वर्षाहून अधिक कालावधीकरता प्रलंबित आहेत ही बाब अतिशय गंभीर आहे. असे मत व्यक्त केले असता दिनांक १५-११-२०१० ते दिनांक ०४-१२-२०१० या एक महिन्याच्या कालावधीत १४९३ परिच्छेद निकाली काढण्यात आले असून आतापर्यंत एकूण २७६८ परिच्छेदांचा निपटारा करण्यात आला आहे आणि यापुढेही अशा प्रकारे सातत्य ठेवण्यात येईल, असा विभागीय सचिवांनी खुलासा केला.

१६.७८ प्रत्येक विभागाकडून प्रतिसाद मिळत नाही काय? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, एक महिन्यामध्ये एकूण २७६८ परिच्छेदांचा निपटारा केला आहे. यानंतर दर दोन महिन्यांनी याबाबत आढावा घेण्यात येणार असून प्रलंबित परिच्छेदांचा निपटारा करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीत आहोत.

१६.७९ जर लेखापरिक्षणाचे परिच्छेद हजारोंच्या संख्येने प्रलंबित रहात असतील तर ही बाब गंभीर आहे, असे समितीने सांगितले. तसेच याकडे विभागाकडून देखील दुर्लक्ष होत असेल तर याबाबत जबाबदारी निश्चित करावी लागेल. संबंधित विभागाच्या दृष्टीने लेखा परीक्षणाच्या बाबतीत काही किंमत आहे असे दिसत नाही.

१६.८० यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, समितीला येत्या सहा महिन्यामध्ये यात निश्चितपणे प्रगती झाल्याचे दिसून येईल. विभागाने हा विषय गांभीर्याने घेतला आहे आणि याबाबतीत कालबद्ध कार्यक्रम हाती घेऊन वर्षभरामध्ये लेखापरिक्षणाच्या प्रलंबित परिच्छेदांचा निपटारा झाला नाही, याबद्दल संबंधितांवर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. त्याशिवाय बाकीची कामे होणार नाहीत. या विभागाच्या तुलनेमध्ये इतर विभागांकडे लेखापरिक्षणाच्या प्रलंबित परिच्छेदांची संख्या एवढ्या प्रमाणात नसावी, म्हणजेच पशुसंवर्धन विभाग लेखापरीक्षणाला महत्व देत नाही असे दिसते, असे समितीने मत व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, लेखापरीक्षण करण्यासाठी लेखा विभागाकडे ज्यादा कर्मचाऱ्याची मागणी केली आहे.

१६.८१ समितीने आपल्या विभागाला लेखापरिक्षणाच्या प्रलंबित परिच्छेदांचा निपटारा करण्यासाठी कोणत्या अडचणी येतात याबाबत समितीला माहिती द्यावी असे सांगितले असता, विभागीय सचिवांनी होकारार्थी उत्तर दिले. परंतु अद्याप समितीस माहिती प्राप्त झालेली नाही.

**अभिप्राय व शिफारशी :**

**१६.८२** पशुसंवर्धन विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी व तोंडी माहितीच्या आधारे पुढीलप्रमाणे अभिप्राय व शिफारशी केलेल्या आहेत.

१६.८३ अनुदान निर्धारण कामाचा अनुशेष हा मुख्यत: जिल्हापरिषदांच्या कमी प्रतिसादामुळे तसेच प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त या कार्यालयातील प्रशासन अधिकारी यांच्या दुर्लक्षामुळे व त्यांनी गांर्भियाने लक्ष न पुरविल्यामुळे राहिला आहे. महालेखाकारांनी

दरवर्षी लेखापरीक्षणामध्ये लेखी सूचना देवूनसुद्धा त्या दुरुस्त झालेल्या नाहीत. अनुदान निर्धारणापैकी ५०% वसूली झाली असून ५०% बाकी आहे. मार्च २००८ पर्यंत प्रलंबित निर्धारणाचे काम पूर्ण करण्याचे लक्ष ठेवण्यात आले होते परंतु सन २०१० पर्यंत निर्धारणाचे लक्ष पूर्ण झालेले नाही. ज्यांच्यावर ही जबाबदारी सोपविली होती त्यांनी ती व्यवस्थित पार पाडली नसतानाही विभागाने त्यांच्यावर कोणतीही कारवाई केली नाही त्यामुळे महालेखाकारांनी हा गंभीर आक्षेप घेतला आहे. सन २००१-२००२ मध्ये २, सन २००२-२००३ मध्ये १६, सन २००३-२००४ मध्ये २९ आणि सन २००४-२००५ मध्ये ३२ अशा एकूण ७९ जिल्हा परिषदांचे निर्धारणाचे काम पूर्ण झाले आहे. सन २००५-२००६ चे निर्धारण शिल्लक आहे. आता सन २०११-२०१२ हे वर्ष सुरु असून सन २०१० या वर्षापर्यंत विचार केला तरी ५ वर्षाचे जिल्हापरिषदेचे निर्धारण बाकी आहे. विशेष मोहिम घेवून आतापर्यंत ७० जिल्हा परिषदांचे निर्धारणाचे काम पूर्ण करण्यात आले असले तरी विभागाच्या कामात गतीमानता दिसून येत नाही. अर्थसंकल्प वितरण प्रणाली (बीडीएस सिस्टिम) आल्यापासून अनुदानाच्या निर्धारणास वेळ लागत नाही असे जे विभागाचे म्हणणे आहे ते योग्य नाही. कारण अर्थसंकल्प वितरण प्रणाली (बीडीएस सिस्टिम), आल्यानंतर लेखापरिक्षकांनी पशुसंवर्धन विभागाचे लेखापरिक्षण केलेले आहे. पशुसंवर्धन विभागाच्या लेख्यांबाबत महालेखाकारांचे अद्याप समाधान झालेले नाही. **यावरुन असे दिसून येते की, विभागाने अद्यापही अनुदान निर्धारण कामात सुधारणा केलेली नाही. त्यामुळे अनुदान निर्धारण कामाची जबाबदारी ज्या प्रशासकीय अधिकाऱ्यावर सोपविलेली होती त्यांच्याविरुद्ध योग्य कारवाई करण्यात यावी व कामात सुधारणा करण्यासाठी कर्मचाऱ्यांना/अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात यावे, तसेच प्रलंबित असलेल्या कामाचा अनुशेष त्वरीत पुर्ण करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

१६.८४ ग्रामीण भागात जनावरांवर औषधोपचार करण्यासंदर्भात फार मोठी अडचण निर्माण झालेली आहे. कारण पशुसंवर्धन विभागात अनेक पदे रिक्त आहेत. रिक्त पदे भरण्याची बाब विभाग गंभीरतेने घेत नाही. रिक्त पदे ज्या ठिकाणी आहेत त्या ठिकाणी जे उमेदवार जाण्यास तयार आहेत त्यांना तेथे नियुक्ती दिली जात नाही आणि जे उमेदवार तेथे जाण्यास इच्छूक नसतात त्यांना तेथे नियुक्ती दिली जाते. त्यामुळे तेथील पदे रिक्त राहतात ही परिस्थिती संपूर्ण महाराष्ट्र राज्यात निर्माण झालेली आहे. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व

मत्स्यव्यवसाय विभागात गट-अ मध्ये ६१० पदे रिक्त आहेत व गट-ब मध्ये १९२ पदे रिक्त आहेत. ग्रामीण भागात अधिकाऱ्यांची मोठ्या प्रमाणात कमतरता आहे. ग्रामिण भागातील पशु चिकित्सालयात जनावरांवर औषधोपचार करण्यासाठी **पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्याने अडचणी निर्माण होतात. त्यामुळे कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभागातील रिक्त पदे लवकरात लवकर भरण्यात यावीत, अशी समितीची शिफारस आहे.**

१६.८५ आठ जिल्ह्यातील ५४ आहरण आणि संवितरण अधिकाऱ्यांपैकी सहा जिल्ह्यातील १० आहरण आणि संवितरण अधिकाऱ्यांनी एप्रिल, २००१ आणि मार्च, २००६ दरम्यान १० ते ६० महिने रोख रकमेची अचानक तपासणी केली नव्हती. ही वस्तुस्थिती विभागाच्या सचिवानी मान्य केली होती. कोषागार नियमानुसार रोख नोंदवहीची नियमित तपासणी करुन खालील नोंदी व रोख रक्कम यांचा ताळमेळ असणे आवश्यक आहे अन्यथा रकमेचा अपहार होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात असते. त्यामुळे आहरण व संवितरण अधिकारी यांनी नियमित रोख नोंदवहीची तपासणी करणे आवश्यक असताना या प्रकरणी तरी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. ज्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी अचानक रोखवहीची तपासणी केली नाही, त्यांना समज देण्यात आली आहे. **यामध्ये रकमेचा अपहार झालेला नसला तरी अनियमितता झालेली असल्याचे दिसून येते. त्यामुळे याप्रकरणी ज्या आहरण आणि संवितरण अधिकाऱ्यांनी अचानक रोखवहीची तपासणी केली नव्हती त्या संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे. तसेच यापुढील काळात कोषगार नियमांचे तंतोतंत पालन होईल याची कटाक्षाने दक्षता घ्यावी असे समितीचे आग्रही मत आहे.**

१६.८७ सन १९८६ ते २००६ या काळात ७३ कुक्कुट पालन सहकारी संस्थांना रुपये ४८.५१ कोटीचे आर्थिक सहाय्य देण्यात आले. २००२ पासून सदर संस्थांचे कामकाज जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत झालेले आहे. त्यामुळे संनियंत्रण सभा झाल्या नव्हत्या. मागील कालावधीत १९० संनियंत्रण सभा झाल्या आहेत. या कुक्कुट पालन सहकारी संस्थाना ४८.५१ कोटी रुपयांच्या दिलेल्या कर्जापैकी ८.९६ कोटी रुपये वसूल झालेले आहेत. या एकूण ७३ संस्थापैकी सद्य:स्थितीत २६ संस्था चालू आहेत. २८ संस्था बंद आहेत. अन्य १९ संस्था अवसायानामध्ये निघालेल्या आहेत. **या संस्थांना एन.सी.डी.सी. आणि राज्य शासनाने हमी दिली असल्याने शासनाला रक्कम भरावी लागली. राज्य शासनाची या संस्थांकडे रक्कम अडकलेली**

**आहे, ती वसूल करण्यासाठी एक सविस्तर योजना तयार करण्यात येऊन त्या योजनेची टिप्पणी मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी येत्या दोन महिन्यात सादर करण्यात येईल, असे सचिवानी समितीस आश्वासित केले, परंतु अद्याप समितीस माहिती प्राप्त झालेली नाही. याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. तरी, समितीस आश्वासित केलेली माहिती तातडीने सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**१६.८८** एकूण १९ कुक्कुटपालन सहकारी संस्था २००४ पासून अवसायानामध्ये निघालेल्या आहेत. या संस्था चालकांना एक रकमी चुकताची संधी देऊन त्यामधून काही मार्ग निघाला नाही तर त्या संस्थांकडून कर्ज वसुली केली जाईल. कर्ज वसुलीच्या संदर्भात एक योजना तयार करण्यात येईल आणि त्याप्रमाणे वसुलीची कार्यवाही सुरु करुन सदर योजनेबाबतची माहिती दोन महिन्यात सादर करण्यात येईल असे समितीस आश्वासित करण्यात आले होते. संस्थांचे व्यवस्थापन नसल्याने या संस्था अवसायानामध्ये निघालेल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे. या संस्थानी एक रकमी चुकता करण्याची तयारी दाखविली तरी या संस्थाकडून कर्जाची वसुली पूर्णपणे होईल असे समितीला वाटत नाही. त्यामुळे समितीचे असे मत आहे की, कुक्कुट पालन सहकारी संस्थांना भ्रष्टाचाराची लागण झालेली आहे. सदर संस्था चालक हे अधिकाऱ्यांशी संगनमत करुन केंद्र शासनाकडून अर्थसहाय्य घेतात आणि नंतर ती संस्था अवसायानामध्ये काढतात. अधिकाऱ्यांच्या सहकार्याशिवाय केंद्र सरकारचे अर्थसहाय्य मिळणे शक्य नाही. **अशा प्रकारास आळा घालण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी. तसेच ज्या संस्था अवसायानामध्ये निघाल्या आहेत त्या संस्थाना एक रकमी चुकता करण्याची संधी देऊनही जर त्यांनी प्रतिसाद दिला नाही तर त्यांच्या तारण असलेल्या जमिनीचा सार्वजनिक लिलाव करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

१६.८९ लेखापरीक्षण तपासणी अहवालातील ११४१५ परिच्छेद प्रलंबित होते. त्यापैकी ३१५ तपासणी अहवालातील ३ वर्षाहून अधिक काळ प्रलंबित असलेल्या १०८८९ परिच्छेदाबाबतच्या कार्यवाहीच्या सद्यस्थितीबाबत वस्तुस्थिती अशी आहे की, विभागामार्फत प्रलंबित लेखापरिक्षण परिच्छेदांचा जलद निपटारा होण्यासाठी सर्व प्रादेशिक स्तरांवर अनुपालन निपटारा धडक मोहिमांचे आयोजन करण्यात आले आणि त्यामध्ये अंतर्गत लेखापरिक्षणाच्या प्रलंबित परिच्छेदांपैकी एकूण १२७५ परिच्छेद निकाली निघालेले आहेत. सर्व

प्रादेशिक स्तरांवर धडक कार्यक्रम राबविण्यात आला होता आणि त्यामध्ये एकंदर १४९३ परिच्छेद निकाली काढण्यात आले. अशाप्रकारे एकंदर २७६८ परिच्छेदांचा निपटारा करण्यात आला आहे. काही संस्था बंद करण्यात आल्या तर काही दुसरीकडे वर्ग केल्या आहेत. तेथील लेखा आक्षेप अनुपालनाचे काम करण्यासाठी फेब्रुवारी महिन्यामध्ये विशेष मोहिम हाती घेण्यात आली होती. असे असले तरी **लेखापरिक्षणाचे परिच्छेद हजारोंच्या संख्येने प्रलंबित राहत असतील तर ही बाब गंभीर आहे. आता प्रलंबित लेखापरिक्षण परिच्छेदांचा जलद निपटारा होण्यासाठी विभागाने पुन्हा आवश्यक ती कार्यवाही करावी व त्यामध्ये सातत्य ठेवण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.**

१६.९० लेखापरिक्षणाचे परिच्छेद हजारोंच्या संख्येने प्रलंबित राहतात कारण त्याकडे विभागाचे दुर्लक्ष होत आहे. याबाबत जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. विभागाने लेखा परीक्षणाचा विषय गांभीर्याने घेतलेला दिसत नाही. **याबाबतीत कालबद्ध कार्यक्रम हाती घेऊन वर्षभरामध्ये लेखापरिक्षणाच्या प्रलंबित परिच्छेदांचा निपटारा करण्यात यावा व याप्रकरणी जे संबंधित दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी व याबाबत केलेल्या कारवाईची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट - अ

# विवरणपत्र ....

## परिशिष्ट ३.६

(संदर्भ: परिच्छेद ३.७.७.३)

### २००४-०५ आणि २००५-०६ कालावधीत जिल्ह्यांत अधिक परिमाणाने धान्य वाटप केल्याचे दर्शविणारे विवरणपत्र

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | लाभार्थींची संख्या | महिन्यांची संख्या ज्यांत अधिक वाटप करण्यांत आले | दरमहा, दरडोई दर माणसी १० किलो वाटपासाठी पात्र परिमाण (क्वींटल मध्ये) | प्रत्यक्ष वाटप केलेले परिमाण (क्वींटल मध्ये) | अधिक वाटप (क्वींटल मध्ये) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रायगड | २५०० | २ | ५००.०० | ५८२.०० | ८२.०० |
| २ | जळगांव | २३०० | ५ | ११५०.०० | ११५५.०० | ५.०० |
| ३ | धुळे | २५०० | ६ | १५००.०० | १९९१.६० | ४९१.६० |
| ४ | नंदुरबार | २६४५ | २ | ५२९.०० | ५४६.०० | १७.०० |
| ५ | अहमदनगर | ३५०० | ४ | १४००.०० | १९९२.८० | ५९२.८० |
| ६ | पूणे (ग्रामीण) | १५०० | २ | ३००.०० | ३५२.०० | ५२.०० |
|  | पूणे (शहरी) | १५०० | १ | १५०.०० | १७७.०० | २७.०० |
| ७ | सातारा | ३१०० | १ | ३१०.०० | ३३२.०० | २२.०० |
| ८ | सांगली | २२०० | १ | २२०.०० | २३४.०० | १४.०० |
| ९ | जालना | २७०० | ७ | १८९०.०० | २२४०.८० | ३५०.८० |
| १० | परभणी | ३००० | ८ | २४००.०० | २८१५.९० | ४१५.९० |
| ११ | लातूर | २५०० | २ | ५००.०० | ७११.०० | २११.०० |
| १२ | अमरावती | ५०० | ३ | १५००.०० | १६२०.०० | १२०.०० |
| १३ | यवतमाळ | ५०० | ३ | १५००.०० | १६१०.०० | ११०.०० |
| १४ | वाशीम | ३४० | २ | ६८०.०० | ७८०.०० | १००.०० |
| १५ | नागपूर (ग्रामीण) | २४०० | १ | २४०.०० | ३३४.०० | ९४.०० |
|  | नागपूर (शहरी) | ६५०० | ४ | २६००.०० | ३११०.०० | ५१०.०० |
| १६ | वर्धा | ६००० | ६ | १८००.०० | २३७८.३० | ५७८.३० |
| १७ | गडचिरोली | २६४० | २ | ५२८.०० | ५७४.०० | ४६.०० |
|  | **एकूण** | **४८८२५** |  | **१९६९७.००** | **२३५३६.४०** | **३८३९.४०** |

# परिशिष्ट - ब

# मंगळवार, दिनांक २९ जून, २०१०
# लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २९ जून, २०१० रोजी शासकीय विश्रामगृह, ओरस, जि.सिंधुदुर्ग येथे सायंकाळी ६.१० वाजता सुरु होऊन सायंकाळी ६.५० वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

**सदस्य**

२) डॉ.नामदेव उसेंडी, वि.स.स.
३) श्री.नवाब मलिक, वि.स.स.
४) श्री.विलास लांडे, वि.स.स.
५) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
६) श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.
७) श्री.बाळा नांदगावकर, वि.स.स.
८) श्री.भाई जगताप - वि.प.स.
९) श्री. विनोद तावडे - वि.प.स.
१०) डॉ. दिपक सावंत - वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**
श्री.सोमनाथ न. सानप, कक्ष अधिकारी.

**साक्षीदार :**

श्री.विक्रमकुमार, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.३.७.१०.१ संदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांची साक्ष घेतली व अपूर्ण राहिली.

## मंगळवार, दिनांक ५ ऑक्टोबर, २०१०
# लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ५ ऑक्टोबर, २०१० रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.४४ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
(३) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स.
(४) श्री.विलास लांडे, वि.स.स.
(५) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
(६) श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.
(७) श्री.आर.एम. वाणी, वि.स.स.
(८) डॉ. दिपक सावंत - वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

(१) श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.
(२) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
(३) श्री.रा.रा. काठे, अवर सचिव (समिती)

**निमंत्रित :**

**महालेखाकार यांचे कार्यालय :**

१) श्री.जी.ए. निर्मलकुमार, उप महालेखाकार, नागपूर.
२) श्री.के.सी. कुरुविल्ला, उप महालेखाकार, मुंबई.

**साक्षीदार :**

**वित्त विभाग :**

१) श्री.विद्याधर कानडे, प्रधान सचिव, (वित्त).
२) श्री.राजेश अग्रवाल, सचिव (लेखा व कोषागारे).

**गृह विभाग :**

१) श्री.मेधा गाडगीळ, प्रधान सचिव (गृह).
२) श्री.प्रवीण दिक्षीत, प्रधान सचिव (गृह/विशेष).

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ४.१.१ संदर्भात गृह व वित्त विभाग यांची साक्ष घेतली व अपूर्ण राहिली आणि परि क्र.४.२.१ संदर्भात गृह विभाग यांची साक्ष घेतली व अपुर्ण राहिली.

# बुधवार, दिनांक ६ ऑक्टोबर, २०१०
# लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ६ ऑक्टोबर, २०१० रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.०० वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

१) श्री. दिपक सावंत, वि.प.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

**सदस्य**

२) श्री.निलेश देशमुख-पारवेकर - वि.स.स.
३) श्री.अमित देशमुख - वि.स.स.
४) श्रीमती मिनाक्षी पाटील - वि.स.स
५) श्री.विलास लांडे - वि.स.स.
६) श्री.संजय सावकारे - वि.स.स.
७) श्री.गिरीष महाजन - वि.स.स.
८) श्री.सुर्यकांत दळवी - वि.स.स.
९) श्री.आर.एम.वाणी - वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

१) श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
२) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव

**निमंत्रित :**

**महालेखाकार यांचे कार्यालय :**

१) श्री.जी.ए.निर्मलकुमार, महालेखाकार नागपूर.
२) श्री.के.सी. कुरुविल्ला, उप महालेखाकार, मुंबई.

**साक्षीदार :**

**रोजगार व स्वंयरोजगार विभाग :**

१) श्री.महेश पाठक, सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, रोजगार व स्वयंरोजगार विभाग (अतिरिक्त कार्यभार).
२) श्री.राजीव जलोटा, आयुक्त, रोजगार व स्वंयरोजगार संचालनालय.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ३.३ संदर्भात रोजगार व स्वयंरोजगार विभाग यांची साक्ष घेतली व अपूर्ण राहिली.

## मंगळवार, दिनांक १९ ऑक्टोबर, २०१०

# लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १९ ऑक्टोबर, २०१० रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १२.५० वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

१) श्री. नाना पटोले, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

**सदस्य**

(२) श्री.निलेश देशमुख-पारवेकर - वि.स.स.
(३) डॉ.नामदेव उसेंडी - वि.स.स.
(४) श्री.ए.टी.पवार - वि.स.स.
(५) श्री.विलास लांडे - वि.स.स.
(६) श्री.सुर्यकांत दळवी - वि.स.स.
(७) श्री.आर.एम.वाणी - वि.स.स.
(८) श्री.बाळा नांदगावकर - वि.स.स.
(९) डॉ. दिपक सावंत - वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
२) श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
३) श्री.रामनाथ रा. काठे, अवर सचिव (समिती)

**निमंत्रित :**

**महालेखाकार यांचे कार्यालय :**

१) श्रीमती सायन्तानी, प्रधान महालेखाकार.
२) श्री.कुरुविल्ला, महालेखाकार.

**वित्त विभाग :**

श्री.राजेश अग्रवाल, सचिव (लेखा व कोषागारे)

**साक्षीदार :**

**गृह (बंदरे) विभाग :**

श्री. सी.एस. संगीतराव, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.४.२.१ संदर्भात गृह (बंदरे) विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली.

# बुधवार, दिनांक २० ऑक्टोबर, २०१०
# लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २० ऑक्टोबर, २०१० रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १२.३० वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

१) श्री. नाना पटोले, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

**सदस्य**

२) श्री.निलेश देशमुख-पारवेकर - वि.स.स.
३) डॉ.नामदेव उसेंडी - वि.स.स.
४) श्री.ए.टी.पवार - वि.स.स.
५) श्री.विलास लांडे - वि.स.स.
६) श्री.सुर्यकांत दळवी - वि.स.स.
७) श्री.आर.एम.वाणी - वि.स.स.
८) श्री.बाळा नांदगावकर - वि.स.स.
९) डॉ. दिपक सावंत - वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
२) श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
३) श्री.रामनाथ रा. काठे, अवर सचिव (समिती)

**निमंत्रित :**

**महालेखाकार यांचे कार्यालय :**
श्री.पी.ए.निर्मलकुमार, उप महालेखाकार.

**वित्त विभाग :**
श्री.राजेश अग्रवाल, सचिव (लेखा व कोषागारे)

**साक्षीदार :**

**शालेय शिक्षण विभाग :-**

(१) श्री.नंदकुमार, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद.
(२) श्री.नारायण रिंगणे, सहायक संचालक (वि.व ले.)
(३) श्री.प्रकाश साबळे, अवर सचिव.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.३.१ शालेय शिक्षण विभाग यांची साक्ष घेतली व अपूर्ण राहिली.

## बुधवार, दिनांक २७ ऑक्टोबर, २०१०.
## लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २७ ऑक्टोबर, २०१० रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १२.४५ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

१) डॉ.दीपक सावंत, वि.प.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख.

**सदस्य**

२) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
३) डॉ.नामदेव ऊसेंडी, वि.स.स.
४) श्री.ए.टी.पवार, वि.स.स.
५) श्री.विलास लांडे, वि.स.स.
६) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
७) प्रा.राम शिंदे, वि.स.स.
८) श्री.गिरीष महाजन, वि.स.स.
९) श्री.नाना पटोले वि.स.स.
१०) श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

१) श्री.भाऊसाहेब कांबळे, सचिव
२) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव
३) श्री.रामनाथ रा. काठे, अवर सचिव (समिती)

**निमंत्रित :**

**महालेखाकार यांचे कार्यालय :**

१) श्रीमती अनिता पट्टनायक, प्रधान महालेखाकार
२) श्री.बी.मजुमदार, महालेखाकार.

**वित्त विभाग :**

श्री.राजेश अग्रवाल, सचिव (ले. व को.)

**साक्षीदार :**

**१) सामान्य प्रशासन विभाग :-**

श्री.नितीन करीर, प्रधान सचिव

**२) कृषी, पुशसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय (पशुसंवर्धन) विभाग :-**

श्री.अनिल डिग्गीकर, सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.३.४ संदर्भात सामान्य प्रशासन विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली आणि परि.क्र.५.१ **कृषी,** पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय (पशुसंवर्धन) विभाग यांची साक्ष घेतली व अपूर्ण राहिली.

# बुधवार, दिनांक १९ जानेवारी, २०११

# लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १९ जानेवारी, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.०० वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
(३) डॉ. नामदेव उसेंडी, वि.स.स.
(४) श्री. ए.टी. पवार, वि.स.स.
(५) श्री. नवाब मलिक, वि.स.स.
(६) श्री. विलास लांडे, वि.स.स.
(७) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(८) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(९) श्री. गिरीष महाजन, वि.स.स.
(१०) श्री. नाना पटोले, वि.स.स.
(११) श्री. आर.एम. वाणी, वि.स.स.
(१२) श्री. विनोद तावडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव.
२) श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.
३) श्री.सु.सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार.
४) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
५) श्री.रामनाथ रा. काठे, अवर सचिव (समिती).

**निमंत्रित :**

**महालेखाकार यांचे कार्यालय :**

श्रीमती सायंतनी जाफा, महालेखाकार (वाणिज्यिक), मुंबई

**वित्त विभाग :**

श्री.राजेश अग्रवाल, सचिव (लेखा व कोषागारे)

**साक्षीदार :**

**अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग :**

(१) श्री. बलदेव सिंग, सचिव,
(२) श्री. पी.डी. माळवदकर, सह सचिव व वित्तीय सल्लागार

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.३.७ संदर्भात अन्न, नागरी व ग्रामविकास विभाग यांची साक्ष घेतली व अपूर्ण राहिली.

## मंगळवार, दिनांक १ फेब्रुवारी, २०११

# लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १ फेब्रुवारी, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी २.०५ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
(३) डॉ. नामदेव उसेंडी, वि.स.स.
(४) श्री.ए.टी.पवार, वि.स.स.
(५) श्री. विलास लांडे, वि.स.स.
(६) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
(७) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(८) श्री.बाळा नांदगावकर, वि.स.स.
(९) डॉ. दीपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव.
२) श्री.सु.सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार.
३) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
४) श्री.रामनाथ रा. काठे, अवर सचिव (समिती).

**निमंत्रित :**

**महालेखाकार यांचे कार्यालय :**
श्री.निर्मल कुमार, उप महालेखाकार, नागपूर

**वित्त विभाग :**
श्री.राजेश अग्रवाल, सचिव (लेखा व कोषागारे)

**साक्षीदार :**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग :**

(१) श्री.संजय कुमार, प्रधान सचिव
(२) श्री.सिध्देश वाडकर, सहाय्यक संचालक (प्रकल्प)

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ३.१ संदर्भात शालेय शिक्षण विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली.

## मंगळवार, दिनांक २ फेब्रुवारी, २०११

# लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २ फेब्रुवारी, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १२.२५ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

**सदस्य**

(२) डॉ. नामदेव उसेंडी, वि.स.स.
(३) श्री.ए.टी.पवार, वि.स.स.
(४) श्री. विलास लांडे, वि.स.स.
(५) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
(६) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(७) श्री.गिरीष महाजन, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

(१) श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.
(२) श्री.सु.सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(३) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
(४) श्री.रामनाथ रा. काठे, अवर सचिव (समिती).

**निमंत्रित :**

**महालेखाकार यांचे कार्यालय :**
श्री.निर्मल कुमार, उप महालेखाकार, नागपूर

**वित्त विभाग :**
श्री.राजेश अग्रवाल, सचिव (लेखा व कोषागारे)

**साक्षीदार :**

**(१) ऊर्जा विभाग :**
श्री.सुब्रतो रयो, प्रधान सचिव.

**(२) आदिवासी विकास विभाग :**
(१) श्री.उत्तम खोब्रागडे, प्रधान सचिव.
(२) श्री.बी.पी.सिंह, सह सचिव.

**सामान्य प्रशासन विभाग :**
श्री.प्रेमसिंह मीना, प्रधान सचिव.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ४.३.५ संदर्भात आदिवासी विकास विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली.

## मंगळवार, दिनांक ८ फेब्रुवारी, २०११

# लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ८ फेब्रुवारी, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी २.०५ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

(१) श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

**सदस्य**

(२) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
(३) डॉ. नामदेव उसेंडी, वि.स.स.
(४) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स.
(५) श्री. ए. टी. पवार, वि.स.स.
(६) श्री. नवाब मलिक, वि.स.स.
(७) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(८) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(९) श्री. बाळा नांदगावकर, वि.स.स.
(१०) श्री. विनोद तावडे, वि.प.स.
(११) डॉ.दिपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

(१) श्री.सु.सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(२) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
(३) श्री.रामनाथ रा. काठे, अवर सचिव (समिती).

**निमंत्रित :**

**महालेखाकार यांचे कार्यालय :**

(१) श्रीमती अनिता पट्टनायक, प्रधान महालेखाकार, मुंबई.
(२) श्रीमती सायन्तनी जाफा, महालेखाकार, नागपूर.

**वित्त विभाग :**

श्री.राजेश अग्रवाल, सचिव (लेखा व कोषागारे)

**साक्षीदार :**

**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय (पशुसंवर्धन) विभाग :**

श्री.अनिल डिग्गीकर, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ५.५ संदर्भात कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय (पशुसंवर्धन) विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली.

# बुधवार, दिनांक ९ फेब्रुवारी, २०११

# लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ९ फेब्रुवारी, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.३५ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

(१) श्री. नवाब मलिक, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

**सदस्य**

(२) श्री. ए.टी.पवार, वि.स.स.
(३) श्री.विलास लांडे, वि.स.स.
(४) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
(५) प्रा.राम शिंदे, वि.स.स.
(६) श्री.बाळा नांदगांवकर, वि.स.स.
(७) श्री.भाई जगताप, वि.प.स.
(८) डॉ.दीपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

१) श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
२) श्री.सु.सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार.
३) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
४) श्री.रामनाथ रा. काठे, अवर सचिव (समिती).

**निमंत्रित :**

**महालेखाकार यांचे कार्यालय :**

श्री.आर.के.सोळंकी, उप महालेखाकार

**वित्त विभाग :**

श्री.राजेश अग्रवाल, सचिव

**साक्षीदार :**

**(१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग :**

(१) श्री.महेश पाठक, सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, रोजगार व स्वयंरोजगार विभाग (अतिरिक्त कार्यभार)
(२) श्रीमती सीमा ढमढेरे, सह सचिव.
(३) श्री.पु.ल. वागदे, उप सचिव.
(४) डॉ.अभय वाघ, उप सचिव.

**(२) रोजगार व स्वयंरोजगार विभाग :**

(१) श्री.विजय कुमार गौतम, आयुक्त.
(२) श्री.वि.रा.शिरसाट, उप सचिव.

**(३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड**

डॉ.राजु मानकर, उप कुलगुरु.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ३.६ संदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांची साक्ष घेतली व अपूर्ण राहिली आणि परिच्छेद क्र.३.३ रोजगार व स्वयंरोजगार विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली.

## मंगळवार, दिनांक १५ फेब्रुवारी, २०११

# लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १५ फेब्रुवारी, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी २.०५ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

**सदस्य**

२) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
३) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स.
४) श्री. ए.टी.पवार, वि.स.स.
५) श्री. नवाब मलिक, वि.स.स.
६) श्री. विलास लांडे, वि.स.स.
७) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
८) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
९) श्री. सुर्यकांत दळवी, वि.स.स.
१०) श्री. सुरेश देशमुख, वि.प.स.
११) डॉ. दीपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

१) श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
२) श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
३) श्री. ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव
४) श्री. रा.रा.काठे, अवर सचिव (समिती)

**निमंत्रित :**

**महालेखाकार यांचे कार्यालय :**

(१) श्री.निर्मल कुमार, उप महालेखाकार, नागपूर.
(२) श्री.कुरुविल्ला, उप महालेखाकार, मुंबई.

**वित्त विभाग :**

श्री. राजेश अग्रवाल, सचिव

**साक्षीदार :**

**सार्वजनिक बांधकाम विभाग :**

श्री. ममदापुरे, सह सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ४.३.३ संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभाग यांची साक्ष घेतली व अपूर्ण राहिली.

## मंगळवार, दिनांक २१ फेब्रुवारी, २०११

# लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २१ फेब्रुवारी, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १२.५० वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

**सदस्य**

२) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
३) डॉ.नामदेव उसेंडी, वि.स.स.
४) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स.
५) श्री. ए.टी.पवार, वि.स.स.
६) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
७) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
८) श्री.गिरीष महाजन, वि.स.स.
९) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
१०) श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.
११) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.
१२) श्री.बाळा नांदगांवकर, वि.स.स.
१३) श्री.भाई जगताप, वि.प.स.
१४) डॉ. दीपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

१) श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
२) श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
३) श्री. ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव

**निमंत्रित :**

**महालेखाकार यांचे कार्यालय :**

श्री.के.सी.कुरुविला, उप महालेखाकार, नागपूर

**वित्त विभाग :**

श्री. राजेश अग्रवाल, सचिव (वित्त)

**साक्षीदार :**

**सार्वजनिक बांधकाम विभाग :**

श्री. धनंजय धवड, सचिव

**नियोजन विभाग, मंत्रालय:**

श्री. सुधीर श्रीवास्तव, प्रधान सचिव.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ४.३.३ संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली.

## मंगळवार, दिनांक २२ फेब्रुवारी, २०११

# लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २२ फेब्रुवारी, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.१५ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

१) श्री.गिरीष बापट, वि.स.स.

**सदस्य**

२) डॉ.नामदेव उसेंडी, वि.स.स.
३) श्री.ए.टी.पवार, वि.स.स.
४) श्री.नवाब मलिक, वि.स.स.
५) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
६) प्रा.राम शिंदे, वि.स.स.
७) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.
८) श्री.बाळा नांदगांवकर, वि.स.स.
९) डॉ.दीपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव.
२) श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.
३) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
४) श्री.ऋतुराज ज.कुडतरकर, अवर सचिव.
५) श्री.रा.रा.काठे, अवर सचिव (समिती)

**निमंत्रित :**

**महालेखाकार यांचे कार्यालय :**

१) श्री.के.सी. कुरुविल्ला, उप महालेखाकार, मुंबई.
२) श्री.जी.ए.निर्मलकुमार, उप महालेखाकार, नागपूर.

**वित्त विभाग :**

श्री.राजेश अग्रवाल, सचिव (ले व को)

**साक्षीदार :**

**(१) विधी व न्याय विभाग :**

१) श्री.उमेशचंद्र सारंगी, अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग.
२) श्री.विजय अचलिया, प्रधान सचिव व विधी परामर्शी, विधी व न्याय विभाग.

**(२) जलसंपदा विभाग :**

१) एकनाथ पाटील, सचिव
२) श्री.चंद्रशेखर मोडक, सचिव, (लाभक्षेत्र विकास).

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील परि क्र. ४.१.१ गृह, वित्त, विधी व न्याय विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली व परिच्छेद क्र. ४.२.६, ४६.२.७, ४.२.८ संदर्भात जलसंपदा विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली.

## मंगळवार, दिनांक १ मार्च, २०११

# लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १ मार्च, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.४५ वाजता सुरु होऊन दुपारी १.४५ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

**सदस्य**

२) श्री.नवाब मलिक, वि.स.स.
३) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
४) प्रा.राम शिंदे, वि.स.स.
५) श्री.सूर्यकांत दळवी, वि.स.स.
६) श्री.बाळा नांदगावकर, वि.स.स.
७) डॉ.दीपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

(१) श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
(२) श्री.रामनाथ रा. काठे, अवर सचिव (समिती).

**निमंत्रित :**

**महालेखाकार यांचे कार्यालय :**

श्रीमती अनिता पटनायक, प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)

**वित्त विभाग :**

श्री.राजेश अग्रवाल, सचिव (ले.व.को.)

**साक्षीदार :**

**(१) गृहनिर्माण विभाग :**

(१) श्री.गौतम चटर्जी, प्रधान सचिव
(२) सतिश गवई, उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा

**(२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग :**

श्री.महेश पाठक, सचिव.

**(३) तंत्र शिक्षण संचालनालय,**

(१) श्री.सु.का.महाजन.
(२) श्री.प्रमोद नाईक, उप संचालक.

**(४) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग :**

श्री.बलदेव सिंह, सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ व ४.२.३ संदर्भात गृहनिर्माण विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली व परिच्छेद क्र. ३.६ संदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली. परिच्छेद क्र. ३.७ संदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली.

# बुधवार, दिनांक १३ जुलै, २०११

# लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १३ जुलै, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०५ वाजता सुरु होऊन दुपारी २.२५ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

**सदस्य**

२) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
३) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स.
४) श्री.नवाब मलिक, वि.स.स.
५) श्री.विलास लांडे, वि.स.स.
६) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
७) प्रा.राम शिंदे, वि.स.स.
८) श्री.गिरीष महाजन, वि.स.स.
९) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
१०) श्री.भाई जगताप, वि.प.स.
११) श्री.विनोद तावडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

१) श्री.रा.रा.काठे, अवर सचिव (समिती)

**निमंत्रित :**

**महालेखाकार यांचे कार्यालय :**

श्री.जे.एस.करपे, महालेखाकार
श्री.टी.एस.आर.गुप्ता, उप महालेखाकार
श्री.पी.के.सोलंकी, उप महालेखाकार
श्री.टी.थंपन, वरिष्ठ लेखापरीक्षा अधिकारी

**वित्त विभाग :**

श्री.श्रीकांत देशपांडे, सचिव (ले.व.को.)

**साक्षीदार :**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग :**

श्री.मिलिंद म्हैसकर, प्रधान सचिव (अतिरिक्त कार्यभार).

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.३.५ संदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली.

## मंगळवार, दिनांक ४ ऑक्टोबर, २०११

# लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ४ ऑक्टोबर, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

**सदस्य**

२) डॉ.नामदेव उसेंडी, वि.स.स.
३) श्री.नवाब मलिक, वि.स.स.
४) श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.
५) श्री.आर.आर.वाणी, वि.स.स.
६) श्री.बाळा नांदगावकर, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

१) श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
२) श्री.ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव
३) श्री.आर.आर.काठे, अवर सचिव (समिती)

**निमंत्रित :**

**महालेखाकार यांचे कार्यालय :**

श्री.यशवंतकुमार, महालेखाकार (लेखापरीक्षा) II, नागपूर, महाराष्ट्र राज्य.

**वित्त विभाग :**

श्री.श्रीकांत देशपांडे, सचिव (ले. व को.)

**साक्षीदार :**

**शालेय शिक्षण विभाग :**

श्री.संजय कुमार, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.३.५ संदर्भात शालेय शिक्षण विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली.

# मंगळवार, दिनांक १० एप्रिल, २०१२
# लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १० एप्रिल, २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ०३.०० वाजता सुरु होऊन सांयकाळी ४.०५ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

**सदस्य**

२) डॉ.नामदेव उसेंडी, वि.स.स.
३) श्री.ए.टी.पवार, वि.स.स.
४) श्री.संजय सावकारे, वि.स.स
५) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
६) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.
७) श्री.बाळा नांदगावकर, वि.स.स.
८) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

१) श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
२) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
३) श्री.सोमनाथ न. सानप, कक्ष अधिकारी

**समितीने आठवा प्रारूप अहवाल विचारात घेतला व काही सुधारणांसह तो संमत केला.**